१

A

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

**मधुराद्वैताचार्य प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबरावमहाराजविरचित यष्टि ९ उत्तरार्ध**

# पदांची गाथा

ऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽ

# १. मंगलाचरणपर

## १ / श्रीगुरुस्तुति (हिंदी)

(वृत्त-सामनुष्टुप.राग-भूप ताल-तेताला.)

ज्ञानेश्वर गुरु नाथ हमारे ॥धृ०॥
सोहि गणेश बिघ्न के हर्ता । तिनपग सीस उधारे ॥१॥
सोहि शारदा मति के दायक । बैठे बाणि हमारे ॥२॥
सोहि सद्‌गुरू जीव ब्रह्मकर । महावाक्य में रहै सिधारे ॥३॥
सोहि संतसमाजसरूप है । व्यापक जगजगमांहि बिहारे ॥४॥
सोहि तुम श्रोते सज्जन हो । श्रवण करो हरिचरित सुधारे ॥५॥
ज्ञानेश्वरप्रभु तातमातगुरु । मम हिरदें तिनकें पगधारे ॥६॥

## २ / ओवी.

आनंद सरोवर मराळिका । जे चातूर्यचंपककळिका ।
ती वंदिली भावपुळिका । प्रेममयी ॥१॥

## ३ / दिंडी.

शारदेला वंदूनि भक्तिभावें । पुढें वर्णू श्रीगुरूचींच नांवे ।
संतसंगें पावोनि दया शांती । स्वयंवरें वाखाणु कृष्णकांती ॥१॥

## ४ / श्लोक

जया पाहतां आंधळी ज्ञानदृष्टी । प्रकाशें स्वयें द्रष्टृरूपेंचि सृष्टि ।
तया सद्‌गुरुपाउला वंदुनीया । मनोभाव तो देवकीनंदनीं या ॥१॥

## ५ / शिवस्तुति

(जयावृत्त. मूळपीठ.-झिंझोटी. ता- दादरा- गौणपीठ - 'पांडुरंग स्मर अभंग.')

पंच तुंड गले रुंड शिव सकला देवो ।
मंगलपद आठवितां पार्वतिपति पावों ॥धृ॥ (य९.उ.१)*



वन्हिनयन फणिभूषण गुरुगिरिजारावो ।
संप्रदाय यत्सुखास अद्वैतचि ठावो ॥१॥
ज्ञानेश्वरचरणांबुज सौरभसुख लाहो ।
सहज दिसे भवभजनें भवनिधि सुकला हो ॥२॥

* (य९उ.१ = पहिली आवृत्ती- यष्टी ९ / उत्तरार्ध / पान १)

## ६ / गणेशस्तुति

वृत्त सामनुष्टुप, मूळ - सारंग, ताल - तेताला

ये ये ये मंगलमूर्ति । मूषकवाहना ॥धृ०॥
तूं एकचि प्रसिद्ध देवा । रिपु भवहाना ॥१॥
येउनि कीर्तनरंगी । हरि विघ्ने नाना ॥२॥
गणनाथ गजानन स्वामी । शिवपार्वति-तान्हा ॥३॥
मम मन हे लावी देवा । ज्ञानेश्वरचरणध्याना ॥४॥

## ७ / कात्यायनी देवीची स्तुति

(वृत्त - सामकामदा, मू - झिंझोटी, ता - यतिलग्न (दादरा) गौण -''पांडुरंग स्मर अभंग'')

ब्रह्मकुमरि शरण तुला घेइ पल्लवी ।
कात्यायनि स्वरुपचि तूं म्हणुनी मी लवी ॥धृ०॥
नाचरंग करुनि दंग कृष्ण भूलवी । कात्यायनिव्रतकथाहि अग्रिं चालवि ॥१॥
जगत तुझे बाळ म्हणुनी साह्यता करी । कथाश्रवणकारकांस भक्ति दे पुरी ॥
ज्ञानेश्वरचरणांबुज तीर्थ सेवुनी । प्रार्थितसो येइ जननी रंग-भूवनी ॥३॥

## ८ / गणेशस्तुति

वृत्त - विशाखा, रा - यमन, ता - राजविद्याधर (तेताला)

गजानन शंकर नंदन जो ॥धृ०॥
भवभय हरुनी क्षणातचि करी । दुर्जन-कंदन जो ॥१॥
सुरवर मुनिजन यांचे घेतो । अक्षय वंदन जो ॥२॥
ज्ञानेश्वरनंदीनि पति याची । यशुमतिनंदन जो ॥३॥

## ९ / गणेशस्तुति

सुशीलावृत्त.रा.-यमन. ता.-तेताला.

देवा ! तूंचि गणेश प्रभुजी ॥धृ०॥ (य९उ.२)
स्वेच्छामय कोमल तव तनु की । निगमनिचय निःशेष ॥१॥
मन्वादि स्मृति अवयव सुंदर । लावण्यार्थ विशेष ॥२॥
पंचायतनीं शिव हरि शक्ति । तूं तेजस्वि दिनेश ॥३॥

ज्ञानेश्वरप्रभु करुणामूर्ते । धृत आनंद गणेश ॥४॥

### १० / आळंदीवासिनी

सामनुष्टुप-वृत्त,मूळपीठ-पूर्या.ता.-तेताला.गौणपीठ.'रंगा येइ वो माय विठाई' या चालीवर.

रंगा येई वो माय, मम जननी, आळंदीवासिनी । रंगा येइ वो ॥धृ०॥
काम मातला असुर, शोधियेले घर, हातीं घेवोनी निजशस्त्र ।
करि आतां संहार ॥१॥ रंगा येइ वो ०
संता अर्पोनी निजधन, जोगवा मागेन, चारी धर्माचा ।
तुजवर, फुलवरा बांधेन ॥२॥ रंगा येइ वो ०
क्रोध तेल हे नेहटी, उजळली दीवटी, घालोनियाही मति मोठी ।
प्रकाश दिशा पोटी ॥३॥ रंगा येइ वो ०
हल्लर वाजवितां अनाहत, गेले अवघे असत, उदय तुझाचि हा ।
दिसत ज्ञानेश्वरिची मात ॥४॥ रंगा येइ वो ०

### ११ / पुंडलीकवरदा

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ-भूप.ता.-तेताला. गौणपीठ (माहीत नाहीं)

जय हरी पुंडलीकवरदा । हरि हरि पुंडलीकवरदा ॥धृ०॥
करवेना मज पंढरीराया । षडरीसह स्परधा ॥१॥
रुक्मिणीवल्लभ दीनदयाळा । देवा सुरपुर-दा ॥२॥
अलकावतिनाथा मम स्वामी । प्रणता निजपुरदा ॥३॥

### १२ / हिंदी

सामनुष्टुप वृत्त. मूळपीठ.- जिल्हा. गौणपीठ.'भज गोविंदं' या चालीवर, मोहरी.

राधाकृष्ण जय कुंज बिहारी । राधाकृष्ण जय कुंज बिहारी ॥धृ०॥
मुरलीधर गोवर्धनधारी । खेलत गोकुल तों पुतनारी ॥१॥ (य९उ.३)
नरहरी रघुपति भक्तहेत भे । अत्रिकुमरमुनि ब्रह्म विचारी ॥२॥
शाम वदन देखि ललचाइ । ज्ञानेश्वरजा गोप कुमारी ॥३॥

### १३ / येइ रमारंगे

सामनुष्टुप वृत्त, मूळपीठ(माहीत नाही) गौणपीठ (माहीत नाही)

येइ रमारंगे, माउली, येइ रमारंगे ॥धृ०॥
भुवनसुंदरे गुणमंदिरे । कीर्तन नवरंगे ॥१॥
परम मनोहर मधुर मोहरी । वाजवी सारंगे ॥२॥
सुंदर लोचन कृपाकटाक्षें । हृदयतिमिरभंगे ॥३॥
निज पदरानें नयन पुसोनी । आलींगी अंगें ॥४॥



आळंदिशे तव नांव गाउनी । नाचुं सुजनसंगें ॥५॥

### १४ / जयजयकार

सामनुष्टुप-वृत्त.राग-भूप. ताल-तेताला.

जयजयकार तुझा । वेदपुराण वाणिती सहजा ॥धृ०॥
एक अखिल जगव्यापक प्रभु हा । याविण नाहीं दुजा ॥१॥
वेदपुराण म्हणती प्रणवार्थचि । जो प्रगटे सहजा ॥२॥
सच्छांदोग्यीं ऐतरेयीं आत्मा । ब्रह्म बृहती उमजा ॥३॥
अलकावतिवल्लभ केनश्रुतौ । मना सगुण नमीं जा ॥४॥

### १५ / आळंदिवल्लभे

सामनुष्टुप वृत्त, मूळपीठ, भूप, ताल तेताला, गौण, 'पांडुरंगे येई वो माय' या चालीवर

आळंदिवल्लभे येई वो जननी । [१]माझे बाळ कोठे ऐसे म्हणत आननी ॥१॥
हृदयीच परी बाहते नेणोनी । धाव घाली झडकरी श्रम न गणोनी ॥२॥
रडोनी रडोनी विकळ हा जीव । मिथ्या परी निवटेना भयमय भव ॥३॥
मुखिं घालोनियां स्तन पाजि प्रेमपान्हा ।
करे कुरवाळूनी केव्हां म्हणसी उगा तान्हा ॥४॥
ज्ञानेश्वरमाये निज जन काशी । तुझिया कृपेविण आम्ही परदेशी ॥५॥
([१]पाठांतर- धीर धरी बाळा ऐसे म्हणत आननी ॥)
(य९उ.४)

# २. रूपपर पदे

### १६ / हिंदी / रामरूप

सामनुष्टुप, मूळ जोगी, गौण हिंदुस्थानी भजनाचे चालीवर

राम के चरणपें चित्त लगाऊं ॥धृ०॥
धनुख हात, शिरपर मणिमुकुट । छबि आजानु सुबाहु ॥१॥
सब जगमों रघुनाथ हमारा । नारायण एक सोहं छावू ॥२॥
ज्ञानेश्वर गुरुचरण की आशा । तिनकि कृपातें रघुपति पावूं ॥३॥

### १७ / मूर्ती सुकुमार

सुशिलावृत्त, राग-सोरठ, ताल-राजविद्याधर, (तेताला)

मूर्ती सुगुणगुणी सुकुमार ॥धृ०॥
नयन भरूनि पाहुं चला गे । अष्टचि वरुष कुमार ॥१॥

सत्त्वरजस्तमभाव विवर्जित । सच्चित्सुखघनसार ॥२॥
ज्ञानेश्वरकन्याकान्ताचे । अवनी सलिल विहार ॥३॥

१८

कंचुकीवृत्त, मूळपीठ, यमन, गौण - 'येथेच उभी' या चालीवर

तनु रति-मनोहरा याची । विरहाक(१) सदारा याची(२)॥धृ०॥
कोमल पंकजनयनाने । खुणवुनि भरि रतिशयनाने ॥१॥
पादपपादापशिराने । सेवुनि करि मूढ शिराने ॥२॥
शिर अलकावतिपतिचरणी । वाहुनिया वरु सतिसरणी ॥३॥

(टीप- १- विरहदुःख. २- द्यायाची)

१९ / (हिंदी)

रमावृत्त, राग-काफी, ताल-तेताला

शामको देखत मोह गिरे ॥धृ०॥
श्रुतिसंभव नाशनकारन । मोहनछबि सुभरे ॥१॥
कटिं कनकांबर गल वनमाला । तांबुल मूख धरे ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु तात कृपासे । नंदज पग पकरे ॥३॥ (य९उ.५)

# ३. नामपर पदे

२०

तिलोत्तमावृत्त, मूळ- जोगी, ता.तेताला, गौण. 'घुंघरु बांधकर नाचुंगी' या चालीवर

प्रभुनाम मधुर मज वाटे हो ॥धृ०॥
रामकृष्ण गोविंद हरी या । स्मरणी तुटति कचाटे हो ॥१॥
पराभक्ति श्रीहरिची सोडुनि । जावे न दुज्या वाटे हो ॥२॥
स्वबळे हरिने पर्णुनी नेतां । प्रेमचि हृदयीं थाटे हो ॥३॥
सत्संगाने सहजचि जळती । हरि मार्गातिल कांटे हो ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभु चरणकमलमधु । तृप्त होऊनिहि चाटे हो ॥५॥

२१ / चौपाई (हिंदी)

कृष्णनाम जों मुख से गावे । ताको पुण्य गणा नहि जावे ॥
तिसका वृंदावन बिच ठाना । यहि बिधि पदमपुराण बखाना ॥१॥

२२ / दिंडी / 'खं ब्रह्म'

नाम घेता गृहिं येति वेणुवाले । रामनामें कैलासपति निवाले ।





नव्हे नामावाचोनि योगियांचे । नाम तेचि 'खं ब्रह्म' होय साचे ॥१॥
नाम घेतां ही ब्रह्मभूत काया । नाम तोडी विक्षेपयुक्त माया ।
नाम विश्व भासवी आत्मरूप । नामयोगें आटती काम कोप ॥२॥
आवडीनें जो कृष्ण नाम गाय । देव त्याचे वंदिती सदा पाय ।
नाम घेता तरला न एक कोणी । अशी नाहीं कोठेंहि आर्ष वाणी ॥३॥

२३ / आर्या

राहूनि गृहस्थाश्रमिं जो घेतो रामकृष्ण आदरसा ।
त्या हृदयीं प्रभु नांदे मानोनी भक्त तो सुखा घरसा ॥१॥

२४ / हरी मंत्र : आर्या

'ह'ताश कष्ट करोनी जे संसारीच शीणले बापा ।
घेता नाम मुखानें मी वारी शीघ्र त्यांचिया पापा ॥१॥ (य९उ.६)
'रि'ते न वक्त्र क्षणभरि ज्याचे गोविंदिं जीभ हालविता ।
त्यांच्या तनुमनयोगें योगक्षेमास मीच चालविता ॥२॥

२५ / श्लोक

जहीं शंकरे भक्षिले काळकूटा । तदा ऊठल्या अंतरीं अग्निलाटा ॥
बहू कष्टि झाला उमाकांत जेव्हां । मनीं आठवी राम नामास तेव्हां ॥१॥

२६ / दिंडी

राम नामें कैलासपति निवाला । राम सायुज्ये कंठ निळा झाला ॥
रामनामीं सामर्थ्य किती आहे । असें बोलाया वेद पुरा नोहे ॥१॥

२७ / दिंडी

मुक्ति त्याच्या चारही होति दासी । प्रयागादी तीर्थेंहि पदा पाशी ॥
विष्णुनामी रंगली वाणि ज्यांची । इंद्रचंद्रादी गाति कीर्ति त्यांची ॥२॥

२८ / आर्या

बहु साधन करुनि मुनि दमुनी भवसिंधुहेतु का तरला ।
परि ते कांहि न करुनि विठ्ठल नामेचि हा तुका तरला ॥१॥

२९ / आर्या

नामें घेसी जेव्हां तेव्हां इंद्रियविलोलताभाव ।
होवुनि हाव तुटोनी बैसे आचार्य पायिं मग भाव ॥१॥

३० / दोहा (हिंदी)

रामकथा सुमिरन करत रामरूप हरिदास ।
ये कहना क्या राम होय जो तहँ करहि निवास ॥

३१ / सौख्य घ्या क्षणभरी

श्रीमतीवृत्त. मूळपीठ-पूर्वी, ता.-तेताला. गौण-माहीत नाही. फक्त याची गौणपीठावरच उभारणी आहे. सर्व श्रीमतीवृत्ताची नाही.

म्हणा रामकृष्ण हरिहरी ॥धृ॥
संसारांतील कष्ट त्यजूनी । सौख्य घ्या क्षणभरी ॥१॥
योग याग जप तप ध्यानातें । ना कळेचि अंतरीं ॥२॥ (य९उ.७)
नामचि घेतां काम हरिल हरी । धरूनि वाटणि करी ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणार्णवपद । प्रेमें वाहूं शिरीं ॥४॥

३२ / नाम कसे गोड असे

सामललितवृत्त. मूळपीठ-देस, ता. - दादरा. गौणपीठ - माहित नाही.

नाम कसे गोड असे ।
गुळ तुप रस सोडवुनी रसनेसी लावि पिसें ॥धृ॥
शंकर सुखि हृदयिं धरुनी हरिस पोळवितां विषें ।
नारदमुनि भुवनिं तिहीं वीणाकर गात असे ॥१॥
शुकसनकादीक म्हणति गोपीजन म्हणति तसें ।
अघनिधि भवनिधि उतरति अतिसकाम नाममिषें ॥२॥
हृदयिं धैर्य धरुनि सदा संतसंगतींत वसे ।
अलकावतिपति चिंतनीं नयनिं वाट उघड दिसे ॥३॥

# संतपर पदे

३३ / दिंडी

मुक्तसिद्धांच्या शोधितांहि कोटी । न भेटे तो ज्याचिया कृष्ण पोटीं ॥
भाळला जो पाहोनि कांतकांती । तयालागी आनंदि वरी शांती ॥१॥

३४ / हिंदी

रसालावृत्त, राग- पूर्वी, ताल-राजविद्याधर तेताला

है जगमाहि बडो सत्संगा ॥धृ०॥
जैसे सज्जन पाप मिटावत । तैसि न टारत गंगा ॥१॥
गंगा बाहर पाप मिटावत । नहि शोधत अंतरंगा ॥२॥
पाप अरु पाप प्रवृत्ति को । हरत साधुजन चंगा ॥३॥
यहिके खातर संतचरण पैं । नित लोटत है गंगा ॥४॥
ज्ञानेश्वरकन्या अनुभवते । बोलत प्रेम सुरंगा ॥५॥ (य९उ.८)



३५

अक्कलकोट स्वामींचे स्तवन

वृत्त. साममाणव. रा.-काफी ता.-दीपचंदी.

देवा दीन मी पदरीं धरा ॥धृ॥
कलियुगीं श्रीदत्तात्रेय । अवतार तुमचा खरा ॥१॥
अ०
अक्कलकोटनिवासी ब्रह्म । सगुण हृदयिं उतरा ॥२॥
श्रीज्ञानेश्वर रूप धरूनी । शिरिं ठेवा स्वकरा ॥३॥

३६ / दिंडी.

नमूं स्वामी अक्कलकोटवासी । रिद्धिसिद्धि राबती पुढें दासी ।
ऐकुनिया कीर्ति मी असे मागे । कृष्ण खेळो सर्वदा चित्तसंगे ॥१॥

३७

सामकामदा. मूळ-झिंझोटी. ता- दादरा. गौण-''पांडुरंग स्मर अभंग''

बुद्धिग्रामि वास ज्यांस तत्पदांबुजा । वंदुनिया प्रेमभरें लीन आत्मजा ॥धृ॥
पूर्वी तिही युगी देव दत्तसद्‌गुरू । कलियुगीं बुद्धिग्रामि हे मुनीश्वरू ॥१॥
देहिं दिसोनिया नाथ विदेही असे । दृष्टिवशें दिनोद्धार पूर्ण होतसे ॥२॥
अक्कलकोटनिवासिया स्वामी श्रीवरा ।
ज्ञानेश्वर रूप धरुनि पुनित मज करा ॥३॥

३८ / दिंडी.

दुरी अथवा संन्नीध असो पाही । मनीं होतां संशय जरी कांही ॥
तरी स्वामी येवोनि दिनानाथा । त्वरें वारी सर्वही माझि चिंता ॥१॥
स्वप्न अथवा जागृती माजिं देवा । देउनीयां दर्शना मनो भावा ॥
कडोनिया घेतांचि चरण सेवा । म्हणोनिया धावती मनो हावा ॥२॥
कृपायोगें करुनिया अंगिकार । त्वरें द्यावा या भवीं नाभिकार ॥
अक्कलकोट ग्रामांत राममूर्ती । परी विस्तारे त्रिभूवनी कीर्ती ॥३॥

३९ / आर्या.

दत्तदर्शनी ज्यांची अभिलाषा त्यास बुद्धिग्रामांत ।
झाला लाभ असें ही स्वामीसंगीय सांगती मात ॥१॥ (य९उ.९)

४०

श्रीज्ञानेश्वरचरणीं भक्ती तैसीच तूमच्या चरणीं ।
परि ज्ञानेश्वररूपें दर्शन होईल ही करा करणी ॥२॥

४१

साममाणव. रा. - काफी ता.-दीपचंदी

दीन मी पदरी धरा ॥ स्वामी ॥धृ॥
अनसूयानंदन कलियुगी । अवतारचि दुसरा ॥१॥
संप्रदायि मी नाहीं तरि प्रभु । करुणें पुनित करा ॥२॥
उदय होतां मार्तण्डा मग । प्रकाश सर्व घरा ॥३॥
तैसें सर्वहि संप्रदाय तें । ज्ञानसुवर्णी भरा ॥४॥
ज्ञानेश्वरगुरु रूप धरूनी । माझ्या हृदयिं शिरा ॥५॥

४२ / अभंग

स्वामी दीनानाथ राहति जया देशी । तेचि वाराणसी शिव सांगे ॥१॥
गुरुगीता वाक्य सर्वत्र प्रमाण । सद्गुरु वचन त्याचि श्रुति ॥२॥
अक्कलकोट ग्राम कलियुगीं काशी । जिवंत कैलासी लोक सारे ॥३॥
स्वामी विश्वेश्वर दत्तात्रेयरूप । महिमा अमूप वर्णवेना ॥४॥
ज्ञानेश्वररूप होवोनिया देवा । स्वीकारावी सेवा बाळकृत ॥५॥

४३ / संस्कृत श्लोक

ये ये संताः समर्था ये अवतीर्णा मुनीश्वराः ।
ज्ञानेश्वरे समाविष्टास्तस्मात्तन्मम दैवतम् ॥१॥

४४ / अभंग.

मरण आणि जन्म गेली आटाआटी । पाहतांचि दृष्टी स्वामीसी या ॥१॥
सकळही कर्म झालें प्रेमरूप । पाहतां स्वरूप स्वामिचेचीं ॥२॥
स्वामी आणि ज्ञानेश्वर दीनबंधू । मिळोनिया इंदु पूर्णरूप ॥३॥
मिळणीचे कांही नाहींचि कारण । अनादि निधान ब्रह्ममय ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभू जीवीचा जिव्हाळा । संतकृपा[1] डोळा तेणें लाहे ॥५॥

(१.कृपादृष्टि.)

४५ / दिंडी.

वसिष्ठादी महात्मे तुम्ही थोर । लेकरूं मी कीजेल अंगिकार ।
गुरू आळंदीराजपदीं प्रेमा । जडो ऐशा मागते वरा तुम्हां ॥१॥ (य९उ.१०)

(अक्कलकोट स्वामींचे स्तवन येथे संपले)

. . . . .

४६ / भगवद्वचन उद्धवाप्रति



सामकामदा. मू.-बेहाग,ता-दादरा. गौण -'पांडुरंग स्मर अभंग' या चालीवर.

योग सांख्य धर्मही नही तोडिती भवा ।
संत संग तो अभंग जाण उद्धवा ॥धृ०॥
सर्व संग त्यजुनि संतसंग तूं करी । वेद सांगती अभेद घेइ तूं करी ॥१॥
काम करुनि राम मनीं कृष्ण आठवी । रमारंग अंतरंगि सहज साठवी ॥२॥
मत्प्रियाची पाहुनि जे येति पाउले । ऐसे किति सांगु मत्स्वरूपिं पावले ॥३॥

४७ / श्लोक.

सांडोनि वैकुंठ रमानिवासा । इच्छी सदा ज्या हरिसंगवासा ॥
ज्यावांचुनी मुक्ति वरिष्ठ नाहीं । मी वाहते भाळ तदीय पायीं ॥१॥

४८

वृत्त-साममाणव. रा-काफी ता- दीपचंदी

यांची काय मी वर्णू दया ॥धृ॥
भक्ता सौख्यदायक हरि तो । नाशक वैरि तया ॥१॥
साधु मित्र अरि समचि मानिती । भेद न कांही जया ॥२॥
देवापासुनि भय चुकिचे तरि । वारिति संत भया ॥३॥
पापताप दैन्यही निवारुनि । दाविति निजपद या ॥४॥
अलकावतिपतिनिष्ठ संत करि । विश्वा शांति दया ॥५॥

४९

माझिया भक्तांची पदवी । जना कडूनि मी वदवी ।
विश्व कार्य साधवी । त्या हातीचि मी ॥१॥
यालागीं माझिया भक्ता । सोडोनिया तत्वता ।
मी नेणें योगिया विरक्ता । तपस्विया ॥२॥

५० / हिंदी दोहा

मेरे भक्तबचन से जो चाहे सो होय ।
और मंगे तो नहिं मिले तपिभि बिनुकृति जोय ॥१॥ (य९उ.११)

५१ / हिंदी

सुशिलावृत्त. राग- यमन. ताल- तेताला

भे हम संतदास के दास ॥धृ०॥
संतहृदय मो राम बसत है । रामचरण हमपास ॥१॥
संत राम को अमृत पिलावे । हम डारे मुख ग्रास ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु तात हमारे । रामस्वरूप विलास ॥३॥

५२ / भगवद्वचन

श्रीमतिवृत्त. रा.-यमन.ता.-राजविद्याधर. (तेताला)

मी दास तयाचा जाण ॥धृ॥
सकलहि भावे मजला एका । जे धरिताति प्रमाण ॥१॥
त्यांच्या अग्रीं अज्ञानी मी । होउनि त्यां करि जाण[१]॥२॥
जें मजसाठीं श्रमती पळपळ । मी तैसा त्या मान ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु जैसे तैसे । समज भजन परिमाण ॥४॥ (१.शहाणा)

५३ / ओव्या.

अगा पुरुषसूक्त ती माझी वाणी । तीचि लावितां माझिया स्तवनी ।
तरी माझीच वाणी घेउनी । स्तवनी काय वरिष्ठता ॥१॥
परी हे बोबडिये बोले । जिहीं मज आपुलेसे केले ।
तयांची मी वंदी पाउलें । द्वारका त्यजूनि उद्धवा ॥२॥

५४

सुधावृत्त. मूळ.-जोगी.ता.-धुमाळी. गौणपीठ.-'कोठें नच जावे' या चालीवर.

मजला तो व्हावा, तो व्हावा । ज्याला न विषयगोवा ॥धृ॥
इहपरलोकीं विरक्त होउनि । मजचि वाहि तनुभावा ॥१॥
त्याच्या भेटिवांचुनि मजला । न रुचे लक्ष्मीसेवा ॥२॥
या या भूवरि त्यासाठी मी । दे अभयवचन देवा ॥३॥
वैकुंठीं मी कडू भक्षुनी । भक्तां दिधला मेवा ॥४॥ (य९उ.१२)
ज्ञानेश्वरसुत कोणी तरि मज । प्रिय आणुनी द्यावा ॥५॥

५५

सामनुष्टुपवृत्त. रा.-परज.ता.-तेताला

हरि वचना ऐकुनि कानी । सद्गद तै प्रेमळ वाणी ॥धृ॥
मनिं न धरुनि अपवर्गाशा । करूं इच्छिति हरिअभिलाषा ॥१॥
यमपुरिला देउनि झोका । हरिचरणीं वारिति पंखा ॥२॥
बळकट ज्ञानेश्वरबाळा । प्रभु कंठी घालिति माळा ॥३॥

५६ / ओव्या

उद्धवा, भक्तभेटी नव्हे पुरती । म्हणोनि त्यांच्याचि मूर्ति ।
घेऊनि मी देव्हारिया प्रति । पूजी निश्चिती सद्भावें ॥१॥
यापरी बोलतां देवरावो । प्रेमें करोनि भक्तरावो ।
टाळिया पिटोनि ज्ञानदेवो । सद्भावें म्हणती ॥२॥



५७ / आर्या

मत्कीर्ति श्रवणी जो श्रम करितो मज सदाचि आवडतो ।
देउनि अविनाश पदा मी सेवा सर्व त्याचि सावडतो ॥१॥

५८ / दिंडी.

भक्तिलागीं वीकला देह ज्यानें । जन्म त्या साठीं घेतला अजानें ।
संतसेवा उल्हास चित्तिं ज्याला । विष्णुने तो वैकुंठिं योग्य केला ॥१॥

५९ / दिंडी.

ज्याच्या चित्तीं सर्वदा कृष्णमूर्ति । त्याचि गाती देवही नित्य किर्ती ।
नाहिं भक्ता न्यून ते कांहि दैवे । कडीये ज्या घेतले वासुदेवे ॥१॥

६० / श्लोक

तो देशची सर्व पवित्र जाणा । जेथें वसे नाथ सुभक्तराणा ।
त्यानेंचि हो जाळिलि सर्व कर्मे । जे ध्याति कृष्णास कळोनि वर्मे ॥२॥

६१ / आर्या

हो कां पुनरुक्तिहि परि सद्भक्तांचे घडो सदा स्मरण ।
किंबहुना हरि त्यांच्या पायां वरती घडो मला मरण ॥१॥ (य९उ.१३)

६२ / तो एक तरला

सामनुष्टुपवृत्त.मूळपीठ.-यमन.ता.-धुमाळी.गौणपीठ-''राधा म्हणे रडूं नको'' या चालीवर.

तो एक तरला जाणावा । दावि जो जना सुपथ-नावा ॥धृ॥
नसे ज्या द्वेषचि कवणाचा । बहु आदर श्रुतिकवनाचा ।
नयनीं सगुण स्वरूप पाहे । चित्ती ब्रह्मी मग्न राहे ॥१॥
जयाच्या दृष्टि पुढें कांहीं । नारिनर असा भेद नाहीं ।
मुमुक्षू मुक्त बद्ध भेद । तोडिले परी मानी वेद ॥२॥
मानामान समुळ नेणें । जयाला जनचि सुमुळि नेणें ।
जयाचे हृदयीं सर्व राहे । सर्वही जयामधें आहे ॥३॥
जयाचे अहं सोहं दोन्ही । पावले ऐक्यचि साधोनी ।
ज्ञानेश्वकरुणा सोपी । केलि ही निजकन्या गोपी ॥४॥

६३ / आर्या

उदधींत मधुर लहरी तेवी हरिमूर्ति संत अवतरती ।
त्यांच्या सहजोक्तीनें कांतमतीजन अनंत भव तरती ॥१॥

६४

श्रमला दशशतफणिही चाळवुनी जीभ संतमहिमानीं ।

यत्सुखमूर्ति प्रकटतां असुनि असुर करि सुसंत महिमानी ॥२॥

६५

संसृतिपिंपळ उडवी झाकुनि जीवा अनंत पर्णरजें ।
यास्तव असंगवस्तु घ्या जाणुनि नमुनि संतचरणरजें ॥३॥

६६

मी तो तोचि म्हणावा मज मन देता क्षुधा तृषा विसरे ।
बहु काय तो पराही जे दे, ते केधवाहि मग न सरे ॥४॥

६७

ज्यांची वृत्ती दासी, झाली श्रीज्ञानदेवचरणाची ।
त्यांना केवी येइल भीति भवविभव-जनन-मरणाचीं ॥५॥

६८

तो धन्य मान्य जाणे जो यदुतिपाय नित्य आठवितो ।
त्या पाहुणेर म्हणुनी प्रभु सदनी घृतवितप्त सांठवितो ॥६॥

६९ / हिंदी

संत महिमा

सामनुष्टुपवृत्त.मूळपीठ-जोगी. ताल-तेताला. गौणपीठ- हिंदुस्थानी भजनाचे चालीवर.

संसृति मिटे संत मिले तब ॥धृ०॥
संत मिलेंगे श्रीहरिहेतुक । धूंडत चेतसवृत्ति भई तब ॥१॥
संत मिले दिल लागि रही हरि । चरणन कमलन की मृदुल छब ॥२॥
अलकावतिपति करुणा भइ तो । आयहि हरि सुबधाइ अब की अब ॥३॥

७० / हिंदी

सामनुष्टुपवृत्त.राग-जोगी. ताल-तेताला.

हरि नित निज भक्तन के संग ॥धृ॥
प्रेम द्वेष जानते नाहीं । दे ते मुक्ति अभंग ॥१॥
मीराको विष प्याला पीयो । खेले गोपिन संग ॥२॥
सूरदास को अखिया दीन्ही । जनी के लिखे अभंग ॥३॥
एकनाथघर नीर भरे प्रभु । किसको चढावत तंग ॥४॥
ज्ञानेश्वरबाला गोपि हरी- । साथ उडावत रंग ॥५॥

७१ / होऊं नको चिमणा

जयंतीवृत्त.मूळपीठ.-जोगी.ता.-धुमाळी. गौणपीठ-''दत्तात्रय चतुराक्षरि मंत्र'' या चालीवर.

मूर्तिमंत भगवंत संत ते आठवि नित्य मना ।



निजपदसुख विसरूनि गड्या रे होऊं नको चिमणा ॥धृ॥
न कळे हरिमय जग हे शास्त्रें साधु जरि न उघड ।
भगवज्जनभजनाविण वाटे कैवल्यहि दगड ॥१॥
जन्मुनि उदरी देवहि परि जे दे न करुनि यजन ।
दर्शनमात्रें दाखविती ते दीन-करुण-सुजन ॥२॥
श्रीज्ञानेश्वरसद्गुरु माझा सज्ञन जनराजा ।
चिंतन करितां वाजवि करणी निगम-वचन बाजा ॥३॥

७२ / दोहा / तुलसीदास स्तवन.

तुलसिदास सम रामकथा जो कथु म्हणे अजाण ।
कांजि काढितो मथुनि सुधा अलकावतिपति आण ॥१॥

७३ / हिंदी / संत स्तवन

सुशीलावृत्त. राग-यमन. ताल-तेताला.

संतन के पग लाग । मानस ॥धृ०॥
सनक सनंदन नारद वसिष्ठ । ब्यास शुक कह जाग ॥१॥
अंबरीष पहेलाद गोपिका । भज भज भव तजि भाग ॥२॥
सबसंतमणी अलकावतिपति । चरणकमल अनुराग ॥३॥

७४

पावन तें सत्कुळ ॥धृ॥
ज्या स्थळि जन्मति दास हरिचे । ज्या परि पांडव कूळ ॥१॥
ज्या घरी सकळहि कुटुंब गाये । 'हरि' वेदाचे मूळ ॥२॥
गोविंदनाम अश्वमेध फळ । कधिं न च पावति तूळ ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या हरिसाठीं । झाडि कचीं गोकूळ ॥४॥

७५ / दिंडी

जरी झाल्या निंबोळ्या बहूत । तरी काका सुकाळ अखंडीत ।
अभक्तांसि त्यापरी पार्थराया । सर्व जाती सत्कृते सांडुनीया ॥१॥

७६ / दिंडी.

भक्त माझा ज्या देशिं ग्रामिं नाहीं । उभे जाळी तो देश ग्राम मीही ।
जेथें माझ्या भक्ताचि पडे धूळ । तेथें लोळे मी रात्रंदीन वेळ ॥२॥

७७ / दिंडी / भगवद्वचन

तयासाठीं वैकुंठ निर्मियेले । तयासाठीं सागरा सोडियेलें ।

जया मोक्ष देतांहि ते न घेती । भक्ति माझी सर्वदा इच्छिताती ॥३॥

७८ / दिंडी / भगवद्वचन

तया प्रीया भक्तांस ध्यानयोगें । मीचि लावी देऊनि बुद्धियोगें ।
जया बुद्धी ते मला प्राप्त होती । जाण माझे भक्त ना व्यर्थ जाती ॥४॥

७९ / दिंडी

सच्चरित्रें ऐकतां दिव्य कानीं । वर्णिताची पावन पूंसवाणी ।
निजधामीं द्वापारिं कृष्ण गेला । कलीयूगीं सन्मिषें प्रगटला ॥५॥

०००

# ५. सद्गुरुमहिमापर पदे

८० / हिंदी

रंभावृत्त. राग-कानडा. ताल-राजविद्याधर (तेताला)

ज्ञानदेव चिदद्घन साकारा ॥धृ०॥
कृता त्रेत में पिता भये प्रभु । द्वापरमांहि भये भरतारा ॥१॥
कलिजुग में गुरुरूप दयाघन । पुनि मिलि कीन्हा पालन म्हारा ॥२॥
भजन भजक तिनके चरननपर । अर्पण करि भइ दासिरु दारा ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या ज्ञानेश्वर-। नाम सुमिरि उतरी भवपारा ॥४॥

८१ / हिंदी

भावदीपनी - ज्ञानेश्वरी

सामनुष्टुप छंद. राग-भूप. ताल- राजविद्याधर. (तेताला)

अघटित घटना सारी है ॥धृ०॥
माटि-दिवालको पंथ चलाया । महिषमुख श्रुति निकारी है ॥१॥
निज पृष्ठीपर पाक बनाया । चांगदेव भीति हारी है ॥२॥
कान्तबाणि गंभीर बचन की । **भावदीपनी** उजियारी है ॥३॥
अंगिकरो अब ज्ञानदेवगुरु । बाला लरकी तुम्हारी है ॥४॥

८२ / हिंदी

रंभावृत्त. राग-बागेश्री. ताल-राजविद्याधर. तेताला.

सब जुग मों तुम्हरी बलहारी ॥धृ०॥
तुम्हरा जन्म भविष्यहि देख के । बंदत नित्य उमा त्रिपुरारी ॥१॥
जग ईश्वर सो कर्मरूप है । तुम ज्ञानेश्वर सुखकारी ॥२॥





कन्या हूं मैं तुम्हरी प्रभुजी । तुम्हरे अंश कृष्णकी नारी ॥३॥
दोनोही प्रभु जानके मोहे । निज किरपा पालन मतिधारी ॥४॥
है उपकार नाथ अनंतहि । क्या वर्णेगी जीह्वा बिचारी ॥५॥
ज्ञानेश्वर है तात दयाघन । करो मोहे भवपार किनारी ॥६॥

८३ / हिंदी - दोहा

अनादि संसृति जानके श्रीज्ञानेश्वरपाव ।
परे जोहि तिनका मिटे छनमांही भवभाव ॥१॥

८४ / हिंदी - दोहा

ज्ञानेश्वर प्रभु तात है पूर्ण दया का स्थान ।
प्रेमसुधा सुपिलायके अमर करत निज[१] जान ॥२॥

(१. आपले समजून)

८५

इंदिरावृत्त. राग-जोगी. ताल-तेताला.

जो जनन मरण हरि सारे ॥धृ॥
हरिसहि हरिपण कृपे जयाच्या । डोले सुखफळभारें ॥१॥
थोर सान ज्या कांहिंच न रुचे । ब्रह्मचि करि अधिकारें ॥२॥
यत्करुणार्द्र कटाक्षें वरिजे । मोक्षरूप संसारें ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु दीनबंधु तो । निवटि मोहमय वारे ॥४॥

८६ / ओवी

मातुलवधाचें प्रायश्चित । घ्यावया उदित रमणचित्त ।
तैं त्यागूनि गोतवित्त । संदीपनाश्रित झाले ॥१॥
सत्वगुणे असोनि रामचंद्र । तमोगुणें वधों लागती असुर ।
तो अविरोध साधावया साचार । वसिष्ठ चरणाधार धरिला ॥२॥

८७ / दिंडी.

पार्वतीनें व्हावया विश्वमाता । गुरुभावें सेविलें आदिनाथा ।
बळें ज्यांनीं निर्मिल्या वेदशाखा । तोहि ब्रह्मनंदनी लीन देखा ॥१॥

८८

जन्मतांचि जो बाळ ब्रह्मवेत्ता । वृक्षपाषाणी ज्याचि शब्दसत्ता ।
तोहि होऊनी शरण निज ताता । वर्णि वक्त्रें अतिप्रीति मदनताता ।

८९ / हिंदी / साकी

इस भांती जिस प्रभुको महिमा वे गुरुनाथ हमारे ।
अकावतिपति करुणा सुंदर कोटी पुण्य निहारे ॥१॥

९० / आर्या.

ज्ञानराज जपता ह्या चतुराक्षरि मंत्र सर्व योगफळे ।
मोडुनि येती सरसें अर्पिति तृप्ती अखंड भक्तिबळे ॥१॥

९१ / हिंदी

सामुनुष्टुप. राग-जोगी. ताल-धुमाळी

मेरे प्रभुकी बलहारी है ॥धृ०॥
मेरे गुरू के आज्ञा बचनते देव त्रय की हुशियारी है ॥१॥
मेरे गुरू के पद्मचरणकी । मोरही सीस सवारी है ॥२॥
जिनकी कृपातें कृष्णसंगमै । खेलत नहिं भी हारी है ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु सद्गुरु मोरे । तिनपग प्रीति हमारी है ॥४॥

९२ / हिंदी / गुरु और हरि

रंभावृत्त. राग-दरबारी कानडा.राजविद्याधर तेताला. भक्तिवीररस.

गुरुबिन हरिगुन रंग न पावे ॥धृ०॥ (य९उ.१८)
हरिध्यानतें गुरु नहि मिलते । गुरु-सुमीरनतें हरि घर आवे ॥१॥
दुष्टको मारन भक्तन तारन । हरि अपने दिल भेद लखावे ॥२॥
गुरु दुर्जनकूं सुजन करतु है । हरिसो अधिक गुरुहि हिय भावे ॥३॥
विठ्ठलनंदनगुण विठ्ठल से । सज्जन बदन अधिकतम गावे ॥४॥

९३ / हिंदी

बडे प्रेम तें एक घडी खडा सद्गुरुद्वार ॥५॥
तिसका चारो मुक्ति करत निःसाधनहि स्विकार ॥१॥

९४ / आर्या

''ज्ञा - ने - श्व - र''

**ज्ञा**नप्रचुर विश्व हे नाहीं अज्ञानप्रत्ययो कोठें ।
जैसा भानुप्रकाशीं अंधःकारांश ना कधीं भेटे ॥१॥
**ने**तीति वेदवाक्यें निषेधुनी प्रकृतिकार्यसंसारा ।
अद्वैतब्रह्मभावें केली अन्वयचि प्रेमनदि धारा ॥२॥
**श्व** जन्म सज्ञनद्वारीं घेउनि श्रीहरिकथाचि ऐकाव्या ।
जगनिंदास्तुतिविषयीं वदनांतुनि सर्व उक्ति टाकाव्या ॥३॥
**र**मतां गुरुपदकमळीं सद्गुरुमूर्तीच चित्ति आणावी ।
**'ज्ञानेश्वर'** या मंत्राहुनि साधन कोटि गौण मानावी ॥४॥

९५ / श्लोक.



सांगूं किती मी तुज शिष्यराया । जे वीकले नित्य आचार्यपाया ।
त्यांचा स्वयें दासचि कृष्ण होतो । मोक्षाहि पायांतळि लोळवीतो ॥१॥

९६

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ-यमन.ता.तेताला. गौणपीठ.''तमाशा संता घरीं.'' या चालीवर.

आम्हां मायमाउली गुरू ॥ आम्हां ॥ जो का परब्रह्म सद्गुरू ॥धृ॥
त्या विण कांहीं न करूं । बळकट तच्चरणालाचि धरूं ॥१॥
गुरुकृपें काम संहरू । गुरु उच्छिष्ट स्वीकरू ॥२॥
ज्ञानेश्वरचरणावरू । तनु मन जीव अर्पण करूं ॥३॥

९७

सुशीलावृत्त. राग.-यमन.ता.-तेताला.

मानस आठविं मंगल पाय ॥धृ॥
कोटि संकटीं कटि बांधुनि जो । रक्षी हरुनि अपाय ॥१॥
रिपुगणबळ तें न चले स्मरतां । विजयी अळंदीराय ॥२॥
तनुमनधन वाहुनिया भज भज । ज्ञानेश्वर गुरुमाय ॥३॥

९८

मुद्दल काय करूं ॥ रामा ॥धृ॥
मुद्दल ठेवुनि जैसें तैसें । तव पद व्याज वरु ॥१॥
जगभांडारीं मुद्दल भरुनी । व्याज हृदयीं धरूं ॥२॥
अलकावतिपतिगुरुचरणामृत । पिउनि कदां न मरूं ॥३॥

९९ / दिंडी.

मुक्ति त्यांच्या चारहि होति दासी । प्रयागादि तीर्थेहि तयां पाशी ।
विष्णुनामीं रंगली वाणि ज्यांची । इंद्रचंद्रादी गाति कीर्ति त्यांची ॥१॥

१०० / आर्या.

श्रीराम वंदितांची बंधन तोडीति सर्वही लोक ।
तो राम वंदि गुरुतें व्हाया ब्रह्मज्ञ उत्तम श्लोक ॥१॥

१०१ / हिंदी - कबित्त

काहूंके भावे मन आतम को ग्यान अति ।
काहूंके भावे मन जोग हठराज है ।
काहूंके कर्मनकी आसा नित चित्त लगी ।
काहूंके मनमांही पंडित समाज है ।
काहूंके मन साजबाज काहूं मन लाजकाज ।

काहूं मानस में सुंदर सुखराज है ।
मैं गरीब हूं अनाथ जोरि कहूं दो हात ।
ज्ञानदेव दीनानाथ हमारे शिरताज है ।

१०२ / हिंदी

रमावृत्त.राग- केदारा. ताल- तेताला

ईश्वर गुरुसो अधिक नही ॥धृ०॥
जुग जुग कह मै अवतार धरूं । सो अब दिखत नही ॥१॥
जुग जुग सद्गुरु शिष्य सुकारण । प्रकटत सहज महीं ॥२॥
अलकावति जीवन करुणाबल । हमरी सबही सही ॥३॥ (य९उ.२०)

# ६. उपासनापर पदे

१०३ / हिंदी

सुशीला. राग- भूप. ताल- तेताला

मेरो नाथही एक उदार ॥धृ०॥
प्रभुको अपने सिरपर लेके । राखूंगी गुरुद्वार ॥१॥
छर संसार दिखत अच्छर मैं । पुरुषोत्तमकी नार ॥२॥
ज्ञानेश्वर सद्गुरु-किरपातें । पावोंगी भव पार ॥३॥

१०४

ॐ नमो भगवते वासुदेवाय

द्वादशाक्षरी मंत्रावरील आर्या

ॐ इति म्हणतो ऐकुनि भक्तवचनसंकटींच धावोनि ।
देव असें न म्हणावें गुरुवाक्यें घ्या प्रचीत पाहोनी ॥१॥
नमितां विष्णुपदातें तृप्ती जैसी मनाप्रती वाटे ।
तैसे न योगयागीं अथवा जातां विधीपदावाटे ॥२॥
मो हें अथवा त्यागें कीजे श्रीकृष्णचिंतना चित्तीं ।
वर्णाश्रमकर्मातें करुनी अर्पी हरीस ना वित्तीं ॥३॥
भजनें श्रीकृष्णाच्या तरतो करुनी परब्रह्म आंगा ।
भवसिंधु वाट देतो जेवीं करिती सुमध्यमा भांगा ॥४॥
गमनागमन सुभक्तां नाहीं कोणीहि ऐकिलें कानीं ।
न मानिती जे भक्ति बुडवीलें कुळ समस्त लेकांनी ॥५॥



वदती अखंडभावें रामकृष्ण गोविंद हरे वाणी ।
तत्प्रेमळवचनाते शिरसी वंदोनियां श्रुती मानीं ॥६॥
ते आवडती हरितें कैसे तें सांगतां नये वाचा ।
की देहचि हरि होउनि जो आत्मा तोचि भक्त देवाचा ॥७॥
वानरिं हरिनामाचा धरितांची छंद जाहले श्रेष्ठ ।
ज्याच्या वर्णनयोगे विप्रत्वा पावला महाभ्रष्ट ॥८॥
सुटल्या हृदयग्रंथी जरि तरि गाताति मुक्त विष्णुगुणा ।
झाली स्वामिनी जरि कां तरि कांता गातसे पती सुगुणा ॥९॥
देणें घेणें कांहीं नसुनी ध्याताति विष्णुपदकमळा ।
जाउनि पार भवाच्या चाखिति हरिगुणसुधारसा विमळा ॥१०॥
(य९उ.२१)
वासुदेव भजनानें जी तृप्ती तीच सत्कथापानें ।
भानु यथा तृण जाळी परि तेंही कार्य अग्नितापानें ॥११॥
यद्गुणकीर्तनिं जैसी तृप्ती तैसी न ब्रह्मनिष्ठ नरा ।
तरि मग कैसी ये त्यां विमानपतितास स्वर्ग भ्रष्टतरा ॥१२॥

१०५ / कृष्ण चरित्

जयंतीवृत्त. मूळ- पूर्वा. ताल- धुमाळी. गौण- घनश्यामसुंदरा.पद-लावणीचे चालीवर.

सकल सुभावें भजन कराया कृष्ण सगुणमूर्ती ।
धर्म तोचि आमुचा नित्य मुनि वर्णिति यत्कीर्ती ॥धृ॥
श्रीशुक परीक्षिती प्रति सांगे भागवतीं गोष्टी ।
वर्णाश्रमधर्म ते अर्पणें हरिपदसंपुष्टी ॥
हरिचरणध्यानाविण नाही परब्रह्मी तुष्टी ।
श्वेताश्वतराद्युपनिषन्निरूपिती याचि गोष्टी ॥
नारदाप्रती सनत्कुमारें कथिली नामरिती ॥१॥
शूरसेनसुत सुकृतबळें जो यदुकुळिं अवतरला ।
नंदपुण्यतरुवर सद्भावें गोकुळिं अनुसरला ॥
पदमुद्रा शिरिं धरुनि ज्याच्या कालिय फणि तरला ।
सांडुनि सकलहि गोत गोपिनी कुंजवनीं वरिला ॥
यागिं न घे अवदान नंदगृहिं पयदधिघृत प्रीती ॥२॥
ब्रह्मचर्याद्याश्रम ज्याते जाणाया कष्टी ।
नित्य तृप्त ब्रह्मचारि वसतो वनितासंपुष्टीं ॥
रासामध्यें रसभावानें योषित्सह गोष्टी ।

करुनि प्रभू दावी गोपीतें कृष्णरूप सृष्टी ॥
कामकर्म हें परि हरियोगें दे ब्रह्मस्फूर्ती ॥३॥
चक्रधरातें स्मरतां गज तो नक्रमुक्त झाला ।
उद्धरितां गज नक्रहि हरिने उद्धरुनी नेला ॥
तो प्रभु आम्हा परिणय करुनी हृदयीं स्थिर झाला ।
ज्ञानेश्वरप्रभुकृपें स्वयें हा नयनीं देखियला ॥
आतां तनुमनवाचे करुनी गाउं चरणकीर्ती ॥४॥ (य९उ.२२)

कात्यायनी पूजन

१०६ / लावणी

कृष्ण कृष्ण हें नाम वदोनी गोपी जळिं शिरती ।
स्नान करोनी पूजिति देवी कृष्णीं धरुनी रती ॥धृ॥
ऊढांचा अनुराग पाहुनी अनुढा व्रजनंदिनी ॥
ज्ञानकला पूजिति प्रेमानें कृष्ण धरोनी मनीं ॥
हांव नसे संसारसार परि भाव कृष्णचरणीं ।
देह गेह हरिपायि अर्पुनी इच्छा सुरती रणीं ॥
॥ चाल ॥ जो अर्जुनासि प्रभु गीतेमाजी वदला ।
कीं मार्गशीर्ष हा मत्स्वरूपीं गमला ॥
तो ऋतु हेमंत लक्षुनियां विमला ॥
॥ चाल ॥ सकलहि बाला स्मरति अजेला धरुनि अजाची प्रिती ।
अक्षय ज्या श्रुति उक्ति रक्ति तैं नंदनंदनाकृति ॥१॥
नवार्णवादिकजपकष्टाते खष्ट मानुनी सदा ॥
त्यागुनिया संकष्ट सकामें तुष्ट श्रीहरीपदा ॥
मागति हेची नित्य प्रसादें नंदनंदनी मुदा ॥
हे देवी पति व्हावा हरि तो वंदतिसों तव पदा ॥
॥ चाल ॥ यापरी सकलही व्रजनारी बोलती ॥
अनुराग धरुनी मनिं हरितें मागती ॥
नम या मंत्रे त्या देविचरणिं लागती ॥
॥ चाल पहिली ॥ ब्रह्म सनातन सर्वान्तरतनु जाणुनि साक्षी अती ॥
अन्वययोगें सगुण करूनी श्यामरूप चिंतिती ॥२॥
आलातादिक चक्रा त्यजुनी एकीं एकल्या सुखें ॥
''कात्यायनि महामाये'' इति मंत्र वर्णिती मुखें ॥
विषयविषधरा दूर घालुनी उभारिती खगटकें ॥



वालुमयी प्रतिमाग्रीं स्मरती रूप सांवळे निकें ॥
॥ चाल ॥ जें परब्रह्म सच्चिदानंदमूर्ती ॥
तैत्तरीय ऐतरेय वर्णिति ज्या श्रुती ॥
जे योगियासही ध्यानि न ये स्मृति ॥
॥ चाल ॥ तें रूप अंतरि धरुनि निरंतर पायिं चित्त ठेविती ॥
ज्ञानेश्वरप्रभु तात दयालु इष्ट इच्छि त्यांप्रती ॥३॥ कृष्ण कृष्ण०

१०७ / हिंदी

सुशीला वृत्त. राग-आसावरी. ताल-राजविद्याधर

प्रभु तुम मदन मनोहर धाम ॥धृ०॥
रुक्मिणी के हो श्याम कृष्ण तुम । जानकि के हो राम ॥१॥
ध्यानज्ञानतें योगी ध्यावत । हरो हमारो काम ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या श्रीहरिको । बिनति करत लैं नाम ॥३॥

१०८ / हिंदी

कर्पूरिकावृत्त. राग- खमाज. ताल-तेताला.

और किसे नहिं मानोंगी ॥धृ०॥
संतसंगतें राग रंग यह । विषयसुख नहि जानुंगी ॥१॥
तुमही पति हो द्वापार जुग में । कलजुग में पितु जानोंगी ॥२॥
ज्ञानेश्वर गोपाल मध्यमें । तत्त्व अभेदहि छानुंगी ॥३॥

१०९ / हिंदी दोहा

संप्रदाय की रीत

संप्रदाय के सबही जन तिनकी है यह रीत ।
इष्ट अपना छोरके और न चाहे प्रीत ॥१॥

११० / हिंदी दोहा

पतिव्रताका धर्म यह पतिबिन अन्य न भाव ।
संप्रदायको तैसेही मुख्य एक गुरुराव ॥२॥

१११ / आर्या

कोणी कांही मागो नंदन कनकादि सर्व यदुराया ।
परि वर एकचि मजला द्यावा होइन अखंड तव जाया ॥१॥

११२ / हिंदी

सुशीला.राग-धनासरी. ताल-तेताला

माई मैं रहूंगी साधुसंग ॥धृ०॥

मायामो गिर गिर भया है । मेरा चूरण अंग ॥१॥
आसन मुद्रा छोड कठन मग । भइ हरिपिरती दंग ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु करुणाबलतें । सुनोंगी बंसी चंग ॥३॥ (य९उ.२४)

११३

सामनुष्टुप. मूळ.-भूप. ता- राजविद्याधर. गौण - ''पहा पहा सावळा''.

ज्ञानेश्वरा मायबापा । निष्कलंका ब्रह्मरूपा ॥
मार्ग दाखवूनी सोपा । वारा त्वरित त्रीतापा ॥धृ॥
जिकडे दिशे देखेन पाउलें । तिकडे अनुमानीं भले ।
तुम्ही याच देशी गेले । माग पाहुनी मी चाले ॥१॥
गुरु जाता सुखासनी । सर्व संतशिरोमणी ।
तरी येते लोटांगणी । दास म्हणवूनी जनीं ॥२॥
हर्षभरी तुमच्या मागें । धांवत यावें वाटे वेगें ।
कांही सेवा घडो अंगे । ज्ञानेश्वरप्रभु अंतरंगे ॥३॥
गृहीं येता गुरूजन । ठेऊ मस्तक चरण ।
मन एकाग्र करून । ओवाळू निंबलोण ॥४॥
शब्द मधुर ओवाळू । मृदु स्पर्श अंगें गाळूं ।
रूपविषय तोहि न पाळू । अवघा करू एकचि खेळू ॥५॥
रसंगंध ओवाळूनी । दिलें इंद्रिय दवडूनी ।
प्रेमें पाय धरूनी मनीं । उरो गुरुदास्य आत्मपणी ॥६॥
सुखपक्वान्नाचें ताट । प्रेम भक्षी लखलखाट ।
संतभरें भरिला हाट । आतां गृह तें ज्ञानेश्वर वाट ॥७॥
ज्ञानेश्वरा मायबापा । निष्कलंका ब्रह्मरूपा ॥
मार्ग दाखवूनी सोपा । वारा त्वरित त्रीतापा ॥धृ॥

११४

इंदिरावृत रा.-वसंत. ताल.-तेताला.

मनमोहन अंतरिं ध्यायीं ॥धृ॥
ज्याच्या ध्यानें तव मन मोहत । ते तुज तारक पाहीं ॥१॥
जेथें मन हें बळें लाविसी । कर्म तेंचि लवलाहीं ॥२॥
मनमोहन मूर्ति ही कळाया । अलकावतिपति गाई ॥३॥ (य९उ.२५)

११५

रमावृत्त.रा.-भीमपलासी ता.-तेताला.





बाई पति तो आवडला ॥धृ०॥
परब्रह्म असुनी भक्तघरीं । भरितो कावडिला ॥१॥
रासमंडळी खेळुनि जो कीं । प्रेमळार्थ रडला ॥२॥
गोपबाळकरुणार्थ प्रभु जो । यमुनाजळिं दडला ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुतातकृपेनें । सद्विवाह(१) घडला ॥४॥(१) ब्राह्मविवाह

११६

श्रीमतीवृत्त. रा.-यमन. ता.-राजविद्याधर. (तेताला.)

मज आवडती तत्पाय ॥धृ॥
नंदचि अक्षय तात जयाचा । आणि यशोदा माय ॥१॥
ज्याच्या स्मरणें भवभय हरुनी । नुरे षडरिचा ठाय ॥२॥
गोपिसंगतीं रासमंडळीं । झाला बहु यदुराय ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु तात दयाळू । आम्हांस पितामाय ॥४॥

११७ / हिंदी

इंदिरावृत्त.राग-खमाज.ताल-पंजाबी ठेका

अइ पति दे मुरलीवाला ॥धृ०॥
सुन्ना रूपा चाहत नाही । अच्छी बनी मृगछाला ॥१॥
कात्यायनि पूजति जिनकारन । भई तरुणिकी बाला ॥२॥
जिस मुरलीको कान सुनतही । बांवरि भइ ब्रजबाला ॥३॥
देखत हरिपद वंदन करिके । डारोंगी गल माला ॥४॥
मोहि बिहाय लेहु बिनवति हूं । तुम पग बिट्ठल-लाला ॥५॥

११८ / वाजवि मुरली

रमावृत्त. रा.- यमन.ता.- राजविद्याधर. तेताला.

प्रभु हा वाजवितो मुरली ॥धृ॥
रामवतारी(२) श्रमलां म्हणूनी । वनलीला वरिली ॥१॥
राम एकपत्नि येथें रति-सह यतिता भरली ॥२॥
रामवतारीं उपासना ती । कृष्णीं चिती उरली ॥३॥
रामाचरण जगास्तव येथें । प्रेमल धी स्फुरली ॥४॥
रामदया साधकासिचि इथें । जारिणी उद्धरली ॥५॥
रामचापभय खडतर वाटे । कृष्णीं मति मुरली ॥६॥
घे घे समपरि अलंदिपतिजा । यदुपतिनें वरिली ॥७॥ (य९उ.२६)

(२. भागुरीच्या मतान्वयें येथें अकाराचा लोप केला आहे.)

## ११९ / हिंदी / गोपी पग की आस

सुशीलावृत्त.राग-यमन. ताल-तेताला

मोहे गोपी पग की आस ॥धृ०॥
गोपी करुणा नारायण को । देखूं अपने पास ॥१॥
कृष्णकृपा गोपीपग नियत न । गोपीबस हरि खास ॥२॥
गोपी अरु हरि भेदरूप नहिं । ब्रह्मरंगमय रास ॥३॥
अलकावतिपति हरि अरु गोपी । सच्चित्सुखविलास ॥४॥

## १२०

गुरुजवळ गाऱ्हाणे

सामकादावृत्त. मूळ.-झिंझोटी.ता.-दादरा. गौणपीठ.'पांडुरंग स्मर अभंग'.

सोडुनि मज पाठविसी भर्तृमंदिरीं ।
मज परीस प्रिया त्यास बहुत सुंदरी ॥धृ०॥
माय पट्टराणि त्यजुनि मुख्य इंदिरा । जाताती यदुवल्लभ अन्यमंदिरा ॥१॥
सान मी म्हणूनि तुला विनवितें सये । या स्थळिं हरि बोलावुनि पूजवीं स्वयें॥
ज्ञानेश्वर दीनकरुण मायमाउली । सत्वर मज आणविं गे अणु पाउली ॥३॥

## १२१

सामकामदावृत्त. मूळ.-झिंझोटी. ता. दादरा. गौण.-''पांडुरंग स्मर अभंग.''

झालिं वर्ष दोन सासरिया येउनी । अझुनि कोणि येइ न कां माहेराउनी ॥धृ॥
नलगे मज साक्षात्कृति तुजविणा गडे । नेणुं बाई काय वृत्त माहेराकडे ॥१॥
चोळि लुगडिं कांहीं नको परि करीं कृपा । तुज मी ज्ञानेशजननि नमीं अत्रपा॥२॥

## १२२ / मी परदेशी

विशाखावृत्त. रा.-जीवनपुरी. ता.-राजविद्याधर (तेताला.)

खचित मी झालें परदेशी ॥धृ॥
षोडश वरुषें प्राप्त तरी हरि । बोलतिना मजसीं ॥१॥
सप्तपदीफळ कांहिं न उमटे । काय अझुनि करिसी ॥२॥
अलकावतिपति जननी माझी । कींव असो तुजसी ॥३॥ (य९उ.२७)

## १२३ / प्रीति करी

सामकामदावृत्त. मूळपीठ. झिंझोटी. ता.दादरा. गौणपीठ.-''पांडुरंग स्मर अभंग.''

माय नंदसूनु हरी प्रीति बहु करी । अंधनेत्र म्हणुनि काय नेणो मजवरी ॥धृ॥
रास करुनि रिझवि गडे अन्यसुंदरी । कळवळुनी राहतो मदीय मंदिरी ॥१॥
योगयाग न करुनीहि अंगिकारिलें । अन्य प्रीय इंदिरादि दूर सारिले ॥२॥



ज्ञानेश्वरचरणांबुज सेवितां गडे । निष्कंटक झाले मम येणें हरिकडे ॥३॥

## १२४ / सोसुं किती

जयावृत्त. मूळ.-वसंत.ता.-दादरा.

विश्वत्रास सोसुं किती वदा नंदबाळा ।
बाळपणीं मनें तुम्हा घातली म्यां माळा ॥धृ॥
सासु जाच कितिक तरी आझुनि मी साहूं ।
चला हरि कोठतरी दिवस चार राहूं ॥१॥
ज्ञानेश्वरचरणांबुज सेवुनिच सदा हो ।
पावतें मी याच जन्मीं तूमच्या पदा हो ॥२॥

## १२५

सुरुचिवृत्त.रा.-यमन. ता.-राजविद्याधर.(तेताला.)

कधिं पाय बघिन नयनी ॥धृ॥
प्रभु तुम्हासम आळ पुरविता । नाहीं त्रयभुवनीं ॥१॥
सान मी कन्या सासरिं जातें । झट न्या परतोनी ॥२॥
सकळ प्रभू तुम्हि जवळि ठेविल्या । मी कां कुलकलनी ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु मायबापगुरु । बैसा हृद्भवनीं ॥४॥

## १२६ / आर्या

सखि पुससी सखये मज कांत तुला कोण सांग आवडतो ।
तरि तो व्हावा माये जो पांडवसदनिं पात्र सावडतो ॥१॥

## १२७ / हिंदी

तिलोत्तमावृत्त. राग-बेहाग. ताल-तेताला

जगदंबा अस जोग करोरी ॥धृ०॥ (य९उ.२८)
त्रिपुरसुंदरी नाम तुम्हारा । पति देवो नंदलाल हरी ॥१॥
जहां जाउं तहां कोउ कही यही । आ जसुमतिसुतकी दुलरी ॥२॥
कात्यायनि महामाय योगिनी । वंदू तोहे अधीश्वरी ॥३॥
ज्ञानेश्वरकन्याको करि दे । नंदनंदनकी प्रेमभरी ॥४॥

## १२८ / शेजेच्या वेळेचें पद

सिंधुजावृत्त. रा-केदारा.ता.-तेताला.

आण तुमची गोविंदा रे ॥धृ॥
मोक्षादिक मज कांहिच नलगे । दावा पदारविंदा ॥१॥
जन्मोजन्मीं अंधचि करि मज । तुटाया विषयधंदा ॥२॥
निजा निजा प्रभु लवकरि आतां । विश्रांतीसुखकंदा ॥३॥

इतुका वेळ जागतां ऐसें । कळेल प्रभुजी नंदा ॥३॥
ज्ञानेश्वरबाला ही इच्छी । अनुभवमय सुखछंदा ॥५॥

१२९ / ''न मः शि वा य'

मंत्र आर्या :- शिवपंचाक्षरीचा विष्णुपर संकेत

**न** गणुनि श्रम करि सेवा मज्ञ्जनपदपंकजाचि जो भावें ।
तद्यश तें कुंतिसुता सुरमुनिसह सर्वदाचि म्यां गावें ॥१॥
**म**हि सलिल दहन पवन ख मिळुनी जी जाहली असे काया ।
ती कृष्णनामभजनें होउनि हरी सेवि सद्‌गुरूपाया ॥२॥
**सि**द्धानुवाद हा कीं श्रेष्ठ ज्ञानाहुनीहि हरिभक्ति ।
श्रीमन्महाभारतीं बहुशा ऐशीच वासुदेवोक्ति ॥३॥
**वा**गवि निजहृदयीं जो सद्‌गुरुचरणांबुजास भावानें ।
त्याचा जन्मोजन्मीं हरी होये दासचि स्वभावानें ॥४॥
**य**म दूतांप्रति सांगे विष्णुपुराणांत वैष्णवालागीं ।
नाणावे कीं त्वां जे झाले क्षीराब्धिजापदविभागी ॥५॥

१३० / आर्या

तेव्हांचि भक्ति भेटे जेव्हां पाणिग्रहण करील हरी ।
मग न्यून न किंचितही राबति धर्मादि पुरुषार्थ घरीं ॥१॥

१३१ / आर्या

वैकुंठ नायकाच्या पदरीं पडतांच भीति काह्याची । (य९उ.२९)
जेवीं गृहिणीलागीं नच शंका कांतसदनिं राह्याची ॥१॥

१३२ / दिंडी

मंत्र तंत्र सर्वही हरिनाम । कृष्णपाय तेचि अपवर्गधाम ।
कृष्णसेवा ती प्रमावृत्ति साची । मूर्ति प्रमेय विश्वव्यापकाची ॥१॥

१३३

साधने ती सांडूनि सर्व काही । फळी झोंबी घ्या वासुदेवपायीं ।
गुणे नाना व्यापिते जरी फार । तरि उतरे तो कुंभिनिचा भार ॥२॥

१३४ / हिंदी

सामकामदावृत्त.मूळपीठ. झिंझोटी. ताल-दादरा.गौणपीठ. 'रत हरिपद' या चालीवर

बांध बांध घूंगरू मैं नाचू आंगन में ॥धृ०॥
श्रीगुरुपग सीस धरूं कृष्ण ध्याऊं मन में ।
नामस्मरण मुख में लेउं हंस राखूं तन में ॥१॥
खेचरी चाचरी अरु अगोचरी लगाऊं ।



अलक्ष मुद्रा ध्यान करत परपदकूं ध्याऊं ॥२॥
राखो एक टेक प्रभू नंदजी के लाला ।
पापि हुं परि तुम्हरे गले डारूं फुलमाला ॥३॥
ज्ञानेश्वर करुणाघन सब जन के दाता ।
वोहि गुरु माके घर वोहि तुम भर्ता ॥४॥

१३५

लावणीवृत्त.मूळपीठ-यमन. ता.-धुमाळी. गौणपीठ- ''पंढरिनाथाविणे काय.'' चालीवर.

चार दिवस शिवुं नका सख्या मी होइन जै शिवदा ।
गुह्य कोणतें यदुकुळटिळका तें मग मजसि वदा ॥धृ॥
भलत्या वेळीं मदना न कशी लाज असे लव ते ।
नका धरूं धरणिधराधेया पायावरि लवते ॥
आर्त नव्हा आर्तवानें अहो भिजले पल्लव ते ।
मुदत दिवस खेळावे संगें घेउनि बल्लव ते ॥
शुद्ध करा सिद्धवरा वारा भव स्वानुभवदा ॥१॥ (य९उ.३०)
पहा कृपेने आज अवचिता येणें हें व्हावें ।
परि म्यां पापिणिनें वदोनी परतुनि लावावे ॥
ऋतुप्रतिबंधनकारक मजला औषध जी व्हावे ।
चार दिवस तरी पतिसेवासुख कां मी खोवावे ।
दिलभरणा निज करुणेचा द्या प्रभु मजला सवदा ॥२॥
श्रीयशुमति मामी भय त्यांचें तुम्हा आणि मजला ।
कसा बाई संवत्सरभरही ऋतू हा नुमजला ।
एवढेंच आतां हा आठव मम हृदयीं रुजला ।
पंचमदिवशी येइन मंचकिं काय करूनि सजला ॥
भवत्प्रेम वृद्ध्यर्थ चिंतितें ज्ञानेश्वर किं वदा ॥३॥

१३६

सुशीलावृत्त. रा.-यमन. ताल-तेताला

आम्हां राखल गोकुळराव ॥धृ॥
ज्याच्या चिंतनमात्रे करुनी । तुटल सकल भवभाव ॥१॥
त्याचे होतां मग तो करितो । कडिये घेउनी डाव[१] ॥२॥
ज्ञानेश्वरवचनें घ्यावें कीं । त्या श्रीहरिचें नांव ॥३॥

(१. लहान मुलाने गाडीत फिरावयास जाणें.)

१३७

रमावृत्त.रा.-यमन.ता.-तेताला.

तो म्यां नंदसदनिं नमिला ॥धृ॥
यच्चरणातें सेवि कमलजा । कुंजवनी रमला ॥१॥
ज्यानें कुंभिनिभार हरोनि । भक्तताप शमिला ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणायोगें । बुद्धि होय विमला ॥३॥ (य९उ.३१)

१३८ / त्यजुनि काम

सामकामदावृत्त.मूळपीठ.बेहाग.ता.-यतिलग्न.दादरा.गौणपीठ'पांडुरंग स्मर अभंग'या चालीवर.

त्यजुनि काम आज शाम दृष्टि पाहिला ।
ज्या स्थळि मी जाई तेथ नित्य राहिला ॥धृ॥
मुरडुनियां उलटविली नयनबाहुली ।
नंदतनयमंचकिं मी शयन पावली ॥१॥ त्यजुनि ०
करुनि काज लोकलाज शब्द साहिला ।
जीवभाव नंदतनय चरणिं वाहिला ॥२॥ त्यजुनि ०
कोंवळिये धरिली शिरीं सुखद पाउली ।
रक्षि सदा ज्ञानेश्वर माय माउली ॥३॥ त्यजुनि ०

१३९ / हिंदी

इंदिरावृत्त.राग-परज. ताल-तेताला.

नंदलाल की मैं हूं रामा ॥धृ.॥
औरनको नित छोड दिया अब । नहिं चाहती सुरधामा ॥१॥
जोग जाग अरु ब्रह्मसिद्धि को । नहि ल्यावति मनकामा ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या ब्रजबरकी । भहि अनमोल सुभामा ॥३॥

१४०

लावणीवृत्त. मूळपीठ. पूर्वी ताल-धुमाळी. गौण. ''वसंती बघुनि'' या चालीवर.

आज मी भाग्याचे झाले । नंदसुताकरिं देउनी बापे कन्यादान केले ॥धृ॥
होते जरि नयनांध मी बाई । परि सगुणाकृति होउनि हरिनें ठेवियलें पायी ॥
नलगे आतां मज कांही । अपवर्गादिक सांडावे ओवाळुनि हरिपायीं ॥
सुकृत बहु जन्माचें फळले ॥१॥ आज मी०
सोहं हंसः जपमाला । सोडुनिया हरिकंठिं घातली प्रेमकमळमाळा ।
गेला भास गौर काळा । लहान असोनी वरिले बाई भुवनत्रयपाळा ।
सुखाचे अवघे क्षण केले ॥२॥ आज मी०
श्रवण नयन मिळुनी बलहारी । नीलबिंदु रेषावर्ण तनू हृदय व्यापि सारी ॥



पवन ख तेज भूमि वारी-। भास जाउनि देखतसे मी सगुण पूतनारी ।
ज्ञानेश्वरकरुणा धाले ॥३॥ आज मी० (य९उ.३२)

१४१

सामकादावृत्त. मूळ-झिंझोटी.ता.-दादरा. गौणपीठ ''पांडुरंग स्मर अभंग'' या चालीवर.

काल मांडिवरी मला तात घेउनी । बोलिले किं राहिं सदा कृष्ण सेवुनी ॥धृ॥
वदले तुज मीच दिले श्रीवराकरीं । घेउनी तत्पद हृदयीं सेविं झडकरी ॥१॥
अलकावति जैसी व्रज मानि तूं तसे ।माझ्यासम यशुमतिला मानिं उल्लसे ॥२॥
सासु माय एक ठाय मानुनी स्वये । ज्ञानेश्वर सद्गुरुपद वंदिले सये ॥३॥

१४२ / पती आवडे मनीं

सामकामदावृत्त. मूळपीठ- झिंझोटी. ता.दादरा. गौण.'पांडुरंग स्मर अभंग' या चालीवर.

माय मला तोचि पती आवडे मनीं ।
पूर्व कल्पी ज्यास गोपयुवति कामिनी ॥धृ॥
ब्रह्म पूर्ण काहिं मला नाकळे गडे । इच्छितें मी जावयास श्रीहरिकडे ॥१॥
इतर देव बहुत असति चांगले जरी । वरायास त्यास असती अन्य सुंदरी ॥२॥
कोटि जन्म करुनि तपा मिळविते तया । ज्ञानेश्वरतात जया कथिति अन्वया॥३॥

१४३ / उखाणा.

नांव घ्या म्हणायासाठी । निगम झाले भाट ।
पंचलतिकेच्या मंदिरी । वासुदेवांचा थाट ॥१॥

१४४ / आर्या

''कुमारिसाठी गोकुळिं गेला'' ज्ञानेश्वरीत ही वाणी ।
यास्तव त्या मी विनवी हरिपति व्हाया कवित्व अर्पोनी ॥१॥ .
(य९.३३)

१४५ / गोकुळची रीत

सुशीलावृत्त. रा.-असावरी. ता.-तेताला.

धन्य व्रजीची रीत । बाई ॥धृ॥
अंतर बाहिर हरिला पाहती । घेति अनंद अमीत ॥१॥
जीवे झाल्या लीनचि कृष्णी । संसृतिकार्य करीत ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु करुणा होता । हरिसुख विश्व भरीत ॥३॥

१४६ / हिंदी

कुरंगाक्षी वृत्त.राग-यमन. ताल-राजविद्याधर.

माई मोरी सावरियासों प्रीत ॥धृ०॥

जहं जहं देखति तहं तहं दिखते । घन तनु सुरत सुनीत ॥१॥
कमलनयन कमलबदन मुरली-। वादन विविध सुगीत ॥२॥
अलकावतिपति नंदिनी के प्रिय-। बिरह-सुरह (१) सुखगीत ॥३॥

(१.संयोग. सुरह हा शब्द 'रह' या शब्दावरून मुद्दाम तयार केला आहे.)

१४७

सानुष्टुपवृत्त. मूळपीठ-जोगी.ता.धुमाळी. गौण- 'वारी संकट हरि दामाजीचे'या चालीवर.

या या यादवजी मंचकिं बैसा । मज नलगे पैसा ॥धृ॥
वेश्या मी तुमची पदगतदासी । चुंबन द्यायासी ॥
मजला तुमचे चरणचि परि कासी । नेणे मी काशी ॥
॥चाल॥ काय हरि मजवरि न जडेची । प्रेम अझूनी कैसा ॥१॥
देते मी तांबूल आपुल्या घरचे । निजसुखसंघ रचे ॥
स्थळ हें तुमचेंची तळिंचे वरिचें । मजल्याही वरिचें ॥
चाल ॥ जितुका वाटेल तुम्हां तितुका । लुटा सुरंगहि लयसा ॥२॥
झाले मी पाहूनि कामसहिता । मनिं कामरहिता ॥
आतां मी तुम्ही एक सहीता । झटणें सुखहिता ॥
चाल ॥ ज्ञानेश्वरगुरुचरण स्मरुनि मनिं । धीट जाले सहसा ॥३॥

१४८ / दोहा

शंकर-विष्णु

कृष्णदास शिवद्रोहि जे कृष्णद्रोहि शिवदास ।
ते जन करिती कल्पवरी कुंभिपाकरहिवास ॥१॥ (य९उ.३४)

१४९ / श्लोक

शिवपदकमलेही कृष्ण भक्तीस देती । हरिपदकमलेही शंकरा भेटवीती ॥
शिवविमुखनरांना विष्णु दे दुःखबेडी । हरिविमुख जनातें शंकरु तेवि पाडी ॥१॥

१५० / दोहा

राम भजे तो शंकरु शिव स्मरे तो राम ।
जो शिवराम भजे तया दोन्हिहि आत्माराम ॥१॥

१५१

गंगायमुनासंगमी दोन्ही तीर्थप्रयाग ।
तेविं विष्णुशिवभक्तिनदीसंगमिं ब्रह्मसुयाग ॥२॥

१५२

शंकरविमुख वैष्णवा विघ्न सुषुप्तीभान ।



विघ्न हरिविमुख शिवप्रिया अतिसंवित्यभिमान ॥३॥

१५३

कंचुकीवृत्त.मूळपीठ.यमन.ता.-धुमाळी. गौणपीठ.- 'कशाला संन्यासी झाला.' या चालीवर

शंभु जरी देतिल उपदेशू । तरि मग कांतहि कमलेषु ॥धृ॥
पिता जै काळजीने पाळी । तरिच घे पतिसौख्यहि बाळी ॥
ठेवितील गुरु जरि कर माथां । तरिच ये करुणा जगनाथा ॥२॥
ज्ञानेश्वरगुरुशिवकरुणा । वरिले व्रजराया तरुणा ॥३॥

१५४ / हिंदी

सुशीलावृत्त. राग-यमन.ताल-तेताला

मेरी माधव सुप्रीत ॥धृ०॥
जो चाहे सो मुकती धुंडे । मैं चाहुं रति-रीत ॥१॥
कठिणबचन यह जानति नहि हूं । सुलभ नाम भल गीत ॥२॥
जहांतक राग द्वेष नहि जावे । तहांतक भवभय नीत ॥३॥
ज्ञानेश्वर कन्यका बिनति सुनि । शामहि हृदय भरीत ॥४॥

१५५ / आर्या

माता भगवति शंकर तात गुरु ज्ञानदेव कृष्ण पती ।
सगोपि राधा भगिनी, हे पंचायतन नित्यमति जपती ॥१॥ (य९उ.३५)

१५६ / कधिं तरि

सुशीलावृत्त. रा-जोगी.- ता.- तेताला

एवं कधिं तरि घडल उपाय ॥धृ॥
कोंडुनि इंद्रिय चिंतित हृदयी । येतिल श्रीगुरुपाय ॥१॥
श्रीगुरुआज्ञा सेविन सज्जन । झिजवुनि धन मन काय ॥२॥
करिल कृपा जरी तरि मग सिद्धचि । ज्ञानेश्वर गुरु माय ॥३॥

१५७ / हिंदी / रामकृष्ण गोविंद मुरारी

प्रभावृत्त.मूळ-यमन.ताल-धुमाळी.गौणपीठ. 'धाव पाव गुरुमाय माझे' या चालीवर

तिन चरणनपर प्रीति हमारी । मत पूछो संसृतिगत नारी ॥धृ०॥
जलदजालसम सुंदर तनु है । निसदिन हृदय ध्यावें त्रिपुरारी ॥१॥
जनम देव ऋषि मनुख न जाने । लेवे चुंबन व्रजकी नारी ॥२॥
भ्रान्तिरहित चिति तरंग तनु जो । रास रचै जमुनाकि किनारी ॥३॥
श्रीज्ञानेश्वरदत्त मंत्र यह । रामकृष्ण गोविंद मुरारी ॥४॥ तिन०

१५८

रमावृत्त. राग-देस. ताल-तेताला

वाढलि काय गडे ॥ रजनी ॥धृ॥
कांहि दिसेना लाल अजूनी । साजणि प्राचिकडे ॥१॥
हाय हाय हे काय चिंतिसी । जाय यदुप तिकडे ॥२॥
चोरुनि आले सकळा साजणि । काय गती तिकडे ॥३॥
एवढि कां गें सलिली पडलिस । कां न गमे इकडे ॥४॥
म्हणसील मला जाणसि ना तूं । गृहिचे लोक कुडे ॥५॥
हरिसी मिळता घरदाराचें । धाडुनि देई मढें ॥६॥
किन्तु मला हरि संगति करिता । न कळे साच कुडे ॥७॥
सत्याऽसत्या याचिच सत्ता । जाणुनि घेई फुडे ॥८॥
ज्ञानेशकृपे दोघी देऊ । श्रीहरिकरि लुगडें ॥९॥

### १५९

इंदिरावृत्त. रा.-परज. ता.-तेताला (राजविद्याधर)

मज आस तयाची बाई ॥धृ॥ (य९उ.३६)
जननी जनकाहूनिहि ज्याला । प्रिय सुयशोदा आई ॥१॥
प्रेमळ भक्तास्तव नंदाच्या । राखी काननी गाई ॥२॥
तो मिळवाया सगुण गगनतनु । शरण अलंदिप-पायी ॥३॥

### १६० / भुलिल गडे

सामकामदावृत्त.मूळपीठ-झिंझोटी.ता.-दादरा.गौणपीठ-'नीज सुखे विश्रांतिसि'या चालीवर.

पाहुनि मी भुलिल गडे शामसुंदरा । ज्याचें दास्य सर्वकाळ करित इंदिरा ॥धृ॥
स्वर्ग मोक्ष कांहि मला आज ना रुचे । विष्णुवीण भोग जसे रोग नारुचे॥१॥
कोमल पद इच्छितााति दुग्धमंदिरे[1] । दृष्टि केलि तरळ बाई भुवनसुंदरे ॥२॥
ज्ञानेश्वरकरुणा ती करुनि मोहरी[2]। सांठवील हृदयि सदा विश्वजोहरी[3]॥३॥

(१.स्तन. २.पुढें. ३.सर्वज्ञ.)

### १६१ / दोहा / हिंदी

ज्ञानेश्वरपग राख हूं जनम जनम मो सीस ।
होवे है व्रजराज पती येही मिले असीस ॥

### १६२ / हिंदी

कर्पूरिकावृत्त.मूळपीठ -जोगी.ताल-तेताला. गौणपीठ- हिंदुस्थानी भजनाचे चालीवर

म्हारो मन जदुपतिपग लपटा ॥धृ०॥



उनकी कंबल आंग रखूंगी । और की न चाहती शालपटा ॥१॥
शाम के संगति शामहि हूंगी । कामकुं बताउंगी ढालपटा ॥२॥
ज्ञानेश्वरजामात सामने । जानेकूं लेती दुपेटा ॥३॥

### १६३ / पत्नीस बोध

**श्लोक**

(* महाराजांचे कुटुंब म्हणजे पत्नी - सौ.मनकर्णिका यांना सांगितलेले श्लोक)

हरिपदभजनानें भाव जैं चित्ति वाढे ।
तुटति सकल तेव्हा संसृती बंध गाढे ॥ (य९उ.३७)
सुखघन करुणाब्धी भेटतो येउनीया ।
व्रजजन युवतींना खेळवी जो वनी या ॥१॥

### १६४

नवघनवपु साची पूर्ण सौंदर्य पुष्टि ।
मुनिजनमनयुक्ति पाहती दिव्यदृष्टि ॥
निजकरिं हरि येतां भीति कांही नसावी ।
जनिं सगुण गुणेंही कृष्णमूर्ति दिसावी ॥२॥

### १६५

निज गुरु तरि तोचि कृष्णिं जो प्रीति लावी ।
भजन करुनि भावें श्रीहरि दृष्टि दावी ।
मन पवन परात्मा अर्पुनी विष्णुपाया ।
व्रजपतिगुणगाने शोभवी सर्व काया ॥३॥

### १६६

स्मरण तरि असो हे कृष्णनामावळीचे ।
स्मरकृत भय आटे सर्व तेव्हां कळीचे ।
स्मर हर-धि-विलासी चित्तिं बांधोनि ठेवी ।
भवभय न कदापी आपणामजि गोवी ॥४॥

### १६७

न कळत मज काही वेदशास्त्रार्थयुक्ति ।
न गणित मम बुद्धि साधनें [4] मोक्ष[5] मुक्ति[6]॥
हरिचरणसरोजीं घेउं विश्रांति धावे ।
म्हणुनि तुजहि ऐसे सांगतो ध्याई भावे ॥५॥

(४.योगादि. ५.कैवल्य.६.सायुज्यादि.)

१६८

हरिचरणगुणांची आवडी चित्तिं जेव्हां ।
जडल भवभयातें सोडुनी भाव तेव्हा ॥
हरिमुख निजहासा भेटुनी तेंचि होते ।
बहुत निगमवाणी कृष्ण[1] जैं कृष्ण[2] होते ॥६॥ (य९उ.३८)

(१. जीव अविद्या आवरणाची काळीमा असल्यामुळे. २. देव.)

१६९

अगणित तव नामे बोलती वेदवाणी ।
परि मम मन ते कीं कृष्ण नामास मानी ॥
निज सुख असुनीही दुःख-त्रैविध्य भासे ।
परि तव गुण गातां कल्पनाविघ्न नाशे ॥७॥

१७०

जंव जंव मन कल्पी पाय तूझे दयाळा ।
त्वरित तंवचि सोडीं संसृतीच्या भयाला ॥
सुलभ मगहि वाटे मुक्ति सर्वत्र माते ।
भजन करुनि पावे सोडुनी स्वक्रमाते ॥८॥

१७१ / आर्या

तंव तंव भवभय जाळी जंव जंव हरिचरणिं प्रीति नाकळते ।
सत्पदसेवा करिता हरिमूर्ती मग हृदीच जाकळते ॥१॥

१७२

पुनरुक्तीही असो का परि तव चित्ती वसो हरि माझा ।
यास्तव शब्द सुखाचे बोलतसे सांगता निगमराजा ॥२॥

॥ पत्नीबोध समाप्त ॥

१७३

कर्पूरिकावृत्त. रा.-परज. ता.-तेताला. राजविद्याधर

हरि करितिल बहुजणि सेवा हो ॥धृ॥
चार दिवस मज जननि-मंदिरी । जाया निरोप द्यावा हो ॥१॥
मजविण क्षणभरि तुम्हा न करमे । हे जाणत मी देवा हो ॥२॥
तुमच्या गृहिं व्रजसुंदरी येतां । न मज सवतिचा हेवा हो ॥३॥
येतें परतुनि तीन दिसां मी । करिं कर मारुनिं घ्यावा हो ।





अलकावतिपतिसुता स्वकान्ता । मागत गुरुपदठेवा हो ॥५॥

१७४ / श्रीकृष्णवचन

भगवद्वरदान - सामकामदा वृत्त. मूळपीठ. रा.-झिंझोटी. ता. दादरा.
गौणपीठ - नीजसुखें विश्रांतिसी. या चालीवर.

जाइं प्रिये गुरुपदरज शीघ्र सावडी ॥
मजहि त्याचि जन्मतांचि परम आवडी ॥धृ॥
विरह तुझा सहन नसे म्हणुनि ये त्वरे ।
**सद्गुरुपद सलिल मला आणि सत्वरे ॥१॥**
वृंदावनपवन मधुर शीत वाटतो ।
यास नेई संग दाखवील वाट तो ॥२॥
अलकावतिपतिनंदिनिकांत जाणता ।
हर्षभरित होत श्वसुर तीर्थ आणिता ॥३॥
(य९उ.३९)

१७५ / हिंदी

कुरंगाक्षी वृत्त.राग-असावरी. ताल-तेताल.

माई मोहे सांवरियाकी प्रीत ॥धृ०॥
रमण तनय धन सदन न जानू । तजी भव-विभव रीत ॥१॥
तनु मन पवन कीन्हि चरणार्पण । सुनि सुनि मुरली गीत ॥२॥
अलकावतिपतिसुता कान्तपद-। -पंकजमोद अमीत ॥३॥

१७६ / हिंदी

चारुचर्यावृत्त. राग-भूप. राजविद्याधर. ताल-तेताला

मुख मुरली मोहन धारी ॥धृ०॥
सुनत अवाज मोहबिबस भये । शचिपति बिधि त्रिपुरारी ॥१॥
जप तप छोरी कुंजबन धूंडत । तापस योगी बिचारी ॥२॥
चारुचरण-चरणते कुंभिनी । पावन भई है सारी ॥३॥
अलंदिपतिनंदिनिमनहारी । अनुहत खेल खिलारी ॥४॥

१७७

रसालावृत्त. रा.- जागी. ता.-तेताला

माझे मन यदुनंदन पायी ॥धृ०॥
जडवित असतां कोठें न जडे । आणिक बहुत उपायी ॥१॥
यद्भजनविना पडती मुनिहि । बहुशः कामअपायी ॥२॥
गरुड कमलजा त्यजुनि जयाला । निजज-दर्शनी घाई ॥३॥

अभयकरे मम पालन कर्त्री । अलकावतिपति आई ॥४॥

१७८ / हिंदी

तिलोत्तमावृत्त. मूळपीठ-जोगी. ताल-कारवा. गौण- पग घुंगरु बांधकर - या चालीवर

जदुराजचरनकी लागी रे ॥धृ०॥
कामक्रोधमद लोभ रिपुनकी । दुर्बल सेना भागी रे ॥२॥
जहं जहं जाती तहं मम मनको । कमलाबल्लभ बागीरे (१) ॥३॥
ज्ञानेश्वरजा जिनपग असुवन । सींच रैनदिन जागीरे ॥४॥ (य९उ.४०)

(१.वळविणारा)

१७९ / हिंदी

सुशीलावृत्त. राग-यमनकल्याण. ताल-तेताला

मोरी प्रभुपद लागी प्रीत ॥धृ०॥
जपतपदान मनहि नहि भावत । जात निषिद्ध बिहीत ॥१॥
ध्यान पकर करिं जरा मिलाई । कब पावोंगी रीत ॥२॥
अलकावतिपतिसुता कांतपग । राखो सकल जिवीत ॥३॥

१८०

रमावृत्त. रा.-खमाज ता.-तेताला. राजविद्याधर.

तो मज साजणि आवडिचा ॥धृ॥
ज्याला व्रजरमणी दाखविती । धाकही चावडिचा ॥१॥
कळस शिखरी जो निगमगम्य प्रभु । संयम पावडीचा ॥२॥
ज्ञानेश्वरकरुणें पैठणी जो । वाहक कावडिचा ॥३॥

१८१

सामनुष्टुपवृत्त. रा.-परज. ताल- तेताला. राजविद्याधर.

आघविया मिळुनी चाला गे । प्रभुकर धरुनी नाचाला ॥धृ॥
गडियांसह हरि करि काला । अणु सेवुनि निवटा काला गे ॥१॥
आपण ज्ञानेश्वरबाला । अणु पळ पुजुं मुरलीवाला ॥२॥

१८२ / हिंदी

सामकामदावृत्त.मूळपीठ-झिंझोटी.ताल-दादरा.गौणपीठ.पांडुरंग स्मर अभंग- या चालीवर.

मेरे तो तुमहि प्रभू प्राण के पिया रे ।
कोउ पवन जवन धरत सुखवन मुख सारे ॥धृ०॥



करण नयन एक करी निरखत पित प्यारे ।
जीव ब्रह्म एक करी कोउ चित्त झारे ॥१॥
व्रजराजतनुजचरणनख शरण हमारे ।
अलकावतिपतिनंदिनि दिन रजनि पुकारे ॥२॥

१८३ / राम स्तुति

हिंदी / विशोकावृत्त. राग- धनासरी. ताल-तेताला

मन प्रीत लागीरे रघुबरकी ॥धृ०॥
वदन नयन टक लागी । मुनिजन सुरवरकी ॥१॥ (य९उ.४१)
मन क्रम बचन नामही लेते । देखत भव सुर की ॥२॥
हिय भरि राखी ब(न)यनमाधुरी । अलकावतिबरकी ॥४॥

१८४

सामकामदावृत्त.मूळपीठ.-झिंझोटी.ता.-दादरा.गौणपीठ-'पांडुरंग स्मर अभंग' या चालीवर

झाले जन्म सात हात जोडुनी हरी । करिते मी तपा व्हावयास अंतुरी ॥धृ॥
चरणिं शरण आम्हि आज पाहि ईश्वरा । निष्कंचन म्हणुनि आम्हां शीघ्रची वरा॥
ज्ञानेश्वरनंदिनि विनवीत या रिती । द्यावी प्रभु झडकरि मद्विवाहसंमती ॥२॥

१८५ / मृत्यू

रमावृत्त. रा.-भूप. ता. तेताला. -राजविद्याधर

माझे मृत्यू काय करी ॥धृ॥
वारणासीपति करुणासिंधु । असता शंभु शिरी ॥१॥
निजजनवैरी माराया धरी । शूल सुनाभ करी ॥२॥
बैसुनि सागरी अक्षय ज्याला । चिंती हृदयीं हरी ॥३॥
ज्ञानेश्वरबाला शिव म्हणुनी । भू कैलास करी ॥४॥

१८६ / हिंदी

कमलारंगी वृत्त.राग-यमन. ता-राजविद्याधर.

मम हिय शाम बसे ॥धृ०॥
त्यजि सब काज निंद अपने घर । चरणन नयन फसे ॥१॥
और दर्शन दीखत नहिं कहु । शामही शाम दिसे ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु निगम उजागर । चेतन सब विलसे ॥३॥

१८७

लावणीवृत्त.ताल-धुमाळी.मूळपीठ.यमन.गौणपीठ.'नरजन्मामधि नरा करुन घे'या चालीवर

जाइन बाई झडकरिं काननी लाज दूरशी करून ।

हरिला पाहिन डोळे भरून ॥धृ०॥ (य९उ.४२)
रामकृष्णहरिवासुदेव हे नांव जयाचे गोड । घेता भव निवटे अवघड ।
भक्तासाठी कळकळ पोटी रूप दावि ऊघड । न दिसे गर्व जया दूघड ॥
फार फार मी शिणले बाई पुनरपि जन्मुन मरून ॥१॥ हरिला०
सद्गुरुचरणी अगाध करणी जहिं ह्रदय हे झटल ।
भ्रांतिचें नयनपडळ तै फिटल । लाल पिवळे काळे ढवळे निळे आघवे हटल ।
पाठिचा जाच सवतिचा तुटल ।
एकवेळ टक लागलिया दृढ येण न मागे फिरून ॥२॥ हरिला०
रंगिं रंगुनी भ्रांति भंगुनी सये चालली पुढे । साजिरें कमळ दृष्टिला पडे ।
लाजिरवाणें मागे टाकुनि संसारिक सवंगडे । सांवळे रूप देखिले फुडे ।
श्रीज्ञानेश्वरगुरुचरणांबुज गाता जाइन तरून ॥३॥ हरिला०

१८८

सामभाणव वृत्त. मूळपीठ. पूर्वी गौणपीठ - ''त्याला कशाला'' या चालीवर.

दिसतो ग बाई दिसतो ग बाई ।
बाळ कोणाचा बहुत गुणाचा । हा दिसतो ग० ॥धृ॥
लाहो धरूनी इंद्रिय दमनाचा । त्यांनाही वश नाही तरी स्वमनाचा ॥१॥
बोल घटित जो मुनीआननाचा । आम्हांसहित तो स्वामी काननाचा ॥२॥
भाव धरा ज्ञानेश्वरचरणाचा । हरि फळभागी गुरु सेवाऋणाचा ॥३॥

१८९

लावणीवृत्त. मूळपीठ. सारंग. गौण माहीत नाही.

विधितनयकृपे[1] तनु निवते । म्हणुनी हरिचरण मी शिवते ॥धृ॥
कोणी म्हणती नव्हसी विचारी । परी पथ मज मुक्तहि चारी ॥१॥
बहुविधिगति लिखितची माझी । जाइन व्रजगोपिसमाजी ॥२॥
नारद-गुरु येऊनि आता । कलियुगी ज्ञानेश्वरदाता ॥३॥

(१. हे पदस्मरण ऐतिहासिक आहे.)

१९० / हिंदी

सामनुष्टुपवृत्त.राग-भीमपलासी. ताल तेताला.

माई मेरी हरिपगसो टक लागी ॥धृ०॥
बिखय प्रिय सब छोर दिये है । श्यामसुंदर पर भई अनुरागी ॥१॥
रिद्धिसिद्धि यह बह गयी सब । भये नयन-असु बनके बिभागी ॥२॥
सब जग हांसत, रोवत हम है । रोना सुख जानतही जागी ॥३॥



ज्ञानेश्वरप्रभु बचन श्रवणतें । गोपिरमण संग रतिरस पागी ॥४॥
(य९उ.४३)
०००

# ७. करुणापर पदे

## १९१ / हिंदी

सामनुष्टुप. मूळ-जोगी. ताल-तेताला. गौण. हिंदुस्थानी भजनाचे चालीवर.

गोपीनाथ मिलनकी साधु राह बतावो ॥धृ०॥
योग याग ये मायाबन बीच । कौनसी रीती सहज सिखावो ॥
सैली शिंगी मुद्रा पैनी । झोली लिइ, कहां शाम दिखावो ॥२॥
छोर दार घर संप्रदाय-लीन । नाथन भइ अब नथनी दिलावो ॥३॥
मंत्र जंत्र उसिकोही देके । काम क्रोध यह शेर जलावो ॥४॥
अमृत ओहि मोहे दान देव गुरु । ज्ञानेश्वर हरि एक मिलावो ॥५॥

## १९२

सामभाणव. रा.-जोगी. ता.-दीपचंदी.

जननी चरणा दावि गडे ॥धृ॥
तुज आहेती बहु कुमरें परि । निरखीं दीनाकडे ॥१॥
तव कृपेने षड्रिपुचें या । जावो त्वरित मढें ॥२॥
पाय तुझे ते ध्यातां स्वमनीं । जग चिन्मय उघडे ॥३॥
क्षणभरि माये भेटसि नातरि । कोसळतें ग रडें ॥४॥
ज्ञानेश्वरमाउली कृपाळे । उचलुनि घेई कडे ॥५॥

## १९३

सामनुष्टुप. मूळ.-भूप. ता.-तेताला. गौणपीठ - पहा पहा सांवळा.

केव्हां येसी सख्या नारायणा । दृढ मिठी घालिन मी चरणा ।
तुझ्या कृपें सांडीन तिहीं गुणा । एकाएकीं मिळेल ब्रह्मपणा ॥१॥
मृगजळ नसोनी मृगाप्रति । पाणी मानूनी भ्रमविते क्षितीं ।
सत्य नाहीं हे विश्व तैशा रीती । अनादि अविद्या फिरवी जीवांप्रति ॥२॥
मनुष्यांसी मृगजळ नाहीं । दिसोनियां न फिरवी कांहीं । (य९उ.४४)
तेवीं मुक्तां संसारची नाहीं । जिकडे पहावे तिकडे शेषशायी ॥३॥
पूर्ण जरी कळालें तुझें रूप । तरी मन इच्छी तें सगुणरूप ।

जेणें मुनी जाहलेती निष्पाप । तेचि निववीत त्रिविध ताप ॥४॥
जें जें दिसे तें तें कृष्णराव । तोंडी बोलों तें तें त्याचे नांव ।
ज्या ज्या कल्पना तो तो शुद्धभाव । जे अधिष्ठान तोचि ज्ञानदेव ॥५॥

### १९४ / हिंदी-मराठी

जयावृत्त.मूळ-यमन. ताल-दादरा. गौण- रत हरि पद. मोहरी.

आशा बरि तुमरि मुहें अलकावतिराणा ॥
मी तव शिशू मूढ पहा करुणानिधाना ॥ आशा बरि० ॥धृ०॥
कमलनयन कमलबदन रूप है तुम्हारा ।
मम हृदयांतिल षडरि निज करुणें मारा ॥१॥
केले प्रभु कर्म बहू तुमसि वदुनि खोटे ।
तुम बिन नहि अन्य कोई जिन पग भव मीटे ॥२॥
ज्ञानेश्वर तात प्रभू दीनबंधु देवा ।
अस असीस देव जनम जनम करूं सेवा ॥३॥

### १९५ / हिंदी

हरीपाठ-अमृतानुभव

सुशीलावृत्त. राग- गौड सारंग. ताल- तेताला.

प्रभु मै हूं पातक की खान ॥धृ०॥
तुम्हरि दृष्टि प्रज्वलीत गुरु । जरे पाप-भवभान ॥१॥
सब अपराध क्षमा प्रभु कीजे । लावो निजपद ध्यान ॥२॥
हरीपाठ-अमृतानुभव को । होवे निशि-दिन गान ॥३॥
ज्ञानेश्वर करुणाकर मेरी । राखो निजपग जान ॥४॥

### १९६

साममाणव॰ रा.-काफी. ता.- दीपचंदी.

देवा काव्य करूं मी कसें ॥धृ॥
मन हे माझें कठिण असे बहु । लोखंडी शस्त्र जसें ॥१॥
राग रंग मी भंगुनि देवा । गाइन कान्तमिसें ॥२॥
तुमचि कृपा होइल तरि वर्णिन । मी जें स्वर्गि नसे ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु म्हणति न चिंता । करिं मी हृदयिं वसे ॥४॥ (य९उ.४५)

### १९७

सामनुष्टुप.मूळ.यमनकल्याण.ताल-तेताला.गौणपीठ-सर मार्गे,वाग सुमार्गे साधारण ही घाटी.

कोण सांभाळि तुजवांचूनी ॥धृ॥



जप तप कर्मादिक आचरितां । श्रम सर्वहि श्रुतिवाचोनी ॥१॥
त्रिभुवन धांडोळुनियां पाहतां । पडति सुरालयिं नाचोनी ॥२॥
ज्ञानेश्वरचरणांबुज सेवूं । भवभयाप्रति काचोनी ॥३॥

### १९८

पद सामनुष्टुप. मूळ.-भूप. ता.-तेताला. गौण-पहा पहा सावळा

जगभरि देवा तुमची कीर्ती । आकळीला हे वदती भक्ति ।
दाता एक तूं सर्वाप्रति । माझे शब्द नाणिसी कां चित्तीं ॥१॥
ऐसा कां झाला कृपण । कोठें केला काय पण ।
भक्तां न दावी चरण । वाहिली काय कवणाची आण ॥२॥
नांव घेता जाश्वनीळ । पावलासी तूं तात्काळ ।
केले अंगे त्या शीतळ । आतां का नये कळकळ ॥३॥
ब्रह्मा ते उदरीचें बाळ । तुम्हा प्रार्थी भक्तिबळ ।
तेव्हां येवोनि तात्काळ । वधितो प्रभू सर्व खळ ॥४॥
वनीं बाहतां नारद । पावलासी तूं गोविंद ।
भक्त रक्षीला प्रल्हाद । आतां लपवीले ब्रीद ॥५॥
उपमन्यू दुधासाठी । लागतांची तुझ्या पाठी ।
दिला क्षीराब्धी शेवटीं । आम्हा वेळे दया नये पोटी ॥६॥
अंगे केला सीता शोध । शबरीसी दिला बोध ।
अजामेळ केला शुद्ध । माझ्या वेळेची कां स्तब्ध ॥७॥
देवा पुंडरिकासाठी । समचरणकरकटी ।
युगायुगीं ऐसी दृष्टि । आम्ही वायां कां शेवटी ॥८॥
ऐसा निर्दय गोविंद । परंतु सोडवेना नाद ।
ज्ञानेश्वर कृपा शुद्ध । पाय ध्याता मिळे परमानंद ॥९॥ (य९उ.४६)

### १९९

दीपिनीवृत्त. रा.-काफी. ताल-दीपचंदी.

माधवजी, शरण तुम्हां मी असें ॥धृ॥
वारा भवदवकवही देवा । हरुनि षडरिवळसे ॥१॥
मागत नाही कैवल्यहि परि । लावा प्रेमपिसें ॥२॥
अलकावतिपतिवचन भरंवसा । मन करि घननीळसें ॥३॥

### २००

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-भूप. ता.-तेताला गौण.-पहा पहा सांवळा चालीवर.

धांव आतां तूं बहूं झाले कष्ट । कोणी मार्ग न दाखवी श्रेष्ठ ।

क्षणभरी मानस नाहीं तुष्ट । अबलेते छळिती षडरि दुष्ट ॥१॥
तिहीं तापीं पोळली तनु सारी । मल विक्षेप आवरण भारी ।
तुजवाचोनि कोण अंगिकारी । धरीं पदरी करुनी निर्विकारी ॥२॥
लीला कोठें नये ऐकूं कानी । प्रेमे डोळ्यामध्यें न ये पाणी ।
चित्तीं नाही तव रूप चक्रपाणी । करीं कृपा बाहतें दीनवाणी ॥३॥
ज्ञाननाथा सद्‌गुरु दीनोद्धारा । असो नसो सद्भाव अंगिकारा ।
जन्मोजन्मीं आपुली दासी करा । मग बाधीना नाना योनि-फेरा ॥४॥

२०१

सुशीलावृत्त. रा.यमन. ता. तेताला

प्रभुविण धरूं कवणाचे पाय ॥धृ॥
ज्यांच्या निर्हेतुक उपकारा । न पुरे बाप न माय ॥१॥
माराया गेली असुरी परि । शेवटि झाली माय ॥२॥
पुत्रमिषें आवाहन करितां । हरिले यमज अपाय ॥३॥
अलकावतीपतिकरुणा सुचवी । अविकल हा सदुपाय ॥४॥

२०२

इंदिरावृत्त. रा.- भीमपलासी. ता.-राजविद्याधर. (तेताला)

सेवक मी जाणुनि घ्या जी ॥धृ॥
अती आळसी सेवा न घडे । परि न्या संतसमाजीं ॥१॥ (य९उ.४७)
प्रभुपद सेवा नित्य कराया । वृत्ति असे मम राजी ॥२॥
सेवामोल कांहीं मी नेच्छीं । खाया नलगे भाजी ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु करुणाघन तुम्हि । माय माउली माझी ॥४॥

२०३

इंदिरावृत्त. रा.-परज. ताल-तेताला. राजविद्याधर.

मज पल्लविं घ्या यदुराया ॥धृ॥
पडलें मी संसारि तथापि । तुमचिच प्रभुजी माया ॥१॥
अनंत जन्मे सेवेसाठी । होते तुमची जाया ॥२॥
तनु मन धन अर्पिलें स्वभावे । अलकावतिपतिपाया ॥३॥

२०४

इंदिरावृत्त. रा.-देस तेताला.

वंदन करितें भावें ॥धृ॥ प्रभु०



येउनि घरिं मजलागीं तुम्ही । पर्णुनि श्रीहरि न्यावें ॥१॥
ब्रह्मज्ञान न मागतसें मी । निजपदिं प्रेमचि द्यावे ॥२॥
कात्यायनिव्रतपुण्यबलाने । भगवन् मम पति व्हावें ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या कर जोडुनि । विनवि असों द्या ठावें ॥४॥

२०५ / आर्या

हें मागतसें स्वामी बहु झाली पुष्टही सुखें काया ।
ठेवीं मयूर करुनी ज्ञानेश्वर हेंचि नाम केका या ॥१॥

२०६

इंदिरावृत्त. रा.-परज. ता.-राजविद्याधर (तेताला)

मुरलीधर मजला पाही ॥धृ०॥
मम हृदयीं तूं दीनदयाळा । क्षण तरि येउनि राहीं ॥१॥
माहेराहुनि एकटि आलें । आश्रय तुजविण नाही ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु करुणायोगें । प्रेम धारमय वाही ॥३॥ (य९उ.४८)

२०७ / हिंदी

सुशीलावृत्त. राग-यमन. ताल- तेताला.

सुनिये मेरी पुकार । माधव ॥धृ०॥
औतनसे मैं जिकिर न करती । जामें बहुत बिकार ॥१॥
नहिं चाहती हूं सायुज्यता मैं । नहिं जोगकु अधिकार ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु करुणाबलतें । तुम्हरे पग लग नार ॥३॥

२०८ / रामस्तुति

कंचुकीवृत्त.मूळपीठ.-भीमपलासी.ता.-धुमाळी.गौणपीठ-कशाला संन्यासी झाला.या चालीवर

जानकि रमणा रामा रे । करि मम भवसु रिकामा रे ॥धृ॥
फणिवरि तव पाहुनि निद्रा । आणिले मनि लावुनि मुद्रा ॥१॥
तपोवनिं तुज मिळलेत मुनी । होतिल पुढें गोपि नमुनी ॥२॥
त्यामाजीं मजला घेई । कृष्णवतारिं[1] अभय देई ॥३॥
मी ज्ञानेश्वरप्रभुबाळा । सांभाळी त्रिभुवनपाळा ॥४॥

*(१. अचा लोप भागुरीच्या मताने केला आहे.)*

२०९

सामनुष्टुपवृत्त मूळपीठ.-जोगी ता.-तेताला. गौण.

येइ वो माय ये, ज्ञानेश्वर माउली वो ।। येई वो माय ये ।।धृ।।
तव गुणमहिमा वर्णन करितां । श्रुतिही श्रम पावली वो ।।१।।
विकल्परहिते हृदय तल्पकी । ठेवीं निजपाउली वो ।।२।।
कृष्णपत्नि निजकन्या जाणुनि । करि करुणा साउली वो ।।३।।
अलकावति ये दासासाठीं । प्रेमें पान्हावली वो ।।४।।
ज्ञानेश्वरजननीं या भविं मज । तूं बरवी फावली वो ।।५।।

२१० / आर्या

अमृत टाकुनि प्रभुजी कामी झाली असें तुझी जाया ।
नामामृत लेवुनिया विनवीं अधरामृतासि पाजाया ।।१।।

२११

वानर करवीं प्रभुजी मारुनि असुरां दिलीं निजा लंका ।
त्या मज एकलिलाची द्याया स्थळ नाहिं काय निज अंका ।।२।।

२१२ / रामस्तुति

रोचनीवृत्त. राग-पिलु.ताल-दीपचंदी.

ये धांवत रघुपति रामा । सज्ञन जन मन विश्रामा ।।धृ।। (९उ.४९)
तुजसाठी भव हा वमला । पद दाखविं घनतनु विमला ।।१।।
दशकंधर मर्दुनि श्रमला । हृदिं येउनि हो विश्रमला ।।२।।
रिपुगण तो यद्‌गति प्रमला । ज्ञानेश्वर करुणें क्रमला ।।३।।

२१३ / हिंदी

सामपटुवृत्त. रा.-भूप. ता.-दीपचंदी.

हरि मोहे मल धोय शुद्ध करो ।।धृ।।
परधन मनसूं सबहि मिटावहुं । परकामिनि रति नष्ट करो ।। हरि०।।१।।
प्रीति द्वेष सब नाथ उडावहुं । आयके हृदय भरो ।। हरि०।।२।।
ज्ञानेश्वरगुरु जननि बचन तें । मेरे सिर ठहरो ।। हरि०।।३।।

२१४ / हिंदी

इंदिरावृत्त. रा.-भूप-ताल-तेताल.

मोहे पालहुं त्रिपुरारी ।।धृ।।
भजन करत भवभंजन होवे । जाबिध कीर्ति तुह्मारी ।।मोहे.।।१।।



जटा जान्हवी शशिशेखर गुरू । पयःफेनतनुधारी ।।मोहे.।।२।।
ज्ञानेश्वरगुरु तुम्हरि कृपातें । तूर्ण मिलो गजहारी ।।मोहे.।।३।।

२१५ / आर्या

ज्ञानेश्वर प्रभु धावा हें सर्वहि दीन विश्व प्रतिपाळा ।
यांना परविद्येस्तव तुम्हाविण ना दिसे दुजी शाळा ।।१।।

२१६

आम्हा सर्वस्व तुम्ही माय बाप गुरु समस्तगणगोत्र ।
न धरा लग्नभयातें आम्हाहुनी मुक्तिचें दुजें गोत्र ।।२।।

२१७

भवत्प्रीति जरि लावी लग्न तरी मुक्ति आमुच्या गोत्रीं ।
ये यास्तव नाम जपा[1] अक्षय बांधू अहेवपण सूत्रीं ।।३।। (१.जपाने)

२१८ / श्लोक

मधुर कळत कैसें सेवितां अन्न गोडी ।
हरिचरणसरोजीं सेवितां होय गोडी ।
हरि चरण सरोजें येति चित्तांत जेव्हां ।
हरिमय-मन नाहीं भेद चित्तांत तेव्हां ।।१।। (य९उ.५०)

२१९ / श्लोक

जयजय जगदीशा केशवा माधवा रे ।
निरखुनी भविं मातें भेटसी केधवा रे ।
तनुहि त्रिविध तापें पोळली फार ताता ।
निज करुणजलानें नीववी शीघ्र आतां ।।

२२० / श्लोक

तव गुणमहिमा तो फारसी साधु माजी ।
मम पतन कसें हे षड्रिपूंच्या समाजीं ।
त्यजुनि सकल मीही वैभवाची सुरा जी ।
तवपदकमळाची व्हावया दासी राजी ।।

२२१ / श्लोक

हरिचरणसरोजीं वृत्ति ज्याची मिळाली ।
परम गुरुकृपेनें एक तत्वी मिळाली ।
त्यजुनि सकल पंथा सेवि जो कृष्णपादा ।
कधिं न करि तयातें कालसंबाधबाधा ।।

२२३ / रामस्तुति

कंचुकीवृत्त-मूळपीठ-यमन-ता.-तेताला-गौणपीठ- या चालीवर

ये धावत रघुपती रामा । सज्जनजनमनसविरामा ॥धृ॥
तुजसाठीं भव हा वमला । पद दाखविं घनतनु विमला ॥१॥
दशकंधर मर्दुनी श्रमला । हृदिं येउनि हो विश्रमला ॥२॥
रिपुगण तो यद्गति शमला । ज्ञानेश्वर द्या भेटि मला ॥३॥

२२४

सामनुष्टुपवृत्त.मूळपीठ-पिलु.ता.-धुमाळी.गौणपीठ- 'उद्धवा शांतवन कर जा' या चालीवर

तें कोमल पद मज दावी । जे पृष्टी घेतसदावी ॥धृ॥
वज्रांकुश कमल ब्रिदांनी युत झालें सुख श्रीदानी ॥१॥
क्षीराब्धी कन्या ज्यातें, सेवित सांडुनी गर्वातें ॥२॥
अलकावतिपतिजा-प्रिया, ये धांवुनि स्ववचनन्हिया ॥३॥

२२५ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. रा.बेहाग - ता.- तेताला

मेरी इतनी बात सुनो ॥धृ॥ (य९उ.५१)
आखीभर सपनेमें तो भी । रूप दिखावो अपनो ॥ मेरी इतनी० ॥१॥
विखयबासआभासमति गिरी । ताको देहू निजमिलनो ॥ मेरी इतनी० ॥२॥
श्रीज्ञानेश्वरबालाबिनती । प्रेम हृदय भरनो ॥ मेरी इतनी० ॥३॥

२२६ / हिंदी

सुरुचीवृत्त - रा- यमन. ता.-तेताला

अब कांई कहूं घरकी ॥धृ०॥
पूत खेल खानेको मांगे । चुनरि जोरु जरकी ॥ अब कांई ॥१॥
देशाटन करि धनमेलनतें । बुद्धि भयी चरकी ॥ अब कांई ॥२॥
घूमत घूमत नाम बिसारे । तनु भयि जर्जरकी ॥ अब कांई ॥३॥
अंदरतो सब आगिलगी छपि । छानहि उपरकी ॥ अब कांई ॥४॥
याते मति अब ब्याकुल भइ है । न जानु इहपरकी ॥ अब कांई ॥५॥
अलकावतिपतिनंदिनिबिनती । सुन[1] प्रभु जदुबर, की ॥ अब कांई ॥६॥

(१. हे जदुबर बिनती सुन की - असा अन्वय आहे.)

२२७

साममाणव वृत्त- रा-देस. ता-दीपचंदी.

नाथा दिवस असे हो । भ्रमता सोडुनि सदन कसे हो ॥धृ॥



कामकोपमदरिपु माराया । टपले भुजग जसे हो ॥नाथा॥१॥
साक्षि प्रभु तुम्हि नसतां हृदयीं । राखण कोणि नसे हो ॥नाथा॥२॥
भ्रमता व्हाल किं वश कवणाला । चिंता हीच असे हो ॥नाथा॥३॥
अलकावतिपतिसुता विनवि हरि । गमनचि योग्य नसे हो ॥नाथा॥४॥

२२८ / मालिनी वृत्त

तव चरण सरोजीं रंगली वृत्ति देवा ।
निजनयनसमीपे भेटि तूं देवदेवा ।
सगुणतनु सुखाची पाहतां ज्ञानबुद्धि ।
पळपळ मग होय प्रेम संलाप वृद्धि ॥१॥
त्रितिय नयन वन्ही त्वत्पदाब्जाऽभिलाषी ।
हिमगिरि वरि राहे भस्म सर्वांग साशी ॥
मग मम मति देवा केविं अन्यायि होते ।
चरण हृदयिं घेतां ऽयोग्य तें काय होतें ॥२॥ (य९उ.५२)

२२९

रमावृत्त -रा-असावरी-ता-तेताला

अंबे घे कडिये जननी ॥धृ॥
या भवसागरिं ओढिती षडरी । फणि धरुनी चरणीं ॥१॥
माते जीवविं विषदग्धा मज । स्तन घालुनि वदनीं ॥२॥
हिमनगजे भवभयसंहारिणी । भगवति भवरमणी ॥३॥
अलकावतिपतिनंदिनि विनवी । पाहि करुण नयनी ॥ अंबे ॥४॥

२३०

रामवृत्त-रा-पिलु-ता.-तेताला.

कोण उपाय करूं । यदुपति ॥धृ०॥
कर्मे कर्तृपणें मिळसि न तूं । चित्सुखकल्पतरू ॥ यदुपति ॥१॥
कर्मासमचि उपासन वाटे । कंचन सदनपरू ॥ यदुपति ॥२॥
ज्ञान निगम वदतो परि तेथही । चेतन गर्वदरू ॥ यदुपति ॥३॥
विश्वासाचें एकचि उरलें । श्रीज्ञानेशगुरु ॥ यदुपति ॥४॥

२३१ / तातस्तुती

रमावृत्त-रा-बेहाग-ता.-तेताला.

अणु न उसंत सये ॥ अंबे ॥धृ॥
या भवडोहीं फिरतां पळपळ । शत जनन मरण ये[1] ॥ अंबे ॥१॥

माया मगरी ओढी चरणा । तूं तूर्ण उचल ये[२] ॥ अंबे ॥२॥
अलंदिमंचक मानिनि घेई । चिन्मणिमय कडिये ॥ अंबे ॥३॥

(१. क्रियार्थी आहे २. हा शब्द प्रार्थनार्थी आहे.)

## २३२ / ज्ञानेश्वर माउली

वरिवस्यावृत्त-मूळ-भूप-ता-धुमाली-गौणपीठ- 'विठाबाई माउली वो' या चालीवर

ज्ञानेश्वर माउली वो माय माझी ज्ञानेश्वर माउली ॥धृ॥
कोमल सुंदर परम मनोहर । ठेविं हृदयिं पाउली वो ॥१॥ (य९उ.५३)
त्रिविधताप संताप साहिना । करि करुणा साउली वो ॥ माय माझी०॥२॥
घेउनि मजला निज मांडिवरी । स्नेहें पान्हावली वो ॥ माय माझी ॥३॥
अलकावतिपतिनंदिनिविनवणि । श्रवण करुनि पाउली वो ॥ माय ० ॥४॥

## २३३

सुशीलावृत्त-रा-आसावरी.ता.तेताला (राजविद्याधर)

भय वाटे मज फार ॥ ताता ॥धृ०॥
माया मोह तरंगिणि भरली । पूरें न कळें पार ॥ ताता ॥१॥
मार्ग वळेना नाव मिळेना । षडरि-कुवदन-कपार ॥ ताता ॥२॥
श्रीज्ञानेश्वर चरण स्मरणें । मृगजल सम संसार ॥ ताता ॥३॥

## २३४

उत्कंठितावृत्त-मूळपीठ. सर्वत्र यमन व चालीचे मूळपीठ-जोगी, ता-सर्वत्र धुमाळी आणि चालीचा ताल दादरा गोणपीठ- आयिजी बरसात दवड करके, या चालीवर.

रमावल्लभा कृपावंता । उमारमण प्रिय भगवंता ।
सुजन तारणा दनुज-हंता । रमावल्लभा ॥धृ॥
सुधासम हरि तव नामातें । जपुनि दुरित कांहिं ना माते ।
त्यजुनि धन नंदन वामातें । कामिते तव पदकामाते ॥

श्लोक

भवाचें भये जीव माझा गळाला । पढूनी श्रुती गर्व नाहीं गळाला ।
सदा अंतरी काम ना श्याम नाचे । अशा संकटी तोंड पाहूं कुणाचे ॥
चाल ॥ त्वरित मज ने त्वरित मज ने ।
भवांबुधिपार दीननाथा ठेविते चरणांबुजि माथा । रमावल्लभा ॥१॥
त्रिविधतापाहि तप्तपोटी । सहाय न कोणी जगजेठी ।
कसेंही करुनि द्यावि भेटी । निवारी षडरिघाव कोटी ॥



श्लोक

तुझी पाउलें साजिरी देवराया । वसो ती सदा मन्मनी देवराया ॥
जया साठि इंद्रादिकें देव कष्टी । मुनी पाहती अंतरीं ज्ञानदृष्टि ॥
चाल ॥ परमसुखदा परमसुखदा धृतव्रजरमणिमृदुलहाता ।
सुमख-कन्यका* चुडे-दाता । रमावल्लभा ॥२॥ (*द्रौपदी)
सख्या तव विरहानल जाळी । भासते भुजगमुक्त जाळी ।
प्राण हा कंठी वनमाळी । पाजुनी प्रेमामृत पाळी ॥

श्लोक

तुझ्यावांचुनी वृत्ति झाल्या पिशा रे । तुझ्यावांचुनी ओस दाही दिशा रे ।
तुझ्यावाचुनी भोग ते रोग सारे । अझूनी दयाळा न येसी कसा रे ॥
(य९उ.५४) चाल ॥ विनविते मी विनविते मी प्रभो ज्ञानेश्वरा ताता ।
उशिर न करावा यदुनाथा । रमावल्लभा कृपावंता ॥३॥

## २३५

बासंतीवृत्त. रा.-यमन ता.तेताला.(राजविद्याधर)

बाई मी हिंपुटि झालें फार ॥धृ॥
शास्त्रें करुनी पाठांतरची । घोकुनि वेदहि चार ॥ बाई मी ॥१॥
जपतप साधन जंवजंव करिते । तंव वाढत संसार ॥ बाई मी ॥२॥
बुद्धि सखे तुज एक असो दे । ज्ञानेश्वर आधार ॥ बाई मी ॥३॥

## २३६

सामनुष्टपवृत्त-मूळपीठ-भूप. ताल-तेताला.गौण. पहा पहा सावळा कैसा धीट- या चालीवर.

उतावेळ चित्त हें यदुराया । वियोगानें संतप्त झाली काया ।
पाठिमोरा आपण पुढें माया । करूं काय मी बलहीन जाया ॥धृ॥
माहेरांत सुखाचे नाहिं कोणी । सासर तो तें दुर्गुणांची खाणी ।
झालें उदास फार मोक्षदानी । आतां लवकर करीं घ्यावा पाणी ॥१॥
नाम पतीतपावन तुझें देवा । बहु वेळ चुकलें मीही सेवा ।
परी साच करा पराक्रम-ठेवा । ज्ञानेश्वरा ताता हात द्यावा ॥२॥

## २३७

रमावृत्त. रा.-केदार. ताल-तेताला (राजविद्याधर)

देवा ऐसें कांहिं करी ॥धृ०॥
चरणावरि तव अवचित यदुपति । उपजो प्रीति खरी ॥१॥
मायबाप बंधू प्रतिबंधक । नाहित कोणी घरीं ॥ देवा ॥२॥

श्रीज्ञानेश्वर दीनदयाळ । होइन तव नवरी ॥ देवा ॥३॥

२३८

सामनुष्टपवृत्त. मूळपीठ - जोगी ता.-तेताला.गौण.-गौळण 'जसवंती पैं सांगे' या चालीवर

किती शिकवूं या मना । न सोडी अझूनि कामना । (य९उ.५५)
न करी इंद्रियदमना । न भजे आवडी वामना ॥धृ॥
भोगिं घालवि यामिनी । माय न देखे कामिनी ।
चुके संधी सौदामिनी । कृष्णा हृदयीं स्वामिनी ॥१॥
जे जे योजिले उपाय । ते ते आघवे अपाय ।
आतां दाखवावे पाय । सखे ज्ञानेश्वर माय ॥२॥

२३९ / नरसिंह स्तुति

कमलारंगीवृत्त-रा.-हमीर.-ता.-तेताला (राजविद्याधर)

पाहि मां नृहरे ॥धृ॥
त्वत्पदकमला कितितरि सेवुनि । साधिती निज हित रे ॥१॥
दैत्यकुळी प्रऱ्हाद तारिला । कीर्ती भुवनभरे ॥२॥
कामादिक षड्रिपू निवारुनि । दाखवि निज पद रे ॥३॥
श्रीज्ञानेश्वरचरणसरोरुह । करुणे तुजचि स्मरे ॥४॥

२४० / हिंदी : शिवस्तुति

जयावृत्त- मूळपीठ- झिंझोटी- ता.-दादरा- गौणपीठ- पांडुरंग स्मर अभंग, या चालीवर.

मेरे हिय तुरत बसो सांब शूलपाणी ।
गंगाधर नंदिवहन सदपवर्गदानी ॥ मेरे हिय ॥धृ॥
जरतिहूं मैं चिंतानल पायी भवग्लानी ।
दीनकें दयाल तुमहि सकलहृदयज्ञानी । मेरे हिय ॥१॥
हो बिरागि तदपि कीन्हि आधतनु भवानी ।
काहे कुमर छोर दियो बरबिनु भयखानी[1] ॥ मेरे० ॥२॥
जय गिरिजावल्लभगुरु जय करुणाखानी ।
ज्ञानेश्वररूप धरी राखो शिर पानी ॥ मेरे० ॥३॥ *(१. भीतीच्या खाणींत)*

२४२ / हिंदी : शिवस्तुति

रसालावृत्त. राग-कामोद. ताल-तेताला (राजविद्याधर)

मेरी साह करो त्रिपुरारी ॥धृ०॥
गिरिजावल्लभ भूतनके पति । भूजगभूषणधारी ॥१॥ (य९उ.५६)
डुबि जा रही भवसागरमो । करिये उपाय गजारी ॥२॥



माया मगरी पाय पकरती । जातैं शंभु पुकारी ॥३॥
ज्ञानेश्वरबालाकी बिनती । होवे कांत मुरारी ॥४॥

२४३ / आळंदीवल्लभे

सानमुष्टुपवृत्त. मूळपीठ-भूप. गौणपीठ- 'येईगा तूं येईगा तूं' या चालीवर

आळंदीवल्लभे येई वो जननी । धीर धरी बाळा ऐसें म्हणत आननीं ॥१॥
हृदयींच परी बाहतें नेणोनी । धाव घाली झडकरी श्रम न गणोनी ॥२॥
रडोनी रडोनी विकळ हा जीव । मिथ्या परी निवटेना भयमय भव ॥३॥
मुखी घालोनिया स्तन पाजीं प्रेमपान्हा ।
करें कुरवाळुनी केव्हां म्हणसी उगा तान्हा ॥४॥
ज्ञानेश्वरमाये निजजनकाशी । तुझिया कृपेवीण आम्ही परदेशी ॥५॥

२४४ / शिवस्तुति

सामनुष्टुपवृत्त.ता-धुमाळी.मूळपीठ- पूर्वी.गौणपीठ- 'वारी संकट हरि दामाजीचे' या चालीवर.

यावें यावें बा गिरिजाकांता । जय करुणावंता ॥धृ॥
पाठी लागला हा संसार । मज जाचणि फार ।
रात्रंदिवस जिवा घोर । मचविला शोर ॥ चाल ॥
तोडुनि खाताति तनुज कांता । शिव करुणावंता ॥१॥
शूल सुनाभा घेवुनि याही । वारा रिपु साही ॥
तुमच्यावांचुनि मज कोणि नाहीं । द्या झडकर बाही ॥
चाल ॥ वाढली फार शरीराहंता । शिव करुणावंता ॥२॥
आतां कोणाला शरण जाऊं । मी कुणिकडे पाहूं ।
जननी जनक बहीण भाऊ । ऐसा मम भावू ॥चाल॥
अलकावतिपति भेट अनंता । शिवा करुणावंता ॥३॥ (य९उ.५७)

२४५ / हिंदी

वासंतीवृत्त -राग-बेहाग-ताल-राजविद्याधर (तेताला)

कृपाघन हिय आवो गुरुनाथ ॥धृ॥
तुमही माता तुमहि पिता प्रभु । तुम पति जीवननाथ ॥१॥
कोप करोगे बनकर शंकर । तौं मो पैं नहिं घात ॥२॥
लोभ रखोगे बनकर जदुवर । तौं पसरोंगी हात ॥३॥

जस चाहिय तस करिये कृपानिधि । श्री ज्ञानेश्वर तात ॥४॥

२४६ / रडण्याविण कळत नाही

जयावृत्ती- मूळपीठ- यमन- गौणपीठ- पांडुरंग स्मर अभंग, या चालीवर

बाहतें मी फार तुला चाल सखे बाई ।
स्तुति मजला रडण्याविण आन कळत नाही ॥धृ॥
धांव धांव धांव उभें जोडुनि मी पाणी ।
रडुनि रडुनि संपविलें लोचनिंचे पाणी ॥ बाहते मी० ॥१॥
सकल काज सोडुनि मज आज कडे घेई ।
प्रेमपयः पाज त्वरें ज्ञानराज आई ॥ बाहतें मी० ॥२॥

२४७ / विठाई

सानमुष्टुपवृत्त- मूळपीठ- जोगी- गौणपीठ- (माहीत नाही.)

पंढरपुरचे आई अंबे धांव गे विठाई ॥धृ॥
पोळलें अंतरीं । येई गे झडकरी ॥१॥
तुजवीण कोणी नाही । काढी धरुनि बाही ॥२॥
दीनदयाळे ये जननी । अलकावतिवासिनी ॥ अंबे धांव गे० ॥३॥

२४८

वासंतीवृत्त-राग असावरी-ताल-तेताला.

पाहसी किततरी अंत । दयाळा । पाहसी ॥धृ॥
कामिनिकनकीं गुंतुनि स्वामी । चुकलो तवपदपंथ ॥१॥
एकचि मी अपराधि काय तरि । जनिं तरलेति अनंत ॥२॥
बिरुद स्मरुनि धांव दयाळा । ज्ञानेश्वर श्रीमंत ॥३॥ (य९उ.५८)

२४९ / हित माझें

प्रमुदिता वृत्त-मूळपीठ-जोगी-ताल धुमाळी-गौणपीठ. ''हे तुज कसे कळते'' या चालीवर

जरि हित माझें हो मज कळतें । तरि कां मन ना वळतें ॥धृ॥
जरि कां आवडतें हरिनाम । तरि कां उठता काम ॥१॥
दिसता जरि नयनी पुतनारी । कां पाहतो परनारी ॥२॥
म्हणवोनि धरिले हो तव चरण । उचित तुम्हांला करण ॥३॥
आळंदीवल्लभा ज्ञानेशा । पुरवी अवघी आशा ॥४॥

२५० / आळंदीवल्लभा रे

सामनुष्टुपवृत्त- मूळपीठ पिलू-ताल तेताला- गौणपीठ- ''पांगूळ झालो देवा'' या चालीवर

आळंदीवल्लभा रे मज कृपादृष्टि पाही ।



भुलोनी पाय तुझे कैसा अडकलो देहीं ।
मूळ कूळ कोण माझें लव आठवण नाहीं ।
व्यापिलो पुण्यपापें भोगरोग दिशा दाही । आळंदीवल्लभारे० ॥१॥
संसारी कष्ट भारी जो तो बोले टचटच ।
अभिमान पोटीं गाढा क्रोधेंसह करी जाच ।
वासना डाकिणी हे घडी घडी म्हणे नाच ।
विवेक दिवा नाहीं राती दाखवाया साच । आळंदी वल्लभारे० ॥२॥
राजा तूं दीनबंधू मज करावें किंकरू ।
मायबाप तूंचि माझा मज करावे लेकरूं ।
विसंबू नको पळ निज घालोनी पाखरूं ।
वाढला वरी सारा मायाविक्षेप खाकरू । आळंदी वल्लभारे० ॥३॥
पाजोनी प्रेमपान्हा करीं समाधान पोटी ।
फिरवी तोंडावरी हात वारी शोकदुःख कोटी ।
ऐसे करी माय बहिणी नव्हे पुन्हा तुटातुटी ।
ज्ञानेश जननीये तूंचि एक वो शेवटी ॥ आळंदी वल्लभारे० ॥४॥

२५१ / त्रासला जीव माझा

सानुष्टुपवृत्त-राग भूप.-ताल-तेताला. गौणपीठ ''गुरुनाथ निरंजनहो'' या चालीवर

त्रासला जीव माझा आळंदि जीवना जी ।
मी पतित धावुनी या तुम्ही पतितपावना जी ॥धृ॥
लहानपण गेलें खेळतां देवराया । (य९उ.५९)
तारुण्यपणी पाठी लागली घोर माया ।
आंधळे झाले डोळे मोहिती पुत्र जाया ।
पूढती गती कैसी लागल्या गळूं काया ॥ त्रासला०॥१॥
ठाउकें मला नाहीं कोणती वाट नाथा ।
नाहीं म्यां पाठ केला सज्जन-सुवचन-गाथा ।
शेवट मार्गासाठीं बांधली नाहीं पाथा ।
श्रमुनियां ठेविताहे तूमच्या पायीं माथा ॥ त्रासला०॥३॥
विद्येचा अल्पशा म्यां घेतला फार माज ।
हरिदिनीदिवशी निजलो टाकोनि सस्त्री बाज ।
बोलतां ज्ञानगोष्टी मानली नाहीं लाज ।
करूं कोण गती आतां सांगा जी महाराज ॥ त्रासला०॥३॥

विनवितो विनाभावे अधिकार नसुनि कांहीं ।
गुणदोष मना नाणा मज तुम्ही बाप आई ।
ठेवुनी गरुड मागें या करुनि अशिच घाई ।
द्या बुद्धि आळंदीशा वाहीन तनु ही पायीं ॥ त्रासला०॥४॥

२५२

सानमुष्टुपवृत्त. मूळपीठ पिलु -''नृपममता रामावरती'' या चालीवर.

तुम्हीं या जी आळंदीराजा । विनवितें आपुल्या काजा ॥धृ॥
निर्गूण तुम्ही जगदादि । मी सगुण करुनि अपराधी ॥१॥
नित खातें शर्कराभक्त । दंभेंचि म्हणवितें भक्त ॥२॥
ज्ञानेश्वर दीनदयाळा । वारा संसारभयाला ॥३॥

२५३ / राम-करुणा

जयावृत्त.मूळपीठ-झिंजोटी.ताल-दादरा.गौणपीठ -''दाखवि मज दिव्य पाय'' या चालीवर

अझुनि मला दिसति न कां पाय तुझे रामा ।
हृदय सदा चाळविती नंदन-धन-रामा ॥धृ॥
जानकिपति दशरथसुत सुखकर गुणधामा ।
करुणाकर शिरिं कर मम ठेविं पूर्ण कामा ॥अझुनि०॥१॥
अलकावतिवल्लभप्रभु सोडविं भवधामा ।
तुमचि भेट झाल्याविण गिळूं पाहे वामा ॥ अझुनि०॥२॥

२५४ / लोकगीत

लावणीवृत्त. ''जोगी सारखें असावें'' गौणपीठ- ''लक्षपति सावकार'' या चालीवर.

ढोलक्या-चोंडक्याची चाल.

चाल चाल गुरुराया पिडिल मशी संसारान । (य९उ.६०)
धाव गरुडावर बैसून ॥धृ०॥
ठाउक मजला कष्ट तुम्हाला होतील दारुण । तुझ्यावर वारिन विंझन ।
जेवतां खावतां तुझ रे देवा कइ लागन येड । तुझ्याविण नको पाणी गोड ।
पाजि मनाला किती शिकवूं लागलि नित खोड । वारुनी पुरवि माझ कोड ।
जीवें भावें तुला विनवतो नको जाउं रूसून ॥धाव०॥१॥
कितीक देवा तुझ्यासाठीं धुंडिति वनिं रानीं । सोडुनी अन्न आणि पाणी ।
तो तुं दयाळा नंदमंदिरी करिं मागशि लोणी । चुंबिते वदन नंदराणी ।
ज्ञानेश्वरप्रभु लवकर भेटा माया निरसून । धाव गरूडावर बैसून०॥२॥

२५५



सामनुष्टुपवृत्त - मूळपीठ- पूर्या-ताल-तेताला गौणपीठ - ''सावध होई बापा'' या चालीवर

धावरे व्रजराया । त्वरें दाखवी पाया ।
दीनबंधु प्राणनाथा । वारी आपुली माया ॥धृ॥
संसारिं पिडिलों मी । वैरी गांजती साहा ।
तुझें नांव घेतां स्वामी । करण कोपती दाहा ॥ धांव रे ॥१॥
अनंत यत्न केले । योगयाग धर्म नाना ।
तुझीया प्रेमावीणें । चित्त चढे अभिमाना ॥ धाव रे ॥२॥
तूं एक दयाघन । आन आघवे खाऊ ।
आळंदी वल्लभा हो मायबाप बहिणभाऊ ॥ धाव रे ॥३॥

२५६

लोकगीत / अंध झालो संसारी

लावणीवृत्त.मूळपीठ-पिलु.ताल-धुमाळी-गौणपीठ'त्रिविध हरीहर मूर्ती'या चालीवर चोंडक्याची चाल.

चाल चाल गोपाळा माझें ध्यान तुझे पायीं ।
अंध झालो संसारी मजला मार्ग दावि कांही ॥धृ॥
आपुल्या बुद्धीने धावुनी जावे ज्या वाटे ।
तिकडे अंधार मागें पुढें गोटे काटे ।
जीव झाला घाबरा फुटले पायाचे बोटे ।
पाहुं कोणाच्या तोंडा अवघे होति हाटे हाटे ।
तुझ्या वांचुनी यदुवीरा जगी मला कोणि नाही ॥१॥ अंध झालो०
बाळपणी मायेच पिऊन दुध खेळणं केलं ।
उनाडपणा धरून गुरूच नाही ऐकीलं ।
जवानींत येता बायकोनं माकड केलं । (य९उ.६१)
येता म्हातारपण अवघ्यानं दूर टाकिलं ।
तुझ्या वांचुनी राया मजला अंति कोणि नाही ॥२॥ अंध झालो०
असूराचं पोरग सख्या त्वां अग्नित तारील ।
टिवटिवीचं पिलू नाही रणांत मारील ।
भक्तवचनासाठी दैन्यकूळ विदारील । ज्ञानेश्वर या मंत्रे अवघं विश्व भरील ।
गुरु पुत्र भर्तार स्वामी तूंचि बाप आई ॥३॥ अंध झालो०

२५७ / येऊं द्या कणवा

रमावृत्त- राग- असावरी ताल - राजविद्याधर.

येऊं द्या कणवा । माझी ॥धृ॥

नयनांतिल बळ सलिल हरपलें । विझवीतां वणवा ॥१॥

चरणकमळिं आवडि मम जडवा । भ्रमर करुनि गणवा ॥२॥

अलकावतिपति दीनदयाळा । अभंड दास नवा ॥३॥

## २५८ / सोडोनी समाधी

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ-यमन ताल-तेताला गौणपीठ-''आले वनमाळी रात्री'' या चालीवर

देवा आता सुखदुःख कोणापाशीं सांगू ।
चित्त माझें भक्तीवीणे घडी घडी पंगू ॥धृ॥
परनारी परधन पाहोनीयां धावे ।
लावोनीयां प्रेमबाण यासी त्वां वेधावें ॥१॥
मायाबाप भाऊ पती गुरू तूंचि राजा ।
नको वीट येऊ देऊं रमापते माझा ॥२॥
कीर्तन पुराण तेंही नावडेचि भावें ।
मेळवाया लौकीकाला दंभें घेतो नावे ॥३॥
इतर रडती माझ्या डोळा नये पाणी ।
ऐशाही दगडा-शीरीं ठेवी कृपापाणी ॥४॥
आळंदीवल्लभा स्वामी उघडावे डोळे ।
सोडोनी समाधी दावा स्वरूप सावळें ॥५॥

## २५९ / दाद ना फिर्याद

सामनुष्टुपवृत्त मूळपीठ - पूर्या गौणपीठ - ''पतीत पावन नाम ऐकुनी'' या चालीवर

दाद ना फिर्याद माझी तुमचे द्वारी ।
हाका मारीतांही लोटुनी लाविती माघारी ॥धृ॥
तुम्ही कृपाळू गडी तुमचे संत कृपावंत ।
दयाळा साधु कृपावंत । (य९उ.६२)
मलीन निर्मळही बाहता नाही मज उसंत ॥१॥
आईकडे सांगावे तो ते सभाग्यास पाहे ।
जयविजयादिक निरोधितां मग आंत रीघ नोहे ॥२॥
कधीं उदय दैवाचा होइन पाहिन पादूका ।
अलकावतिवल्लभा तुम्हावरि उधळिन फुलबुक्का ॥३॥

## २६०



विशाखावृत्त.मूळपीठ-यमन.ताल-तेताला.गौणपीठ-'आई मी करीन कुलकरणी' या चालीवर

कठिणपण उगेच कां धरितां ॥धृ॥

नाम जपुनि तुमचें तर मी । भेटि न कां वरितां ॥१॥

पापी असे मी परि गोकुळींची । आठवण वीसरता ॥२॥

अलकावतिपति दीनदयाळा । उशिर कसा करिता ॥३॥

## २६१ / खरं सांग

रुचिरावृत्त-मूळपीठ-यमन.ताल-तेताला.गौणपीठ-'आई मी करीन कुलकरणी' या चालीवर

खरेचि सांगे माय । तुला मी आवडतें मुल काय ॥धृ०॥

नयन आंधळें सेवे द्विजजन । ध्यानिं न येती पाय ॥ तुला मी ॥१॥

विषयव्यवस्था घडिभरिं चुकतां । कोपे कांपत काय ॥ तुला मी ॥२॥

वैभव प्रेमास्तव दिधले कीं । करण्या सुकृति अपाय ॥ तुला मी ॥३॥

ज्ञानराजमाउली सुचवि मज । कुरवाळूनि उपाय ॥ तुला मी ॥४॥

## २६२

विशाखावृत्त-राग-यमन-ताल-तेताला

नाम तुझें वदनीं दयाला ॥धृ॥

घेउनि तरले कितितरि । सांगति आगमनिगम मुनी ॥१॥

जपलें मी दंभें वा भावें । परि शुचि कां न मनी ॥२॥

शूळपाणि विषविवश निवाला । स्मरतो दिन रजनीं ॥३॥

अळंदिशे तुज आण शिवाची । न व्हतां मम जननी ॥४॥ (य९उ.६३)

## २६३

विजयावृत्त -मूळपीठ-झिंझोटी-ताल-दादरा गौणपीठ- ''भजभज भव'' या चालीवर

अझुनि मना उमज नये काय मी करूं हो ॥धृ॥
चंचल अति विषयवनीं । धरत चित्त दीर्घ मुनी ।
ठायिं नये कधिं दमुनी । कितिक आवरूं हो ॥ अझुनि०॥१॥
चिंतितसे वित्तधाम । सतत कामिनीशीं काम ।
कधिं न वदनीं गाइ राम । सुखद सागरू हो ॥ अझुनि०॥२॥
अलकावति नाथ राय । दावी मज त्वरित पाय ।
तूं सद्गुरु बापमाय । राखि लेकरूं हो ॥ अझुनि०॥२॥

## २६४ / हिंदी

रसालावृत्त - राग- पिलु- ताल- राजविद्याधर.

तोहे करुणा कौन सिखावे ॥धृ॥
जगगुरु ये सब तुमसो छोटे । सुमती कितऊ लखावे ॥१॥
जो तुम कठोर भे तों जदुबर । वर्जन कौन दिखावे ॥२॥
अलकावति वल्लभ का कहको । पितु सुतको जदि खावे ॥३॥

२६५ / हिंदी

सुशिलावृत्त- राग-जीवनपुरी, ताल-राजविद्याधर.

मेरी हरी कौन राखे बाज ॥धृ॥
बिरुद तुम्हारे दीन उधारन । निगम भनत व्रजराज ॥१॥
अगुण हते तो सगुण भये हो । निजदासनके काज ॥२॥
दौरत आवहु बिना बिचारे । प्रभु अलकावतिराज ॥३॥

२६६

असो दे तुला लाज माझी ॥धृ॥
माय बाप गुरु बहिण बंधु तूं । वस हृदयामाजीं ॥ असो दे ॥१॥
तुझे पाय मिळवाया कोण्या । वद करूं तपा जी ॥ असो दे ॥२॥
बहुत वाचिले ग्रंथ सांगती । संतहि अजपा जी ॥ असो दे ॥३॥
चरण कमल वंदिते सकल मम । दुष्कृतफळ भाजी ॥४॥ (य९उ.६४)
अलकावतिपति करुणावल्लभ । सज्ञनसुलभा जी ॥ असो दे ॥५॥

२६७

सामनुष्टुपवृत्त - रा. जोगी. ता-तेताला.

अजुनी कितिक दूर पल्ला ॥धृ॥
नयन कोरडे कंठ सूकला । रडुनि करुनि कल्ला ॥ अजुनि०॥१॥
भक्तिरसाचा हृदयांतिल चोरिति षडरि गल्ला ।
म्हणुनि माधवा तुला बहाते । मधुसूदन मल्ला ॥ अजुनि० ॥२॥
किंवा तुला जाउं नको म्हणुनी सवति देति सल्ला ।
अलकावतिपति परतुनि सकलां । उघडा देती सुखकल्ला ॥ अजुनि० ॥३॥

**करुणाकलरवस्तोत्र**

२६८ / भुजंगप्रयात

नमस्ते नमस्ते नमस्ते कृपाळा । नमस्ते नमस्ते अलंदीनृपाळा ।
मला दाखवा आपुल्या प्रेमपाया । मना वोळवोनी निवारा अपाया ॥१॥



२६९

बहू जन्म मी घेतले मायबापा । बहू सोसिले गर्भवासांत तापा ।
सख्या भूललो मंत्र बाहेरि येतां । तरी लाज नाहीं पुढें वीनवीतां ॥२॥

२७०

व्रतध्यान म्यां कोणतें रे करावें । जळोनी किंवा वन्हिमाजीं मरावें ।
करूं कोणता योग कोण्या कपाटीं । सख्या सांगरे आपुल्या भेटिसाठी ॥३॥

२७१

जळावीण मीना जशी प्राणचिंता । मला तेवढी प्रीति नाहीं अनंता ।
परी आपुली जाणुनी दीन कांता । मला भेटि द्यावी प्रभो भाग्यवंता ॥४॥

२७२

विगर्वा तुझी इंदिरा पाददासी । श्मशानीं तपे शंभु कैलासवासी ।
तुझ्या कीर्तिची आवडी सत्समाजी । रमावल्लभा येऊं द्या कींव माझी ॥५॥

२७३

चुकोनी मुळा जाहला जीव कष्टी । कुणी ना वदे सत्समाधानगोष्टी ।
जसे मी तसे सर्वही जीव रोगी । <u>जगीं धुंडती पोटगीसाठी योगी ॥६॥</u>

२७४

कुणाच्या पदीं नाकळे शीघ्र लागूं । कुणापाशिं हे एवढें दुःख सांगूं ।
भवाग्नीत या जीव सारे जळाले । अहंतागुणें काळदाढे मिळाले ॥७॥
(९उ.६५)

२७५

जशी कामना डाकिणी चित्तिं वाढे । तसे वाजती देवतांचे पवाडे ।
पुसेना कुणी दीनदुःखाप्रती हो । नसे त्वत्पदावांचुनी सद्गती हो ॥८॥

२७६

मला जे धनाकारणें रक्षिताती । यमें बांधितां तेहि सोडोनि जाती ।
पुढें वित्त ना चित्त तेंही बुडालें । तुझ्यावांचुनी पुण्य सारें उडालें ॥९॥

२७७

तुवां द्रौपदी रक्षिली प्रेमपात्रा । सख्या पाळिलें जाळिता पांडुपुत्रा ।
तुवां टिट्टिभाचा पणू सिद्धि नेला । मियां बाहतां फार कां वेळ केला ॥१०॥

२७८

जरी मर्त्य लोकू रुचेना तुम्हाला । अळंदी तरी कासया वास केला ।

जरी येइना आमुची कीव कांहीं । दयाळू मि हे बोलणे योग्य नाही ॥११॥

२७९

करूं कोणता सांग स्वामी उपाय । मनीं ज्यामुळें राहती नाथपाय ।
महंतीमुळें पूजनीं झोंप येते । जना वाटते कीं समाधीच होते ॥१२॥

२८०

सख्या मी रचीं जे कुडे भाव नाना । खरे वाटती प्रेमळा ते जनानां ।
जना मोकलीतां घडे फार हिंसा । जना ठेवितां ना घडे त्वत्प्रशंसा ॥१३॥

२८१

महंतीत माझे कुडे ओळखीजे । मला सेविती श्रेष्ठ माझ्याहूनी जे ।
महंतींत चित्ता अनूताप झाला । जना दाखवीतां स्तुतीमाजिं गेला ॥१४॥

२८२

नसे साजिरा गूणही एक अंगा । असें कासया निर्मिले गोपिरंगा ।
महंतींत माझा न अन्याय कोणी । भये दाखवी बोलुनी शीघ्र वाणी ॥१५॥

२८३

सख्या केधवां दंड देशी समर्था । बहु भीतसे मी पुढिल्या अनर्था ।
तुवां लाविल्या वाटते गोड शिक्षा । परी जाचते अल्पही ते उपेक्षा ॥१६॥

२८४

महंतींत हृद्दुःख सांगू कुणातें । न वाटे खरें सांगतां या जनातें ।
सख्या वासना ती वसे चित्ति खोटी । तिला वारुनी द्या कृपें शीघ्र भेटि ॥१७

२८५

परोत्कर्ष डोळ्यांपुढे पाहवेना । फुका या मुखाला सखा बाहवेना ।
चुका केलिया वांचुनी राहवेना । जनाचा पुन्हा बोलही साहवेना ॥१८॥

२८६

सख्या आंधळी मी असे दीन दारा । पती याचिताहे समर्था उदारा ।
बरें नाहिं हे जाणतें मी तथापी । मन श्रोत्र झालें भवत् सत्कथा पी ॥१९॥

२८७

दुरंतां तंव तें निवांती वसावें । अहंताविहंतें महंता पुसावें । (य९उ-६६)
सख्याहों समर्थे समर्थी रुसावे । मला बालका कां कुणी ना पुसावे ॥२०॥

२८८ / मालिनी

नवल तव जनातें भक्तिमंत प्रशांत । बघुनि महति रागें चित्तिं वाटे न संत ।
अजुनि कणव व्हाना जात आयूवसंत । मग तपनजतापीं घेउं कोठें उसंत ॥२१॥



२८९

नवस करूं तुम्हां कीं प्राण वाहीन चित्तीं ।
तरि धनिजनकार्या शूरही प्राण देती ॥
म्हणउनि करुणार्द्रा दीन जाणूनि यावें ।
उचित रुचिर सर्व स्वामिपायांस ठावें ॥२॥

२९०

जरि दुर करवेना* माझिया कर्मजोडा ।
तरि हरि सुकुमारा काळजी सर्व सोडा ।
श्रम पळभरि वारा बैसुनीया पलंगीं ।
हृदयरति समर्पूं सर्वदां अंगसंगी ॥२३॥

(*पाठांतर- जरि परिहरवेना )

२९१ / भुजंगप्रयात

सख्या भ्रष्टवीतो मला साहि संगी । परी तूमची आवडी अंतरंगी ।
कुलीना नव्हे मी गणीका खरी जी । परी कीर्ति ती जी बरी नोवरी जी ॥२४॥

२९२

बहू चाळवीलें जनां शाब्दयोगी । परस्त्रीस माता म्हणोनीही भोगी ।
नसे अंगिं भक्ति भवद्वेटिजोगी । सदा घाबरे चित्तही देह रोगी ॥२५॥

२९३

खरी दासि जाणोनि सन्मान केला । कुडी मानुनी वा परित्याग केला ।
तथापी मला आन आधार नाहीं । सदा जीव दोषी गुणी शेषशायी ॥२६॥

२९४

जरी माधवीं आमुची अंधश्रद्धा । कळे तें तरी जें कळाले प्रबुद्धा ।
तुझें नाम घेवोनियां बद्ध झाला । असा नाहिं ठाऊक वेदांदिकांला ॥२७॥

२९५ / मालिनी

तव पद महिमेला गाति जेथें महंत । नमन न मन तेथें कां करी मूढ हंत ।
नवनव रमणींचा आवडे हास हो या । लवहि करूं नका जी या दयादंड द्याया।२८

२९६ / मालिनी

व्रजवर तुम्हि माझा फारसा लाड केला ।
म्हणवुनि अपराधू मत्करें होत गेला ।
पळहि न धनिकाजीं झीजवीली स्वकाया ।
अझूनि न अणु शिक्षा कां क्षमा स्वामिराया ॥२९॥

२९७

सदा सर्वदाते तुम्ही शार्ङ्गपाणी । कदा आणिका मी न जोडीन पाणी ।
भिकारी करीं झोळि घेवोनि आलों । मला भक्तिची भीक वाढा दयालो॥३०॥
(य९उ.६७)

२९८ / शिखरिणी

प्रिया नाना योनीं जनन जरि दैवें मज घडे ।
तिथें व्हावें हें हो भजनिं तुमच्या नांतर पडे ।
पियोत्कंठा स्त्रीतें जशि अति पती गेहिं नसुनी ।
तशी मत्प्रीती हो जवळिं तुम्हि गोविंद असुनी ॥३१॥

२९९ / मालिनी

स्तनविषहि तुम्हातें पाजितां दैत्यदारा ।
जननिगतिस नेली पूतना ते उदारा ।
त्यजुनि चरण ऐसे घोर संसारतारू ।
शरण कवण मानू जें यमाचें उतारू ॥३२॥

३०० / मंदाक्रांता

स्नानासाठीं मज झडकरी सारि गे आज पाणी ।
देई तोषा निजमृदुकरें चोळुनी पादपाणी ।
प्रेमें कान्ते उशिर व्यजना घेउनी घालिं वारा ।
कैं ऐकेन श्रवणिं वचनें तूमची ही उदारा ॥३३॥

३०१ / वसंततिलका

बंधू सुदाम मुनि त्यास सनाथ केले ।
त्या द्रौपदी बहिणिचें बहु कार्य झालें ।
मी अन्यजा म्हणुनि हो मजला उपेक्षा ।
केली कशास तरि कामिनिची अपेक्षा ॥३४॥

३०२ / भुजंगप्रयात

अलंदीवरा सद्गुरू ज्ञानराजा । त्वरें संहरा धावुनी शोक माझा ।
भवीं या सुखें जन्म जावोत कोटी । तुम्हावांचुनी नायके आन गोठी ॥३५॥

३०३

स्वयें ऐकतें वाक्य ज्या ज्या परीचें । तसे भावही ऊठती अंतरींचे ।
घडी एक चित्ता नये स्थैर्य कांही । तुम्हावीण कोणा पुसूं शेषशायी ॥३६॥



३०४

श्रुतीनां मुनी जाउनी पूसती हो । परी त्या मला पाहुनी रूसती हो ।
गुरूवांचुनी तारिल्या यज्ञपत्नी । दयाळा मिही तूमची दीन पत्नी ॥३७॥

३०५

पित्याच्या भयें आठवीतां तुम्हाला । स्वयें रक्षिलें दानवाच्याहि बाळा ।
बिरूदावळी पाळणें नित्य संता । मला भेटि द्यावी प्रभों भाग्यवंता ॥३८॥

३०६

जरी प्रार्थितों मी धरूनी निजार्थ । तरी सर्व देणार तुम्ही समर्थ ।(य९उ.६८)
भिकारी सख्या कोण निष्काम आहे । असें ओळखोनी कृपादृष्टि पाहे ॥३९॥

३०७

असे स्वार्थ तो एवढा दीनबंधू । मनीं माझिया वाढतो मोहसिंधू ।
अगस्ती तुम्ही येउनी सूकवावें । रमावल्लभा पाउला दाखवावे ॥४०॥

३०८

कहीं तूं कही मी तुम्ही हेहि वाणी । कदा कन्यका केधवा होय राणी ।
परी अंतरीं शोक जो जीव भाजी । असें बोलवी तो रमावल्लभा जी ॥४१॥

३०९

अहो ऊसणी सर्वही काव्यवाणी । नवी आणुं कोठोनिया चक्रपाणी ।
जसें शीकवी माय बाळाप्रती हो । तसें बोलतां सर्वही तोषती हो ॥४२॥

३१०

भवाला भिवोनी स्मरे जो तुम्हाला । असा कोण ज्याचा न उद्धार झाला ।
विनोदें झणी पाहतां जी परीक्षा । तरी ते मला वाटताहे उपेक्षा ॥४३॥

३११

अशी प्रौढशी नायिका कोण आहे । विनोदें सख्याच्या वियोगास साहे ।
भवत् चित्कळा रुक्मिणी राजबाळा । विनोदें तिच्याही तनूचा उबाळा ॥४४॥

३१२

विनोदें तुम्ही निर्मिली सर्व सृष्टी । पुढें संहरा हे विनोदीच गोष्टी ।
विनोदाविणें आन तुम्हास नाहीं । परी आमुच्या अंतरीं धीर नाहीं ॥४५॥

३१३

विनोदें तुम्ही साधल्या मौन पोटीं । न बोला झणी गेलिया कल्प कोटी ।
असें सर्वदां मुग्ध मी नायिका जी । विनोदू म्हणोनी करूं तो नका जी ॥४६।

३१४
तुझा शत्रु मी एकटा काय देवा । करें माझिया घेत कां नाहिं सेवा ।
कशाची तुम्हां एवढी भीति वाटे । मियां प्रार्थितां रोधितां द्वार वाटे ॥४७॥ ड?
३१५
मला काम तो नावरे बुद्धिमंदू । परी पुत्र तो तुमचा दीनबंधू ।
तयाला तुम्ही आवरावें कृपाळा । रमावल्लभा द्वारकेच्या नृपाळा ॥४८॥
३१६
मला क्रोध तोही करी नित्य बंधू । असे तो तुम्हां रूद्रनामा सुनंदू ।
तयाला तुम्ही आवरावें कृपाळा । रमावल्लभा द्वारकेच्या नृपाळा ॥४९॥
३१७
मला नावरे फारशी लोभमाया । परी तूमची आवडीचीच जाया ।
तियेतें तुम्ही आवरावें कृपाळा । रमावल्लभा द्वारकेच्या नृपाळा ॥५०॥
३१८
मला लावुनीयां बळें काळवाटे । यमाची तुम्ही राखितां पैज वाटे ।(य९उ.६९)
असा पक्षपातू नसावा कृपाळा । रमावल्लभा द्वारकेच्या नृपाळा ॥५१॥
३१९
अविद्या यदा लागली फार पाठीं । तदा बाळ मी पाडिलों या कपाटी ।
सदा सर्वदां काळजी जीव भाजी । करा कीव माझी रमावल्लभा जी ॥५२॥
३२०
शिशू तो वसे नित्य मालिन्य देहीं । तथापी न घे चिळसी माय कांही ।
तसा मी असे बाहिरीं अंतरंगा । तरी प्रार्थितों स्वामि घ्यावें उसंगा ॥५३॥
३२१
समर्थाचिया सेवका वक्र पाही । असा सर्व भूमंडळीं कोणि नाहीं ।
परंतु न मी सेवकू योग्य देवा । ह्मणोनी बहू वाटते भेव जीवा ॥५४॥
३२२
सदा सर्वदां देव सन्नीध आहे । कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ।
परी धैर्यशीला नसे माझि काया । तथापी तुम्हां प्रार्थितों देवराया ॥५६॥
३२३
धरूं धैर्य तों प्रेमिं होते उपेक्षा । उतावेळ तों नाहिं झाली परीक्षा ।
कळेना श्रुती कोणि देई न भिक्षा । मला तुमच्या पादुकेची अपेक्षा ॥५६॥



३२४ / पृथ्वी
प्रसाद करितां नसे पळ विलंब बापा खरें ।
घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पांखरें ।
कफें परि निरुद्ध हो ह्रदय बुद्धि आणी गळा ।
प्रयत्न मजसाठिं हो म्हणुनियां करा आगळा ॥५७॥
३२५
प्रभो शरण आलियावरि नव्हां कधीं वाकडे ।
परंतु इतुकेंच हें स्वहितकृत्य जीवांकडे ।
मयूरवचनें खरीं परि विमूढ मी माधवा ।
शरण्य मज ना कळे बुझविजे दयें येधवां ॥५८॥
३२६ / भुजंगप्रयात
रडे बाळ तैं घेउनी माय पाजी । रडेना तरी चिंति कां तंद्रिमाजीं ।
तसा प्रेम अप्रेम हो कां अनंता । तरी आघवी आपणा माझि चिंता ॥५९॥
३२७
परब्रह्म सर्वत्र हें वेद सांगे । विमूढा तरी संसृती गोड लागे ।
तशी मूढ मी इच्छितें पादसेवा । मला कासया दावितां मुक्ति ठेवा ॥६०॥
३२८
अविद्यावशें संसृती जीवचित्ता । अनादी अनंता तुम्ही पूरवीतां ।
अविद्यावशें ही सुखें हो कृपाळा । मला भक्ति द्या द्वारकेच्या नृपाळा ॥६१॥
३२९
बहू त्रासला जीव जन्मादि भोगें । तरी मूढ ना जेविं कैवल्य मागे । (य९उ.७०)
भवत्पादसेवार्थ मातेहि कष्ट । तसें झालिया सर्व मानीन इष्ट ॥६२॥
३३०
बहू नीच कामें करूनी कृपाही । समर्थोत्थ संपादिती सर्व कांहीं ।
परंतू भवीं नीच कामें कराया । न तीं हो भवन्मंदिरी देवराया ॥६३॥
३३१
किर्तीही भवत्काज हो नीच साचें । भवाहूनि तें थोर ऐसावयाचें ।
म्हणोनी तुम्ही नीच कामें कृपाळ । असें बोलतां हांसती प्रेमपाळ ॥६४॥
३३२
स्वभावें तुम्ही दीन कारुण्यसिंधू । मला पल्लवीं घ्या त्वरें आर्तबंधू ।

असो वा नसो भाव धावा कृपाळा । मला नाव द्या द्वारकेच्या कृपाळा ॥६५॥

३३३

कळेना गती नास्तिका आत्मयाची । तथापी नव्हे वासना न्यून त्याची ।
तशी मी न जाणे तुम्हां देवराया । परी वांछितें चित्त सेवा कराया ॥६६॥

३३४

पुढें तूमच्या ऊघडें चित्त केलें । तयाला तुम्ही ना जरी शुद्ध केलें ।
तरी नाहिं अन्याय माझा कृपाळा । त्वरें धाव घ्या द्वारकेच्या नृपाळा ॥६७॥

३३५

जरी इंद्रियें ऐकती देवराया । न होतें तुम्हां काज संकष्ट द्याया ।
परंतु त्रपा सोडुनी मायबापा । तुम्हां मागते भीक वारा त्रितापा ॥६८॥

३३६

वरी उघडा द्वेष तो फार वाढे । सदा लागलीं आत्मबुद्धी-कवाडें ।
दिसेना पुढें मागिलें आकळेना । तुम्हा वांचुनी कोण मार्गू कळेना ॥६९॥

३३७

तुम्हा तें निषेधी विवेकी विरक्ती । न तें आवडें माझिया चित्तवृत्ती ।
भवन्नामरूपीं न जेथें रती हो । अशा केवलीं माझि ना आरती हो ॥७०॥

३३८

नवीना नवीना भवत्पादभक्ति । न पूर्व त्यजी उत्तरीं शुद्ध रक्ती ।
भवल्लाभ हा अंतरा होऊं द्यावा । निरीक्षूं नका पूर्विचा जन्मठेवा ॥७१॥

३३९

निरीक्षा जरी पूर्वजन्मास फार । अनादी अविद्या क्रियांचे बिढार ।
सदा कार्यसत्ते सुचक्रप्रवृत्ति । मिळेना तुम्हां कर्मिपूर्णो न वृत्ती ॥७२॥

३४०

कृपा ते कशी मद्विषीं आवराया । तुम्हां शोभते बोलिजे देवराया ।
शिशूतें म्हणे माय मा मा वदावें । भवत्प्रेम आम्हां तसें तुम्हि द्यावें ।७३॥

३४१

मनाचे तुम्ही मायहूनी मवाळू । म्हणोनी श्रुती बोलताती किंवाळू ।(य९उ.७१)
मला त्यागणें मात्र ना योग्य थोरा । दया येऊं द्या गोपिका-चित्तचोरा ॥७४॥

३४२

म्हणा हा भवू वाढला व्यर्थ वाटे । परी रज्जुसर्पे मला भेव वाटे ।



तुम्हावांचुनी दाविता कोण दोरा । दया येऊं द्या गोपिकाचित्तचोरा ॥७५॥

३४३

मति भ्रांत झाली बहू वेदनानें । कुडें जोडिलें सोडुनी वेद-नाणें ।
विना भक्तिबोधू जसे नेत्र मोरा । दया येऊं द्या गोपिकाचित्तचोरा ॥७६॥

३४४

कुणाची तुम्हावीण आशा करावी । जनाच्या कदन्नें तनू कां भरावी ।
फळानें न केल्या तुम्ही पूर्ण ओटी । उपायें अनंतें न संतोष पोटीं ॥७७॥

३४५

घडो साच वाग्दान तें निंदकाही । मिळो आपुल्या रूपि येवोनि तोही ।
म्हणोनी व्रजीं दाविले कामलीले । दुरी कां दयाळा मला मोकलीलें ॥७८॥

३४६

कशी मी म्हणूं 'खेळु या शेषशायी' । मला गोपिकाप्रीतिचा लेश नाही ।
कसा मान दाऊं पुढें राधिकेच्या । धनाच्या पणा केविं सारूं भिकेच्या ॥७९॥

३४७

कशी मी म्हणूं पर्णिजे देवराणें । असे प्रेम तो रुक्मिणीमाय जाणे ।
सुरांसाठिं मी आवडीची मुकुंदा । म्हणूं केवि होता न सद्धर्म वृंदा ॥८०॥

३४८ / मालिनी

म्हणवुं तुमचि दासी कोणिया तोंड देवा ।
निमिषहि नच कुब्जे सारिखी झालि सेवा ।
नयनिं नसुनि पाणी भाकतें कींव वाचे ।
तदपि तुम्हि दयाळा सोयरे व्हा जिवाचे ॥८१॥

३४९ / वसंततिलका

मी होय ना प्रभु तुम्ही वरितां प्रमत्ता ।
नाहीं असा भरंवसा मम दुष्ट चित्ता ।
साधूस निंदि हरिनाम मुखीं म्हणोनी ।
ताराल कीं मज तरी गणिका गणोनी ॥८२॥

३५०

नामास घे परि करीत दशापराधा ।
जिव्हे तुम्हास भजतांहि नये सुराधा ।
भेदांधवृत्ति अशि किंतु साहा सख्या ती ।

तारा मला तुमचि गातिल सर्व ख्याती ॥८३॥

३५१

दंभी मनांत परि मी निजर्दुगुणाला ।
सांगे करोनि उघडे तुज निर्गुणाला ।
जी एवढी तरि खरी मज योग्यताही ।
मानू परंतु दिसते तुमची दयाही ॥८४॥

३५२

तुम्हासवें जरि विरोध करूं तराया ।
तों भीतसे अति मति प्रभुजी मराया ।
आतां तुम्हीच सुचवा पथ कोणता जी ।
मानोनि अंश मजला निज नेणतां जी ॥८५॥ (य९उ.७२)

३५३

अन्याय कांहिं न करोनिहि कींव तुम्हा ।
सारेच भाखिति महंत मनोभिरामा ।
मी तों खरी निशिदिनीं करिं चावटीला ।
तुम्हाविण तदपि कोणि न शेवटीला ॥८६॥

३५४ / मालिनी

विषयवनिं जरी मी भ्रांत हिंडे भुकेला ।
तदपि न तुमचा जी कांहि अन्याय केला ।
कवण करूं शके हो काय पूर्णा तुम्हातें ।
म्हणवुनि न भियावें दावितां पाय मातें ॥८७॥

३५५

पळ पळ पळ मोजी जीविताला यमाजी ।
त्वरित मज कडे घे तूं गडे माय माझी ।
स्तन वदनिं अये दे बाहतों दीनवाणी ।
कठिण मन न कीजे ज्ञाननाथे निदानीं ॥८८॥

३५६ / भुजंगप्रयात

रुचे कोरडे ज्ञान ना मन्मनाला । अवच्छेद आभास विद्वज्जनाला ।
मला साजलें साजिरें रूप डोळा । सख्या दाखवा राखुनी भाव भोळा ॥८९॥



३५७ / पृथ्वी

तुम्ही उजळतां जना तुम्हिच लावितां दुर्मळ ।
असा भरंवसा असो श्रुतिपदीं सदा निर्मळ ।
परंतु विषयाकुलीं कवण लक्षिता लाभलें ।
म्हणोनि तुमच्या पुढें तनयसे रडें हो भलें ॥९०॥

३५८

प्रभो शठ खरीच मी तरि तुम्ही करा शाठ्य जी ।
उगे मधुर बोलुनी सहज दाखवां नाट्य जी ।
सुखें हृदय राहुं द्या जननि गोपिकासंगतीं ।
तदीयपदचिंतनें शुचि करा मदंतर्मती ॥९१॥

३५९

शठत्व मम या परी परि भवत्प्रतापानळें ।
जळेल सगळें विभो म्हणुनियां न भीतां बळें ।
गळेल मतिगर्व हा पळल काळ तोही पळें ।
फळेल मज नाम हा भरंवसाहि गीताबळें ॥९२॥

३६० / शिखरिणी

जसें केलें कर्म प्रभु मज तसा भोगहि घडो ।
विनंती हे किंतु प्रियपदगुणें चित्त उघडो ।
बहु श्रांता कांता तरू[1] अशि तरी माधवदया ।
अजी येऊं द्यावी मजविषयि माधुर्यहृदया ॥९३॥

(१. तरावी, तरो.)

३६१ / भुजंगप्रयात

रसा चंचला निश्चला ती धरित्री । सदा आन दारा मुधा मान तंत्री ।
तुझ्या सारिखी आंधळी का वरावी । म्हणा तैं कुणाचीं पदें म्यां धरावी॥९४॥
(य९उ.७३)

३६२ / वसंततिलका

केली स्तुती म्हणुनी मी नच देई भेटी । शांतिक्षमादि गुण हे वसतां न पोटीं ।
ऐसें म्हणा तरि जना न रुचे कृपाळा । भाट-स्तवें द्रव दिसे स्वदयें नृपाळा ॥९५॥

३६३

हें बोलणें स्फुरवि सर्वहि शारदा ते ।

मौनेहि सेविति बहू मुनि पारदा तें ।
आणूं नवे कुठुनि मी परि पूर्व पंथीं ।
चाले म्हणोनिच धरा स्वमनीं विनंती ॥९६॥

३६४

तुम्हांचि भोग रुचती नव काननाचें । तैं आभिसार करुनी नव कां न नाचे ।
आतां समस्तहि सहा करुणार्द्रसिंधो । तोडूं नये स्वकरजद्रुम दीनबंधो ॥९७॥

३६५ / द्रुतविलंबित

नाम हें रुचतसे चवथे मला । नाममंत्र तुम्हि तो निज दीधला ।
येथ मी करुं कसे करुणाघना । सांगिजे सकल विट्ठलनंदना ॥९८॥

३६६ / पृथ्वी

अमंगल अखंड मी कुमल संशयें मानसी ।
न काय करुणानिधे अवघियांस तूं जाणसी ।
सुनाम चवथें प्रिय-त्यजन-दुःख ना साहवे ।
न मंत्र चतुरक्षरी अनुभवप्रमा दाहवे ॥९९॥

३६७ / इंद्रवज्रा

पळोपळीं प्रत्यय हा मला हो । मागों तरी पूर्णचि काम लाहो ।
ही अक्षरें चार सुसिद्ध मातें । झालीं तथापी मन घे भ्रमातें ॥१००॥

३६८

धावे मती फार चतुर्थ नामीं । रोधावया तीस समर्थ ना मी ।
होईल तें हो धरि धी स्वपक्षा । जाणोनिया दुर्बलबालरक्षा ॥१०१॥

३६९ / वसंततिलका

हे चार वर्ण सुखदायक सर्वदा ही । त्यांचें प्रतीक परि द्या चवथ्या पदाही ।
हे चार मी जपिन हो नियमानुसारें । गाईन नाम चवथें रुचिमात्र सारें ॥१०२॥

३७०

गोविंद सुंदर पदें जपतां न बंधू । आज्ञा करीत हरिपाठ वरिष्ठ बंधू । ती मस्तकी धरुनि चालतसों सुपंथें । अन्यायि साच परि उद्धरिजे अनंतें ॥१०३॥

३७१ / भुजंग प्रयात

‘अळंदीमधे दूर राहें स्वपापे’ । असे स्वप्न जैं दीधले मायबापे । (य९उ.७४)
पुन्हा प्रार्थितां ‘ये त्वरें’ हे म्हणाले । म्हणोनी कृपावंत तुम्ही कळालें ॥१०४॥

३७२ / सवाई

दीन उगा म्हणवीसि परंतु जगीं अति गर्व मनांत कसा रे ।
बोल असा प्रभु देशि झणी मनिं दीन तुझे जनिं दीन न सारे ।



गर्व हरीं हरि तूंचि समस्तहि मस्तक ठेवितसें तव पायी ।
आणिक सर्व उपेक्षिन जें तुजवांचुनि नेत अखंड अपायीं ॥१०५॥

३७३

दंभचि हा परकीयपदासम पद्य रचूनि तुम्हांस भजावे ।
हा करि पार परि बहुतां म्हणुनी मम वेळिं न तुम्हि निजावें ।
अश्रु नवे तरि काय पयोमय होतिल हे करुणाघन सांगा ।
घ्या पदरीं न करोनि विचार समर्पण अंग भवत्तनुसंगा ॥१०६॥

३७४ / पृथ्वी

चरित्र तुम्हि गोकुळीं बहु करोनि राधारतें ।
अनंतजन तारिले अवनि जे निराधार ते ।
मदीय विषयींच कां हृदयि चोरिली कारुणा ।
वदान्य कधिं याचकीं रुसल घ्यावया कारुणा ॥१०७॥

३७५ / स्रग्धरा

आतां ही शेवटीली विनवणि हृदयी देवराया धरावी ।
झांकोनी पल्लवानें मज निजचरणार्चार्थ दासी करावी ।
आलंदीवल्लभाजी नच भलतिकडे दाखवा तर्जनीला ।
श्रीमंत स्वामि ते न त्यजिति विलसतां अंगणीं मार्जनीला ॥१०८॥

३७६ / इंद्रवज्रा

ही एकशे आठ सुपद्य देवा । तुम्हांस होत प्रिय वासुदेवा । (य९उ.७५)
वाहोनियां सर्व अलंदिनाथा । गातें पदी ठेवुनि नाम माथा ॥१०९॥

॥ करुणाकलरवस्तोत्र समाप्त ॥

# ८. भक्तिपर पदे

३७७ / हिंदी

सामनुष्टुप - राग भीमपलासी- ता. राजविद्याधर (तेताला)

**नाथ मोरे आये भक्तनके काज ॥धृ॥**

कोइ करे बहु करम जोग कोइ । लेत सांख्य को छाज ॥१॥
कोई कहे ब्रह्मही सनातन । कोइ ध्यावत मुनिराज ॥२॥
हम तो उनके चरणन लपटी । छोर मातपितु लाज ॥३॥
ज्ञानेश्वर प्रभु दीनदयाल है । हरिदायक गुरुराज ॥४॥

३७८ / हिंदी

सामनुष्टुप -रा.- यमन.

हरि मोरे सब सुखके दाता ॥धृ॥
और हमरा कोई नहिं जन । मारुंगी संसार को लाता ॥१॥
कोइ मुझे तो जूति लगावत । कोई शिरपें धरत है छाता ॥२॥
कोई तो प्रेमसें गुण मोरे गावत । करत कोई तो दोख कि बाता ॥३॥
स्तुति अरु निंदा शब्दमात्र है । मैं तो भई निःशब्द की ज्ञाता ॥४॥
बर्णाश्रम यह बिधिनिषेधको । मैं तो कृष्णचरण धरूं माथा ॥५॥
ज्ञानेश्वरकन्या सब जनको । कह कर जोरि भजो रघुनाथा ॥६॥

३७९ / हिंदी

सामकामदा - रा.-मांड - ता.- दादरा.

उठो पिया जागो प्रेमदान करन लागो ॥धृ॥
रातदिन देख्या नही मनसे दौर आई ।
शान्ति छमा दया तीन साथ सखी लाई ॥ उठो पिया ॥१॥
कल तुमने बेणु बजा चित्त मोहलीयो ।
सुनि अवाज बैरि भई सदन छोर दियो ॥ उठो पिया ॥२॥
जैसो तेज माहिं सुरज एक बडो भासे ।
तैसा तेरा प्रेम ब्रह्मज्ञान हि हम चापे[१] ॥ उठो पिया ॥३॥
अलकावतिपतिनंदिनी कहती करजोरी । (य९उ.७६)
मुक्तकरो नाथ मोहे [२]तोरि सरम सारी ॥ उठो पिया ॥४॥(१.पाहे.२.तोडून.)

३८० / रामस्तुति

लावणीवृत्त - मुळ-जोगी ता. धुमाळी- गौण.''विठोबा शिणले आळविता''

नमो श्रीरामा गुणधामा ।
दुर्जनहरणा निजजनतरणा जानकिविश्रामा ॥धृ॥
प्रभु रे, अघटित तव लीला ।
भरत करुनि प्रिय अक्षय दिधला दोषचि कैकयिला ॥१॥
दयाळा वनिं होतें जाणे । देवावरि त्वां मीष घालुनी ऊठविलें ठाणे ॥२॥



प्रभु रे, तुझीच ही माया । भक्त असोनी तया घातलें असुरयोनिठाया ॥३॥
सख्या प्रभु धन्य तया वाणूं । जे तव पायी विनटुनि झाले वैराग्यस्थाणू ॥४॥
प्रभू हा वर आम्हा देई । ज्ञानेश्वरगुरु सकळहि वाटो बंधु बाप आई ॥५॥

पार्थ-कृष्ण संवाद :
व्यक्ताव्यक्त उपासना निर्णय.

३८१ / दिंडी

पार्थ बोले मज पुर्ण कळों आलें । निराकार साकार तुम्हीं झाले ।
भक्तिं पावे साकार दुजें योगें । परी दोन्ही तुमचींच प्रभू आंगें ॥१॥

३८२

अमृताच्या सिंधूंत बुडी देतां । मृत्यु जायें तैसीच बिंदुसत्ता ।
एकदेशीय आणि व्याप्त मूर्ती । मला वाटे दोहींचि साम्य कीर्ती ॥२॥

३८३

तरी देवा पूसणें एक आहे । धरियेलें जें विश्वरूप होय ।
सत्य किंवा मायीक तेंचि सांगा । कृपायोगें स्पर्शोनि मच्छिरांगा ॥३॥

३८४

असा ऐकोनी पार्थ प्रश्न साचा । तुष्टला तो श्रीनाथ गोपिकांचा ।
म्हणे बापा जाणसी पुसों कैसा । क्षीर नीरा निवडीत हंस जैसा ॥४॥

३८५

असा आश्वासोनियां पार्थ देवें । म्हणे मातें भजतीच जिवें भावें ।
ध्यानयोगें मन्मंदिर जे झाले । तयां मानी तूं योगि पूर्ण धाले ॥५॥

३८६

मला जे कां ध्यातातिं भक्त ध्यानीं । तया पार्था मी योगयुक्त मानी ।
कडीये जों लेंकरूं नांदताहे । मायचें तें तोंवरी प्रेम लाहे ॥६॥

३८७

जसी गंगा सागराप्रती जाय । प्रवाहे पैं मागोनि येति होय ।
तसें पाहोनी मलाही स्वभावें । भजती जे अक्षय नव्या भावें ॥७॥

३८८

तयासाठी त्यागुनी क्षीरसिंधू । त्यागुनीया मी प्रेमशीर्ष इंदू ।
योगध्यान इंदिरा बळीभद्रा । त्यागुनीयां इच्छि मी भक्त भद्रा ॥८॥

३८९

प्रियांहूनी वैकुंठ गोड मातें । न लागे हें सांगतो सत्य तूतें ।

निश्चयानें जे मला चित्तिं ध्याती । रक्षिं त्यां मी सोडूनि अन्य प्रीती ॥९॥

३९०

विप्र राज्ञ विट् शूद्र हीन जाती । होउनीही निज प्रीतिगुणें ध्याती ।
सांडुनीयां वैकुंठ तया पाशीं । सदा राहे मी बद्ध प्रेमपाशी ॥१०॥

३९१

असो, आतां निर्गुणी भक्ति ज्यांची । गती तूतें वर्णितो काय त्यांची ।
कष्ट सोसोनी दुष्ट तुष्टि नाहीं । दंत नसतां भक्षिती लोह पाहीं ॥११॥

३९२

साह्य माझे सोडोनि सर्व कांहीं । स्वयोगें जे पाहती जाउं ठायीं ।
शीत उष्ण पर्जन्य तिन्ही तापा । सोसुनीही जो मार्ग नव्हे सोपा ॥१२॥

३९३

पांगुळाचा वायुसी नव्हे हेवा । न पावेची भृंग तो रवीं सुगावा ।
देहवंता जीवांहि तया रीती । कदा नोहे अव्यक्त सुप्रतीति ॥१४॥

३९४

व्यक्त सांडोनी चतुर्भूज सारे । निर्गुणासी झोंबती जे किं बारे ।
येति कष्टें ते मत्पदास कोणी । बहू विघ्नें सोसूनि दीनवाणी ॥१४॥

३९५

सर्व भूतांशी साम्य दार्ढ्य व्हावें । शिळावृक्षीं सौजन्य चालवावें ।
जरी ऐसा बाहेर पूर्ण झाला । तरी विघ्नें अंतरीं येति त्याला ॥१५॥

३९६

जियालागी मोहाहुनी उचाटे । महा मोहो बोलती जे अचाटे ।
सांख्य ज्यासी बोलती दुःखसिद्धि । अणीमादी धांवती त्याचि रिद्धि ॥१६॥

३९७

समाधीचा नाशोनि सुहव्यास । करीताती बाह्यज्ञ स्फूर्ति व्यास ।
अशीं विघ्नें तोडोनि जरी आला । तरी नाहीं आधिक्य कांहीं त्याला ॥१७॥

३९८

परी मातें नेणोनि पार्थवीरा । उगें जाती ते घेति मार्गि फेरा ।
असो यांची निंदाचि स्तुती होय । पुढें भक्तीपंथाचि सांगु सोय ॥१८॥

३९९

सर्व कर्मे अर्पोनि मला भावें । मद्रुपीं जे रंगले सुस्वभावें ।
तयालागीं स्वप्नी न दुःख भेटे । घेवोनियां मी खांदि वाहिं नेटें ॥१९॥



(य९उ.७८)

पद / ४००

सामामाणववृत्त - राग- काफी ताल- दीपचंदी

मांजरपिलियापरी । भजती जे मज म्हणुनि हरी ॥धृ॥
त्या संसारांतुनि मी काहीं । उचलुनि अधर धरीं ॥ मांजर पिलिया ॥१॥
काज तयाचें पडतां भावें । धाउनि अंगें करी ॥ मांजर पिलिया ॥२॥
ज्ञानेश्वर प्रभु तात दयालू । षड्रिपु त्वरित हरी ॥ मांजर पिलिया ॥३॥

४०१ / हिंदी

सामनुष्टुप - राग- सारंग - ता.- तेताला.

जो नित लेवे मोरो नाम ॥धृ०॥
गृह धंदा यदि छूटे तिसका । दौरके करूं सोहि काम ॥ जो नित ॥१॥
जलबिज कमल लिप्त न होवे । तैसे तरण सुधाम ॥ जो नित ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणाबलतें । कहो भैया गोपालराम ॥ जो नित ॥३॥

४०२ / दोहा (हिंदी )

ऐसी मेरी आसतें मद जिनका मिट जाय ।
मै तिनके हृदय बीच रहूं नीत ठहराय ॥१॥

४०३

लावणीवृत्त - मूळ-पूर्वी - ता. - धुमाळी - गौण ''घनःश्याम सुंदरा'' या चालीवर.

त्यांचा मृत्यू निज अंगाने मी करुणाघन सुखे ।
सोशितसो की संशय नाही ऐके मुनिवरमुखे ॥धृ॥
काळाचाही काळचि मी शासितों जना सकळा ।
वारुनिया भवउष्णा दे प्रेम सौख्य शीतकळा ॥
अंबरिषाचे दहा गर्भ म्यां सोशियले गुण टके ।
ज्ञानेश्वरप्रभु साह्यचि होतां न्युन नसे आणिके ॥१॥

४०४ / अभंग

योगियांचे ध्यानीं न ये कदाकाळीं । तो मी वनमाळी पाणी भरी ॥१॥
कीर्तनाची मज अत्यंत आवडी । जीवाहूनी गोडी भक्तांची की ॥२॥
वाटे हें शरीर करावें कुर्वंडी । बैसवावें मांडीवरी भक्तां ॥३॥
वाटे शिरावरी घ्यावे उचलूनी । हृदय चिरोनी ध्यावे वाटे ॥४॥
वाटे मरोनीयां व्हावें भक्त बाळ । सेवावें तात्काळ प्रेमें पाय ॥५॥
ऐसा मी तयांचा ऋणी गा पांडवा । जीवे भावें सेवा करीती जे ॥६॥

तयांसी मी मानी साच योगबळ । सद्गुरु कृपाळ ज्ञानेश्वर ॥७॥ (य९उ.७९)

४०५

साममाणव. रा.-काफी. ता.-दीपचंदी

सागरीं लवण मिळे ॥धृ०॥ जैसे ॥
पुढती ते ना ये परतोनी । तैसे मन न ढळे ॥ सागरीं ॥१॥
हृदयस्था मज ध्यातां भावें । शुद्ध प्रेमा कळें ॥ सागरीं ॥२॥
असुनीयां मी व्यापक परि मज । ओढिति भक्तिबळें ॥ सागरीं ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु निज सद्गुरुचें । वंदू पदकमळें ॥ सागरी ॥४॥

४०६ / श्लोक

अनन्य योगूचि असा म्हणावा । आकाशिं हा शब्द जसा गणावा ।
द्रव्या गुणा संभव जेथ नाहीं । भक्तार्थ तो मी सगुणी स्वतां ही ॥१॥

४०७

नैयायिका मी सुनिमित्त भासें । मीमांसका धर्मकळीं विकासें ।
सांख्या प्रधाना पुरुषा परौता । वेदान्तिया मी सकळां वरौता ॥२॥

४०८

तो भक्तिनें मी प्रभु फार सोपा । दुष्टाप्रती मी यम देत तापा ।
न्यायार्थ भक्त्यर्थ कृपार्थ माझ्या । विस्तारल्याती विभूती समाजा ॥३॥

४०९ / दिंडी

मला कर्मे अर्पिली ज्यानिं सारीं । चित्त ज्यांचें मजसाठिं कष्टि भारी ।
जसी बाळा क्षणभरीं माय नाही । तरी होय दुःख त्या रीति पाहीं ॥

४१०

मजवीणें क्षण ज्यास यूग वाटे । मत्कथा त्या ऐकोनि प्रेम दाटे ।
मद्गुणातें वर्णितां अश्रु येती । मागें पूढें रक्षि मी तयांप्रती ॥

४११

काय वर्णूं मी फार कुरुराया । तया कांतू मी तेचि माझि जाया ।
तयांचें मी बाळ ते माय माझी । भजति जे मज एकटे वा समाजी ।

४१२

रमा ब्रह्मा बलिराम शीव शेखी । त्यागुनी मी पातलों मर्त्य लोकी ।
वसुदेव-देवकिस सांडुनियां । गोकुळींच्या तारिल्या गौळिणीया ॥

४१३



जातिच्या त्या केवळा शूद्र जाणा । मुनि शुकादी परि वर्णिताति गूणा ।
अशा माझ्या गोपिका प्रेमखाणी । अर्जुना मी लाजलों जया स्थानीं ॥

४१४ / हिंदी- साकी

वर्णाश्रमके उचित कर्म करि मम चरणनको देवे ।
सो मेरो पद पावत यामें संशय कछु नहि होवे ॥ (य९उ.८०)

४१५ / हिंदी

सुतजननीको ध्यान करत है तैसा मुझको ध्यावे ।
ताके गुण इन तीन लोकमों सुरनर मुनिजन गावे ॥

४१६ / दिडीं

अरे ! अभ्यासीं चित्त तुझें नाहीं । गौण कैसा मानिसी सर्वदां ही ॥
गड्या ! अभ्यासें अल्प तरी फावे । विना अभ्यासें बोल सर्व वावे ॥

४१७ / श्लोक

भक्तीं मला ज्यापरि बद्ध केलें । तैसें न यागादिकिं बांधियेले ।
भक्तासि जैसा मम प्रेम आहे । तैसाचि मी त्यां जवळीहि राहें ॥

४१८ / दिंडी

नारदानें वर्णिले जिये लागीं । भक्ति तैसी प्रेमळांचिया आंगी ॥
प्रीतिवांचोनी मला जगीं कोणी । आकळीना ही वदे वेदवाणी ॥

४१९

श्रुती ज्यांच्या पायीक मुखामाजीं । सद्गुरू जे वर्णाचिया समाजीं ॥
गुणा बाराही अधिष्ठान झाले । परी मातें नेणतां व्यर्थ गेले ॥

४२०

जरी होतां न्यून मद्भक्तसेवा । तरी त्यागीं पोटिच्या ब्रह्मदेवा ॥
इंदिरेसी सांडीन पळामाजी । परी रक्षाया सदा भक्त राजी ॥

४२१ / अभंग

नाहीं मज प्रिय कैलासीचा राणा । नाहीं संकर्षणावरी प्रीती ॥१॥
ब्रह्मदेव माझ्या उदरीचें बाळ । परी न प्रबळ प्रीय तैसें ॥२॥
इंदिरा ती माझी अक्षयींची कांता । परी त्या एकांताहूनि नाहीं ॥३॥
बहु काय मज आवडेना जीव । जैसा भक्तिभाव आवडतो ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभु मित्राची ही वाणी । आणिली गोठोनि अभंगात ॥५॥

४२२ / दिंडी

सद्गुणांची खाणीच प्रिया माझी । तिये लागीं मी सर्व बळें राजी ।
भृंग कोरी काष्ठ ज्यापरी तैसा । कुसूमातें सांभाळि जिवें कैसा ॥

४२३

तसा नाशीं मी विश्व तल्लयांती । परी नाहीं भक्तास त्याचि खंती ।
विश्व उपजे तैं ते न जन्म घेती । विश्वनाशे तैं दुःखिही ते न होती ॥

४२४

जया ठावें मी व्याप्त सर्व देहीं । निघे माझ्या पासूनि सर्व कांहीं ।
मला तोही नाशास ने न पार्था । मीहि त्यातें पुरवितो सर्वदार्था ॥

**(य९उ.८१)**

४२५

असे देवें बोलोनि अर्जुनासी । भक्ति दावीली अनन्या जनासी ।
हाचि मंत्र योगही हाचि सोपा । हेंचि औषध वारितें तिहीं तापा ॥

४२६

कर्म धर्म त्यागोनि सर्व कांहीं । शरण जावें भक्तिनें कृष्णपायीं ।
निवारीतो पाप तें शोकमूळ । कोटिपर्यंत उद्धरीत कूळ ॥

४२७

ब्रह्मनिष्ठ जो सत्य शांत झाला । हर्षशोकें सुखदुःख नाहि ज्याला ॥
सर्वभूतीं साम्यता पूर्ण आली । पराभक्ति तैं माळ गळां घाली ॥

४२८ / दिडीं

कर्म धर्म ज्ञानही पूर्ण झालें । भक्तिवांचूनी कोणि नाहीं धालें ॥
श्रमोनीया ज्ञानि ते भक्ति घेती । ज्ञान लोळे भक्तांचिया पदांतीं ॥

४२९

भक्तियोगा सौकर्य फार आहे । ज्ञानयोगा विघ्नाचि शीव पाहे ॥
साह्य नाहीं जरि कांत इंदिरेचा । तरी साऱ्या साधनीं देह रेचा ॥

४३० / इंद्रवज्रा

जन्मोनियां ब्राह्मण उंचखाणी । जो वर्णिना विष्णुगुणा मुखानी ॥
त्याहूनि चांडाल वरिष्ठ साचा । वर्णी जयाची हरिनाम वाचा ॥

४३१ / अभंग

जरी झाली आहे द्वैताची समाप्ति । तरी कृष्णभक्ति सोडावी ना ॥१॥
जरी एकरूप झाले देवभक्त । तरी ते समस्त देवाचे की ॥२॥



सिंधूचे तरंग ऐसाची व्यवहार । नोहे हा समुद्र तरंगाचा ॥३॥
तैसें जरी ब्रह्म पावले हे जीव । तरी आहे भाव तरंगाचा ॥४॥
पाणी एकरूप सत्यचि हें जाणा । परी येती भिन्ना तरंगासी ॥५॥
तैसें ज्ञानेश्वर कृपाबळें झालें । समस्त आटलें बिंदुमाजी ॥६॥

४३२ / श्लोक

जे जाणती भक्तिबळें मला गा । त्यांच्या करीं मी हृदयांतला गा ॥
ते मत्सुखा होउनि येति दारा । हे बोलिले देव पृथाकुमारा ॥

॥ पार्थ कृष्णसंवाद समाप्त ॥

'''

४३३

जयंतीवृत्त. मूळ.-पूर्वी.-ताल-धुमाळी. -गौण-''घनश्याम सुंदरा.''

तुला ध्यातसों हरी सख्या रे कठिणता नेई ।
मृगजळ हा संसार वारुनी शांति मना देईं ॥धृ॥
भूति दया तूं वाढविं माझी आशेतें नेई । (य९उ.८२)
चरण दावि पुंडरीक वरदा शिर ठेविन पायी ।
सच्चित्सुख भोक्तृत्व भोग्य जें नसे जनीं कांहीं ।
एकचि परि अद्वैत सनातन भवभय तें नाहीं ॥ ध्यातसों०॥१॥
अभेद जरि साधक तरि प्रभू आम्ही तुझे पाहीं ।
नव्हेसि तूं आमुचा सिंधुचे तरंग लवलाहीं ।
मत्स्यादिक अवतार धरोनी महितें सुखदाता ।
मारुनियां दुष्टांस रक्षिलें निजपदधृतभक्तां ॥ ध्यातसों ॥२॥
वारियले ते ताप प्रभु त्वां नेले मोक्षपथा ।
म्हणुनीया प्रार्थितों मला प्रभु तारीं भवभीतां ।
दामोदर गुणमंदिर सुंदर वदन तुझें देवा ।
भवसिंधूचा नाशक भासक सुखसिंधूभावा ॥ ध्यातसों ॥३॥
दवानलापासुनी काढिसी तोडिसी भवगोवा ।
सुखसिंधूचा इंदु सखा तूं जाळिसि दुःखदवा ।
नारायण करुणाघन तूंची वर्ष कृपावृष्टि ।
शरण आम्ही तुजला दिसो प्रभु त्वद्गुणमय सृष्टि ॥ ध्यातसों ॥४॥
जिकडे तिकडे रूप सांवळें दिसों आमुच्या दृष्टि ।
शिर राहो ज्ञानेशप्रभूचरणांबुजसंपुष्टीं ।

हेचि षट्पदीपदप्रबंधी मुखी वसो पाहीं ।
जें वदले आचार्य तयाचा सदर्थ लवलाही ॥ ध्यातसों ॥५॥

४३४ / दोहा

मेरी मति कछु और है ब्रह्मग्यान पश्चात् ।
एक गुरुही भजनीय है छोरि आन गुनगाथ ॥१॥

४३५

सामसाक्षिणी. मूळ.- जोगी.-ता.-तेताल. गौण.- ''कैसा जोग कमायाबे.''

मज कांहिंच नाहीं वान । दोहीं गृहींचा घेतें मान ॥धृ॥
वैकुंठादिक पदें सकलही पावुनियां परिमाण ।
सरतां सुकृत पावती त्या स्थळिं सर्वहि जन अपमान ॥मज०॥१॥
अलकावति जातां तेव्हां मज होतें निजसुखभान ।
वृंदावनिं जातां मग हरितें मम सम न रुचे आन ॥मज०॥२॥
ज्ञानेश्वरकन्या म्हणुनी मज गोड मिळे पक्वान्न ।
पत्नी ज्याची तोचि प्रभु दे आणुनि तांबुलपान ॥ मज०॥३॥(य९उ.८३)

४३६ / हिंदी

सामनुष्टुप.- रा.-कामोद.-ता.-तेताला.

चाहति हूं साविलया को संग ॥धृ॥
श्रवण नयनको एक मिलायके । छोरके दीन्हा अनंग ॥१॥
दहर पलंगपर प्रेम बिछोना । पियको देउंगी अंग ॥२॥
देहभिन्न अपनेकु जानके । करति हूं संसृतिभंग ॥३॥
ज्ञानेश्वरकरुणाबलतें मैं । खेलति हरिमिलरंग ॥४॥

४३७

जयंतीवृत्त - मूळ - पूर्वी ता.- धुमाळी गौण - ''घनश्याम सुंदरा.''

प्रभु घेउनि अवतार गोकुळीं विचित्र करि करणी ।
लीलाललित विलासि तयाच्या लंपट मन चरणीं ॥धृ०॥
बाळपणी पूतना शोषिली धाडिलि अपवर्गी ।
यमलार्जुन तारिले किशोरें निजवश समवर्गी ॥
जाउनिया सावळा गड्यासह निजगृहचौरंगी ।
भक्षुनियां दहिदूध जातसे दूर निगमसंगी ।
ते सुख किति मी सांगु प्रणय गोपी अंतःकरणीं ॥१॥
शुक्तिमाजि मौक्तीक जसें कां तेजोमय निपजे ।



तसा गौळियांमाजि साजिरा श्रीहरि कान्त सजे ॥
नारदादि मुनिजन हृदयीं हा परब्रह्म समजे ।
दुर्जन जे अति खळ त्यां प्रति हा शत्रुसमचि उमजे ॥
गोकुळिच्या पतिव्रता केल्या निजांक संकरणी ॥२॥
जो गोवर्धन धरी अंगुलिवरी हारवि कालफणि ।
प्रेमरूप गोपकामिनीची तो करि वेणिफणि ॥
कमलासन अभिमान निवारुनि इंद्रदर्पदमणी ।
गोविंद अशी संज्ञाधारक राधा यद्रमणी ।
त्या प्रभुची बाई मी करितें जाउनि घरभरणी ॥३॥
अलंकार शोभलें लक्षिता चिद्रसहरिमूर्ती [१] ।
नातरि व्यर्थचि रसगायन जें अन्यमनुजकीर्ती ॥
हरिगुण गातां हरिच देतसे स्तवावया स्फूर्ती ।
ज्ञानेश्वरगुरु करुणे नें मत्प्रवृत्ति हरिसुरतीं ॥
नलगे आतां कवणाची मज कांहींच मनधरणी ॥४॥ (य९उ.८४)

(१. हिरण्य हरिमूर्ती - पाठांतर.)

४३८

साममाणववृत्त. मूळ-पूर्वी-ता.-दीपचंदी-गौण.राधे घडिघडि.

गुणसागर नारायण । करितें नाम पारायण ॥धृ॥
खाया दे ना जरी गृहीं कोणी । तरी न सोडिं मी चक्रपाणी ॥१॥
पती बाइ हा नाहीं चतुर । म्हणुनीयां केला कृष्ण वर ॥२॥
घरीं मनुष्य अवघेचि दाड । झाली म्हणुनी कृष्णी सुरवाड ॥३॥
आधिं लागलि होति माझि मती । वरी ज्ञानेश आज्ञापीती ॥गुण०॥४॥

४३९ / हिंदी

कंचुकीवृत्त. मूळ- गौडसारंग, ता.-तेताला.

मै तो नहीं रही मेरी । रहूंगि कैसी घर मेरी ॥धृ०॥
गई है शरीरसुध सारी । दिई हरिकर चोली सारी ॥१॥
छोरा बिखय सदन धंदा । लिया हरिपग प्रीती छंदा ॥२॥
निभर्य ज्ञानेश्वरबाला । रहि हिय पिय करि नंदलाला ॥ मै तो नहीं०॥३॥

४४०

सामनुष्टुप. मूळ-भूप. ता.-तेताला. गौण- ''पहा पहा सावळा''

पुरेपुरे बोलणें आतां । सोडा वाचाबळसत्ता ।

मोकळा म्या केला माथा । जीवेभावें वाहिलें कृष्णनाथा ॥१॥
तुम्ही ज्योतिषी ब्राह्मण । जेव्हां केलें माझे लग्न ।
तेव्हां कां न पाहिले अवगुण । आतां शब्द ऐकेल तरि कोण ॥२॥
इहलोकीं तुमचें भय नाहीं । यम करूं न शके मज कांहीं ।
झालें देहींच या विदेही । अकृत्रिम कृष्णीं प्रीति वाही ॥३॥
ज्ञानेश्वर सहाय माझा पिता । मग कोण मानी सुरापीता ।
बोंबा ठोका तुम्ही आणि पिता । भाव अभाव न घे भावितां ॥४॥

४४१

रंगलावणी वृत्त. मूळ. -पूर्या. गौण.- 'द्राक्षाचे मंडप'

उजळले भाग्य दाही दिशाची प्रकाश गे ।
कृष्ण नवरा झाला आता कवणाचि आस गे ॥धृ०॥
पाहतां पाहतां झाला बाई संसाराचा नास गे ।
अंतरीचा फिटला बाई षड्रिपूंचा त्रास गे ॥१॥
पूर्वजन्मि होती काही संचिताचि मोट गे ।
म्हणुनीयां कृष्णपायीं झालि हृदयभेट गे ॥२॥ (य९उ.८५)
सुखी राहो बाई माझा ज्ञानेश्वर तात गे ।
जयाचिये कृपे झाला कांत गोपिनाथ गे ॥३॥

४४२

कमलारंगीवृत्त. रा.-यमन. ता.-तेताला.

वर्णू कृष्णगुणा ॥ बाई गे ॥धृ॥
निर्गुण किटकिट सांडुनि सकळहि । चित्तिं धरूं सगुणा ॥ बाई गे वर्णू ॥१॥
ज्ञानानें व्युत्थानहि होतें । मुक्तिंत भोक्तृपणा ॥ बाई गे वर्णू ॥२॥
मुक्त शुकादि असूनि वंदिती । व्रजवनिताचरणा ॥ बाई गे वर्णू ॥३॥
मुक्ता भक्ति दावी स्वपदी । मिळवुनि प्रेम मना ॥ बाई गे वर्णू ॥४॥
काम नसोनी राम म्हणावें । कृष्ण शक्ति स्मरणा ॥ बाई गे वर्णू ॥५॥
ज्ञानेश्वरकृष्णैक्य मानुनी । गेली भवभ्रमणा ॥ बाई गे वर्णू ॥६॥

पार्थ-कृष्ण संवाद

४४३ / दिंडी : भगवदुपदेश

म्हणोनीया हे कुंतिसुता ऐक । सर्व धर्म टाकूनि मीच एक ॥
धरोनीयां मनि शरण मला येईं । शोक सांडीं होईल सर्व कांही ॥१॥



४४४

सर्वभूती ईश्वर नांदताहे । हृदयीं तो चैतन्यरूप पाहे ॥
सर्वभूतां लावुनी यंत्र माया । जीव कर्मीं भ्रमवीत पार्थराया ॥२॥

४४५

तयालागीं सद्भक्ति शरण जाईं । सर्व भावें आत्माहि पदीं वाहीं ॥
मग त्याच्या प्रसादबळें शांती । पावुनीयां लाहसी ब्रह्मकांती ॥३॥

४४६

क्षितिपालवृत्त. मूळ-धनासरी ता.-धुमाळी. गौण.-'विद्याभ्यास करा मुलानों' या चालीवर.

कोण असा भुवरी । ज्याला नावडता नृहरी ॥धृ०॥
नास्तिक म्हणती दाविल कुणि तरी । पाहुंचि नयनभरी ॥१॥
जीवन्मुक्त असोनि शुकादिक । गाती कीर्ति खरी ॥२॥
संसृति दावानल दग्धजना । औषधि नच दुसरी ॥३॥
यल्लीला श्रोतृवृंदचित्ता । आकर्षणचि करी ॥४॥
उत्तम श्लोक गुणानुरंजनी । कोण न रमत परी ॥५॥ (य९उ.८६)
पशु तोही निजभोजनकामी । स्वामी वचन वरी ॥६॥
म्हणुनी सज्जनहो मज सांगा । हरिलीला ही बरी ॥७॥
अलकावतिपति करुणायोगें । हृदया प्रेम वरी ॥८॥

४४७

विशाखावृत्त. रा.-यमन. ता.-तेताला.

आम्हा तो एक आवडता ॥धृ०॥
गोपीवेष्टित चिद्घनमूर्ति । सावरि भविं बुडता ॥१॥
रिद्धिसिद्धि जळोत अवघ्या । ज्याहि विषयजडता ॥२॥
ज्याच्या ध्यानीं लंपट होतां । न दिसे चिज्जडता ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणेनें जो । हृत्सदन उघडता ॥४॥

४४८ / आर्या

प्राणप्रीय मुखांतुनि घेतां तांबूल सौख्य जें वाटे ।
त्यांतिल शतांश नाहीं जातां योगें विमुक्तिच्या वाटे ॥१॥

४४९ / दिंडी

भक्ति वैराग्य ज्ञान कृष्णप्राप्ति । एककाळी या चतुष्काचि व्याप्ती ।
जेविं जेवीतांक्षणीं क्षुधाशांती । तुष्टि पुष्टि आणीक अंगकांती ॥१॥

४५० / भगवद्वाक्य

शैव ईतें बोलती महाशक्ति । आम्हि बोलूं आपली प्रेमभक्ति ॥
ज्ञानियांची ही ब्रह्मीं पूर्ण मुक्ति । शुद्ध शिष्याही श्रेष्ठ सद्गुरूक्ति ॥१॥

४५१ / हिंदी

रमावृत्त - रा.-भूप ता. राजविद्याधर (तेताला)

मैं तो श्यामल गवनि भई ॥धृ॥
कोमल वदनकमल नयनकमल । चरनहि चित्त दई ॥मै तो ॥१॥
देखत देखत संसृति छूटी । सुनिगमवचनगही ॥ मै तो ॥२॥
अलकावतिपतिनंदिनि जानी । मुरहर अंक लई ॥ मै तो ॥३॥

४५२ / हिंदी



सिंधुजावृत्त- रा.-काफी ता.-तेताला

मोहन श्याम हमारा ॥धृ०॥
जमुनाजलबिच कूदि डारिके कालिय फणिवर मारा ॥१॥ (य९उ.८७)
गोपबाल जब अघनें खाये । तब बिख दृष्टि उतारा ॥२॥
अलकावतिपतिसुताकर । प्रेमजादु मह डारा ॥३॥

४५३ / हिंदी

सुशीलावृत्त - रा.-यमन - ता.-तेताला.

मोहे हरि चरणोंकी प्रीत ॥धृ०॥
और कछूभी नहीं जानति हूं । जोगजागकी रीत । मोहे हरि० ॥१॥
तज तज तनु लें नव जनमनको । गावोंगी हरिगीत ॥ मोहे हरि० ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या हरिसेवा । करन चाहती नीत ॥ मोहे हरि० ॥३॥

४५४ / आर्या

विषयत्यागीच पुरे शुकप्रभृती शीर्ष कळस संतांचे ।
परि मज नवलचि वाटे ते वर्णिति विषय गोपिकान्ताचे ॥१॥

४५५

विषयद्वेषचि घडला तो मानुनि क्लेश ते शुकादिमुनी ।
वर्णिति काय हरीचे विषयचि सद्भाव तत्पदा नमुनी ॥२॥

४५६ / हिंदी

रसालावृत्त - राग- यमनकल्याण ता.-तेताला.

मोहे जदुनाथजीकी प्रीत लागी ॥धृ॥



नारीनर नयन न नहीं दिखत । ब्रह्मरूपमों जागी ॥१॥
तीन लोक अब सपनसमहि है । मायारूपबिभागी ॥२॥
ज्ञानेश्वरगुरुचरन शीस यह । सखी भई अनुरागी ॥३॥

४५७ / हिंदी

कर्पूरिकावृत्त - रा.- गौडसारंग - ता. तेताला

मोहन प्राणसों प्यारा है ॥धृ॥
प्राण देहबुद्धिको बढावे । मोहन देहसो न्यारा है ॥१॥
प्राण बिचारा फिरे अचेतन । मोहन चेतन सारा है ॥२॥
प्राणनकूं तो भूकप्यास बडी । मोहन तृप्त सदा रहै ॥३॥
प्राण तो मायारूप बन्यो शठ । मोहन मोहबिदारा है ॥४॥
जननमरणका प्राणके माथे । नीत धराहि पसारा है ॥५॥
अलकावतिपतिकृपा बिलोकन । मोहन व्यापक सारा है ॥६॥ (य९उ..८८)

४५८

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ - जोगी. ताल-तेताला गौणपीठ- ''पहा पहा सावळा'' या चालीवर

कष्ट झाले फारसे मायबापा । ज्याला त्याला दाविसी मार्ग सोपा ।
हात उभारिसि करोनियां कृपा । केला मोकळा ब्रह्मानंद सोपा ॥धृ॥
मेल्या जीवाचें कैसें जीवपण । वेदादिकीं निवटे न अझून ।
माझा स्वामी श्रमतो रात्रंदीन । हाका ऐकोनी किटाळले कान ॥१॥
आतां सोडा या आळंदीची पाठ । माझें वसवा सुखानें हृदयपीठ ।
प्रेमभावें मी वागवीन नीट । ज्ञानेश्वरनामीं न धरुनी वीट ॥२॥

४५९ श्लोक

उपाधीबळें या जिवा संसृती ही । उपाधी निवारा म्हणे की श्रुती ही ।
उपाधी न हा ज्ञानयोगें विनाशे । गळे तेधवां भक्ति जेव्हां विकाशे ॥१॥

४६०

सुशीलावृत्त. राग-छायानट. ताल-तेताला.

आज मी नवल देखिलें माय ॥धृ०॥
श्रीसद्गुरुचा शब्द ऐकतां । निवटती चारही काय ॥१॥
आंगें मी बह्म होउनी पुजिं । हृदयी गोपिपतिपाय ॥२॥
डोळे भरुनी रूप पाहातां । गेली संसृति हाय ॥३॥
आठवुनी उपकार स्मरतें । ज्ञानेश्वरगुरु माय ॥४॥

### ४६१ / हिंदी

विशाखावृत्त. रा-भूप. ताल- तेताला.

माई मैं सबदिन अमर भई ॥धृ॥
सद्गुरुवचनामृतका प्याला । पीवत हृदय लही ॥१॥
श्यामसुंदर तनु नयना दीखत । मनमों शांत भई ॥२॥
जनममरण सब छोर दिया अब । ज्ञानेशपद रही ॥३॥

### ४६२

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ-भूप. ताल.-तेताला. गौणपीठ-''पहा पहा सावळा'' या चालीवर

तो हा देखीयला डोळा । चिन्मय घनसांवळा । (य९उ.८९)
नाहीं सोवळा ओवळा । चित्तीं जाणे विश्वकळवळा ॥१॥
दृष्टि दृष्टीत मुराली । नूतन दृष्टी उदयली ।
तंव भूतीं समता आली । जीवेश्वर ऐक्यता झाली ॥२॥
मन मोहिले पाहतां । अंतर्बाह्य व्यापिलें सर्व आतां ।
मीतूंपण भ्रांतीने ओळखतां । उज्वळ दृष्टी जाहाली एक ध्यातां ॥३॥
डोळां भरोनी एक निवारिले । देखतांची हे दृश्य मावळले ।
ज्ञानेश्वरनांवे चित्त भरले । ज्ञानेश्वरची सर्वभावें झालें ॥४॥

### ४६३

वात्सल्य-माधूर्य-मिश्रण.

ओवी - आजपासोनी श्रीकृष्णा । नको मागूं यशोदास्तना ।
मी आपुला प्रेमपान्हा । मनमोहना पाजितें ॥

०००

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# वेदान्तपर पदे

### ४६४

लावणीवृत्त. मूळ.-जोगी. ता.-धुमाळी. गौण- ''विठाबा शिणले आळवितां '' या चालीवर

जरि तूं मुक्त शिष्यराया ।
तरि करि कर्मा सुव्यवस्थिता जग संग्रह चालाया ॥धृ॥
ज्ञानिया आग्रह तंव नाही । तूं अभिमाने म्हणसी नच मी कर्म करी कांही ॥
प्रकृति विश्वाची आई । करवीलचि ऐसा निश्चय मनी दृढ धरुनी राही ॥



व्यर्थ कां कष्टविसी काया ॥ तरि करि कर्मा०॥१॥
अरे, हा स्वभावची ऐसा । ज्याच्यायोगे प्राप्त तुला निजवर्ण देहवळसा ।
तया सोडूं इच्छिसि सहसा । करसीलचि परि मिथ्यामोहे हा तव हठधिंवसा ।
बा, ही अवघड हरिमाया ॥ तरि करि कर्मा०॥२॥ (य९उ.९०)
बा, तूं ब्रह्मनिष्ठ जेव्हां । विश्वभावना मात्र पाहता ईश्वरही तेव्हां ॥
आश्रवुनी करुणागुणठेवा । द्याया निजसुख चालवि सत्पथिं स्वांशोद्गम जीवा।
विश्व अविरोधिच परठाया ॥ तरि करि कर्मा०॥३॥
शिकवी ज्ञानेश्वर आई । चरमतया निज धर्म आचरुनि हरिचरणी वाही ॥
मग तुज बंधनची नाही । लीलामात्रचि भेद पाहुनी नित्यतृप्ति लाही ॥
प्रेमभर भज सद्गुरुपाया ॥ तरि करि कर्मा०॥४॥

### ४६५ / दिंडी

पूसिली त्वां विष्णुची महामाया । तुझें गेलें तें पूसणेंचि वायां ।
जसी आंगी आपुल्या असे छाया । तशी मिथ्या ब्रह्मीहि मूळमाया ॥१॥

### ४६६

सद्गुरूचा मस्तकीं हस्त नाहीं । शब्दमात्रे स्वप्नीहि मोक्ष नाही ।
विना स्वामी शृंगार जसा खोटा । तसा आचार्याविना ज्ञानि गोटा ॥२॥

### ४६७

असे देव व्यापिला सर्व देशी । परी तूंची भाससी महादोषी ।
जही वाढे भावना नाथपायी । कळे तेव्हां आत्माचि देव देही ॥३॥

### ४६८

प्रीति व्हावी ज्या रीति कृष्णपायी । तसी आचार्यचरणिं भक्ति पाही ।
तयालागी अन्वयज्ञान भासे । विष्णुरूपीं विश्वचि हे विकासे ॥४॥

### ४६९

निर्गुणाचा आनंद रुक्ष ज्याला । कृष्णभजनाचा अधिकार त्याला ।
श्याममूर्ती अंभोजलोचनाची । तया चित्तीं राहोनि सतत नाची ॥५॥

<u>वसिष्ठांचा रामाला उपदेश</u>

### ४७० / वसिष्ठवचन

विचालना नटिनी भेद. राग.-परज. ता.-तेताला. (राजविद्याधर)

जें विश्व दिसे ती माया रे । विज्ञानें त्यजिं रघुराया रे ॥ जें विश्व०॥धृ॥
शुष्कस्थळिं मृगघनछाया रे । किंवा वंध्यासुतजाया रे ॥१॥
तैसें चिद्रूपिं जडा, या रे । कल्पुनि मोहि मूढा या ॥२॥

जे काममद्य बहु प्याले रे । ते हिनें लयाला नेले रे ॥३॥
साधन इसि हें माराया रे । प्रेमें स्मर निज माराया ॥४॥
आत्मा न गणावी काया रे । चिंतुनि विठ्ठलसुतपाया रे ॥५॥ (य९उ.९१)

४७१ / वसिष्ठवचन

सामकामदा. मूळ.- काफी. ता.-दादरा. गौण-''सोडुनि मसि रामराय''

हे राम घे विराम इंद्रजाल जाणुनी ।
द्रष्टृ-दृश्य भेद उगा वरिसि नेणुनी ॥ हे राम० ॥धृ॥
सत्चित्सुख ओळखुनी विश्वअन्यता । पाहुनिया जीत साधि बंधशून्यता ॥१॥
मायाकृत कट-व्याल-दाम हे तिन्ही । साच जाहले तसी जगद्वराननी ॥२॥
भूतचित्त त्यागुनी चिदंबरी मिळे । ज्ञानोत्तरभक्तिं भोगिं कृष्णसोहळे ॥३॥
ज्ञानेश्वरतातनाथ तो जनांप्रति । बोध तुला त्याचिच ही सर्व ही कृती ॥४॥

४७२ / वसिष्ठवचन

विचालना (नटिनीभेद) रा.-परज. ता. -राजविद्याधर (तेताला)

मनि येइल तें त्यज रामा रे । नित होउनि राहि रिकामा रे ॥धृ॥
नरजन्म सार्थका झटणें । यमकिंकरकरिहुनि सुटणें ॥१॥
ही डाकिणि केवळ भामा रे । परि कामि-नराप्रति रामा रे ॥२॥
गुरुसंगति तूं आज केली रे । तरि सांडीं इंद्रियकेली रे ॥३॥
मिठि विठ्ठलसुतचरणानां ते । घालुनि रोधीं करणांतें ॥४॥ मनि येइल०

४७३ / ॐ कारसाधना / आधपद

दंत दंता मिळवुनी । नको बोलूं मिथ्या वाणी ॥१॥
कर करानें पिडोनी । रोधीं इंद्रिय ते दोन्ही ॥२॥
आधीं करोनी रेचक । घेइं अकाराचें सुख ॥३॥
उकार विष्णु देख । ध्यायीं करितां पूरक ॥४॥
ध्यायीं प्राण आणतां । मकार कुंभावरता ।
सुषुम्नेचा मार्ग रिता । करोनी हो ब्रह्मभरिता ॥५॥
अर्धमात्रा तूर्याराणी । सोहं गर्जे परा वाणी ॥६॥
जेथ माया अविद्या शिराणी । तेथ मिळे जैसें जळिं पाणी ॥७॥
मन उठल जेव्हां जेव्हां । आत्म्यावरी नेईं तेव्हां ॥८॥
मग पावोनी ब्रह्मभावा । प्रेमें करीं ज्ञानेश्वरसेवा ॥९॥ (य९उ.९२)

४७४ / योगवासिष्ठाचा सारांश

(अभंग)''वैराग्य'' तें सर्व इंद्रियांचा रोध । ''मुमुक्षुता'' शुद्ध इच्छा मनीं


॥१॥
''उत्पत्ती'' ते मनीं जगाची कल्पना । दृश्य ती कलना ''स्थिती'' ऐसी ॥२॥
सप्त भूमिकेनें मनाचा जो लय । ''उपशम'' होय त्याचि नांव ॥३॥
आत्मपदीं नाहीं कदाही चळण । या नांव ''निर्वाण'' बोलिजे कां ॥४॥
योगवासिष्ठाचा काढिला सारांश । वसिष्ठें रामास बोधिलें जें ॥५॥
ज्ञानेश्वरकृपा साम्राज्याची दात्री । सदा प्रेमसूत्रीं बांधो मज ॥६॥

॥ योगवासिष्ठाचा सारांश समाप्त ॥

## ॥ स्फुट निरूपण ॥

गुरु-शिष्य संवाद

४७५ / श्लोक

तैं बोलती सद्गुरु शिष्यराया । केले कसें साधन सांग याया ।
ऐकूनि ऐशा गुरुवाक्ययोगा । येरु वदे इच्छुनि संतसंगा ॥

४७६

केले बहु सन्मय इष्टियज्ञ । नाही परी मी परिपूर्ण प्राज्ञ ।
दाने तपें तीर्थव्रतें अनंतें । केलीं परी चित्त न सोडि ध्वान्तें ॥

४७७ / आर्या

लावुनि सगुणी अगुणी मन केल्या बहु उपासना देवा ।
परि ऐसें दिसलें मज कीं भजत्याचीच आवडी देवा ॥

४७८ / आर्या

न भजे त्याप्रति कोणी न पुसे ऐसीच देवलोकांत ।
रीती म्हणुनि वाटे मज मोक्षार्थी नरास आकांत ॥

४७९

कर्मे जंव जंव केलीं तंव तंव करितीच कर्तृबंधन की ।
यास्तव सोडुनि सर्वहि भावें तुमच्या पदास वंदन कीं ॥१॥

४८० / श्लोक

ऐकूनि ऐसी निजशिष्यवाणी । संतुष्ट होऊनि विमुक्तिदानी ॥
ठेवूनियां हात कृपार्द्र माथां । तैं बोलती सावध शिष्यनाथा ॥

४८१

संसार तापानळ ज्यांस जाळी । कैसी तयां मुक्तिहि कर्मजाळी ॥
संसारसौख्याश्रित सर्व कर्मे । तीं बापुडीं नेणति मोक्षवर्मे ॥

४८२

वेदोक्त कर्मास करुनि आधीं । झाली तुला ही अपवर्गबुद्धि ॥
आतां सुखें कर्मचि कृष्णिं वाहीं । पाहें विवेकें परमेश देहीं ॥(य९उ.९३)

४८३

दहरोपासना आणि भक्ति

लावणीवृत्त. मूळ.-पूर्वी. गौण.-तA- धुमाळी. ''नरजन्मामधि''

कर्तृबुद्धि जोवरि तोवरि या कर्मा आश्रय पुरा ।
अन्यथा कोण पुसेA पामरा ॥धृ०॥
कर्तृबुद्धिचा देहबळानें चित्ति आरोपचि खरा ।
म्हणुनि तूं रीघ दहर अंतरा ॥१॥
हृदयोपासक होता मग आवडसिल परमेश्वरा ।
सृजिल तो करुणेच्या पाझरा ॥२॥
ते पिउनी प्रेमामृत मग तूं सेवी शांतीनिरा ।
जाउनी उन्मनिच्या मंदिरा ॥३॥
<u>तेथे घेउनि निद्रासुख मग उलटुनि पाहसिल जरा ।</u>
<u>आपणा देखसि या जगिं पुरा ॥४॥</u>
सर्वहि भूते ब्रह्म सनातन नयनी पाहुनि बरा ।
निवसि मग सर्वांगे साजिरा ॥५॥
<u>विस्मरणमिसे स्मरणचि साचे ऐसा अनुभव खरा ।</u>
पावता जाइल षडरीकुरा ॥६॥
मग तुजलागी एकचि उरले जाण सुता सुंदरा ।
अखंड स्मरणें ज्ञानेश्वरा ॥७॥ कर्तृबुद्धि०

४८४ / अभंग

ऐसें गुरुराज बोलतां सुंदर । शिष्य नेत्रा नीर स्वानंदाचे ॥१॥
करूं पाहे देवपायां अभिषेक । अनुभवसुख इच्छी स्वयें ॥२॥
सकळ कर्माच्या तुटल्या शृंखळा । जाहला वेगळा संसाराच्या ॥३॥
शोक सांवरोनी मग जोडि कर । राहिला समोर प्रेमें उभा ॥४॥
म्हणे स्वामी वाक्यें आपुलीं दुर्घट । न कळेचि स्पष्ट अर्थ याचा ॥५॥
जयायोगें मज येईल प्रतीती । ज्ञानेश्वरमूर्ति कृपा करा ॥६॥

४८५ / श्रीगुरुरुवाच-

पद. सुशीलावृत्त. रा.-जोगी. ता.-तेताला.

बाळा जग आनंद स्वरूप ॥धृ॥



आनंदातुनि जगदुत्पत्ति । आनंद स्थितिरूप ॥ बाळा०॥१॥
आनंदातचि लय विश्वाचा । मूल आनंद अमूप ॥ बाळा०॥२॥
त्याची तूं जिज्ञासा करिं बा । सांडुनि संसृतिकूप ॥ बाळा०॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु ऐसें वदतां । शिष्या सत्व अमूप ॥ बाळा०॥४॥

४८६ / व्यापक अनुभव / हिंदी

सुशीलावृत्त. रा.-मंजरी. ता.-तेताला.- (राजविद्याधर)

घटघट व्यापक रूप ॥ मेरो ॥धृ०॥
ब्रह्मा विष्णु शंकर ये सब । मम माया अनुरूप ॥१॥ मेरो०(य९उ.९४)
वादविवाद जहां नहि पावत । तटस्थ निगमभूप ॥ मेरो०॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुचरण कृपातें । गई छाया अरु धूप ॥ मेरो०॥३॥

४८७

श्रीमतीवृत्त. रा.-धनासरी. ता.-राजविद्याधर (तेताला)

मी सदाचाचि निष्काम ॥धृ॥
करिती जे सत्कर्मे नाना । त्यांचा पुरवीं काम ॥ मी सदा ॥१॥
उपासक जे भक्त म्हणविती । ते जपती मम नाम ॥ मी सदा ॥२॥
वेदशास्त्रपुराण वर्णिती । मन्मायामय धाम ॥ मी सदा ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु मीच स्वयें तरि । कवणा करूं प्रणाम ॥ मी सदा ॥४॥

४८८

इंदिरावृत्त. रा.-यमन. ता.-तेताला.

मी कोणि कसा नच पाही ॥धृ॥
मजसी आतां वाद कराया । निगमहि समर्थ नाहीं ॥ मी कोणि ॥१॥
मजला देखाया या सृष्टि । दृष्ट्युद्भवची नाहीं ॥ मी कोणि ॥२॥
ब्राह्मणांत मी ब्रह्मनिष्ठ कीं । नीचीं नीच अति राहीं ॥ मी कोणि ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु कृपा वर्णितां । माझें मीपण नाहीं ॥ मी कोणि ॥४॥

४८९ / शिष्यप्रार्थना-

पद. सुशीलावृत्त रा.-मंजरी. ता.-तेताला

स्वामी तुम्ही आत्माराम ॥धृ॥
तुमचें सुख तुम्ही भोगितसां कीं । मी तों दुःखि सकाम ॥ स्वामी ॥१॥
तुमच्या स्वरूपा व्याप्ति असे तरि । उणें कां मद्धाम ॥ स्वामी ॥२॥
वदवेना मज वचन पुढें जी । म्हणुनी करीं प्रणाम ॥ स्वामी ॥३॥

ज्ञानेश्वरसुत जोडुनियां कर । विनवी प्रेमद धाम ॥ स्वामी ॥४॥

४९० / श्लोक / श्रीगुरुरुवाच-

करी जेधवां शोक अत्यंत तान्हें । तदा बागुला कल्पुनी माउलीनें ॥
उगें बाळ कीजे जया पद्धतीनें । तुला सांगतों ज्ञान मी त्या रितीनें ॥१॥
स्वरूपीं न अज्ञानसंपर्क तो ही । परी भासते रोहिणी जेवि कांहीं ।
तसा भास अध्यास हें विश्व पाहीं । तया सोडुनी तूंचि तूं देव होई ॥२॥
जया रज्जुसर्पाकृति भ्रांतिसंगें । तया भीति ते मंदबुद्धी निजांगे ॥ (य९उ.९५)
तसें संसृती पाहुनी मूढ भीती । परब्रह्मवेत्त्या न कांहींच खंती ॥३॥

४९१ / आर्या

मृगजल मृगासि भुलवी परि नर पाहोनि भ्रांतिच्याहि बळे ।
धाव न घेती तेवीं बद्धा भव मुक्त अंतरा न वळे ॥१॥

४९२

बागुलमरणा ऐकुनि बाळा संतोष ना न थोरनरा ।
तैसा ब्रह्मसुखीया नाहीं बंधापवर्गभाव खरा ॥

४९३

परि तूं बाळचि माझा म्हणुनि बागूल कल्पुनी आतां ।
मरणोपाय तयाचा कथितों भावें धरीं हृदयिं ताता ॥

४९४

ओवी :- अनादि भावरूप अज्ञान । कार्यानुमेयाऽनिर्वाच्य जाण ॥
त्रिगुणात्मक बद्धक म्हणोन । माया, प्रकृति, अविद्यादि तन्नावें ॥१॥

४९५ दिंडी / शिष्य उवाच : -

निष्कलंक ब्रह्म हें गुरुनाथा । नाहिं ज्याला कर चरण पोट माथा ॥
स्वसंवेद्य सर्वदा एकरूप । त्यात कैंचा अज्ञान अंधकूप ॥१॥

४९६

श्रौत तर्काश्रय करूनियां देवा । मला स्वामी परमात्मबोध द्यावा ॥
अन्यथा या निष्फळ युक्ति साऱ्या । दाखवीती ज्या शुष्क भवपसाऱ्या ॥

४९७ / हिंदी साकी / श्रीगुरुरुवाच -

सुन सुन बेटा परब्रह्ममों मायावस्तु न पावे ।
परंतु मृगजल सूरजमाही जैसा भास लखावे ॥१॥

४९८



तैसी माया परब्रह्ममो मिथ्याज्ञान मिलाई ।
सत मिथ्याको प्रतीभास परमार्थविरोध भी नाहीं ॥२॥

४९९ / चौपाई

चक्षुतेज सूर्यांशहि जानो । मृगसंबंधविशेष बखानों ॥
तातें भ्रम मृगनयन न होई । मायाबंध मूढहिय होई ॥

५०० / ओवी

सद्गुरुज्ञानेश्वरचरणीं । तनमनधनप्रेमें करुनी ॥
अध्यायसहित समर्पुनी । ज्ञानेश्वरचरणीं चीर पावूं ॥१॥ (य९उ.९६)

५०१ / तत्त्वमसि

कमलारंगीवृत्त. रा.-मांझी. ता. - तेताला

भेद न कांहि हरी ॥धृ०॥
तत्पद पति तूं मज आहेसी । त्वंपद पत्नि खरी ॥१॥
ज्ञानेश्वरपदिं ऐक्य कराया । असिपदभाव धरीं ॥२॥ भेद०

॥ अपूर्ण ॥

राम-वसिष्ठ संवाद

५०२ / कटाव

नेणुनी रूप या हरिचे । जल्पति जन नानापरिचे ॥धृ॥
रज्जुसर्प नसुनी ये भानीं । विश्व तयापरि असत्य मानी ।
यापरि माध्यमीक अभिमानी । असत्ख्याति ते मुख्य मानुनी ।
भ्रम उपपादिति एका करणीं । अन्य क्षणिकवादि विज्ञानी ।
आत्मख्याति मुख्य मानुनी । म्हणति रज्जुफणि बुद्धिपासुनी ।
बुद्धिमुळें जग हें स्वस्थानीं । व्यर्थ ख्याती अशा मानुनी ॥
बुद्ध जाहले वेद दुरीचे ॥१॥
नेणुनी रूप या हरिचे । जल्पति जन नानापरिचे ०
बुद्धीपासुनी सर्पचि भासे । तरि मग जेथ जेथ बुद्धि असे ।
त्या त्या स्थळिं सर्पभ्रम न दिसे । म्हणुनी बुद्धि कारणचि नसे ।
असत्य तरि वंध्यासुत न दिसे । या कारणें एक सिद्ध असे ।
अन्य स्थळिं पाहणें फणि जसें । रज्जुवरी तो भ्रमेंचि विलसें ।
अघटित संस्काराचेंचि पिसें ।
ख्याति अन्यथाप्रमाण मानुनि । नैय्यायिक ते तर्क करोनी ।

अन्यमता स्वबळें संहरूनी ।
मानिति जग तें यथार्थ साचें । रज्जुफणिसम अन्यभ्रमाचें ।
जगत् सत्यची मानुनि वाचे । जल्पन करिती बहु तर्काचें ।
इतरां म्हणती वादवितंड । खंडण मंडण करुनी बंड ।
उभारिती ते अति प्रचंड ॥ तेणें भ्रमुनी करिती अणु निजघरिचे ॥२॥
नेणुनी रूप या हरिचे । जल्पति जन नानापरिचे ।
मध्यें मध्यें पाणि ज्यापरी । किंवा बीजीं अंकुर कुसरी ।
सामान्यत्वें वसे परोपरि । तैसी प्रकृति विश्वाकारी । सामान्यस्वरुपें निर्धारीं ।
रज्जु इदंसामान्य प्रकाशे । सर्परूप हें विशेष भासे ।
स्मृति उमटे परि अविवेक असे । या नांवचि आख्याती उमसे ।
इदंशब्दवाच्य तसें जाणा । प्रधान तें अव्यक्तचि माना ।
त्या पासुनियां कर्षण भाना । जना होत भ्रम विश्वचि नाना ।
अविवेकचि त्या कारण जाणा । याप्रति वेदान्ताहि समाना ।
यापरि युक्तिहीन या चारी । ख्याती वदल्या बहुत प्रकारीं ।
आतां पंचमि ख्याति सुंदरी । अनिर्वाच्य माया निर्धारी । (य९उ.९७)
वदवेना जे बहुताकारी । तें बोलिजे छंद अनिवारी ।
ज्ञानेश्वरप्रभु मतें निवारी । शिष्या देउनि ठाव कृपापरिचे ॥३॥ नेणुनी रूप०

५०३ / अभंग

दृष्टिसृष्टि वाद

स्वप्नासम जग नव्हे स्मृतिरूप । ऐसें मुनिभूप सांगताती ॥१॥
सामग्रीरहित जयांची उत्पत्ति । मिथ्या तयाप्रति संज्ञा असे ॥२॥
मायबापावीण पुढें हत्ति उभा । दिसत प्रगल्भा स्वप्नीं जैसा ॥३॥
तैसेंची हें जग क्रमावीण पाहीं । लयासाठी सोई उत्पत्तीची ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभु जाणुनि हा अर्थ । केला तो कृतार्थ शिष्य तेव्हां ॥५॥

५०४ / ओवी

यापरी सद्गुरुवचना । ऐकूनियां शिष्यराणा ।
पुढती कर जोडोनि प्रार्थना । सद्गुरुचरणा करीतसे ॥१॥
जय जय श्रीगुरुसमर्था । जय सच्चिदानंदा भगवंता ।
जय वेदविहित वेदात्मका अनंता । वेदस्वरूपा वेदगुह्या ॥२॥

५०५ / हिंदी / साकी



वचन सून शिष्यको गुरू जब कहते अमृत बाणी ।
भक्ति हरिकी दोख मिटावत यहि संतनकी बाणी ॥१॥

५०६ / हिंदी

सांख्य योग वेदान्त शास्त्रा सब भक्ति साह्यकरि आवे ।
सांख्य जीवको भिन्न करत है योग ईश्वर गावे ॥२॥

५०७ / हिंदी

पतिपत्नी को भेद न राखे वेदान्तकि ये रीति ।
तीनों मिलीके प्राप्त करो तुम कृष्णचरणमों प्रीति ॥३॥

०००

*गद्य - हे भगवन् सांख्य शास्त्रांत जीव आणि देह भिन्न प्रतीत होतात. योगशास्त्रानें जीवाहून विलक्षण ईश्वर आहे असें सांगितलें आहे. आणि वेदान्तशास्त्रांत ईश्वर पती व जीव पत्नी हे दोन्ही ही भिन्न नाहींत असे सांगितले आहे, या तिहींचा समन्वय भक्तींत कसा होतो ?*

५०९

सामनुष्टुप. मूळ-जोगी. ता.-तेताल. गौण.-कोठें नच जावें.

भलतें वदसि गड्या । तूं घालुनि भवफुगड्या ॥ भलतें वदसि०॥धृ॥
देहसहित हरिभक्ती करितां । फिटती मृत्युघड्या ॥ भलते वदसि०॥१॥
जीव वेगळा करुनि भक्तितें । करितो नित सुगड्या ॥ भलते वदसि०॥२॥
श्रुतियुक्ती अनुभव हा साधुनि । त्यज मायालुगड्या ॥ भलतें वदसिं०॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुस्मरण करीतां । येती अमृतघड्या ॥ भलते वदसि०॥४॥

५१० / कटाव

कथितों तें सावधान ऐकी । संशय मनिंचा सकलहि टाकीं ।
जे जें दिसतें नयनमना कीं । या लोकीं आणिक वर नाकीं ।
त्यांची नाशिवंत रचना की । षडरिपुची वेसण यन्त्राकीं ।
त्यां अधिकार कोटि जनि ना कीं ।
म्हणुनि गड्या हें ऐकें सुखकर । भरभर संसर ।
नर होउनि तूं व्यर्थ न मर । हरिलागीं स्मर । हरपेल स्मर ।
भवसागर तर । करणी असि कर । दे हरिकरिं कर ।
श्रीगुरुचा वर ॥ पावुनि ज्ञानेश्वर म्हण रे ॥
भवभंग करीं श्रीरंग लावुनी मन रे ॥ वाणितील तुज मुनिजन रे ॥१॥

५११ / कटाव

सांख्य विवेचन

अद सांख्य-योग-वेदान्त-रसामृतकाला ॥
तूं विसरूं नको रे अन्वय-व्यतिरेकाला ॥धृ॥
सांख्य शास्त्र संपूर्ण असे कीं । ज्याप्रति पावुननि शोक न शेखीं ।
संख्ये जे अति पंचविशे की । जेथ आटती कर्महि शेखी ।
ती स्मृति अतिसुंदर । जी स्थळि ज्ञानेश्वर ।
निरूपण पूर्ण मनोहर । ध्याति सर्वदा ब्रह्माविष्णुहर ।
कपिलकथित आसुरिला त्याचा प्राकृतार्थ केला ॥ तूं विसरुं ॥१॥
करुनी जडचैतन्यविवेका । निश्चय धरिं श्रीहरिपदिं एका ।
गोपिमंडळी साह्य होइ का । हरिचें प्रेमदास्य करिं फुका ।
म्हणे मुखानें कृष्णराम । मग हरत षडरिचें नाम । नुरवि हरिनाम ।
करिल निष्काम । पुरुष निजधाम । द्वारपालाला ॥ तूं विसरूं नको रे ॥१॥
सत्वरजस्तम द्रव्यें तीन्ही । येति न वैशेषिकोक्तगुणी ।
परि हे तुजला आत्मबंधनीं । प्रधानगुण बोलिजेति म्हणुनी ।
एरव्हिं सर्वहि द्रव्यें जाणा । संयोगविभागें अनुमाना ।
त्या मी ऐसें मानुनि स्मरणा । करुनी तिही सामान्य करणा ।
समाना याना अधिकरणा । विषम अवस्थाप्रकृति जेव्हा ।
उपजति बुद्धि अहंकृति तेव्हां ।
पुढें विकार उपजती षोडश । असंग सच्चिदानंद पुरुष ।
जाण तत्त्व हे पंचवीस तूं । (य९उ.९९)
विवेक करिं ओळखूनि सांख्याला ॥ अद ० ॥३॥
विकार ते प्रत्यक्ष भासती । प्रधानाचि अनुमानीं वसती ।
पुरुष सदा अपरोक्षचि भासे । परोक्ष स्वर्गादीक विकासे ।
दृश्य जें तें सकल विनाशे । म्हणुनी पुरुषीं ध्यान प्रकाशे ।
ज्ञानेश्वर पद तें न विनाशे । म्हणुनी तत्पदिं अतिउल्हासे ।
शरण जाउं चल भक्तिविलासें । सांडुनि दे भवभयकलंकाला ॥ अद०॥४॥

५१२ / कटाव

साधना

सांडुनियां स्त्रीसुतगोवी । तूं नित्यचि प्रभुला सेवी ॥धृ॥
जाणायास परब्रह्मातें । संग्रहिं ठेवीं शाब्दिप्रमा ते ।
आश्रवूनि वैदिक धर्मातें । आचरिं वर्णाश्रम कर्मातें ।



संतमुखें जाणुनि वर्मातें । लोटांगणि जा श्रुतिवरमाते ।
भेदुनि विषयांच्या मर्मातें । फेडी चट शारीरभ्रमातें ।
योगसमाधि साधुनि बा ते । धारण करी ब्रह्मनांवातें ।
उसळुं नको संचितादि वातें । सुखें भोगिं प्रारब्धांगाते ।
सेवुनि अंतरि श्रीरंगातें । सोडी सर्वहि इंद्रियनातें ।
अंतीं सहाय होतिच ना ते । करिती जे तुज पूर्ण सनाथे ।
वंदि नाथ ते संधि साधुनी । देहबुद्धिची जाळूनि धुनि ।
मन ओवाळुनि सद्गुरुचरणीं ॥ मधुर तद्वचन जेवीं ॥ सांडुनियां०॥१॥
नीलकंठ बोलिले भारती । टीका करितां सुखाकार ती ।
शुद्धशबलसूत्र विराडोक्ति । विष्णु पांचवा चतुर्भुजाकृति ।
पंचेश्वर पुरुष हे श्रौती । संसृति नाशावयास कीर्ती ।
यांचि गाइजे सदासर्वदा, सांडूनि धंदा, मानुनि मांडुक्योपनिषदा ।
ॐकार चतुष्पाद आत्मा । परमात्मा तो नव्हेचि यद्भिन्न प्रत्यगात्मा ।
चिदन्य कोठें नाहिं अनात्मा । म्हणुनि एकचि जाणुनि परिमा ।
सांडीं सर्वहि वृत्तिगरिमा । विरोधपर वैराग्य संहरीं ।
सकळहि विषया सांडुनी दुरी । ध्यान योगें वृत्ति सावरीं ।
ज्ञानेशचरणीं शिर ठेवीं ॥ सांडुनियां ०॥२॥

गुरुशिष्य संवाद समाप्त

(अपूर्ण)

५१३

सुशीलावृत्त. राग.-मुलतानी. ता.-तेताला.

आधीं होई सनातनरूप ॥धृ॥ (य९उ.१००)
तत्पद ईश्वर सच्चित्सुखघन । त्वंपद जीवसरूप ॥ आधीं होई ॥१॥
तत्त्वंपदिचें लक्ष्य साधुनी । असिपद पाव अमूप ॥ आधी होई ॥२॥
जीवब्रह्म हे एक झालिया । सेविं भक्तिरस सूप[१] ॥ आधीं होई ॥३॥
नाम मुखीं चित्तीं प्रेमा धरि । त्यज जगदंध कुकूप ॥ आधीं होई ॥४॥
श्रीमत्सद्गुरु अलकावतिपति । करिति तनय सुखभूप । आधीं०॥५॥ (१.पक्वान्न)

५१४

जयावृत्त. मूळपीठ-झिंझोटी. ता.-दादरा. गौणपीठ - 'रत हरि पद' या चालीवर

तोचि परम पुरुषार्थ त्रिविध दुःख शांती ।

दृश्य दृष्टि त्यजुनी सकल द्रष्टरिं महांती ॥ तोचि० ॥धृ॥
कालकर्म प्रकृतिबंध नाहिं आत्मप्रांतीं ।
नारिनरां अविवेकचि पाडि द्वंद्वध्वांतीं ॥१॥
ज्ञाने अविवेक जळे मिळे ब्रह्मशांती ।
ज्ञानेश्वरचरणांबुजिं अलौकीक कांती ॥२॥

५१५ / आर्या

वाद नको यालागीं आधीं करुनीच पाहिं अनुभूती ।
मग तुज भासे कीं हें समस्त चिद्रूप जग हरिविभूति ॥१॥

५१६ / श्लोक

आहे जयातें श्रुति बोलताती । तेंचि कळे यापरि ब्रह्मख्याती ।
आनंद तो याहुनि भिन्न नाहीं । सच्चित्सुखें तें हरिरूप पाहीं ॥२॥

५१७

वेदीं बरे सांगितलें सुरस्ते । कर्मादिके भाव निके समस्ते ।
भोगोनि स्वर्गाप्रति पुण्यराशी । येती तळीं रौरव नर्क देशी ॥४॥

५१८

तत्त्वमसि चे विवेचन

ताल- धुमाळी. लावणीवृत्त. मूळपीठ.-यमन. गौणपीठ. 'नरजन्मामधि' या चालीवर. ता.-

स्वप्नामध्ये जसा भिकारी आणि तो नृपवर ॥ तसे संसारिक जीवेश्वर ॥धृ॥
स्वप्न निमाल्या जागृतिमध्ये नरचि मंचकावर । तसें हे ब्रह्मचि सर्वांवर ॥
अझुनि कसा तुज उमज न वाटे अशुद्ध तव अंतर । (य९उ.१०१)
देई तूं सांडुनि धर्मांतर ॥ चाल ॥ करुनिया प्रथम कर्मे ती अति आवडी ।
निजमनोमळांची करि गगनी वावडी । मग उपासनेने हरिपदकण सावडी ॥
॥चाल पहिली॥ जाइल तो विक्षेप चित्त मग सोडिल दोषाकर ।
होई तू श्रीगुरुचा चाकर ॥ स्वप्नामध्यें० ॥१॥
स्वप्नी जशी कामिनी पाहुनी काम मनी अति भरे ।
तसे सुरपुर उमजे मनी बरे । यास्तव सोडुनि कामफळाते गुरुपदसेवी करे।
तोडि षड्वैरीदळ निकरे ॥चाल ॥
या मनुष्य जन्मी साधीं परमार्थता । मग पुढे न ऐसी अमोल संधी आतां ॥
निज करून भोगी संसारी स्वार्थता ॥ चाल पहिली ॥
करुनि विवेक विरक्ति शमादीषट्क मुमुक्षापर ॥
होउनी गुरुपदि ठेवी शिर ॥ स्वप्नामध्ये० ॥२॥



स्थूल लिंग कारण हे वारी जीवदेह पै त्रय । वारि तूं ईश्वर देहत्रय ।
मायामय ईश्वरवाच्यांश **'तत्पद'** जाणुनि स्वये । अविद्यांश **'त्वंपद'**वाच्य ये ॥
॥चाल॥ माया अविद्या दोन्ही तूं सांडुनी । मग घेइ आपुली परब्रह्मता जुनी ।
जेथे जीवेशपण होये अवघी धुनी ॥ चाल पहिली ॥
स्थळा पाहुनी सत्चित्घन स्वानंदी मग सत्वर ॥
होउनी प्रेमे भरिं अंतर ॥ स्वप्नामध्ये० ॥३॥
यावरि **लक्ष्यांश** घेवुनी तूं ब्रह्म होसि जेधवां ।
उरे मग हरिभक्तिच तेधवां । जसी कुमारी लग्न होउनी पट्टराणि पाटवा ।
पावल्या भजे आपुल्या धवा ॥चाल॥ यापरी मुक्ति झालिया भक्ति आचरी ।
तुज वाटे त्या त्या स्थळि सुसुखे संचरी ।
जन दीन पाहुनी करिं धरुनी उद्धरी ॥
॥चाल पाहिली॥ ज्ञानेश्वरप्रभुचरणसलिल तूं पान करी सत्वर ।
आणि सिंचन करि दीनावर ॥ स्वप्नामध्ये जसा भिकारी ०॥४॥

५१९

वासंतीवृत्त. रा.-जोगी. ता.-तेताला.

आज मी नवल देखिलें माय ॥धृ॥
श्रीगुरुवरवचन कानिं ऐकुनि । निवटति चारहि काय ॥ आज०॥१॥
अंगें मी परब्रह्म होउनी ॥ हृदयीं यदुपतिपाय ॥ आज०॥२॥ (य९उ.१०२)
डोळें भरुनी रूप पाहतां । गेली संसृतिहाय ॥ आज०॥३॥
उपकारार्थचि स्मरतें भावें । ज्ञानेश्वरगुरुमाय ॥ आज०॥४॥

५२०

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ-पूर्वी. गौण.-वसंती बघुनि मेनिकेला या चालीवर.

वसिष्ठ मुनि म्हणती रामा ।
आत्मा जाणुनि त्यजिले ज्यानें विषयांकुरकामा ॥धृ॥
धन्य तो या लोकीं सकळा ।
विकळा माया त्यजुनि तयाला शरण येति सुकळा ॥
ज्या दृष्टी जाहालि सामा ॥ आत्मा जाणुनि ॥१॥
मुंगीहुनि विधिपर्यंत । भिन्न दृष्टि न करुनि पाहीं भूतीं भगवंत ॥
मुनी जपती त्याच्या नामा । आत्मा जाणुनि ॥२॥
तो विधि हरिहरावरि कृपा । समर्थ होतो करावयातें वारुनि भवतापा ॥
विद्या येती तद्ग्रामा । आत्मा जाणुनि ॥३॥

यापरि ज्ञानेश्वर आई परमकृपें दास करुनि धरुनी ठेवित निजपायी ।
तत्पदिं राहो अति प्रेमा ॥ आत्मा जाणुनि ॥४॥

५२१

लावणीवृत्त. मूळपीठ.-पूर्वी. ता.-धुमाळी. गौणपीठ.नरजन्मामधि - या चालीवर.

भेटी जयाच्या कोटि हरपती बंध पोटि मुक्तिला ।
सुदविणे मुक्त जसे शुक्तिला ॥धृ॥
नेणे जो माया-यामिनि-तम उत्तम पुरुषाकृति । घटेना धीट परी प्रकृती ॥
सेवाया तत्पद पूर्वी स्थळ दान करि विरक्तिला ॥
सुदविणे मुक्त जसे शुक्तिला ॥ भेटी० ॥१॥
उधृतनगमहि गमत परी हा नग न गमे महिवरी ।
घटवि नग नागविगर महिवरी ॥
गगनगमन मग नगर न गणितो सगर करुनि रामहि ।
गगनसम गतसकलग कामहि ।
भवभयभाव नको यास्तव भवही भावी यद्‌भक्तिला ॥ सुदविणे० ॥२॥
प्राक्कादिसम ही की अकगुण सगुणिं वारि अकत्रय ।
विरोधा नाकि नये नकत्रय ।
शिव दे शिवतां शिवतां स्मरतां ज्यासहि तन्नमनय ।
घटवि परि साम्य न करुनी नय । (य९उ.१०३)
एवं ज्ञानेश्वर गुरु तत्पदिं धरु परानुरक्तिला ॥ भेटी जयाच्या० ॥३॥

५२२ / आर्या

ते तरले ते तरले ज्यांना तरलों असें न आठवते ।
त्यांच्या हृदयामध्यें गुरुकरुणामृत समस्त साठवतें ॥१॥

॥ राम-वसिष्ठसंवाद समाप्त ॥

.....

५२३ / हिंदी

कल्पितलीला. सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ-यमन. ता.धुमाळी. गौण राधा म्हणे रडुं नको.या चालीवर.

शाम मैं नहिं हूं औरनकी । कन्या आलंदिबरनकी ॥धृ॥
और सुनोजी नंदलाला । तुम हम नहिं गौरन काला ।
सबही आतम निजज्वाला । महावाक्यप्रतीति बाला ।



एही बानी बीरनकी । कन्या आलंदिबरनकी ॥ शाम मैं० ॥१॥
नयनकी कोर नयन लागी । मनकी वृत्ति निकर भागी ।
बुद्धि तो भई है अनुरागी । भई हूं बिषयते बिरागी ।
आस अब तुम्हरे चरणनकी । कन्या आलंदि० ॥२॥
नहिं हूं मै ना तुम नाथा । एक चैतन्य सबन माथा ।
यही श्रुतिजननिमुखगाथा । भवरोग मिटावन बचा था ।
श्रीज्ञानेश्वरगति मनकी । कन्या आलंदि० ॥३॥

५२४ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. रा.-सोरठ ता.-तेताला.

किह बिधि हो हि । बिखयको संग ॥धृ॥
जहं जहं देखत तहं तहं संगमो । दीखत राधारंग । किह०॥१॥
राधारंग संगतिबलतें । होत त्रिगुण भय भंग ॥ किह०॥२॥
परि ये पदकुं मिलावन कारन । ज्ञानेशकृपा अभंग ॥किह० ॥३॥

५२५ / हिंदी दोहा

इतना गोपी बचन सुन कहत जसोदालाल ।
जो तूं जानत चेतन सच्चित्सुख जगपाल ॥१॥

५२६ / हिंदी / तुकबंदीवृत्त

तो मोरे बिन जगमों नाहीं । एषा क्यौं प्रतीती नाहीं ॥
काहे करत जनसो बिरोधा । काहे कारण गति मनरोधा ॥१॥(य९उ.१०४)

५२७

लावणीवृत्त. मूळपीठ.-पूर्वी. ता.-प्रतिताल. (धुमाळी) गौणपीठ - नंदाच्यानंदना. या चालीवर

श्रुतिगुरुवचनी रमा ॥ जन हो ॥
रमारमण जिन हृदयी धरिता मग ती आयती रमा ॥धृ०॥
सोडुनि भवभयभ्रमा । गुरुमुखगतवाक्यार्थ साधुनी घ्या निजसुखसंभ्रमा ॥
सांडुनि साधनक्रमा । वृत्तिलक्षणेक्षणा करुनि मग देहचतुष्टय क्रमा ॥
संसृतिसुख क्षणिक हे वमा ॥ रमारमण० ॥१॥
कधिहि इच्छिजे न मा । वाङ्मन काया एक करोनी संतचरणिं तुम्हि नमा ॥
मिळलचि तुमची जमा । सन्मतिगति अति अधिष्ठित स्थिति भूतिं पहावे समा।
भोगुनियां कृतिफळ दमा । ज्ञानानंतरही रक्षावें अधिगत निज शम दमा ॥
मग साधुनि भक्तिप्रमा । ज्ञानेश्वरप्रभुकरुणे वारा दुःखत्रिविधश्रमा ॥
श्रुतिगुरु वचनीं रमा० ॥२॥

## ५२८ / भगवद्वाक्य

(उदाराः सर्व एवैते - या गीताश्लोकाच्या आधारें )

सामनुष्टुपवृत्त, मूळ.- भीमपलासी. ता.-धुमाळी. गौण.- नारायण भज रे.

**सकलहि भजक उदार । परि मज ज्ञानि आवडे फार ॥धृ॥**
**ज्ञानि जनास्तव उपजण माझें । मज तंव ज्ञानविचार ॥ परि मज० ॥१॥**
**ज्ञानीभक्तापुढे मजला । नावडे धनसुतदार ॥ परि मज० ॥२॥**
**ज्ञानीभक्त तो आत्मा माझा । मजहुनि ही सकुमार ॥ परि मज० ॥३॥**
**माझें जीवित त्याचसाठिं बा । जाण तूं पंडुकुमार ॥ परि मज ॥४॥**
**अलकावतिपतिकरुणा ज्ञानें । पाववि भवतिर पार ॥ परि मज ॥५॥(य९उ.१०५)**

## ५२९ / हिंदी

दृष्टिसृष्टिवाद

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ.-सोरठ. ता.-तेताला. गौणपीठ.- हिंदुस्थानी भजनाचे चालीवर.

**पावे जो सो सुमिरे मनही ॥धृ०॥**
**मनही मन नारीनर दीखत । मन अधीन सज्जन दुर्जन ही ॥१॥**
**मनमों माता मनमों ताता । मनही गुरु मन यदुनंदनही ॥ पावे ० ॥२॥**
**जातें मन हरिचरण लगावहुं । फेरि सर्ग कल्पेभी भय नहिं ॥ पावे ० ॥३॥**
**अलकावतिपतिकरुणचरणद्युति । चिति बल ना जनना भव मनही ॥पावे०॥४**

## ५३०

उदितावृत्त. लावणीभेद. मूळपीठ.- पूर्वी. ता.- धुमाळी. गौणपीठ- नंदाच्या नंदना या चालीवर

**नितांत स्वांता जना ।**
**नवघनतनु कोवळी हृदयमुखी अभिमुख करि या जना ॥धृ०॥**
**मिळवुं चरण साजणा । आत्मविवेका करुनी दवडुं हृद्गत नित सहाजणा ॥**
**अभिनव तरु तनुमय ।**
**ज्या स्थळिं श्रुतिस्मृत्यादि पुराणे योगि करिति विनिमय ॥**
**निगमांती चिन्मय । कितितरि झाल्या मम भगिनी यद्ध्यानी सच्चिन्मय ॥**
**सोडुनि निज कुलजना । रामकृष्ण गोविंद वदवुनी अभिमुख करि या जना ॥**
**अलकावतिपतिपदा । भजतां तनुभय सोडुनि मिळते जाउनि मन चितिपदा ॥**
**नाही मग च्युति कदा ।**
**ज्ञानेश्वरनामे हृदय हे जडवा अच्युतपदा ॥ नितांत स्वांता० ॥१॥**

आद्य शंकराचार्यांचे



'मनीषापंचक'

## ५३१ / शार्दूलविक्रीडित

**जो मी ब्रह्म अखंड सन्मय असें जाणूनियां सन्मती ।**
**देहासक्ति निवारुनी स्थिति करी श्रुत्यर्थ सत्संगती ॥**
**चित्तिं सद्गुरुपादुकेविण कदा वैकुंठही नावडे ।**
**तो चांडाल असोऽथवा द्विज असो आचार्यतेला चढे ॥१॥**

## ५३२

**आनंदैकरसी निजात्मकरसीं चित्ताप्रति स्थापुनी ।**
**कामक्रोधविकार सर्व हरिले मायाकृती लोपुनी ॥**
**जाय चित्त जिथें तिथें सहजची होतो समाधी जया ।**
**तो चांडाल असोऽथवा द्विज असो आचार्यता ये तया ॥२॥**

## ५३३

**जो सर्वत्र अखंड एकरस सच्चैतन्यता पाहतो ।**
**काया वाणि मनास नित्य गुरुच्या पादाम्बुजीं वाहतो ।**
**जो दीनाप्रति पाहुनी लगबगें मातेपरी धावतो ।**
**तो चांडाल असोऽथवा द्विज असो आचार्यता पावतो ॥३॥ (य९उ.१०६)**

## ५३४

**ज्याचा प्रेम सदा निजात्म विषयी मिथ्या जगा जाणतो ।**
**चित्ताचे अतिदोष पाहुनि तया हातातळीं आणतो ।**
**ज्याच्या वाइट चांगलें जनिं कदा दृष्टीपुढें नातुडे ।**
**तो चांडाल असोऽथवा द्विज असो आचार्यतेला चढे ॥४॥**

## ५३५ / श्लोक

**जो सोसुनी परम कष्ट दयार्द्र अंगे ।**
**रक्षोनि धर्म निगमांत-रहस्य सांगे ॥**
**श्रीमंत अंतरि जना दिसतो भिकारी ।**
**आनंद बोधनपथा परमाधिकारी ॥१॥**

## ५३६ / चौपाई (हिंदी)

**साच पदारथ दुख उपजावे । तौं निजरूपभि साच लखावे ॥**
**परम असत्य जो सुख दुख दोई । तौ ख-सुमन क्यौं कोउ न लेई? ॥१॥**

## ५३७ / हिंदी दोहा

**क्यौं नहि शशके श्रृंगतें बांझतनयकी हानि ।**

जौं कहुं विरोध देइ दुख तौं दुसर नहि मानि ॥१॥

५३८ / हिंदी चौपाई

अपनेमाहि विरोध न पाया । ब्रह्मविरोधि नाहिं कभि माया ॥
तौं दुखदायक को जगमाहि । रागद्वेषबिन अन को नाही ॥१॥

५३९

जडचेतन एकहि करि जाने । जडतनुको निजरूपहि माने ॥
सो अभिमान कुमति उपजावे । करि संकल्प सौख्य दुख पावे ॥२॥

५४० / मायेचे स्वरूप

श्लोक

आहे म्हणूं तरि विबोधघडीच नाशे ।
नाहीं म्हणूं तरि जगा नयनींच भासे ।
रूपाप्रती जडलि ज्यापरि काळि छाया ।
तैसीच ब्रह्मपद लोपवि मिथ्यमाया ॥१॥

५४१ / ओवी

अधिष्ठानाचिया सत्ता । माया गाजताहे वृथा ।
तें तें होऊं न शके सर्वथा ॥ ब्रह्माधिष्ठानता विरोधी ॥१॥

५४२ / हिंदी दोहा

शंका देखी होत पुनी । अनृत रीति अनुमान ।
ब्रह्म जानि करि तुमकुं भयो । संशय परम प्रमाण ॥१॥

५४३ / हिंदी चौपाई

जानि परेश प्रश्न नहि होई । प्रश्न बिना उत्तर नहि देइ ॥
उत्तर प्रश्न बुद्धि करि कीन्हे । इन महपरे तब निज नहि चीन्हे ॥१॥

५४४ / हिंदी

बिन अलकावतिबल्लभकरुणा । कोटिक शास्त्र पढे नहि तरना ॥

५४५

नाहिन जहं रजनीकि प्रतीती । कोन तहां चाहत दियज्योती ।
जहां नहिं रोग तनुनपर आवे । को तहां औषधमहिमा गावे ॥१॥
(य९उ.१०७)

५४६ / हिंदी दोहा

जहां न मरणकि भीति तहां कहां पीयूख प्रचार ।
तैसे नहिं अग्यान जहां तहं न ग्यान उपकार ॥१॥



५४७ / ओवी

ब्रह्माचें अंश मुख्य तीन । आश्रया माजीं असती दोन ।
सामान्य विशेष अभिधान । कल्पित विशेष तिसरा ॥१॥
कल्पिताधार सामान्य म्हणोनी । कल्पित न नाशे सामान्य ज्ञानी ।
यालागीं विशेषांश ब्रह्मस्थानी । अज्ञान नाशाया विद्या कल्पि ॥२॥

५४८ / दिंडी

भिन्न भावें जो करी विष्णुभक्ति । तया नाहीं विष्णुत्व कधीं प्राप्ति ।
विष्णु होवोनी विष्णु पूजि भावें । हरी त्याला स्वीकरी भक्तिभावें ॥

५४९ / दिंडी

विवेकादी साधनें चारि केलीं । सद्गुरुची सेवाहि पूर्ण झाली ॥
ब्रह्मजिज्ञासा तयालागिं साची । अधीकारें होतसें सर्वदाची ॥

०००

वाठोडकर वेंकटशास्त्रीशी प्रश्नोत्तरे, वाठोडा

५५०

वेंकटशास्त्री -

मानसि अति भय वाटे कैं हें भवजलधि-तोय आटेल ।
परि तें सापेक्ष असे गुरुहृदयीं प्रेमपूर दाटेल ॥

महाराज -

भवीय मुळींच नाही मृगजलसम व्यर्थ त्यास काय भिणे ।
तो यदुपति मनी ध्यावा जो निजदासास ब्रह्मभान भिने ॥

वेंकटशास्त्री -

पुत्राचे वात्सल्यें स्वगृहिं धन सांगतो पिता आहे ।
परि तें कवणे कोनीं असकृत पुत्रहि विचारिता होये ॥

५५१

महाराज -

पुत्र पिता हे दोन्ही एक म्हणुनि येथ सांगणें कोणा ?
देश गृहांत जितुका तेवीं हृदयास नाहिंची कोणा ॥

वेंकटशास्त्री -

उपदेशा करिती बहू परि पारंपर्यज्ञान येथ वसें ।
यास्तव वाटे मजला या मासीं मीं वैकुंठकेलिं वसे ॥

५५२ / उत्तर -

मीपण असे नसावे जेणे मिळतो जगीं उगा मान । (य९उ.१०८)
परि हरिचे सुत व्हाया मी मी म्हणुनी असोचि अभिमान ॥

०००

५५३ / गुरुसेवा

लावणीवृत्त. मूळपीठ- पूर्वी. ताल.-धुमाळी. गौणपीठ - राधामुखमंडन.

सद्गुरुसेवा करुनी भावें गुरुवचनीं नाहणें ।
त्रिगुणात्मक पंचभेद सोडुनि समबुद्धि राहणें ॥धृ॥
पुण्यपाप कर्तृतंत्र उपजे सर्व भावनामय ।
परमहंस हंसा उलटवुनि देहींच अनामय ॥
नाहीं ज्यांच्या दृष्टि त्वम्-अहं-तदीयमित्यामय ।
वेदांतामृत पिउनि जाहले परम अमर अक्षय ॥
जाणुनियां निर्दोष ब्रह्म मग जगद्दोष दाहणे ॥
त्रिगुणात्मक पंचभेद सोडुनि समबुद्धी राहणें ॥ सद्गुरु सेवा० ॥१॥
कंठीं घाली सरी कानिं बुगडी केकत मस्तकी ।
भिन्नभूषणें परि पाहे सोनार कनकवस्त कीं ॥
कनकचि मानुनि घेती साहू निजधन जन हस्तकी ।
कनक जाणतां शोभे मग नग आवडिचे हस्तकीं ॥
तत्सम जग सच्चित्सुख पाहुनि ज्ञानेश्वर लाहणें ॥ सद्गुरु सेवा० ॥२॥

५५४

लावणीवृत्त. मूळपीठ.-पूर्वी. ताल.-धुमाळी. गौणपीठ - 'नरजन्मामधि' या चालीवर

भाष्यकारमत कथितो प्रेमे श्रोती करुनी कृपा ।
ऐकिजे होउनिया गतत्रपा ॥धृ०॥
त्रिविध दुःखनिवृत्ति इच्छिति जन सकळही यास्तव ।
दुःखदायक हा वाटे भव ॥
परि नेणूनियां पतंग ज्या परि सेवि दिव्याचा दव ।
तसे जन भूलवी यौवन नव ॥
शीर्यमाण वस्तुच्या सेवने वश होती यमसृपा[1] ॥
ऐकिजे होउनियां गतत्रपा० ॥१॥
दशशत मानव भवगत त्यातहि कोणि साध्विपुत्र[2] तो ।
त्यागितो भोग इहामूत्र तो ॥



निजसुखजिज्ञासा करि भावे व्यासवदन सूत्र तो ।
धुंडि मग ब्रह्मनिष्ठ श्रोत्र तो ॥
यापरि धुंडुनि गुरु जीव मग शोधि आत्मचिन्रूपा ।
ऐकिजे होउनिया गतत्रपा० ॥२॥ (य९उ.१०९)
देह प्राण मन बुद्धि सुषुप्ति गुरुवचने त्यागितां ।
सांपडे निजसुख मग भोगितां ।
श्रीगुरुवैद्यकृपेतहि जाये संसारिक रोगिता ।
पावतो घरिहि अशी[3] योगिता ॥
परि हे व्हाया मूळ पाहिजे श्रीज्ञानेश्वरकृपा ॥
ऐकिजे होउनिया गतत्रपा० ॥३॥

(१.सर्पातें २.सतीचा लाल. ३.संन्यास न घेताही)

५५५

साधनमार्ग

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ -भूप. ताल.-तेताला. गौणपीठ-पहा पहा सावळा या चालीवर

आधी आपुलें व्हावें शुद्धिचित्त । मग अर्पावे आचार्यातें वित्त ।
सोहंभावें जपतां भाव नीत । होईल तत्काल शांत भवपित्त ॥१॥
व्हावे अझुनी तरीही सावधान । करा गुरुपायीं तनुमनदान ।
ठेवा गुंडाळुनी मानापमान । नाहींतरी कापील यम मान ॥२॥
जपतप कामिक करितां नाना । कधी नये ब्रह्म तें अनुमाना ।
यास्तव लागा निष्काम हरीध्याना । तेणें येईल शुद्धभाग मना ॥३॥
जीव चैतन्य अविद्या उपाधी । श्रुतिसिद्ध त्वंपद निरसा आधी ।
मायोपहित ईश्वर चिन्मांदी । तत्पदलक्ष्याब्धीं लावा दृढ समाधी ॥४॥
तत्त्वंपद वाच्यांश सर्व सोडा । असिपदी एकत्र लक्ष्य जोडा ।
विश्वकार्यकारणभाव मोडा । अहंममता सहज अवधी तोडा ॥५॥
शत्रुमित्र नका पाहूं दृष्टी । सोडा पापीपुण्यवंत गोष्टी ।
पाहा ज्ञानें स्वानंदमय सृष्टी । नका होऊं त्रिविध दुःखें कष्टी ॥६॥
मनबुद्धी समांतरीं आणा । निजदेहा वैराजत्व माना ।
अन्वयव्यतिरेकें पाहा ब्रह्मभाना । दावी ज्ञानेश्वर अलकावतीराणा ॥७॥

५५६

साधनदर्शन

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ- भूप. ता.-तेताला. गौणपीठ- 'पहा पहा सावळा' या चालीवर

आधी सांडा विषय उतावेळ । कांही काढा परमार्थासाठी वेळ ।(य९उ.११०)
घ्यावा घडीभर हाती विणाटाळ । गळां राखावी तुळशीची माळ ॥१॥
वर्णाश्रमा उचीत करा कर्म । यथाशक्ती साधावा दानधर्म ।
निंदा-स्तुती सांडोनी द्यावें वर्म । गुरुपासोनी घ्यावें प्रणवब्रह्म ॥२॥
वाचे हरिनाम लाखावली वाहा । दोहीं डोळां सांवळी तनु पाहा ।
हरिकथा ऐकूनी मग्र राहा । संतसंगानें करा षडरी-दाहा ॥३॥
कानीं ऐकावे श्रीहरीचे गुण । विष्णुनिर्माल्यवास घेवो घ्राण ।
करें सेवावे सद्गुरुचरण । पायी दृढ साधावें तीर्थाटण ॥४॥
विष्णू-नैवेद्य रसनेसी द्यावा । मनी भाव धैर्ययुक्त व्हावा ।
चित्ती दीनांचा कळवळा यावा । हळूहळू दंभ सर्वही जावा ॥५॥
ऐसी व्हावी सगुण उपासना । येणें क्षय पावती वासना ।
मग धुंडावा सद्गुरुराणा । महावाक्यउपदेश ध्यानीं आणा ॥६॥
चारी वेदांचे महावाक्य चार । त्याचें मंथन करूनी घ्यावा सार ।
आंत बाहेर विश्व ब्रह्माकार । मग पिशाचा सारिखा व्यवहार ॥७॥
योग सांख्य याग नलगे कांहीं । देतो इच्छित स्वामी शेषशायी ।
मग तूंचि तूं साक्षी होउनी राही । अभिमान श्रीहरीचरणी वाही ॥८॥
मग जें जें बोलाल तें तें वेद । नाहीं प्रपंचपरमार्थभेद ।
नलगे शास्त्र देशांतरशोध । समाधान सच्चिदानंदबोध ॥९॥
न करुनी कविता अभिमानी । बाळपणी बोबडी आरुष वाणी ।
क्षमा करोत कांत चक्रपाणी । प्रीति पावो ज्ञानेश मोक्षदानी ॥१०॥

५५७ / हिंदी

ये लीला मायामय तोरी ॥धृ॥
गगन पवन वन्ही जल भूमी । परजा कछु थोरी ॥ ये लीला ॥१॥
अपने रूप बिसारी सुंदर । तनु कहता मोरी ॥ ये लीला ॥२॥
ज्ञानेश्वर करुणाबिन भवफणि । हरत न चिति डोरी ॥३॥ (य९उ.१११)

०००

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥



# उपदेशपर पदे

## ५५८ / हिंदी

सामनुष्टुप. रा.-खमाज. ता.-तेताला.

आतमराम हीं मनमां गावो ॥धृ॥
सोहं हंसा इसी नामसे, । हिय के दोख मिटावो ॥१॥
तुम्हरे हृदय का अंतर आत्मा । सो दशरथसुत वृत्ति मिलावो ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या के पितृ को । सुमिरहिं धनु को बाण लगावो ॥३॥

## ५५९ हिंदी

सामनुष्टुपवृत्त. रा.-पिलु. ता.-तेताला.

काहेकु सोच करत मनमाहीं । हरिप्रताप दुल्लभ कछु नाहीं ॥धृ॥
पेटमें था तब बाहर स्तनमें । दूध मातु चुछ दियो मिलाई ॥
जानकुं देत अजानकुं देत । जहान उनके पग लपटाई ॥१॥
क्या शठ तूं नहिं जानत है यह । ज्ञानेश्वरजा चरन लगाई ॥२॥

## ५६० हिंदी

रसालावृत्त. रा.-देस. ता.-तेताला.

सुन रे प्यारे ! गुरु की बाणी ॥धृ०॥
बालपनों सब क्रीडतमों ग्यो । फोंकट जात जवानी ॥ सुनरे प्यारे ॥१॥
जरा मरन यह आय भिडे जब । निकल जात अनपानी ॥ सुनरे प्यारे॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु दीनदयाल है । शठ भज तिनको बानी ॥ सुनरे प्यारे ॥३॥

## ५६१ / धर्म पालन

संजीवनीवृत्त. मूळ.-पूर्वी. ता.-धुमाळी. गौण.-अभयवरदकर.

नको नको करूं चुकी सदा तूं क्षणेक जीवित कीं ।
जंव जंव हरिला विस्मरशी रे तंव तंव काल तकी ॥धृ॥
हरिहर श्रीगुरु एक करूनियां प्रेमें साम्य तुकीं ।
जीव आपुला स्वयें मिळवुनी ब्रह्मी होय सुखी ॥ (य९उ.११२)
अजुनि तुला हें कैसें नकळें आपुलेंच हित कीं ।
शेवटिं सोडवि कोण तुझी अति होइल दुर्गति कीं ॥ चाल ॥
मग अहा अहा करिसील जरी कांहीं । तरि कोणि न देइल तुझी पुरी ग्वाही।
अनुताप होउनी फळ मग तें नाहीं ॥ चाल पहिली ॥

यास्तव आधिंच नामग्रहण करि सुशास्त्र संमत कीं ॥ जंव जंव ०॥१॥
व्यर्थ काय बायका मुलें तूं घेउनियां बसला ।
मेळविला काढा भोंवति हा आणुनियां नसला ॥
येतां वृद्धपणा मग तूं जाशील रे गिंवसला ।
यास्तव मारुनि लाथ भवातें जाई दुरी कसला ॥ चाल ॥
वैराग्यावांचुनि भाग्य नसे कांहीं । यापरिची देती श्रुतिमुनिवर ग्वाही ।
गुरु सांगतील ती मति घे लवलाही ॥ चाल पहिली ॥
आत्मविचारावांचुनि जीवन नाहिंच शोभत कीं ॥ जंव जंव०॥२॥
घेउं नको नाना मतवादें विटाळुनी चित्त ।
देउं नको रांडिच्या घराप्रति नेउनियां वित्त ॥
सांडु नको वर्णाश्रमकर्मे होउनियां मत्त ।
जनिं करुनी अपकीर्ति नको वाढवूं उगी पित्त ।
॥चाल ॥ यापरि धर्माचा करितां अवलंब । झालिया चित्त शुद्धि घे निरालंब ।
मग तूंचि होउनी राहें हेरंब ॥ चाल पहिली ॥
ज्ञानेश्वरप्रभु तात दयालू संगिं अखंडित कीं ॥ जंव जंव०॥३॥

५६२ / दिंडी

हरिपायीं चित्त हें स्थीर जेव्हां । संसृती हे कल्पनाजाल तेव्हां ।
मग कानीं ऐकिली जेविं कीर्ती । दिसे तैसी डोळियां पुढें मूर्ती ॥१॥

५६३ / हिंदी

सामनुष्टुप. रा.-पिलु. ता.-तेताला.

समुझ मन, कोइ नहीं तेरा । आखिर तोहे जाना अकेला ॥धृ॥
नाना जनम धूंडधूंडकर । लिया चौऱ्यासी फेरा ॥ रे मन कोइ नहिं ॥१॥
अब तोहे कस सूझत नाहीं । आवे काल धंडोरा ॥ रे मन कोइ नहि ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणाबलतें । हरिकोही कह मेरा ॥ रे मन कोइ नहि ॥३॥

५६४ / हिंदी

जयावृत्त. मूळ.-झिंझोटी. ता.-दादरा. गौण.-रत हरिपद.

साधु पियारे सुमरो राम नामबाणी ।
भूल मरे देख धाम राखि कामबाणी ॥धृ॥ (य९उ.११३)
विखयबास कीच भरा आइ काय-ग्लानी ।
पाइ जनम मानुखको भई धूलधानी ॥१॥
करण रोधो चरण ध्यावो संसृतिभय मानी ।
सगुण भाव गुणको हरत नाथ चापपाणी ॥२॥



परधनपर थूक देहु परतिरिया नानी ।
ज्ञानेश्वर चरणनका पिवो गांगपाणी ॥३॥

५६५ / हिंदी

सुशीलावृत्त. रा.-यमन. ता.-तेताला

मत कर बाल, मदिरापान ॥धृ॥
सुन्नेसी नरतनू पायके । खोना न वृथा जान । मत०॥१॥
धनसुतदारा मोह त्यजकर । ले श्रीगुरुमुख ग्यान ॥ मत०॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु करुणातें कर । कृष्णचरण जलस्नान ॥ मत०॥३॥

५६६ / आर्या

ऐकुनि श्रीहरिचरिता न तरे ऐसा जगीं असे कोण ।
की गगनें न व्यापिला ऐसा सृष्टीत कायसा कोन ॥१॥

५६७

कथा श्रवण करण्याची लागे जैसी मनाप्रती गोडी ।
तैशा तैशा हरती कामक्रोधादि शत्रुच्या खोडी ॥१॥

५६८

विशाखावृत्त रा.-बेहाग. ता.-राजविद्याधर (तेताला)

गोविंद नाम स्मरा ॥धृ॥
मदन मनोहर त्यजुनि साजिरा । वायां भविं न मरा ॥१॥
कांहिं तरी तुम्हि सौभाग्याचें । करिं कंकण सुभरा ॥२॥
मजबरोबरि हरिघरिं येउनि । संमार्जनचि करा ॥३॥
परि आधीं शिरिं ठेवुनि घ्या गे । ज्ञानेश्वर सु-करा ॥४॥

५६९ / कलीची लीला

सामनुष्टुप. मूळ. - जोगी. ता.-तेताला . गौण. साधारण साकीचे चालीवर

अति अघटित कलिची लीला । असुकृति दे वेद हलीला ॥धृ॥
युगत्रयरवी ग्रासाया जणु राहो उदया आला ।
विद्या घेउनि शिष्य माजती झोडिति आचार्याला ॥अति०॥१॥ (य९उ.११४)
चाकर मालक कलहा करुनी जाति बळें पाताळा ।
परकरकृतकुचमंडल कामिनि विष देती कांताला ॥ अति०॥२॥
सुंदर स्त्रीशीं हासुनि बसुनी लाजवि यातिही देवा ।
मायबाप पिकदाणी घेउनि करिती अग्री सेवा ॥ अति०॥३॥
सुंदर असतां सुत मग मायहि फिदा होउनी राही ।
कन्या सुंदर पाहुनि बापचि विवाहमुहूर्त पाही ॥ अति०॥४॥

तिहीं युगामध्यें देवांनी वैदिकमत गाजविलें ।
म्हणुनी असुरादेशे कलिनें पाखंडा माजविलें ॥ अति० ॥५॥
तिहीं युगामधि अमृत भरुनी होत्या पूरणपोळ्या ।
या युगीं तों गोड वाटती नरककुंडिच्या गोळ्या ॥ अति० ॥६॥
तिहीं युगामधिं कांचनाच्या होत्या हरिच्या मूर्ती ।
कलियूगी जीवंतचि गर्भगृह स्मशान स्फूर्ती ॥ अति०॥७॥
पीतांबर नेसुनी जारिणी ठुमकत ठुमकत चाले ।
पतिव्रता मंदिरामाजि ते रडतचि बाई बोले ॥ अति०॥८॥
पाठ थापटूं तथापि कलिची हा अति करुणावंत ।
अलंदिपति संकीर्तनमात्रें करि भलत्याला संत ॥ अति०॥९॥

५७० / भगवद्वचन -

सुशीला. रा.-मारवा. ता.-तेताला.

मजला भक्तिच वाटे गोड ॥धृ॥
नूतन नाहीं मुळिं ब्रह्मीहुनि । ही मज लागलि खोड ॥ मजला ॥१॥
ब्रह्मक्षत्रविट्शूद्रान्त्यजही । जो करि माझी जोड ॥ मजला ॥२।
ज्ञानेश्वरप्रभुचरण सेवुनी । होये भवबिज मोड ॥ मजला ॥३।

५७१ / हिंदी

सामनुष्टुप. रा.-बेहारा. ता.- तेताला.

प्रभुबिन कौन जगतमों तुम्हारा ॥धृ॥
औरत चाहत नथनि जोडको । सुत चाहत दे सदन हमारा ॥ प्रभुबिन ॥१॥
प्राणसंयमन धीरे धीरे करो । देहसो जान्यो आत्मा न्यारा ॥ प्रभुबिन ॥२॥
श्रीगुरुआज्ञा एकहि पालो । हरिरुप देखो मुक्त संसारा ॥ प्रभुबिन ॥३॥
तुमहम मिलके एक करेंगे । प्रभुज्ञानेश्वरचरणआधारा ॥४॥ (य९उ.११५)

आसुरी स्वभाव

५७२ / भगवद्वाक्य -

कमलारंगीवृत्त. रा.-दरबारी कानडा. ता.-राजविद्याधर तेताला.

पावती नीच गती ॥धृ॥
संसारीं नरदेह पावुनी । राहति अधममति ॥ पावती ॥१॥
त्यांना मी अति दुःखीं घाली । ज्यां सुख न मागुती ॥ पावती ॥२॥
मनुष्यरूपी ब्रह्म तयां मज । जे कधिं नोळखती ॥ पावती ॥३॥



अलकावतिपतिकरुणेनें मी । सुलभ त्रीजगती ॥ पावती ॥४॥

५७३ / हिंदी

शकटधाटीवृत्त. गौण-छक्कडचे चालीवर. मूळ-माहित नाही.

भाइ तुम चलो हमारेहि साथ ॥धृ॥
नैनसो देखत कानसो सूनत । रातके दीन दीनकी रात ॥ भाइ तुम ॥१॥
जहां जहां जाउं तहां मिलत है । भवव्याधी को बचाथ ॥ भाइ तुम ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या गुरुसेवा । करि लेवत शिस हात ॥ भाइ तुम ॥३॥

५७४ / आर्या

कोण असा भूमिवरी आहे कीं ज्यास नावडे हरि तो ।
झाला नास्तिक जरि तरि वक्ता त्याचीहि संमती हरि तो ॥१॥

५७५

शकटधाटीवृत्त. छक्कडचे चालीवर.

असि कोण लवंडीच्याला व्याली । जो हरिपदिं धाव न घाली ॥धृ॥
रांड कशाला प्रसूत झाली । यमपुरीची ठेवी केली ॥ असि ॥१॥
काय सटवी तेव्हां होती मेली । जन्मतांचि न बुंथी नेली ॥ असि ॥२॥
किति लेकाला बोलावी बोली । ज्ञानेश्वरवाणी शिणविली ॥ असि ॥३॥

५७६

वासंतीवृत्त. रा. यमन.ता.-तेताला.

गड्यारे म्हण नारायण नांव ॥धृ॥
भवसागरिं या ताराया । संति बांधिली नाव ॥ गड्यारे म्हण ॥१॥
संसारीं स्त्रीसुतवित्ताची । व्यर्थचि धरिसी हाव ॥ गड्यारे म्हण ॥२॥
राग नको धरूं मनि आपुल्या तूं । होउनि गर्वित राव ॥३॥ (य९उ.११६)
सर्वाभूती सद्गुरुकरुणे । पाही भगवद्भाव ॥ गड्यारे म्हण ॥४॥
ज्ञानेश्वरपदपंकजभजनीं । जीवन्मुक्तिस पाव ॥ गड्यारे म्हण ॥५॥

५७७

साममाणववृत्त. रा.- यमन. ता.-तेताला.

गड्यानों डिका कृष्णपदी । राहुं नका मायेमधीं ॥धृ॥
ब्रह्म मिळाया काय उतावेळ । भावचि साधा आधीं ॥गड्यानों ॥१॥
होइल तैसें हो संसारीं । बोला गोविंद सुधी ॥ गड्यानों ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणायोगें । सच्चित्सौख्यनिधी ॥ गड्यानों ॥३॥

५७८ / आर्या

शिवापमानक पुरुषा घाली विष्णूच नेउनी नरकी ।

यास्तव शिवविष्णूचे मानुनि साम्यास राहती नर कीं ॥१॥

५७९ / हिंदी

कुमारीवृत्त. रा.-पिलु. ता.- तेताला.

प्रेमबिन गाना रोना है ॥धृ॥
जगमो प्रभुबिन अन्नपानसो । पेट नरकसो भरना है ॥ प्रेमबिन ॥१॥
संसृतिपंक गिरे जीनेसे । गरभहि अच्छा मरना है ॥ प्रेमबिन ॥२॥
मनुखजनममा भक्ति भावतें । ज्ञानेश्वरपग स्मरना है ॥ प्रेमबिन ॥३॥

५८०

धात्रीवृत्त. मूळपीठ.- धनासरी. ता.-तेताला. गौण.-नारायण भजरे. या चालीवर

मुक्ती आस जरी । मनुजा शांती चित्तिं धरी ॥धृ॥
जें जें दिसतें तें तें नाशे । हाचि विचार करीं ॥ मनुजा ॥१॥
निजवर्णाश्रमकर्मा पाळुनि । सद्गुरु आणि घरी ॥ मनुजा ॥२॥
देहादी व्यतिरेक करोनी । साधीं भक्ति खरी ॥ मनुजा ॥३॥
ज्ञानेश्वरकरुणाबलयोगें । सुख बांधीं पदरीं ॥ मनुजा ॥४॥

५८१

इंदिरावृत्त. मूळपीठ- पिलु. ता.-तेताला. गौणपीठ - मज टाकुनि अवघ्या. या चालीवर

किति बोलुं जनाप्रति वाणी हो ॥धृ०॥ (य९उ.११७)
घडिभरि तरि या संसृतिमध्ये । स्मर मनिं सारंगपाणी ॥१॥
घडि घडि पळ पळ मोजितसे हा । काळ तुला निजपाणी ॥२॥
जलतरंगसम जाइल जीवित । नरतनु कांचनखाणी ॥३॥
प्रेमबळें घ्या साधुनि सत्वर । शिरिं आलंदिपपाणि ॥४॥

५८२

विशाखावृत्त. राग-सारंग. ताल-तेताला

नाहिं हा नूतन अवतरला ॥धृ०॥
लीला ऐकुनि अघटित ज्याची । जन बहु भव तरला ॥१॥
सहस्त्रवेळी आम्हि देखुनी । नित्य हृदयिं भरला ॥२॥
सोहं शब्दीं जपतां ज्याला । समाधि ये घरला ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या यद्दासी । गुण गाउनि विमला ॥४॥

५८३

लावणीवृत्त. मूळपीठ.-जोगी. ता.-धुमाळी. गौणपीठ.डफाचे किंवा 'जांबजांभळी' या चालीवर '

देव होउनी देव भजावा यापरि देती श्रुति ग्वाही ।



विष्णुभिन्न जो विष्णु पूजि त्या पूजाफल ते कधि नाही ॥धृ॥
अनन्यजनयोगक्षेमाते चालविता हा फणिशायी ।
ज्ञानेश्वरप्रभु वंदुनि भावे वृत्तिनिष्ठ सगुणि राही ॥ देव होउनी ॥१॥

५८४

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ.- भीमपलासी. ता.-धुमाळी. गौण.- जन्मुनि उगले. या चालीवर

मायाची बांधील जरी । काय मग मायिक ज्ञान करी ॥धृ॥
मायारहित श्रीहरिला । जातां शरणचि भव हरिला ॥१॥
भक्ति अभंग अक्षय कीं । नाहीं नामाला क्षय कीं ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु करिल कृपा । तरि हा मार्गचि मग सोपा ॥३॥

५८५ / आर्या

मृगजलसम संसारालागिं तराया न नाव काष्ठाची ।
जाणुनि ब्रह्म करावी हरिभक्ती अशि सुखोक्ति शिष्टांची ॥१॥

५८६

ब्रह्मज्ञानमदानें गोपीरमणा न मानि जो कोणी । (य९उ.११८)
त्या अधमाची यम तो करिं घेउनि शस्त्र छेदितो वाणी ॥१॥

५८७ / श्लोक

केलाचि संसार पुढें करावा । ऐशाच जीवी भरताति हावा ।
जो पुत्रदारादि प्रपंच दाटे । तों काळ येवोनि पुढेंचि थाटे ॥१॥

५८८ / आर्या

न कळूनि काळमहिमा म्हणती आम्हीच सर्वही कर्ते ।
जैसी दीपा पाहुनि घालीतां उडिस भृंगिका मरते ॥१॥

५८९ / श्लोक

नादें कुरंगा भय प्राप्त होय । रूपें पतंगापरि अंत ठाय ।
स्पर्शे स्वयें आकळिती गजातें । गंधेंचि तें बंधन अंडजातें ॥२॥

५९० / आर्या

रस देतां मीनातें लोभानें मृत्यु पावतो त्वरित ।
ऐसा एक एकची विषय परि प्राण सर्व संहरित ॥३॥

५९१

नर विषयपंचकातें भोगोनी पावतो न नर्क कसा ।
हो गांधर्वीहि परी कटिं जडला जेविं वस्त्रिंचा चिकसा ॥४॥

५९२ / मोहरी / मराठी-हिंदी

मदनिकावृत्त. मूळपीठ.- जोगी. ता.-दीपचंदी. गौणपीठ.- राधे घडिघडि. या चालीवर

बाजे झननन काल का डंका । सावध हो उमज मनीं रंका ॥धृ॥
साच किति सांगू तुज लोकीं । नाहिं सुनताहै तूं बात निकी ॥
मंदिर माडी तेरी ना मेरी । माझी म्हणुनी कां घालीसी फेरी ॥
झाला वृद्ध लज्जा चित्ति धरीं । जीनेतक कहो राम हरी ।
आयुष्य को राख राम सुमर । भोगुनी दारसुख व्यर्थ न मर ॥
ज्ञानेश्वरप्रभु सत्ताधीश । जाकी कृपा पावत जगदीश ॥ बाजे झननन०॥१॥

५९३

रा. सारंग ता.-तेताला. तिलोत्तमावृत्त.

रामकृष्णहरि म्हण वदनि गड्या ॥धृ॥
करुणाघन जानकिजीवनतनु । नामें फेडी भवलुगड्या ॥१॥
अक्षय संकर्षण म्हणति जया । पुरुष पुराण श्रुति उघड्या ॥२॥
अलकावतिवल्लभ करुणाघन । पाय उपासी सर्व घड्या ॥३॥ (य९उ.११९)

५९४

नवसाकीवृत्त. मूळपीठ. रा.-जोगी. ता.- धुमाळी. गौणपीठ.'शांतमतीने' या चालीवर.

व्यवहाराची शिष्टाई तूं श्रेष्ठापुढेहि करिशी ।
बायकोच्या माकडा बे सेखी कैसा तरसी ॥
उदरचि कां भरसी ॥ घेतां नाम काय मरसी ॥१॥
नयनी नसता कांता तुजला सदनांतुनिही काढी ।
ग्रामी होता अपकीर्ति मुखिं पैजारचि ते झाडी ॥
उदरचि कां भरसी ॥ घेता नाम काय मरसी ॥२॥
मायबाप तुज मोठे करिती तो उपकार स्मरसी ।
ज्याने दिधली नरतनु त्या प्रभुलागी कां विस्मरसी ॥
उदरचि का भरसी ॥ घेतां नाम काय मरसी ॥३॥
सांगावे तुज बहुतप्रकारें परि ना वळसी बापा ।
ज्ञानेश्वरप्रभु तात दयाळू स्मरणि कळे पथ सोपा ॥
उदरचि कां भरसी ॥ घेतां नाम काय मरसी ॥४॥

५९५

प्रमुदितावृत्त. मूळपीठ. रा.-जोगी. ता.-धुमाळी. गौणपीठ.-कोठें नच जावें. या चालीवर

उगेंचि वटवटतां वटवटतां । हरिपदिं नच का झटतां ॥धृ॥
सांडुनि हरिभजनाला । खडखड शास्त्रवाचनीं झटतां ॥१॥



जाउनि मुक्तीच्याहि पदावरि । अज्ञानें आपटतां ॥२॥
न ओळखोनी श्रीरंगातें । विषयरंग कां लुटतां ॥३॥
हरिप्रेमाच्या गांठित असतां । निजकर्मानें तुटतां ॥४॥
तारुण्याची शक्ति असोनी । काळा हातीं गठतां ॥५॥
अलकावतिवल्लभचिंता मग । जाइल भव-लंपटता ॥६॥

५९६ / आर्या

निर्गुण निर्गुण म्हणुनी शिणवी जो जीभ भक्तिवाचोनी ।
त्यानें कुळ बुडवीलें नरजन्मी वेदशास्त्र वाचोनी ॥१॥

५९७ / कांहीं तरी कर

प्रमुदितावृत्त. मूळपीठ.-जोगी. ताल-धुमाळी. गौणपीठ - कोठें नच जावें. या चालीवर

अजुनी करिं कांहीं करिं कांहीं । विचारुनी मनिं पाहीं ॥ अजुनी ॥धृ॥
(य९उ१२०)मुळिचा असुनी परब्रह्म तूं । म्हणसी कां मी देही ॥अजुनी॥१॥
भोगुनि नाना पुण्यपापफल । झालासी नर देही ॥ अजुनी ॥२॥
नरतनु गेल्या मग शत कल्पहि । अवकाशचि तुज नाहीं ॥ अजुनी ॥३॥
ज्ञानेश्वरकरुणे घरिं राहुनि । यशुमतिनंदन बाहीं ॥ अजुनी ॥४॥

५९८ / हिंदी

रसालावृत्त. मूळपीठ-सारंग. ता.-तेताला.गौणपीठ- हरणारे समझ समझ वनचरना रे.या चालीवर

मनुखजनम पायके नहीं सठ । शिश्नोदर भरणा रे ॥ भजमन ॥१॥
एकबेर लैं नाम बदन तो । क्रोध मदन मरणा रे ॥ भजमन ॥२॥
ज्ञानेश्वरकरुणाबलतें झट । भवसागर तरणा रे ॥ भजमन ॥३॥

५९९

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ.- यमन ता.- कव्वाली. गौणपीठ.-छक्कडचे या चालीवर.

चला बाई कालिंदितीरीं नाहा । हरि डोळे भरोनि पहा ॥धृ॥
घडिभरि तरि गृह धनसुत सोडुनि । घनतनु जवळी राहा ॥ चलाबाई ॥१॥
नवनित नवघन मूर्ति सांवळी । नयन भरुनी पहा ॥ चलाबाई ॥२॥
पाहुनि सुंदर वदन अप्सरा । म्हणती अहा अहा ॥ चलाबाई ॥३॥
ज्ञानेश्वरकरुणेनें तनुमन । हरिचरणींच वाहा ॥ चलाबाई ॥४॥

६०० / आर्या

आयुष्य काळ खातो कां रे निश्चिन्त बैसलां सकळ ।
ज्ञानेश्वर मुखिं म्हणतां होवोनी ब्रह्म जाल हे निखळ ॥१॥

६०१

रोचनीवृत्त. लावणीभेद. मूळपीठ.-जोगी. ता.-धुमाळी.गौणपीठ.-

''क्या निकला सुभेका तारा मुझे छोड चला'' या चालीवर

सोडुनियां धनसुत चुटका । प्या भक्तिरसायन घुटका ॥धृ॥
नवनित नवल नववारी । कारणतनु भवदव वारी ॥
भजनिं ये नयनिं नव वारी । भवभाव सहज मग फुटका ॥१॥
हे पूर्वि न नाहीं पुढती । परि मध्यचि भाव विरुढती ॥ (य९उ.१२१)
आपसया माजी लढती । हा रज्जुफणिभ्रम लटिका ॥२॥
हें भवभयदुःखा शमवी । हें षडरी सहजचि भ्रमवी ।
हे हरिपदि नेउनि रमवी । ज्ञानेश्वर करुणे सुटका ॥३॥

६०२

सुशीलावृत्त. मूळपीठ.-भीमपलासी. ता.-धुमाळी. गौणपीठ.-''नारायण भजरे मानस'' या चालीवर

नको कोरडे बोल ॥ हरिविण ॥॥धृ॥
अघटितघटनापटुपण करि जी । तीप्रति पाडी झोल ॥१॥
जळो ज्ञान तें ज्या स्थळिं नाहीं । प्रीतिजान्हवी ओल ॥२॥
अलकावतिपतिकन्या झाली । कृष्णबटकि बिनमोल ॥३॥

६०३

जयावृत्त. मूळपीठ.-झिंझोटी. ता.-दादरा. गौणपीठ.-''पांडुरंग स्मर अभंग'' या चालीवर.

बैसलासि स्वस्त कसा अजुनि मानवा रे ।
बहुत पुण्यें पावलासि जन्म हा नवा ॥धृ॥
खेळतांचि बाळकपण हरिविले गड्या रे ।
तरुणपणीं युवतिसवें घालिसि फुगड्या रें ॥१॥
थर थर थर वृद्धपणीं शीर कांपता रे ।
पळ पळ पळ जाण तुला काळ मापता रे ॥२॥
ज्ञानेश्वरकरुणाघन शिकविति बरें रे ।
मानितां तदीय वचन बद्धता नुरें रे ॥३॥

६०४ / हिंदी

रसालावृत्त. मूळपीठ.-जोगी. ता.-तेताला. गौणपीठ.- हिंदुस्थानी भजनाचे चालीवर.

भज मन राधामुकुंद प्यारे ॥धृ॥
भू जल तेज पवन गगनु में । ब्यापि रहे छबि वारे ॥१॥
निर्गुण होकर रास मंडलमों । प्रेम गोपिकर धारे ॥२॥
जुगुलकिशोर सुसुमिरन ते स्मर । किमपि बाण नहिं मारे ॥३॥



अलकावतिजीवन करुणा बल । हिय पंकज पिय ठारे ॥४॥ (य९उ.१२२)

६०५ / हिंदी

संदीपनीवृत्त. मूळ.-जोगी. ता.-तेताला. गौणपीठ.-खंजिरी भजनाचे हिंदुस्थानी चालीवर.

भज ले सियाबर राम ॥ प्यारे मन ॥धृ॥
राम भजन तें रामहि आयके । वारत मनको काम ॥१॥
लछुमन जानकी शांति गनि । आत्मा श्रीरघुराम ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणाबलतें । ''तत्त्वमसि'' निज नाम ॥३॥

६०६ / आर्या

निजपित्तदृष्टियोगें भासे जैसा सुदीप तेजमय ।
तैसें निजप्रमादें भासति संतहि समस्त कोपमय ॥१॥

६०७

ब्रह्मज्ञानहि झालें परि हृदयींची न जात दुस्तरता ।
सुकुमार हरिपदाब्जा स्मरतां भावें न पात्र संसरता ॥२॥

६०८

झालें ब्रह्मज्ञानहि परि प्रारब्धाहि भोगणें प्राप्त ।
श्रीकृष्णपाय कोमळ हृदयीं धरितां समस्त पर्याप्त ॥३॥

६०९

ब्रह्मज्ञानाऽहंकृत फसवी प्रारब्ध त्या महामूढा ।
यास्तव श्रीकृष्णाच्या गृहिणी झालों समस्तही गूढा ॥४॥

६१०

आतां हरि झाला तूं तरि हरिपण देउनी हरि करिं गा ।
दोन्ही एक मिळोनी ज्ञानेश्वरपादसेवना करिं गा ॥५॥

६११

कळलीं नसतील जरी माझी वाक्यें तरी करीं मनना ।
ओढीतिल नाहिं तरी विषयेंद्रिय साधुनी रिपूहनना ॥६॥

६१२

सुशीलावृत्त. रा.-यमन. ता.-तेताला.

न मिळे आत्माराम ॥ हरिविण ॥धृ॥
भक्तिवाचुनीं चित्त रोधितां । उसळें अतितर काम ॥१॥
रामकृष्ण हरि वदनीं न गातां । व्यर्थ प्राणायाम ॥२॥
सगुण सावळें सुंदर ध्यातां । उघडे निजसुखधाम ॥३॥

अलकावतिपतिनंदिनी विनवी । लक्षुनि हरिपद वाम ॥४॥ (य९उ.१२३)

६१३

श्रीमतीवृत्त. रा.-यमन. ता.-तेताला.

हें मुखपाटव सोड ॥धृ॥
घडि घडि वाद करोनी । केली व्यर्थ कुयुक्तिजोड ॥१॥
मनुष्यजन्मी येउनी अंगी । लावियली त्वां खोड ॥२॥
ज्ञानेश्वरकरुणेनें घे घे । नाम हरीचें गोड ॥३॥

६१४

सुशीलावृत्त. रा.-भूप. ता.- राजविद्याधर (तेताला)

मानस जप राधागोविंद ॥धृ॥
भवजलधींतुनि भय संत्रस्ता । काढी जो सुखकंद ॥१॥
नर नारी तरु आदिक तरती । धरितां यत्पदछंद ॥२॥
श्रीगुरुज्ञानेश्वर मी यांचे । पूजीं पदअरविंद ॥३॥

०००

*''स्त्रीपुरुषाणां कृपयैव संसारं करोमि, नान्यथास्वार्थम्'' इत्याशंक्योत्तरमाह* -

(भालेरावगुरूला नागपुर मुक्कामी उत्तर.)

६१५

मृदुक्रणन्ति वृत्त. मूळपीठ.-भूप. ता.-धुमाळी. गौण.-

कधिंतरी हरशिल रे । कितिकांवरी करुणा करिशिल ॥धृ॥
देतां स्त्रीपुत्रातें धन जन । मार्गी किति संहरशिल रे ॥१॥
रूसतां बाइल पहिली मग तूं । लग्नें कितितरि करिशिल रे ॥२॥
पाहुनि यमदंडाच्या बंडा । शेवटी मागें सरशिल रे ॥३॥
पापें धन मेळवुनी अंती । घर चोराचे भरशिल रे ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभुतात नमुनी । संसृति किंपरि तरशिलरे ॥५॥

६१६ / श्लोक-मालिनी

हृदयिं उदय होये प्रेमसंपर्क जेव्हां ।
यशोमतिसुत वारी ताप त्रैविध्य तेव्हां ॥
जळति पुढति पूर्वी जाहलीं सर्व पापें ।
मिळति सकळ शांती श्रीगुरूच्या प्रतापें ॥१॥

६१७ / द्रुतविलंबित



पळ जरी घननीळ कथामृता । मिळसि तैं मळ देखसि अमृता ।
परि गुरुचरणांबुज सेविजे । हृदयिं तैं हरि बांधुनि ठेविजे ॥२॥
(य९उ.१२४)

६१८ / वसंततिलका

बहु ज्ञानें केली सकल महि आक्रांत मनुजा ।
बहु श्रांता कान्ता करुनि रति त्वल्लब्धतनुजा ॥
बहु स्वर्गामध्यें मिळविलीं सुधापूर्ण नदकें ।
सख्या चित्ताऽलंदीपतिपदसमानंद वद कें ॥३॥

६१९

सदा सेवी पाया वचन मनकाया वळवुनी ।
न ये कामा जाया धनतनु उपाया मिळवुनी ॥
कृपाछायासंगें निवटिं निजमायागत अका ।
अलंदीशा ताता सकल असु-चिन्तार्पिशी न कां ॥४॥

६२०

अलंदीवैकुंठस्थितिकरुणकंठद्युतिमणी ।
निजज्ञानज्ञांची जननि तूर्या प्रेमरमणी ॥
परं गंगेन्द्राणिजनक पदवी ज्या सुचरणा ।
सदा तद्दास्याहो खगपतिपदारूढसुमना ॥५॥

६२१

सामत्रिष्टुपवृत्त. मूळपीठ.-देश. ता.-तेताला. गौणपीठ.- सज्जनजनहो यारे. या चालीवर.

रामकृष्णहरि गा रे । काम करुनि उगा रे । न म्हणे आज मघा रे ।
विषय नाशिवंत हे पाहुनी । संतवचन उमगा रे ॥धृ॥
जा जा झडकरि जा रे । गुरुपदकमल भजा रे । महावाक्य उमजा रे ।
काळ पुढें हें जाणुनि सोडा । धनकामिनि गमजा रे ॥१॥
मिळवुनि पवन-मना रे । सोहं-हंस म्हणा रे । लाउनी निज नयना रे ।
विवेकसेना घेउनि उठवा । षडरीच्या चयना रे ॥२॥
कुरति त्यजा वामा रे । हे युवति नव्हे पामा रे । अंति न ये कामा रे ।
यास्तव घ्या कळवळुनि । सदा अलकावतिपतिनामा रे ॥३॥

६२२ / श्लोक

जडल जडल बुद्धी कृष्णपायीं झटूनी ।
पडल पडल तेव्हां संसृती ही तुटूनी ॥

मग गुरु करुणेचा बिंदु जीवीं विलासे ।
परचितिसुखिसिंधू विश्विं तैं पूर्ण लासे ॥१॥

६२३

निगमगणहि शब्दीं वर्णुनी नेति नेति ।
परम पथित लक्ष्यीं ऐक्यता दाखवीती ॥
शिवमतिगति मूर्ति आश्रयीलीं सये ती ।
व्रजयुवति मिळाया धांवुनी जीस येती ॥२॥ (य९उ.१२५)

६२४

सदयहृदय देवा तापला देह माझा । लवकर हरि आणि सिद्धसाधूसमाजा ।
तंववरि परितापू त्वत्पदा जों न सेवी । म्हणवुनि करुणार्द्रा मस्तकीं हस्त ठेवी ॥३॥

६२५

लावणीवृत्त. मूळपीठ.-पूर्वी. ता.-धुमाळी. गौणपीठ.'तार तार भवपार करी' या चालीवर.

कृपावंत भगवंत ओळखुनि षडरिपुभय सोडी ।
संतसुजनगुरुगृही जावुनी पंथाग्रह सोडी ॥धृ०॥
मनोबुद्धि विषयाकृतिवृत्ती स्थळिहुनी परि ओढी ।
नयन करुनि विपरीत परीता जोड ब्रह्मजोडी ॥
सोहंभावे प्रणवसुखाची घेउनि निज गोडी ।
चिदानंद चिद्रूप पाहुनी वारि विकृतिकोडी ॥
दासि कल्पना काशित सोडुनि भवभावहि मोडी ॥
संतसुजनगुरुगृहीं जावुनी ॥१॥
बहुविधमति हरि विचारिला हे आधिं मनी आणी ।
प्राण गेलिया वदूं नको कधिं अनृतमय वाणी ॥
निर्गुणिं प्रेमा सगुणिं नयनिं जल गुरुचरणा न्हाणी ।
न्हाणता न्हाणता करी हे अमृतहृदय न्हाणी ॥
अंतर निर्गुण बाह्य सगुण हे जाणुनि मति फोडी ।
संतसुजन गुरुगृहीं जावुनी ॥२॥
इंद्रिय जंववरि विषय-चव तंववरि ही कुळयाती ।
नवघनतनु पाहतां दृष्टि मग तनुभावहि जाती ॥
प्रीतीवांचुनि रीती लटकी गोष्टि परी जाती ।
न करितां पक्कान्न, नाम करिनाचि उदरतृप्ती ॥
ज्ञानेश्वरप्रभु तात करीं तत्पदसेवा थोडी ।



संतसुजन गुरुगृहीं जावुनी ॥३॥

६२६

सामकामदावृत्त. मूळपीठ-झिंझोटी. ताल-दादरा. गौणपीठ- रत हरि पद कमल कंद.या चालीवर.

चरण चारु चिंतुनि मनिं नयनजळीं न्हाणी ॥धृ॥
नाम करित पुनित तेविं करि न गांगपाणी ।
सदय करुन उदय चिती षड्रिपु-गदहानी ॥ चरण चारु ॥१॥
ब्रह्मरूप अंधकूप दोन्हि एक काळी ।
अब्दवरी शब्दघटन न मिळे वनमाळी ॥ चरण चारु ॥२॥ (य९उ१२६)
अक्षरार्थ करुनि वृथा चित्तशुद्धि नाहीं ।
बाह्य तसा अंतरही एकरूप राही ॥ चरण चारू ॥३॥
अलकावतिपतिकन्या विनवि बद्धपाणी ।
दीन होउनी मनांत ध्याइ चक्रपाणी ॥ चरण चारु ॥४॥

६२७ / चौपाइ - (तुकबंदी)

हरिपदकमल सकलमति आणी । त्यजुनि मताग्रह करिं निज जाणी ॥
अक्षय आंधि होइं निजचित्तीं । देइं तिलांजुलि गृहसुतवित्ती ॥१॥

६२८

अंतरिं करि निर्गुणमय वृत्ति । बाहेरि सेवि सगुण सुवृत्ती ॥
वाचे वद हरि कृष्ण मुकुंद । पवनीं चालवि सोहं छंद ॥२॥

६२९

मनिं करि सगुण नीलतनुध्याना । बुद्धि लाविं निर्गुण प्रमाणा ॥
जीवब्रह्मएकता करावी । सकल जनीं निज नीति भरावी ॥३॥

६३०

ज्याचें ज्यापरि ईशउपासन । त्यापरि करिं उपदेश सुवासन ॥
अंतर बाहेर निर्मळ राहे । तुझी परिक्षा तूं मनिं पाहें ॥४॥

६३१

किंचितही न करीं कुटिलाई । गुरुचरणीं निजसुख समुदाई ॥
व्यर्थ वचनरचनाप्रति त्यागीं । हो सज्जनवचनामृतभागी ॥५॥

६३२

वाद त्यजुनि करिं हरिअनुवादा । जिंकुनि मन मग करीं विवादा ॥
वेदविहित पथ जाण दयाळा । वारिं त्वरित जनभवविभयाला ॥

भव वैभव हे सकळहि सोडी । क्षणभरि लावुनि दाखवि गोडी ॥६॥

६३३ / दोहा

रामकृष्ण हरि गाउनी क्षालीं तनुमनपाप ।
सगुणनिर्गुणीं एकता पाहिं धरुनि अनुताप ॥१॥

६३४

जगीं सर्व सुखी०, यावर उत्तर –

सदासर्वदा सौख्य त्यालागिं आहे । समाधान ज्याच्या सुचित्तांत राहे ॥
असे कर्म तें शरीराचि माथां । भजें तूं स्वयें आवडी कृष्णनाथा ॥१॥

६३५

उपेक्षू नको०- यावर उत्तर -

उपेक्षा नव्हे ब्रह्मरूपे कदाही । उपेक्षा असे देहरूपें सदाही ॥
सदासर्वदा ब्रह्म तेंही नित्य आहे । घडे देहप्रीती तया मिथ्य पाहें ॥२॥

६३६ / आर्या

शुक सांगे कुरुराया हरिपाया एकदाचि सेवि मन ।
मग चितिरूपचि काया-सुत-जाया वाटतात्ति कहिं मम न ॥१॥(य९उ.१२७)

६३७ / श्लोक

बोलतां हरिपदाम्बुज गावें । मानसी हरिपदाम्बुज ध्यावें ॥
जेवितां हरिपदाम्बुजपुष्टि । निद्रया हरिपदाम्बुजिं तुष्टी ॥१॥

६३८

जयावृत्त. मूळपीठ.- झिंझोटी. ता.-दादरा. गौणपीठ.- रत हरिपद कमलकंद, या चालीवर.

तोचि संग वाढविजे जेथ कृष्णनामीं ।
वाणिचित्त गुंतुनिया काय गांगग्रामीं ॥धृ॥
भेटतांचि भूमिजनही विपुल कुटिल कामी ।
त्यांत गुंतुनीच मृत्यु करिल चाळ कामीं ॥१॥
विषयरंगभंग करुनि संतसंग साधीं ।
सोडुनिया गर्व सर्व भक्तिपर्व साधीं ॥ तोचिसंग ॥२॥
षडरि आरु[१] करुनि चारु चरणप्रीति सेवीं ।
वाचुनियां मुक्त होई ग्रंथ ज्ञानदेवी ॥३॥ (१.मारून)

६३९

मधुर सुखद मूर्ति श्रीहरीची पहावी । तन मन धन वृत्ति सर्व पायीं वहावी ।
उलटुनि तरि साही शत्रु जिंकोनि घ्यावे । मदनदहनमित्रा चुंबनी मेळवावें ॥



६४० / आर्या

बोधहि करितां जो करि कानाडोळा धरूनि अळस मनीं ।
त्या इहपरसुख नाहीं दंडी यम हेंचि जाणिजे स्वमनी ॥१॥

६४१ / दिंडी

अभीमानें व्यापिला देह सारा । मेळवीला भोंवते कां पसारा ॥
काम करितानां नाम मुखीं नाहीं । म्हणसि भेटेना देव कसा कांही ॥२॥

६४२ / श्लोक

निगम वदनिं ही यत्पूर्ण गोपांगनांचे ।
हरण मन करी जो पूर्ण गोपांगनांचें ॥
उदकीं लहरि जेवीं क्रीडती एकभावें ।
हरिचरण सरोजीं चित्त हे तेविं व्हावे ॥३॥

६४३ / आर्या

कनक कनक सम वाटे कांता कांतार वाटतें सुमनीं ।
हे दृढ होइल तेव्हां जैं हरिपायास पूजिशिल सुमनीं ॥१॥

६४४

प्रेमें सद्गद होउनि वदनीं श्रीकृष्णनाम आनयन ।
हें न करुनि मग हाते होतें तरि काय दाबुनी नयन ॥२॥

६४५

प्रेमळ सुजनालागी द्विजकांचननगरिदानि काय न दे ।
यास्तव पतिव्रतांना तूं होउनि कृष्णपत्नि वायन दे ॥३॥ (य९उ.१२८)

६४६

विप्र राज्ञ विट् शूद्र म्लेच्छ पशू बा तयाहुनी हिनसे ।
जडतां हरिपायीं मग महतांचा प्रीतिनाश कधिंहि नसे ॥४॥

६४७

जयावृत्त. मूळपीठ.-झिझोंटी. ता.-दादरा. गौणपीठ.-पांडुरंग स्मर अभंग या चालीवर.

मधुर मेघशाम नाम वाणिनें वदा हो ॥
नाहीं तरि झडकरि यम करिलचि सवदा हो ॥ मधुर ॥धृ॥
चरण चारु सुमन सुमन करुनियां पुजा हो ।
विषयवाट बिकट घाट जाणुनी न जा हो ॥ मधुर० ॥१॥
मदन कदन सुमन सदन वदनि नित्य गा हो ।
चयन करुनि शयन नाकिं शिणचि तो उगा हो ॥२॥

अलकापुरिराजकाज करिल सकल कांहीं ।
विषम शमनि परम जिथे भिन्न भाव नाहीं ॥ मधुर० ॥३॥

६४८ / हिंदी

विधुद्युतीवृत्त. मूळपीठ - पिलु. ता.-धुमाळी. गौणपीठ.

पाइ जनम मानुखकी भाई गुण गोविंद के गाना बे ॥
श्रीकमलापतचरण नखनमों दिल अनमोल लगाना बे ॥धृ॥
माया जायादि ये जानि मन जल्द छोरकर जाना बे ।
संतसंगमो अंग घुमाकर तनकी आग बुझाना बे ॥१॥
अंधा हो परधन परनारी किमपी मन नहिं लाना बे ।
ध्यान पकडकर खडा रहे तब कबु दिलको न हिलाना बे ॥२॥
सुदिन रातपर सेवा करकर गुरूग्यानकू लेना बे ।
गुरु कृपाबिन ब्रह्मसदनका ताला कबहुं खुलेना बे ॥३॥
नैन बैन करि एक देख फिर समान मट्टी सोना बे ।
अलकावतिपति चरणसौख्य में शांत कालत्रय सोना बे ॥४॥

६४९ / हिंदी - मराठी

सुशीलावृत्त. मोहरी. रा.-यमन. ता.-तेताला (राजविद्याधर)

रे मन संतनचरणन लाग ॥धृ॥
कामिनि नंदन कांचन हेतू । स्वप्नीं कधिंहि न माग ॥१॥
ज्ञानसत्रमों मार जलदि कर । कोप काम मद छाग ॥२॥ (य९उ.१२९)
गोपिसंगती प्रीति मिळवुनी । घे रमणांकविभाग ॥३॥
अलकावतिपतिचरणकृपावस । जुदुपतिपद अनुराग ॥४॥

६५०

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ. यमन. ता.-तेताला. गौणपीठ.- बाई उठा उठा या चालीवर

जय विठ्ठल जयहरि विठ्ठल ॥धृ॥
नाम स्मरतां अतितर भावें । मोह सकल हा फिटल ॥१॥
संतसंगती धरितां नित्यचि । संसृति समुळचि हटल ॥जय ॥२॥
देह आत्म हे दोन्हि निवडितां । हृदयग्रंथि ते सुटल ॥ जय ॥३॥
तोचि परी हे पावल योगी । घडि घडि हरिपदिं झटल ॥ जय ॥४॥
श्रीज्ञानेश्वरकरुणायोगे । दृश्यभ्रांतिहि फिटल ॥ जय ॥५॥

६५१

चारुचर्यावृत्त. रा.-बेहाग. ता.-तेताला.



गोविंद गिरिधर गावो ॥धृ॥
गिरिधररसरसना लपटायकें[1] । गिरिधरही बन जावो ॥१॥
गोविंद शिव हे गिरिधरशक्ति । सोहं छंद चलावो ॥ गोविंद ॥२॥
शाम नयन बिच राखिराखि करि । सज्जन रवीच मिलावो ॥३॥
अलकावतिपतिचरणसलिलरुह । ये मनमधुप सुलावो ॥४॥

(१.यांतील 'के' हा शब्द हिंदुस्थानी भाषा सरणीप्रमाणें ऱ्हस्व झाला आहे. उदा. जे आचरहिते)

६५२ / हिंदी

रसालावृत्त. मूळपीठ.-जोगी. ता.-तेताला. गौण.-हिंदुस्थानी भजनाचे चालीवर

भज मन रघुनंदनचरणा रे ॥धृ॥
कमलनयन शयन फणिपीठपर । जीतत असुर रणारे ॥१॥
छोरी राम काम रामामों । गिर गिर नहिं मरनारे ॥२॥
ज्ञानेश्वरकन्याबचननको । कंठमाल करनारे ॥३॥ (य९उ.१३०)

६५३

कंचुकीवृत्त. मूळपीठ- भीमपलासी. ता.-धुमाळी,गौणपीठ.कशाला संन्यासी झाला या चालीवर.

तंवची साधुवरी सत्ता । जंव ही कळते त्वंतत्ता ॥धृ॥
नातरि व्यर्थचि मद वाढे । वसवी मनी कुमदवाडे ॥१॥
यास्तव गुरुपद मनिं ध्यावें । वदनी ममपतिगुण गावे ॥२॥
मग श्रुति सर्वहि त्या ओपी । दावी भजनकृती सोपी ॥३॥
आम्ही ज्ञानेश्वरकन्या । होऊं हरिकान्ता मान्या ॥४॥

६५४

कंचुकीवृत्त. मूळ.-यमन ता.-धुमाळी. गौणपीठ-कशाला संन्यासी झाला या चालीवर

तो जरि झाला अपवर्गी । नये तरि गोपीजनवर्गी ॥धृ॥
नाहिं ज्या हरिभजनस्पृहा । तया यमही मारीत महा ॥१॥
सोडिना कुरंगीसंग तया । न ज्या हरिस्मरणीं सुरंगतया ॥२॥
अलकावतिपतिजाकान्ता । ध्याति मुनिजन एकान्ता ॥३॥

६५५

सामनुष्टुप मूळ.-यमन. ता.-तेताला. गौण.-बाइ उठा उठा, या चालीवर.

जय विठ्ठल जय जय ॥धृ०॥
विठ्ठल विठ्ठल वदनीं गातां । काळपाश हा तुटल ॥१॥
नयन भरोनी मूर्ति पाहतां । जीवचि हरिमय घटल ॥२॥
अश्रु भरोनी पाय क्षाळितां । हाके सरसा भेटल ॥३॥

ज्ञानेश्वरप्रभुकरुणायोगें । येथचि मुक्ति प्रगटल ॥४॥

६५६ / हिंदी

सामकामदावृत्त. मूळ.-यमन. ता.-दादरा. गौण.- 'रत हरिपद' या चालीवर.

गावहुं गुण रे मानस नंदजीके लालके ॥धृ॥
गरभ बीच कीच पऱ्यो वन्हि सींच डारके ।
बाहे निकसि विसरो नाम दुःख भोगे वारके ॥१॥
तरुणपने होष गयो वामकाम पालके ।
भ्रांति भयी चुंबनतें कामिनिके गालके ॥ गावहुं ॥२॥ (य९उ.१३१)
जरठ तनू होय गयी रस्से भये बालके ।
थूकथूक रंगि दिवाल कहिं न जाय हालके ॥ गावहुं ॥३॥
फिरतो बात न रहेंगी फांस परे कालके ।
याहितें हुशियार होहु बिखयको निकालके ॥ गावहुं ॥४॥
ज्ञानेश्वरचरणकमलस्थान करो भालके ।
देखो हृदि गोपाललाल गुरुबचन सुचालके ॥ गावहुं ॥५॥

६५७ / हिंदी

कर्पूरिकावृत्त. रा.-हमीरकल्याण. ता.-तेताला.

ये दुनिया सब झूटनकी ॥धृ॥
जननमरणबिच कीच बहन चलि । कोई नाहिं सुनत किनकी ॥१॥
जहां जहां देखूं तहां सब मूढहि । आशा राखत धनतनकी ॥२॥
नरक जाय सो नरकहि रोवे । सुरपुरचाह औरतनकी ॥३॥
अंदर भरि है बिख सुं विचारी । ऊपर लागत माखनकी ॥४॥
आशा ज्ञानेश्वरनंदिनिपति । पदपंकजरज लाखनकी ॥५॥

६५८ / श्लोक

गुरुवचन सुधा जो आयके नित्य कानीं ।
दुरित विषम वाणी तो न माने कहाणी ॥
परि नर नरकीं ते गोविले जे दुरीशे ।
उदयहि जरि झाला भूगृहाकें प्रकाशे ॥१॥

६५९

सामकामदावृत्त. मूळपीठ.-यमनकल्याण. ता-दादरा गौणपीठ. रतहरिपद कमल, या चालीवर.

जलजवदन जलदतनू मधुर गीति गावा ।
नमन मनें करुनि गमन न करि शमन गावा ॥धृ॥



विभव सकल मृगजलसम बोलविले वाचे ।
त्यजुनि म्हणुनि आवडिनें कृष्णभजनिं नाचे ॥१॥
सुजनपुजन करुनि सदा कुजनसंग वारी ।
रामकृष्णनाम म्हणुनि प्यावें गांगवारी ॥२॥
अलकावतिकांतपदा नमुनि शुद्ध भावें ।
नमकभाव सकल हरुनि नम्य होउनि जावें ॥३॥ (य९उ.१३२)

६६० / शिव भजन

रमावृत्त. रा.-हमीरकल्याण. ता.-तेताला (राजविद्याधर)

वाचे शिव शंभू गा रे । झडकरि रोधा या भवनदिच्या आवृतवेगा[1] रे ॥धृ॥
हैमवतीपति करुणाघन विभु । विनाऽन्य न सगा रे ॥१॥
घेउनि वज्रविवेक करिं करा । चूर कुधिनगा रे ॥२॥
धृतशूल सुनाभ भूतपालक । निज हृदयिं बघा रे ॥३॥
श्रवण नयन मन पवन मेळवुनि । अक अणु नुमगा रे ॥४॥
ज्ञानेश्वर गुरुनाथ भजावा । होउनि सम गा रे ॥५॥ (१.भोंवरा)

६६१

कंचुकीवृत्त. मूळपीठ.-जोगी. ता.-धुमाळी. गौणपीठ-नृपममता रामावरती, या चालीवर.

मुरलीधर वदनीं गावा । जावें न संयमनीगावा ॥धृ॥
श्रुतिवदनविहित अधिकारी । यद्व्रजनानें अविकारी ॥१॥
आधी मन शुद्ध करावें । मग हरिचें ध्यान धरावें ॥२॥
हरि आणि आपण एक । हा धरिजे मुख्य विवेक ॥३॥
ज्ञानेश्वरसद्गुरुचरणा । भजुनी मुकती जनिमरणा ॥४॥

६६२ / हिंदी-मराठी

कंचुकीवृत्त. मूळपीठ-पिलु. ता-धुमाळी. गौण-कशाला संन्यासी. या चालीवर.स्वाश्वासन.मोहरी

म्हारो भव कौंन निवारे । दुस्तर मायामय वारे ॥धृ॥
भवदव अनुभव ये जद[1] ही । हरि चारिल निजप्रेम दही ॥१॥
अव्वल अपनी सुधि करनी । गुरुवचनें ऐकुनि करणी ॥२॥
पकरनि वाट सु निज हितकी । तनुपवनमनधिबिरहित की ॥३॥
अनुहत मुरली को सुनना । निजरूपचि आणुनि मनना ॥४॥
अलकावतिपति चरणन की । आशा तरि जनि-मरणनकी ॥५॥ (२.जेव्हा)
(य९उ.१३३)

## ६६३ / योगातील उणीव

लावणीवृत्त. मूळपीठ.-यमन. ता.-धुमाळी. गौण.'अमोल काया' या चालीवर.

योग कशाला याग कशाला जंव नाहित गुरुचरण मनी ॥
त्यजुनि भवनवन सेवुनि न सुटे हृदि जडली मनिशा रमणी ॥धृ॥
कळकळ वळवळ करुनि विकळ मुनि सकळ जाहले भुलुनि जिला ।
जप तप करुनी परि नच ज्यांचा लोभ काम दंभहि निजला ॥
योगि म्हणविती बुद्धि शिणविती भेद ठेवुनी तुला मला ॥
निंदिति युवती परि निज कुमती अंतर भाव नसे दमला ॥
यास्तव हरि हरि गाउनि वदनी अनुसर झडकरि मन शमनी ॥१॥
हृदयकमळि वनमाळी धरुनी नयन भरुनी प्रेमजळे ।
न्हाणि आवडी शांतिकावडी ब्रह्मकपुष्टि तदा पघळे ॥
मायामय जग सत्यवृत्ति ही नामस्मरणें अवघि गळे ॥
जळे मान अपमान चहूंकडे सच्चित्सुखसविता उजळे ॥
श्रीज्ञानेश्वरतातपदाम्बुजयुगल पुजुं चिन्मय सुमनी ॥२॥

## ६६४

क्षमावृत्त. मूळपीठ - जोगी. ता.-धुमाळी. गौणपीठ.-कोठे नच जावे, या चालीवर

या जगीं तो तरला रे तो तरला ॥ या जगिं ॥धृ॥
धनसुतकांता हरिची चिंता । करितां सकळ विसरला ॥१॥
मन इंद्रियविषयांतुनि काढुनि । ज्ञानें जिनपदिं मुरला ॥२॥
जिकडे तिकडे बघतां माझा । ज्ञानेश्वरप्रभु भरला ॥३॥

## ६६५

विजयावृत्त. मूळपीठ.-झिंझोटी. ता.-दादरा. गौण.-'जागिये रघुनाथ' या चालीवर.

अकल कळल तुज तदाचि सुगुरुचरण गारे ॥धृ॥
त्यजुनि सकल विषयशोक, कृष्णरूप पाहिं लोक ।
अनृत ओळखोनि झोक, दुरि कुजननगा रे ॥१॥ (य९उ.१३४)
वृत्ति सांडुनी अनेक, जीवब्रह्म दोन्हि एक ।
तीव्र करुनि हा विवेक, वारि भवदगा रे ॥२॥
त्यजुनि कामकल्पवात, जोडुनि नमि दोन्हि हात ।
अलकावतिराय तात, समज निजसगा रे ॥ अकल कळल ॥३॥

## ६६६

रमावृत्त. रा.-यमन ता.-तेताला.



हरिचें ऐसें भजन घडो ॥धृ॥
एकवेळ मति रंगली मग ती । नच विषयी मुरडो ॥ हरिचें ॥१॥
सेवा करितां करितां केवळ । सत्पदिं देह पडो ॥ हरिचें ॥२॥
ज्ञानेश्वरपदयुगलस्मरणें । चित्सुखिं वृत्ति जडो ॥ हरिचें ॥३॥

## ६६७

कंचुकीवृत्त. मूळपीठ.-पिलु. ता.-धुमाळी गौणपीठ.- 'कशाला संन्यासी झाला' या चालीवर

अझुनि कसा तूं तळमळसी । विषयास्तव मुळिहुनि चळसी ॥धृ॥
इंद्रियचावटि आवडते । हरिभजनीं काय बिघडतें ॥१॥
धडि घडि जातें जीवीत रे । निजजन तुजला गोवित रे ॥२॥
अलकावतिपतिचरणाला । चिंतुनि मुक जनिमरणाला ॥३॥

## ६६८

रंभावृत्त. मूळपीठ.- जोगी. ता.-धुमाळी गौणपीठ-अजुनी कां बा नव तरसी, या चालीवर

हेचि कसें तुज आवडतें रे ॥धृ॥
एकहि दिवसीं भोजन न सुटे । हरि विस्मृति घडि घडि पडते रे । हेचि०॥१॥
पाहुनि सज्जन लवसी नापरि । नरजनयजन उघड घडतें रे ॥ हेचि०॥२॥
श्री ज्ञानेश्वरजननिपदाम्बुज । ध्यातां निजसुख हृदिं जडतें रे ॥ हेंचि०॥३॥

## ६६९

रमावृत्त. रा.-यमन ता.-तेताला.

सावध अझुनि गड्या ॥ होसि न ॥धृ॥ (य९उ.१३५)
पळ पळ मोजी काळ तथापी । घालसि कां फुगड्या ॥ होसि न ॥१॥
राम मनोहर सांडुनि कामिनि-। करिं देसी लुगड्या ॥ होसि न ॥२॥
श्रीज्ञानेश्वरस्मरणावांचुनि । दवडिसि व्यर्थ घड्या ॥ होसि न ॥३॥

## ६७०

सामकामदावृत्त.मूळपीठ-झिंझोटी.ताल-दादरा.यतिलग्न.गौणपीठ- पांडुरंग स्मर अभंग,या चालीवर

पूर्ण तुझी ब्रह्मसुखी आवडी जरी ।
ध्याई गुरुचरणनखें सदय साजिरीं ॥ पूर्ण ॥धृ॥
राम पूर्ण ब्रह्म जरी शरण गुरुपदाला ।
कृष्णनाथ संदिपना समन तनुज झाला ॥ पूर्ण ॥१॥
निगम-गमन गगनसुमन-समचि गुरुविणें हो ।
वश करि त्या भावद्युती हरुनि तनुमनें ॥२॥
अलकावतिपतिनंदिनि विनवी स्वयें ।

गुरुकरुणे वांचुनि श्रुति दाविति न नये ॥ पूर्ण ॥३॥

६७१

सुशीलावृत्त. रा.-यमन ता.-तेताला.

गाइं मुखी गोविंद ॥ मानस ॥धृ॥
मखपटिं जेवि न त्या दधि चारिती । नवल यशोदानंद ॥ मानस ॥१॥
अंतरिं निर्गुण बाहिर सुंदर । मुनिमनसेव्य अनिंद ॥ मानस ॥२॥
सादर घे अलावतिवल्लभ । चरणसरोरुहगंध ॥ मानस ॥३॥

६७२

रंभावृत्त रा.-भूप. ता.-तेताला (राजविद्याधर )

आवडि भजन करा ॥ हरिचें ॥धृ॥
जपतप साधन करुनी सारें । गुरुची सोय धरा ॥ हरिचें ॥१॥
प्रेमावांचुनि योगहि बंधन । श्रयणें शिखरदरा ॥ हरिचें ॥२॥
श्रीज्ञानेश्वरपदनख नमुनी । सोडा घर नखरा ॥ हरिचें ॥३॥

६७३

कोकिलावृत्त. मूळ.-पिलु. ता.-धुमाळी. गौणपीठ - आजि अक्रुर हा, या चालीवर

निज मानसि हा विचार करि रे दगडा ।
तूं पहिले पासुनि उघडा ॥धृ०॥ (य९उ.१३६)
ममताविवशे धैर्य तुझे कां खचले । कनकादि भोग तुज (कां) रुचले ॥
स्त्री मिळवाया उपाय कितितरि रचले । परि यमाजवळि हे न चले ॥
॥ चाल ॥ तव कर्महि निरखुनि फुटके रे फुटके ।
यमदूत मारतिल फटके रे फटके ।
मग कोणि सहायक न टिके रे न टिके ॥
॥ चाल पहिली ॥ चल फिर मागे टाकुनि लटिका झगडा ॥
तूं पहिले पासुनि उघडा ॥ निजमानसिं ॥१॥
हा संग कसा गोड वाटतो अझुनी । ओळख पाहसि कां न जुनी ॥
हो सावध रे अलभ नरतनु समजुनी । युगलकिशोरपदा भजुनी ॥
॥ चाल ॥
काही तरि सोय धरावी हो धरावी । ही भवनदि पार तरावी हो तरावी ॥
चुकि ऐसी कधि न करावी जी करावी



॥चाल पहिली॥॥ नच तरि बापा पुनरपि होईल रगडा ॥
तूं पहिले पासुनि उघडा ॥ निज मानसिं० ॥२॥
सज्जनसंगे मारुनि मायाकुंजर । मोडी भवभयमय पंजर ॥
सद्गुरुपद ते ध्यानी आणुनि सुंदर । शोभवी हृदयमणिमंदिर ॥ चाल ॥
उमजोनि आत्मसुख साचे रे साचे ॥ हरिकीर्तनि निर्भय नाचे रे नाचे ॥
कृष्णगुण म्हणवि जन वाचे रे वाचे ॥
॥ चाल पहिली ॥ ज्ञानेश्वर या नामाचा जनिं पगडा ॥
तूं पहिलेपासुनि उघडा ॥ निज मानसिं ० ॥३॥

६७४

विशाखावृत्त. रा.-धनासरी . ता.-तेताला (राजविद्याधर)

वाचे आळंदिनाथ वदा ॥धृ॥
तत्पदलाभावांचुनि विद्या । काय पढुनि चवदा ॥ वाचे ॥१॥
रिद्धिसिद्धि बहुधा मुक्ति । भक्तिविणें भवदा ॥२॥
ज्ञानेश्वर हें मंगल गाउनि । घ्या निजसुखसवदा ॥ वाचे ॥३॥

६७५

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ.-जोगी. ता.-तेताला. गौणपीठ - पहा पहा सावळा, या चालीवर

योग्य-त्यागें घेतां ज्ञान । तुष्ट नाहीं नारायण ।
करिताती देव विघ्न । अक्षकपाट उघडोन ॥धृ॥
इहलोकीं विघ्नहारी । सद्गुरु कारुण्यकारी ।
परलोकी विघ्नें दुरी । गुरूपरंपरा करी ॥१॥ (य९उ.१३७)
म्हणवोनी तूं हृदया । ध्याई ज्ञानेश्वरपाया ।
तुटेल ही अवघी माया । ब्रह्म वाणी मन काया ॥२॥

६७६

जवळचे ब्राह्मणानां उद्देशून -

सामनुष्टुपवृत्त.मूळपीठ-यमन ता.-तेतालाराजविद्याधर.

गौणपीठ-पहा पहा सावळा सावळा या चालीवर

गा रे आळंदिवल्लभ वाचे । चूर होईल सर्व भवाचें ।
ध्यान सोडा भोगवैभवाचें । नेणे देह हा कोठवरी वांचे ॥ गा रे ॥धृ॥
कोण विश्वास धरोनियां मनीं । बैसलासी निश्चिन्त सदनीं ।

पळ पळ जीवित काळ गणीं । व्याधी उभ्या अखंड आंगणीं ॥ गा रें ॥१॥
सोडा कामना सर्वदुःखदायी । संसारीं या कोणाचें कोणी नाहीं ।
जो तो इच्छितो आपुलें सौख्य देही । एक विठ्ठल बंधु बहिण बाप आई ॥२॥
शूद्रजन्म मी नव्हे अधिकारी । परी तुम्ही तों सर्वथा विचारी ।
जाळोनियां चित्त हें विकारी । जीवभाव वहावा ज्ञानेश्वरीं ॥ गा रे ॥३॥

६७७

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ-यमन. ता.-तेताला. गौणपीठ - पहा पहा सावळा, या चालीवर.

सावधान होई मना । आयुर्जातें क्षणक्षणा ।
येरझार मुख्यप्राणा । म्हणोनियां ध्या नारायणा ॥धृ॥
नको करूं योगयाग । नको करूं तपसोंग ।
वाचे गाई पांडुरंग । प्रेमें करीं संतसंग ॥१॥
सोहं फुंकोनियां भाता । ज्ञानानळें चेतवितां ।
दाटे गर्वाची उष्णता । गाई यास्तव अनंता ॥२॥
सांडि सांडि जनलाज । हिचें अंती नाहीं काज ।
भक्तिभावें दृढ साज । स्मर आळंदीचा राज ॥३॥ (य९उ.१३८)

६७८ / शिवध्यान

रसालावृत्त. रा. - भूप. ता.-तेताला.

मानस शंकरचरणा ध्याई ॥धृ॥
न मिटे हा भव शिवकरुणेविण । आणिक बहुत उपायी ॥१॥
ज्ञानसमान तथापि दिनि दिनी, । ध्यानें विस्मर देही ॥२॥
अकलंकित शशिनिभतनु केवल । शशिशेखर श्रुतिग्वाही ॥३॥
श्रीज्ञानेश्वररूप धरूनी । जो मज रक्षी सदा ही ॥४॥

६७९

चित्तोपदेशांतील ३ श्लोक

मना सोडिंरें मानकी[1] जीवनाची[2] । धरी आवडी जानकीजीवनाची ॥
करीं पान विद्या सिताजीवनाचें । सदा ठेवुनी कीर्तनी जीव नाचे ॥१॥

(१. गर्व अहंपणा, २. आयुष्याची )

६८०

तुझें कल्पिलें विश्व स्वप्नासमान । पुन्हा तूं तयाला कसा देसि मान ॥
गुरूच्या कृपें जाणुनी ब्रह्मबोधा । सख्यारे निवारीं त्वरें द्वैतबाधा ॥२॥



६८१

तुझा देह प्रत्यक्ष निर्जीव माती । तया मी असें मानिसी केविं चित्ती ॥
त्यजोनी ममत्वा तुला त्वां भजावें । गुरूच्या कृपें शांतिसौख्यीं निजावें ॥३॥

६८२ / हिंदी उमावृत्त

गुरुनाम सुधारस बानि पिबें तब माल गलासु रहे न रहे ।
जननी सब कामिनि को समुझे तब काजन नेम बहे न बहे ।
पिय की हियमें सच चोट लगी तब पौन उमंग गहे न गहे ।
मन ग्यान सुरेशकृपाबलतें मिलि है अपवर्ग चहैं न चहैं ॥१॥

६८३ / गीति

वारकरी

सोंग करुनि साधूचें टाकुनियां ब्रह्मकर्म वारकरी ॥
झाले ज्यांचें जीवित पाहुनियां नित्य काळ वार करी ॥|॥

६८४

चित्तोपदेशांतील श्लोक

जरी ब्रह्मसंपन्न झालासि बापा । तरी तूं नको या करूं भक्तिलोपा ।
जयाच्या कृपें जाणिली वेदवाणी । स्मरें तो सख्या सद्गुरु चक्रपाणि ॥१॥

६८५

वैराग्य

सामनुष्टुप मूळपीठ - जोगी. गौणपीठ - नाही.

मंदिर माडी पुरे पुरे । घोडागाडी पुरे पुरे । खेतीवाडी पुरे पुरे ।
सोडुनि सगळे हरहर हरहर हरहर शंभो तूं म्हणरे ॥१॥
माल खजीना पुरे पुरे । चौरंग जीना पुरेपुरे । काका नाना पुरेपुरे ।
वाराणसि मधें जाउनी बापा शिवशिव नामें हृदय भरें ॥२॥
पलंगबिछाना पुरेपुरे । चांदीसोना पुरेपुरे । अवघा रोना पुरेपुरे ।
कोमल आणुनि बिल्वदलानें शूलपाणि तो पूजिं करें ॥३॥ (य९उ.१३९)
शाल दुशाला पुरेपुरे । दिवटि मशाला पुरेपुरे । रेशिम उशाला पुरेपुरे ।
चुकलो चुकलों चुकलों म्हणुनी शंकर शंकर हें जप रे ॥४॥
पागोटी जरी पुरेपुरे । बाइल साजरी पुरेपुरे । कारागीरी पुरेपुरे ।
चार मणी रुद्राक्ष गळ्यामधें घालुनी म्हणवीं शैव त्वरें ॥५॥
खाजिकरंजी पुरेपुरे । लेप सतरंजी पुरेपुरे । पाटवरंजी पुरेपुरे ।

ज्ञानेश्वरकन्यकावचन मनीं मानुनि पंचाक्षरि जप रे ॥६॥

६८६

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ - पूर्या. गौणपीठ - ''तुजवर फुलवरा बांधिलावो'' चा चालीवर.

दास वदविसी कशास गुरुचा दास वदविसी कशास रे ॥धृ॥
द्रव्य असुनि पल्लवीं पाहसी निर्भय अबल दशास रे ॥१॥
शिव्या देउनि आश्रितां जनां दाविसि दाहि दिशांस रे ॥२॥
परगुण-धान्या टाकुनि घेसी ओढुनि दोष-तुषास रे ॥३॥
वैभवडोहीं शयन करीसी घेउनि भुजग उशास रे ॥४॥
धुंडाया कामिनी घालसी कामी सकल निशांस रे ॥५॥
आणाया जग निजहातातळीं देशी पीळ मिशांस रे ॥६॥
पशु असुनी तूं पशुपाठीवरी उडविसी सहज कशास[१] रे ॥७॥
द्वारीं याचक याचित असतां देसि न धान्य पशास रे ॥८॥
भोगासाठीं राम म्हणोनी उगा शिणविसी घशास रे ॥९॥
श्रीज्ञानेश्वर दीनदयाळू सूनु न म्हणती अशास रे ॥१०॥ *(१. चाबूक)*

६८७ / श्लोक मालिनी

मधुर मधुर नांवें श्रीहरीचीं वदावी ।
हरिजनगत मैत्री सत्वरें देव दावी ।
हरि मम पति ऐसी चित्तिं ये भावना ही ।
मग भवनदिलागीं कांहीं संधाव[२] नाहीं ॥

(२ प्रवाहाचा अविच्छेद म्हणजे भवनदी सदा कोरडी, असा अर्थ)

६८८

लावणीवृत्त. मूळपीठ.-पूर्वी. ता.-धुमाळी. गौणपीठ.'नंदाच्या नंदना' या चालीवर.

जनहो श्रुतिगुरुवचनी रमा ।
रमारमण निजह्रदयी धरिता घरि ये आयती रमा ॥धृ०॥ (य९उ.१४०)
सोडुनि भवमयभ्रमा ॥ जनहो ॥
गुरुमुखगतवाक्यार्थ साधुनी घ्या निजसुखसंभ्रमा ।
सांडुनि साधनक्रमा ॥ जनहो ॥
वृत्तिलक्षणे क्षणा करुनि मग देहचतुष्क क्रमा ।
संसृति-सुख क्षणिक हे वमा ॥ जनहो ।१॥
कधींही इच्छिजे न मा ।
वाङ्मनकाया एक करोनी संतचरणिं तुम्हि नमा ॥



मग मिळलचि तुमची जमा ।
सन्मती गति अति अधिष्ठित स्थिति भूतीं पाहावें समा ॥२॥
भोगुनिया कृतिफळ दमा । ज्ञानानंतर ही रक्षावे अधिगत निजशमदमा ॥
मग साधुनि भक्तिप्रमा । ज्ञानेश्वरप्रभुकरुणे वारा दुःख त्रिविधश्रमा ॥
श्रुतिगुरुवचनी रमा ॥ रमारमण निज० ॥३॥

६८९ / श्लोक

अद्वैत तेंहि हरिवांचुनि पूर्ण नाहीं । भक्तीविणें सकळ बोधहि व्यर्थ पाहीं ।
या साठीं तोचि करि आश्रय प्रेमभावें । घेवोनियां परम नाम भवा तरावें ॥

६९०

गौरकांतीवृत्त. ताल-राजविद्याधर. मूळपीठ- धनासरी. गौणपीठ- नारायण भजरे. या चालीवर.

झाला अत्यंज योनि जरी । तदपी भक्तिच पुनित करी ॥धृ॥
भगवन्निष्ठायोगबलानें । नांदे ह्रदयीं हरी ॥१॥
नामगुणें तो कामादिक हे । षडरी दूर करी ॥२॥
धर्मादिक पुरुषार्थ चतुष्टय । राबति भजकघरीं ॥३॥
अलकावतिवल्लभें कृपें मज । दिधलें कृष्णकरीं ॥४॥

६९१

सामनुष्टुपवृत्त. राग.-कोणीही. ताल.-राजविद्याधर.

कधीं तरी पाहुं हरी । बाईगे ॥धृ॥
संसारी तरी हरिनामातें । सेवुनि रहा उरी ॥१॥
फळ तातडी तें सोडुनि आधीं ॥ साधन शीघ्र करीं ॥२॥
उचलुनि नेईल गुरु करुणाघन । सत्वर धरूनी करीं ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु पाय न सोडूं । होऊं कृष्ण-नवरी ॥४॥ (य९उ.१४१)

६९२ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. रा.-यमन ता.-तेताला

गुरुबिन न मिले आतम ज्योती ॥धृ॥
कोइ पढे वेद कोइ शास्तर । कोउ तो बाचत पुरानपोथी ॥१॥
कोइ तो पूजत शिवहरिब्रह्मा । कोइ लगावत धेरकी पोथी ॥२॥
कोइ करते जोगजाग व्रततप । कोइ बतावत होनेहि जती ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या सबको कहै । गुरुचरनण खोजो ब्रह्मसुमोती ॥४॥

६९३

समनुष्टुपवृत्त. रा-यमन ता.-तेताला.

मंगल जानो रामको नाम ॥धृ॥
दारा सुत धन सब जानेका । नित रहनेका वैकुंठधाम ॥१॥
चंदा सूरज रामस्वरूप है । सुख मनमों रहे राधिकाश्याम ॥२॥
भृकुटि मिलनते धनुख चढावे । कृपाकटाक्षमें भये तर काम ॥३॥
अनुहत बेणू सुन बावरि भयी । ज्ञानेश्वकरुणाके कुलग्राम ॥४॥

६९४

नवमल्लिकावृत्त. मूळपीठ.-सारंग. ता.-तेताला.गौणपीठ - त्याचा हरि विकला या चालीवर.

कोठुनि गुण शिकला गुण शिकला । जीव रांडेला विकला ॥धृ.
पाहुनि चाल तुझी तोंडावर । सकल महाजन थुकला ॥१॥
मायबापाला दूर टाकुनी । इहपर लोकां मुकला ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुस्मरण करिसी तरी । सुधरसी पुढती चुकला ॥३॥

६९५

वारी करणे

कमलारंगीवृत्त. रा-यमन ता.-तेताला.

वारी ऐसी करा ॥धृ॥
पुंडरीक वरदाता प्रभु तो । आणि हृदयघरा ॥१॥
संतसंग धरुनी जा पंढरी । भेटा शार्ङ्गधरा ॥२॥
विठू आणि तुम्ही एक मिळोनी । भक्तीं विश्व भरा ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु हात शिरावरी । मग भय मनीं न धरा ॥४॥ (य९उ.१४२)

६९६

सामकामदावृत्त. मूळपीठ-झिंझोटी. ताल-दादरा. गौणपीठ-पांडुरंगस्मर अभंग या चालीवर.

नामिं न्यून काय तुला वाटतें गड्या ।
मायास्त्रीच्या सोडिसि व्यर्थ लूगड्या ॥नामि.॥धृ॥
योगयाग नियम धर्म सर्व कल्पना । कृष्णविना वेद शास्त्र उगी जल्पना ॥१॥
अस्ति भाति प्रिय ब्रह्मनित्य तेंचि कीं । नामरूप नाहिं परी भासते चुकी ॥२॥
गुरुवाक्यें त्यजुनि स्वप्न येइं जागृती । स्नेहें दृढ हृदयी धरीं नंदजाकृती ॥३॥
रामकृष्णस्मरणिं त्यजीं ज्ञानगर्वही । ज्ञानेश्वरप्रभु चरणी अर्पि सर्वही ॥४॥

६९७

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ.-पिलु. ताल- तेताला गौणपीठ - मज टाकुनि अवघ्या, या चालीवर.

गुरुपदांबुजा भज हे मना ॥धृ॥
कां करिसी तू योगाभ्यासें । व्यर्थेन्द्रियदमना ॥१॥



सद्भावें तुज मिळतिल तैशा । गुरुपदीं वाहा सुमना ॥२॥
तदनुग्रह द्वादशाक्षरी तो । पावुनि करिं स्मरणा ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुतात तयांच्या । पदिं वाहीं तनुमना ॥४॥

६९८ / हिंदी

रमावृत्त. राग.-बेहाग. ताल.-तेताला.

मिलत न भजनबिना । रघुवर । मिलत ॥धृ॥
श्रुतिमतिगति को बिनु बूझै नहिं । ब्रह्मणि संग मना ॥१॥
रामचरनबिनु होत न तारक । शिरशशिरस झरना ॥२॥
अस जानी मन सुमर सकल तजी । ज्ञानेश्वरचरणा ॥३॥

६९९ / हिंदी - मनको उपदेश

रमावृत्त. राग.-खमाज. ताल.-तेताला.

ये मन सबदिन खोरि करे ॥धृ॥ (य९उ.१४३)
कब नाचत लै घरदौलत कब । नारिपलो पकरे ॥१॥
कबहुं गरिबजन रिपुरिपु मानी । कारिरि जग्य करे ॥२॥
कबहुं देखिके सुजन समाजा । हिय मदमान भरे ॥३॥
अलकावतिपति को नहि भजिके । सठ नित नरक फिरे ॥४॥

७००

कंचुकीवृत्त. रा.-भीपलासी. ता.-धुमाळी. गौणपीठ - कशाला संन्यासी झाला, या चालीवर.

रामा सोडुनी कां रामा । सवें जन घेती का-रामा[१] ॥धृ॥
सोडुनी अक्षय निजधामा । भुलले कवणेपरी धामा ॥१॥
विसरुनी जीवन आरामा । पाजिती जीवन[२] आरामा[२] ॥२॥
विटती अझुनी ना कामा । कर्मीही याचिति नाका मा ॥३॥
ज्ञानेश्वर पदींची भामा[३] । मिळतां न रुचे धन मामा ॥४॥

(१. कुत्सित स्त्री २ जीवन आरामा - बगीचाला पाणी देती. ३. भा-लक्ष्मी.)

७०१ / मनाला उपदेश

सामनुष्टुप. भूप.-पहा पहा सावळा, या चालीवर.

सावधान होईं मना । आयु जातें क्षणक्षणा ।
येरझार मुख्य प्राणा । म्हणोनी ध्या नारायणा ॥१॥
नको करूं योगयाग । नको करूं तपसोंग ।
वाचे गाई पांडुरंग । प्रेमें करीं संतसंग ॥२॥
सोऽहं फुंकोनियां भाता । ज्ञानानळ चेतवितां ।
दाटे गर्वाची उष्णता । गाई यास्तव अनंता ॥३॥

सांडी सांडीं जनलाज । तिचें अंतीं नाहीं काज ।
भक्तिभाव दृढ साज । स्मरण आळंदीचा राज ॥४॥

७०२

सामनुष्टुपवृत्त. रा.-पूर्वी. ता.-धुमाळी. गौणपीठ-''धुतांच मोती'' या चालीवर.

मेळवुनी गडी वाजवी वेणू यदुवर वृंदावनीं ।
चला गडे पाहूं सखी चवघी जणी ॥धृ॥
धन सुत नंदन पति दिर जेठही मायामय मृगजळ ।
द्यावें डावलूनी सकळ ।
चहूंकडुनी मेल्यानें दिसोंदिस काळजी लाविला गळ ।
घडीभर स्मरावा घननीळ ।
पाऊल टाका झट झट बाई मन न भुलवुनी जनीं ॥ चला गडे० ॥१॥
(य९उ.१४४) कैं हरी भेटेल तुटल भव हा धरा अशी कळकळ ।
खातो जीवित काळ पळपळ ।
तरुणमदानें चार दिवस हो नका करूं वळवळ ।
शेवटीं रडाल कीं घळघळ ।
शम न दम न जैं करि न तदा मग सोडवील ना कोणी ।
चाल गडे पाहूं सखी०॥२॥
या संसारीं हा नरदेह सुंदरतर पर्वही ।
भजा हरी सांडुनि भवीं गर्वही ।
सार धरुनि निर्धार लावुनी पवनावरी शर्वही ।
मागिलें विसरा हो सर्वही ।
अळंदिपति करुणाघनसद्गुरु कीजे हृदया धनी ॥
चला गडे पाहूं सखी चवघी जणी ॥३॥

७०३ / हिंदी

विजयावृत्त. मूळपीठ.झिंझोटी. ताल-दादरा. गौणपीठ- भजभज भव जलधिमाजिं' या चालीवर.

पापियोंने देखो कैसी धरमकी बिगारी ॥धृ॥
घी सक्कर रोटी जिमे । बनितनसंग खूब रमे ।
भजननमों मन न गमे । करत जनसुं रारी ॥ पापि.॥१॥
रामराम भजत बाणि । परधन निज मानि मानि ।
राखिं सदन आनि आनि । पालत सुतनारी ॥पापि.॥२॥
बालकनकुं[१] सजा सजा । तालमृदंग बजा बजा ॥



दशम उलट बुझा बुझा । मोहत नरनारी ॥३॥
ज्ञानेश्वरललि कहत । यह संग मैं नाहिं चहत ।
हियमों नित जपत रहत । श्याम पूतनारी ॥४॥

*(१. लरकियोंकु- पाठांतर)*

७०४ / हिंदी

मुक्तमालावृत्त. (रसाला भेद ) राग.-बेहाग. ताल.-तेताला.

को अस पातकि या जगामाही ।
नारायणहरि कहत दयाघन निजपद पठयो नाही ॥धृ॥
अजामिल द्विज निजकारज तजि कियो दासिसंग नीचा ।
कुमरनाम नारायण भनि भनि पार भयो भवकीचा ॥१॥
सुग्ग सिखावत गणिका तरगयी ग्राहबिबस गज छूटे ।
कलजुग जनम पायि हरिपगसुख को न नामबल लूटे ॥२॥ (य९उ.१४५)
जोगजागजप नियमधरम अति करत विपति सहि घोर ।
ते कहते गति नाहिं नामबिन जो प्रभु ब्रजचितचोर ॥३॥
निगमागमपुराण अरु स्मृति जाचि जाचि मन चीन्हा ।
रामनाम सतसंग विरोध विनोद हुंते नहिं कीन्हा ॥ को अस०॥४॥
रे सठ मन अखियाबिन तूं कंह धूंडत मरुबन खोरी ।
ज्ञानराज निदरे कह उनपग नहि नहि करुणा थोरी ॥५॥

७०५

वासंतीवृत्त. राग-यमन. ताल.-तेताला.

मना चल झट झट हरिहर बोल ॥धृ॥
सद्गुरुसेवेवाचुंनी नरतनु । दवडिं न मातीमोल ॥ मना ॥१॥
मधुर खाउनी युवती सेवुनी । घेउं नको यमझोल ॥ मना ॥२॥
अलंदीपकरुणेने ओळख । जीव देव समतोल ॥ मना ॥३॥

७०६ / हिंदी

वासंतीवृत्त. राग-पूर्या. ताल-तेताला.

हमारे कोटि किये अपराध ॥धृ॥
पाय जनम मानुसको मानस । पूजे नहिं गुरुसाध ॥१॥
खेलत बालक उमर गमाई । विखय लिये हिय लाध ॥२॥
बूढेमें अब तनु नहिं धारत । छिन छिन सुमिरन बाध ॥३॥

पकर लिजावूं अब ज्ञानेश्वर । पग पाही फिर्याद ॥४॥

७०७ / हिंदी

उमावृत्त

वेदपुराण पढे मनमान तबै हरिगानबिना खटको ।
लोगलुगाइ सबे सब निंदत ताहि बुझावन ना लटको ॥
पीतमको हियमें निरखे नहि तीरथमांहि वृथा भटको ।
साचि कहूं सुनिये मन ग्यानसुरेशपदांबुज जा अटको ॥

७०८ / हिंदी

उमावृत्त

बालक थे तब ग्यान न थे खुब दूध पिये सुद धायनके ।
ऊमरदार भये तब द्वार परे रमणी अरु रायनके ।
बूढन में अब बूडत हों दिन आयगये समुझायनके ।
मानस साच भरोस रहो अलकावतिजीवनपायनके ॥ (य९उ.१४६)

७०९ / हिंदी मदिरावृत्त

शामके नामबिना कविता पढिके करिये न कदें मनरंजन ।
चामको काम कुबाम धरे दिनदीन करे बलबुद्धिबिभंजन ।
गान करों रसना अरु मानस में निरखो ब्रजराजनिरंजन ।
लाज तजो अजु जाय भजो अलकावति वल्लभके पदकंजन ॥

७१० / हिंदी मदिरावृत्त

सुंदर छौंरस खायके खायके क्या खुबसे अठ अंग फुले हो ।
लोग तुम्हे कहतेहि भले उनकेहि भलाइपें आप भले हो ॥
बाहर दीखतहो मननिर्मल अंतरमांहि नितांत छले हो ।
ग्यान सुरेश्वरके करुणाबिन क्यौं बलते जमहात चले हो ॥

७११ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. राग.-यमन ताल.-तेताला.

भजनबिना तुम नाहिं तरोगे ॥धृ॥
अहंकार जब जबहि बढेगो । तब आतम बिसरोगे ॥



बूढापनमों जमकिंकर दृग-। देखी आप डरोगे ॥१॥
अलकावतिवल्लभ करुणाघन । हियमें जौहिं स्मरोगे ।
निमिखमांहि यह प्रबल जाल सब । मायासहित हरोगे ॥२॥

७१२

रघुराज भजावा रे । निरसल सहज सजावा रे ॥धृ॥
लाज बाज हे पाठिं लावुनी घेतलि चिमणा बाळा ।
जाळें घालुनि गळ्यामधें तुज ओढिती बळकट बाळा ॥१॥ रघुराज०
उमजुनियां श्रुतिवचनें बापा लवकरि हो सावध तूं ॥
करिं धरुनी अनुतापशस्त्र मग करिं षडरींचा वध तूं ॥२॥ रघुराज०
तनु मन धन ओवाळुनि श्रद्धा सद्गुरुवचनी ठेवीं ॥
ज्ञानराज अंतरिं जप जैसी कृपणाघरची ठेवी ॥३॥ रघुराज०

७१३ / हिंदी दोहा

रामनाम के आलसी भवजलमें हुशियार ।
मूख न देखूं तिनका पावे नहिं वो पार ॥ (य९उ.१४७)

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# श्रीकृष्ण लीलापर पदे

गोपीवचन

७१४ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. रा.-काफी. ता.-तेताला.

नंदलाला नाचो मोरे अंगना ॥धृ॥
दैविक नचनो नाथ तुम्हारो । देखुंगी नयना ॥ नंदलाला ॥१॥
देऊंगी मैं दहिदुध तुमको । मन कीनो हरना ॥॥ नंदलाला ॥२॥
नहि तो नहिं बन्सी देऊंगी । लगाउंगी देर ना ॥ नंदलाला ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या श्रीहरी की । होने चाहत अंगना ॥ नंदलाला ॥४॥

मुरली गीत

७१५ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. रा.-बेहाग. ता.-तेताला.

प्रभु ! तोरे मुरली की गत न्यारी ॥धृ॥
प्राण लेत जनु हरकर मनको । फेरि छुडावत पति-पितु म्हारी ॥प्रभु०॥१॥
बिखयकामना शीघ्र छुडावत । घुमावत बावरी बनारी ॥ प्रभु०॥२॥
चुंबन छिन हम लेति तिहारे । ये सवती रहती मुहडारी ॥ प्रभ०॥३॥
ज्ञानेश्वरबालाकी बिनती । सुनिये शाम मुरारी ॥ प्रभु०॥४॥

७१६ / हिंदी - मुरली गीत

सामनुष्टुप. रा- खमाज. ता.-तेताला.

किने मोरी बांसरी आज चुराई ॥धृ॥
नहि थी सुनेकी, नहि थी रुपेकी । केवल प्रेमकी लायी ॥१॥
नहीं बजाऊंगी अब गाममों । दीयो देवहु कामिनि लाई ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुकन्या सुनकर । हरि घर लिये बुलाई ॥३॥

७१७ / हिंदी - मुरली गीत

सामनुष्टुप. रा.-काफी. ता.-तेताला.

देउंगी मै लाला मुरली तुम्हारी ॥धृ॥
और सबनकी प्रीत छोरके । हम पर राखों भारी ॥१॥ (य९उ.१४८)
अथवा हमरो हरन करो मन । जैसि राधिका प्यारी ॥२॥
ज्ञानेश्वरकरुणा हसि कहती । दुलहिन बनबन नारी ॥ ॥३॥

०००

७१८ / हिंदी

सामनुष्टुप रा.-खमाज ता.-तेताला.

कान्हानें मोरी छोर लिई लुगरी ॥धृ॥
मैं बाला हूं छोटी लालजी । ननद देवेंगी गारी ॥१॥
हात जोरके नाथ कहतहूं । लाज रखो प्रभु मेरी ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या बडहि प्रेमसें । लीन भयी बिचारी ॥३॥

७१९ / हिंदी

सामनुष्टुप. रा.-यमन. ता.-तेताला.

भइहुं मै लाला दासी तुम्हारी ॥धृ॥
तुम तो नंदजीके बालक । मै हूं गरिबकी छोरी ॥१॥
किंतु छन एक बेणु बजावो । हर लेवों सुधि बुधि सब मोरी ॥२॥
और नारि तो भोग करत प्रभु । हमें तोख चरनहि निहारी ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या कर जोरी । कहत नयननतें नीरझारी ॥४॥

७२० / गोपीवचन



कुरलालका. रा.-काफी. ता.-दीपचंदी.

सखे बाइ आवरि आपुला हरि ॥धृ॥
सुखसेजे मी निजलें असता । उठवी धरुनि करिं ॥१॥
टाकुनि जावें गोकुळ काय गे । तव तनयाचि वरी ॥२॥
ज्ञानेश्वरकन्यका विनोदे । बोलत प्रणयभरी ॥३॥

७२१ / हिंदी

सामनुष्टुप रा.-खमाज. ता-तेताला

ननदिया मत देवो मोहे गारी रे ॥धृ॥
जाती थी मथुरा दधि बेचन । बीच मिल्यो शाम पुतनारी ॥१॥
दौर दौरके निकट आय प्रभु । करी हमारी लाल पिली सारी ॥२॥
रंग गुलाल बहुत उडायके । हरि लीनी हियते मति मारी ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या श्रीहरिको । देखके वाङ्मन काय बिसारी ॥४॥(य९उ.१४९)

७२२ / हिंदी

शकटधाटीवृत्त. रा.-सारंग ता.-कारवा.

प्यारे नंदलालाजी मोरे घर आवोगे ॥धृ॥
नहिं मोरि सासरु ननंद घरमों । निजइच्छातें प्रेम लुटावोगे ॥१॥
देखति हूं मै राह तुम्हारी । द्वार उपर तुम भलि पावोगे ॥२॥
शिर मेरा अंकन लेलेके । कर निष्काम प्रेम सुलावोगे ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या कर पकरके । प्रभु कब अपने चरन मिलावोंगे ॥४॥

७२३ / हिंदी

रसालावृत्त रा.-सोरठ. ता.-तेताला.

सुनरी सखि रजनी की बाता ॥धृ.
प्रेमसे लेके नंदलाल मुहै । अपने कंठ लगाता ॥१॥
चंदा सुंदर तरुके ऊपर । मोहन मुगुटपें छाता ॥२॥
भोगतिहूं मैं परम सौख्यको । कामहि मोक्ष मिलाता ॥३॥
कलकी कहि मैं आज तुही चल । मारी घरपर लाता ॥४॥
ज्ञानेश्वरकन्या इतरनको । हरिपग राखति माथा ॥५॥

७२४ / हिंदी

शकटधाटीवृत्त. रा.-सारंग ता.-कारवा.

न्हाने ग्रहण कुंजबन जाउंगी ॥धृ॥
कठिण हृदय यह कोमल प्रभुके। लैं लै अंतर रूप मिलाउंगी ॥१॥
तूं जाय चहा मति जाय सखी । मैं तो हरिपग सीस लगाउंगी ॥२॥

ग्रहणका मिष करके सारा । पति सुत सासको भीख मिलाउंगी ॥३॥
श्रीहरिमुखका तांबुल सुंदर । अमृतसाथ मिलायके खाउंगी ॥४॥
ज्ञानेश्वरकन्या हरि देखके । अपने मनका कलक मिटाउंगी ॥५॥

७२५ / हिंदी

सामनुष्टुप. रा.-मांड. ताल-तेताला.

आवो आवो प्रियनाथ । मिलुंगी आज अकेली रात ॥धृ॥
सास मेरी गांव गई है । नहिं पति देवर साथ ॥१॥
छेल छबेला रूप तुम्हारा । मुनिजन मनमो ध्यात ॥२॥ (य९उ.१५०)
ज्ञानेश्वरकन्या व्याकुल अति । कहत बिरहबस बात ॥३॥

७२६ / हिंदी

रंभावृत्त. रा-खमाज. ता.-तेताला.

क्या यह शीखे तुम फणिशायी ॥धृ॥
लोगनको ऐसें दीखतहो । राखत हो धेनू बनमाहि ॥१॥
गर्ग तुम्हे कहतेथे ऐसें । आये हो ब्रज छिरधि बिहाई ॥२॥
तुमरे हियमों काम भरा है । कस गीता अर्जुनहि शिकाई ॥३॥
देखेगा कोई दिन है प्रभु अब । तुम तो भले हमरीहि बुराई ॥४॥
ज्ञानेश्वरकन्या श्रीहरिको । प्रेम तें कहती लाज लगाई ॥५॥

७२७ / हिंदी

कीर्तीवृत्त. रा.-हिंडोल. ता.-तेताला.

प्रियनंदलाला ! बेणु बजावो ॥धृ॥
भुजगपती सासू डाकिणिसे । मारा चित्त छुरावो ॥१॥
आउंगी मैं रात एकान्तमें । राग हिंडोरा गावो ॥२॥
मैं हूं दीनरु तुम करुणाकर । ज्ञानेश्वर प्रभु पावो ॥३॥

७२८ / हिंदी

रसालावृत्त. रा.-सोरठ. ता.-तेताला.

मैया ! सूद गयी मोरी ॥धृ॥
क्या यह बेणू बजती सुंदर । सुनि हरिपद दौरी ॥१॥
जाती हूं अब सकल छोरकर । रखती नहिं चोरी ॥२॥
कन्हया साप हृदयमा काटे । दिस बस बहि[1] बौरी ॥१॥
जिसनें काटा ओही उतारे । ज्ञानेश्वर चहूंरी[2] ॥४॥ (१.झाली. २.पाहिजे आहे.)

७२९ / हिंदी



रसालावृत्त. रा.-सोरठ. ता.-तेताला.

तुमबिन कौन मुझें सांवलिया ॥धृ॥
देख तुम्हारा रूप मैं आई । बेणु अवाज मिला पावलिया[1] ॥१॥
घरसे मोहे दीन्ह निकारिके । क्यौं अब छोरत हो कर संय्या ॥२॥
तुम्हरी हूं जाया ब्रजबर मैं । लाज तजो निजकाज रमैय्या ॥३॥
(य९उ.१५१) ज्ञानेश्वरकन्या करजोरी । कहती परती हूं प्रभु पैंया ॥४॥(१.पायांनां)

७३० / हिंदी

रंभावृत्त रा.-तोडी. ता.-तेताला.

तुम कारण देवी व्रत कीन्हा ॥धृ॥
पतिसुतबंधू गोत छोडिके । तुमरे पग निकट भइ दीना ॥१॥
प्रहसन ऊपर अंतर कूहक । हमरी प्रीती तुम नहिं चीन्हा ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या सब मिलिके । ब्रजबर-चरणनपर भइ लीना ॥३॥

७३१ / हिंदी

रसाला. रा.-भैरवी. ता.-तेताला.

तुम चरणनको ध्यान लगाऊं ॥धृ॥
जपतपयोगयाग इन सबको । तुम बिन अशुभ मनाऊं ॥१॥
अपने हृन्मंदिरके अंगनमों । प्रेमकी फूल लगाऊं ॥२॥
सास ननंदको झूटा कहके । भव उन सीर लधाऊं ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या सब मिलके । तुम्हे यहांहि मिलाऊं ॥४॥

७३२ / हिंदी

कुरंगाक्षीवृत्त. रा.-सिंध भैरवी. ता.-तेताला.

छोडो कान्हा मैं हुं बिरानी नार ॥धृ॥
तुम्हरि संगसे पितु पति सुतको । बूडत सब घरबार ॥ छोडो कान्हा ॥१॥
अपनि देखिके जबरी करिये । मोर न पावोगे पार ॥ छोडो कान्हा ॥२॥
ज्ञानेश्वरकन्याकी हरिनें । पकरी चुनरि किनार ॥ छोडो कान्हा ॥३॥

७३३ / हिंदी

सामकामदा. मूळ-झिंझोटी. ता.-दादरा गौ.-पांडुरंग स्मर०

मंद मंद मधुर बाई वेणू वाजवी ।
तेणें चित्तिं आमुचिया काम गाजवी ॥ मंद मंद०॥धृ॥
कूळशील गोतमात सर्व लाजवी । विसरवुनी देहभाव सहज साधवी ॥१॥
माझें मी हें सर्वभाव जीवें सोडवी । तृष्णामद मोहदंभ पाश तोडवी ॥२॥
वृंदवंद्यनंदनंदन हा लाघवी । ज्ञानेश्वरकृपें प्रेम सौख्य भोगवी ॥(य९उ.१५२)

७३४

शकटधाटीवृत्त. ता.-तेताला.

राधे, चाल बाई चाल ।
कुंजवनी दिसते लाल लाल लाल ॥ राधे ॥ धृ॥
नाचति गोपिका घेउनि गुलाल गे ।
मध्यें फिरतो बाई हा नंदजीचा लाल ॥ राधे ॥१॥
तप करितां झाले बाई ऋषींचे हाल ।
तो या गवळ्या मधिं बाई शोभतो गोपाल ॥राधे॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुनाथ सर्वदा दयाल ।
जयाचिया कृपें मी वरिला विश्वपाल ॥ राधे ॥३॥

७३५ / यशोदावचन

सामजगतीवृत्त. मूळ.-जिल्हा. ता.-दीपचंदी. गौणपीठ-

पाहूं कवणे वनीं । बाई गे । गोविंद माझा सये ॥ पाहूं कवणे ॥धृ॥
बहुकाळ याची मंचकी खेळे । मजपुढें सदां स्तनपानीं रूळे ।
गोजिरी[१] नवी चिमणी ॥१॥
भेटे जरी आज ना यदुराणा । ठेविन नातरि मी निजप्राणा ।
लय सर्व ध्यान मनीं ॥२॥
भेटीची आशा यामुळें चित्ती । एकचि उरली मज सांगाती । ज्ञानेश्वरजननी ॥
पाहूं कवणे वनीं । बाई गे । गोविंद माझा सये ॥३॥ (१. ही वाजवि चिमणी)

७३६

सामनुष्टुप. मूळ.-भूप. ता.-तेताला. गौण.-पहा पहा सावळा.

क्षणभरी राहूं द्या गे पाणी । संसारावरी घाला पाणी ।
वनीं शोधीत चक्रपाणी । अन्न समर्पू चरणीं ॥१॥
घट तैसी नाशिवंत काया । पळपळ मोजितो काळही या ।
चला शरण जाऊं यदुराया । तनमन अर्पू प्रेमे पाया ॥२॥
पंच आरत्या घेवोनी । चित्ति निर्लज्ज होवोनी ।
मुक्ति सांडा ओवाळूनी । प्रेम दिवटी पाजळूनी ॥३॥
सर्वमतें पाहणें खळखळ । ब्रह्मनिश्चय तोही ओंगळ ।
सांडोनीयां गृह कळकळ । निर्विकल्प सेवूं घननीळ ॥४॥
धाक वेदाचा सकळांवरी । तुम्ही जरी वरिला श्रीहरी ।
तरी वेद तुमची स्तुती करी । पहा प्रतीति खोटि खरी ॥५॥ (य९उ.१५३)



बाई यासी द्वेषिती जे खळ । मुख त्यांचें पाहे पायतळ ।
म्हणोनी तो हरि भक्तिविण फटकळ । आतां डोळेभरी पाहूं गोपाळ ॥६॥
ज्ञानेश्वरकृपा तुमच्या ठायीं । हेंच सार्थक आधीं करा कांहीं ।
वनीं जातो सखा शेषशायी । त्याला जागा द्या गे हृदयीं ॥ क्षण०॥७॥

७३७ / यशोदावचन -

सामनुष्टुप. मूळ.-पिलु. ता.-तेताला. गौणपीठ - मज टाकुनि अवघ्याजणि.

यदुनंदन कोणिकडे गेला गे ॥धृ॥
शेषशयन हा क्षिराब्धिवासी । गर्गादि सांगत होते मला ॥१॥
दहि दुध भक्षितां गोकुळिं गोपी । फटफट करिती त्याला गे ॥२॥
दह्यासाठिं म्या उखळिं बांधिले । आग लागो हाताला ॥३॥
ज्ञानेश्वरगडी लाल दुबळिचा । अक्रुर-विविशिनें नेला गे ॥४॥

७३८ / गोपीवचन

सामनुष्टुप. मूळ.-भीमपलासी ता.-तेताला.

सखे बाई यशोदे ग दाखवीं गोपिनाथ ॥धृ॥
त्यासम तुजला होतिल सुत बहु । आम्हां नसे कोणि नाथ ॥१॥
तुझा कांत गोकुळिंच असे कीं । दूर आमुचा नाथ ॥२॥
वृंदावनिं तो मोहि आम्हातें । वेणु वाजवुनि साथ ॥३॥
यापरि गोपि यशोदे सदनी । मातेसह शोकांत ॥४॥
अलकावतिपतिनंदिनि करिती । जननीपदिं प्रणिपात ॥५॥

७३९ / गोपीवचन

लावणीभेद. ता.-धुमाळी-गौण.- कशाला संन्यासी.

सख्यांनो चला गडे जाऊं । सावळी तनु नयनी पाहूं ॥धृ॥
जयाते म्हणति शेषशायी । यशोदानंद बाप आई ॥
मथुरेहुनि आला बाई । लागती मुनी जया पायी ।
तयाच्या चरणी शरण जाउं ॥ सावळी० ॥१॥
योगिया ध्यानि न ये जो की । यज्ञयागी नच जेवी की ॥
सखे बाई नंदहात

तो की । शामतनु कवळ घेत मूखी ॥
तयाला ग आलिंगन देऊ ॥ सावळी० ॥२॥ (य९उ.१५४)
यमुने तिरी वृंदावनी । भराया जाति गोपि पाणी ॥

तयाते रोखि चक्रपाणी । कामातुर त्या असति मनी ॥
तया चरणी लंपट होउ ॥ सावळी तनु॰ ॥३॥
तनुमन अर्पू गोपाळा । करू एकचि सर्व थाळा ।
लाथ मारुनी जाऊ काळा । सदा होउ ज्ञानेश्वरबाळा ॥
शिर सद्‌गुरुपायी ठेवू ॥ सावळी तनु॰ ॥४॥

७४० / हिंदी गोपीवचन -

रंभावृत्त. रा.- बाहार. ता.-तेताला.

तुम जावो वृंदावन बासा ॥धृ॥
गवां चरानें तुमरि विद्या है । म्हारो तो पति पंडित खासा ॥१॥
माके प्यारे अक्लर भये तुम । हमको देवे गारिहि सासा ॥२॥
कारे तुम माके नहिं हौ प्रभु । जसुमतिरूप गौरतर खासा ॥३॥
किसके छोरे नंदघर आये । कीना गोकुल सकल बिनासा ॥४॥
ज्ञानेश्वरकन्या श्रीहरिको । हसहस नयन बिमार बिलासा ॥५॥

द्रौपदीचा धावा

७४१ / हिंदी

सामनुष्टप. रा.-जोगी. ताल-तेताला.

खबर करो तुम नाथ हमारी ॥धृ॥
दुःशासन चंडाळ खेंचके । सभा बीच लाई भगिनी तुमारी ॥१॥
कितने प्रभु उपकार हुं गावूं । तुम देव मै अधमा नारी ॥२॥
नहिं मैं तुम्हरी भगिनी हुं लाला । तुम्हरे दासकी दासि बिचारी ॥३॥
ज्ञानेश्वरजा ननद हरीको । चरण शीस धृत करत फुकारी ॥४॥

७४२ / हिंदी

सामनुष्टुप. रा.-जोगी. ता.- तेताला.

क्या तुम लाला देखत नयना ॥धृ॥
सोल सहस्सर नारि तुम्हारी । आवो तिनको छोरके शयना ॥१॥
तुमकु तो भगिनि सुभद्रा मोको । तुमारे बिन नहि है भइना ॥२॥
तुमको जामातही पार्थ है । मोको तुमरे बिन कौनहि लैना ॥३॥
मारो प्राण आप पग लेवो । तुम रे बिन न बाहरू बैना ॥४॥ (य९.उ.१५५)
कहत कान्त ज्ञानेश्वरजाको । जातहुं मै द्रौपदिके दैना ॥५॥

७४३ / हिंदी



सामनुष्टुप रा.-केदारा. तो.-तेताला.

भोजन छोर चले श्रीरंगा ॥धृ॥
नित तिरपतको क्या चहि भोजन । ओ तो प्रिय सदा संतके संगा ॥१॥
जगमें जो अवदान न पावत । सो प्रभु खात विदुर घर चोंगा ॥२॥
हम दौरत दौरत पिछे जात है । हमकोभी त्याग गये दिरंगा ॥३॥
तब हम ज्ञानेश्वरकी कृपातें । द्रौपदि चरणन की भइहूं भृंगा ॥४॥

७४४ / हिंदी

सामनुष्टुप रा.-सोहनी. ताल-तेताला.

देखत द्रौपदी तो हरि देखे ॥धृ॥
सब जोगनका फल पाया तब । एक छनमें सावले पेखे ॥१॥
खिन्न बदन सो प्रतिफल आया । नयनन सो प्रभु मूह निरेखे ॥२॥
कोमल अंतर है वैष्णवको । मनमों पूजत हरिपग लेखे ॥३॥
ज्ञानेश्वरकन्याकें पति तब । द्रौपदी जननिहि वदत बिसेखे ॥४॥

॥ द्रौपदीचा धावा समाप्त ॥

७४५ / हिंदी राधावचन -

रंभावृत्त. रा. बेहाग. काफी. ता.-तेताला.

सुनिये पीय नंदजिके लाला ॥धृ॥
बालक हो तुम छोटे प्रभुजी । मोरे मनमें कामकि ज्वाला ॥१॥
किस भांती तुम बडे बढोंगे । सो कहिये मुझकूं जगपाला ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या श्रीहरिको । बिनति करति करि जी मतवाला ॥३॥

७४६ / हिंदी गोपीवचन -

सुशीला. रा.-मांझी. ता.-तेताला.

मोसे मत लरियेजी श्याम ॥धृ॥
तुम गडि मिलहो मैं तो अकेली । छोरो मोको काम ॥१॥
मै हूं बह्मनी तुम हौ गौली । जाने दो पति धाम ॥२॥
अब धीर धरो फिरि आवूंगी । जब होवेगी शाम ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुतात दयालू । अमर तीनको नाम ॥४॥ (य९उ.१५६)

७४७ / हिंदी गोपीवचन -

सुशीला. रा.-परज ता.-तेताला.

प्रभु मैं जाती जमुना तीर ॥धृ॥
तुम्हरी माता घरमें सोई । तुम बिदि खेलत तीर ॥१॥

भोजन कारण कांत बिठाये । ल्यावन निकरी नीर ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुतात कृपातें । यह तुम्हरोहि शरीर ॥३॥

७४८ / वृद्धावचन -

सामष्टुपवृत्त. रा.-काफी. ता.-दीपचंदी.

कोणि केली मोहिनि तुज सांग । किंवा खातेसि नित्यचि भांग ॥धृ॥
पतिशयनीं तूं भीतेस नित्यचि । कृष्णासी देतेसि आंग ॥१॥
पक्क अन्न घरिं भक्षिसिना गे । खासि फळांची रांग ॥२॥
पाहूनी पतिमुख डोळे मोडिसि । श्रीकृष्ण वाटतो चांग ॥३॥
ज्ञानेश्वरकन्येतें पुसतां । हासूनि हरि करि वांग [१] ॥४॥ (१. वाकोल्या)

७४९ / हिंदी गोपीवचन -

सामनुष्टुप.मूळ-जोगी.ताल-धुमाळी.

मत पूछो कोई । घरमों खप्तन मैं हूई ॥धृ॥
जो इस गाम पटेल को नंदन । सदन मों सोई ॥ मत पूछो ॥१॥
भाव पकर सब नाव डुबाया । हियमों धरि सांई ॥ मत पूछो ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुतातकृपातें । हरिपग शिर लाई ॥ मत पूछो ॥३॥

७५०

साममाणववृत्त. मूळ.-जोगी. ता.-दीपचंदी. गौणपीठ 'याच्या वीणे ग'

चला चलाजी केली कराया । एकटें मी उभी यदुराया ॥धृ॥
मजसाठीं बहू कष्ट केले । आज मार्गीं मी बरें सांपडले ॥१॥
तुम्हा वाटेल कीं दिवस आहे । परी वनीं झाडी दाट लाहे ॥२॥
होइल तें माझें होवो देवा । सर्व संसार माती मिळो वा ॥३॥
ज्ञानराजकन्येची हे वाणी । ऐकुनी अनुकुल चक्रपाणी ॥४॥ (य९उ.१५७)

७५१

सामपटुवृत्त. रा.-काफी. ता.-दीपचंदी

माधवजी तोंड हे लपवूं नका ।
हरला बळिराम तुमचा सखा ॥ तोंड हें०॥धृ॥
एकटे तुम्ही नंदजीचे बाळ । आमुची पडली गळ्यांत माळ ।
आतां कसा सुटका ॥१॥
वांकड्या तोंडाचा पेंधा गडी । पाहोनि बोले लाहान उघडी ।
त्याला करूं अटका ॥२॥
बाईल एकचि खडतर जाणा । आम्हि तों तुमच्या कोटि सुजाणा ।



करितां किं वश चटका ॥३॥
ज्ञानेश्वरदृष्टीच्या पुढें । केलें पाणिग्रहणहि फूडें ।
आतां दुरि न ठका ॥४॥

७५२ / बळिभद्र वचन -

साममाणव वृत्त. रा.-बेहाग ता.-दीपचंदी.

साच मी हरलों हरी । आतां अवघ्या गोपि वरीं ॥धृ॥
अवघ्या कामी कामिनि बळी । मी तों रामिच राम बळी ॥१॥
वडिलांचा हा बरवाचि मान । आतां घेइं करिं गोपीचा मान ॥२॥
केली निष्फळ माझी असे । तुझीच केवळ सफळ दिसे ॥३॥
अलकावतिपतिनंदिनी । करी योग्य स्वपद वंदनीं ॥४॥

७५३ हिंदी गोपीवचन -

श्रीवृत्त. रा.-परज. ता.-तेताला.

ये बात तुम्हरि बनमाली । सुनकर भइ हूं मतवाली ॥धृ॥
देखत देखत घर छोरा सब । भे मानस मदशाली ॥१॥
अब तो मोहे मालूम हुवा । मोहनि तुमने डाली ॥२॥
तुमहिं मिलनकूं एक हमारे । अलकावतिपति वाली ॥३॥

७५४ / हिंदी

जयावृत्त. रा.वसंत. ता.-दादरा.

गोपि रंग देख दंग भइ सब व्रजनारी ।
मदनमोहन दैत्यदमन कुंजबन बिहारी ॥धृ॥
टकि नयनन नींद नहीं रात बीति सारी ।
सुबो ना हुइ तो निकरी सीस घगरि धारी ॥१॥ (य९उ.१५८)
नंदपूत देखी पुनि जमुना किनारी ।
लाजत जी पियहि भजी मधुर मन सुधारी ॥२॥
श्यामसुंदर रूप तनू पैठे हिय मारी ।
ज्ञानेश्वरजननिकृपाफलकी झबि सारी ॥३॥

७५५ / हिंदी गोपीबचन -

शकटधाटी वृत्त. 'मज टाकुनि अवघ्या' या चालीवर

मत लेवो अंगोठी मोरीरे ।
तुम जगपाल मुरारी हो ॥ मत लेवो ॥धृ॥
तुम्हरी माता बडि है प्रभुजी । क्या करते हो चोरी जी ॥१॥

धनवाले सौकार नाथ तुम । मैं तो गरीबकि छोरी___हो ॥२॥
दूध दही चाहते होगे तो । लाय देउं भर थारी ॥३॥
अंगठी पास नाहिं देखी तो । सास देवेंगी गारी ॥४॥
पतिसुतधन यह सकल छोर मन । तुम चरणन पुतनारी ॥५॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणाबलतें । मैं हूं तुम्हरी नारी ॥६॥

### ७५६ / हिंदी गोपीबचन

शकटधाटीवृत्त. ता.- कारवा. 'यारके गलिया मैं झांजल बजाय आई' या चालीवर

भरन भरन घट पनियाको जाउंगी ॥धृ॥
सास ननंदको झुक्का देकर । हरिपग पंकज मधुकर होउंगी ॥१॥
नयन बयन ये एक करे अब । सैलिनसह मैं हरिकु मिलाउंगी ॥२॥
किसन कहेंगे तो मैं बिखभी । अपने पतिको रात खिलाउंगी ॥३॥
श्रीज्ञानेश्वरप्रभू पलंगपर । कुल बल तजि गणिकापद पाउंगी ॥४॥

### ७५७ / हिंदी गोपीबचन

इंदिरावृत्त. रा.-दरबारी कानडा. ता.-तेताला.

सखि देखिरि पनघट लीला ॥धृ॥
रश्मि ग्वालिनी घेरि रही बिच । सुमनि कांत मम नीला ॥१॥
गोपी सीस घगरिया भरि हे । बीच प्रेमका प्याला ॥२॥
तीन लोकसों रूप बिलच्छन । गल गूंजन मणिमाला ॥३॥ (य९उ.३५९)
सब गोपिनकूं हारि देत है । जसुमति लाल अकेला ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभु करुणाबलतें । भइ हूं हरि कुलशीला ॥५॥

### ७५८ / हिंदी गोपीबचन

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-तिलंग (पंजाबी खमाज) ता.-पंजाबी ठेका.
गौण.-'कदर पिया मोरी' या चालीवर

कदर हरि मोरी अंगिया छूलई । नाहक लाज गई ॥धृ॥
मैं तो सावले सोवलि बह्मनि । न्हाने मगन भई ॥१॥
गाम होवेंगा शाम धंडोरा । जाती बहिर भई ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभू करुणातें भव । तोरके निकरि सही ॥३॥

### ७५९

सामकादा. मूळ.-झिंझोटी. ता.-दादरा. गौ.- 'पांडुरंग स्मर' अभंग या चालीवर

करी गान रचुनि ध्यान रासमंडळी ।
चिंतिति ज्या नारदादि संतमंडळी ॥ करी गान ॥धृ॥



रागरंग तें अभंग ज्यास वर्णितां । तोचि वाजवितो वेणु गोपि पर्णितां ॥१॥
तात ज्ञानदेव तयाची कृपा पुरी । माळ घालुनियां गोपि चारिती पुरी ॥२॥

### ७६० / हिंदी यशोदा बचन -

शकटधाटीवृत्त

माई मोरा गोविंद देवो बताय ॥धृ॥
जाको स्मरके बिधि हर मुनिजन । आये स्वपद बिताय ॥१॥
वृंदावनमों खेलत दिन दिन । गोपिन लेत सताय ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु चरणनकूं मम । बिनती देहु जताय ॥३॥

### ७६१ / गोपीवचन -

सामकामदा. मूळ.-झिंझोटी, ताल- दादरा. 'नीज सुखें विश्रांतिसि पुत्रा' या चालीवर.

येतो मना धीर आज काहिंसा गडे ।
वाटते येतील कृष्ण मद्‌गृहाकडे ॥ येतो० ॥धृ॥
जात होतें बाई जहीं यमुना निरा । (य९उ.१६०)
उल्लंघिती तीन चाष वाम वावरा ॥१॥
लवत वाम नेत्र स्फुरे बाहु दक्षिण ।
हरिस आलि कृपा बाइ बघुनि मी क्षिण ॥२॥
काल पाहटेस स्वप्न सुशुभ भासलें ।
कवळुनि मज हृदयिं सखे स्वामि हांसले ॥३॥
नवा नवा प्रेम मनीं बाइ उठतो ।
प्रेमान्वित पूर्ण काम आंगिं दाटतो ॥४॥
पाठिमागे उभे प्रभू असति वाटतें ।
हर्षभरें अंगिं सये चोळि दाटते ॥५॥
अलकावतितातकृपा पूर्ण जाहली ।
स्वामिचरणतीर्थि माझि सतनु नाहली ॥६॥

### ७६२

शकटधाटी. छक्कडचे चालीवर.

पाहा बाइ हरि हा करतो कसा । अंगाला बिलगे लहान जसा ॥धृ॥
सोडूनि मंथन डेरा दूरी । जातांचि काढीतो लोणी करीं ॥१॥
नंदजी म्हणती बाळ पिसा । येईल स्त्री याला दों दिवसा ॥२॥
जंव जंव नंदजी बोलति याला । तंव तंव लाजावें लागतें मला ॥३॥
अलकावतिवल्लभ राजगुरू । त्याची उपासना परिपूर्ण करूं ॥४॥

७६३

कंचुकीवृत्त. मूळ-यमन. ता-धुमाळी. गौण- 'चांदणी विनविते चंद्राला' या चालीवर

रोहिणी येउं दे परबाळा । उगारूं नको लाल डोळा ।।धृ।।
बाळ हा हरि निजगृहिं आहे । येति म्हणुनि परसुत पाहे ।।१।।
आपुलें त्यांच्या घरिं जातें । खेळाया म्हणुनि कोणि येतें ।।२।।
मुलें सर्वांचिच नागळ । येती बाइ मज कळकळ ।।३।।
आलंदिपकृपा आपणासी । म्हणुनि आलों जननिपणासी ।।४।।

७६४

शकटधाटी. छक्कडचे चालीवर.

बाइ मी खचित झालें वेडी । देउनि कामसमुद्रीं बुडी ।।धृ।।
सासा ननंदा घरच्या तुम्ही । ठोका बोंबेची गुढी ।।१।।
पति देवरांची मोडोनि भिड मी । प्रभुसाठिं नेते विडी ।।२।। (य९उ.१६१)
भार्या व्हाया श्रीकृष्णाची । टाकीन अनळीं उडी ।।३।।
ज्ञानेशकरुणे व्रजराजकरवीं । फेडवितें लूगडीं ।।४।।

७६५

लावणीवृत्त. मूळ.-यमन असावा. गौण.'आले वनमाळी रात्री' या चालीवर.

मामि मुला तुमचीया की बायकांचा चाळा ।
म्हणे जननीस आमुच्या एवढि द्या बाला ।।धृ।।
काय नेणो घेऊनीयां कंठि करिल माळा ।
आता पासोनीयां नाही गुण बरा बाळा ।।१।।
सभेमध्ये दिसतो बाई विचित्र हा काळा ।
परि श्रुती म्हणती हाची शिक्षा लावि काळा ।।
कैशा आम्ही मोहू मामी पाहूनी लहाना ।
आम्हा मिळवाया ज्ञानस्वामि हाति आणा ।।२।।

कृष्ण-बुढी संवाद

**७६६ / श्रीकृष्णवचन**

साममाणव. मूळ.-पूर्वी ता.-दीपचंदी. गौण.- 'राधे घडिघडि'-

मामी तुम्ही तरी द्या आपूलि पोर । काय करितां ही बहु झाली थोर ।।धृ।।
नाहीं तरी तुम्हांला माहीत मी चोर । लग्न न करितां करिन मी घोर ।।१।।
कुळ तुमचें बहु उंच सलाल । बरा वर मी मुलिला नंदलाल ।।२।।

बुढीवचन -



बहु काय करिता जी पोरींची आस । दिनरात तुम्हां वेश्याघरी वास ।।३।।

कृष्णवचन -

असें काय बोलतां सोडोनि लाज । निःसंग मी भोगुनी स्त्री समाज ।।४।।
कारुण्यसिंधू आळंदीश तात । हरि ठेवी गोपीकामस्तकिं हात ।।५।।

**७६७ / बुढीवचन -**

शकटधाटी.- ता.कव्वाली.

अग यशोदे पाहगं बाई । नेलि वहडुनश्यान सुन माही ।।धृ।।
काय सांग माय आपल्या पोरा । बाई भला झाला चटोरा ।।१।।
मी म्हातारी बाई एकली । माझ्या डोळ्यांत धुळ टाकली ।।२।।
रांडलेक हा माजला बरा । मी करीन याचा मातेरा ।।३।। (य९उ.१६२)
याला कोनं शिकवीले गुन । पोरगही पडल लहान ।।४।।
माय लेकराला म्हनाव । कोणि घेइल तुमचेंच नांव ।।५।।
तो लहान सुटुन जाइल । बोल तुम्हावर येइल ।।६।।
बोल आयकुनि म्हातारिचा । बोले नाथ विश्व तारीचा ।।७।।

कृष्णवचन -

काय म्हणसी गे म्हातारी । दिलि सुन मज ज्ञानेश्वरी ।।८।।

७६८

साममाणववृत्त. रा.-बेहाग. ता.-दीपचंदी.

गोपीवचन

प्रभुजी थोडेसे थांबा गड्या । जाऊं द्या सासू देशधड्या ।।धृ।।
काय क्रीडा करितां कुड्या । घेतां कामाचसाठिं उड्या ।।१।।
सोडुनी आमुच्या लुगड्या । खेळुं मंदिरी या फुगड्या ।।२।।
ज्ञानेश्वरकृपा सुगड्या । पूजितां सुखी अवघ्या घड्या ।।३।।

०००

# ।। रुक्मिणीचे पत्र ।।

**७६९ / आर्या**

राक्षसविधिनें तरि मज पर्णोनी द्वारके प्रती न्यावें ।
हीच विनंती प्रभुजी न स्त्रीलिखितास तुच्छ मानावें ।।१।।

७७०

तुम्हि न वरितां मजला तरि शतजन्मावधीं तपा करीन ।

परि या शिशुपाळाच्या जाया मी सिद्ध होतसें करिं न ॥२॥

७७१

गोकुळिंच्या नारीसम नाहीं मी भक्तिमंत परि देवा ।
लिहिल्या पत्रावरुनी घ्या दुबळीची कसी तरी सेवा ॥३॥

७७२

सिंह तुम्ही असतां प्रभु जंबुक शिशुपाल हा मला वाटे ।
यास्तव येउनि लवकर जानवसा घ्या सदम्बिकावाटे ॥४॥

७७३ / दिंडी

आमुचा हा कुलधर्म असा आहे । पूजिताती अंबिका सदा पाहे ।
केसरी तूं येऊनि दयामूर्ती । नेउनीयां गाजवी जनीं कीर्ती ॥५॥

७७४ / हिंदी साकी

सुनसुन प्रभुजी तुम्हरे ऊपर मेरी मति प्रभु लागी ।
तुम्हरे कारन कीर्तनमाही रयनदीन मैं जागी ॥६॥

७७५ / हिंदी

कीर्तीनामा द्विजमुख सुनिके सुंदर कीर्ति तेहारी ।
छिनछिन मन भावति मैं जाउं तुम चरणन बलहारी ॥७॥ (य९उ.१६३)

७७६ / हिंदी

अब नहिं किस होकर जाऊंगी प्राण देउंगी अपना ।
तुमबिन ये जग भासत मोहे सब मायामय सपना ॥८॥

॥ समाप्त ॥

७७७ / गोपीवचन कनिष्ठा नायिका -

साममाणव. मूळ.- जोगी ता-दीपचंदी. गौण.-ऐसे कहती बटाऊसे मोहना.

मुनि सांगति तुम्ही ब्रह्मचारी । नित्य शोधीतां व्रजींच्या हो नारी ॥धृ॥
आपण तों वनींच रहावे । कधी कामसौख्यची न घ्यावें ॥१॥
ब्रह्मचर्यासह करितां संग । आम्हि पतन होऊं समनांग ॥२॥
ऐसी बोलतां ज्ञानेशबाळा । आलें हास्य त्रिभूवन पाळा ॥३॥

७७८ / ओवी

श्रीकृष्णवचन — आम्ही ब्रह्मचारी संपूर्ण । पाहोनि तुझें सुंदरपण ।
स्नानसंध्या देवार्चनवन । सर्व कांहीं सोडिलें ॥१॥

७७९ / श्रीकृष्णवचन -

सामनुष्टुप वृत्त. रा.-काफी ता.-दीपचंदी.



प्रिये तुज हें कां न कळे ॥धृ॥
करुनि कर्म मी अलिप्त ऐसे । कां तंव मन न वळे ॥१॥
ब्रह्मचारि मी आहेंचि परी । तुजसाठी डोहळे ॥२॥
देतो सुकृत सकळही तुजला । करिं मजसह सोहळे ॥३॥
ऐकुनियां हे कृष्णवचन मग । कामिनि मोडी डोळे ॥४॥
ज्ञानेश्वरकन्या सुकुमारा । चिंति मनीं सावळे ॥५॥

७८० / गोपीवचन -

सामनुष्टुप. रा.- यमन. ता.-तेताला.

शोधिला की काय वेगळा वेद ॥धृ॥
सुकृत देउनी नारि भोगितां । करणें ऐसा भेद ॥१॥
भोगासाठी गोष्टि सांगता । परब्रह्म अभेद ॥२॥
शिकलां तुम्हीं व्याकरणादिक । मी मूर्खचि निर्वेद ॥३॥
ब्रह्मचारि असूनी कामाचा । मनिं अत्यंतचि वेध ॥४॥
असो आम्हा करणें काय । ज्ञानेश अनवच्छेद ॥५॥ (य९उ.१६४)

७८१

साममाणव. - मूळ.-जोगी. ता.-दीपचंदी. गौण.-ऐसी कहती.

मनिं होतें तैसें ग झालें । चालोनी हरि मंदीरी आले ॥धृ॥
कुचकाठिण्यगजगर्व झाडा । द्याया केसरी श्रीरंग गाढा ॥१॥
पतिप्रेम आजवरि तान्हा । निजकरें हा वर्धवी कान्हा ॥२॥
शिवा वाहिलें लक्ष बिल्वपाना । तत्फळ कांत यशोदातान्हा ॥३॥
अधरामृत पाजूनि देवा । करूं दोघें ज्ञानेश्वरसेवा ॥४॥

७८२ / अधमा नायिका गोपीवचन -

सामनुष्टुप. मूळ.-जोगी. ता.-तेताला. गौण.-पद घुंगरु बांधकर

फिर मागें नंदाच्या पोरा रे ॥धृ॥
घेसी जरि तूं दहि दुध आतां । ठेविन बांधुनि चोरा ॥१॥
म्हणवीशी तूं धनवंताचा । कंठीं बांधिन दोरा ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु दीनदयाळचि । घे तच्चरणीं थारा ॥३॥

७८३ / हिंदी गोपीवचन -

सामनुष्टुप. रा.-सोरठ.-ता.-तेताला.

माई ब्रिजबीच रंगेला ख्याल ॥धृ॥
अन्या नारी नंदनंदनकी । जनम भई प्रेम नाल ॥ माई ब्रिज ॥१॥

घरदरवाजा लागा तोभी । आया है नंदलाल ॥ माई ब्रिज ॥२॥
अब तुमें कछु कहना कहिजो । डारति हूं मै हरिगल माल ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु तात कृपाघन । तिनके पगपर राखति भाल ॥४॥

७८४

सामनुष्टप् वृत्त. मूळ.-जोगी. ता.-दीपचंदी. गौणपीठ.

बिदी बिदी कां मज रोधितां गे ॥धृ॥
झाले मी आतां कुलटा नारी । कोठवरी बाई तुम्हि शोधितां गे ॥१॥
टाकुनि हरिला आपुल्या घरिं तुम्ही । डाकिणि सासू आराधिता गे ॥२॥
आजवरी मजसम जरि असत्या । तरी जीवन्मोक्ष साधिता गें ॥३॥
ज्ञानेश्वर करुणाघन सद्गुरु । दीनजना निजपद बोधिता गे ॥४॥(य९उ.१६५)

७८५

सामकामदा. मूळ.-झिंझोटी. ता.-दादरा. गौण.- निजसुखें विश्रांतिसी

बाई देव जेवितांचि काय बोलिले हो ।
उपवासी विप्रासह उठुनि चालिले हो ॥ बाई देव०॥धृ॥
किति बाई सदनिं वागुं सांभाळुनि सांगा ।
अझुनीयां केविं दया ये न रमारंगा ॥१॥
बैसतें मी नित्य बाई लावुनी कवाडें ।
काय करूं स्वामिमनीं संशय अति वाढे ॥२॥
बरवें झालें बाइ मला पाठिराख्या मामी ।
नाहिं तरी ठेविते न देव कदा धामी ॥३॥
लेकासाठिं बाइ जना आवडती सूना ।
परि मजवरि मामिचा न लोभ अणुहि ऊणा ॥४॥
काल मामंजीनें मला मागितलें पाणी ।
सांगु नका काम म्हणाल्या कि नंदराणी ॥५॥
करितां ये स्वयंपाक धुरें नयनिं पाणी ।
उठवुनि तहिं तोंडावरि फिरविति मृदु पाणी ॥६॥
बोलण्याविषयिं मी न म्हणें पुनः देवा ।
राहुनि घरिं करिन परि मामिचरणसेवा ॥७॥
कधिं तरि मसिं बोलतील अलकावतिराजे ।
धरिति आज लाजे परि प्रेम मनिं विराजे ॥ बाई देव जेवितांचि० ॥८॥

७८६ / भगवद्वचन यशोदेप्रत-

सामनुष्टुपवृत्त.मूळ.-जिल्हा. ता.-दीपचंदी. गौण.'सये माझि हरिनें पुरवीली पाठ' या चालीवर



आई, मज कळतें भल्याचें मी पोर । कां घेसि मजला बांधाया दोर ॥धृ॥
सहज खेळाया बिदेवरि जातां । गोपि दाखविति कोर ॥१॥
नानापरि चेष्टवुनी मातें । सांगति तुज हा चोर ॥२॥
ज्ञानेश्वरगडि बोल ऐकुनी । हासति मुनिजन थोर ॥३॥

७८७ / मध्यमा नायिका गोपीवचन -

सामनुष्टुपवृत्त. रा.-बिलावल. ता.-तेताला.

काय करूं मामीबाई वाटते जी लाज ॥धृ॥ (य९उ.१६६)
चहुं पोरामध्यें नाचविती हरि । बळेंचि देउनि साज ॥१॥
सुपर्णशय्या करिति कुंजवनिं । काय घरीं नाहिं बाज ॥२॥
रजनी मध्ये जातें तंव, दिनि । वेणूक्वणनि न काज ॥३॥
ऐसें करितां काय म्हणतिल । कुळवंत आळंदीराज ॥४॥

७८८ / गोपीवचन -

सामनुष्टुपवृत्त. रा.-काफी. ता.-तेताला.

मैं तो दासि तुम्हरी नंदलाल ॥धृ॥
मैं हूं कुंवरी आठ बरसकी । तुमभि जसोमति बाल ॥१॥
तुम चालक प्रभुजी ब्रजमांही । मुझपर करिये ख्याल ॥२॥
मेरा जो कछु तारुणपन सब । सोहि तुम्हारा माल ॥३॥
ज्ञानेश्वरगुरुकरुणाबलतें । करूंगी सेवा कमाल ॥४॥

७८९ / मी गौळ्याची

लावणीवृत्त. मूळ.-पूर्वी. ता.-धुमाळी. गौण. - नरजन्मामधि.

सदासर्वदा कामवृत्ति हे नाही हरि हो बरी ।
भल्याचे तुम्हि उमजा अंतरी ॥धृ॥
मी गौळ्याची तुम्हि नंदाचे कुळ पहा काहीतरी ।
करावी शोभेलसी अंतुरी ॥
काहो का इतुकी तुम्हाला मी वाटलि साजिरी ।
मला बहु छळतिल निजजन घरी ॥
असेल तुमची मर्जी मग मी राजिच आहे परी ।
भल्याचे तुम्हि उमजा अंतरी ० ॥१॥
एकपत्नी तुम्हि ऐसी ध्वनि ही निगमनगारी मिळे ।
आता कां परवश रतिवर बळे ।
तुम्हां पाहतां पतिव्रतांचे मनही प्रभुजी वळे ।
तुम्हा हा केवि अनर्थ न कळे ॥

नाही तुमची लहान वय सोय धरावी सत्वरी ॥२॥
काम सरति तै राम मिळे हे वचन निगमांतरी ।
पाळुनी वरा मुक्ति मांतुरी ॥
वाणितील मग गुण तुमचे प्रभु सुरमुनि सर्वां परी ।
एवढे ऐका वदते खरी ॥
येइल मर्जिस तसे करावे आता याउपरी ॥३॥
विषयमनन संग उपजवितो काम उपजवी मनी ।
क्रोध मग उपजे कामांतुनी ॥
क्रोधापासुनि मोह उपजुनी करी आठवण सुनी ।
योग्य मति जाय तदा नासुनी । (य९उ.१६७)
प्रज्ञानाशी नाश सर्वथा अशि तुमचिच वैखरी ।
भल्याचे तुम्हि उमजा ० ॥४॥
नाहि पाहिला पतिविण कोणी पुरुषहि मी आझुनी ।
नव्हति मज विषयसंवयही जुनी ॥
परि द्वारिं एकटी सावळी तनु तुमची पाहुनी ।
उडाले हृदय शरीराहुनी ॥
कराल भज नोवरी तरी धरा प्रेम अलंदीवरी ।
भल्याचे तुम्हि उमजा ० ॥५॥

७९० गोपीवचन -

इंदिरावृत्त. रा.-परज ता.-तेताला.

सावध व्हा हरि यदुराया ॥धृ॥
आलों आम्ही सकळ मिळोनी । तुम्हा स्वामि वराया ॥१॥ सावध०॥
चार दिवस सोहळाहि न लगे । राक्षस विधिनें न्याया ॥२॥ सावध०॥
आम्ही सिद्ध सकळ तुमच्या पदिं । तनुमन जीव वहाया ॥३॥ सावध०॥
अलकावति वल्लभा वराव्या । एक मुहूर्ते जाया ॥४॥ सावध०॥

७९१ गोपीवचन -

तिलोत्तमावृत्त. मूळ.- माहित नाहीं. गौण.- सख्यांनों गौरि पुजाया जाऊं. या चालीवर.

हें तुजलागिं कसें आवडलें ॥धृ॥
चित्त आमुचें काय तवपदीं । नाहिं खरोखर जडलें रे ॥१॥
नख नलगे त्या स्थानीं प्रभुजी । उल्हाटयंत्र घडलें रे ॥२॥
नंदसुकृत हें अकस्मातची । आम्हालागिं उघडलें रे ॥३॥



रूप आजवरि सन्निध होतें । कोठें जाउनि दडलें रे ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणायोगें । विरहिं योगसुख घडलें रे ॥५॥

७९२ / यशोदावचन -

सामनुष्टुपवृत्त. रा.-सोरठ. ताल.-तेताला.

बाई माझा लाडका हरी कोणितरी आणा ।
अक्रुरानें नेला बाई एकलाच तान्हा ॥ बाई ०॥धृ॥
नाहिं पुरलि हौस बाई पाजुनियां पान्हा ।
प्रणवाचें वाच्य त्या मी म्हणतसें कान्हा ॥१॥
गर्गगुरूवाक्य सर्व आठवतें आतां ।
सांगा जावुनि ये स्तन्य देते तुझी माता ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु तुम्ही तनुमनें ध्याना ।
माझा बाळ तुमचा कान्त त्वरें विनवाना ॥ बाई ०॥३॥ (य९उ.१६८)

७९३

सामनुष्टुपवृत्त. रा.-असावरी. ता.-तेताला.

पुरली आतां ठेव । गोपिनों ॥धृ॥
माझा गेला प्रियनंदन कीं । तुमचा तो नवरदेव ॥१॥
हरि होता तोंवरी न होते । यमाहि पासुनि भेव ॥२॥
उपाय हा एकची करुं चला । भजुं अलकावतिदेव ॥ गोपिनों ० ॥३॥

७९४

साममाणववृत्त. मूळ.- जोगी. ता.-दीपचंदी.

हरिगुणवर्णन पुरें करा गे । मम स्तनदुग्धें भिजते धरा गे ॥धृ॥
जोंवरि तो मज भेटत नाहीं । तोंवरि तरि तुम्ही मौन धरा गे ॥१॥
त्याला तुम्ही आवडतां सुंदरी । त्यावीण मज सूनि वसुंधरा गे ॥२॥
सौभाग्याला हृदयिं धरूनी । अलकावतिपतिपाय धरा गे ॥३॥

७९५ यशोदावचन -

सामनुष्टुप. रा.-असावरी. ता.-तेताला.

वत्सा काय मी नव्हतें माय ॥धृ॥
नाहिं तुला चोरिलें दहिंदुधा । अर्पिलि बापा साय ॥ वत्सा०॥१॥
गोपिसहित मी शोकाकुल बा । घडिघडि मोकलि धाय ॥ वत्सा०॥२॥
तुज मिळवाया स्मरतें अक्षय । अलकावतिपतिपाय ॥ वत्सा०॥३॥

७९६

ओवी - ऐसी नंदपत्निवाणी । आणि तैशाच गोपराणी ।
शोकग्रस्त पाहुनी शार्ङ्गपाणी । पाचारी वाणी उद्धवाते ॥१॥

७९७ / हिंदी भगवद्वचन -

सुशीला. रा.-गुर्जरी म्हणजे गुजरी तोडी. ता.-तेताला.

ऊधो क्या कहुं गोपी प्रीत ॥धृ॥
पति सुत धन सब तजके मोपर । राखत जीव विनीत ॥ ऊधो० ॥१॥
नहिं देखी मैं कोइ जनममों । इतनी भक्तिकी रीत ॥ ऊधो ॥२॥(य९उ.१६९)
जावो तुम समुझावन कारन । उनको सुखसतचित् ॥ ऊधो० ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या सुमिरनतें । हरि हृदयद्दति अमीत ॥ ऊधो० ॥४॥

७९८ / अभंग

सांगावें तें सर्व थोडेंचि उद्धवा । मजसाठीं जीवा देतील त्या ॥१॥
मजमध्यें त्यांचे गुंतले की प्राण । सुखीं की मरणप्राप्ता नेणो ॥२॥
जा जा तया पाजीं शुद्ध ज्ञानामृत । जीववीं समस्त मद्भक्तांते ॥३॥
संतावीण बापा उपदेशावया । सामर्थ्य दुजीया नाही नाही ॥४॥
उद्धव गोविंद दोघेही सद्‌गद । जळभरी स्तब्ध नयन ज्यांचे ॥५॥
ज्ञानेश्वरप्रभु प्रेमाची आवडी । न वर्णवे गोडी आम्हातें की ॥६॥

७९९

रंगलावणीवृत्त. रा - सोरठ. ता.- तेताला.

काय तुम्हां थोरा नाही आबरूची चाड हो ।
झालि देवा तुमचे चित्ती बहु कामवाढ हो ॥धृ॥
पाटलाचे पोर तुम्ही पहा स्त्रिया थोर हो ।
नीच आम्हा गौळिणीला का लाविता घोर हो ॥१॥
खावयाच्या मिसे येता गोपिकांच्या घरी ।
हळु हळु पुसता तुझ्या मोठे काय उरी ॥२॥
सकुमार तुम्ही आम्ही धांगडि बाया ।
प्रणयरज्जुनें बांधू ज्ञानेश्वरपाया ॥३॥

८००

रंगलावणीवृत्त. रा. - पहाडी. ता.- तेताला.

थट्टा नाहि भावत पोरा म्हणे तुमचि माय जी ।
आता धरूनि ओढिता कां गौळिणीचे पाय जी ॥धृ॥
शिमग्याचे दिवशी थोडे टाकिले मी पाणी ।



खेकाऊनि धावली तै मज नंदराणी ॥१॥
संक्रांतीच्या दिवशी गोपी धूत होत्या पाय जी ।
तेव्हा ही म्हणाली तैसी लाज गेलि काय जी ॥२॥
आता जुलूम का आम्हा गरिबांचे वरी ।
तुम्हां योग्य पहा स्वामी साजिरी नोवरी ॥३॥
ज्ञानेश्वरबाळा आम्ही सर्वदा निष्काम जी ।
हृन्मंदीरी कृष्णा येऊनिया घ्या विश्राम जी ॥४॥ (य९उ.१७०)

८०१

सममाणव. मूळ.-पूर्वी. ता.-दीपचंदी. गौण.-''राधे घडि घडि'' या चालीवर

मनमोहन मंदीरीं आले । धन्य भाग्य सनाथ मी झाले ॥धृ॥
आजवरि पाहत होतें वाट । करुनियां कुसुमसेज थाट ॥१॥
सर्व गोपी श्रुतीसमन्वय । कृष्णी साधूं भक्ती प्रेमान्वय ॥२॥
नंदनंदन पाहूनी डोळा । हर्ष निर्भर ज्ञानेशबाळा ॥३॥

८०२ / स्नुषावचन :-

रंगलावणीवृत्त. मूळ-पूर्वी. ता. धुमाळी. गौण. 'द्राक्षांचे मंडप'

बरे झाले तुमचे आहे चामाचे हे तोंड ।
जरी असते काष्टाचे तरि होते का दुखंड ॥ बरे झाले० ॥धृ०॥
बिदीवरी पाहता हरी कपाळ की उठे ।
लेक द्वाड घरी येता बरा प्रेम दाटे ॥ बरे झाले ॥१॥
रातदिवस नाही तुमच्या बोलण्या आकार गे ।
काय तुम्ही तरुणपणी होत्या शुद्ध फार गे ॥ बरें झालें ॥२॥
आतां तुम्हां सांगते मी स्वये ऊघडूनी ।
झाले कृष्णपत्नी घाला बाह्य दवडोनी ॥ बरें झालें ॥३॥
कृष्णाविषी तिरस्कार मनी तुमच्या फुका ।
वृद्धपणी बोलतांची उडे अवघा थुंका ॥ बरें झालें ॥४॥
निघूनी मी कृष्णाघरी गेले जरी नीक ।
तरि काय तुमचे होते सांगा खाले नाक ॥ बरें झालें ॥५॥
ज्ञानेश्वरकन्या नाही कुणाच्या आधीन ।
राहते मी कृष्णापायी होउनिया दीन ॥ बरें झालें ॥६॥

८०३ अधमावचन :-

रंगलावणीवृत्त. मूळ-पूर्वी. ता.-तेताला. गौण. 'द्राक्षांचे मंडप'

नाहि डोळे फुटले माझे पाहते मी तूला ।
काय करितो श्रीकृष्णा ही वेडि वेडि लीला ॥ नाहि० ॥धृ०॥
एकलें मी मंदिरी या दुजे नाहि कोणी ।
हाका मारावया नाही घोर माझि वाणी ॥१॥
आता पासुनिया ऐसे बरे नाहि चाळे ।
असे वाटते मला तूं जासि नाचमेळे ॥२॥
निरीया धरूनी मजला नको छळू देवा ।
सांगसी ते करावया उदार मी सेवा ॥३॥ (य९उ.१७१)
ज्ञानेश्वरबाळा आम्ही सर्वदा कुमारी ।
मारुनिया कामबाणा दाविसी खुमारी ॥४॥

८०४ / हिंदी

सामनुष्टुप. रा.-भूप. ता.-तेताला. राजविद्याधर.

माई मोहे लागी हरिकी आस ॥धृ॥
औरके घरमो मति दे मोको । नहीं करोंगी बास ॥ माई मोहे ॥१॥
अन्य पतीको मार डारूंगी । सोंगी हरिके पास ॥ माई मोहे ॥२॥
माया परिणति हरि विवर्त ते । मिलत जगदाभास ॥ माई मोहे ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु तात हमारे । रहूंगि उन पग पास ॥ माई मोहे ॥४॥

८०५

रंगलावणीवृत्त. मूळ-पूर्वी. ता.- तेताला. गौण.'द्राक्षांचे मंडप'

भल्याची मी कांता काही पहा मागे पूढे ।
काय तुमचे कामामुळे चित्त झाले वेडे ॥धृ॥
आजवरी नव्हते मला परनरडोहळे ।
पाहोनिया कृष्णा तुम्हा इच्छिते सोहळे ॥१॥
पती माझा खडतर महा अभिमानी ।
आता पासोनी तो तुम्हा प्रभु वैरि मानी ॥२॥
ज्ञानेश्वरबाळा आम्ही तुम्हा योग्य साच ।
परी दिले दुसऱ्या घरी मिळुनीया पांच ॥३॥

८०६ / हिंदी गोपीवचन - अधमा नायिका.

सामनुष्टुपवृत्त. रा.-बागेश्री. ता.-तेताला.

हरिको भुलावने ब्रिज कौन आई ।
तीन दीन गई रात घर नहिं कोई ॥ हरिको०॥धृ॥



परनारप्रीति हरिको किसने सिखाई ।
डरती हुं अकेली मैं अंधारेमें बाई ॥ हरिको०॥१॥
और गोपियोंसे क्या रांड भई प्यारी ।
कोइ तोभि जाय ल्यावो हमारे मुरारी ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या तुमहो सुंदर नारी ।
सबमिल बांधो हियमें दृढ पूतनारी ॥ हरिको०॥३॥ (य९उ.१७२)

८०७ / नारद वचन कंसाप्रति -

सामनुष्टपुवृत्त. रा.-छायानट. ता.-तेताला.

शिवविष्णू सम ते दोन्ही ॥धृ॥
आले वाटे जग कैवारें । अवतारचि घेऊनि ॥ शिव विष्णू ॥१॥
एक गौर एक शामवर्णी । शुर दैत्यदल कदनीं ॥ शिव विष्णू ॥२॥
आतां वसुदेव देवकी ते । दे सत्वर सोडोनी ॥ शिव विष्णू ॥३॥
वन्हि मंदिरीं लावुं नको तूं । नसतांची आणोनी ॥ शिव विष्णू ॥४॥
ज्ञानेश्वरसुतवाक्य कांहिंतरि । आकर्णय निज कानीं ॥ शिव विष्णू ॥५॥

८०८ / हिंदी

सामनुष्टपु. रा.-हमीर कल्याण. ता.-तेताला.

देवरजी थट्टा नहिं करना ॥धृ॥
देवर तुम तो पतिसम मति हो । भाइनकों डरना ॥ देवरजी ॥१॥
मात जसोदा गारि देवेगी । मनमों याद करना ॥ देवरजी ॥२॥
बालपनेमें भजो नाथजी । ज्ञानेश्वर चरणा ॥ देवरजी ॥३॥

८०९ / हिंदी दोहा

सामनुष्टुप. रा.-तिलंग (खमाज) ता.-तेताला.

सावलि सुरत देख कूदि डारी ॥धृ॥
जल भरि जमुना नाव न लीन्ही । प्रेम पकर आइ भारी ॥ सावलि ॥१॥
दोहा - नैनन नैन मिलाय मिलायके पकरा मनमों भाव ।
एक बोल बोलिके मधुरतर मम मन काम बिछाव ॥ सावलि ॥२॥
ज्ञानेश्वर बाला हूं प्रभु मैं । बस भइ तुम्हरी नारी ॥ सावलि ॥३॥

८१०

वासंतीवृत्त. रा.-हमीर. ता.-तेताला.

आजवरी होतें मी अज्ञान ॥धृ॥
मोठे पाहुनि मम पितयानें । दिलें आपणा दान ॥ आजवरी ॥१॥

इतर गोपिकासंग त्यजूनी । घ्या माझें रतिदान ॥ आजवरी ॥२॥
काय नसें मी गोरि गोमटी । काय न केलें स्नान ॥ आजवरी ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु दाखविती मज । तुमच्या पदिं विंदान ॥ आजवरी ॥४॥(य९उ.१७३)

८११ / अधमानायिका वचन -

सुशीलावृत्त. रा.-यमन. ता.-तेताला.

ज्याचा त्या हो गोड ॥ कृष्णा ॥धृ॥
तुझ्या काळजीमुळें गौळिणी । झाल्या सकळहि रोड ॥ कृष्णा ॥१॥
आणखि पाहीं दुजि बाजारू । माझ्या निरिया सोड ॥ कृष्णा ॥२॥
नंदजिनें तुज हीच दिली कां । स्वातंत्र्याची जोड ॥ कृष्णा ॥३॥
चावडिवरि मी नेइन धरुनी । दाविन नंदा खोड ॥ कृष्णा ॥४॥
जरि तुज आमुची आवड तरि हरि । ज्ञानेश्वरपद जोड ॥ कृष्णा ॥५॥

८१२ यशोदावचन -

सामनुष्टुप. रा.-हमीर. ता.-तेताला.

मजसी बोलुं नका कोणी ॥धृ॥
तुम्हां वाटेल तसेंचि करा । न्या सारंगपाणी ॥ मजसी ॥१॥
नायकवति या पोराची मज । नित्यचि गाऱ्हाणीं ॥ मजसी ॥२॥
तोही धांगड तुम्ही धांगडी । वृद्ध मी नंदराणी ॥ मजसी ॥३॥
नायकेचि त्या काय करावें । उगि शिणवुनी वाणी ॥ मजसी ॥४॥
ज्ञानेश्वरजामात जननिची । प्रणयान्वित ग्लानी ॥ मजसी ॥५॥

८१३

सामकामदा. मूळ.-बेहाग. ता.-दादरा. ''पांडुरंग स्मर अभंग.'' या चालीवर

काय सौख्य पावलीस सांग कामिनी ।
ममविषयी भलतें भरिलेस पतिमनीं ॥धृ॥
शांत दांत संत त्यास शरण मी असें ।
कांत कांतिमंत मला नयनिं ना दिसे ॥ काय ॥१॥
नारी नर नपूसंक सर्वही हरी ।
रत्नभरित भूमि त्यास संत जो हरी ॥ काय ॥२॥
त्यागुनियां वित्त चित्त हरिपदीं मिळो ।
सासुश्वसुरपतिगृह मग सर्वही जळो ॥३॥



असो चाल मत्समागमास साधुनी ।
वंदुनिया कृष्ण करी पातका धुनी ॥ काय ॥४॥
जारिणि मी साच परी तूंचि सावरीं ।
ज्ञानेश्वरतात हस्त मस्तकावरी ॥५॥ (य९उ.१७४)

८१४

सामकामदा. राग, ताल, चाल वरीलप्रमाणे

सत्य जाण प्राण आमुचे तुझ्यावरी ।
जन्मजन्म जाहलों तुझ्याच नोवरी ॥धृ॥
कमलगर्भि सुंदरपण जें असे हरी ।
तद्वरिष्ठ दृष्टि तुझी त्यासही हरी ॥१॥
चरण धरिति त्यांस मरण योग्य कां गड्या ।
घालाव्या काय सांग डोहिया उड्या ॥२॥
नंदबाळ तूं कृपाळ घे अम्हां करी ।
काम करित ग्रास रास दावि झडकरी ॥३॥
इच्छित दे कष्ट परी नारि या वरी ।
ज्ञानेश्वरचरण मिळुनी स्मरूं सत्वरी ॥४॥

८१५ / आर्या

जेथें जेथें हरिनें वांचविले तेचि वर्णुनी बाळा ।
म्हणती घालूं सर्वहि कंठीं हरिच्याचि पर्णूनी माळा ॥१॥

८१६ / हिंदी

सुमती. रा.-असावरी. ता.-तेताला.

हतो कैसो कारो नाग ॥धृ॥
बिख जलपान करत मरहि गये । न रहाथा कछु माग ॥ हतो ॥१॥
तो निजकरुणादृष्टि उठाये । भलो सबनको भाग ॥ हतो ॥२॥
अघासूरनें ग्रासा ब्रज तब । राखा प्रेम बिलाग ॥ हतो ॥३॥
ज्ञानेश्वरबालाका ही क्यौं । फूट गया सा भाग ॥ हतो ॥४॥

८१७

ओवी - इंद्रें मांडिला प्रळय थोर । वर्षो लागला शिळासंभार ।
तेव्हां करोनि गोवर्धनोद्धार । ब्रज साचार रक्षिलें ॥१॥

८१८ / दिंडी

वात जेव्हां सूटला ब्रजीं गाढा । तदा दैत्या दाविला मृत्युवाडा ।

अंगणीचा मोडिला बळें गाडा । गोपिकांचा कां मोडविला गाडा ॥१॥

८१९

पाहुनीयां अन्याय करा शिक्षा । देउनीयां निजप्रेमभक्ति दीक्षा ।
नखें खुंटे त्या कासया कुठारी । त्वद्वियोगें मेलोंचि पूतनारी ॥२॥

८२० ओवी

आकाशीं मेघ पाहतां । रडोनी बोलोनी वनिता ।
म्हणती नाहींस काय पृथ्वीवरुता । रमाकांता जगद्गुरो ॥१॥

८२१ / दिंडी

मेघ आकाशीं अतसि सुमनवर्णी । ऊर्ध्वनेत्रा प्रार्थिती विमलवर्णी ।
अर्पुनीयां चित्त हे कृष्ण चरणी । उदित झाल्या वपु बाह्य प्राण चरणी ॥१॥
(य९उ.१७५)

८२२ श्रीशुकवचन -

सामपटु. रा.-जोगी. ता.-दीपचंदी.

घडिघडि घडिघडि छळि हा हरी ॥ ज्यांना ॥धृ॥
परि त्या नाहीं गेल्या त्यजुनी । गोकुळ मथुरा पुरी ॥१॥
सासु सासरे नणदा त्यांना । मारित होत्या घरीं ॥२॥
हेमंतकालीं शैत्य न गणुनी । क्रीडति यमुना निरीं ॥३॥
वस्त्रें चोरुनि हरिनें नेतां । निंदिति नाच तरी ॥४॥
मथुरे जाता हरिस बांधिलें । ज्यानीं हृदयांतरीं ॥५॥
ज्ञानेश्वरकृपें हरिप्रिया । वंदू प्रेमभरी ॥६॥

८२३ गोपीवचन -

सामनुष्टुप. रा.-यमन.ता.-तेताला.

तूं नससि दुरी गोविंदा रे ॥धृ॥
सुरवर मुनिजन ध्याति तपबळें । तव चरणारविंदा ॥ तूं नससि ॥१॥
नाहीं तुजला करण कर्म ते । नाहिं कार्यकृत धंदा ॥ तूं नससि ॥२॥
गोपकन्यका श्रमल्या तरिही । येसी न प्रीतिछंदा ॥ तूं नससि ॥३॥
ज्ञानेश्वरकरुणार्द्रकटाक्षें । स्मरतों परमानंदा ॥ तूं नससि ॥४॥

८२४ / सप्तस्वर

सामनुष्टुप. मूळ - जिल्हा ता.-तेताला. गौण.-धावपाव गुरुमाय माझे.

नाधिंन्नात्रक धिं धिं नाना । ऐकुनि नाचे मन्मथ नाना ॥धृ॥
सारिगम पधनी सप्त स्वरांचा । गाई आलाप वर वीरांचा ॥नाधिं ॥१॥



राग विवेकें ताल ग्राम अति । गातां गोपी सर्व कामवति ॥ नाधि ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणाबळतें । पर्णुनि न्याया हरिप्रति बळ तें ॥ नाधिं ॥३॥

८२५ गोपीवचन मधुकराप्रति -

वांसतीवृत्त. रा.-केदारा. ताल.-तेताला.

आमुचें जीवित झालें मंद ॥धृ॥
भ्रमर चतुर तूं कुमुद शहाणा । घेउनि आला गंध ॥ आमुचें ॥१॥
मन मधुपा पाना बैसाया । हरिचरण कमल रुंद ॥ आमुचें ॥२॥
आम्हासाठी रुंजी घालुनि । वळवी श्रीगोविंद ॥ आमुचें ॥३॥ (य९उ.१७६)
ज्ञानेश्वरबाळा हरिचरणा । सेविति नित्य अनिंद ॥ आमुचें ॥४॥

८२६

कंचुकी. मूळ.-पिलु. ता.-धुमाळी. गौण.-येथेंचि उभी कीं आले, या चालीवर

मधु मुरहर वाजवि मुरली । ऐकुनि मधुमति चुरमुरली ॥धृ॥
मधुवनीं मधुर ध्वनि होतो । मन मधुकर मधु पिउं जातो ॥१॥
ध्वनि सदन कदन करि मदना । कसि कळा कळलि मधुसुदना ॥२॥
अलकावतिपतिजाकांत । कान्तासह स्पृहि एकान्त ॥३॥

८२७ / हिंदी

कर्पूरिकावृत्त. रा.-यमन ता.-तेताला.

धीर धरो हरि आवेंगे ॥धृ॥
एक बेरके नामग्रहणतें । महि वैकुंठकूं लावेंगे ॥ धीर धरो ॥१॥
तुम्हरे हृदय-दहर-गगन बीच । नील चतुर्भुज छावेंगे ॥ धीर धरो ॥२॥
संतसंगही केवल करना । तिसतें छहों रिपु जावेंगे ॥ धीर धरो ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुतात कृपाघन । अपने जनको पावेंगे ॥ धीर धरो ॥४॥

८२८ गोपीवचन -

सामपटु. रा-बेहा. ता.-दीपचंदी.

यशोदे, चालक तुझा हरी ॥धृ॥
त्वांचि शिकविले यास वाटतें । याया आमुचे घरीं ॥ यशोदे ॥१॥
एक म्हणूनी लाड करीसी । फुकट किं स्त्री दुसरी ॥ यशोदे ॥२॥
आवरिं आतां कोण्याहि रिती । बांधिन नाहिंतरी ॥ यशोदे ॥३॥
पाटिल तुम्ही काय कराल गे । प्रजा न वाटे बरी ॥ यशोदे ॥४॥
ज्ञानेश्वरबाळा बहु प्रेमें । प्रणयकोप धरी ॥ यशोदे ॥५॥

८२९

कुरंगाक्षीवृत्त. रा.-भूप. ता.-तेताला.

काग कांहिं तुम्हा वाटते किं लाज ॥धृ॥
तुम्ही धांगडी वृद्धा मी कीं । तान्हा मम यदुराज ॥ काग कांहिं ॥१॥
मिळुनि कशाला येतां सदनी । घेउनिं कंचनि साज ॥२॥ (य९उ.१७७)
नवरे जाती दूध विकूं हरि । नेता टाकुनि बाज ॥ काग कांहि ॥३॥
ज्ञानेश्वरजामात जननिचा । प्रणयकोप महि गाज ॥ काग कांहि ॥४॥

८३०

ओवी - कोणी एके अवसरीं । कृष्णास न देखतां निजद्वारीं ।
नंदराणी घरोघरीं । पाहायासी निघाली ॥१॥
तंव एक गोपी श्रीकृष्णाकडे । बोट दाखवूनि रोकडें ।
यशोदेस न जाणुनी फुडे । येईं ऐसें वदतसे ॥२॥

८३१ / हिंदी

सामनुष्टप. रा.-जिल्हा. ता.-तेताला.

घर आवो प्यारे नंदलाल ॥धृ॥
सास डाकिणी बेचन गई है । सूना मेरा महाल ॥ घर आवो प्यारे ॥१॥
गोपिनको मैं फुकारती हूं । खेलेंगे लाल गुलाल ॥ घर आवो प्यारे ॥२॥
इतने में जो पति आवे तो । कहूंगि कछुभी हाल ॥ घर आवो प्यारे ॥३॥
ज्ञानेश्वरनंदिनिकी बाणी । सुन प्रभु आये नेहाल ॥ घर आवो प्यारे ॥४॥

८३२

ओवी - हे ऐकोनी वाणी । किंचित् हासोनि नंदराणी ।
म्हणे चाळक या गौळणी । उगें गाऱ्हाणें आणती ॥१॥

८३३

सामनुष्टुप. रा.- भैरवी. ता. -तेताला.

तूं कोण ग येथे उभी आहेस कंचनी ॥धृ०॥
भलते भलते बोलसि पोरा । वाजविसी पायझुनी ॥ तूं कोण ॥१॥
धांगडि तुम्ही मिळुनी बारा । कृष्ण मोहितां क्षणी ॥ तूं कोण ॥२॥
सासुला तुझ्या सांगन जाउनि । आवरि आपुल्या सुनी ॥ तूं कोण ॥३॥
पति असतां तुज लाज न रंडे । होशी कुलनाशिनी ॥ तूं कोण ॥४॥
ज्ञानेश्वरगडि मातृशब्द तो । सहति उग्या कामिनी ॥ तूं कोण ॥५॥

८३४

ओवी - वचन ऐकोनि जननीचें । मुख उतरलें गौळिणीचें ।



मग तोंड पाहती कृष्णाचें । प्रेमें सुवाचे वदताती ॥१॥

८३५ / हिंदी

सामनुष्टप. रा.-खमाज. ता.-तेताला.

भइ हूं प्रभु मैं तुम्हरि नार ॥धृ॥ (य९उ.१७८)
और जो कोई जोर चलावे । मारोंगी भरतार ॥ भइ हूं ॥१॥
सास ननद सुत ससुर गृह भव । इन्हे लगाउंगि खार ॥ भइ हूं ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुतातकृपातें । बसूंगि जमुना किनार ॥ भइ हूं ॥३॥

८३६

सुशीला. रा. -गौडसारंग. ता.- तेताला.

कृष्णा काय अशी तुज खोड ॥धृ०॥
नंदपित्याची लाज धरुनी । अझुनि तरी तूं सोड ॥ कृष्णा काय ॥१॥
ऐसा अवगुण ऐकुनि तुजला । नवरि न देतिल जोड ॥ कृष्णा काय ॥२॥
लवकर लवकर होइ शहाणा । जारिणिसंगति तोड ॥ कृष्णा काय ॥३॥
जिकडे जासी तिकडे गोकुळि । कोणि न बोलत गोड ॥ कृष्णा काय ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभु मित्र तुझे की । पहा तद्विरक्तिमोड ॥ कृष्णा काय ॥५॥

८३७ स्नुषावचन : -

संदीपनीवृत्त. रा. -यमन. ता. -तेताला

जळो सासुबाई असा व्यवहार ॥धृ०॥
नरदेही या येउनि ज्यांचा । नाही प्रभुपदि भार ॥ जळो सासुबाई ॥१॥
एकवेळ तरि कंठिं यमाची । बसल तिखट तलवार ॥ जळो सासुबाई ॥२॥
हरिविण मजला नावडती की । साहि रस सुमनहार ॥ जळो सासुबाई॥३॥
विठ्ठलसुतकरुणे मी पीते । हरिअधरामृतधार ॥ जळो सासुबाई ॥४॥

८३८ स्नुषावचन : -

सामनुष्टुप. रा.- काफी. ता. दीपचंदी.

सासुबाई कैसी हो तुमची हाव ॥धृ॥
केश पांढरे डोळे पिचके । जवळ यमाचे गांव ॥१॥
दांत न तोंडी शेंबुड गळतो । रडका तुसट स्वभाव ॥२॥
भलपण गेले खुळेचार केले । उमजा मसणी ठाव ॥३॥
आज तुम्हा मी मति शिकविते । गा श्रीहरीचे नांव ॥४॥
अलकावतिपतिकरुणायोगे । घ्या कुंजवनी धाव ॥५॥

८३९

रमावृत्त. रा.-भूप. ता.- तेताला.

कोणी क्रोध नका ग करूं ॥धृ॥ (य९उ.१७९)
तुम्ही आम्ही या सत्वर मिळुनी । श्रीहरिपाय धरूं ॥ कोणी क्रोध ॥१॥
तुमचा मी अधिकार वाढवुनी । सावध कां न करू ॥ कोणी क्रोध ॥२॥
ज्ञानेश्वरबाळा तुम्हि आम्ही । भावे हरिस वरूं ॥ कोणी क्रोध ॥३॥

८४०

शकटधाटीवृत्त. ता.-कारवा. छक्कडचे चालीवर.

कोणिहि करा गे आडवा हात । म्या धरिली हरिसाथ ॥ कोणिहि ॥धृ॥
तेलमिठ लावुनि मनगट घासा । कराविं कुचकुचि मात ॥ कोणिहि ॥१॥
हरि आणी मी दोघे मिळुनी । खाऊं मुक्तिचा भात । कोणिहि ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुपद मस्तकिं ने । वारिति मायारात ॥ कोणिहि ॥३॥

८४१ गोपीवचन -

शकटधाटीवृत्त.

भले बमठस तुझे गडी रे कृष्णा ॥ भले बमठस तुझे ॥धृ॥
तुझ्या बरोबर लोकांच्या घरिं । येति कराया खोडी ॥१॥
तूं जातोस निघुनी आधीं । मग त्यांच्या पदिं बेडी ॥२॥
तोत्रे बोबडे चाचरि चलती । तुझ्या पुढें तातडी ॥३॥
प्रसंग पडतां मोडत नाहीं । भाजलिहि पापडी ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभु एकचि आम्हा । प्रेमगुणें सावडी ॥५॥

८४२ - सासूवचन यशोदेप्रति -

वासंतीवृत्त. रा.-यमन. ता.-तेताला.

यशोदे, हा न बरा शेजार ॥धृ॥
तव कुमराच्या सवें आमुची । पोरें करिती चार ॥ यशोदे ॥१॥
लेकि सुना अवघ्याच्या येती । तोंडतोंडिं अइ फार ॥ यशोदे ॥२॥
इतुकें असुनी कृष्ण तुझा हा । बोले मन करि गार ॥ यशोदे ॥३॥
अलकावतिवल्लभकरुणेविण । आम्ही अति बेजार ॥ यशोदे ॥४॥

८४३ / हिंदी

सामनुष्टपु. मूळ.-जोगी. तो.-तेताला. गौण. हिंदुस्थानी भजनाचे चालीवर.

रोओ ना प्रभुजी चलो मोरे घर पालना ॥धृ॥
जैसा तुम्हरे मनमों आवे । तैसा करो खेलना ॥ रोओ०॥१॥ (य९उ.१८०)



बालरुप यह छांड प्रभुजी । कुछ करिये बोलना ॥ रोओना प्रभुजी ॥२॥
ज्ञानेश्वरकन्याकी बिनती । सुनकर झट मिलना ॥ रोओना प्रभुजी ॥३॥

८४४ / हिंदी

सामनुष्टप. गौण.-जिल्हा. ता.-तेताला. गौण.- ढुंबरीचे चालीवर.

सुरत तेहारी बलमां नयना लागिरे ॥धृ॥
मास बरस जुग तुम्हरे कारन । दिन रजनी मैं जागीरे ॥ सुरत०॥१॥
सज सिंगार मैं घरमो बैठि । कोइ न दच्छन भागीरे ॥ सुरत०॥२॥
तुम हो प्यारे मैं हूं प्यारी । दूनो सम अनुरागीरे ॥ सुरत०॥३॥
सुंदर मैं विट्ठलसुतबाला । तुम सब रतनन केहि बिभागीरे ॥ सुरत०॥४॥

८४५

रमावृत्त. रा.-तोडी. ता.-तेताला.

माझी येऊं द्या करुणा ॥धृ॥
बहुत तूमच्या सुंदर दासी । मी एकटि अगुणा ॥ माझी ॥१॥
तुम्हिं त्यजितां कोठें दवडूं । ही वयसा तरुणा ॥ माझी ॥२॥
वदति हरी इच्छिसि मज भज तरि । विट्ठलसुतचरणा ॥ माझी ॥३॥

८४६

इंदिरावृत्त

पाहूं नयनभरी ॥ मूर्ती ॥धृ॥
प्रातःकाळी उठुनी गाई । चारीं धरुनि करी ॥ मूर्ती ॥१॥
पाहतां भावें तनमनचि विरे । मग यम काय करी ॥ मूर्ती ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणायोगे । समरस गोपि खरी ॥ मूर्ती ॥३॥

८४७

शकटधाटीवृत्त. छक्कडचे चालीवर.

बाई जातें मी वृंदावनी ॥धृ॥
घरदाराला फार त्रासलें । तापचि होतो मनीं ॥ बाई जातें ॥१॥
रोधुनि ठेविल जरि कोणी मज । देइन असु नेवुनी ॥ बाई जातें ॥२॥
अलकावतिजीवनपदकरुणे । राहिन हरि-भुवनीं ॥३॥ (य९उ.१८१)

८४८ स्नुषावचन : -

रंगलावणीवृत्त. मूळ. -पूर्वी. -ता.- तेताला. गौण. -द्राक्षांचे मंडप. या चालीवर.

सासुबाई आता तुम्ही नका त्रास देऊं ॥धृ॥
माझ्यासम तुमच्या घरी आहे नणंद जाऊं ॥

मला तुम्ही जाचतसा तरी प्राण देऊं ॥ सासुबाई ॥१॥
देवांगना अप्सरा ज्या इच्छितातिं पाहूं ।
त्यांच्या काय सामोरे मी सांगा नको जाऊं ॥ सासुबाई ॥२॥
काय सांडोनिया तुमचे घर दूरि राहूं ।
किंवा येथे राहूनिया कडु बोल साहूं ॥ सासुबाई ॥३॥
आम्ही ज्ञानेश्वरपाया चित्तिं धरुनि राहूं ।
तयाचिया कृपे नंदपुत्र पति लाहूं ॥ सासुबाई ॥४॥

८४९ स्नुषावचन : -

सामनुष्टुपवृत्त. रा.-काफी. ता.-दीपचंदी.

कटकट तुमची पुरे ॥ बाई ॥धृ॥
तुमच्या बोलें जशि माय माझी । लज्जा अवघि मरे ॥ बाई ॥१॥
थोडीशी गोष्टहि लेकाजवळि । सांगूनि करितां खरें ॥ बाई ॥२॥
मज वाटे अझुनीयां तुमचें । जीवित कां न सरे ॥ बाई ॥३॥
ज्ञानेश्वरकरुणेनें कृष्णा । वरितें मी प्रेमभरें ॥ बाई ॥४॥

८५० / हिंदी

सामनुष्टुप. रा.-यमन. ता.-तेताला.

माई मेरी हरिपगसो प्रीत लागी ॥धृ॥
जोग न करती जाग न करती । तदपि भई लछमीकी विभागी ॥१॥
औरनको नहिं झ्याट जानति हुं । एक चरनको उर लीन जागी ॥२॥
बेणू सुनके भूलगई मति । घर छोर भई प्रभु अनुरागी ॥३॥
ज्ञानेश्वरकरुणानिधिको स्मर । भइ हरिकी स्मरखेलबिभागी ॥४॥

८५१ / हिंदी

रंभावृत्त. रा.-मारवा. ता.-तेताला.

नाथ कौन हो तुम मैं जानी ॥धृ॥ (य९उ.१८२)
नहिं खोलति हूं आज किवारा । अजि जा देखो दुसरी रानी ॥१॥
मेरो तो पति जैसो शंकर । देखि करोगे फेरि गलानी ॥ नाथ ॥२॥
यह सीखे प्रभु किसके मुखसे । छोटि बडी औरत नहि जानी ॥ नाथ ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या ब्रजबरसूं । करत बिनोद रसीलि निशानी ॥ नाथ ॥४॥

८५२ / दोहा

गगन मंडलमो चंद है भूमी मेरा मूख ।
आवो प्रभु मंदीर बिच लेवो अपना सूख ॥१॥

(१.वडिलांची भीती धरूं नका असा यात ध्वनि आहे)



८५३

सामनुष्टुपवृत्त. रा.असावरी. ता.-तेताला.

सोडा आमुची वाट ॥ देवा ॥धृ॥
प्रपंच पति ते पुढेंचि गेले । पाहत असतिल वाट ॥देवा ॥१॥
वास्तविक तव येथचि ठेवुनि । रोधा घरिची वाट ॥देवा ॥२॥
सूर्य साक्षि हा पहात असे कीं । मम पातिव्रत्यथाट ॥ देवा ॥३॥
एक क्षणामाजी येतें मी । उरकुनि प्रपंचहाट ॥ देवा ॥४॥
मग ज्ञानेश्वरकृपें तुम्हां आम्हां । भोगस्थळ गोल्हाट ॥ देवा ॥५॥

८५४

सामकामदावृत्त. मूळ.-खमाज ता.-दादरा. गौण.-''आज शाम मोहे लीनो'' या चालीवर.

आज कृष्ण बाइ माझ्या आंगणी ग क्रीडतो ।
भवपाश सर्व मुळींहूनि बाइ तोडितो ॥ आज कृष्ण० ॥धृ॥
शोभा त्रिभुवनिंची कीं माझियाच राउळीं ।
वैकुंठिचि बाळतनू मूर्ति दिसें सावळी ॥१॥
वृंदावनिं होता वाजवीत वेणु जो हरी ।
तोचि करी भक्तरत्नपरीक्षण जोहरीं ॥२॥
ज्ञानेश्वरकरुणाघन चरणाप्रति वंदिता ।
पर्णुनि हरि करित कृपा निवारोनि मंदता ॥३॥

८५५ / हिंदी दोहा

स्नुषावचन : -

वृंदावन. मूळ.-सोरठ. ता.-तेताला.गौण.- हमसो न बोलना महाराज

मोसूं न बोलना नंदलाल । तुम तो दगलबाज गोपाल ॥१॥ (य९उ.१८३)
मेरी आज तुमको नहीं हमे तुम्हारी आस ।
बनबन मै धूंडत प्रभू आई तुम्हरे पास ॥ मोसूं ॥२॥
और गोपी तुमकु प्रभु बहु प्यारी व्रजमाहि ।
तिनघर सबदिन जात हो मो घर घडिभर नाहिं ॥ मोसूं ॥३॥
एकदीन तुम ना गये तो नहिं बोलेंगी और ।
मम घर आने वर्ष भया है टेरत हो मन ठौर ॥ मौसूं ॥४॥
आज तुम जो निकल गये तो कर पकरोंगी दौर ।
अलकावतिवल्लभ करुणाबस खेलोंगी सुख भोर ॥ मोसूं ॥५॥

८५६ / हिंदी

सुरसुंदरीवृत्त. मूळ.-जोगी. ता.-तेताला. गौण.- हिंदुस्थानी खंजरीचे भजनाचे चालीवर.

नहिं रोना बेटा द्यूंगि पती नंदलाल ॥धृ॥
तेरे कारन बलहि करोंगी । भगवद्धर्म सुकाल ॥ नहिं रोना०॥१॥
तेरे कारन भूमी ऊपर । ल्यूंगी किसनमहाल ॥ नहिं रोना०॥२॥
जननि बचनको सुनिके निकरा । मनका सब बेहाल ॥ नहिं रोना०॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुकन्याकी तो । पातिव्रत्यमय चाल ॥ नहिं रोना०॥४॥

८५७ / हिंदी

कर्पूरिकावृत्त. मूळ.-सारंग. गौण.-''अझुनी का बा नवतरसी प्रभु.'' या चालीवर.

अब न छोरकर जाऊंगी ॥धृ॥
तुमनें घरको खाक लगाई । तुम्हरेहि संग आवोंगी ॥ अब न ० ॥१॥
तुम्हरे चरन मिलनके कारन । स्त्रीपन शतभव पावोंगी ॥ अब न ० ॥२॥
मैं आई हूं जदपि अकेली । पाछेसे अरु लावोंगी ॥ अब न ० ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणाबलतें । ममसुख तुम्हे भुगाऊंगी ॥ अब न ० ॥४॥

८५८ / हिंदी दोहा

चंद्रावळीवृत्त. रा.-सोरठ. ता.-तेताला.

प्रभु तज मत जावो व्रजगोपी बावरीया होवेंगी ॥धृ॥
सास ननंदा इन्हे देखकर अधिकहि गारी देवेंगी ।
सो सुनि सुनिके ताप भया तब जमुनामें मर जावेंगी ॥१॥ (य९उ.१८४)
तुमही अपनें मनमो देखो विचारके नंदलाल ।
जब तुम गेथे रासमंडलसे कैस भयोथो हाल ॥२॥
फिर जो तुम आवें लवटे तो नही दहीदुध देवेंगी ।
फिर जो मुरली नाथ बजाई तो बलतें छिनलेवेंगी ॥३॥
तरुणी गोकुलमांहि बहुत है मथुरापुरमें कोय ।
जिसके कारण भक्तिबिबस पिय गवन आपका होय ॥४॥
यहां रहेंगे जदुपति तुम तो दूधदही नित लावेंगी ।
अरु अलकावतिपतिकरुणाबल रतिरस सुरस पिलावेगीं ॥प्रभु तज ॥५॥

८५९ / हिंदी

रमावृत्त. रा.-असावरी. ता.-तेताला. राजविद्याधर.

प्रभुजी अबसो मैं चीना ॥धृ॥
यह गोकुल जोजार भया है । सो सब तुम कीन्हा ॥ प्रभुजी ॥१॥



आप बडेके नंदन होके । यह क्या करलीना ॥ प्रभुजी ॥२॥
कहां गये हो औरत बनके । कहां जबरी ली दीना ॥ प्रभुजी ॥३॥
अलकावतिपतिकरुणाबलतें । तुम हो ब्रह्महृदय अस चीन्हा ॥ प्रभुजी ॥४॥

८६० / हिंदी

चक्रिकावृत्त. रा.-जीवनपुरी. ता.-तेताला. राजविद्याधर.

मै भई दिवानी श्याम ॥धृ॥
बाला कहती पतिनाम सुमर । तो आवत घनश्याम ॥ मै भई ॥१॥
सास ससुर को गोता देकर । धुंडतिहूं बनधाम ॥ मै भई ॥२॥
अलकावतिपति बचन यही है । लेना ब्रजबरनाम ॥ मै भई ॥३॥

८६१ यशोदावचन -

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-जिल्हा. ता-तेताला. गौण.- कृष्ण माझा कणकणीतो.

सोळा सतरा अठरा वर्षे झालीं अझुनी कसा रे ।
सोय न धरिसी कृष्णा वागसि लहान बाळचि जसा रे ॥धृ॥
मोठे आपुले बाप नंदजी जाणोनीयां मनीं रे ।
घरीं राहुनी देईं सोडुनि खुळकुटिया कामिनी रे ॥ सोळा ॥१॥
गर्गनारदादीक मुनीजन तुजला ध्याती मनीं रे ।
विरह असूनी आवडते ही त्या कैसी करणी रे ॥ सोळा ॥२॥
देव जरी तूं म्हणविसि तरि मग नीति नसे कां मनीं रे । (य९उ.१८५)
धर्म सोडुनी अधर्म करिसी भोगिसि परकामिनी रे ॥ सोळा ॥३॥
नवस करूं कोणाचा तुजला देइल कोण मती रे ।
ज्ञानेश्वरप्रभु चरणध्यानीं वेदशास्त्रसंमती रे ॥४॥

८६२ / हिंदी

रंभावृत्त. रा.-दरबारी कानडा. ता.-तेताला.

बंसी बाजे झननन सुमधूर ॥धृ॥
श्रवण सुनत मै बावरि भइ हूं । डारे धन नंदन रमण दूर ॥ बंसी ०॥१॥
सुनत अवाज कामकोपरिपू । प्रेम कटक बस मरि होत चूर ॥ बंसी ०॥२॥
सुंदरश्यामचरण द्दग निरखी । हियमें बाढा अनुरागपूर ॥ बंसी ०॥३॥
दोनो मिलिके ज्ञानेश्वरगुण । गाऊं लगाय अनाहत सूर ॥ बंसी ०॥४॥

८६३ / हिंदी

क्रिकावृत्त. रा.-जीवनपुरी ता.तेताला

मै भयी दिवानी श्याम ॥धृ॥

तोर मुरलीकी धून सुनत सब । तनुभर उबरा काम ॥१॥
घरबारकी कुछ सूद ना रही । अकल गुंग बेफाम ॥२॥
वृंदावनमो आइ अकेली । तजि निजपति सुत ग्राम ॥३॥
सुरत सावली देख तेहारी । दिलकु लगा आराम ॥४॥
तुम्हरा हमरा यहि (स)नेह बढे । ले ज्ञानेश्वरनाम ॥५॥

८६४ गोपीवचन -

सामनुष्टुप. मूळ.-भूप. ता.-तेताला.गौणपीठ - पहा पहा सावळा कैसा धीट. या चालीवर.

माय शब्द उठतो वृंदावनीं । काम पोळवि हृदयभुवनी ।
श्यामतनू एकलीच वनीं । वाटे पाचारिती म्हणवुनी ॥१॥
झाला नवलाव ऐकतां नाद । शक्ति लोपले अहं सोहं शब्द ।
वृत्ति झाल्या सकळहि स्तब्ध । आतां उरलें ते अनिर्वाच्य मुग्ध ॥२॥
निर्विकार हातां नाहिं आले । येणे विकारेंचि विकार नेले ।
जीवें मारोनि सौजन्य केले । पाचारोनी वनीं बैसवीले ॥३॥
होय झाडणी पांचाहि भूतां । नाहीं ठाव विश्वाच्या संभूता । (य९उ.१८६)
केली उजळणी महद्भूता । काया निर्मळ सलिलें न धूतां ॥४॥
स्पर्शत्यागें भ्रुवोर्मध्यें दृष्टि । स्वयें सांगे जो निजशिष्या गोष्टी ।
लोकां ऐसी तो लिळा करी सृष्टि । परि ते ऐसी जे वाणी परमेष्टी ॥५॥
कान रसना मधुर मुरली ध्वनि । चित्त मंजुळ मंजुळ चक्रपाणी ।
आत्मा बोध ब्रह्मखाणी । शिरी अवशिष्ट ज्ञाननाथपाणी ॥६॥

८६५ / विश्वरूपदर्शन समयी अर्जुनवचन -

प्रमुदितावृत्त. मूळ.- जोगी. ता.-धुमाळी. गौण.-कोठे नच जावे. या चालीवर रस - लालन-करुणा

म्या तुज बहु छडिले । बहु छडिलें ॥ बोल हशावरि नेलें ॥धृ॥
ये रे कृष्णा येई यादवा । म्हणुनी ओढुनी नेलें ॥ म्या तुज ॥१॥
क्रीडा करितां थापड मारुनि । निजता जागे केले ॥ म्या तुज ॥२॥
भोजनपात्रीं माति टाकुनी । उपवासी उठवीलें ॥ म्या तुज ॥३॥
हरहर माझे हात कसे हे । नाहित जळुनी गेले ॥ म्या तुज ॥४॥
ज्ञानेश्वरसुत हरिरुप बघुनी । चित्तीं प्रेमें डोले ॥ म्या तुज ॥५॥

८६६

शांतीवृत्त. मूळ .-झिंझोटी. तो. दीपचंदी गौण.

स्वामी आतां ते क्षमा करी । सावळ्या नंदकुमरा हरी ॥धृ॥
निगम मुनींना स्तवनार्हचि तू । नेणुनि खोटें करीं ॥ आतां ते ॥१॥



मित्रामित्रा न्याया साही । सांभाळि बापापरी ॥ आतां ते ॥२॥
गोपींच्या अपराधा साहसी । मी तेविं तव नवरी ॥ आतां ते ॥३॥
तैशा आम्ही प्रिया तुझ्या की । सत्वर धरिं पदरीं ॥ आतां ते ॥४॥
म्हणुनि सख्या माझ्या अपराधा । कांहि न हृदयीं धरीं ॥ आतां ते ॥५॥
अलकावतिपतिनंदन विनवी । प्रेम प्रसादा करीं ॥ आता ते ॥६॥

८६७

कल्याणीवृत्त. रा.-झिंझोटी. ता.-दीपचंदी. यशोदावचन. वत्सलरस.

पाहूं कोणे वनीं बाइगे । गोविंद माझा सये ॥ पाहूं ॥धृ॥
गर्गादि मुनिजन वर्णीत होते । तें नाहिं धरिलें मनी ॥१॥ (य९उ.१८७)
वाटे आतां जावें तेथवरी । असुचाप खें उडोनी ॥ बाइगे पाहूं ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु गडि मिळवाया । गेली प्रेमी बुडूनी ॥ बाइगे पाहूं ॥३॥

८६८ / विरहोन्मत्ता गोपीवचन -

वासंतीवृत्त. रा.-तोडी. ता.-तेताला. राजविद्याधर.

यशोदे आंगणिं बसलीस काय ॥धृ॥
धनमदयोगें कृष्ण दवडुनी । पुढति पसरिले पाय ॥ यशोदे ॥१॥
अजन्म हरिला भेटलीस कशि । देहगर्वमय माय ॥ यशोदे ॥२॥
सौभाग्य तुझें दृष्टि असे गे । दे अमुचा यदुराय ॥ यशोदे ॥३॥
अलकावतिपति पदचिंतन हा । व्रजवर भेट उपाय ॥ यशोदे ॥४॥

८६९ / श्लोक

जयासाठिं तूं जाहली मान्य आम्हा । कुठें त्वां तया धाडिलें मेघशामा ।
त्वरें आणुनी कांत देईं सुखाने । न देतां शिव्या सर्व देऊं मुखानें ॥१॥

८७० विरहोन्मत्ता गोपीवचन -

सुमतीवृत्त. रा.-यमनकल्याण ता.-दीपचंदी.

मामी मौन धरिलें कसें ॥धृ॥
कृष्णावांचुनि पळभरि तुम्हा । करमत नव्हतें असें ॥ मामी मौन ॥१॥
पाठवूनि त्या अक्रुरासवें । गोकुळ केलें पिसें ॥ मामी मौन ॥२॥
नारदादिमुनिउपदेशाचें । ना हित हृदयी ठसे ॥ मामी मौन ॥३॥
गृहिं आणुनी नच पाळीलें । परकीय बाळ जसें ॥ मामी मौन ॥४॥
अलकावतिपतिबाळाजीवित । व्याकूल विरहविषें ॥ मामी मौन ॥५॥

८७१

कमलारंगीवृत्त. रा.-यमन. ता.-तेताला.

मोहचि बाई पडे ॥धृ॥

वेणुनाद हा श्रवणीं पडतां । घरिंहुनि चित्त उडे ॥ मोहचि ॥१॥
सुरमुनि आणी देव कामिनी । बघुनि भुलति जिकडे ॥ मोहचि ॥२॥
आम्ही काय त्या स्थली करावें । तनुअभिमान बुडे ॥ मोहचि ॥३॥
अलकावतिपतिकरुणे साजणि । ब्रह्म हेंचि उघडें ॥४॥ (य९उ.१८८)

८७२

सामकामदावृत्त. यशोदावचन. मूळ.-झिंझोटी. ता.-दादरा. गौण॰- पांडुरंग स्मर अभंग.

केव्हांची आळवितें गान गाउनी ।
रुदन तरी सोडि न हा खेळ घेउनी ॥ केव्हांची ॥धृ॥
विश्वपाळ बाळ नंदभाग्य जाहला ।
बाळ असुनि जननीसम भार साहिला ॥ केव्हांची ॥१॥
बाइ दीठ झालि काय माझिया मुला ।
नवसितें मी मल्हारी पाव तूं मला ॥ केव्हांची ॥२॥
ज्ञानेश्वर चरणांबुज सेवुनी सये ।
बाळचि परि हृदयिं सदा असो अन्वयें ॥ केव्हांची ॥३॥

८७३ / यशोदेप्रति गोपीवचन :-

सामकामदावृत्त. मूळ.-झिंझोटी. ता.-दादरा. गौण.- पांडुरंग स्मर.

माय इनें कंदुक मम लपविला स्वयें ।
देववुनी त्वरित मला घेइं जवळिये ॥ माय इनें ॥धृ॥
ऐकुनियां वाणि नंदराणि बोलिली ।
काय करिसि कंदुक तूं घेउनी मुली ॥१॥
सगुण बाळ उगिच आळ त्यावरी कशा ।
घेउनियां सोडितसां कंचुकी कशा ॥२॥
ज्ञानेश्वर काय तुम्हां हेंचि बोलिले ।
कुलपांसन खेलन हे काय चालिलें ॥३॥

८७४ / गोपीवचन :-

रमावृत्त. रा.-जीवनपुरी ता.-तेताला.

गरिब आम्ही बाळा ॥ मामी ॥धृ॥
लटिकें बोलुनि छळी आम्हा हा । शिकवा कीं बाळा ॥ मामी ॥१॥
कायतरी कंदुकासि करणें । घेउनि आम्हांला ॥ मामी ॥२॥
ज्ञानेश्वरकरुणें त्वन्नंदन-। कंठिं घालुं माळा ॥ मामी ॥३॥

८७५ / प्रेमसरला नायिका वचन -



सामकामदावृत्त. मूळ.-झिंझोटी. ता.-दादरा. गौण.- पांडुरंग स्मर.

मामी मी एकटी तमारिजातटीं ।
प्रेमबळें कृष्णगळां घालितें मिठी । मामी मी ॥धृ॥ (य९उ.१८९)
तुमचा सुत आवडता अंतरी मला । मानुनियां स्नुषा त्वरित घ्या किं विमला ॥१॥
उगिच घालुनियां आळ येतो मंदिरा । प्रेमबळें चुंबितसों श्यामसुंदरा ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु त्यांची पूर्ण संमती । यास्तव मज सदनिं न्या जि सांडुनी भिती ॥३॥

८७६ / हिंदी

वासंतीवृत्त. रा.-यमन. ता.-राजविद्याधर (तेताला)

आति हुं मंदिर तुम्हरे साथ ॥धृ॥
तुम्हरें नंदन गिरिधर लाला । तासु करूंगी बात ॥ आति हुं ॥१॥
उपवास करि रहूंगी द्वारे । हरि संनिध इक रात ॥ आति हुं ॥२॥
तुम्हरे सुतकारन होऊंगी । ऊंचन की बेजात ॥ आति हुं ॥३॥
निरखि निरखि अति सुख पावेंगे । ज्ञानेश्वर गुरुनाथ ॥ आति हुं ॥४॥

८७७ यशोदावचन -

सामकामदावृत्त. मूळ.-झिंझोटी. ता.-दादरा. गौण.-पांडुरंग स्मर अभंग

काय जगीं लावितेसि तोंडि कृष्णता ।
जडली तुझिये मानसिं पूर्ण कृष्णता ॥ काय जगीं ॥धृ॥
काय तव घरीं ग तुला जाळि उष्णता ।
पावसील काय माझे सदनि विष्णुता ॥ काय ॥१॥
ज्ञानेश्वरकन्या तूं कुलिन साजिरी ।
तोषविं श्वसुरादि जना वदुनि वाग्झरी ॥ काय ॥२॥

८७८ / गोपीवचन यशोदाप्रति.

रसालावृत्त. मूळ.-जोगी. ता.-तेताला. गौण.- पदघुंगरु बांधकर नाचूंगी

उपदेश नको मज मामी हा ॥धृ॥
काय तुम्हा ठाउक नाहीं हो । कुळ परि हरिती कामी ॥ उपदेश ॥१॥
राक्षसविधिनें हरिसह मजला । न्या झट आपुल्या धामीं ॥ उपदेश ॥२॥
ना तरि यमुनासलिलीं प्राणां । देइन आज निकामी ॥ उपदेश ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणायोगें । श्रीहरि केला स्वामी ॥ उपदेश ॥४॥ (य९उ.१९०)

८७९

लावणीवृत्त. मूळ. - यमन . ता. -धुमाळी. गौण.'नंदाच्या नंदना' या चालीवर

उद्यां तयारी करा । गड्यांनो ॥

कुंजवनी नंदात्मज पाहुनी प्रेमे हृदयचि भरा ॥ उद्यां ॥धृ॥
मन ठेवा गुरुपदी ।
येउनि हरि मग घालिल तुमच्या करि कंकण आणि मुदी ।
मानुनि संसृतिभया ।
हरिपदपंकज सेवुनि तारा भवांतुनी आत्मया ।॥२॥
ज्ञानेश्वरगुरुपदा सेवुनी ।
झरझरझरझर चाला सुपथी धरुनि दैविसंपदा ॥३॥

८८०

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-सारंग. ता.-तेताला. गौण.- अग सखे । आषक आम्हि पिसे. या चालीवर.

अग सखे । कधीं पाहीन मी । पाहिन हरि डोळा ।
जयाला ध्यातो शिव भोळा ॥ कधिं पाहिन ॥धृ॥
अग सखें, कुंजवनिं खेळे । मुरलीधर पुतनारी । पाहुनी मोहती[1] पूत नारी ॥
तिथें आपुला, कायसा पाड भारी । नमिति ज्या नित्य निराहारी ॥
प्रभू तो आम्हां । करि दान सौख्य सोहळा ॥ जयाला ॥१॥
अग सखे, कोटि कामाचा । कामाचा काढुनि सार । ओतिली मूर्ति सुंदर ॥
पूर्ण काम हा । काम हा गोपिवर । चला जाऊं ग तेथवर ॥
दर्शनें होऊं । निष्काम सर्व अबला ॥ जयाला ॥२॥
अग सखे, सावळी तनू । तनू सुकुमार, हरी वृषभानुसुता मार ॥
श्रुती वर्णिती । वर्णिती सर्वाधार । तोचि हा यशोदाकुमार ॥
दैवयोगानें । सापडला गोकूला ॥ जयाला ॥३॥
अग सखे, निघूं पाहती । पाहती नयन दोन्ही । चाचरी जाते बाइ वाणी ॥
कधीं तरी सखा । सखा चक्रपाणी । करिल तरि ग्रहण मदिय पाणी ॥
अग सखे, प्रेमें ज्ञानेश्वर । ज्ञानेश्वरपदिं लोळा ॥
जयाला ध्यातो ग शिव भोळा ॥ कधीं पाहिन मी ॥४॥ (य९उ.१९१)

(१. स्वतः मोहित होणें)

८८१ / हिंदी

छविवृत्त. रा.-काफी. ता.-तेताला.

मैया तेरे बालेनें मोहनि डारी ॥धृ॥
जाती थी जमुना जल भरनको । रंगपिचकारी मारी ॥ मैया तेरे ॥१॥
घर जंगल सब एक दिखत है ॥ भूल गई सुध म्हारी ॥ मैया तेरे ॥२॥
ज्ञानेश्वरकी कन्या हूं मै । भई श्रीहरिकी नारी ॥ मैया तेरे ॥३॥



८८२ / हिंदी

कमलारंगीवृत्त. रा.-बेहाग ता.-तेताला.

जमुना तीर खडी ॥धृ॥
मै हुं अकेली ग्वालन अबला । तुम्हरे बहुत गडी ॥ जमुना तीर ॥१॥
तुम हो लरके नंदजी लाला । मै हूं तुमसुं बडी ॥ जमुना तीर ॥२॥
कोई छोट बडा न जानके । लई काम सगडी ॥ जमुना तीर ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या श्रीहरीको । प्रेम प्रसाद अडी ॥ जमुना तीर ॥४॥

८८३

मदनिकावृत्त. मूळ.-पीठ. रा.-पूर्वी. ता.-दीपचंदी. गौण.- राधे घडिघडि. या चालीवर

सांग कांहीं ग आपुल्या पोरा । बाई बांधीन नातरि चोरा ॥धृ॥
कूळ मोठें यशोदेग बाई । यास शिकविलें गुण ऐसे काई ॥ सांग ॥१॥
आम्ही सासुरवासीनी बाळा । कैसे उमजेना हें तंव बाळा ॥ सांग ॥२॥
तूं करितेसि गृहि सर्व धंदा । आम्हा छळूं धाडीसी मुकुंदा ॥ सांग ॥३॥
प्रणयि गोपी ज्ञानेशकन्या । पाहुनीयां हरिस होति धन्या ॥ सांग ॥४॥

८८४

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ.-झिंझोटी. ता.-तेताला. गौणपीठ - ''बहु शिणले नेत्र''.

* बहु केलें उपाया तें मन शांती होइना ।
वरलीयावीण कृष्णा धीर चित्तीं येइना ॥धृ॥
जारत्व योग्य नाही मनिं ऐसे आणिले ।
ना दिधले पाणि तेही हरि येतां तान्हेले ॥ (य९उ.१९२)
हरिसेवकांस बाई तृणसम मानिलें ।
परि स्मृती श्रीहरीची कांहीं केल्या जाइना ॥बहु०॥१॥
कृष्णाहुनि राममूर्ती बहु सत्य ऐकिलें ।
सुटायासी कृष्णसंग वैराग्य लेखिलें ॥
तुम्हालाही सासुबाई मनिं फार धाकिलें ।
परि कृष्णावीण प्रीती अन्यत्र राहिना ॥बहु०॥२॥
पुरे पुरे कष्टलें मी करुनियां यत्न कीं ।
अज द्यावें आणुनीयां गोविंदरत्न की ॥
ब्रह्ममूर्ती तेथ माझा जीवभाव यत्न कीं ।
ज्ञानेशकृपा बाई अज्ञान साहिना ॥ बहु केले ॥३॥

(*कृष्णानें स्वतः माझें मन आकर्षण केल्यामुळें माझा कांहीं उपाय चालत नाहीं असे गोपी सासूस

सांगते.)

## ८८५

तुलसी-स्तुति

जयावृत्त. मूळपीठ.-यमन कल्याण. ता.-यतिलग्न

गौणपीठ.-''रत हरिपद.'' या चालीवर

गेले कोठें हरि गे सांग सखे बाई ।
मस्तकिं घेताति तुला नित्य शेषशायी ॥ गेले ॥धृ॥
सगुण मूर्ति सांवळि अशि लोकिं तिहीं नाहीं ।
गृहिं असतां यानिं आम्हां मोहियलें बाई ॥
अझुनि तरी सवतिमत्सर सोडित कां नाही ।
आम्ही होऊं दासि तुझ्या राणि तूंचि होई ॥
न करूं कधिंहि तव मत्सर कृष्णसाक्ष पाही ।
आम्हि सान थोर तूंचि पदरिं सखे घेई ॥
तूंचि पट्टराणि हरिस अम्हां बहिण आई ।
सहन करीं सकळ चुका अभयदान देई ॥
सकळ सौख्य तूंचि भोगि निष्कंटक ठायी ।
परि आम्हा कृपाबळें कृष्णचरणिं वाहीं ॥
हरिवियोगमृतां अम्हां अमृतबिंदु देई ।
ज्ञानेश्वरकृपें माय धन्वन्तरि होई ॥ गेले कोठे ॥१॥

## ८८६

सामनुष्टपवृत्त. मूळपीठ. रा.- सारंग. ता.-तेताला.गौणपीठ.- कुणीकडे तुम्हीं या चालीवर.

महाराज व्रजगोकुळी, गोकुळी सौख्य भारी,
अवतरलेति पूतनारी ॥ व्रजगोकुळी ॥धृ॥
महाराज नंदभाग्याचा, भाग्या सफळ वृक्ष, साधिले 'तत्त्वमसि' लक्ष्य ॥
स्वरूपी मिळतां, मिळतां अपरोक्ष, पुढे सगुणचि हा प्रत्यक्ष,
पाहुनी डोळां, मोहित होति नारि ॥१॥ (य९उ.१९३)
महाराज यशोदासती, सती पुण्यवंत, आले यदुदरि भगवंत ॥
वर्णिती जया, जया श्रुति संत । नाहि ज्या स्वरूपास अंत ।
अपरिच्छिन्न, व्यापकची निर्धारी ॥ अवतरलेति० ॥२॥
महाराज लज्ञा धरुनि, धरुनि जे करिति वारी,सदा निर्लज्ञचि संसारी ॥
तया हनना या, हनना या मुरारी, अवतरलेति निर्विकारी ॥



चक्षु भरुनिया, भरुनिया साक्ष धारी ॥ अवतरलेति० ॥३॥
चला बायांनो, बायांनो नंदसदनी, सांडुनी संसृति भयकंदनी ।
सावधानता, धानता करुनि स्वमनी, होउ श्रीहरिच्या कामिनी ।
ज्ञानेश्वरचरणी, कविता अर्पण सारी ॥ अवतरलेति०॥४॥

## ८८७

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ.-सारंग. ता.तेताला. गौणपीठ. कुणीकडे तुम्ही या चालीवर.

महाराज पाळण्यावरी, खेळे गोविंद, अगुण गुणमय परमानंद ।
पाळण्यावरी ॥धृ॥
कुमारी आम्हीं, आम्हीं व्रजबाळा, घालुं इच्छितों कंठिं माळा ॥
म्हणुनिया आला, आला कळवळा । शामसुंदर दिसती डोळां ॥
करी आला कीं, सुककंद, ॥ अगुण गुणमय ॥१॥
महाराज सर्वही, आम्हीं परतंत्र, तुम्हीं एकची निजतंत्र ।
तरी करुणेनें, साधोनि शांतितंत्र, करा आम्हा वरुनी[1] पवित्र ॥
विश्वव्यापका, नेणो मतिमंद, ॥ अगुण गुणमय ॥२॥
महाराज वदन पाहतां, पाहतां चक्रपाणी, कराल ग्रहण वाटे पाणी ।
म्हणुनियां उभ्या, उभ्या बद्धपाणी, स्वीकरा प्रभू मोक्षदानी ॥
हालवूं आम्हीं, मनि मानुनि आनंद ॥ अगुण गुणमय ॥३॥
महाराज नंदगोकुळी, गोकुळीं तुम्ही आल्या, सर्वही ज्ञानेश्वरबाला ,
म्हणुनिया प्रभू, स्वीकारा आम्हांला, घालुं सकळही कंठिं माळा ॥
मस्तकें सेवूं । पाउलारविंद ॥ अगुण गणुमय ॥४॥ (य९उ.१९४)

(१.लग्न करून)

## ८८८

धात्रीवृत्त. रा.-पिलु. ता.-तेताला. गौणपीठ.-शोच समझ नादान. या चालीवर

व्रज टेकल मरणी । गोपी पडतिल कामरणी ॥धृ॥
वाचविं तूं उद्धवा ! तयांना । सच्चित्सुखम्मरणीं ॥ व्रज टेकल ॥१॥
काढुनि साय दुधावरली मज । देत होति जननी ॥ व्रज टेकल ॥२॥
अलकावतिपतिबाला विठ्ठल । माझ्या प्रियरमणीं ॥ व्रज टेकल ॥३॥

## ८८९

इंदिरावृत्त. मूळपीठ.-झिंझोटी. ता.-तेताला. गौण.- गौरि पुजाया जाऊं, या चालीवर.

बहु चालक तुम्हि नंदलाला ॥धृ॥
वर्षत्रय झालें त्यावरि हें । दर्शन आज आम्हांला ॥ बहु चालक ॥१॥
आम्ही तुमच्यापरि त्यजूनी । पहातां तरुणी बाला ॥ बहु चालक ॥२॥
ज्ञानेश्वरआज्ञेनें तुमच्या । कंठीं घालूं माळा ॥ बहु चालक ॥३॥

८९०

श्रीमतीवृत्त. रा.-गौडसारंग. ता.-तेताला.

मै घरकि अकेली नार ॥धृ॥
छोरो मेरा अंबर जदुबर । मथुरा जाति बजार ॥१॥
तुम हो प्रभुजी पुत्र बडोंके । कस लीना आचार ॥२॥
द्यूंगी प्यारे दहिदुध तुमको । छोरो चुनरिकिनार ॥३॥
सास मुझे गारी देवेगी । बिच्छूसम भरतार ॥४॥
ज्ञानेश्वरकन्या डर तजके । लेती हरिसुखसार ॥५॥

८९१

सिद्धिवृत्त. रा.-बेहाग. ता.-तेताला.

जागो ना प्यारे निंद लेवो नंदलाल ॥धृ॥
जगनेका अभ्यास नहीं है । अखिया होगई लाल ॥ निंद लेवो ॥१॥
खेलत खेलत गोपिनसो प्रभु । सूक गई फुलमाल ॥ निंद लेवो ॥२॥
रात भई प्रभु दोन पहर अब । कल खेलनको काल ॥३॥ (य९उ.१९५)
ज्ञानेश्वरकन्याकी बिनती । सुनो कांत गोपाल ॥ निंद लेवो ॥४॥

८९२ / विरहिणी गोपीवचन -

सुशीलावृत्त. रा.-तोडी. ता.-तेताला.

कोमळ दाखवि पाय ॥ देवा ॥धृ॥
कठिण आमुचें कुच म्हणुनी हरी । करीं दृष्टिसमवाय[1] ॥ कोमळ ॥१॥
वनिं फिरतां तुज रुततिल कंटक । हे प्रभु यादवराय ॥ कोमळ ॥२॥
सुकुमारा तुज शीण पाहुनी । बिघडल यशुमतिमाय ॥ कोमळ ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु करुणायोगें । हृदयसंगि यदुराय ॥ कोमळ ॥४॥

(१.आमच्या दृष्टीचा आणि तुझा नित्य संबंध कर.)



# बालरक्षा

(इतिहासान्वयें गोपीवचन आणि माधूर्यभक्तिअन्वयें माझें आणि कोणाचेही, याप्रमाणे सर्वत्र समजावे.)

८९३

सामकामदावृत्त.मूळपीठ.-झिंझोटी.ता.-यतिलग्न (दादरा)गौणपीठ- पांडुरंग स्मर अभंग.या चालीवर.

तान्हें बाळ बाई यास रक्षि तूं घरी ।
विघ्न बहुत येति माय अचुक यावरी ॥ तान्हें बाळ ॥धृ॥
आजपासुनीच आम्हि सक्त यावरी ।
पाहतां हरिस स्मरत नसे भवहि अंतरी ॥ तान्हें बाळ ॥१॥
जारिणि परि पतिव्रता आम्हि सुंदरी ।
हाचि पती योग्य वाटे नंद सुंदरी ॥ तान्हें बाळ ॥२॥
मोहयुक्त झालों आम्हि सर्व बायका ।
बाळपणिंच पर्णु बाई विश्वनायका ॥ तान्हें बाळ ॥३॥
ज्ञानेश्वरकृपा पूर्ण आपणावरी ।
वेदविधिविनाहि आम्ही याच्या नोवरी ॥ तान्हे बाळ ॥४॥

८९४

ओवी - ऐक सखे यशोदे बाई । सकळ आम्हीं मिळोनि लवलाही ।
रक्षण करावया शेषशाई । हृदयीं ठायीं प्रार्थु कां ॥१॥ (य९उ.१९६)

८९५

सामकामदावृत्त. मूळ.-झिंझोटी. ता.-यतिलग्न (दादरा) गौणपीठ.- पांडुरंग स्मर या चालीवर.

लहान तूज तुम्हिं म्हणोनि बोलतां नये ।
दासि परि मी झालि तुझी सगुण अन्वयें ॥धृ॥
वात्सल्यचि रक्षण समयीं बरें हरी ।
यास्तव तुज हृदयिं सदा रक्ष तूं हरी ॥ लहान तूज॥१॥
लक्ष्मीपति मस्तकिं तो करो रक्षणा ।
श्यामलांग राखो तुझ्या कोमलेक्षणा ॥ लहान तूज ॥२॥
ज्ञानेश्वर करुणाघन तुजवरी वळो ।
चिरकालचि अमरपणा हरि तुला मिळो ॥ लहान तूज ॥३॥

८९६

ओवी - यापरी प्रथम बाळा । रक्षित होत्साती गोपाळा ।

मृत्तिका घेवोनिया भाळा । लावीतसे प्रीतिबळें ॥१॥

८९७

सामकामदावृत्त. मूळपीठ.-झिंझोटी. ता.-यतिलग्न दादरा. गौण.'पांडुरंग स्मर' या चालीवर.

बालरक्षा प्रसंगी -

भाग्य आमुचें म्हणुनि तुझा जन्म गोकुळी ।
प्रिय होई प्राणसख्या सकळ नृपकुळीं ॥धृ॥
रक्षण तव शेषशयन बाहुचें करो ।
रक्षाया उदर तुझें शेष पाखरो ॥ भाग्य आमुचें ॥१॥
अस्मत्कुचमंडल हें पाणि धारक ।
रक्षक त्यावरि असो किं दिनोद्धारक ॥ भाग्य०॥२॥
कमलनाभ नाभिप्रती कंठिं केशव ।
ओष्ठ तुझें रक्षो सख्या इंदिराधव ॥ भाग्य०॥३॥
ज्ञानेश्वरकरुणामय अमृत पाझरो ।
तेणें प्रेमगांग सदा हृदयिं निर्झरो ॥ भाग्य आमुचें ॥४॥

८९८

आला तुम्ही जन्मा यादवांचे कुळीं । म्हणोनी गोकुळीं आम्ही नारी ॥१॥
जरी नंदकुळीं येता चक्रपाणी । तरी नातें आनि बहू होती ॥२॥
परकिये नाते बरें सांपडलें । एकचि जोडले कांतमूर्ति ॥३॥
ज्ञानेश्वरबाळा परम प्रेमळ । म्हणती गोपाळ रक्षीं रक्षीं ॥४॥

८९९

ओवी - एक लज्ञा टाकोनी । तुम्ही ऐसें म्हणोनी ।
देहभान विसरोनी । सासूश्वसुरही नेणे ॥१॥ (य९उ.१९७)

९००

सामकामदावृत्त. मूळपीठ.- झिंझोटी. ता.यतिलग्न (दादरा) गौणपीठ- पांडुरंग स्मर, या चालीवर.

संघचक्र आमचुं तूं रक्षिं श्रीधरा ।
देउनिया चुडे कृपें भीजवीं धरा ॥ संघचक्र ॥धृ॥
नंदसूनु कांत अम्हां देइं सत्वरीं । बाहुं कुसुमगंध करुनि नवस तुजवरी॥१॥
अभंग रंग देइं सख्या इंदिरापती । श्रीनिवास रक्षि सर्व कृष्णसंपती ॥२॥
प्रणयबद्ध बोलताति गोपकन्यका । ज्ञानेश्वरतात रक्षि विष्णुवन्त्रिका ॥३॥

९०१ / दिंडी

प्रणयरज्जूनीं बद्ध गोपिबाळा । चिंतिताती आरोग्य नंदबाळा ॥



मंत्रुनीयां बांधिती करीं वाळा । म्हणति आम्हां भक्षिं तूं ऊग्र काळा ॥१॥

९०२ / दिंडी

विघ्न भोगाया सिद्ध आम्हि नारी । कष्टवीसी कां व्यर्थ पूतनारी ।
भक्षुनीयां आम्हांस कृष्ण रक्षी । कोमलांग बाल हा तूं निरीक्षीं ॥२॥

९०३ / ओवी

गोपींची बालरक्षा पाहुनी । चकित झाली नंदराणी ।
म्हणे एवढा प्रेम माझ्या मनीं । अझूनि कांहीं उपजेना ॥१॥
रात्रौ कांता दिवसा जननी । ऐशा पाहुनी गौळिणी ।
रक्षा करितांचि चक्रपाणी । प्रणयभाषणीं मोहीं तया ॥२॥
करावया जगाचें पालन । जेणें धरिला सत्वगुण ।
तो आपुला कांत जाणोन । गोपी रक्षा करूं पाहती ॥३॥
संहारकालीं शंकर । सृष्टीचा करी स्वीकार ।
परी तेव्हांही जो साचार । भक्तनाश होऊं नेदी ॥४॥
तयासी गोपिबाळा । रक्षरक्ष म्हणती लोकपाळा ।
तरी या प्रेममय सुकाळा । हरी कां न स्विकारी ॥५॥
लक्ष्मी हरिपाय चुरीत । परी तांबूल काढोनि मुखीं न देत ।
एवढीच स्वर्गांत । उणीव निश्चित असे कीं ॥६॥
गरुड तो असे हरिवाहन । परी कोणी न घाली शयन ।
ही एक उणीव वैकुंठी जाण । सत्यचि प्रमाण असे कीं ॥७॥
गोलोकीं राधा मानवती । स्वयें कष्ट करी श्रीपती ।
तेथेंही सुखाची रीती । क्षणभरी न मिळे ॥८॥
म्हणुनीच काय वृंदावनीं । गोपीबाळा घेतल्या मोहुनी ।
सेवासुखें सुखावुनी । रक्षा निर्वाणी अंगिकारी ॥९॥ (य९उ.१९८)
यापरी हें बालरक्षण । जे कां यथामती केलें वर्णन ।
ते ज्ञानेश्वरचरणी संपूर्ण । अर्पण असो की ॥१०॥
जैसें कां मोरा आंगींचे डोळे । तया अभिमाना न येती बळें ।
तैसें हें कवित्व कोमळें । अभिमाना मज नाणी ॥११॥
तैसें ज्ञानेश्वरें कवितारत्न । मजहाती दिधलें न करितां यत्न ।
म्हणोनि प्रशंसामात्र वेतन । करोनि अर्पिले ज्ञानेश्वरा ॥१२॥
स्वामीचिया सनगाची । प्रशंसा न करितां साची ।

तरी मग चाकराची । चाकरी मिथ्या ॥१३॥

॥ बालरक्षा संपूर्णम् ॥

— —

## ९०४

शकटधाटीवृत्त. मूळपीठ - भूप - ता.-कव्वाली. गौण.-छक्कडचे चालीवर.

बाई, उठा उठा, बायांनो उठा उठा ॥धृ॥
न्हाउनि धूवुनि मस्तकिंच्या तुम्हि । नम्र कराव्या लटा ग ॥ बाई ॥१॥
रामकृष्णहरि नामस्मरणीं । जिवापाड तुम्हिं झटा ग ॥ बाई ॥२॥
कृष्णीं झगटुनि संसारासी । अक्षयिच्या तुम्हि तुटा ग ॥ बाई ॥३॥
याच शरीरीं डोळें भरुनी । नीरदांगरंग लुटा ग ॥ बाई ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभु तातकृपेनें । प्रेमीं रंगवा पटा ग ॥ बाई ॥५॥

## ९०५

रंगलावणीवृत्त मूळपीठ. -पूर्वी. ता.राजविद्याधर.(तेताला)
गौणपीठ - द्राक्षाचे मंडप. या चालीवर.

चला जाऊ पाहू बाइ वृंदावनि थाट गे ।
सोडोनिया वित्त पुत्र धरू भक्तिवाट गे ॥धृ॥
गोपिकांचि यमुनातीरी रोखोनिया वाट गे ।
दान मागोनिया लावी रासक्रीडा नाट गे ॥१॥ चला जाऊ०
कामाच्याचि बळे घालूं मोक्षावरि लाट गे ।
परब्रह्मि कृष्णीं लाऊं लज्जारहित पाट गे ॥२॥ चला जाऊ०
बहार हा करूं रात्र सोडोनिया गांठ गे ।
ज्ञानेश्वरकृपे घेवूं प्रेमसुख दाट गे ॥३॥ चला जाऊ० (य९उ.१९९)

## ९०६

(प्रतिज्ञेचे पूर्वीचे हें पद आहे.)

सुशीलावृत्त. मूळपीठ.- कल्याण ता.-धुमाळी.गौणपीठ.-झालि मग नौकाजळि चालती. या चालीवर

तुझा तुला ग लाडका ॥ यशोदे ॥धृ॥
इत्रेपण हें मज नावडतें । हृदयासह होडका ॥ यशोदे ॥१॥
सोडुनिया घर आज आम्हि तरी । वसवावें झाड का ॥ यशोदे ॥२॥
कळा आणितो रोज घरिं तरी । सांग कृष्ण गोड का ॥ यशोदे ॥३॥
आतां जरि येइल मंदिरिं तरि । काढिन बरं खोड का ॥ यशोदे ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणेनें हा । बंधनासि सोड का ॥ यशोदे ॥५॥



## ९०७ / अक्रूर-निंदा

ओवी - अक्रुरें नेला जगन्नाथू । तों गोकुळीं अवघा आकांतू ।
कां सुवियोगसुखाचा आयस्कांतू । अंतःकरणू लोह कर्षी ॥१॥
एका जन्मींचा भ्रतार जाणा । निघूनि जाय देशांगणा ।
तरी रडती किती अंगना । काळजी करुनि तयाची ॥२॥
हा तंव अनेक जन्मींचा भ्रतारू । जन्म जन्म सुखाकारू ।
तो घेऊनि गेला अक्रुरू । तो दुःख सागरू कोण जाणे ॥३॥

## ९०८ / मथुरागमन

जयंतीवृत्त. मूळपीठ.- यमन. ता.-धुमाळी. गौणपीठ- राधा मुखरन, या चालीवर.

विरहिणीवचन -

नवल नवल साजणी गौळिणी हरिरस भरि रसना ।
करिवर पंचानन उरिं धरूनि मागति हरि उसणा ॥धृ॥
धन्य सुभद्रा पतिसुतसुत तो शुकमुनिचा पुसणा ।
हरिलिलामृतपान करूनी तोडित यम-कसणा ॥
हरिप्राप्ति व्हावयासाठीं जो निजशरिरीं रुसणा ।
तो करि प्रश्न मुनिवरा सांगा गोपिराग वसना ।
सुकृति कृतीफळ टळलें मानुनि कोणी व्रजबाळा ।
कल्प साम्य पळ घालवि स्मरुनी निजमनिं यदुपाळा ।
तंव तिजला भेटली वाट चालतां दुजी बाळा ।
तिला पुसे अजुनि कां न पडली चिंता मम काळा ।
बहु बहु बाई ताप देतसे संसृतिशुळ बसणा ॥१॥ करिवर० (य९उ.२००)
एक गोपिका त्यजुनि सकल निज सदन कामधंदा ।
मदन आवरुनि वदन भरी रस भरितचि गोविंदा ।
चाखुनि घेतां खुणे पावली चिदानंदकंदा ।
आपण होउनि तीव्र ओढिल्या गोपि अधिकमंदा ।
भवभय कैसें राहिल मग तें मृगजलगत रशना ॥ करिवर पंचानन ॥२॥
एक गोपिका घृत आणाया दुजा सदनिं गेली ।
घृत मागावें तो मनबुद्धि हरिपदमय झाली ।
सांडुनियां मग घृतसुकृत गुणशब्द असा घाली ।
देतें मी आणूनि क्षणिक दे उसणा वनमाळी ।
काय बाइ तव मंदिरिं नाहीं कालत्रयीं असणा ॥ करिवर पंचानन ॥३॥

ऐकुनि वाणी नयनीं पाणी आणुनि मग बोले ।
बाई तुला आठवतें, प्रभुजी मथुरापुरिं गेले ।
आज आपुलें भाग्य सकलही दुष्कर्मे नेले ।
बोलतांचि दोघींचे तनुमनभाव गलित झाले ।
ज्ञानेश्वरप्रभुकरुणेने हरि हृदयसदन वसणा ॥ करिवर पंचानन ॥४॥

९०९

सिंधुजावृत्त. रा.-सोरठ ता.-तेताला (राजविद्याधर)

मूढपणा तरि सोडा ॥धृ॥
निज हृदयींचें गुह्य जाणुनी । विरहपाश हा तोडा ॥ मूढपणा तरि ॥१॥
चार देह उल्लंघुनि बाई । निर्गुण हरिसुख जोडा ॥ मूढपणा तरि ॥२॥
ज्ञानेश्वरकरुणेने झडकरि । षडरिकलहबिज मोडा ॥ मूढपणा तरि ॥३॥

९१० / उद्धव-वचन

सिंधुजावृत्त. रा.-सोरठ ता.-तेताला (राजविद्याधर)

काय धरुनि हठ असला ॥धृ॥
स्त्रीसुतधनगृह यामध्यें हरि । कालत्रयिंहि न फसला ॥ काय धरुनि ॥१॥
निर्गुण निर्विकार हृदयेश्वर । तयावरी तुम्हि रुसलां ॥ काय धरुनि ॥२॥
ज्ञानेश्वरबाळा तुम्हि असुनी । विरहदुःखवश बसलां ॥३॥ (य९उ.२०१)

९११ गोपीवचन उद्धवंप्रति -

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ.- भीमपलासी. ता.-धुमाळी. गौण.-कशाला संन्यासी, या चालीवर

जा जा जा जा मथुरेला । सांडुनी ही कैतवलीला ॥धृ॥
जो अपवर्गास्तव जागा । तेथ तुज मिळल बरी जागा ।
वटवटसी येथचि कां गा । भक्तिविण ज्ञान मलिन कागा ।
आमुचा सांग प्राण गेला ॥ सांडुनी ही ॥१॥
ज्याला खायाला नाहीं । तयाची पर्णकुटी पाहीं ॥
जाउनी त्यास सांग कांही । आम्हां दे हरिसुख लवलाही ॥
यास्तव धाडिलें किं तुजला ॥ सांडुनी ही ॥२॥
आम्ही ज्ञानेश्वरबाळा । कधिंहि न सोडुं यदुपाळा ॥
धरुनी कृष्णनामथाळा । घालुं हरि कंठिं प्रेममाळा ।
पिऊं निजशांतिपयःप्याला ॥ सांडुनी ही ॥३॥

९१२ / गोपीं प्रति उद्धव-वचन

इंदिरावृत्त. रा.-बेहाग. ता.-तेताला.

मज नवल वाटतें बाई ॥धृ॥



देवगुरूपासीं मी पढलों । प्रस्थानत्रय पाहीं ॥ मज ॥१॥
त्याचा सार काढुनी बघतां । अद्वैताविण नाहीं ॥ मज ॥२॥
द्वैता घेउनि दुःख भोगणें । योग्य तुम्हांला नाहीं ॥ मज ॥३॥
ज्ञानेश्वबाळा तुम्हि अजुनी । कळत्या व्हा तरि कांहीं ॥ मज ॥४॥

९१३ / गोपीवचन उद्धवाप्रति

रमावृत्त. रा.-असावरी. ता.-तेताला.

आम्हां दाखविं वनमाली ॥धृ॥
ज्ञान किटकिटी ऐकुनी तुझ्या । झोंप नयनिं आली ॥ आम्हां ॥१॥
कालिय-फणी तो लीले मथिला । सलिलद-छविशाली ॥ आम्हां ॥२॥
हरिभक्तीविण पठण नेउनी । चुलींतचीं घाली ॥ आम्हां ॥३॥
ज्ञानेश्वरकरुणेनें चालूं । मनोमार्गचाली ॥ आम्हां ॥४॥ (य९उ.२०२)

९१४ / उद्धव मनोगत

सिंधुजावृत्त. रा.-सोरठ. ता.- राजविद्याधर (तेताला)

मति दे तूं गोविंदा ॥धृ॥
ध्यातों तुज तूं तुझें सावरीं । माझी मति अतिमंदा ॥ मति दे ॥१॥
ह्या तव मिनल्या सुगुण सुरूपीं । सोडुनि संसृतिधंदा ॥ मति दे ॥२॥
यांचे प्रभु मी सगुण उडवितां । त्यजितिल तनु असुबंदा[1] ॥ मति दे ॥३॥
ज्ञानेश्वरकन्यकाप्रिया हरि । सज्जनपरमानंदा ॥ मति दे ॥४॥ (१.बंधनाते)

९१५ / हिंदी / गोपीवचन उद्धवंप्रति

रा.-यमन. ता.-तेताला

सुनो उधोजी बात ॥धृ॥
नयन मूंदके क्या करते हो । क्या है तुम्हरे हात ॥ सुनो ॥१॥
कछु नहिं होना हमे तुम्हारा । निजघर जावो तात ॥ सुनो ॥२॥
अलकावतिपतिलली सहेंगी । बिरहदुःख दिनरात ॥ सुनो ॥३॥

९१६

सुशीलावृत्त. रा.-बिलावल. ता.-राजविद्याधर (तेताला)

पाहूं सरस वसंत सखये ॥धृ॥
सखिजनसह हरि नाचत मिळुनी । धरुनि श्रुतिमतिपंथ ॥ सखये ॥१॥
भवरुजपीडित जनसमुदाया । यत्करुणालव मंथ[2] ॥ सखये ॥२॥
कामबळेंही शाम स्मरतां । मुक्ति मिळे जीवंत ॥ सखये ॥३॥
हें सुख सगुणचि मिळवुनि द्याया । ज्ञानेश्वगुरु संत ॥ सखये ॥४॥

(२. औषधीचा एक प्रकार आहे)

९१७ / हिंदी गोपीवचन -

सुलोचनावृत्त. रा.- काफी. ता.-राजविद्याधर (तेताला)

श्याम मोरा मुरलीसो प्राण हरे ॥धृ॥
ये मुरली निज कुलकी नाशिनी । परकुल काह टरे ॥ शाम मोरा ॥१॥
दिनरजनीं हम दासि तुम्हारी । मुरली अमृत भरे ॥ शाम मोरा ॥२॥
मुरलीधरकर पकरनको प्रभु । ज्ञानेश्वर सुमिरे ॥शाम०॥३॥ (य९उ.२०३)

९१८ भगवद्वचन राधिकेप्रति.

श्रीवृत्त. रा.-परज ता.- तेताला.

निष्कारण मान न करिं गे । तूं वशावशचि मम करिं गे ॥ निष्कारण ॥धृ॥
पीडित तो मम हृदय विंधुनी । रतिवर कुसुमशरीं गे ॥ निष्कारण ॥१॥
श्रीपदकमळा देइं तरि सखे । घेतों मी निजशिरीं गे ॥ निष्कारण ॥२॥
परी एक तरी शब्द वदोनी । मम हृन्मदना हरि गे ॥ निष्कारण ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या तूं कुलिना । पतिपदकमला धरिं गे ॥ निष्कारण ॥४॥

९१९

परिचारिणीवृत्त. मूळ.- यमन. ता.- धुमाळी. गौण.- नागपुरी लावणीच्या चालीवर

हें कपटपटूपण सोडा यदुनायका ।
आम्हि शरण तुम्हांला श्रीमुरलीगायका ॥ हें कपटपटूपण० ॥धृ॥
सासूरवासिनी सकलहि आम्हि कामिनी ।
परि त्यजुनि सदन पातलों महा यामिनी ।
ना इच्छूं व्हाया रमासमहि स्वामिनी । स्वप्रेमें कीजें आम्हा निज भामिनी ।
एवढी विनंती करुणाघन आयका ॥ हें कपटपटूपण ॥१॥
निज कोमलचरणा दावा डोळेभरी । ध्यातात जया नारद शुकमुनि सौभरी ।
अस्मत् हृदयी युष्मत् वेणूरव भरी । सकलही कुमारी आम्हीं परि नवभरी ।
येउंद्या कृपा हरि सुजनस्वपददायका ॥ हें कपटपटूपण ॥२॥
पतिपुत्र गोत्रकुळ त्यजुनी आम्ही गड्या । रजनींत पातलों घालाया फूगड्या ।
जाताति तुम्हाविण आमुच्या व्यर्थचि घड्या ।
श्रीकृष्णपत्नि घालितें प्रभू पदघड्या ।
ज्ञानेश्वरकन्या तुम्हा सकल बायका ॥ हें कपटपटूपण ॥३॥

९२० / हिंदी

मेनिकावृत्त. रा.- खमाज. ता.- तेताला.



सुनरि जसोदा लरका तेहारा ॥धृ॥
छिनछिन मो घरमो होरि खेलत । जाके कुबिक्रम गोकुल हारा ॥सुनरि.॥१॥
श्रुतिस्मृति ध्यान धरत मनमांही । गोकुल जन जुवती हिय धारा ॥२॥
अलकावतिपतिनंदिनि जिन्ह गले । बनायके डालति फुलहारा ॥३॥
(य९उ.२०४)

९२१ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- यमन. ता.-धुमाळी. गौण.- ''चांदणी विनविते'' या चालीवर

आज लौं देखे बहुतनके । नहिं अस लरका अनतनके ॥धृ॥
छे सात बरस तन जिनके । कामिनी हेत भेख जिंदके ॥ आज लों० ॥१॥
अलकावतिनृप-नंदिनि को । मोहत छोर रजनि दिनको ॥ आज लों० ॥२॥

९२२ / आर्या

गोपीची विशिष्ट स्थिति.

एवं शोक करूनी लोकालोकांत देखुनी न हरी ।
ब्रह्मीं लीन होउनी उठल्या पुढती जशा उदधिलहरी ॥१॥

९२३ / हिंदी

सामकामदावृत्त. मूळ.- झिंझोटी. ता.-यतिलग्न (दादरा) गौण-'वैशाखमास वासंतिक' या चालीवर.

धीर धरो प्यारे जरा नंदजीके लाला ।
ले जाती माकेकने कर पकर नेहाला ॥ धीर धरो ॥धृ॥
कहकह सहरति वियोग जोग बरन गाला ।
मैतो हूं गौर नारि तुम्हरो अंग काला ॥ धीर धरो ॥१॥
तुम्हरि नारि भई प्रभू गले डारूंगि माला ।
निपट कपट छोड रही ज्ञानेश्वरबाला ॥ धीर धरो ॥२॥

९२४

सुशीलावृत्त. मूळ.- जिल्हा. ता.-तेताला. गौण.- ''कोण गली गयो'' या चालीवर.

टाकुनि गेले श्याम ॥ आम्हां ॥धृ॥
नाहीं पुरली हृदय असोसी । नाहीं घरिं आराम ॥ आम्हां टाकुनि ॥१॥
येथें होतें भय सासूचें । प्रभु तव गेलें लाम ॥ आम्हां टाकुनि ॥२॥
अपवर्गहि तो नको आम्हांला । चित्तीं हरिपदकाम ॥ आम्हां टाकुनि ॥३॥
दृष्टि देखती मूर्ति सांडुनी । कांहिं नको विश्राम ॥ आम्हां टाकुनि ॥४॥
वनीं मुनी जे जपतप करिती । त्यां कथिं आत्माराम ॥ आम्हां टाकुनि ॥५॥
आम्हीं बाला शतजन्म जपूं । श्रीज्ञानेश्वरनाम ॥ आम्हां ॥६॥ (य९उ.२०५)

९२५

सुशीलावृत्त. रा.-काफी. ता.-तेताला

खेळूं रंग गुलाल ॥ प्रभुजी ॥धृ॥
चोळि आणली तुम्हि तिज जडले । पांच हिरे मणि लाल ॥ प्रभुजी ॥१॥
कुंजवनी यावें नटुनि सख्या । कंठी घालिन माळ ॥ प्रभुजी ॥२॥
ज्ञानेश्वरकरुणेंचि मिळाले । पति मज त्रिभुवनपाल ॥ प्रभुजी ॥३॥

९२६

सुशीलावृत्त. रा.-सिंधभैरवी. ता.-तेताला

खेळुं चला जी वसंत ॥ यदुपति ॥धृ॥
ध्याती मुनि मानसी तुम्हा ते । किमपि न मनुनि उसंत ॥ यदुपति ॥१॥
ज्ञानेश्वरकन्या नंदसुता । नवरा मानि पसंत ॥ यदुपती ॥२॥

९२७ / हिंदी

कन्यकावृत्त. रा.-बेहाग. ता.-तेताला.

मोहन मेरा श्याम ॥धृ॥
मै मंचकपर सोति अकेलि । सुन बेणू बेफाम ॥ मोहन ॥१॥
पतिधनसुत ये मम दुखदायक । सुखघन जदुबर श्याम ॥ मोहन ॥२॥
अलकावतिपतिनंदिनिको प्रभु । हृदय करब निजधाम ॥ मोहन ॥३॥

९२८

लावणीवृत्त मूळ. -पूर्वी ता. धुमाळी. गौण.- ''चुटका लावुन गेला.'' या चालीवर.

कर्नाटकचा ठगडा गेला लावुनियां चुटका ।
तुम्हि तरी उद्धवा पाजिजे प्रेमामृतघुटका ॥धृ॥
काय विधीने लिहिला बाई दासिभाव फुटका ।
सुंदर त्यजुनी कुब्जे रतला रसिक गुणसुटका ॥१॥
आज नाहि तरि दो दिवसा हा मारिल यम फटका ।
यास्तव विनवणि नेउनि आमुची हरिचरणी पटका ॥२॥
प्रेमदधी शांतीघृत भरुनी देउं हृदयमटका ।
परि सांगा हरिलागिं नसावा लोभ प्रभू तुटका ॥३॥
पुसा पुसा हरिलागी आमुचा प्रेम कुठे लटका ।
काय बोलिलों आम्ही म्हणुनी हरिस आला झटका ॥४॥ (य९उ.२०६)
हरिविण जाते आम्हा भाऊजी कल्पसाम्य घटका ।
ज्ञानेश्वरप्रभुनंदिनि विरहिणि करि हरिपदि अटका ॥



कर्नाटकाचा ठगडा गेला ॥५॥

९२९ गोपीवचन -

कुब्जा-प्रशंसा

सुशीलावृत्त. रा.-गौडसारंग. ता.-तेताला. (राजविद्याधर)

हरिविण चैन न पडतें आज ॥धृ॥
एकट आलें वृंदावनिं मी । सोडुनिया गृहकाज ॥ हरिविण ॥१॥
अनंत जन्में तप आचरुनी । पति मिळला व्रजराज ॥ हरिविण ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या हरिसाठीं । नाचत घेवुनि साज ॥ हरिविण ॥३॥

९३०

लावणीवृत्त. मूळ. -पूर्वी ता.-धुमाळी. गौण.- वसंती बघुनी मेनिकेला. या चालीवर

धन्य बाई कुब्जा वेल्हाळा ।
आंगी असुनी वांकडि निजवश केले यदुपाळा ॥धृ॥
काय आम्ही सरळा बाळा । जवळीच्या दवडिले निधाना भुवनत्रयपाळा ॥
आपुल्यामध्ये बळ नाही । बळवंताला शिव्या देउनी फळ मिळते काई ॥
हृदयी प्रेमचि दृढ यावा । मथुरेहुनि येउनि देइल मग हरि चुंबन ठेवा ॥
खचित तप कुब्जेचे मोठे । चला तिला शरण वो जिच्या करुणेने हरि भेटे ॥
कशाला द्वेष तुम्हा व्हावा । सर्वसाम्य हरिच्या घरि अनुचित करण सवतिदावा॥
अवघ्या ज्ञानेश्वरबाळा । पुसति उद्धवा आम्ही आवडतो की गोपाळा ॥१॥

९३१

लावणीवृत्त.मूळ.- पूर्वी. ता-धुमाळी. गौण.- वसंती बघुनी मेनिकेला. या चालीवर

पाळणा खेळे पुतनारी ।
विषयविवर्जित रतिरस भरिता हालविती नारी ॥धृ॥
योगिया कधी नव्हे प्राप्ति । ज्ञानि करिति अनुमान साधुनी उगिच विश्वव्याप्ति॥
जाहली दुःखाचि समाप्ति । सकळहि गोपी कृष्ण पाहुनी पर्याकामाप्ति ॥
पाहता मनि प्रीती भारी । श्यामतनू पाहूनी भूलल्या अवघ्या व्रजनारी ॥
पाळणा खेळे पुतनारी ॥१॥ (य९उ.२०७)
पडली मनपवना गांठी । गृहलज्जा त्यजुनी आचरती कृष्णासह गोठी ॥
उमाळे प्रेमाचे पोटी । धैर्यबळे बोलती भोगु हा हरि, जन्म कोटी ॥
ज्ञानेश्वरस्मरणी अधिकारी । शामतनू पाहूनी भुलल्या अवघ्या व्रजनारी ॥२॥

९३२

लावणीवृत्त. मूळ. -पूर्वी ता.-धुमाळी. गौण.- वसंती बघुनी. या चालीवर

चला गडे दोघि चौघि जाऊं ।

यमुनातिरिं हरि वाजवि मुरली हिरुनिया घेऊं ॥धृ॥
यशोदे सांगुनिया देऊं । मुरलिरवे मोही मन आमुचे बळीभद्र भाऊ ॥
श्यामतनु कोवळि ही मूर्ति । अघ बक केशी मारुनि केली त्रिभुवनभर कीर्ति ॥
नंदभाग्याची ही सूर्ती । झालि प्रकट गोकुळी । चला जाऊ मिळुनिया सुरती ॥१॥
काल बाई मिळुनि सर्व बाळा । कात्यायनिव्रत आचरितां ते कळले गोपाळा ॥
आला कोणिकडुनि काळा । वृक्षस्कंधी चढला करुनी वस्त्रांच्या माळा ॥
हरीहुनि भिन्न आम्हि नारी । म्हणुनि मुरलि ऐकता होतसे क्षोभ मना भारी ॥
श्रुतिच्या लाहोनि विचारी । गोपीगोप ती भेदभावना द्या सांडुनि सारी ॥
कोवळ्या सप्तवरुषि रूपा । बघुनि जाहलो मोहित अवघ्या सोडुनि कुलतापा ।
भिऊ ना कवणाच्या बापा । देव मिळल त्या सुखे करावे पुण्या वा पापा ॥
सहज हा मार्ग होय सोपा । अखंड मनि भावावे गावे वाणि अलंदीपा ॥२॥

## ९३३

वासंतीवृत्त. मूळ.-यमनकल्याण. ता.-तेताला. गौण.- ''लगि बाई मोहनियाकी'' या चालीवर

आज नका वाजवूं । वेणु हरी ॥धृ॥
सासू जावा खडतर त्यासह । कलह नका माजवूं ॥ वेणू हरि ॥१॥
गोरस विकुनी पति आला त्या । समिप नका लाजवूं ॥ वेणू हरि ॥२॥
भुवनत्रयिं अपकीर्ती माझी । व्यर्थ नका गाजवूं ॥ वेणु ॥३॥ (य९उ.२०९)
ज्ञानेश्वरवचनें तुमच्यास्तव । आम्ही रति साजवूं ॥ वेणु हरी ॥४॥

## ९३४ / हिंदी

सुशीलावृत्त. रा.-असावरी. ता.-तेताला.

मै तो घरकि अकेली श्याम ॥धृ॥
पति बैठे हैं भोजन कारन । जल ले जाति हूं धाम ॥ मै तो ॥१॥
देर भयी प्रभु अब छोरो फिर । करोंगि तुह्मरो काम ॥ मै तो ॥२॥
सुमरन अंतर राखतिहूं प्रभु । बाणि तेहारो नाम ॥ मै तो ॥३॥
ज्ञानेश्वरबल आवोंगी झट । वृंदा-कानन-धाम ॥ मै तो ॥४॥

## ९३५

मल्लिकावृत्त. रा.-जोगी. ता.-दीपचंदी.

श्यामसुंदर भुलला कसा गे ॥धृ॥
हरिहुनि साजिरि नाहीं[1] गोकुळि । विपरीत काळ असा गे ॥१॥
बहु बहु रात्रंदिवस शिकवितें । तरि नच उमटे ठसा गे ॥२॥
ज्ञानेश्वरजा विनती करुनी । परिहारि भववळसा गे ॥३॥

(१. कोणि न, पाठांतर)



## ९३६ / हिंदी

रसालावृत्त. रा.-सिंधभैरवी. ता.-तेताला.

किने मेरे प्यारेकुं मोहनि डारी ॥धृ॥
आजतक प्रीती थी मोपर । निकस गयी ओ सारी ॥ किने ॥१॥
खानापीना छोर दिया सब । अखियन दिखती नारी ॥ किने ॥२॥
ज्ञानेश्वरकन्याकी प्रीती । हरिचरणनपर थारी ॥ किने ॥३॥

## ९३७ कृष्णवचन उद्धवं प्रति

परिचारिणीवृत्त. मूळ.-यमन. ता.-धुमाळी. गौण.- ''हे कपटपटूपण'' या चालीवर.

तूं जाउनि पाहीं व्रजजनमधुरादिशा ।
जे सगुणब्रह्मिं पावती उन्मनि दशा रे ॥ तूं जाउनि ॥धृ॥
मन्मेघ जळीं ज्या तळपति सौदामिनी ।
सर्वदा प्रिया मम बद्धमदनदामिनी ॥
वाटे मज त्यजितिल कीं प्राणचि कामिनी ।
मी करिनचि त्यानां अपवर्गी स्वामिनी ॥ (य९उ.२०९)
ज्या बालपणापासुनि माझ्या भामिनी ।
त्यांवांचुनि मजला वाटे युगसम निशा हो ॥ तूं जाउनि पाहीं ॥१॥
अक्रुरें आणिलें मथुरे जेव्हां मला ।
तैं झाल्या दुःखित गोपी अतिनिर्मला ॥
अक्रुरा निंदिती लावुनिया क्रूर मला ।
म्हणती कां नेसी गोकुळिंची जीवकळा ॥
त्या पति सुत त्यजुनी मम चरणांबुजवशा हो ॥ तूं जाउनि पाहीं ॥२॥
उद्धवा असें मी मैंदचि वाटे खरा ।
किति दिलें दुःख त्या गोकुळिं नारीनरां ॥
बहु आठविती मज गोपी विरहातुरा ।
मद्ध्यानें झाल्या साक्षिरूप सुंदरा ॥
त्या भक्तिबळें पावल्या विमुक्तिस कशा रे ॥ तूं जाउनि ॥३॥
मज भासे मी दुर्दैविच परि नेटका ।
मिळल मला गोपीअधरामृत घोट का ॥
म्यां व्यर्थ वसविली व्रजिं प्रीती दाट का ।
परि गेलों विसरुनि देवपणहि नेटका ॥
तत्सेवें न दिलें फल शुल्कहि म्यां टका ॥
श्री ज्ञानेश्वर वारितील संसृतिविषा हो ॥ तूं जाउनि पाहीं ॥४॥

०००

उद्धव-गोपी संवाद

उद्धव प्रकरणीं दिंड्या आर्या वगैरे.

९३८ / आर्या

बोले व्यासकुमर तो पांडवकुलपालका सुखें ऐक ।
उद्धव बोलावुनियां जवळी गुज सांगतो हरी पैक[1] ॥१॥

(१.प+इक=पैक.)

९३९ / दिंडी

क्षीण झाल्या गोपिका हरिध्यानें । पूर्ण तैशा अंतरीं विरहपानें ।
जाणुनीयां तद्भाव देवराणा । उद्धवासी पाठवी नंदतान्हा ॥१॥

९४० / ओवी

उद्धवा जवळी वनमाळी । सांगे व्रजाची नवाळी ।
गोपी गुंतल्या प्रेमजाळीं । भवकल्लोलधुमाळी सांडुनी ॥१॥

९४१ / हिंदी साकी

नंदराणि अरु नंद उद्धव मोहे ध्यावत नित मनमाही ।
ताबिन मोको और कछु यहां किंचित सूझत नाहीं ॥१॥

९४२ / हिंदी चौपाई

और कहूं क्या ब्रजछब ताता । मिठी मिठी गोपिनकी बाता ।
सुमरत मन जन न रुचत मोहे । ज्या हृदिं प्रेमपूर्ण बिधि सोहे ॥

*(पद सूरदास -)*

*''उधो मोहे व्रज बिसरत नाहीं रे ॥*

*इत्यादि.* (य९उ.२१०)

९४३

जयावृत्त. मूळ.-झिंझोटी. ता.-दादरा. गौण.- रत हरिपद कमलकंद. या चालीवर.

मामी मी सांगूं किती ह्याच्या तरि खोडी ॥धृ॥
कंठीं कर घालुनियां बळें हार तोडी ॥
* (अ) एकटि निजलें बघूनि हृदयग्रंथि सोडी ।
यमुना तटिं जातां कटिनिऱ्या धरुनि ओढी ॥ मामी ॥१॥
दीर पती देखतांहि उगे नयन मोडी ॥ मामी ॥२॥
ज्ञानेश्वरकरुणे मज लागलि हरिगोडी ।
भवत्तनुजपायाहुनि मुक्ति मानिं थोडी ॥ मामी ॥३॥



९४४ / हिंदी

विशाखावृत्त. रा.-बेहाग. ता.-तेताला.

आज हरी कौनसुं सदन गये ॥धृ॥
भोजन कारन मामि जसोदा । को श्रम धूंडि भये ॥ आज हरी ॥१॥
मैं नहिं जानति हरिनें भोजन । कितउ किये न किये ॥ आज हरी ॥२॥
गोकुलभीतर सुंदर नारी । प्रिय मन मोहलिये ॥ आज हरी ॥३॥
अलकावतिवल्लभकरुणाबल । हियमें शामलये ॥ आज हरी ॥४॥

९४५

सामकादावृत्त. मूळ.-झिंझोटी. ता.-दादरा. गौण.- पांडुरंग स्मर अभंग. या चालीवर.

विसरला किं वाटे तो आम्हां वैभवें ॥धृ॥
रंग ढंग कुब्जे घरिं करितसे नवे । गोकुलजनआठव त्या नाहिं गे स्वयें ॥१॥
येथ खात होता दूध अल्प आवडी । आतां तव द्वारिं येति सुधाकावडी ॥२॥
दुग्धभरें माझे स्तन येति दाटुनि । देतिल ज्ञानेश कधीं हरिस पाठुनी[1] ॥३॥

(१.पाठुनी - हा प्रयोग वऱ्हाडांत पाठवून या अर्थी होतो.)

**सखीसंवाद**

येथून सखिसंवाद आहे यांत नायिका भिन्न भिन्न आहेत.

९४६ उत्तमा नायिकावचन -

सुशीलावृत्त. रा.-जोगी. ता.-तेताला.

कधिं ते मजला मिळतिल सांग ॥धृ॥ (य९उ.२११)
ज्याविण झुरतें दिनरजनीं मी । सुकवुनि आपुलें आंग ॥ कधिं ते ॥१॥
त्यानां मजहुनि कोण मिळाली । शामा वनिता चांग ॥ कधिं ते ॥२॥
येतिल म्हणुनी रात्रिं सखे म्यां । मणिमय भरिला भांग ॥ कधिं ते ॥३॥
अलकावतिजीवनभेटीस्तव । लंघिन भवसरिरांग ॥ कधिं ते ॥४॥

९४७ / हिंदी चौपाई

बिरहदशा कामिनिको जानी । बोलत प्रेमभरें सखि बाणी ॥
काहे सखी सुद न रही तोहे । शाम पर गली दीखे मोहे ॥१॥

९४८ / श्लोक

तदा ती वदे गोपिका प्रेमवाणी । असें बोलणें बोलिजे ना मुखानीं ॥
पती जातसे जो गृहालागिं अन्या । परी द्वेषि ना कामिनी तेचि धन्या ॥१॥

९४९ / उत्तमा नायिकावचन -

प्रमुदितावृत्त. मूळ.- जोगी. ता.-धुमाळी.गौण.- कोठें नच जावें. या चालीवर.

व्रज हें कवणाचें कवणाचें ॥ हरिविण आन न नाचे ॥ व्रज हें ॥धृ॥
त्रिभुवन ज्यानें पाळियलें हें काय नव्हे सखि त्याचें ।
आपण घरिं येतां विनवावें नम्र वदोनी वाचे ॥ व्रज हें ॥१॥
ज्ञानेश्वरातात मजहुनी गुण । वाणिति जामाताचे ॥ व्रज हें ॥२॥

९५०

रमावृत्त. रा.-हमीर. ता.-तेताला.

हें काय बरें बाई ॥ अग हें ॥धृ॥
परसुन छळितां न तिचे लक्षी । बाप बहिण आई ॥ हें काय ॥१॥
जाळि शरीरा रतिवर म्हणुं तरि ॥ तरुणहि हा नाहीं ॥ अग हें ॥२॥
कितितरि गर्गादिक मुनी या । म्हणती फणिशाई ॥ अग हें ॥३॥
तूं म्हणसिल मजलाचि बजारिणि । परि हें प्रिय काई ॥ अग हें ॥४॥
बदल काय आपणा कुलिन मम । ज्ञानेश्वरआई ॥ अग हें ॥५॥

९५१ यशोदावचन गोपीप्रति -

रमावृत्त. रा.-हमीर. ता.-तेताला.

सखि तूं विवाह कां केला ॥धृ॥ (य९उ.२१२)
तात मात मिळुनी शिरीं कांहीं । बोजा नच देला ॥ सखे त्वां॥१॥
व्यर्थचि निंदिसि निज भर्तारा । लाज न ये तुजला ॥ सखे त्वां ॥२॥
तुज न कळे कीं सर्वादेखत । शरण शक्र आला ॥ सखे त्वां ॥३॥
यमुनाडोहीं उडी घालुनी । कालिय फणि मथिला ॥ सखे त्वां ॥४॥
अलकावतिपतिच्या तरि कांहीं । धरिं अंतरिं बोला ॥ सखे त्वां ॥५॥

९५२ / अन्य सखिवचन -

सुशीलावृत्त. रा.-यमन. ता.-तेताला

बाई दुःख सोसुं किति आज ॥धृ॥
जनापवादें कांहिच ना ये । बाइ ग यानां लाज ॥ बाई दुःख सोसुं ॥१॥
मंचक होता दिला दुजीला । निजघरिं मोडकि बाज ॥ बाई दुःख ०॥२॥
सांडुनियां लग्नाच्या नारी । काय परस्थळीं काज ॥ बाई दुःख सोसुं ॥३॥
नेणो कधिं पावतील सखये । ज्ञानेश्वर गुरुराज ॥ बाई दुःख सोसुं ॥४॥

९५३

सामकामदावृत्त. मूळ.- बेहाग. ता.- दादरा. गौण.- पांडुरंग स्मर अभंग. या चालीवर.

असिच काय गे सखे तूं हरिस सेविसी ।
जातां परमंदिरीं रोधूनि ठेविसी ॥ असिच ॥धृ॥



क्षणभरि तें घरिं नसतां कां ग जेविसी ।
तूंच खोटि आणि कृष्णीं बोल ठेविसी ॥ असिच ॥१॥
म्हणवुनि ज्ञानेशसुता शब्द लाविसी ।
पातिव्रत्य विसरुनी कुल लाज खोविसी ॥ असिच ॥२॥

९५४ / आर्या

सकळहि झालें आतां तुजजवळी सांगतां गडे गोष्टी ।
तूं तंव पक्ष तयांचा घेसी जे होति स्त्रीमुळे कष्टी ॥१॥

९५५

तव सखि वदली साजणि मानुनि पति हरिपदास सेवावें ॥
घालवुनी मळ गुरुकुळ साजवुनी वच पियूष जेवावें ॥२॥

९५६

श्रीज्ञानेश्वरचरणीं सखिसंवादास अर्पुनी प्रणती ॥
करुनि करितसें यावे सदनिं रमण हीच सर्वदा विनति ॥३॥

९५७

लावणीवृत्त. मूळ. -पूर्वी ता.-धुमाळी. गौण.- भला जन्म हा - या चालीवर

तनुरुत जीवित वित्त न मोजुनी जुनि उत्थित पावली । (य९उ.२१३)
तशा त्या धावति प्रतिपाउली ॥धृ॥
चंद्रवदन मृगनयन सकळही नच गोरी सावळी । इच्छिती हरिकरुणासाउली ॥
हरि येतां त्यापुढति तनु करी मन्मथ पाशावली । प्रीतिमय वनशोभा छावली ॥
॥चाल॥ मग धावति काही धरिती प्रेमे करा ।
कोणि नयनि नयन मिळवीती विरहातुरा ॥
कोणि चुंबन घेऊनि रदे खंडिताधरा ॥
॥ चाल पहिली ॥ यापरि बाला विगलितलोला वेष्टितस्मर माउली ॥
धरुनि तनुवरती स्मरमावली ॥ तनुरुत ॥१॥
कोमलकमलोत्फुल्ललोचना उभारुनी बाहुरी । एक धरि ओढुनि एकावली ॥
भ्रुकुटिकटा प्रेमसंभ्रमबळे चढवुनि अलकावली । एक रमे विझवुनि दीपावली ॥
॥ चाल ॥ यापरी विलासे रमती व्रजनंदिनी ।
त्या पूजिती हरिला तुलसिसुमनचंदनी । आरूढ करोनी मनबुद्धिस्यंदनी ॥
॥ चाल पहिली ॥ जीवब्रह्मएकत्व पावल्या सांडुनि कामावली ।
स्मरति परि ज्ञानेश्वरमाउली ॥ तनुरुत ॥२॥

९५८

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- गौण.- बाई आम्ही दिल्लिपतीच्या दासी. या चालीवर.

मज मदन ताडि तनुवरते । पदपल्लव करि शिर सरतें ॥ मज ॥धृ॥
चारुगात्रि तूं सुंदरवदना । कदनप्रेमरति भरतें ॥ मज ॥१॥
मळुनि अंग शृंगार-रंगसुख - । संगदंग करि पुरतें ॥ मज ॥२॥
व्यास गुरू जयदेव तसा प्रभु । ज्ञानेश्वरपदिं शिर तें ॥ मज ॥३॥

९५९

लावणीवृत्त. मूळ.- यमन. ता.- धुमाळी. गौण.- नंदाच्या नंदना. या चालीवर.

उद्धवा ऋण नाहीं फेडिलें ।
परि मजसाठी उलटें त्यांनी पतिसुतगृह सोडिलें ॥धृ॥
उद्धवा कुळ त्यांचें बुडविलें ।
परि मम निंदा न करुनि त्यांनीं कात्यायनिं मिळविलें ॥
उद्धवा किति मी त्यांचा ऋणी ।
वाटे कीं सेवार्थचि घ्यावी कृष्णतनूही जुनी ॥
उद्धवा युक्ति सांग आझुनी ।
देवगुरूच्या गृहिं तूं शिकला श्रुतिविद्याही जुनी ॥ (य९उ.२१४)
ज्ञानेश्वर करुणाबळ ।
स्मरुनी झडकरि व्रजपुरीं जा पाहिं गोपि प्रेमळ ॥
उद्धवा ऋण नाहीं फेडिले ॥१॥

९६० / दिंडी

सोयरीक जोडोनि आणि जो का । तात त्याला बोलते श्रुति देखा ॥
माझि आणी गोपींचि सोयरीक । जोडि ताता उद्धवा पूर्ण नीक[१] ॥१॥

(१.चांगली)

९६१ / दिंडी

उद्धवा तूं गोकुळीं जासि आतां । पाहसी मम गोपिका प्रेमकान्ता ॥
रात्रि कैशा मी कंठु सांग ताता । काल कां मम प्राण तो नव्हे नेता ॥२॥

९६२

गौळियाच्या रानटी पहा पोरी । तारि त्यांनां श्रीहरी करुनि चोरी ॥
एक पाहीजे हरिस पूर्ण भक्ति । कांहिं नेच्छी मग वेदशास्त्रयुक्ति ॥३॥

९६३

सामकामदावृत्त. मूळ.- बेहाग. ता.- दादरा. गौण.- पांडुरंग स्मर या चालीवर.

माय मला जेउं घाल भूक लागली ।



धेनु वनी चारुनियां तनू भागली ॥ माय मला ॥धृ॥
दूधदहीं भात देइं त्वरित आणुनी ।
जेवुं मागुं आलों तुला सदनिं जाणुनी ॥ माय ॥१॥
उपवासी असुनी मी मार्गि चालतां ।
करिति बहु विनोद गोपि हंसत बोलतां ॥ माय ॥२॥
ज्ञानेश्वरकन्यापति विनवितां असे ।
अन्न माय पात्रिं वाढि पूर्ण षड्रसें ॥ माय मला ॥३॥

९६४ / हिंदी

सामकामदावृत्त. मूळ.-यमन ता.-दादरा. गौण.- रतहरिपद कमल. या चालीवर.

नंदजीके लाल देवो कपडे तुम म्हारे ।
अंग मोरा कापन लागे सीतताके मारे ॥ नंदजी ॥धृ॥
जसोदाके कान्हा प्रभु नंदके हो प्यारे ।
वस्त्ररहित देख सास हमे घरते निकारे ॥ नंदजी ॥१॥
तजियसे न दयानिधान दीन के सहारे ।
ज्ञानेश्वरकन्याहिय तुम्हरे पग धारे ॥ नंदजी ॥२॥ (य९उ.२१५)

९६५ / मुरली

वासंतीवृत्त. रा.-यमन ता.- तेताला.

वेणु हरी मधुर मधुर वाजवी ॥धृ॥
नर्तन-वादन-गान-निपुणता । सुरसुंदरि लाजवी ॥ वेणु हरी ॥१॥
कोटि मदनसम वदन विधुद्युती । नयनोद्गम साजवी ॥ वेणु हरी ॥२॥
ज्ञानेश्वरकळवळा बळें हरि । संचित बिज भाजवी ॥ वेणु हरी ॥३॥

९६६ / अक्रूराप्रति

सुशीलावृत्त रा.- हमीर ता.-तेताला.

तुज हे कोणि ठेविलें नांव ॥धृ॥
नामा ऐसी करणी नसुनी । व्यर्थचि कीं मनिं हाव ॥ तुज हें ॥१॥
अक्रुर म्हणती परी तुझा तो । परम क्रूर स्वभाव ॥ तुज हें ॥२॥
विविशक विरहकुठारें घालिसि । गोपीवरि कां घाव ॥ तुज हें ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुतात दयाला । तूं तरि झडकरि पाव ॥ तुज हें ॥४॥

९६७

जयंतीवृत्त. मूळ.- पूर्वी. ता.-धुमाळी. गौण.-घनशाम सुंदरा. या चालीवर.

मदन मनोहर मूर्ति कोंवळी मंदिरिं तरि आणा ।

न पाहतां शेजे नंदतनय त्यागिन मी प्राणा ॥धृ॥
मसृण मलयचंदन अंगीं मज पावकसम वाटे ।
न भेटतां स्मितवदन भवकदन मदन मनीं दाटे ॥
सुमनहार कंठिं घालतां आशिवीष गमती ।
आतांवरि निघते असु तरि हरिपदिं जाउनि रमती ॥
जाइ मुक्तलग धग धग जाळित वाटे मज ज्वाळा ।
नंदजविरहें तप्त जाहली ज्ञानेश्वरबाळा ॥ मदन ॥१॥

९६८

लावणीवृत्त. मूळ. -पूर्वी ता.-धुमाळी. गौण.- घनश्याम सुंदरा. या चालीवर

कष्ट न सोसुनि सासुप्रति हरी सुखे गोपि बोले ।
हरिसाठी या व्रजपुरि येऊनि प्रेम पिउनि धाले ॥धृ॥ (य९उ.२१६)
उघडी होउनि घडि घडि घडि हरि जोडुनि करि पिंगा ।
निस्संग होउनि रंग हरिसुखे मिळवू श्रीरंगा ।
सांडुनि शब्द स्तब्ध व्हावया मोकळि मी झाले ॥
हरिसाठी या व्रजपुरिं ॥१॥
आज कडी लावुनी कवाडा बांधितसा मजला ।
परि सुत तुमचा मेला माझ्या हृदयी हरि निजला ।
आज नव्हे बहु जन्मापासुनि हा प्रभु मी भजला ।
आता जाते गृह निघुनी मी पाहिजे उमजला ।
अझुनि तरी सोडाना व्यर्थचि कां बंधन केले ॥
हरिसाठी या व्रजपुरिं येउनि० ॥२॥
मज न गमे नगरी सगरा करि नग ज्या स्थळि आहे ।
दे मज जो नग त्या प्रति मग मी प्रीति जवळि राहे ॥
जवळि दूरि हा भाव सांडुनी हरि मम हृदिं आहे ।
नकळे तरि मग ज्ञानेश्वर श्रीगुरु करुनी पाहे ॥
तुमच्या कुळिहुनि सर्वस्वहि मी अज वाया गेले ॥
हरिसाठी या व्रजपुरिं येउनि० ॥३॥

९६९ / समाधि-व्युत्थान

लावणीवृत्त. मूळ.-पूर्वी ता.-धुमाळी. गौण.- घनश्याम सुंदरा. या चालीवर

नवल करी परि वाजवि हरि हा वेणु स्वये साजणी ॥
तार नसूनी सात स्वरही चतुच्छिद्रता जुनी ॥धृ॥



षड्ज पंचम युगपत् साधी साधी सांडुनि कळा ।
श्रवण नयन जिघ्राण स्पर्शन रसना शब्दी कळा ॥
मनन, पवन, ग्रहण, श्रवण, कथन नानाविध या कळा ।
मुरलीद्वारे दाखवि श्रीहरि न हूनि जन वेगळा ॥
अघटित करणी वर्णनि श्रमला दशशत फणि मोजुनी ॥
ज्ञानेश्वरप्रभु करुणाघन यत्कीर्तिस्मरणी जुनी ॥ नवल करी परि ॥१॥

९७० / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. रा.-काफी. ता.-तेताला.

हरिबिन मोहे औरन कोई जनमजनम मोको वहि प्रिय होई ॥ हरिबिन ॥धृ॥
मदनदहनप्रिय राधिकापति अतसिकुसुम सम अंग ।
प्रेमभरे गोपिनतें खेलत रास रसान्वित संग ॥ हरिबिन मोहे ॥१॥
देखदेख भइ तदा बावरी गोकुल कामिनि सारी ॥ (य९उ.२१७)
जमुनाजल बिच जमबंध हरे हरि भज ब्रजकी नारी ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुचरणनआशा ध्याई बलजोई ॥ हरिबिन मोहें ॥३॥

९७१ गोपीकृष्णसंवाद -

रमावृत्त. रा.- असावरी. ता.- तेताला.

आजी बहु दिवसां भेटी ॥धृ॥
भेटी घ्याया केलें प्रभुजी । साधन शतकोटी ॥ आजी ॥१॥
विरहानल हा जाळित होता । अतितर नित पोटीं ॥ आजीं ॥२॥
भेटी होता सुटल्या सकळा । चिदहं मम गाठी ॥ आजीं ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुतातकृपेला । मिळवुं तुम्हासाठी ॥ आजीं ॥४॥

९७२

रमावृत्त. रा.-बेहाग. ता.-तेताला.

मी तों सकळांच्या हृदयीं ॥धृ॥
मजविण या जनिं ठाव रिकामा । नाहीं मुळिंच सई ॥ मी तों ॥१॥
तत्पदरूपें अंतर्यामी । त्वंपदिं मीच तुम्ही ॥ मी तों ॥२॥
निज हृदयीचें गुह्य विसरुनी । पडलिस शोक नई[1] ॥ मी तों ॥३॥
ज्ञानेश्वरगुरुवाक्यरहस्ये । पाहीं श्रुति समयीं ॥ मी तों ॥४॥ (१.नई = नदी.)

९७३ / हिंदी

सुशीलावृत्त. रा.-बेहाग. ता.-तेताला.

मैं तो चाहती हूं साकार ॥धृ॥

निर्गुणरूप ध्यान न आवत । देत न चितमो प्यार ॥ मैं तो ॥१॥
कर धर बेणु गले बनमाला । निजजनहृदय विहार ॥ मैं तो ॥२॥
अलकावतिपतिकन्या प्रभु मैं । जानि करो स्वीकार ॥ मैं तो ॥३॥

९७४

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- जोगी. ता.-तेताला. गौण.- पहा पहा सावळा. या चालीवर.

गोकुळीं या नवल नानापरी । दधी मंथितां आपुलिये घरीं ।
डेरा घुमू लागला सोहंकारी । दिसे अवघा गोविंद शिरीं उरी ॥गोकुळी०॥धृ॥
(य९उ.२१८) धूत असतां मी कटी पर घडी । प्रभु मुकुंद पातला तेचि घडी ।
कळंबावरूनी खालें घाली उडीं । चहुंकडे घेरिलें निजगडी ॥ गोकुळीं०॥१॥
कामबळें सांपडे जीवन्मुक्ति । भलत्या भावें भजतां कृष्णभक्ति ।
ठायीं गेली मरूनी भवभुक्ती । आतुळली ज्ञानेश्वरगुरूक्ती ॥ गोकुळीं या०॥२॥

९७५ / हिंदी

विशाखावृत्त. रा.-जोगी. ता.-राजविद्याधर (तेताला)

हरि हमें क्यौं छांडे बनमो ॥धृ॥
गोकुल म्याने लछमी बसतु है । प्रीति तोरि जनमो ॥ हरि हमें ॥१॥
पति सुत बांधव तव हेत तजे । खाक भरी तनमो ॥ हरि हमें ॥२॥
गो चारनते चुबते होंगे । कंटक चरणनमो ॥ हरि हमें ॥३॥
अलकावतिपतिकरुणाबलतें । प्रभु बैठे मनमों ॥ हरि हमें ॥४॥

९७६ / मुरलीची धून

लावणीवृत्त. मूळ. - ता.-धुमाळी. गौण. - भूपती खरे ते वैभव सुख सेवीती. या चालीवर.

ऐकुनि धून मुरलिचि घायबरी झाली ।
मी सोडुनि पतिला धावत धावत आली ॥धृ॥
पति बसले ग जेवायला रंग महाली ।
मी वाढितांचि पिसि होउनि कढिने नहाली ॥
॥ चाल ॥ कोणि चालति का तरि सांगा ॥ मज सवें ॥
या संसारी हे वेड मज नवे ॥ आता टाकियले ग दूरी मज भवे ॥
॥ चाल पहिली ॥ देवोत सासुजी मुखि येइल ती गाली ॥मी सोडुनि॥१॥
हे नवल साजणी मी बरि बळकट मनिंची ॥
ऐकताचि मुरली वाट धरीली वनिंची ।
मी गेली भावना विसरुनि आपुल्या ग तनुची ॥
मज कांहि नाठवे कर्मस्मृतिही मनुची ॥



॥चाल ॥ मज स्वर्गनरकही सारे खुळचटे ।
मी जाउनि भोगिन आता हरि हटे ।
ज्यांच्या पदकरुणायोगे भव तुटे ॥
॥ चाल पहिली ॥ या कुंजवनी मी सुंदर खेळण केली ॥ मी सोडुनि ॥२॥
बाई मी हरि मिळवायाचा निश्चय केला ।
कोठवरी पाठी पति धावल हा मेला ॥
बाई माझा मानस भाव हरीने गे नेला ।
जनलाजेसह अभिमान पळोनी गेला ॥
॥ चाल पहिली ॥ मज कोणि नको ग आतां सांगते ॥ (य९उ.२१९)
हरिप्रेमसौख्यची गोड लागते ।
हरिनामे कार्यहि माझे भागते ॥
चाल पहिली ॥ श्रीज्ञानेश्वरगुरु तात मार्गि मज वाली ॥ मी सोडुनि ॥३॥

९७७ / हिंदी

नवोढावृत्त. मूळ.-झिंझोटी. ता.-तेताला.

विश्वासेन स्वसखिंप्रति स्वभक्तेः फलं निश्चितमित्याह :-

सखी हूंगि कोई दिनमों लालकी पियारी ।
छोरि सदन जाते है कहिं साजनी पियारी ॥धृ॥
मोहलेति लाला दिलकूं गोकूलकी नारी ।
तप करिजा रहुं मै तनु जमुना किनारी ॥ सखी ॥१॥
लालहेतु लज्ञा तजिके भई हूं बजारी ।
गेहुं लालको खिला मैं पाति सदा जारी ॥ सखी ॥२॥
लालहेत पाती थी मैं सासकी सजारी ॥
मजा लालकी लखि दीन्ही कूलको रजारी ॥ सखी ॥३॥
ज्ञानदेवबाणीबलतें देतिहूं मुनारी ।
चैन नाहिं मनमो छनभी लाल तो बिनारी ॥ सखी ॥४॥

९७८ / हिंदी

सामनुष्टुप वृत्त. मूळ पिलु. ताल धुमाळी. गौण - ''नहि गोपीचंद मैं'' - या चालीवर

प्रियप्रीत्या परेशो कर्णस्फाटित (नाथवत्) भूत्वा वनोपवनेष्ठ विगतत्रपः प्रियार्थं भ्रमतीत्याशयेनाह :-

कहिं देखी कहवूं माई राधिका प्यारी ॥धृ॥
ज्या प्यारिकाज कींगरि करमो मैं धारी ।

अब जाउं कहां उर लागी बिरहकटारी ।
बृखभानुसुता वो दृगजु टरे नहिं टारी ॥ कहिं देखी ॥१॥
ज्या कारन मैनें छोरा जगत पसारा ।
धूंडि बारा बरस भये सूखा तनलहु सारा ॥
ज्या आस पकर मन कीन्हा जपतप सारा ।
तों खोज नहिं लगे क्या मोहे कहिये बिसारा ॥ कहिं देखी ॥२॥
ये प्रिया प्रेम मोहे इत उत नीत घुमाता ।
इस कारन सुमरत नाहिं तात अरु माता ॥
तरुपाथरको यह फिर फिर सीस नमाता । (य९उ.२२०)
देहुं दर्शन प्यारी स्मर ज्ञानेश्वरमाता ॥ कहिं देखी ॥३॥

## ९७९ / हिंदी

सुवासिनी रसाला भेद. रा.-सोरठ.- ता- तेताला.

श्याम श्याम सखिघर नहिं आये ॥धृ॥
आधि बाट सुधि आवत सुनि है । कहिं किन लीन फिराये ॥ श्याम ॥१॥
दीपावलिको ज्योति श्री नहिं । बिन हरि स्नेह मिलाये ॥ श्याम ॥२॥
अलकावतिपतिनंदिनिचरणसुं । नंदजचित्त लगाये ॥ श्याम श्याम ॥३॥

## ९८० / हिंदी

साममाणववृत्त. रा.-काफी. ता.-दीपचंदी.

शाम सुरत तेहारी ॥ भरगई नयनन सारी ॥ शाम ॥धृ॥
रात पलंग नींद नहीं आवति । बिरहदशा परती है बिचारी ॥ शाम०॥१॥
दोहा
बिरहन बलतें समय समयमो व्हैकरि एकाकारी ।
अपन बिसर करि तवरूप व्हैके आपहि करत पुकारी ॥ शाम सुरत ॥२॥
फिरकर आवत तनुपर तब पुनि लेवत प्रभु तव नाम ।
अलकावतिपतिनंदिनि अचरज देखत मति गुणधाम ॥ शाम सुरत ॥३॥

## ९८१ समाधि-व्युत्थान

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-जोगी. ता.-तेताला.गौण.- पहा पहा सावळा, या चालीवर.

सर्व मिळोनि व्रजगवळिणी । सगुण सावळी ब्रह्मतनु जुनी ।
वैदिक ब्रह्मनिष्ठ गुरु मुनी । भक्तिभावें आळविती चक्रपाणी ॥ सर्व०॥धृ॥
भक्ति मुक्ति सर्वही अधिकारी ।
ज्यांची प्रीती कृष्णी अव्यभिचारी । कर्मे सांडिलीं सर्व अभिचारी ।



अंतर्बाह्य जाहल्या ब्रह्मचारी ॥ सर्व मिळोनि ॥१॥
मौन निर्गुणी बोलणें सगुण । ब्रह्म समाधी श्रीकृष्ण व्युत्थान ।
नायकतां ऐकती हरिगुण । पुढे त्रिगुणा करीती निर्दलन ॥ सर्व मिळोनि ॥२
ब्रह्मकंचन हृदयगृह भरी । परी आवडी श्रीकृष्ण अलंकारीं ।
करुनी तटस्थलक्षण वेद चारी ।
महावाक्यें मिळाल्या सगुण सारी ॥ सर्व मिळोनि ॥३॥ (य९उ.२२१)
हेमब्रह्मज्ञानें हरिमाहात्म्य कळे । कृष्णभूषणी अंग ब्रह्मीं वळे ।
आवडीनें आनंद उसळे । हृदयालिंगनी पुष्टि पघळे ॥ सर्व मिळोनि ॥४॥
सर्वांनांही भरतार शेषशायी । परी सपत्नीमत्सर चित्तिं नाहीं ।
कृष्ण-गोपी हा भाव नसे कांहीं । अंबुतरंगीं रंगल्या एके ठायीं ॥ सर्व०॥५॥
समाधींत एकल्या आत्मज्योती । देहावरी येतांचि कृष्णप्रीती ।
ब्रह्मरूप विषयही स्थिती । समाधिव्युत्थानिं श्रीहरिप्रतीती ॥ सर्व०॥६॥
हांसतांही आठविती कृष्णा । कर्मे अर्पिती सांडोनियां तृष्णा ।
प्रभूसाठी साहती शीतउष्णा । ब्रह्मतनू चैतन्यमय ज्योत्स्ना ॥ सर्व ॥७॥
ऐशा धन्य कामिनी व्रजाचिया । कृष्णनामेंचि केली ब्रह्म काया ।
तेथ न प्रवर्ते अविद्यामाया । नमो भगवते वासुदेवाया ॥ सर्व मिळोनि ॥८॥
ज्ञानेश्वरकारुण्य फोंफावलें । गोपिप्रेम अचुक फावलें । मोक्षा जिवंत सकळ
पावले । भक्तिसाठी हृदयी हरिपाउलें ॥ सर्व मिळोनि ॥९॥

## ९८२ / ओवी

मग परस्पर बोलती गोपिका । जिया आलिंगनी ब्रह्मबोध फिका ।
अनुभवोनि निर्गुणसुखा । वैकुंठनायका आलिंगिती ॥१॥

## ९८३

हांसविण्यासाठीं करीती गाऱ्हाणें । प्रेमा आलिंगनें मिळोनियां ॥१॥
प्रेमप्रवृत्त्यर्थ करिताति ध्यान । सोडोनि संधान संसाराचें ॥२॥
खेळविण्यासाठीं करिताति काला । जीवेंभावें केला वश्य कृष्ण ॥३॥
ब्रह्मरूपध्यानें नेलें जीवपण । सगुणीं तें मन हारविलें ॥४॥
जीव मन दोन्हीं गेले हारपूनी । देहाची कहाणी कोण जाणें ॥५॥
व्यतिरेकें बह्म जाणिलें निर्गुण । अन्वयें सगुण सावळें तें ॥६॥
मानोनियां वेद विसरल्या भेद । वाचेसी गोविंद नित्य गाती ॥७॥
आळंदीचा राणा होतां कृपावंत । मग भगवंत अंतर्बाह्य ॥८॥

९८४ / सामनुष्टुपवृत्त.

चला सख्यानों चला गे । विसरुनि भवभयकला गे ।
जीवब्रह्मी हा तुला गे । षडरिपुगणही भुला गे ॥ चला सख्यानों ॥धृ॥
(य९उ.२२२) नयन मिळवुनी पणागे । जीवचि लावा पणा गे ।
निवारा त्रिगुणा गे । ब्रह्मलोकही उणा गे ॥ चला सख्यानों ॥१॥
प्रेमपाणि हे वला गे । करा वश्य केवला गे ।
विसरुनि तुजला-मला गे । भेदअद्वैतमला गे ॥ चला ॥२॥
गोविंदा हरि म्हणा हो । पदिं अर्पा तनुमना हो ।
वैराग्यसुमना हो । भक्ति भजन अति गणा हो ॥ चला ॥३॥
अलकावतिपति पदा गे । चित्तिं आठवा सदा गे ।
तुटतिल तरि आपदा गे । नुरे मग यदा तदा गे ॥ चला सख्यानों ॥४॥

९८५ / हिंदी यशोदाप्रति गोपीवचन -

सुशीलावृत्त रा.- यमन ता.- तेताला.

माई सुनिये मेरि फुकार ॥धृ॥
ये तव नंदन भवकंदन करि । तोडत हृदय बिकार ॥ माई सुनिये ॥१॥
जोगी तापस जाने नहिं सो । दिया मुहै अधिकार ॥ माई सुनिये ॥२॥
अलकावतिपति साथि भये अब । किहबिधि करु संसार ॥ माई सुनिये ॥३।

९८६ / यशोदावचन गोपीप्रती

पहिलें गाऱ्हाणें ऐकूनी यशोदा । अत्यंत प्रमोदा उत्तरीलें ॥१॥
काय गे बोलसी लटिकें येऊनी । आवडे तें मनीं कैसें झालें ॥२॥
नाना जन्महूनी आठविला हरी । म्हणोनि अंतरीं भरला तो ॥३॥
मुळिंपासुनी तूं संसारा अपात्र । येथ माझा पुत्र दोषी नाहीं ॥४॥
बाई माझा बाळ खेळतो पाळणा । तुझीचि भावना चावट किं ॥५॥
भवाचिया भयें पळालीस दूरी । म्हणसी मुरारी अपराधी ॥६॥
जावोनियां पुसें ज्ञानेश्वरताता । माझ्या कृष्णनाथा दोष नाहीं ॥७॥

९८७ / हिंदी दोहा

इतिबिधि सुनिकर बात पुनी दुजी गोपि स्नेहाल ।
नमन करी जसुमतिपग सुमिर बोलि नंदलाल ॥

९८८ / गोपीवचन

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-जोगी ता.-तेताला. गौण.-पहा पहा सावळा. या चालीवर.

ऐक ऐक यशोदेबाई । ऐसें पहिलीला उत्तर देतां कांहीं ।



निर्गुणाविषयीं आम्हां वाद नाहीं ।
परि हा सगुण पुत्र तुझा छलनदायी ॥धृ॥
निर्गुणनिरूपण बहूही आयकतो । तरी एकाएकीं गृही विसरतो ।
(य९उ.२२३) परी हा सगुण जेधवां गृहा येतो ।
तेव्हां जीवभाव आकर्षुनी नेतो ॥ ऐक ऐक ॥१॥
निर्गुणांत घालितां थोडि उडी । तरी झोंप येते लवडसवडी ।
बाई हा सगुण लावुनी लाडिगोडी ।
देहाहुनी जीव ब्रह्माकडे ओढी ॥ ऐक ऐक ॥२॥
आम्हि आधींच गवळियाच्या नारी । वेदमार्गी सर्वथा अनधिकारी ।
नेणों निर्गुण कासयाचें परी । किन्तु सगुणचि चाळवितों भारी ॥ ऐक०॥३॥
म्हणुनीयां उत्तर अुनचीत । सगुण ओढी सर्वदा आमुचें चित्त ।
ज्ञानेश्वरकरुणा प्रेमवित्त । आम्हां वाटे हा श्रीहरीच गोत ॥ ऐक०॥४॥

९८९

उगेंचि बोलतां न वाटे का लाज । सदोदित काज तुम्हां येथें ॥१॥
निर्गुण अंतरीं बाणलिया जरी । चुंबनासि तरी कोणी नाहीं ॥२॥
म्हणोनियां येसी घडिघडि येथें । मग कां कृष्णातें दूषितेसी ॥३॥
ज्ञानेश्वरतात न बोलेचि वृथा । तुम्ही कृष्णकान्ता जीवेंभावें ॥४॥

९९० / हिंदी दोहा

सुनि यह बात तीसरी बोलत मधुर सुबैन ।
बाणी दृष्टी मेल नहीं हरिपग लागे नैन ॥१॥

९९१ / गोपी वचन

कितीही बोलिल्या न वाटे विश्वास । देतसां आश्वास[१] पुत्रालाची ॥१॥
आवडती सदा नंदनाचे गुण । उत्तर म्हणून कांहीं तरी ॥२॥
परी नाहिं बरें ठेवावें लक्षांत । देईल शिक्षांत[२] कृष्ण तुमचा ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभूकरुणा अगाध । जेणें हा गोविंद बांधू आम्ही ॥४॥

(१. आश्वासन २. शिक्षेंत)

९९२

बोलणें हे वाचे करावें कीं तैसे । वरणें[३] अविश्वासें ठेवोनियां ॥१॥
बाळासी शिक्षितां तुम्हांहातीं शिक्षा । पावतां परीक्षा देखेन मी ॥२॥
प्रेमावीण यासी शिक्षा द्यावयासी । कोणीही शिवासी विदित नाहीं ॥३॥
प्रेमें जरी यासी बांधाल अंतरीं । माझे घ्यावें करीं गाऱ्हाणें हे ॥४॥
चतुर यशोदा दोहीं पक्षीं बोले । गोपीतें अडवीलें शिष्यसम ॥५॥

ज्ञानेश्वरप्रभु-करुणा-संमती । करावया पती कृष्ण जाऊं ॥६॥ (३.लग्नाविषयी)

९९३ / हिंदी दोहा

गोपीवचन-

सुनिके यह भी बचन पुनी बोलत चवथी नार ।
जहुं बिधि भक्तीभाव बढे मन कालिंदिकिनार ॥१॥

९९४

बहू पावलें उत्तर । व्यर्थ मारुं नका जोर ॥१॥
सुत तुमचा श्रृंगारी । काम उठवी अंतरीं ॥२॥
ज्ञानेश्वरकृपा मोठी । कदा बोलेना मी खोटी ॥३॥

९९५ / यशोदावचन -

काम राम एक दोन्ही । भक्ति पहावी साधोनी ॥१॥
श्रृंगार तो ब्रह्मांनद । मुनी वर्णिती अनिंद ॥२॥
ज्ञानेश्वर माय बाप । तेथ ठेवावा संकल्प ॥३॥

९९६ / दोहा

तदा पांचवी गवळिणी विसरुनि विषयविहार ।
यशोमतीप्रति बोलिली करुनिहि प्रणमस्कार ॥

९९७ / गोपीवचन

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- भूप ता.-तेताला. गौण.- पहा पहा सांवळा. या चालीवर.

मामी बोलताति यथार्थ भाव ।
आम्हांलाचि आहे कृष्णचरणहाव । 'अहं ब्रह्मास्मि' अभिमानठेव ।
सगुण भजतां तें अहं होय वाव ॥ मामी बोलताति ॥धृ॥
बाळ नव्हे हा तुमचा आत्माराम । त्याला पाहों कैसा उठेल काम ।
उलटा कामची होत तैं निष्काम । प्रेमपरिरंभण संभ्रम ॥ मामी ०॥१॥
परी एक पुसणें आहे आतां । याच्या होतां लौकिकीं आम्ही कान्ता ।
तरी येईल स्त्रीदेहा अहंता । भक्ती न साधे याहूनी अन्यथा ॥ मामी ॥२॥
याची आवडी आम्हां जीवापाड । डोळेभरी बाहतों घननिळ । जागृत्स्वप्निं
सुप्तीं हरि वेळ । येतो येथें होउनी उतावेळ ॥ मामी बोलताति ॥३॥
ज्ञानेश्वरकारुण्य कळों आलें । गाऱ्हाण्याच्या मिषें ज्ञान झालें ।
आतां पाजा भक्तिसुधाप्याले । सर्व त्यागी जें महायोगी प्याले ॥ मामी०॥४॥

गोपालकाला

९९८ - यशुमति वचन



संधिसमाधींत आठवा गोपाळ । चित्त घननीळमय करा ॥१॥
येथें येवोनियां घडिघडि हांसा । चित्ताचिया भासा सोडोनी द्या ॥२॥
सगुण सुंदर करील जैं काला । विसरोनी काला तेथ जावें ॥३॥
काल्यामध्यें कीजे काळाचाही काला । अंतरीं गोपाला आठवूनी ॥४॥
गोपाळगोपिकाप्रसादाचें सुख । नित्य कृष्ण मुख प्रेमें पाहा ॥५ (य९उ.२२५)
ज्ञानेश्वरप्रभु साह्य तुम्हाप्रति । भय कांहीं चित्तीं धरुं नये ॥६॥

९९९ / काला

ओवी - सद्गुरु सारिखी यशुमतीवाणी । ऐकोनि सकल व्रजकामिनी ।
न गणोनि दिवस आणि यामिनी । कृष्णरमणी जाहल्या ॥१॥
आत्मभावें परब्रह्म । देहभावें पत्निधर्म ।
मनोभावें पुरुषोत्तम । जन्म जन्म परम सेविला ॥२॥
मग परस्पर म्हणती चाला । जेथ स्वामी करिती काला ।
कंठी घालूनि माला । गोविंदनामाला मुखें वदूं ॥३॥
वाचे गोविंद गोविंद । श्वासासी लागला सोहं छंद ।
मनासी ध्यानमय नामबोध । सत्ता शुद्ध आत्मयातें ॥४॥
आत्मा देह मन प्राण । सर्वही जरी जाहला कृष्ण ।
तरी डोळ्यानें डोळा पाहण्या समान । अद्वैतीं भजन करावें ॥५॥

१००० / काला

अभंग - गोविंद गोपाळ सुखाचा सागर । मधुर मधुर यत्प्रसाद ॥१॥
आपण सुखाचा दुज्या देतो सुख । गोपी अंतर्मुख सर्व झाल्या ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या गोपाळासहित । पावल्या स्वहीत परब्रह्म ॥३॥

१००१ / काला

सामनुष्टपवृत्त. हरिचा काला गोड झाला. या चालीवर.

हरिचा काला गोड झाला । इतर देव ते आलापाला ॥धृ॥
सुरवर भुलती विषयफळाला । कर्मठ ते वश होति यमाला ॥१॥
यादवपति हा दीनदयाला । काला वारित विभवभयाला ॥२॥
विषय भोगितां सुख नच प्राप्ति । काला खातां अखंड तृप्ती ॥३॥
हरिचा काला गोड झाला । समबुद्धीचा पूर आला ॥४॥
यातीकूळभाव गेला । गोपगोपिका जेऊं घाला ॥५॥
अलकावतिपति करुणामूर्ति । काला अद्वैतीं तत्कीर्ती ॥६॥

०००

पाळणा

गोपी-कृष्ण प्रश्नोत्तरे.





१००२

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-सारंग. ता.-धुमाळी. गौण.-महाराज कुणीकडे तुम्ही, या चालीवर

महाराज कनकपाळणा, पाळणा हृदय मुनिचें ।
निजलें ब्रह्म साक्षि मनिचें ॥ कनकपाळणा ॥धृ॥
महाराज कनकभूषणीं, भूषणींच दृष्टान्ती, जयातें योगि सुनिष्ठांतीं ॥ (य९उ२२६)
महाराज करीती बहू, नमन श्रेष्ठांती, उदय पावतांचि दृष्टान्ती ॥
महाराज प्राणपदर तें, पदर ते सुबक साचे, लाविले विवेककसाचे ।
महाराज कृष्ण गोविंद, गोविंद वदूं वाचे, जयाला नेती श्रुति वाचे । कनक ॥१॥
महाराज शुद्धभाव तो, भाव तो उदय पावे, तदा हें सगुणब्रह्म फावे ।
मिळुनि सज्जन, याचेचि गूण गावे, सदा या साष्टांग नमावें ॥२॥
महाराज अलंदीपती, पतीकृपा मोठी, डोळिया दिसला जगजेठी ॥
गेलिं पातकें पातकें लक्षकोटी, जाहलें शांतिस्वरूप पोटीं ॥३॥

१००३ / हिंदी दोहा

जारबुद्धि परमात्मरत कीन्हा बंधन क्षीण ।
शुद्धसंग शुचि भावना हुई ब्रह्ममो लीन ॥१॥

१००४

रमावृत्त. रा.-बिलावल. ता.-तेताला.

मोहनमुखरित मुरलीरवा ॥धृ॥
पुढें जाउनी कोणि सख्यानों । क्षणतरि उगि करवा ॥ मोहनमुखरित ॥१॥
येतें मी मागुनी तंववरी । राससभा भरवा ॥ मोहनमुखरित ॥२॥
एका घावें संसारांतुनि । घ्या करुनी निरवा ॥ मोहनमुखरित ॥३॥
सगुण सावळें रूप घेउनी । दिलपालखिं मिरवा ॥ मोहनमुखरित ॥४॥
श्रीज्ञानेश्वरकरुणा काढी । विषयांतुनि अरवा ॥ मोहनमुखरित ॥५॥

१००५

गोपी-कृष्ण प्रश्नोत्तरे.

विशाखावृत्त रा.-खमाज. ता.-तेताला.

युवतिनो आला कशाकरितां ॥धृ॥
तूं जगताचा स्वामि ब्रह्मतनु । भवमोचनकरता ॥१॥
देवपती, युवतीनां भजणें । योग्य न श्रुतिसरता ॥ युवतिनों ॥२॥
पती एक जन्माचा तूं तंव । जन्म जन्म भरतां ॥ युवितनों ॥३॥
ज्ञानेश्वरकन्यका सकल आम्हि । तव गुणिं मन भरिता ॥ युवतिनों ॥४॥

१००६ / श्लोक



मधुप किं तव बंधो या पदीं गोपबाळा । मधुपमधुर गीतीं गुंफिती प्रेममाळा ॥
परम हरिसुखातें चित्त व्यापी जयाचें । परम करिति तुच्छ द्योतनीं ज्या तयाचें॥
(य९उ.२२७)

१००७

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-भूप. ता.-–तेताला. गौण.- पहा पहा सावळा कैसा धीट. या चालीवर.

गाई चाराया जासिल जेव्हां वाटे । पाय सकुमार रुततील कांटे ।
यास्तव विनवीतों सकळहि नेटें । प्रभू येउनियां झडकरि भेटें ॥
गाई चाराया० ॥धृ॥
चंद्र नसतां सुकती कमलिनी । तुझे पाय अम्लान मोक्षदानी ।
कुच कोमल आमुचे प्रमाणीं । तुझे पाय त्याहुनी चक्रपाणी ॥१॥
भक्तसत्वहृदय सुकुमार । पदकमलां तंव तेंचि सरोवर ।
भूमी अवघीही झाली तृणाकार । बाई खुपतील जाडे अंकुर ॥२॥
म्हणोनियां खेद वाटे मना । धांवुनी ये रुक्मिणीरमणा ।
करीं करुणा शमनशमना । वंदितो श्रीज्ञानेशचरणा ॥ गाई चाराया० ॥३॥

१००८

परमार्थाच्या पायऱ्या

सामकामदावृत्त मूळ.- झिंझोटी. ता.-दादरा. गौण.- पांडुरंग स्मर अभंग. या चालीवर

मधुर रामनामगानकारि ज्याचि वाणी ।
वाम काम तो न करी ब्रह्मिं धामदानी ॥धृ॥
स्मरत रामकृष्णनाम ग्रामचाड नाहीं ।
सत्य वदुनि मिथ्यभवा गुरुचरणीं वाहीं ॥१॥
महावाक्यें ब्रह्मीं ऐक्य करुनि जीवदेवा ।
सगुण सुगुण हृदयिं सदा आठवूनि ठेवा ॥२॥
ज्ञानदेवचरण सेव भेदभाव वारी ।
अन्वयव्यतिरेकिं विश्व चिन्मय सुखकारी ॥३॥

१००९

मुरलीरव

सामकामदावृत्त. मूळ- झिंझोटी. ता.-दादरा. गौण.- पांडुरंग स्मर. या चालीवर.

श्रवण करुनि मुरलीरव भवभय हें नाहीं ।
घेत करीं पूतनारी उच्चतर हिनांही ॥धृ॥
नमकचमक नमन करुनि नाद झमक वाजे ।
मुरलि गोड तैसें नाहीं योगि सोहं साजे ॥१॥

अगुणब्रह्म सगुण होय भक्तकार्यकारी ।
प्रणव विनति करुनि म्हणति नेति वेद चारी ॥२॥
अलकावतिपतिचरणीं मरण जन्म नाशे ।
श्रवणमनननिदिध्यासिं विश्व ब्रह्म भासे ॥३॥ (य९उ.२२८)

१०१०

रमावृत्त. रा.-भूप. ता.- तेताला.

साजणी माधवकेलि करूं ॥धृ॥
कुचयुगल दान करुनी हृदयीं । अधरामृतचि भरूं ॥ माधव ॥१॥
एकवेळ हरिपदिं मिळुनी मग । पुढति न जन्मुं मरूं ॥ माधव ॥२॥
क्षण वाइट म्हणवूं परि अंती । त्रिभुवन कीर्ति भरूं ॥ माधव ॥३॥
अलकावतिपतिवचनरचनसुख । कदाहि नच विसरूं ॥ माधव ॥४॥

१०११ / श्लोक -

त्यजुनि अखिल वृत्ति साधनीं दीन झाल्या ।
सगुण हरि सुखार्थी उद्धवापाशिं आल्या ॥
मिळवुनि चिति वक्त्रीं नाम त्या माधवाचें ।
रडति सकल नारी गाति गोविंद वाचे ॥१॥

यशुमति-गोपीसंवाद

१०१२ / आर्या -

गोपी - किति सांगू कपटी हा याच्या गृहिं गोपि पात्र सांवडती ।
परि वैकुंठीं जातां शेवटिं याला रमाचि आवडती ॥१॥

१०१३

यशोदा - हें काय बोलतां गे विष्णू हा मर्त्यलोकिं कां आला ।
वैकुंठ रमा त्यजुनी प्रेमें तुमचा कर ग्रहण केला ॥२॥

१०१४

गोपी - आम्हां विस्मय जननी कीं मुनि त्यांनाहि लागलं वेड ।
ते ब्रह्मचारि असुनी जाराचें भजन लागलें गोड ॥३॥

१०१५

कंचुकीवृत्त. मूळ.-पिलु. ता.-धुमाळी. गौण.- नृपममता रामावरती. या चालीवर.

बहिणी तूं विरहिणि ज्यासाठीं । रततो परकामिनि पाठीं ॥धृ॥
एवढी तनु तव सुकली कां । पाहतो हरि नव सु-कलीका ॥१॥
सोडुनि तुज कुमुदीनीला । लंपट पटकूमदनीला ॥२॥



मानिति मुनि ज्यास विगुण राणी । कळित तोकांस विगुणराणी ॥३॥
असशिल जरि त्यावरि रुसली । साहि अकराहि घरिंच बसली ॥४॥
आधिं अलकावतिपतिपाया । चिंतिं मग हरिस घटविं काया ॥५॥
(य९उ.२२९)

१०१६ / हिंदी / मुरलीरव

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-जोगी. ता.-तेताला.गौण.- हिंदुस्थानी भजनाचे चालीवर.

लाल तूनें बंसी काहेको बजाई ॥धृ॥
टेर सुनी मैं रजनि समयमों । इस बन दवरत आई ॥ लाल तूनें ॥१॥
अव्वल लेहि फुकार बुलायके । अब क्यौं बोलत नाहीं ॥ लाल तूनें ॥२॥
अलकावतिपतितात हमारे । तिन संमति तुम्हरीही लुगाई ॥ लाल तूनें ॥३॥

१०१७ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-जोगी. ता.-तेताला.गौण.- हिंदुस्थानी भजनाचे चालीवर.

शाम तोरे बांसरिमें मोहनि छाई ॥धृ॥
अपने कांत ढिग बात करति थी । सुनि बन दौरके आई ॥ शाम तोरे ॥१॥
बिन मोहन की या गोकुलमें । शाम मिले न लुगाई ॥ शाम तोरे ॥२॥
अपन सातसंग पीत सुरा छलि । औरन लेत मोहाई ॥ शाम तोरे ॥३॥
ज्ञानेश्वरजामात कुलिन तुम । साबरि काहे बनाई ॥ शाम तोरे ॥४॥

१०१८ / गोपीवचन

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- जोगी. ता.-तेताला गौण.- पहा पहा सावळा. या चालीवर

बाई गोविंद कोणीतरि घ्या वो । मनोभाव समूळ येथ द्या वो ।
मायामगरीला घडिघडि भ्या वो । हात धरूनियां दोघी दोघी या वो ॥धृ॥
घरा दारापासुनी मागें फिरा । निजकर्माचा करूनियां शिरा ।
घाला माया मोहावरी चिरा । अमोल ध्या सख्यांनों यदुवीरा ॥ बाई०॥१॥
मथुरेच्या बोलती तेव्हां नारी । सर्व वेड्या जाहल्या तुम्हिं नारी ।
जो कां दीन ताराया अवतारी । तोचि कैचा माठांत पूतनारी । बाई०॥२॥
बाई सांडोनिया देहबुद्धि पाहा । अंतरींच होऊनी तृप्त राहा ।
गर्व टाकोनी हरिप्रेमी नाहा । तनूमन हें ज्ञानेश्वरी वाहा ॥३॥ (य९उ.२३०)

द्रौपदीचा धावा

१०१९

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- जोगी. ता.-तेताला. गौण. पहा पहा सांवळा या चालीवर.

धाव पाव गोविंदा लवकरी मज सांभाळि आपुले करीं ।

प्रभु दीनेवरी कृपा करी, तुज ध्यातों मी दयाळा अंतरी ॥धृ॥
आतां माझा नको पाहूं अंत । धाव द्वारकाधीश भगवंत ।
धाव दीनबंधो रमाकान्त । गेलि लज्जा बोलति ना कि कान्त ॥१॥
गुंतलासी तूं कोठें नारायणा । मी करितें तव नामपारायणा ।
कंठ सोकला येई बा सगूणा । ऐशा समयीं दाखविं चरणा ॥२॥
तुझे आम्ही सकळ गोपिकान्ता । रक्षिं लज्जा धावोनि भगवंता ।
प्रेमाऽप्रेम पाहसी तूं अनंता । ज्ञानेश्वरमित्रा मोक्षदाता ॥३॥

१०२०

रमावृत्त. राग-हमीर. ता.-तेताला.

सखि हे चाल वसंत वनीं ॥धृ॥
सूप्ति मनोगत सकलहि झाले । शून्य क्षण भुवनीं ॥ सखि हें ॥१॥
सुंदर शामतनू सकुमारा । पाहुं सहज नयनी ॥ सखिं हें ॥२॥
आलिंगन-चुंबन-नख-लोलनिं । क्रीडुं सुमनशयनीं ॥ सखिं हे ॥३॥
या स्थळिं जैसें अनुकुल सकलहि । तेविं न मा भुवनी ॥ सखि हें ॥४॥
अलकावतिपतिकरुणायोगे । मन न गमे च्यवनीं ॥ सखि हें ॥५॥

१०२१. / हिंदी यशोदावचन -

सुशीलावृत्त. रा.-असावरी. ता.-तेताला.

मोरे किते गये दोउ लाल ॥धृ॥
देख्यो न उन्हें जगत पसाऱ्यो । आठ बरसके बाल ॥ मोरे ॥१॥
नहिं पहनाई मोतन लरिया । खुषि भें लें बन माल ॥ मोरे ॥२॥
ज्ञानेश्वर तुम्हरे बेटिनके । असुवन भीगत गाल ॥ मोरे ॥३॥ (य९उ.२३१)

१०२२

सामकामदावृत्त. मूळ.-यमन ता.-दादरा. गौण.- पांडुरंग स्मर अभंग. या चालीवर.

कुंजवनीं वेणु माय मधुर मधुर वाजे ।
अघटितघटनापटुता ज्या स्थळीं विराजे ॥ कुंजवनीं ॥धृ॥
व्रजयुवतीमति मोहुनि येउं नेदि लाजे ।
त्वरित तोडी सकल भाव ब्रह्मसत्तुला जे ॥१॥
अलकावतिपतिनंदिनिरमण सौख्यकारी ।
प्रणवसाम्य नाम यदिय वदति वेद चारी ॥२॥

१०२३

बाई आज घरीं नाहीं आला देव । तरी कैसा भव जाईल हा ॥१॥
काय प्रेमामाजीं पडलें अंतर । नाहीं शार्ङ्गधर गृहीं आला ॥२॥



दोघी चौघी चला मिळोनियां जाऊं । नंदद्वारीं राहूं तुझ्या प्रेमें ॥३॥
गाऱ्हाण्याच्या मिसें पाहूं नारायणा । प्रत्यय तो जना सिद्ध देऊं ॥४॥
''आवृत्तिरसकृदुपदेशादिति'' । ब्रह्मसूत्रउक्ति प्रमाण ज्या ॥५॥
म्हणोनियां वेळोवेळीं पाहूं ध्यान । तदाकार मन करावया ॥६॥
ज्ञानेश्वरकृपा प्रेममार्गी फळ । भक्तिसुखबळ आंगीं पावे ॥७॥

१०२४

सामनुष्टुप वृत्त. मूळ.-जोगी. ता.-तेताला. गौण.- पहा पहा सावळा. या चालीवर.

पुरे पुरे तें लाडविणें आतां ।
खोडी करी तें कां न ये पाहतां । एवढा असोनी मांडीवरी घेतां ।
काय राहील चार दिवस सत्ता ॥ पुरें पुरें ॥धृ॥
जावें टाकुनी गोकुळ काय । याचे प्रत्यक्ष तुम्हीं बापमाय ।
कांहीं सांगाना या अजूनि सोय ।
ताप देतो हा अत्यंतचि माय ॥ पुरे पुरे ॥१॥
बाई याचा संयोग जेव्हां होत । तेव्हां खोडी नाहींत मोजवत ।
वियोगांत प्रेमभरी चित्त । तोहि भक्ती हा आम्हां आकर्षित ॥ पुरे ॥२॥
बाई आम्हीं सासुरवाशा नारी । काय आम्हा लाज नाहि खरी ।
काय आम्ही कुलटांच्या पोरी । काय तुम्हीच कुलांगना भारी ॥ पुरे ॥३॥
आतां पासोनि बरे शिकविणें । पुढं हा राहील वाटे तुम्हावीणें ।
यासी बांधोनि सर्वदा ठेवणें । परी ज्ञानेश्वरसम्मति घेणें ॥ पुरे पुरें ॥४॥
(य९उ.२३२)

१०२५

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-जोगी. ता.-तेताला. गौण.- पहा पहा सावळा. या चालीवर

काय करावें सांगा बाई । गृहीं येतां ताप ऐसा देई ।
दुरी जातां व्यापी सर्वाठायीं । श्रुतिसिद्ध आह्मालागीं गोवी ॥धृ॥
आतांपासुनी हा वेदान्त सांगे । बहू अनन्वीत कर्म करी अंगे ।
वाटे धर्मबाह्य होऊं याच्या संगें । ऐसा विकल्प[1] येतां अंतरंगें ॥ काय ॥१॥
माये याच्या निरूपणीं गोडी । न बोलतांची संशय तोडी ।
म्हणे तुम्हीं सन्यस्तीं घाला उडी । म्हणोनीयां कंचुकीगांठ सोडी ॥काय॥२॥
एके दिनीं आला हा पुतनारी । म्हणे संन्यासी व्हा तुम्ही नारी ।
आम्ही बोलिलों नहों अधिकारी । तेव्हां बाई हा बळे नग्न करी ॥काय०॥३॥

तेव्हां ऐसें हा आम्हां बोले । माझ्या दर्शनीं पाप तुमचें गेलें ।
आता सत्कर्म जें कांही राहिलें । त्याच्या बळें मज वरा वहिलें ॥ काय०॥४॥
पुण्य पाप जाहलीया क्षीण । मग गृहस्थ संन्यासचि जाण ।
यासी नको अन्यत्र प्रमाण । मजहूनी वरिष्ठ आहे कोण ॥ काय ॥५॥
ऐसे ऐकोनि आम्हां क्रोध येत । पुन्हां याला पाहतां शुद्ध होत ।
बाई इंद्रजालपरीच दिसत । ज्ञानेश्वर क्षमा करवीत ॥ काय करावे ॥६॥

(१.विगता कल्पना इतिश्लेषः = छेकापन्हुती.)

१०२६

ओवी - यापरी सकल बाळा । एकान्त पाहुनी वेल्हाळा ।
आम्हां अर्पावें गोपाळा । ऐसें संकेतें विनविती ॥१॥

१०२७ / अभंग

प्रणयानुबद्ध कांहीं गोपिबाळा । प्रेमाचा उमाळा मावेचि ना ॥१॥
प्रेमें अश्रुभरें अभिषेकभाव । तुम्हां आम्हां हाव प्रेममय ॥२॥
सुखाचियासाठीं हारविलें दुःख । उरलें ते सुख कृष्णा दिलें ॥३॥
सुखदुःखावरी सांडोनियां पाणी । स्वयें नंदराणी बोलतसे ॥४॥
ज्ञानेश्वरबाळा बोलती वचन । धरूनियां मौन कृष्ण ऐसें ॥५॥ (य९उ.२३३)

१०२८

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-जोगी. ता.-तेताला. गौण.- पहा पहा सावळा. या चालीवर.

मामी तुमचा खडतर क्रोध । आम्हीं याला शिकवितों बोध ।
उगें बैसा श्रीहरी देतो दूध । तंव हा म्हणे पाहिजे कुचदुग्ध ॥धृ॥
बाळभावें हा स्तना स्पर्श करी । मग म्हणे तूं माझीच अंतोरी ।
बाई गर्गें वर्णिली याचि थोरी । काय ज्योतिष्य चालेना द्वापारीं ॥ मामी ॥१॥
माये याच्या तेजें सूर्या तेज । याच्या कुंडलिंत तोहि हा सहज ।
याच्या ग्रही ग्रहगजबज । कांहीं न चले हा बळिया सहज ॥ मामी० ॥२॥
मामी गर्गाचार्याभिन्नदृष्टि । ग्रह सांगे नवविध सृष्टि ।
माय, नवग्रहा हाचि देत पुष्टि । मग कासया ज्योतिषी झाला कष्टी ॥३॥
सूर्याहूनि जें तेज वरिष्ठ । भर्गो ऐसे बोलती वेद स्पष्ट ।
वेदमातासम्मतीलक्ष्यनिष्ठ । काय जाणेल गर्ग ग्रहनिष्ठ ॥ मामी तुमचा ॥४॥
ज्ञानेश्वरकृपा जेव्हां मिळे । तैं हा साधन न करितां वळे ।
अनूभव आम्हां नित कळे । म्हणोनि धालों सर्व प्रेमबळें ॥ मामी तुमचा ॥५॥



अहंग्रहोपासक गोपी

कांहीं गोपी अहंग्रहोपासक होत्या त्या म्हणाल्या -

१०२९

माय याची कळा अघटित कीती । ज्ञानमय पाहती मूर्ति डोळां ॥१॥
आपणाचि ऐसें निळें आम्हां करीं । माझ्याचि नोवरी म्हणे स्वयें ॥२॥
आम्हालाहि वाटे आम्ही कृष्णकांता । चलावें एकान्ता ऐसें म्हणे ॥३॥
निळ्यामध्यें निळें मिसळोनी जाय । शीर आणि पाय एकरूप ॥४॥
ज्ञानेश्वरकृपा महावाक्यवृत्ति । ''अहंब्रह्मास्मीति'' स्थिती एकी ॥५॥

१०३०

मनो ब्रह्मोपासक गोपी

कांहीं गोपी मनब्रह्मोपासना करणाऱ्या गोपी म्हणतात -

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-जोगी. ता.-तेताला. गौण.-पहा पहा सावळा या चालीवर.

मामी स्वप्नीं मी नवल पाहें । पतीसेजेवरी कोणि नोहे । (य९उ.२३४)
मज उत्पन्न काम झाला आहे । पती म्हणतां हा पुढें उभा राहें । मामी०॥धृ॥
मज स्वप्नीं यानें दिला भोग । परी जागृतींत साधला योग ।
न करतां साधन अष्टांग । स्वप्नमिसें समाधीचा रंग ॥ मामी स्वप्नीं०॥१॥
''स्वप्ननिद्राज्ञानालंबनं वा''। पतंजलोक्त योगसूत्रीं ठेवा ।
'मनोब्रह्मेत्युपासीत' भावा । परी माये हा तुझिये घरीं बरवा ॥ मामी ०॥२॥
तुम्हां घरीं पाळणां नारायण । म्हणोनि येथें गुंतलें सदा मन ।
गाऱ्हाण्याचे मिसें येऊन । पावलों ही ज्ञानेशकृपाखुण ॥ मामी०॥३॥

१०३१

विज्ञानं ब्रह्मोपासक गोपी

काही विज्ञानं ब्रह्म उपासना करणाऱ्या गोपी म्हणाल्या -

निश्चय आमुचा हाचि करूं कान्त । म्हणोनी एकान्त येथें आलों ॥१॥
तुमच्या पोराची करूं सोयरीक । म्हणोनी हरिख तुम्हां यावा ॥२॥
लोकांमध्यें कदा घडेना हे वार्ता । पती आणि सुता देखतांचि ॥३॥
म्हणोनीयां आतां करा साक्षगंध । द्यावा हा गोविंद आम्हांलागीं ॥४॥
तैशा करी खोडी त्या परीस बरें । विवाह निर्धारें करोनियां ॥५॥
गाऱ्हाण्याच्या मीसें ज्ञानेश्वरकृपा । होईल हा सोपा नारायण ॥६॥

### १०३२

आनंद ब्रह्मोपासक गोपी

काही आनंदं ब्रह्मोपासक गोपी म्हणाल्या -

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-जोगी. ता.-तेताला. गौण.-पहा पहा सावळा या चालीवर.

बाई हा भक्षी दहींदूध । परी अमृत देतो शुद्ध ।
काय सांगू वेगळा नाद । बोले भलते भलतेच शब्द ॥ बाई हा ॥धृ॥
आम्हीं खेळतां यमुनातीरीं । येतो कोणीकडून मुरारी ।
बळें पदर ओढोनिया करीं । म्हणे तुम्हां पतिसुख नाहीं घरी ॥ बाई हा॥१॥
आम्हीं जेव्हां आठवितों माहेर । तेव्हां येवोनि ठेवि माथां कर ।
म्हणे खचित बरें नाहीं तुमचें घर । आतां चला मजबरोबर ॥ बाई हा ॥२॥
बाई आम्हां जेव्हा दुःख दाटे । तेव्हां येवोनी अवचित भेटे ।
अश्रु पुसोनी बोलतो गोमटें । म्हणे माझ्यासंगें तुम्हां सौख्य मोठे ॥३॥
(य९उ.२३५) मामी, याला पाहतांचि दृष्टि । आम्ही होतों निर्भय सृष्टिं ।
पतीपुत्र ते बहू होती कष्टी । आम्हां सांगे हा अमृतमय गोष्टी ॥ बाई हा॥४॥
म्हणे तुम्ही ज्ञानेश्वरबाळा । वरा मज त्रिभुवनपाळा ।
तुम्हांसाठीं गोरा होइन काळा । काळा शिक्षा द्याया झालों काळा ॥५॥

### १०३३

व्यतिरेकाच्या उपासक गोपी

काहीं गोपी व्यतिरेक करणाऱ्या होत्या म्हणजे जग-पति-पुत्र मिथ्या मानणाऱ्या,म्हणाल्या :-

याच्यासाठी आम्हीं झालो पतिव्रता । जन्म तो कोणता न कळे कीं ॥१॥
परी या जन्मांत देतो हा स्मरण । धरावे चरण म्हणतो माझे ॥२॥
बाई आम्हीं कांहीं झिडकारितां यास । तुमचा मी दास ऐसें म्हणे ॥३॥
तेव्हां चित्तीं आम्हां वाटोनी विचित्र । होतों स्तब्धचित्र तैशा आम्हीं ॥४॥
आम्हींच बोलतों मग तुझ्या दासी । तरी बहु यासी सुख वाटे ॥५॥
याचा बाई कांहीं वियोग न साहे । म्हणोनियां पाहे डोळेभरी ॥६॥
आम्हा नाहीं क्रोध परी पहावया । गाऱ्हाणें द्यावया उगें आलों ॥७॥
ज्ञानेश्वरबाळा बोलतां वचन । यशोदा ती मौनमुखी होय ॥८॥



### १०३४

विनोदप्रेमवता गोपी-वचन

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-जोगी. ता.-तेताला. गौण.- पहा पहा सावळा. या चालीवर.

मामी बोलती ह्या तुम्हांप्रति बाळा । सांडोनीयां आपुल्या कूळा ।
आम्ही कुळवंत सकळहि बाळा । घरीं बांधोनि कृष्ण हा सांभाळा ॥धृ॥
आम्ही मिळोनी बारा सोळा जणीं । यास टाकूं निश्चयें कोंडोनी ।
चोळी लुगडें याला नेसवोनी । करूं फजिती अवघ्या जनीं ॥ मामी ०॥१॥
याची अपकीर्ति जातां दूरवरी । कोणी न देईल पुढें नवरी ।
म्हणोनि सोय धरी कांहीं तरी । ऐसें सांगा तुम्ही झडकरी ॥ मामी०॥२॥
हा तो ईश्वर सांगताति मुनी । गुरू देवाचाही देव श्रुती मानी ।
आम्ही ज्ञानेश्वरकन्या म्हणवोनी । आम्हां बळ अधिक कृष्णाहूनी ॥ मामी॥३॥
(य९उ.२३६)

### १०३५

गोपीप्रेमसंभ्रम वर्णन

**यशोदावचन -**

सामनुष्टपवृत्त. मूळ.-जोगी. ता.-तेताला. गौण.- पहा पहा सावळा या चालीवर

मामी यासी तोंडानें मात्र बोला । मारणें तें साहेनाचि याला ।
तुम्ही मारू मारू बहु रोड केला । मनी यानें काचचि धरियेला ॥धृ॥
तरी याला राहेना याद कांहीं । बाळ म्हणोनी उनाडचि बाई ।
बाई लेंकरूं कोणाचें धड नाहीं । उगें मारोनी होतें तरि काई ॥ मामी०॥१॥
अहा रायाहूनि या सकुमार । बाई तुमचा तो क्षत्रियसा मार ।
अहो हा एकुलताचि कुमार । मोठेपणी थोडाचि करणार ॥मामी०॥२॥
बाई याचे अवगूण सांगो कोणी । परी माझ्या येतो हा सदनीं ।
तेव्हां जैसा बकदालभ्य मुनी । बाई याची धमकटी कामिनी ॥ मामी० ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या मी सत्यवंत । बाई देखिले बहुत मी संत ।
ते म्हणती हा भगवंत । तुम्ही मारतां न देतां उसंत ॥ मामी० ॥४॥

१०३६

सवतीमत्सरयुक्ता गोपी

कांही प्रणयबद्धा गोपी सपत्निमत्सरानें सांगतात :-

तुझी एकटीची ऐसी का गे वाणी । आम्ही त्या कामिनी गणिका गे ॥१॥
तूंच यशोदेसी सांगसी विचार । आम्हीं कां प्रकार भेद सांगू ॥२॥
विनोदाची तुज न कळेचि खूण । तरी कां कामीन म्हणतेसी ॥३॥
विनोदावांचूनी रिझवाया कांहीं । स्त्रियापाशीं नाहीं सर्वथा गे ॥४॥
विनोदाचे मीसें हांसत श्रीहरी । टाकूं तयावरी प्रेम धारा ॥५॥
विनोदप्रेमाचा मिळाला संपर्क । कृपाही सम्यक ज्ञानेशाची ॥६॥

१०३७ आधपद

संयोगीचें सुख तंववरी गोड । जोंवरी सुरवाड एकाग्रता ॥१॥
प्रेम भरावया पाहिजे वियोग । जाणुनी श्रीरंग वनीं जाय ॥२॥
सकुमार देव जाती वृंदावनी । गोपिका त्या मनीं हळहळती ॥३॥
निघोनियां वनीं चालतां गोविंद । कृष्णपदारविंद स्मरती बाळा ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभू कृपावंत खरा । करावया थारा ऐसें करी ॥५॥ (य९उ.२३७)

१०३८

सामनुष्टपवृत्त. मूळ.-जोगी. ता.-तेताला. गौण.-'पहा पहा सावळा' या चालीवर.

बाई आपण आलों यमुने पाण्या । यशोदेनें नेला मंदिरीं कान्हा ।
धाडिलें की काय तया वना । वनीं जातां आपण जावें शरणा ॥धृ॥
बाई काय वाजतें वृंदावनी । बाई गाई धांवती रानोनानीं ।
बाई वर आलें यमुनेचें पाणी । वनीं आले वाटते मोक्षदानी ॥ बाई०॥१॥
बाई पूर्वी तें काय तप केलें । म्हणोनि हरी गोकुळा मध्यें आले ।
परी सांगोनी गाऱ्हाणें दवडीले । हे कां हरीवरी उपकार केले ॥ बाई०॥२॥
बाई त्याची यशोदा जननी । आपण कामभरें कामिनी ।
यशोदाही शुद्ध बहू मानी । तिच्या वचनें चाले हरी म्हणोनी ॥ बाई०॥३॥
घरदार विसरोनी बाळा । स्पुंदस्पुंदोनि अश्रु येति डोळां ।
ज्ञानेश्वरकृपें कळवळा । हरि सुखासाठी भक्तसुख सोहळा ॥ बाई०॥४॥

१०३९

कल्पतरुतळीं याचिलें दरिद्रा । योगफळनिद्रा मागीतली ॥१॥
कामधेनु शुष्क काष्टें हाणितली । नसतां साधीली ढोंगी भक्ति ॥२॥
गोफणेस घातला गे चिंतामणि । तैसा हरी वनीं दवडिला ॥३॥



ज्ञानेश्वरबाळा सद्गद सुप्रेमें । भजति निष्कामें श्रीहरीते ॥४॥

१०४०

''नासां द्विजातिसंस्कार'' यापरा । भक्ति अधिकारामाजी सर्व ॥१॥
द्विजांचे दैवत श्रीहरी हा द्विज । संसार सहज त्यांचा तया ॥२॥
पतिव्रतेलागीं गुरू तो भ्रतार । तया तो निर्धार शुद्ध झाला ॥३॥
म्हणोनियां कांहीं न साहे वियोग । प्रेमभरी अंग फोफावलें ॥४॥
म्हणताति चला जाऊं वृंदावनी । देउनियां पाणी संसारासी ॥५॥
संसारीक पती तरुण वयाचा । श्रीकृष्ण सर्वांचा आत्मा स्वामी ॥६॥
पती तो श्रीकृष्ण आम्हां सर्वां तारी । म्हणोनि झडकरी चला जाऊं ॥७॥
ऐसे बोलोनिया ज्ञानेश्वबाळा । प्रेमें श्रीगोपाळा पाहूं जाती ॥८॥ (य९उ.२३८)

१०४१

सामनुष्टुपवृत्त मूळ.- जोगी. ता.- तेताला. गौण.- पहा पहा सावळा या चालीवर

तुम्हां कोणें धाडियलें वनीं । काय नव्हते चाकर सदनीं ।
बाळ लहानचि नच पाहोनी । कैसा निकर हांसोनी ॥ तुम्हा कोणे ॥धृ॥
बंदिशाळेहुनी आले देवा । येथें गाई चारितां बरा गोवा ।
कैसे आवडेल हें वसुदेवा । हिरा पडिला मृत्तिका साठोवा ॥ तुम्हा०॥१॥
तुम्ही यादव सकुमार राया । नंदराणी लोकांत[1] तिची माया । *(१.वरवर.)*
रोहिणीते जो सापत्न माया । बाई धाडिलें बनी यदुराया ॥ तुम्हा०॥२॥
बाई तैसी नाहीं ग रोहिणी । तिचा पुत्रही आला आहे वनीं ।
खरी निर्दय बाई नंदराणी । काय ऐसा तोटा ये सदनीं ॥ तुम्हा०॥३॥
आम्ही सर्वही होवोनिया जाया । तुम्हा चारूं सुग्रास यदुराया ।
आम्ही कारण वनी धाडावया । नाहीं अपराधी यशोदा माया ॥ तुम्हा०॥४॥
सभोंवती गोपाळांचा मेळा । मध्यें बैसला सगुण सावळा ।
हातीं घेवोनि सुमनांच्या माळा । गळां घालिती ज्ञानेश्वरबाळा ॥ तुम्हां०॥५॥

१०४२ / श्रीकृष्णवचन -

तुम्हां पाहोनियां भवामाजि दीन । आलों नारायण होवोनियां ॥१॥
तुम्हासाठिं माझे अवतार दहा । कांहीतरी पहा तिकडे कीं ॥२॥
तुमच्या उपकारा नाहीं उतराई । सोडोनी लवलाही जाऊं नका ॥३॥
हरीचें वचन ऐकोनी गोपिका । झाल्या सद्भावीका प्रेमयुक्त ॥४॥
अभिषेकपात्र नेत्रीं अश्रुधारा । इंदिरेच्या वरा न्हाणियलें ॥५॥
ग्रास चारावया गोपिका उदित । ज्ञानेश्वरीं चित्त गुरुप्रेमें ॥६॥

१०४३ / हिंदी

रसालावृत्त. राग-परज. ता.-तेताला (राजविद्याधर)

नहिं कहने की ये बाता ॥धृ॥ (य९उ.२३९)
पति देवेगो सुनतहि गारी । सासु लगावहिं लाता ॥ नहि कहनेकी ॥१॥
बालपनेमें जो तूं मरती । तोही अच्छा होता ॥ नहिं कहनेकी ॥२॥
जो चाहति यदुराज कांत तव । ज्ञानेश्वरगुरु दाता ॥ नहिं कहनेकी ॥३॥

१०४४ / ओवी

ऐकोनियां निजसखिवचना । हृदयीं भरली पावेशरचना ।
सिद्ध जाहली प्राणमोचना । आनंदघना आठवुनी ॥१॥
हास्यप्रौढी न जाणतां । नेणोनि सखिच्या परीक्षावाक्यार्था ।
अत्यंत होवोनि मदनतातार्ता । मरणवार्ता आंगीं प्रार्थी ॥२॥
<u>प्रारब्धभोग संपलियावीण । देहांतूनि न जाये प्राण ।</u>
<u>परी होतांचि विरह दारुण । ब्रह्माकाशांत तो विरे ॥३॥</u>
जैसी मेलियावीण पाहीं । मृतावस्था येतचि नाहीं ।
परी समाधि लावोनि योगियांही । शरीर तैसें करितां ये ॥४॥
तेवी राखोनि प्रारब्धभोगा । ब्रह्माकाशीं महायोगा ।
सिद्ध जाहली प्राणत्यागा । हरिवियोगानळबळें ॥५॥

१०४५

<u>योगातील षट्चक्र-भेदन</u>

जितेंची मरण साधावया नारी । धरी पूतनारी हृदयांत(१) ॥१॥
योगांची षट्चक्रें हरिआंगी भावी । प्रत्याहार(२) ठेवी तया स्थानीं ॥२॥
प्रथम(१) तें चक्र युगुल पाउलीं । स्थिर दशांगुळी केलें चित्त ॥३॥
द्वितीय(२) तें चक्र सुनीळ मांडिया । रूप यमुनेया सरिसें झाले ॥४॥
तृतीय(३) तें चक्र विष्णो नाभिस्थान । जाहला उत्पन्न ब्रह्मा जेथ ॥५॥
श्रीवत्सलांछन चवथें(४) साजीरें । जन्ममृत्युजरे नाशवी जें ॥६॥
पांचवें(५) तें जेथें नांदे वैजयंती । गोपिका घालिती मिठी जेथ ॥७॥
सहावें(६) तें चक्र हासतें वदन । लयाचें सदन प्रेमळां जे ॥८॥
तीन पळांमाजीं प्रत्यय सिद्धांचा । प्रत्याहारवाचा करी गोपी ॥९॥
पावोनी अंतरीं संयोग हा ऐसा । बाहेरी तो तैसा जाहला कीं ॥१०॥
म्हणोनी जीवंत पुन्हा गोपि वाटे । न चालतां वाटे मोक्ष हातीं ॥११॥
ज्ञानेश्वरप्रभुकन्याअनुभव । निवटाया भव वाखाणिला ॥१२॥



१०४६ / हिंदी

मुक्तमाला. रसालाभेद. रा.- परज. ता.- तेताला.

बेणू क्यूं न बजावे ॥ प्यारा ॥धृ॥
सगरि रयन मम बिरह जहर तें ।
तडफ तडफ जिया जावे ॥ प्यारा ॥ (य९उ.२४०)

१०४७ / हिंदी दोहा

आजतक तो जननिजनकका हता मुझे विश्वास ।
अब दुसरे घर आय परेसे हरिबिन जावत श्वास ॥ वेणू क्यूं न बजावे ॥१॥
अब त्यजके तनु शरण करूंगी ज्ञानेश्वरगुरुद्वार ।
तिनके उदर आयके जदुपति मिलावोंगि भरतार ॥ वेणू क्यूं न बजावे ॥२॥

१०४८ / हिंदी

सामकामदावृत्त. मूळ.- रा.-झिंझोटी. ता.- दादरा गौण.- पांडुरंग स्मर अभंग. या चालीवर

**श्रीकृष्णवचन -**

घरमों रहि लंगर बांधि मेरि प्यारि गोरी ।
पानि पिलानेकुं नहीं पास कोइ छोरी ॥ घरमों ॥धृ॥
मोकलि थी अतिथि तब कुलको करि चोरी ॥
वाके कारण आज मैं भूख प्यास छोरी ॥१॥
पुकारती लाल लाल करिके कर जोरी ॥
ज्ञानेश्वरचरण निकट बुद्धिमान दौरी ॥२॥

१०४९ / हिंदी

छविवृत्त. रा.- काफी. ता.- तेताला.

माई तेरे बालेनें मुरली बजाई ॥धृ॥
सोती थी मैं अपने पियसंग ॥ श्रवण मधुर धुनि आई ॥ माई तेरे ॥१॥
उस मुरलीकी सात ध्वनि दश ॥ नादको देत हटाई ॥ माई तेरे ॥२॥
ज्ञानेश्वरकी कन्या हूं मैं ॥ तोभि सुनत भुल जाई ॥ माई तेरे ॥३॥

१०५०

परिचारिकावृत्त. मूळ.-यमन. ता.- धुमाळी. गौण.- मम मनस सतत, या चालीवर.

किति चतुर तुझा नंदन नंदालिंगिते[1] ॥
करिं धरुनि कराम्बुज हृदय करि विकृति रितें ॥ किति ॥धृ॥
मन मदनमिश्रित परि अमदन करि पाउलें ।
यत्स्मरणें सुरवरमुनि स्वरुपा पावले ।

ते चिद्धन घनतनु हरि आम्हां फावले । यत्संग सुखानें प्रेमचि फोफावलें ।
जाहलें पुरत्रय लीलासुरसभरिते ॥ किति ॥१॥ (य९उ.२४१)
हा कपिलचि परि कपिलजेप्रती नवरिता ॥
वारुनी कपिलता दे आम्हा नवरिता ॥
यावांचुनि क्षणही नाहिं गडे भव रिता ॥
परि यातें धरितां सहजचि हा भव रिता ॥
यत्प्रीति वारिते षडरिदाहवारितें ॥ किति ॥२॥
मी कलिंदनंदिनिजीवन घेउनि घरीं ॥
येतांचि भेटला श्रीहरि मार्गावरी ॥
मम घटस्फोट करुनियां हृदय आवरी ॥
जलरहित बिंबमय सुमती याला वरी ॥
किं करूं मन बहू बहू परिहि सावरितें ॥ किति ॥३॥
असि मरणदानि या संवय कशी शिकविती ॥
परि नवलचि लीला वर्णीती सुकवि ती ॥
हरिविरहबाण शरीरांप्रति हो सुकविती ।
कुंजवनीं यांचे गडि आम्हां झकविती ॥
श्रीज्ञानेश्वरकन्या वरि कंसारितें[२] ॥ किति ॥४॥

(१.नंदांकस्थिते- पाठांतर २.कृष्णातें)

१०५१

परिचारिकावृत्त. मूळ.-यमन. ता.-धुमाळी गौण.- किति चतुर तुझा. या चालीवर.

मम मनस सतत पदिं रमलें यांच्या गडे ।
मी प्रौढहि असुनी झालें या सांगडें ॥ मम ॥धृ॥
श्रुतिकथित पथा बहु मुनिजन गेले जरी ।
हा श्रुतिविरहित परि गाती लीला तरी ॥
हे नवल वाटतें मला नंदसुंदरी ॥
यावांचुनि नाहीं चैन पळहि मंदिरीं ॥
मी येतें म्हणुनी घडिघडि तुम्हांकडे ॥ मम ॥१॥
जे गुण अवगुण बांधिति निजरूपा स्वयें ॥
याच्या संगतिं ते सद्गुण होती सये ।
जो मोह तामसी ज्याला मुनिजन भिये ।
तो यास अर्पिता शुद्धप्रेमधामिं ये ॥



या समचि जाहले याचे परि सौंगडे ॥ मम ॥२॥
जडजीव[*] जीव निज हरि हरि जड जड हरी ।
कांही न याचितां हा एवढि नड हरी ॥
नवविधा नवतनू दावी हा साजिरी ॥
नवविधाबळें आम्हीं हरिनवनोवरी ॥
श्रीज्ञानेश्वरस्मरणें बुद्धी नच अडे ॥ मम ॥३॥

(*पांच भेद सांगितले.)

१०५२ / हिंदी सखिवचन -

सुशीलावृत्त. रा.-जोगी. ता.-तेताला.

हरि तव खेलत जमुना तीर ॥धृ॥
प्यारी प्यारी मुखसों कहत है ॥ नयनन झरपत नीर ॥ हरि तव ॥१॥
प्रिया आवेगी कौन दिशा ते ॥ गगन उडावत चीर ॥ हरि तव ॥२॥
ज्ञानेश्वरकन्यका प्रेमका ॥ हरि-हिय लागा तीर ॥ हरि तव ॥३॥

१०५३ / हिंदी सखिप्रत -

सुशीलावृत्त. रा.-जोगी. ता.-तेताला.

माई तीव्र करो अनुराग ॥धृ॥
हरि की प्रिती बढी न बढाई । भावफूल भर बाग ॥ माई ॥१॥
जब तो प्रभु घर आवत है तब । देखत तेरो माग ॥ माई ॥२॥
जब बनमाही जात तब करत । सब बिखयनको त्याग ॥ माई ॥३॥
ज्ञानेश्वरबाला तुम हरिसों । किमपि न बोलहुं दाग ॥ माई ॥४॥

१०५४ / हिंदी गोपीवचन -

रंभावृत्त. रा. बसंत. ता.-तेताला.

न्यून नहीं बनमें प्रभु बासा ॥धृ॥
ये बंसी हमरि है नाथजी । अन्य बस्तुपर क्यौं तुम प्यासा ॥१॥
बंसरी मेरी छोर दियो अब । उमर तुम्हारी बरस भई बीसा ॥२॥
आजतक सोतेथे पानपें । अब तो बिछावोंगी मंचक खासा ॥३॥
मेर बंसी आप बनाओं । मम नाम निकारो मुख खासा ॥४॥
ज्ञानेश्वरबाला नंदलालको । होय विलासिनि करत बिलासा ॥५॥

१०५५

सामकामदावृत्त. मूळ- झिंझोटी. ता.- दादरा. गौण.- रत हरिपद. या चालीवर.

मुनिमनको बिखयगुणको मेरो कान्हबाई ।

तेरो घ्राण नीचे होत घगर भरत लाई ॥धृ॥
जिसपथ हरि बसत पथ वो काहे तूंहि जाई ।
मेरो कान्ह छोटो अभी जानत कछु नाहीं ॥१॥
मोको कहत सिख कियो तूं तो जात रंडा ॥
जायजाय कुंजगली कियो सुकुल भंडा ॥२॥
शामसुंदर सावलि तनु पकरो चित लाई ॥
ज्ञानेश्वरबाला तुम मेरो हरि जंवाई ॥३॥ **(य९उ.२४३)**

१०५६ / हिंदी

परस्पर गोपीवचन -

रा. जिल्हा. ता.- तेताला. मुक्तमालारसाला

फणिशायी पिया तो घर आये ॥धृ॥
शामलांग चारे भुजा देखत । कमलनयन मन भाये ॥१॥
दोहा - कुंडलिनी पुनिहृदय क्षिराब्धी कमलनयन हरि होय ॥
नेक नगारा अनुहत वाजे मिली अपनपनि सोय ॥ फणिशायी ॥२॥
अब तो चिंता छोर दीजियो ले ले हरिको नाम ॥
ज्ञानेश्वरप्रभुतात करेंगें कृपा शीसबिश्राम ॥ फणिशायी ॥३॥

१०५७

लावणीवृत्त. मूळ.-पूर्वी. ता.-धुमाळी गौण. नंदाच्या नंदना. या चालीवर.

शामतनू कोवळी । अधरि धरुनि सुखमुद्रा मुरली वाजवि अतितर बळी ॥
शामतनू कोवळी ॥धृ॥
प्रभु जो प्रेमळ कळवळी ॥
अथ नत-जन-भजन मन कर्षुनी अरितचरण दळवळी ॥१॥
श्रुतिपथ न चुकेच या ।
हरुनि कुमनमल विमलकमलमुख दावित मधुरा लया ॥२॥
रासरसान्वित जसा ॥
ज्ञानेश्वरप्रभुसंमति केला ब्रह्मीचा साजसा ॥ शामतनू ॥३॥

१०५८

इंदिरावृत्त. रा.-परज. ता.- तेताला.

किति मधुर वाजविसि पावा ॥धृ॥
नवल प्रभू येणें घडतें कीं । सोडुनियां पतिसेवा ॥१॥
सोडवुनी तूं कूल आमचें । घालिसि अधर्मी गोवा ॥२॥
ऐसी करणी तुझी गोविंदा । रुचेलना कीं देवा ॥३॥



मधु मुखिं हृदयी हलाहल तुझ्या ॥ कळलें मम मन भावा ॥४॥
मजसी जरि विवाह इच्छिसि तरि ॥ आठविं अलंदिदेवा ॥५॥(य९उ.२४४)

१०५९ / हिंदी

कुरंगाक्षीवृत्त. मूळ.- जोगी. ता.- तेताला. गौण.-हिंदुस्थानी खंजिरी भजनाचे चालीवर

प्यारे मेरे नाहिं मिले सब रात ॥धृ॥
डारा न मुझे कबभि अकेला । जबसे लाइ बरात ॥ प्यारे मेरे ॥१॥
मेरेबिन वो प्रभू अकेले । किसे करेंगें बात ॥ प्यारे मेरे ॥२॥
रहा देखते भंवर भई है । दहा करे शित वात ॥ प्यारे मेरे ॥३॥
दिनभर तो कचरिमें रहेंगे । बैठे जहं नंदतात ॥ प्यारे मेरे ॥४॥
ज्ञानेश्वरजामात बिना मम । अखियन लगत न पात ॥ प्यारे मेरे ॥५॥

१०६० कृष्णवचन

गौरकांतीवृत्त. मूळ.- जोगी. ता.- धुमाळी. गौण.- अझुनी कां बा नवतरसी, या चालीवर

विसरुं कसा मी विसरुं कसा । व्रजरमणींचा प्रेम ठसा ॥धृ॥
निर्गुणा मज चेववुनी मनीं । दिधला तनु धिंवसा ॥ विसरुं कसा ॥१॥
अंतर बाहेरि मजला धरिलें । त्यजुनि पति भरवंसा ॥ विसरुं कसा ॥२॥
रडता ज्यांचा असुवीं भिजतो । नित्य काय चिकसा ॥ विसरुं कसा ॥३॥
योगि वियोगी मजला स्मरती । हृदयीं प्रेम असा ॥ विसरुं कसा ॥४॥
अलकावतिपति बाला प्रेमळ । त्याविण पळ युगसा ॥ विसरुं कसा ॥५॥

१०६१ / हिंदी कृष्णवचन

सामनुष्टुपवृत्त. रा.- काफी. ता.- दीपचंदी.

परे क्यौं ब्रिजकी भुलाई ॥धृ॥
जाके दहिदुध माखन खायके । ये नील तनु मिलाई ॥ परे क्यौ ॥१॥
जाको एकान्त प्रदानके कारन । बनमो गय्या चराई ॥ परे क्यौ ॥२॥
दीन भुलूं तो दहिदुध सुमरत । रात भुलूं तो रास मिलाई ॥परे क्यौं ॥३॥
अलकावतिपतिबाला प्रेमल । सुत पतिगृह तज आई ॥ परे क्यौ ॥४॥

१०६२ / हिंदी कृष्णवचन

सामनुष्टुपवृत्त. रा.-बेहाग. ता.- तेताला

देरी मत करिजो ॥धृ॥ उधोजी ॥ (य९उ२४५)
जो होये तो हेतो सिखावहुं । नहिंतो वाके पाव पकरिजो ॥ देरी ॥१॥
जैसा मोको देखत तूं यहां । तैसा वाके हृदय निहरिजो ॥ देरी ॥२॥

संतचरनकी धूरि सीसपर । धरी भवविभव हरिजो ॥ देरी ॥३॥
अलकावतिपतिबाळा प्रेमल । तिनका भजन मग्ग बरिजो ॥ देरी ॥४॥

१०६३ / हिंदी

मुरली गीत

रसालावृत्त. रा.- सोरठ ता.- तेताला.

कान्हा ये मुरली न बजावो ॥धृ॥
सास हमारी गारि देत प्रभु । तुम अपने घर जावो ॥ कान्हा ये ॥१॥
कुल छुरायके चार लोकमें । प्रभु मोहे न लजावो ॥ कान्हा ये ॥२॥
ज्ञानेश्वर करुणाकर कहके । निजपग नख सुपुजावो ॥ कान्हा ये ॥३॥

१०६४

मुरलीरव

रसालावृत्त. रा.- खमाज. ता.- तेताला.

या मुरलिचा पुरे रव हा गे ॥धृ॥
पडतां श्रवणीं पळही नुमटे । अंतरीं भवदव हा गे । या मुरलिचा ॥१॥
इकडे वळतां मन मग होतो । कुलसदन विचव हा[1] गे ॥ या मुरलिचा ॥२॥
पति होतिल प्रभुज्ञानेश्वरपद । वर्णुनि विभव अहा गे ॥ या मुरलिचा ॥३॥

(१.हे अव्यय आहे)

१०६५ / हिंदी

कर्पूरिकावृत्त. रा.-हमीर. ता.- तेताला (राजविद्याधर)

रूप निहारो प्रभुजीको ॥धृ॥
जो मनमें रिपुभाव भरा है । मिट जावेगो सब जीको ॥ रूप निहारो ॥१॥
वृषभानुसुता जानि दयार्णव । मनो बिनोदन शिवजीको ॥ रूप निहारो ॥२॥
अलकावतिजीवन नंदिनिके । सुनि वै वारो अरजीको ॥ रूप निहारो ॥३॥

१०६६ / हिंदी

रंभावृत्त. रा.- देस. ता.-तेताला (राजविद्याधर)

ये इक मो मन अचरज आवे ॥धृ॥
निगम न गाई सके गुण जिनके । सो जसुमतिको मंग मंग खावे ॥१॥
तपसु तपत मुनिगन जिन कारन । सो कूंजनमें युवति बुलावे ॥२॥
ज्ञानेश्वरगुरुचरणकृपा एक । प्रेमल मनमों शाम मिलावे ॥३॥(य९उ२४६)

१०६७ / मालिनी

निबिड हरि वनीं या धावती सर्व गोपी ।



विरह-दहन-दुःखी रक्षिता त्यां न कोपि ॥
तुजविण करुणाब्धे कोण सांभाळिताहे ।
झडकरि हरि आतां दृष्टि कारुण्य पाहे ॥१॥

१०६८ गोपीवचन

सानुष्टपवृत्त. मूळ.- जोगी. ता.- तेताला. गौण.-मेरे भरोसे. चा चालीवर

कधिं कोणि सांगा । आणुनि हरिला भेटवील काय ॥धृ॥
पाहुनि पाहुनि वाटहि थकले । सये वाणी मन काय ॥ कधिं ॥१॥
आम्हिं असों परि रडत दिवसनिशिं । त्याचि यशोदामाय ॥ कधिं ॥२॥
येइल काह्या सोडुनि बाई । जनिदा देवकि माय ॥ कधिं ॥३॥
वदनीं साखर घालिन साजणी । जो निरुपील उपाय ॥कधिं ॥४॥
भरंवशाचे एकचि दिसती । ज्ञानेश्वरगुरुपाय ॥ कधिं ॥५॥

१०६९ / संस्कृत श्लोक

इत्येता गोपिकाः सर्वाः प्रार्थयित्वा हरिप्रियम् ।
कृष्णमेवानुगायन्त्यो यमुनायास्तटम् ययुः ॥

१०७० / अभंग

*स्वस्मिन्नेव परस्परानुभावेन गोपीनां भाषणमाह :-*

गोपीवचन

मज वाटे नेणे उद्धव सगुण । दावितो निर्गुण वटवट ॥१॥
सगुण भक्तीची आह्मातें ओळख । सत्संगाचे सुख पूर्ण जाणों ॥२॥
पाहोनियां संत प्रेम जया न ये । त्या नाहीं प्रत्यय सगुणाचा ॥३॥
पुसतां हरीला धरीयलें मौन । नाहींत हे चिन्ह प्रेमळांचे ॥४॥
ज्ञानेश्वरबाळा पूर्ण चहूंकडे । ओसंडे रोकडें कृष्णप्रेम ॥५॥

१०७१ / द्वितीया बाला उवाच -

लावणीवृत्त. मूळ.-पूर्वी. ता.-धुमाळी. गौण. - नंदाच्या नंदना. या चालीवर.

कितिकहि साधन करा ।
परि हरिकरुणेवीण न भेटे भक्तिसुखाचा झरा ॥धृ॥
तो जाणत साजिरा ।
ज्याचा देह श्रीहरिसाठी झुरझुरुनी पांजरा । कितिकहि ॥१॥
साधुनि योगहि पुरा । (य९उ.२४७)
याच देहि दवडिली जयानी जन्म मरण आणि जरा ॥ कितिकहि ॥२॥
पिउनि सत्रावी निरा । पुष्ट न होती अननुभविता प्रेमनयनगत निरा ॥३॥
ज्ञानेश्वरगुरु खरा । सोडुनि भेटल कैसा हरि तो विषयविवशमति खरा ॥४॥

१०७२ तृतीया बाला उवाच -

अग्नि जळासंगे राहिल्यावांचोन । न होय पक्वान्न मृदुतर ॥१॥
तैसें विरहाग्नि आणि प्रेमजळ । वांचोनी निर्मळ चित्त नोहे ॥२॥
पाक होतांक्षणी अग्निजळनाद । भुक्भुकादि शब्द उठताती ॥३॥
तैसी भक्तिपाकीं रामकृष्ण हरी । येती वाचेवरी अनुक्षण ॥४॥
गोपाळ गोविंद जिवाचा सोयरा । सासर माहेरा तुटी नाहीं ॥५॥
गडे ऐसी कळेना जों प्रेमखुण । तंव स्तब्धपण ज्ञानियासी ॥६॥
नरनारी सारे देखिलिया देव । मग द्वैतभाव कासयाचा ॥७॥
बोलणें चालणें गोविंदाचा खेळ । मौन हें किडाळ कोण धरी ॥८॥
समाधीसुखासी नाहीं अधिकता । राधाकृष्णकथा ऐकोनीयां ॥९॥
ज्ञानेश्वरकन्या प्रेमरंगी रक्त । नाहीं गर्वासक्त बुद्धि ज्यांची ॥१०॥

१०७३ अन्या उवाच -

सुशीलावृत्त. रा.- भीमपलासी. ता.-तेताला.

बाई सुलभ न भक्ति उपाय ॥धृ॥
साधूसंगतिं कळतो जैसा । तेविं न जाळुनि काय ॥१॥
मन होयेना हरि तरि हरिला । जवळी ठेवुनि काय ॥२॥
बालवती प्रतिकूल वेदना । वंध्या जाणिल काय ॥३॥
भगवत्प्रीतीदायक आम्हां । अलकावतिपतिपाय ॥४॥

१०७४ पुनरन्योवाच -

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- पिलु. ता.-धुमाळी. गौण.- नृपममता. या चालीवर.

सई कांहिं असो कवणाचें । ठेवा दृढ प्रेम मनाचे ॥धृ॥
या जगतिं सकल भव नाचे । जन अंकित सुत भवनाचे ॥१॥
जीवन सद्गुरुचरणाचें । भय हरितें जनिमरणाचे ॥२॥ **(य९उ.२४८)**
हरिप्रेमीं जो नव नाचे । त्या काम किमपि न वनाचे ॥३॥
हें भाग्यचि त्या सदयाचें । ज्ञानेश्वरनृप हृदयाचे ॥४॥

१०७५ / हिंदी

रसालावृत्त. रा.- देस.- ता.-तेताला.(राजविद्याधर)

उद्धव चरण चारु मन लागे ॥धृ॥
तज चिंतामणि कांच कि कारण । कौन जनपद न भागे ॥ उद्धव ॥१॥
रासरचनहेतु रातदिन हम । जदुबरसंगति जागे ॥ उद्धव ॥२॥
अलकावतिपतिनंदिनिबिनती । सुनि कूंजन अनुरागे ॥ उद्धव ॥३॥



१०७६ / हिंदी-मराठी

जयावृत्त. मूळ.- झिंझोटी. ता.- दादरा (यतिलग्न) गौण.-पांडुरंगस्मर. या चालीवर मोहरी

मधुकर तुम हमरे गृह आजसूं न आना ।
जावुनियां मथुरापुरिं यूवति पहाना ॥धृ॥
काजहेत तज बिलाज चरन नहीं छिना ।
कपट तुझें ओळखुनी न फसुं आम्हि दीना ॥१॥
देख कमल अपर हमे फेरी न मिलाना ।
ज्ञानेश्वरनंदिनीमति श्रवण सुगुण गाना ॥२॥

१०७७ उद्धव वचन -

तो परमात्मा निर्विकार । जो सच्चिदानंद निगम सार ।
त्यास तुम्हीं लावोनी विकार । निजभ्रतारसम देखता ॥१॥

१०७८ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. रा. मुलतानी. ता.-तेताला (राजविद्याधर)

यहि हेतू किह भेजो तोहे ॥धृ॥
तजि सुधारस भोजनकारन । कौन मूढ श्रमि सोहे ॥१॥
कहकह उद्धव ब्रह्मरूप तूं । बिन सगुण किधों लोहे[1] ॥२॥
लेतहि नाम पदारथको नहिं । शान्तिक्षुधा कब लाहे ॥३॥
श्रीअलकावतिपतिनंदिनि तो । शामचरण एक चाहे ॥४॥ (य९उ.२४९)

(१.लोभ पावे)

१०७९ / संस्कृत. उद्धववचन -

परेशो यः सर्वसाक्षि यो गुणैर्नहि सज्जते ।
ज्ञात्वा तं सगुणाकारं प्रपतन्तिहि योगिनः ॥१॥

१०८० / हिंदी-मराठी

विशाखावृत्त. रा.-यमन. ता.- तेताला.

वटवट पुढति नको तुझि ही ॥धृ॥
नाहिं असें तूं सांगसि कानीं । बिन अनुभव शिष्णको ॥ वटवट ॥१॥
सगुणसुखाविण ज्ञान आमुची । विषसम बुद्धि लिखो ॥ वटवट ॥२॥
मुरलि मनोहर मधुर गान करि । जाणे श्रुतिविण को ॥ वटवट ॥३॥
ज्ञानेश्वरनंदिनि या नव्हती । भजन विना किनको ॥ वटवट ॥४॥

१०८१ हिंदी / गोपीवचन उद्धवं प्रति -

सुशीलावृत्त. रा.- बेहाग ता.- तेताला.

किह बिधि सुनिये याकी बात ॥धृ॥
निर्गुण निर्विकार बचननतें । हृदय रसहि जरि जात । किह बिधि ॥१॥
प्रभुपद मधुर बिना जो गावे । ताकुं चढयो है बात ॥ किह बिधि ॥२॥
हमरो एकहि सबको पालक । ज्ञानेश्वरगुरुतात ॥ किह बिधि ॥३॥

१०८२

सामनुष्टुप रा.- यमन. ता.- तेताला.

माघारा सरसर ॥ उद्धवा ॥धृ॥
सोड म्हणसि जें बळें आम्हांला । तें तूंचि विसर ॥ माघारा ॥१॥
विसरलासी म्हणुनिचि वदसी । जें शब्दाहूनि पर ॥ माघारा ॥२॥
श्रीज्ञानेश्वरगुरुकरुणेनें । प्रभु दिसती घर घर ॥ माघारा ॥३॥

१०८३ / गोपीवचन उद्धवं प्रति -

विशाखावृत्त. रा.- यमन. ता.-तेताला.

सुलभु न ब्रह्मपणा ॥ भाउजी ॥धृ॥
आम्हां शिष्या समजुनि म्हणतां । सद्गुरू आपणा ॥ भाउजी ॥१॥
ब्रह्म होउनी झोंप तुटेना । परि नामचि न म्हणा । भाउजी ॥२॥
सगुण भजुनि आपण तें व्हावें । ह्या ज्ञानेशखुणा ॥ भाउजी ॥३॥

१०८४ यशोदावचन -

कनकरेखा वृत्त. मूळ.- झिंझोटी. ता.- तेताला. गौण. प्रतिकुल होइल कैसा, या चालीवर

सांगतें मी कृष्णा तुजला मंदिरींच खेळें । (य९उ.२५०)
धुंडताति गोकुळिया बागुलेंहि मेळे ॥ सांगतें ॥धृ॥
काढुनियां नेइल कोणी कुंडलाणि बाळी ।
जाहल्याति चावट बहुधा गौळियांच्या बाळी ॥ सांगतें ॥१॥
आळंदीचा राणा तान्हा मानुनियां गोपी ।
जन्मानंतसुकृतानें मुक्ति केलि सोपी ॥ सांगतें मी ॥२॥

१०८५

गोपी-गाऱ्हाणे

वासंतीवृत्त. रा.-बेहाग. ता.-तेताला.

थोडी तंव वरी चाल ॥ यशोदे ॥धृ॥
गेला तव सुत धीटपणानें । घालुनि दुग्धीं गुलाल ॥ थोडी तंव ॥१॥
आवडती तुज चाळे याचे । बुझविसि म्हणुनि लाल ॥ थोडी तंव ॥२॥



आम्हीं जाऊं सोडुनि मग हा । तुमचा सकल महाल ॥ थोडी तंव ॥३॥
अलकावतिपतिनंदिनि शिणल्या । पावुनि हरिकृत हाल ॥ थोडी तंव ॥४॥

१०८६ / हिंदी उद्धवप्रति गोपीवचन -

वासंतीवृत्त.रा. तोडी. ता.-तेताला. राजविद्याधर

शामबिन गोकुल प्रेतसमान ॥धृ॥
जाते थे प्रभु वृंदावन जब । तब नवत तरुकमान ॥ शामबिन ॥१॥
गोकुल थे तब लों नहिं बूझे । व्रजजन करि अभिमान ॥ शामबिन ॥२॥
हालाहलजल जमुनाजीको । कीन्हो अमृत समान ॥ शामबिन ॥३॥
व्रजयुवती अति व्याकुल मति भइ । छोरि मोह मद मान ॥ शामबिन ॥४॥
अलकावतिपतिनंदिनि राखत । कृष्णचरणनखमान ॥ शामबिन ॥५॥

१०८७ / भगवद्वचन यशोदेप्रत.

सामकामदावृत्त. मूळ- बेहाग. ता- दादरा, यतिलग्न. गौण- पांडुरंगस्मर अभंग. या चालीवर.

दुध देइं माते मज भूक लागली । धेनुचरणिं करुनी श्रम तनू भागली ॥धृ॥
माय म्हणे नसे दूध बाळ येधवां । जननी तें असतें तरि सांग केधवा? ॥१॥
रात्रिं दूध येइल हें वचन ऐकुनी । देव म्हणे झालि रात्र नेत्र झांकुनी ॥२॥
देइं म्हणुनि ओढि पदरमायखांदिचा । धन्यभाग्य पुत्र पोटिं सौख्यसंधिचा ॥३॥
अलकावतिपतिनंदिनि पाहुनी लिळा । चाल सखीयांस म्हणे होऊं प्रेमळा॥४॥
(य९उ.२५१)

१०८८ / हिंदी / गजल

भ्रमरगीतांतील गोपीवचन

पटलालवंगीभेद मूळ.- जिल्हा. ता.-गजल. गौण. मेंदीमलके या चालीवर.मोहरी -

अबे चल दिवाने क्या गरज तेरी हमे परी ॥धृ॥
ले मटका दधिका सिरऊपर । जातिहुं कंसपुरी ॥ अबे चल ॥१॥
निजसम चावट युवति गोकुळीं । पाहुनि घे दुसरी ॥ अबे चल ॥२॥
अलंदिवल्लभ तात हमारे । देवेंगे पीठ छरी ॥ अबे चल ॥३॥

१०८९ / यशोदाप्रति गोपीवचन

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- भूप. ता.-तेताला. गौण.- पहा पहा सावळा.या चालीवर

उत्सव समयीचे उद्गार.

मामी पोर केवढें नटधारी । उभे राहोनी इंद्रियांचे द्वारी ।
भोग दवडीले अविद्येच्या पारी । केल्या हस्तगत गोकुळींच्या नारी ॥धृ॥

एक याचे नाट्य जगा पाडीं । एक नाट्य आम्हां ब्रह्मी ओढी ।
दोहीं नाट्यांची अविरुद्ध गोडी । तटस्थता स्वरूपीं नव्हे बेडी ॥१॥
जन्म याचा हृदयांतुनी झाला । स्तनावांचोनी प्रेमदुग्ध प्याला ।
मुखावांचोनी वेद ओसणला । पायावांचुनी सर्वाठायी आला ॥२॥
आम्हा सद्गुरू आळंदीचा राणा । तेणें करी आला यशोदेचा तान्हा ।
मुख अर्पुनी नित्य गुणगाना । केली साक्षिभास्य सर्वहि प्रमाणा ॥४॥

## १०९० / गोपींचा पश्चात्ताप

श्रीमतीवृत्त. रा.- यमन. ता.- दीपचंदी.

गाऱ्हाणें सांगूनि काय ॥धृ॥
केलें आपण या देवाचें । अंतरवीले पाय ॥१॥
सुत पाठवुनी एकटि बसले । असुनि यशोदा माय ॥२॥
आतां जाउनि वरु परि कीजे । ज्ञानेश्वरवधुमाय ॥३॥ (य९उ.२५२)

पाळणा

## १०९१

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-सारंग.ता.-धुमाळी. गौण.कुणीकडे तुम्ही या चालीवर उत्सव समयीचें.

महाराज नंदनंदना, नंदना शाममूर्ति ।
नित्य गाताति निगम कीर्ती ॥ नंदनंदना ॥धृ॥
महाराज जगज्जन्मादि, जन्मादी तुजमाजी, परि न येसि तूं तत्समाजीं ।
विनंती परी, ऐकुनियां माझी, प्रकट व्हा प्रीतिवृत्तिमाजी ।
पाळणा मग, चेतनमय स्फूर्ति ॥ नित्य गाताति ॥१॥
महाराज चित्तसाम्यता, साम्यता सत्व म्हणुनी । प्रथमरूप हें शुक्लवर्णी ।
नेत्रगोचर, गोचर तीव्र गणुनी, नयनसाम्यता नीलवर्णी ।
इतर वृत्ति त्या सहज विरती ॥ नित्य गाताति ॥२॥
महाराज सृष्टिकार्यार्थ, कार्यार्थ मथुरेचा, प्रेमवृद्ध्यर्थ गोकुळींचा ।
भाव हा तुझा, तुझा मुख्य साचा, मोडुनि दहरभूपणाचा ।
पुढें जें उरे, सगुण तेथ सूरती[1] ॥ नित्य गाताति ॥३॥
महाराज हृदयीं सदा, सदाचि व्रजराणा, मस्तकीं अलकावतिराणा ।
कोण पाहतो, पाहतो जी अनुमाना, जिथें रीघ न स्वर्विमाना ।
आवडी जडो, ज्ञानेश्वरीं पुरती ॥ नित्य गाताति ॥४॥ *(१. सम्यक् रती)*

पाळणा





## १०९२

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- यमन. ता.- धुमाळी. गौण.- कुणीकडे तुम्ही. या चालीवर उत्सव समयींचे.

जो जो जो जो जो जो भगवंता ।
सत्यविज्ञानसुखाऽनंता ॥ जो जो जो जो ॥धृ॥
करुणावंत, वंत अती जो का । घेउनि प्रभु आपण झोका ॥
आम्हांला देतो, शीत पवन निका, नेणें वेदरूप जें का ॥
तया निजमनें, ध्यातों श्रीकान्ता । सत्यविज्ञान०॥१॥
महाराज सजाति प्रेमा, प्रेमा तव मूर्ती, तवाधिष्ठान गुरू कीर्ती ॥
महाराज मनीं भासती, भासती मधुरवृत्ति, तीव्र ती नयनाग्रीं दीप्ति ॥
(य९उ२५३) कळें हें स्वयें, स्वयें गुह्य संता ॥ सत्यविज्ञान०॥२॥
महाराज सांख्ययोगांही, योगांहि सत्यबोध, कळे चैतन्य वेदसिद्ध ।
मुख्य साहित्य, साहित्य आनंद, मिळुनि भक्ति सच्चिदानंद ॥
आळंदीपते, पते कृपावंता ॥ सत्यविज्ञान०॥३॥

## १०९३ / गोपीवचन

विशाखावृत्त. रा.- भीमपलासी. ता.- तेताला.

कोणें नेलि दया ॥ तुझि प्रभु ॥धृ॥
किंवा आमुच्याचि भयें गेले । ईश्वरपण विलया ॥ तुझि प्रभु ॥१॥
जगपालक असुनीयां त्यजिलें । वनितांना वनि या ॥ तुझि प्रभु ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या त्या रडती । हिंपुटि होउनियां ॥ तुझि प्रभु ॥३॥

## १०९४ / आर्या

एक म्हणे तूं कां गे व्यर्थचि या श्रीहरीस अनुसरली ॥
सोडुनि भवविभवाला कां तंव मति वेणुच्या रवें भरली ॥१॥

## १०९५ / आर्या

हा कपटी जन्माचा ओळखिला बाइ पूर्ण आजवरी ॥
परंतु फसतों पुढती ठेवुनि विश्वास व्यर्थ याजवरी ॥२॥

## १०९६ / आर्या

आम्हां टाकुनि हरि हा झाला वश मुरलिच्या कसा नादीं ॥
मोही सुरनर मुनिजन पशुपक्षी सारिका ससाणादी ॥३॥

## १०९७ / आर्या

याच्या मुरलीनादें सोडुनि सुरसदन अप्सरा जाती ।
येती मग आम्हि कुठें चुकतों परि याचिया परी जाती ॥४॥

भ्रमरगीत

### १०९८ / गोपीवचन भ्रमराप्रत -

रमावृत्त. रा.- सोरठ. ता.- तेताला.

मधु हा दिननिशिं सेवि नवें ॥धृ॥
तप करुनी मुनि किति मनिं श्रमती । परि नच येति सवें ॥ मधु हा ॥१॥
मधुपपरी कमळांना ओढी । मोहुनि मुरलिरवें ॥ मधु हा ॥२॥
ज्ञानेश्वरकरुणेवाचुनियां । कवणा कधि न पवे ॥ मधु हा ॥३॥

### १०९९ / गोपीवचन -

रमावृत्त. रा. खमाज. ता.- तेताला.

उगिच नको ग, उगिच नको ॥धृ॥
दोष हरीला देउनि पुढती । मायाफळ न पिको ॥१॥ (य९उ२५४)
त्यजिलें म्हणुनि सावध होउनि । गर्वचि सर्व सुको ॥ उगिच नको ॥२॥
अलकावतिपतिकरुणेनें हा । काम समस्त चुको ॥ उगिच नको ॥३॥

### ११००

रमावृत्त. रा.- असावरी. ता.- तेताला.

आता अंत नका पाहूं ॥धृ॥
तुमच्यासाठीं त्यजिले स्वामी । जनि जनक भाऊ ॥ आतां ॥१॥
हृदयिं प्रेमपक्वान्नें कवणा । घालवें जेवूं ॥ आतां ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या पदरीं घ्या । रेवतिपतिभाऊ ॥ आतां ॥३॥

### ११०१ / आर्या

गेलों असतों मरुनी परि चरणीं गुंतलें सख्या चित्त ।
पुढती न मिळां तुम्हीं दिधलें जरि श्राद्धिंहि सुतीं[१] वित्त ॥४॥ (१.मुलांनी)

### ११०२ / ओवी

ज्याच्या पोटीं असती नंदन । ते इच्छा पुरविती प्रेतक्रिया करून ।
परी तूं कर्मजन्य न होशी भगवान । यालागी जीवित नयन इच्छिती पाहूं ॥

### ११०३ / गोपीवचन

रमावृत्त. रा.- असावरी. ता.- तेताला.

चुकलों आम्हिं स्वयें ॥ प्रभुजी ॥धृ॥
परि पुरुषानें स्त्रीबोलाची । सुस्मृति ठेउं नये ॥ प्रभुजी ॥१॥
आजवरी हें नव्हतें केव्हां । दृष्ट श्रुतहि सये ॥ प्रभुजी ॥२॥
अलकावतिपतिनंदिनि बाहति । भवच्चरणिं हृदयें[२] ॥ प्रभुजी ॥३॥



(२. अंतःकरणें तुमचे पायी आहेत असा भाव)

## गोपी गीत

(मराठी अनुवाद / गोपीगीताच्या प्रथम श्लोकाधारें. )

### ११०४ / गोपीवचन

सामकादावृत्त. मूळ.- झिंझोटी ता.- दादरा. गौण.- पांडुरंग स्मर अभंग. या चालीवर

आमुचेंच कोण पाप पावलें फळ ।
तुमच्या जनिपासुनियां सौख्य गोकुळा ॥ आमुचेंच ॥धृ॥
जन्मतांचि गोपसदनिं आलि इंदिरा ।
कां त्यजिले गोपिच्याचि नयन मंदिरा ॥१॥
सगुण तनू धरुनि विश्व सुभरिलें श्रिया ।
आम्हिंहि तुमच्याचि, पाय दाखवा प्रिया ॥२॥
श्रमित बहू धुंडित वनिं विरह साहुनी ।
विनवितसों तुमच्या पदिं प्राण वाहुनी ॥३॥
अलकावतिपतिनंदिनि युवति जन रडे ।
गळुनि गळुनि सलिल होति नयन कोरडें ॥४॥ (य९उ.२५५)

### ११०५

गोपीगीत

गोपीगीताच्या दुसऱ्या श्लोकाच्या आधारें.श्लोक

तूं वाजवूनि मुरली करुणार्द्रसिंधू ।
ओढोनि चित्त आमुचें परमार्तबंधू ॥
लावोनि आस मनसीं अति गोपनाथा ।
आतां किमर्थ वधिसी रमणी अनाथा ॥१॥

### ११०६

सामनुष्टपवृत्त. मूळ.- सारंग. ता.- धुमाळी गौण.- कुणीकडे तुम्ही या चालीवर

महाराज देखिली तनू । तनु गोजिरवाणी ।
स्तविति ज्या निगम दिव्यवाणी ॥ देखिली तनू ॥धृ॥
महाराज जगा पूर्वीं या पूर्वीं या एक होतें । इच्छिते झाले स्वयें हो ते ।
ईक्षणेचि त्या । सृजिलीं भूतें, पृथ्वी पासुनि गगनान्ते अनध्यस्त तें ।
विवर्त ज्ञानखाणी । स्तविति ज्या०॥१॥
महाराज अकारांतुनी होय ब्रह्मा । उकार वाच्यता मेघश्यामा ।

मकारात्मका, आत्मका गूणधामा । शशिशेखर शिव परनामा ॥
मकारात्मका, मिळोनी तीन्ही । हा शार्ङ्गपाणी । स्तविति ज्या०॥२॥
महाराज यशोदापुण्य, पुण्यतरू फळला । तपें जो नाहिं मुनिस कळला ।
तोचि हा उदरीं, उदरिं स्वयें आला । मधुरद गोपिकांस झाला ।
महाराज उघडो दृष्टि, दृष्टि कृपादानी । स्तविति ज्या०॥३॥
महाराज भ्रमरगुंफेंत, गुंफेत मुख्य जो कां, यशोदा देत त्यास झोका ।
आम्हि सर्वही, सर्वही गोपीका, जाहलों यत्स्तवनीं पीका ।
ज्ञानदेवाचा, देवाचा शिरीं पाणी । स्तविती ज्या ॥४॥

पाळणा

११०७

सामनुष्टपवृत्त. मूळ.- सारंग. ता.- धुमाळी गौण.- कुणीकडे तुम्ही या चालीवर

अग सखे, चला गडे आजी, आजि आपण जाऊं,
सावळी तनू नयनि पाहूं ॥ चला गडे ॥धृ॥
कमळिचें गुह्य, गुह्य सर्व ठायीं, पंकुळी उघडुनियां पाहीं ॥
आंत बाहेरी, बाहेरि आन नाही, कोंदल्या सुखें दिशा दाही ॥ (य९उ.२५६)
सवें अवतरला शेष भाऊ ॥ सावळी तनू ॥१॥
अग सखे बरें जाहलें, जाहलें झालों नारी, आधि आपणचि जाउं द्वारी ॥
प्रवेशूं तेथें, जेथ पूतनारी, हालवि माय धरुनि दोरी ॥
पुरुष गर्वाचे, गर्वाचे अंगणिं राहूं ॥ सावळी तनू ॥२॥
अग सखे नका भिउं चित्तीं, चित्तिं आणिक कवणा ।
म्हणति वेद हा जाणपणा, अनुकुळ आहाती ॥
आहाती या आपणा, प्रभु आळंदीचा राणा ॥
तयाच्या पायीं, तनुमन हें वाहूं ॥ सावळी तनू ॥३॥

११०८ / हिंदी

सुशीलावृत्त. रा.- गौडसारंग. ता.- तेताला.

सखि आजु देख्यो सुनयन लाल ॥धृ॥
पूजत जिन्ह सुरवर मुनि तापसि । लैकर तुलसी माल ॥ सखि ॥१॥
चरण पीयुखहि जानि उमावर । दियो सलिलतलभाल ॥ सखि ॥२॥
अलकावतिपतिनंदिनिबिनती । डारूंगी गले माल ॥ सखि ॥३॥

११०९ / हिंदी



रमावृत्त. रा.- धनासरी. ता.- तेताला. (राजविद्याधर) गोपीवचन -

शाम कहीं न गयो ॥ सजनी ॥धृ॥
अपनने अपने तनुमनके । भाव समेन दियो ॥ सजनी ॥१॥
अल्प कि सेवा कीनि न कीनी । तौं फल मांगलियो ॥ सजनी ॥२॥
दारूण मानगुमानको करिकरि । अब पछताय पयो ॥ सजनी ॥३॥
आवतथे दधि लेन सदन मह । डह डह बोलि रह्यो ॥ सजनी ॥४॥
ज्ञानेश्वरपग पकरनतें प्रभु । हियते प्रकट भयो ॥ सजनी ॥५॥

१११० / श्लोक

येवो न येवो व्रजपाळ येथें । चित्ता करीं वास मुकुंद जेथें ॥
आत्माचि होवोनि निकुंजवासी । देईल आनंदहि आपणासी ॥१॥

११११

सुशीलावृत्त. रा.- यमन ता- तेताला. उत्सव समयीचे बोल.गोपीवचन -

हाचि दृढ विश्वास ॥ प्रभु मज ॥धृ॥
रुचल तुम्हाला तेथें वसिजे । स्मरुनि तरी आम्हांस ॥ प्रभु ॥१॥
आम्ही गोपी चरण स्मरुनी । शोभवुं श्वासोच्छ्वास ॥ प्रभु ॥२॥ (य९उ.२५७)
ज्ञानेश्वरपदकरुणा जननी । कोणा न करी उदास ॥ प्रभु ॥३॥

१११२ । दोहा

इति चिंतन निरखूनि हरी निगमगीत सुखसार ।
बहिरंतर व्यापूनि दिसे गृहितप्रीतिसत्कार ॥१॥

१११३ / हिंदी

विशाखावृत्त. रा.-काफी. ता.- तेताला.गोपीवचन -

लाज लई मेरी ॥ शाम तुम ॥धृ॥
मैं अपने घर बैठि अकेली । मुरलि नहक टेरी ॥ शाम तुम ॥१॥
मनमों पेखि अवल सूध तुम्हे । तातें फासी परी ॥ शाम तुम ॥२॥
गावत वेद सो झूठ भया आज । राग तुम्ह न व्हैरी ॥ शाम तुम ॥३॥
अलकावतिपतिचरण निकट अब । बात कहूं सारी ॥ शाम तुम ॥४॥

१११४ / हिंदी

विशोकावृत्त. रा.- तोडी. ता.-तेताला राजविद्याधर. यशोदावचन -

को मेरे लालाको देत दही ॥धृ॥
जबसों प्यारे गे मथुराबिच । ब्रजकी याद गई ॥ को मेरे ॥१॥
लाल लाल हे बाल पुकारत । असुअन बुद्धि बही ॥ को मेरे ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या पियबिरहतें । बावरि जननि भई ॥ को मेरे ॥३॥

१११५ / हिंदी

तुंगभद्रावृत्त. रा.- वसंत. ता.- तेताला. राजविद्याधर. मुरलीप्रति गोपीवचन -

आपन क्यौंकर देना गारी । वह भुगती निज सुकृत बिचारी ॥धृ॥
मुरलि एकपग ठाडि रहिरहि । तप करिकरि सबदिन तनु जारी ॥१॥
शतशत समयमें आगि सुलाखत । तौं नहिं डरिये न प्रेम डारी ॥२॥
तबही यदुपति अधर लगावत । गावत छनछन सकल बिसारी ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या तुम हरि भजि । होउं सतत प्रभु सुखअधिकारी ॥४॥

१११६

सुशीलावृत्त. रा.-सारंग ताल- तेताला. (राजविद्याधर) गोपाल वचन -

तुज आम्हिं पुसतों सखया सांग ॥धृ॥ (य९उ.२५८)
वदन तुझें कोमाविलें कसे । बोलसि ना हरि चांग ॥ तुज आम्हि ॥१॥
नेणत तुजसी भलतें बोलुनि । कुटिलें कोमल आंग ॥ तुज आम्हि ॥२॥
असशिल जरि तूं स्वामि भुकेला । अर्पु सिदोऱ्या सांग ॥ तुज आम्हि ॥३॥
ज्ञानेश्वरकरुणे आम्हांवरि । तूझी दृष्टि अपांग ॥ तुज आम्हिं ॥४॥

१११७ / हिंदी

सुशीलावृत्त. रा.- सारंग ता.- तेताला. गोपालवचन -

करिये न कान्ह बिचार ॥ जदुबर ॥धृ॥
दीनदयालू लेव आज तुम, मोरा सबही अचार[१] ॥ जदुबर ॥१॥
सूखी रूखी रोटी हमारी । लेवो नमकिन सार ॥ जदुबर ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणाबलतें । सेवहुं दीन उदार ॥३॥ *(१.लोणचें, रायतें.)*

१११८ / हिंदी

रसालावृत्त. रा.- भीमपलासी ता.- तेताला राजविद्याधर. गोपीवचन उद्धवप्रति -

ऊधो ये थी मनमों आसा ॥धृ॥
छोरी मंदर मंचक गादी । छोरि बिछायनि बासा[२] ॥ऊधो ॥२॥
अब तो जीकी सबहि टेक गई । भे प्रभु कुबजनिवासा ॥ऊधो ॥२॥
कीं भुलजाऊं या तनमनको । पियसंग करत बिलासा ॥ ऊधो ॥३॥
ज्ञानेश्वरकरुणा तुम तोभी । फिर कि रचावहुं रासा ॥ ऊधो ॥४॥ *(२.वस्त्रा)*

१११९ / हिंदी

संदीपनीवृत्त. रा.- यमनकल्याण. ता.- तेताला (राजविद्याधर)

माई याको कौन करूंरी उपाय ॥धृ॥
सोती थी मैं अपने पियासंग । रारिकरत तहं आय ॥ माई ॥१॥



लै लै दहि अपने मुख डारत । चढि शिशु शिस धरि पाय ॥ माई ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या कुलिना हम । बरन चहति ब्रजराय ॥३॥ (य९उ.२५९)

११२० / हिंदी / गोपीवचन उद्धवप्रति

सुवासिनी (रसालाभेद) रा.-बागेश्री. ता.-तेताला (राजविद्याधर)

ऊधो छूटत नाहिंन आसा ॥धृ॥
भटकत भौंरे दिलचाहत तहं । फुल परे बिनु बासा ॥ ऊधो ॥१॥
दोहा - जिन पग कारन धन नंदन तजि, तपसि भये बनबासा ।
आय पवन घन लेहि गयो दुर, चायक रहि गइ प्याला ॥ ऊधो ॥२॥
दिन रजनीं जिय जरत बिरहतें तदपि न दलतहि आसा ।
कहुं जाके ज्ञानेश्वरप्रभुको सुखसे करहुं बिलासा ॥ ऊधो ॥३॥

११२१

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-यमन. ता.- तेताला. गौण.- चक्रि भंवरा विटीदांडु, या चालीवर

तूं जेविं रे सगुणा यशोदाबाळा ॥धृ॥
आधीं माझा घेईं ग्रास । स्वामी गोपिकानिवास ॥ विश्वपाळा ॥१॥
माझी सुंदर पुरणपोळी । आधी घेईं वनमाळी । नवनित गोळा ॥२॥
माझी मधुर साखरपुरी । झडकरि वदनीं कवळूं भरी । चारितें रसाला[१]॥३॥
माझा गरिबाचा कोंडा । स्वामी लागूं द्यावा तोंडा । घननीळा ॥४॥
दीन ज्ञानेश्वरकन्या । विलोकावी विश्वमान्या । करुणा डोळां ।तूं जेविंरे ॥५॥

(१.श्रीखंड)

११२२

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- यमन. ता.- तेताला. गौण.- छक्कडचे चालीवर.

कालिंदि तीरी चला ॥ सखिबाई ॥धृ॥
दहा पांच जणि मिळुनि गौळणी । श्याम वदनिं बोला ॥१॥
ज्ञानेश्वरप्रभु नाम गातजी । अवघा भवही भुला गे ॥२॥

११२३ / हिंदी / मुरलीप्रशंसा -

(सुवासिनी) रसालाभेद. रा.- खमाज. ता.- तेताला

जों मुरली नहिं हरिकर आवती ॥धृ॥ (य९उ.२६०)
तों गोविंदगीत मधुर सुधा । कानन कौन पिबावती ॥१॥
दोहा - गोपिहृदय नदि हरि सागरतट लै, लै कौन बहावति ।
मेरि प्रिया ब्रजबाला, प्रियमुख, निजबल कौन कहावति ॥२॥
आवो रसेली आवो रंगेली, कहकह कौन बुलावति ।
पतिनंदनधनसदनगर्वको छिन मंह कौन भुलावति ॥३॥

गाय गाय ज्ञानेश्वर-पग-गुन दिन-निशि कौन लुभावति ।
तातें छांडि सकल छल सजनी अब मोहे मुरलि हि भावति ॥४॥

११२४ / हिंदी – मुरली प्रशंसा - गोपीवचन -

सुवासिनी (रसालाभेद) रा.- दरबारी कानडा. ता.- तेताला.

मम बंदन मुरली कह दीजै ॥धृ॥
कह वो शाम मन मोते सजनी । तनक दूर नहिं कीजै ॥१॥
दोहा- अधरसुधारस सुखिनि पिबहुं तुम । मुहै शेस पठईजे ।
पाछे बचन बोरिजो कछु हम, ते अब मन नहिं लीजे ॥२॥
तुम दयाल तुम्हरी सुनि माधव, मोपें रीस न दीजे ।
अलकावतिवल्लभ करुणाघन, तुमहि रिझावत रीझे ॥३॥

११२५ / हिंदी गोपीवचन प्रियाप्रति -

सुवासिनी (रसालाभेद) रा.-बेहाग. ता.- तेताला.

का कहते हो पंछि पुकारे ॥धृ॥
पिहुपिहु रटत सजनि अनुदिन जनु । प्यासे बन महं प्यारे ॥१॥
दोहा - ये जननी हम देखि पिसाचिनि, कानन पठये दुलारे ।
देवकिनंदनपर प्रीति कहां, ज्यौ निज पेट न धारे ॥२॥
दूधदही घृत लै चलती मैं, हिय हि मनावत प्यारे ।
अलकावतिवल्लभके कारन, तनकन दुख तनु गारे ॥३॥

११२६ / हिंदी गोपीवचन -

सुवासिनी (रसालाभेद) रा.-केदारा. ता.-तेताला.

परी हमहि पापिनि ब्रजनारी ॥धृ॥ (य९उ.२६१)
रैनदीन पियचरन मनावति, क्यौं करि गवनतयारी ॥ परी ॥१॥
दोहा :- निगम पुरान रटत कीरति अति, सुमिरत योगि बिचारी ।
हमरे अनुभव नेकन आयो, कंस-गज-गनिका तारी ॥ परी ॥२॥
चलहु सजनि मिलि जयि तजन आज, सूरज सुललि किनारी ।
अलकावतिवल्लभ पिय बिछुरन, हिय नहिं सकति संभारी ॥३॥

११२७ / हिंदी

मुरलीप्रशंसा

मुक्तमाला (रसालाभेद) रा.- भीमपलासी ता.- तेताला गोपीवचन -

तुम मुरलीसों बैर करोना ॥धृ॥
तुम्हरे भाग छीन ले जायगि । ये मन तनक धरोना ॥ तुम० ॥१॥



दोहा - वह अधरामृत आचवन समे तुम्हरी करत पुकार ।
तुमहि देखि निजधननंदनपति, जात न साजि सिंगार ॥ तुम० ॥२॥
जद्यपि निजतपबळतें भयि है, जदुपति प्रेमनिकेतु ।
तदपि करति अति कंठशोष सखि केवल तुम्हरे हेतू ॥ तुम० ॥३॥
तुमसों हसती तुम वासों सखि नाहक निकर करोना ।
ज्ञानेश्वरकरुणाघन पग तुम जाय काहे पकरोना ॥ तुम ॥४॥

११२८ / हिंदी

सामकामदावृत्त. मूळ.- झिंझोटी ता.-दादरा.यतिलग्न गौण.- पांडुरंग स्मर अभंग. या चालीवर.

जानतिहूं श्याम तुम्हें नंदके कन्हैया ॥धृ॥
जाय जाय वृंदावन धेनू चरवय्या ।
गिरत नीर गोकुलपर नखगिरी धरय्या ॥१॥
सनकादिक आदि मुनी हीयके भजय्या ।
मेरे लिये आय द्वार मूरली बजय्या ॥२॥
अब इतना सुनिये नाथ दीनके बचय्या ।
चाह मेरी तो लगि है ज्ञानेश्वरपैया ॥३॥

११२९ / हिंदी

सामकामदावृत्त. मूळ.- भैरवी. ता.- दादरा. गौण. पियाके जाने न दूंगि आज मैं, या चालीवर.

आवू करो मोरे घर नंदके ललैया ॥धृ॥
निगमगीत परम ब्रह्म जसुमतिके छंय्या ।
करनखनपर शिखर पकर बिरजके बचय्या ॥१॥ (य९उ.२६२)
असुरहरण दीनभरण गोपके खिलय्या ।
मधुपुरिपथ जातसमय गोपिके छलय्या ॥२॥
जोगि अकल प्रेमबिवस दहीके खवय्या ।
अलकावतिपतिनंदिनि पानिके गहय्या ॥३॥

११३० / हिंदी

मोहरी प्रभावृत्त. रंभाभेद. मूळ॰ पिलु गौण.- इस तन धनकी या चालीवर.

चाल उधो प्रभुगान सुनाये । जाय कुंजबन लायि मनाये ॥१॥
आज भये भागविहिन काना । दिन व्रज गोलन गति सुनि आये ॥२॥
काल सावले सुरत तुं देखी । आज नयननबिच तम छाये ॥३॥
अलकावतिपतिबाला विव्हल । असु अवगाहन बरत बनाये ॥४॥

११३१

सामनुष्टपवृत्त. रा.- परज. ता.- राजविद्याधर. उत्सवसमयीचें उद्गार.

राधावर करितो काला ॥धृ॥ प्रेमें वाटित गोपाला ॥१॥
विसरोनी तनुभावाला । व्रजहेवा महादेवाला ॥२॥
पदिं गोवी वृंदारकाला । वारि गौळियांच्या काला ॥३॥
आपण ज्ञानेश्वरबाळा । शेष सेवूं झडकरि चाला ॥४॥

११३२

सामनुष्टुप वृत्त. गौणपीठ.- ''राधे चाल बाई चाल'' या चालीवर

सखे चाल बाई चाल ॥धृ॥
सांडोनीयां संसाराचे अगणित हाल ॥१॥
जागृतीं सपनीं सुप्तीं भजे नंदलाल गे ॥२॥
यमुनेच्या तीरीं हरी घेऊनी गोपाल गे ॥३॥
काला करीं जाऊं तेथें माध्यान्ह हा काल गे ॥४॥
दीर सासू जावा नणंदा करोनी हलाल गे ॥५॥
जन्म जन्म कांत चित्तीं यशोमतीबाल गे ॥६॥
साहाय आपणां ज्ञानेश्वर सर्वकाल गे ॥७॥
भेटवील कृपें आम्हां यशुमतीबाल गे ॥८॥ (य९उ.२६३)

११३३

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- परज तेताला.

माधवजी करितो काला । संगे घेउनि गोपाला ॥धृ॥
मुनि कोंडियले कपाटीं । कोंडियली रमा वैकुंठी ॥
इंद्रादिक गोउनि स्वर्गी । गोवी ब्रह्मासुत सर्गी ॥
सनकादिक लावुनि ध्यानीं । बैसविला शिवही श्मशानीं ॥
धन्यपुण्य व्रजजनाचें । ब्रह्म विषय यन्नयनाचें ॥
देति गोपी भरुनी थाळा । उष्टें सेवी अलंदिशबाळा ॥

११३४ / हिंदी / गोपी वचनम् भ्रमरं प्रति -

सुशीलावृत्त. रा.-बेहाग. ता.- राजविद्याधर.

मधुकर वाहीके पग लाग ॥धृ॥
ज्या पंकजमों सुमधु मिलत है । तहां करो अनुराग ॥१॥
या ब्रजकू सब आग लगी है । फूटो हमरो भाग ॥२॥
विठ्ठललाल मग निरख थके । नयन रैन दिन जाग ॥३॥

११३५

इंदिरावृत्त. रा.- हमीर. ता.- तेताला. उद्धवं प्रति गोपी वचनम् -



निर्गुण राहो तुजपाशी ॥धृ॥
शिकवि तया जे जाउनि बसले । घर सोडुनि काशी ॥१॥
सगुणपदाम्बुज आवडती मज । हृदयीं अविनाशी ॥२॥
येइं न जरि युदपति गोकुळिं तरी । मरूं घेउनि फांसी ॥३॥
श्रीज्ञानेश्वरचरणसरोरुह । त्याच्या आम्हीं दासी ॥४॥

११३६ / यशोदावचन

लावणीवृत्त. ता.- धुमाळी. मूळ.-यमन.गौण- निबिड सघनघनमध्य शार्वरी, या चालीवर.

रडूं नको रडूं नको सख्यारे बलीभद्र भाऊ ।
नीजतोस तूं नाहि उगा कीं बागुल बोलावूं ॥धृ॥
श्यामसुंदरा गुणमंदिरा नयन तरी लावी ।
खोडी तुझी गोपाळा आतां कुठवरी बोलावी ॥१॥
पहा कसा तो निजला मंचकी बलीराम दादा । (य९उ.२६४)
छंद घेसी भलताचि तान्हुल्या काय झाली बाधा ॥२॥
ऐकुनियां ही वाणी मायची उठुनि हरि बसला ।
माय दावि बागुला नयनी मज अजुनि नाहीं दिसला ॥३॥
ज्ञानेश्वरनंदिनिचा स्वामी बहुबहु करी खेळ ।
कळेना कवणास सेविल्याविण सज्जनमेळ ॥४॥

११३७ / श्रीकृष्णवचन यशोदेप्रत -

शकटधाटी. ता.-कवाली. यावनी राजविद्याधर.

आई मज बागुल दावी डोळा ॥धृ॥
सांगसी तूं लक्षण ज्याचें कीं । भेटविं तो एकवेळा ॥१॥
मत्स्य कूर्म अवतार धरुनि मी । वधिलें दनुजकुळा ॥२॥
मी असतां बागुल कैसा ग । आला धेनुकुळा ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुनंदिनी प्रियकर । दाखवी प्रेमकळा ॥४॥

११३८

कमलारंगी वृत्त. रा.-यमन ता.-तेताला.

नवस काय करूं ॥धृ॥
मुलखामध्यें आहेसी कीं, तूं एक लेंकरूं ॥१॥
लोकाचें तुजविषयी बोलणें, कुठवर जीविं धरूं ॥२॥
मोदक वाहिन श्रीगणपतीला, नको तूं छंद करूं ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुनाथ दयाघन, प्रेमळास सुकरू[1] ॥४॥ (१.सोपा)

११३९

रमावृत्त. रा.-यमन. ता.- तेताला. यशोदावचन -

बाळा हें कैसें न कळे ॥धृ॥

कीं दिवसा मम माता श्रमते । काम करुनि सगळें ॥१॥

रात्री जागुनि दुखतिल डोळे । गात्रें अति विकळें ॥२॥

ज्ञानेश्वरप्रभु अझुनि तुला कां । देति न गुण विमळे ॥३॥ (य९उ.२६५)

पाळणा

११४०

सामनुष्टुप.ता.धुमाळी.मूळ.-सारंग.गौण.-महाराज कुणिकडे तुम्ही, या चालीवर.उत्सवसमयींचे उद्गार.

महाराज यशोदासुत । सुत सुंदरमूर्ति । नित्य गाताति निगम कीर्ति ॥धृ॥

महाराज पाळण्यावरी । वरी विमलतनू ।

योगि जे ध्याति म्हणुनि अणू ॥ पाळण्यावरी ॥१॥

महाराज नेणती जया । जया निगम मनु ।

आकळीनाचि प्रणव-धनु ॥ पाळण्यावरी ॥२॥

महाराज आळंदीपती । पती सुखदाता ।

तिन्ही लोकांस स्वयें त्राता । नमन तत्पदीं । तत्पदीं भावें करितां ।

जाहली सृष्टि भावभरिता ॥ पाळण्यावरी ॥३॥

११४१ / हिंदी

मूळ.- जोगी गौण.- हरि विमुखनको संग, या चालीवर.

माई मोहे सावरे संग रुची ॥धृ॥

हातमों झल्लर पाव घुंगरुवा । गोविंद गात नची ॥१॥

जलजमुनातट नंदलालासंग । तिय मिल रास रची ॥२॥

ज्ञानेश्वरप्रभुकरुणाबलतें । कालभुजगसु बची ॥३॥

११४२ / आर्या / गोपी वचन

बहु गोपी हरि तुम्हां दहिं खातां म्हणती नेऊं चाव्हडिये ।

ही आपुलि दासि प्रभू देते आणूनि दूध कावडिये ॥

११४३ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. रा.- खमाज. ता.- तेताला.

अब मैं नही डरती हूं किनको ॥धृ॥

जिनका डर था सो तो आयगये दास करूंगी सबनको ॥१॥

जो कोई घरसे निकाल दे तो जायरहूं मधुबनको ॥२॥



कोई करे जोगजागतप मैं तो करुंगी प्रभूसुमरनको ॥३॥

ज्ञानेश्वरप्रभुकरुणाबलतें कृष्णार्पण करुंगी तनमनको ॥४॥(य९उ.२६६)

११४४ / हिंदी

तिलोत्तमावृत्त रा.- जोगी. ता.- तेताला.

दहीबेचन मोहे जाने दे ॥धृ॥

सास हमारी बांकी बनरिया । पण्यसु[१] पैसा लाने दे ॥१॥

घरकी गरीबनी हम ग्वालनिया । अबरुकि लाग मिलाने दे ॥२॥

ज्ञानेश्वरकी कन्या प्रभु मैं । प्रेमपलंगपें आने दे ॥३॥ (१. बाजारांतून)

११४५ / हिंदी

रमावृत्त. रा.- काफी. ता.- तेताला. गोपीवचन -

मोहन छन एक केलि करो ॥धृ॥

लेकर मुखमों जलभर भरके । बसंत मग्ग धरो ॥१॥

जानती नही हूं मैं प्रौढीको । तुम शिशुभाव धरो ॥२॥

ज्ञानेश्वरकन्या निजकांता । जानिके प्रेम धरो ॥३॥

११४६ गोपीवचन -

सुशीलावृत्त. रा.- मालकंस. ता.-तेताला.

कोमल तुमचे पाय ॥ अतितर ॥धृ॥

अनवाणी काननिं फिरतां प्रभु क्लवल[१] यशोदामाय ॥१॥

परी आजवरी सवयहि नाहीं करितां अति येजाय[२] ॥२॥

जाऊं दिलें मी तुम्हां तरी क्षोभतिल अलंदीराय ॥३॥

(१.वैक्लव्य-विकलता पावेल. २. येरझार)

११४७

सुशीलावृत्त. रा.- हमीर. ता.- राजविद्याधर.

मंदिरीं येणें झालें आज ॥धृ॥

लग्नापासुनि नाहीं पाहिलें । चित्तीं वाटत लाज ॥१॥

अष्टवर्षी तनु सगुण सावळी । मनमोहन व्रजराज ॥२॥

पाहुनियां गृहीं मामी यशोदा । वदती करिं निज काज ॥३॥

ज्ञानेश्वरकरुणा करि धीटची । हारुनि वृत्तिसमाज ॥४॥ (य९उ.२६७)

११४८

रमावृत्त. रा.- खमाज. ता.- राजविद्याधर.

तव दुर्दैव दशा फिटली ॥धृ॥

आजपासुनी हरिची वाटे । पूर्व संवय तुटली ॥१॥

यास्तव आले सदनीं केशव । गोष्टी बरी घटली ॥२॥
आतां मंचकीं हरिसहित पुन्हा । प्रीति असो जुटली ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुकृपें हरीची । प्रेमनदी सुटली ॥४॥

## ११४९ / हिंदी

रसालावृत्त. रा.- देस. ता.- तेताला.

सो कूंजनमें खेले । हरि अलि० ॥धृ॥
जाको ध्यात ज्ञेयध्येय करी । निगम उपाधी लेले ॥१॥
छोरि पयोब्धी सुख क्रीडत है । मिलाय ग्वालिनि मेले ॥२॥
ज्ञानेश्वरगुरुकृपा चाखिये । हरिचणामृत भेले ॥३॥

## ११५० / हिंदी

छविवृत्त. रा.- काफी. ता.- तेताला.

माई मोहे श्यामने मोहनी डारी ॥धृ॥
जाती थी मैं चित्रबाग तब । बासन चुनरी फारी ॥१॥
मारि जोरीकर पाथर तो मम । संचित मटकी फोरी ॥२॥
बोलत तूं दे छोरी पतिसंग । होजा मेरी नारी ॥३॥
लेय पितांबर टाकत मोंपर । चित्त हरत पुतनारी ॥४॥
अब वनिता भई जनम जनम हूं । त्रिकाल रूप करारी ॥५॥
ज्ञानेश्वरप्रभु करुणाबस मम । हिरदें बसे मुरारी ॥६॥

## ११५१

लावणी वृत्त. मूळ.- पूर्वी. गौण.- नंदाच्या नंदना, या चालीवर.

ये दुडदुड धांवुनी ।
मधुर वदुनि निववीं व्रजरामा आलिंगन देउनी ॥धृ॥
नवघनतनु सावळी ॥ प्रभु तव ॥
भवविभव तुटल म्हणुनी आम्ही पूजुं हृदयराउळीं ॥
प्रेमसुमन वाहुनी ॥ प्रभुरे मधुर वदुनि ॥१॥
त्यजुनी तव गुणलिला ॥ हरिरे ॥ (य९उ.२६८)
नवल कलिकाल भुलति जन बघुनि तरुणिहरिणिला ॥
भ्रमसंकुपिं राहुनी ॥ जन हे ॥ मधुर वदुनि ॥२॥
वारिं षडरिसृष्टिला ॥ प्रभुरे ॥
अलकावतिपतिसुता प्रियकरा करि करुणावृष्टिला ॥
दृष्टिसृष्टि दाउनी ॥ श्रीहरी ॥



मधुर वदुनि निववीं व्रजरामा आलिंगन देउनी ॥३॥

## ११५२

लावणीवृत्त. मूळ.- पूर्वी,० गौण. नंदाच्या नंदना या चालीवर.

रुचिर चीर आणिलें ॥ आज मज ॥
कनकसुभर सिंहासनिं हरिसह यशुमतिनें न्हाणिलें ॥धृ॥
पाहुनि पतिपावलें ॥ रतिमय व्रत धरितां सहजचि मी सदनी सुख पावलें ॥
षडरिविभव सानिले ॥ कनक सुभर० ॥१॥
कमलासन[1] थारणी । करुनि निजबळें प्रेमें मिळणें मज झटुनी रतिरणीं ॥
चित्त करुनि वाणिलें [2] ॥ कनक सुभर० ॥२॥
मारुनि मायासवा । निजशिरीं हरिपद धरुनि गुरुकृपें वरिलें श्री माधवा ॥
ज्ञानेश्वरगुण वाणिले ॥ कनक सुभर० ॥३॥

(कमलासन थारणी = हृदयधारणा. २.वाणिले =वाचाधीन करुन किंवा नाहीसं करून)

## ११५३ / हिंदी

सुशीलावृत्त रा.- मारवा. ता.- तेताला. उद्धवाप्रत -

क्या रखुं शीस उतार । ऊधो ॥धृ॥
इस पालखपर सोया घरमों । अब नाहिंन झुलनार ॥१॥
इस चौकनमें न्हाया धोया । जल जमुनाको गार ॥२॥
इस अंगनमें खेलके कीना । यमुलार्जुनउद्धार ॥३॥
मेरे दोनों स्तनकी पीया । प्रेमदुग्धकी धार ॥४॥
अब ज्ञानेश्वकरुणाबल कब । आवें दीनोद्धार ॥५॥

## ११५३ / हिंदी / गोपीवचन श्रीकृष्णाप्रत -

तारावृत्त. रा.-कोणीही ता.- राजविद्याधर.

अब नहिं मोहे किनकी आस ॥धृ॥
स्वरग-पताल नाश पावेंगे रहूंगी मै प्रभु तोरे पास ॥१॥
पंछि पिंगला शकुन बतावत । रामकृष्ण कहिं तोताचाष ॥२॥
घर-पति-धन-नंदनहि छोरके । करूंगी बृंदाबनमें वास ॥३॥
ज्ञानेश्वर श्रीगुरुपग सुमिरत । हियमें करत सुभक्तिबिलास ॥४॥

## ११५४ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. रा.- काफी. ता.- तेताला.

सासजी मै जाती मथुरा ग्राम ॥धृ॥
दहिं दुध घृत तक्र बेचबेचके । लाऊंगी सुन्नेके दाम ॥१॥

जमुनाजलबिच डुबी मारके । लाऊंगी रतनको धाम ॥२॥
श्रीकृष्णनको हात चुकायके । कोरी आऊंगी अपने धाम ॥३॥
ज्ञानेश्वरजासासको भ्रांती । देके मिलावत श्याम ॥४॥

११५५ / हिंदी

तारावृत्त. रा.- काफी. ता.- तेताला.

तूं मथुराबाजार न जाय ।।धृ॥
बृंदाबनमों कान्ह बसत है । सो लेवेंगा वस्त्र छुराय ॥१॥
मैं तब बोली नंदलालको । देवोंगी बलसेहि हराय ॥२॥
ज्ञानेश्वरजा सास छोरके । सुखिनि भई हरिचरण मिलाय ॥३॥

११५६

साममाणववृत्त. मूळ.- पूर्वी. ता.- दीपचंदी. गौण.- राधे घडिघडि. या चालीवर.

बाई अवघड याच्या खोडी । तुझ्या कृष्णाची तुजला गोडी ॥धृ॥
भलतें कार्य करी हा गोकुळी । अवघे चाळे कोणि न केले कुळी ॥१॥
तुझ्या लाडानें हरि वायां गेला । समुळ संसार मम बुडवीला ॥२॥
सोहंभावें नादचाळा केला । समदृष्टी चोर विठे ठेला ॥३॥
रामअवतारीं एकपत्निव्रती । आतां भोगी गोकुळींच्या युवती ॥४॥
जाउनि उभा तस्कर विटेवरुती । याची वर्णवेना कोणा कीर्ती ॥५॥
सांग आतां कोठें आम्हीं जावें । काय यमुनेंत बुडुनी मरावें ॥६॥
किती त्रास याचे गे सोसावे । यातें त्वां कैसें न शिकवावें ॥७॥
(य९उ.२७०)बाई सर्प हा आणितो धरूनी । मुलें येती घरींच पळोनी८
तया मागें येतो चक्रपाणी । सोडी गांठ कंचुकी आकळुनी ॥९॥
अवघ्या मिळोनी ज्ञानेश्वरबाळा । चहूंकडोनी वेढिति घननीळा ॥१०॥

ब्द११५८ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. रा.- वराळी. ता.-तेताला.

नंदलाला तुम मथुराको मति जावो ॥धृ॥
अपने बृंदावनमों रहके । छनछन बेणु बजावो ॥१॥
हमारो मनको हरन करकर । अपने चरण मिलावो ॥२॥
हमें मारके गोकुल ग्राममें । शीघ्रही अगन जरावो ॥३॥
ज्ञानेश्वरबाळा ही विलापतें । चरणन शीस पहरावो ॥४॥

११५९ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. रा.- यमन. ता.- तेताला.



नहीं मैं लीन्ही मुरली तुम्हारी ॥धृ॥
नंदके सूत तुम बडेके कहावत । मोहे गरीब पें करत बिलारी ॥१॥
और नारि तुमें दहि दुध देत है । गरीब हम रस्तेपर ठारी ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या मुरली लेके । विनोदसे कहत नेतिधारी ॥३॥

११६० / शकटधाटीवृत्त.

आतां मी बजारा जातें नटून ॥धृ॥
सासुबाई तुम्ही भिऊं नका कांहीं । हरिच्या हातून येईन सुटून ॥१॥
तुमची लेक नणंद माझी । कालचि हरिनें घेतली गठून ॥२॥
दहिदुध विकुनी मथुरेमध्यें । द्रव्य आणितें लुटून ॥३॥
मी तंव शुद्ध निर्मळ आहें । काय हरि करील थटून ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभु कारुण्यबळे । सासुला दिलें हटून ॥५॥

११६१ / भगवंताप्रत अर्जुनवचन -

दिंडी - सखा साहे अन्याय सखीयाचे । पिता साहे अपराध आत्मजाचे ।
पत्नि अन्याया प्रीय कांत साहे । तसा देवा तूं कृपादृष्टि पाहे ॥ य९उ.२७१)

११६२ / गोपीवचन -

दिंडी

जहीं चाराया धेनु वनीं जासी । पायीं काटे रुततील निश्चयेसी ॥
म्हणोनीयां चित्तास दुःख वाटे । सांग कोण्या गेलासि तरी वाटे ॥

११६३ / हिंदी-मराठी

रंगलावणीवृत्त. मूळ.- पूर्वी. ता.- धुमाळी. गौण.- द्राक्षाचे मंडप बाई, या चालीवर मोहरी.

वृंदावनीं वेणु वाजे लवकरी चाला ।
ग्वालनीनमाही भये खडे नंदलाला ॥धृ॥
अझुनियां बाई नाहीं शशांक निघाला ।
देखेंगी जो सास तो देवेंगि जहरप्याला ॥१॥
हाकारितां तुम्हां आम्हां श्रम झाले त्याला ।
मिलीके गोपाल अब करेंगे रसकाला ॥२॥
जऊनियां प्रेमें बाई चुंबूं कृष्णगाला ।
चलो अब सब मिल ज्ञानेश्वरबाला ॥३॥

११६४ / हिंदी

साममाणववृत्त. मूळ.- पूर्वी. ता.- दीपचंदी. गौण.- राधे घडिघडि या चालीवर.

बडे खिलय्या तुम हो मुरारी । छोरो सय्या मैं तुमसों हारी ॥धृ॥

तुम शक्तिमंत पुतनारी । मैं तो दुर्बल अकेली नारी ॥१॥
तुमे चाहत तुम्हरी माता । मोसे कोई न करते बाता ॥२॥
छूट जावोगे तुम बालपनसे । तूट जाऊंगी मैं सबके मनसे ॥३॥
नाथ करूंगी संगत तुम्हारी । फेरी कौन गती होगी मारी ॥४॥
सुकुमार हो तुम श्याममूर्ति । मेरी रूपकी नहीं ग्रामकीर्ती ॥५॥
नाथ ज्ञानेश्वरकी मैं बाला । चाहातेहो तो ग्रहण करो लाला ॥६॥

११६५ / हिंदी

साममाणववृत्त मूळ.- पूर्वी. ता.- दीपचंदी गौण.- राधे घडिघडि, या चालीवर.

राधामाधव गोविंद हरी । देखदेख मतिसब हारी ॥धृ॥
राधा मंदिरमों रही प्यारी । खेले मंचकपर पुतनारी ॥१॥
राधाकृष्ण नाम मूसे गावो । ज्ञानेश्वरप्रसादको पावो ॥२॥ (य९उ.२७२)

११६६

श्रीमतीवृत्त. रा.- खमाज. ता.-तेताला.

मी गेलें मधुवनिं काल ॥धृ॥
तेथें हरिनें पदरीं धरोनी । केले बरवे हाल ॥१॥
म्हणुनि आज मी पथ नच पाहें । उभा असल नंदलाल ॥२॥
काल मला कष्टेंचि सोडिलें । पुढति धरिल गोपाळ ॥३॥
गौळिणि गवळी एकचि मिळतां । मग सच्चित्सुखमाल ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणायोगें । ध्वनित यशोमतिलाल ॥५॥

गोपाल काला

११६७

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- माहित नाही. गौण.- माहित नाही.उत्सवसमयीचें उद्गार.

वाढणें लवकरी करा । लागली क्षुधा यदुविरा ॥धृ॥
गाई चारित यमुनातिरीं । गोपाळ मिळुनी पूतनारी ॥
परमानंदें दोन प्रहरीं । काला करिती गडी साजिरा ॥१॥
माझी घ्या साकरपुरी । लोणचेंही देतों वरी ॥
चटणी मीठ मोहरी । वरी माखूनही भरभरा ॥२॥
माझी घ्या पूरणपोळी । माझी घ्या साकर गोळी ॥
माझी घ्या लाडुकुरोडी । वरपाया कढी झरझरा ॥३॥
माझी घ्या वरण भाकरी । माझें घ्या चूनतेल वरी ॥
माझी कोंड्याची पुरी । मिळवुनी वैर हें विसरा ॥४॥



प्रेमसार तो काढुनी । हरी सोयरा जोडुनी ॥
टाका भवपाश तोडुनी । जेववुनी ज्ञानेश्वरा ॥५॥

११६८ / हिंदी

उत्सवसमयीचें उद्गार कन्यकावृत्त. रा.- पहाडी. ता.-तेताला.

दीनोद्धरण सुभाव ॥धृ॥
शाम भयी तब सदनही लौटे । खेलत आनंद भाव ॥१॥
अलकावतिपति निजजनकारण । बिरचत बोधउपाव ॥२॥

११६९ गोवर्धन-लीला

कासयाचा ताता करितां विचार । कृपेनें उत्तर द्यावें मज ॥१॥
(य९उ.२७३)
नंद म्हणे आम्हीं इंद्रा तोषवीतों । मख आंरभितों म्हणोनियां ॥२॥
इंद्रची सामर्थ्यें करोनियां वृष्टि । जना तुष्टि पुष्टि देतो सदा ॥३॥
ज्ञानेश्वरगडी ऐकोनी उत्तर । बोले हास्यवक्त्र नंदादीकां ॥४॥

११७०

उत्सव समयींचे उद्गार-

हस्तिशुंडेसम वर्षलिया धारा । पडताती गारा नानापरी ॥१॥
न दिसे गोकुळ गौळी घाबरले । म्हणती बुडालें सर्व कांही ॥२॥
गौळिणी बोलती धांव नारायणा । आमुच्या श्रीकृष्णा वाचवीं कां ॥३॥
इंद्रें आरंभिला प्रळयची थोर । सखा ज्ञानेश्वर रक्षो आतां ॥४॥

११७१

सुशीलावृत्त. रा.- जोगी. ता.- तेताला. (उत्सव समयींचे उद्गार)

कधींतरी जातिल प्राण । आमुचे ॥धृ॥
परि हा वांचवी यशुमतिनंदन । जो विश्वाचें त्राण ॥१॥
ज्ञानेश्वरप्रभुपदनिर्माल्य । यास्तव करूं अवघ्राण ॥२॥

११७२ / ओवी

ऐसी ऐकोनी गोपिकावाणी । अंतरी द्रवला शार्ङ्गपाणी ।
मग ना भीं म्हणे गौळियां लागुनी । करें उचलोनी पर्वता ॥

११७३

सामनुष्टुपवृत्त.राग-भूप, ताल-तेताला, उत्सवसमयी

गौळि हो तुम्ही अतुल बळी ॥धृ॥
मज होती श्रम बहु मी काढूं । सांगा कीं अंगुळी ॥१॥

ऐकुनि वचना काढिं काढिं रे । बोलियलें सकळीं ॥२॥
निजजन-गर्वनिवारण-कारण । करी ज्ञानेश रळी ॥३॥

११७४ / ओवी

मग किंचित् कर हरिनें ढिलविला ।
तंव तो पर्वत एकाएकींच करकरला ।
अवघा गौळीभार दडपला । श्वासोच्छवास कोंडती ॥१॥

११७५ / ओवी

जेवीं दूरी सारितां सद्गुरुवचन । आडवें सहज ये मायाविघ्न ।
तेवीं अंगुळी ढिलवितां मनमोहन । गोवर्धन दडपी जना ॥२॥

११७६

सुशीलावृत्त. रा.- केदारा. ता.- तेताला.

कळलें कळलें आज । प्रभुजी ॥धृ॥ (य९उ.२७४)
नव्हेसी तूं सुत यशोमतिचा । विश्वहृदयिं तव राज ॥१॥
भाग्यें आला नंदसदनीं तूं । साधाया सुरकाज ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु दीनदयाळा । दुःखित तारिं समाज ॥३॥

११७७

ओवी - तरी आतां सोडुनी भय । तळीं बैसा म्हणे यदुराय ।
गौळी बैसोनि ऊर्ध्वमय । लक्षोनियां पाहती ॥१॥

११७८ / ओवी

पर्वत व्यापिला सभोंवति । मध्यें सप्तवर्षी मूर्ति ।
पाहतां धांवोनि यशुमती । मिठी घातली कृष्णकंठा ॥२॥

११७९

उत्सव समयींचे उद्गार

तुझी माय म्हणवितां । लाज वाटते रे चित्ता ॥१॥
तूंचि माझी बाप आई । सावळीये कान्हाबाई ॥२॥
सांडुनियां सर्व माया । कुर्वंडीन निजकाया ॥३॥
ज्ञानेश्वर दीनबंधू । करी क्षमा अपराधू ॥४॥
असो ऐसे सप्तदीन । मेघ वर्षले दारुण ।
मग इंद्र म्हणे आतां मरण । पावलें असेल व्रज सारें ॥५॥

११८० / पद

सुशीलावृत्त. रा.- असावरी. ता.- तेताला.



हा कां क्षोभविला म्यां नाथ ॥धृ॥
ज्याची माया लीले निर्मी । स्वर्गशतांचे गाथ ॥१॥
ज्ञानेश्वरप्रभु केवीं पुढती । ठेवितील शिरिं हात ॥२॥

११८१

ओवी - इंद्र धरूनि गुरूचे पाय । म्हणे स्वामी करावें काय ।
कळोनि घडला अन्याय । केवीं यदुराय क्षमा करी ॥१॥
जो जगत्पित्याचा उपजविणार । पृथ्वीवरी माजले असुर ।
आम्हांसाठींच अवतार । एवं प्रत्युपकार फेडिला म्यां ॥२॥
मी तया पाहूनि मनुष्यबुद्धी । अधिकारमदें झालों अपराधी ।
आतां तो करुणानिधि । वश होईल केवीं सांगा ॥३॥
सद्गुरु म्हणे सहस्रनयना । शरण जावें त्या जगन्मोहना ।
स्वर्ग वाहूनि तयाच्या चरणा । निर्माल्यगंधें सुखी व्हावें ॥४॥
जयाची माया ब्रह्मांड अनंत । निमिषलवें घडमोडीत ।
तयासी मी कपट करीत । अन्याय हा महत् घडला ॥५॥ (य९उ.२७५)

११८२

सामनुष्टुप वृत्त. रा.- बेहाग. ता.-दीपचंदी.

सयेबाई आवरीं आपुलें ग बाळ ॥धृ॥
निजलें मी मंदिरिं एकटि असतां । काळे करी माझें भाळ ॥१॥
खेळत असतां बिदिवरी माझ्या । रळि करि भलतीच चाळ ॥२॥
घुमोनी दावी दह्याचे साठीं । उधळोनि ऊद आणि राळ ॥३॥
ज्ञानेश्वरनंदिनिच्या झाला । संसारालागीं ग काळ ॥४॥

११८३

ओवी - गाऱ्हाणियांचे चपेटे थोर । ऐकोनियां आली माय सत्वर ।
म्हणे बाळा गाई घेवोनी शीघ्र । आजपासोनी जाई वना ॥१॥
अवश्य म्हणोनी शेषशायी । वना घेवोनी जाय गायी ।
चिमणे बाळ लवलाही । बरोबरी मेळविले ॥२॥
धन्य त्या गाई कृष्णभक्त । धन्य तें तृण जें आपणा वेंचित ।
तृप्त करी गो-रूप संत । सम भगवंत प्रिय जया ॥३॥
पाहोनि प्रियाचें मोहकपण । गाई चरूं विसरल्या तृण ।
टवकारोनि आपुले नयन । भूकतहान विसरती हो ॥४॥
सर्वथा न दूरी जाती । वळावयाची नाहीं खंती ।
म्हणोनी गोपाळ आणि श्रीपती । खेळ मांडती स्वानंदें ॥५॥

''चक्री भंवरा विटीदांडू । रंगित गोटी वेगळा चेंडू ।'' इ.
नवल पाहोनि गोविंदा । अवघ्या गाई जाहल्या यशोदा ।
मग आपलिया हृदयींच्या दुग्धा । म्हणती मुकंदा प्राशीं तूं ॥६॥
''गाई गोपाळ यमुनेस्थळीं । खेळताती चेंडुफळी ॥
मिळोनी मेळा । तूं खाय साखरलोणी माझिया बाळा ॥''
जैसा देव कंससदनी । रीघ करितांचि क्षणीं ।
जैसी ज्याची भावना मनीं । तयालागोनि तैसा दिसे ॥७॥
ज्ञानी भाविती आपुले मनीं । आम्हीं जडलों पूर्ण निर्गुणीं ।
परी विषय भिन्न नाहीं ब्रह्माहुनी । हें भक्तिवांचुनी कळेना ॥८॥ (य९उ.२७६)
ज्ञानसूर्य आराधून । तयाचें दास्य केलें पूर्ण ।
परी तोचि सूर्य चंद्रमा सगुण । होऊनि अमृत दे प्रेमळां ॥९॥
म्हणोनीच ज्ञानगर्व । सांडुनियां कवी सर्व ।
ज्ञानसूर्यताप विझवोनि सर्व । चंद्रामृतातें पाहती ॥१०॥
मनीं भावी शेषशायी । जयांचें मी चोरिलें दहीं ।
त्या गोपी सांडोनि आपुल्यागृहीं । गोड न वाटे वनीं दुग्ध ॥११॥
म्हणोनियां तयांचे मनी । आर्त उपजवी कैवल्यदानी ।
आपुलियां करेंकरूनी । काला घ्यावया कामिनीतें ॥१२॥
जयाचे ऐकतांचि गुण । विव्हळ होय जड अंतःकरण ।
मग आत्मा तत्सजातीय चेतन । तो पुढें आपण केवीं न धांवे ॥१३॥
स्वप्नींचिया औषधें करून । स्वप्नींचा रोग निवर्ते पूर्ण ।
तेवी मिथ्या भव नाशावया कारण । मिथ्या उपाय रचिती गोपी ॥१४॥
कां गोपिका अवघ्या श्रुती । फुटोनी राहतां प्रमाण न होती ।
म्हणोनी समन्वयें आघव्या जाती । सत्य श्रीपती ओळखावया ॥१५॥

११८४ / हिंदी

सुमध्यमावृत्त. रा.- देस. ता.- तेताला. गोपीवचन -

आजसे तो मुरलीया कबु ना बजावो ॥धृ॥
मैं अपने घर सोइ पलंगपर । मुरली आन जगायो ॥१॥
खोली किवारा निकसि अकेली । उतनेमें पिय पायो ॥२॥
अलकावतिपतिबालासो यह । रारि न फेरि चलावो ॥३॥

११८५ गोपीवचन -

सामपटुवृत्त. मूळ.-बेहाग. ता.-दीपचंदी. गौण- 'सये माझि हरिनें पुरवीली पाठ' या चालीवर.



सये बाई पुरे पुरे माधवसंग ॥धृ॥
जात मी असतां यमुने पाण्या । साधुनि येत प्रसंग ॥१॥
फागन बागन कांहींच नसतां । घाली चोळीवरी रंग ॥२॥
ज्ञानेश्वरगडी चुंबन घेउनी । व्यापुनि राही अंग ॥३॥

११८६

रमावृत्त. रा.-यमन. ता.-तेताला. उत्सव समयींचे उद्गार.

मंगल ब्रज राहो । चिरंतन । मंगल० ॥धृ॥
नंदभूपती राणि यशोदा । कंचनदिन पाहो ॥१॥
धनधान्यदिक वृद्धि होऊनी । आज्ञा जन साहो ॥२॥ (य९उ.२७७)
जयजयकारें सुरवर मुनिजन । नृपवरयश गावो ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणे आम्हां । नंदज पति लाहो ॥४॥

११८७

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- सारंग. ता.- तेताला. गौण.- ''कुणीकडे तुम्ही'' या चालीवर

महाराज पाळणा सुखें हालविती नारी । वरी पहुडले पूतनारी ॥धृ॥
महाराज भक्तवत्सले । वत्सलें नवल केलें । रूप निर्गुण प्रगटवीलें ।
महाराज कांहीं बाहींही । बाहीहीं भूलवीले । निजपद सहजचि दाखविलें ।
महाराज सृष्टि आनंदें । आनंदें भरिली सारी ॥ वरी पहुडले०॥१॥
महाराज योगनिद्रेचा । निद्रेचा कंटाळा । आला बहु वाटे गोपाळा ।
महाराज म्हणुनी गोकुळीं । गोकुळीं अवलीला । आयके नारिगीतसोहळा ।
महाराज सर्वसुखदाता । गाताति वेद चारी ॥ वरी पहुडले०॥२॥
महाराज हृदयपाळणा । पाळणा मनोहर । भक्तिची गादि मृदू वर ।
महाराज परब्रह्म हें । ब्रह्म हें सुकुमार । तनू सांवळी सुंदर ।
महाराज ज्ञानराज हे । राज हे वर्ण चारी । वरी पहुडले० ॥३॥

११८८ यशोदावचन श्रीकृष्णाप्रत.

सामनुष्टुप वृत्त. मूळ.- पूर्वी- ता.- दीपचंदी. गौण.- ''त्याला कशाला'' या चालीवर

जावें कशाला । ओळख जेथें नच पुरुषाला ॥धृ॥
बोलति ना जे धड वचनेंही । पाहुं नये बा नयनीं अशाला ॥१॥
खाती धमकटी अवघ्या मिळुनी । तुवां मागत न देति पशाला ॥२॥
पतिला चोरुनि रांडा निजती । घेउनि नवनितमडकि उशाला ॥३॥
घरीं आपुल्या भरलें कितितरी । खाउनि उरतें लक्ष दशाला ॥४॥
करुणे हरीच्या पाउलपाउलीं । या धरणीवर सुरभीशाला ॥५॥

अलकावतिवल्लभ करुणाघन । भरुनी उरला दाही दिशांला ॥६॥

११८९

लावणीवृत्त. वत्सलरस. मूळ.- यमन. ता.-धुमाळी गौण.- 'नंदाच्या नंदना' या चालीवर.

चाल माझे सावळे । तान्हुले ।
पवन बहुत सूटला धुळीनें मळतिल तव जावळें ॥धृ॥ (य९उ.२७८)
मळल वसन पीवळें । कटीचें ।
लाल गालावर तीळ शोभती मळतिल मोतीपोवळे ॥१॥
नये तुज ओवळे । उचलिता । रुतल कठिण कुंभिनी ।
राजसे चरण तुझे कोंवळें ॥२॥
कर्मरुपी सोवळें । सांडुनी ।
आळंदिशे तव चरणास्तव मी होइन नित बावळें ॥३॥

११९०

सामपटुवृत्त. रा.- खर हरप्रिया. (काफी) ता.- दीपचंदी.

याच्या सांगूं मी कितितरी खोडी ।
मंदीरीं एकटी बैसलि असतां माठ दह्यांचे फोडी ॥१॥
चुकुनी धूळी नयनांत घालुनी । कंचुकिग्रंथी सोडी ॥२॥
ब्राह्मणी मी हा सोवळं बाटवी । वैदिक धर्मचि मोडी ॥३॥
मैं हूं यवनी मेरे पतिकी । झटिति उखाडत दाढी ॥४॥
राजपुतानी मी माझें हरी । नाक धरुनी ओढी ॥५॥
झकवी ये रीती चेटकिपरी हा । लावी स्वचरणगोडी ॥६॥
ज्ञानेश्वरप्रभुबाळा हिंपुटी । चित्त धरुनी ओढी ॥७॥

११९१

सामनुष्टपुवृत्त. रा.- रामकली. ता.- तेताला. उत्सव समयीचे उद्गार.

ऐकें बा सगुणा । सख्या हरी ॥धृ॥
गोकुळिंच्या गौळणि अति धांगडी । कलह आणिति सदना ॥१॥
गायी घेउनी कवणेपरि परी । जा राजसा वना ॥२॥
ऐसें बोलुनि प्रेमें वदनीं । घालित दध्योदना ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुगडि जगभाग्यें । निघे सधेनु वना ॥४॥

११९२ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- पिलु. ता.- तेताला. गौण.-

चलो कुंज गलिया । जावेंगे सखी तुमहम मिलिया ॥धृ॥



लै राधा चंद्रावलि ललिता । खेलत सावलिया ॥१॥
अलकावतिवल्लभकरुणाबस । परणेंगे नंदलालया ॥२॥

११९३ / हिंदी / मदिरावृत्त.

चंदन लै कुबरीकु सुधार दियो फलनाथ कियो अतिप्रीति ।
मातुपितापदबंद छुरायके दीनि बताई सुनंदन-रीति ॥ (य९उ.२७९)
उग्रकुं राज दियो अरु लोकनमांहि बढाइ अखंडित नीति ।
ज्ञानसुरेश ब्रजेश तुम्हीत हो क्यौं सबकी हमरेपर बीती ॥

११९४ / हिंदी

रमावृत्त. रा.- तोडी. ता.- तेताला.

नाहीं न सुपन परे । ऊधो ॥धृ॥
दोहा - रास तजी गेथे तबतें हम सावध रहत मरे ।
क्यौं कारण छोरे अब गोकुल दीनपें कोप करे ॥ नाहिंन ॥१॥
ल्यावनको सठ अक्रुर आयो तहां हम थी नहिरे ।
दौर मिली रथपें हरि देखे सुने नहिं पाय परे ॥ नाहिंन ॥२॥
ये प्रभुकूं अटकाय करेगी मानि कुशकुन डरे ।
कर आये नंदलाल छुटे सठ खोटे भाग पुरे ॥ नाहिंन ॥३॥
कोटि दिये उपदेस तथापि न मानसदुःख टरे ।
ज्ञानेश्वरकरुणाबिन ऊधो कौन उपाय करे ॥ नाहिंन ॥४॥

<u>गोपाल काला</u>

११९५

जयावृत्त. मूळ.- पूर्वी ता.- दादरा. गौण.- पांडुरंग स्मर अभंग, या चालीवर

मधुमुरहर पाहुं गडे वाळवंटी चाला ।
मेळवूनि संग गडी मांडियेला काला ॥धृ॥
यमनियमादीक करुनि स्मरति मुनि जयाला ।
घेइं घेइं भातदहीं म्हणति गडि तयाला ॥१॥
मुरलिरवा ऐकुनियां मोहिति सुरजाया ।
पति आपुले परममूढ बसति धरुनि माया ॥२॥
एक वदनिं एक कवळ देति प्रेमभावें ।
सेवुनियां शेष जपूं ज्ञानराज नांवे ॥३॥

११९६

<u>पाळणा</u>

सामनुष्टुपवृत्त मूळ- सारंग- ता- राजविद्याधर. गौण- कुणीकडे तुम्ही' उत्सव समयीचें उद्गार.

महाराज भक्तवत्सला । वत्सला रमारंगा ।
निजसुखीं पहुडा निःसंगा ॥ भक्तवत्सला ॥धृ॥
महाराज द्यावया सुखा । सुखा तुम्हाप्रती ।
कोणिही न धरि चित्तवृत्ती । महाराज दासि तूमच्या ।
तुमच्या निगमश्रुती । याहि शेवटीं जागवीती ॥ भक्तवत्सला ॥१॥
महाराज अलंदीपते । पते श्याममूर्ती । (य९उ.२८०)
गाउनी तुम्हां गीतकीर्ति । निजसुखी निजऊं ।
निजऊं सौख्यस्फूर्ति । करुनिया सेवुं आत्ममूर्ति ॥ भक्तवत्सला ॥२॥

## ११९७ / हिंदी

रमावृत्त. रा.- मालकंस ता.- तेताला.

प्रभुवर नामहि साच किये ॥धृ॥
मेघःश्याम समानहि करणी । कुबजासदन गये ॥१॥
श्याम गये मथुरामण्डलमो । मेघहि व्रजन दिये ॥२॥
अलकावतिवल्लभनंदिनिकी । आसा लटक रहे ॥३॥

## ११९८ / मुरलीस प्रार्थना

सुशीलावृत्त. रा.- यमन. ता.- तेताला.

अधर जरा तरी सोड । मुरली ॥धृ॥
मोहुनि मन दहीं दूध अशितही । त्वां हरि केले रोड ॥ मुरली ॥१॥
नाहिं आलि तव अंगीं अझुनी । पतिसेवेची मोड ॥ मुरली ॥२॥
वनवासी कुलटा भिल्लिणि तूं । झालिस कैसी गोड ॥ मुरली ॥३॥
तूं आल्यापासुनी मोडली । समुळ आमुची खोड ॥ मुरली ॥४॥
रात आम्हांला दिवस तुला अशि । तरी काढावी तोड ॥५॥
ज्ञानेश्वरप्रभु करिति आमुचें । हरिपद देउनि कोड ॥ मुरली ॥६॥

## ११९९

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- जोगी. ता.- धुमाळी. गौण.- नवसाकीची चाल.

फुटलें भाग्य आज बाई । मथुरे जातो फणिशायी ॥धृ॥
बाइ या नंदपत्निनें त्या राखविलें गायी ।
आतां व्यर्थचि निज लोचनि जल आणुनियां कांहीं ॥२॥
आपण जरि अहेव तरि पति कां कंस करीं द्यावे ।



रथ निघण्याच्या आधिं हरिपदावरिं मरूनी जावें ॥३॥
धीर धरुनियां चला सकळही श्रीज्ञानेश्वरबाळा ।
कुल-लज्जादिक सांडुनि घालूं श्रीहरीकंठी माळा ॥४॥

## १२०० / हिंदी

रसालावृत्त. रा.- जीवनपुरी. ता.- तेताला. गोपीवचन -

क्यौं नहीं आज पये हो ॥ प्रभुजी ॥धृ॥
भवन भवन वन भवशत बीते । आयें हाथ गये हो ॥१॥ (य९उ.२८१)
हमपरि है जो बिरहबिबश तो । काहे सगुण भये हो ॥२॥
हमसे डरते तो कस रणमों । भीखम बाण सहे हो ॥३॥
अलकावतिजीवन तुम जानहुं । हम अन नाहिं चहे हो ॥४॥

## १२०१

गोपाल काला

चला[1] बाई पांडुरंग पाहूं वाळवंटी ।
मांडियेला काला भोंवती गोपाळांची दाटी ॥१॥
आनंदें कवळ देती एकामुखी एक ।
न म्हणती सानथोर अवघीं सकळीक ॥२॥
हमामा हुंबरी पोहा वाजवी मोहरी ।
घेतलासे फेर माजी घालुनियां हरी ॥३॥

(१.मूळ अभंग श्री तुकारामांचा असून त्यावरील अवतरणें श्रीमहाराजांची आहेत.)

ओव्या - कां निज काला गोपाळा । मित्रभावे वाटी सावळा ।
पतिपत्निभावें ग्रास गोपिकांला । वाटी काला मनमोहन ॥१॥
हें प्रत्यक्षरूपें प्रमाण । अभंगद्रष्टे बोलती आपण ।
यालागी मधुरोच्छिष्ट सेवन । साजणी जाऊन करूं चला ॥२॥
अभंग कडवें - लुब्धल्या नरनारी अवघ्या पशुयाती ।
विसरली देहभाव शंका नाही चित्तीं ॥४॥
ओव्या - गोपाळ करिती पुष्पवर्षण । सुहृद्भावें पूजिती भगवान ।
गोपी तनुमन समर्पून । सांडिती प्राण ओवाळुनी ॥१॥
अभंग कडवें - पुष्पांचा वर्षांव झाला आरत्यांची दाटी ।
गुंफोनियां तुळशीमाळा घालिताती कंठी ॥५॥
ओव्या - जयाच्या भावें तैसा देव । येथ अन्यथा नाहीं अनुभव ।
जो यादवांसी रक्षी राव । तो गोपींस सावेव क्रीडा करी ॥१॥

गोपिकांचे हरोनि मन । उठों न देचि रजोगुण ।
यालागीं होवोनीहि कान्त आपण । लहानपण सांडीना ॥२॥
अभंग कडवें - यादवांचा राणा गोपी मनोहर तान्हा ।
तुका म्हणे सुख वाटे देखोनिया मना ॥६॥

# रासक्रीडा उपक्रम

१२०२ / हिंदी चौपाई
शुकमुखगत यह बचन सुहाई । चरित करत बहुविध यदुराई ॥
पंडु कुमर वंशजहितकारी । दशमारंभीं वंदु मुरारी ॥१॥
१२०३
नवघन तनु कोमल सकुमारा । चिंतुनि ते विधि नंदकुमारा ॥
यदुपतिचरित काय मन वाणी । श्रवण करित सुखि नृप गुणखाणी ॥२॥
१२०४ / दोहा
कुंजवनीं हरि वेणु तदा वाजवि अति मनुहार ।
ऐकुनि गोपी मोहवशे त्यजुनि येति घरदार ॥२॥
१२०५ / चौपाइ
गायनाचे लक्षण
मात्रा(१) ताल(२) प्रबंध(३) विभागें । स्वर(४) सुस्वर रागहिं(५) अनुरागें(६) ॥
भाषा स्पष्ट(७) गान मनुहारी(८) । गात मुरलि मुखि धरुनि मुरारी ॥१॥
१२०६
श्रवण करुनि तें गीत मनोहर । माया वारि निवारक सुंदर ।
गोपि त्यजुनि सुत पति निज मंदिर । पावति जेथें कृष्ण सइंदिर ॥२॥
१२०७
धरिति तदा त्या वनिची वाटी । शरदुत्फुल्लमल्लिका वाटी ॥
पाहुनि प्रभु कामिनि समुदाया । अति आदर सादर वर द्याया ॥३॥
१२०८
महाभाग तुम्ही व्रजकामिनि । आलां काय म्हणुनि या यामिनीं ॥
स्वागत तुमचें सदा असो कीं । काय प्रीय करुं प्रीति वसो कीं ॥४॥
१२०९
घोर रजनि अति दारुण वेशी । उघडुनि आल्या नगर सुवेशी ॥



काय काज मज सांगा सकळ । कवण हेतु यापरि तुह्मि विकळ ॥५॥
१२१०
जा झडकरि घरिं स्मरतचि मजला । धरा भाव मम चरणी सजला ॥
ज्यापरि मनगत भक्ति सुखा दे । ते विधि मम संगे नच साधे ॥६॥
१२११
पति सुत बांधव सेवाकरणी । युवतिधर्म यापरि मनु वर्णी ॥
यास्तव सत्वर साधा तें कीं । येणें मिळत परेश स्वयें कीं ॥७॥
१२१२ / दोहा
यापरि वाणी ऐकुनी दुःखित गोपिसमाज ॥
जोडुनि कर मग विनविती सांडुनि सकळहि लाज ॥८॥
१२१३ / चौपाई
इंदूदय कां अदय जहालां । सूर्य कसा मृगसलिलि नहाला ।
गरिबी कशि ही रमामहाला । शेष कां न भूभार सहाला ॥९॥
१२१४
नाहिं तसा दुष्काळहि बाई । मातेला सुतआवडि नाहीं ॥ (य९उ.२८३)
मेघ काय चातकासि रुसला । ऐरावति कां पंकजिं फसला ॥१०॥
१२१५ / दोहा
अमृत जाहलें केविं परी हालाहल स्वरूप ॥
मेघ बिहाला भरण करूं गोष्पदसम भवकूप ॥११॥
१२१६ / चौपाई
दीनबंधु तूं श्यामल मूर्ति । वेद गाति तव अक्षय कीर्ती ॥
तवपदनत भवभय न गणति ते । रामकृष्ण गोविंद म्हणति ते ॥१२॥
१२१७
प्रणतपाळ तव खेळ दयाळा । वारिसि तूं निजज रिपु भयाला ।
काय तुझ्या आम्हीं नहुं दासी । दाविसी इतिविधि स्वामि उदासी ॥१३॥
१२१८
पतिसुत त्यजुनि तुझ्यास्तव आलों । त्यजुनि धर्म कुलटाही झालों ।
पतिचा पति तूं श्रीपतिनाथा । घे पदरीं प्रभु आम्हां अनाथा ॥१४॥
१२१९ / दोहा
धर्म्य आणि जरि स्वर्ग न दे तो न तरिहि आचार ॥

इतिविधि वदले मनू तरी तवपदिं नाहिं विचार ॥१५॥

१२२० / चौपाई

सकळ ह्रदय तूं पाहसी देवा । तूं धर्मज्ञ धर्मगत ठेवा ॥
सुतपतिबांधवसेवनकरणी । इतिविध युवतिधर्म श्रुति वरणी ॥१६॥

१२२१

तूंहि तथाविध वदला देवा । परि पतिपति तूं स्वामि केशवा ॥
म्हणुनि धर्म जो कथिला त्वां कीं । जाणें आहे जयाप्रति नाकीं ॥१७॥

१२२२

ते करतिल पालन तद्धर्मा । आम्हि तुझ्यास्तव ह्रतकुलकर्मा ॥
त्वां कथिला जो धर्म परेशा । तो आम्हा तव पदिंच विरेशा ॥१८॥

१२२३

यदुपति सर्वप्रीय तूं आत्मा । तूं विश्वाधारहि परमात्मा ॥
जो तुज भजतो तोचि महात्मा । न भजे तो धर्मीहि दुरात्मा ॥१९॥

१२२४

तूं सकळांच्या अंतर्यामि । अस्मदाणि पतिचाही स्वामी ॥
यास्तव तवपद लक्षुनि देवा । त्यजुनि कुळा आलो करुं सेवा ॥२०॥

१२२५ / दोहा

नाहिं जरी तुज आमुचा करणें हरि स्वीकार ।
तरी शस्त्र करिं घेउनी झडकरि करिजे ठार ॥२१॥

१२२६ / चौपाई

इतिविधि युवतिवाणि अति प्रेमळ । ऐकुनि बाष्प कंठगत श्यामल ॥
सफळ होत मन भाव सकळही । कधिं न होवुं मम भक्ति विकळही ॥२२॥

१२२७

या परि देउनि वर वरदानी । झाला गोपींना, नवरदानी ॥ (य९उ.२८४)
नवरा कृष्ण पाहुनी सकळा । झाल्या जेविं रमा सुखि सुकळा ॥२३॥

१२२८

त्यजुनि भाव तनुगत मग सारे । पाहति ना मनु वदत कसारे ॥
कृष्ण गोपी गोपी हरि पाहीं । गोपिकृष्णभेदहि नच कांहीं ॥२४॥

१२२९ / दोहा

गोपि कृष्णमय प्रेमबळें कृष्णहि गोपिस्वरूप ॥
खेळति जेवीं घृतकणिका पाउनि द्रवमय तूप ॥२५॥



१२३०

गोपिमनीं हरिभावना हरौ गोपिकाब्रह्म ॥
जे निजभक्तीं भागवत ते जाणति हें वर्म ॥२६॥

१२३१ / चौपाई

जितुक्या गणिती गोकुळबाळी । तितुकीं रूपे धरि वनमाळी ।
जारभाव गोपिका तराया । एकपत्निता कीर्ति भराया ॥२७॥

१२३२

ओवी - एकपत्निप्रभु रामावतारी । तीचि आठवण धरोनी काय करी ।
जितुक्या होत्या व्रजसुंदरी । तितुकीं रूपें जाहला ॥२८॥

१२३३ / दोहा

इतिविध कौतुक करुनि हरी रचित सुमंगल रास ॥
जंव जंव खेळति गोपिजन तंव तंव मायाऱ्हास ॥२९॥

१२३४ / अभंग

अनेकींचे मनीं पती व्हावा हरी । तितुकीही धरी रूपें देव ॥१॥
रामअवतारीं एकपत्निभाव । तैसी आहे ठेव कृष्णमूर्ति ॥२॥
एकी एकी साठीं एक एक रूप । जाहला संकल्प पातिव्रत्य ॥३॥
प्रत्येक कृष्णासी एक एक नारी । येथ व्यभिचारी नव्हे कोणी ॥४॥
कात्यायनीव्रत करिती कुमारिका । व्हावा कृष्ण सखा म्हणोनियां ॥५॥
कृष्ण ब्रह्मचारी सर्वभावें गोपी । भजतां संकल्पीं मुक्त झाल्या ॥६॥
गुणदोष गेले सकळ जळोनी । आले हें कळोनी व्यासादिकां ॥७॥
म्हणोनियां कृष्ण परब्रह्म माझा । वृंदावनराजा दीनबंधू ॥८॥
ब्रह्मरूपगोपी माउली बहीणी । होइन सांगातिणी त्यांची आतां ॥९॥
ज्ञानेश्वरप्रभु वदविता रास । येणें होवो ऱ्हास अविद्येचा ॥१०॥

१२३५ / चौपाई

एकपत्निव्रत रक्षुनि नाथू । रास रचित अतिकृतसंघातू ।
निजकरिं कर गोपींचे धरुनी । भूतें काढिलिं प्रेमें भरुनी ॥३०॥

१२३६

कर धरितां चाकरपण[१] गेलें । कृष्णकरीं कर ऐक्यचि झाले ॥(य९उ.२८५)
जीवेश्वर हें भान गळालें । सर्वभूतिं चित् ब्रह्म कळालें ॥३१॥*(१.जीवपणा)*

१२३७

वृत्ति जशा सिद्धांच्या ब्रह्मी । तैशा गोपिवृत्ति हरिप्रेमीं ॥
गोपिभावही गोपि विसरती । कृष्णभावना कृष्णिंहि सरती ॥३२॥

१२३८

रासरचन श्रुतिवचन समानी । अनितिसाम्य परि नीति समानी ॥
यापरी निगमगम्य चिद्घन जें । परमानंदरूप जीवन जें ॥३३॥

१२३९

आजवरी जें ज्ञानिजनाला । होतें चिन्मय कळत मनाला ॥
तेचि गोपि आनंद पहाति । आनंदें मग भव न सहाती ॥३४॥

१२४०

गोपि कृष्ण चिन्मय तनु दोन्ही । निजानंद निजसम साधोनी ॥
इति विधि रास ऐक्यसुख साचें । नाहिं कधीं कारण ऱ्हासाचें ॥३५॥

१२४१ / दोहा

एवंविध हरिगोपिकामिश्रित भक्तिज्ञान ।
रासरचनमनवचनतनू क्रीडति गत अभिमान ॥३६॥

१२४२ / चौपाई

नाहीं कोणि पुरुष आणि नारी । न ज्ञानी न कुटिल अभिचारी ।
शीला तरु पशु पक्षि मनुष्य । कृष्णरूप सुखि करीती लास्य ॥३७॥

१२४३

जें जें दिसतें नयनीं सृष्टि । तेथ तेथ नंदजमय दृष्टि ॥
कृष्ण-गोपिका निज-निज भुलती । ब्रह्मानंदें सकळही डुलती ॥३८॥

१२४४

भोग न तो मज योगचि वाटे । जें सुख न मिळे मुनिसहि वाटे ॥
भक्तिबळें वश यदुपति झाला । निवटी जो भव-अनलज्वाला ॥३९॥

१२४५

ज्ञान आणि वृत्ती

कामिनिकामुकभाव न कांहीं । ज्ञानवृत्ति गोपी-हरि पाहीं ॥
ज्ञानरूप तनु यादवपतिची । वृत्तिरूप तनु व्रजयुवतींची ॥४०॥

१२४६

व्यष्टि-समष्टि

व्यष्टिवृत्ति मन गोपि-अंतरीं । समष्टिवृत्तिमय साचा श्रीहरी ।
मृदू यदा तैं वृत्तिवाच्य कीं । तीव्र तदा त्या गोपि साच कीं ॥४१॥

१२४७

मृदूरूप मन निश्चित जाणा । तीव्ररूप ये देहप्रमाणा ॥



तैशा तीव्ररूप हरिवृत्ति । त्याचि गोपितनु परम प्रीति ॥४२॥

१२४८

यास्तव वृत्ति गोपिका म्हणणें । कृष्णनाथ चैतन्यचि गणणें ।
रूपक मृदू-तीव्र सूजाणी । भेद मात्र इतुका मनि आणी ॥४३॥

१२४९

रूपक मृदु म्हणुनी तें खोटें । तीव्र संन्निवेश खरा वाटे ।
एवं संन्निविष्ट हरिचरणीं । तीव्रवृत्तितनु गोकुलरमणी ॥४४॥ (य९उ.२८६)

१२५०

इति विधि भक्ति ज्ञान अतिगूढ । जें जगि नाहिं कल्पनारूढ ।
तें पावे करितां हरिभक्ति । व्हावी परि गुरुपदिं अनुरक्ति ॥४५॥

१२५१ / दोहा

इतिविध रासरहस्य हें जाणति सकल सुजाण ।
शुक सांगे तूं तथाविध यास्तव चिंतनिं आण ॥४६॥

१२५२ / चौपाई

आधिंच ज्या मनें हरिपदिं चढल्या । तीव्र म्हणुनि मग शरिरें जडल्या ॥
ज्यांहि पूजिला हरिभव नाना । त्यागुनि सखिसुतपतिभवनांना ॥४७॥

१२५३

ज्यांचें ध्यान कृष्णमय साचें । स्वप्निहि ज्या हरिवीण न याचें ॥
त्याचि जागृतीत तीव्र मतीने । अंगिकारिल्या यादवपतिने ॥४८॥

१२५४

अतिशय तीव्र भावना जेव्हां । कृष्ण-गोपि मग भाव न तेव्हां ॥
नदि वेगें जैं सागरिं मिळते । नदीभावना सकळहि गळते ॥४९॥

१२५५

तैशी तीव्र भावना देवीं । भावनापणचि जाउनी ठेवी ॥
नदि पावे जैं सागररूपा । तेविं गोपि मिळती व्रजभूपा ॥५०॥

१२५६

मृदू मध्य तीव्रता न कांहीं । भाव भावना भावहि नाहीं ॥
चैतन्यचि तें सुजनिं उजळलें । तीव्र भाव तेही मग जळले ॥
भक्तिमात्र सुख अन्य न कांहीं । चिदानंद अवघा फणिशायी ॥५१॥

रास-समाधि

संधि-वृत्ति / समाधि-व्युत्थान

१२५७ / दोहा

एवंविध शुक सांगतसे रास-समाधीभाव ।
समाधान नृप पाउनी गेली जनिमृतिहाव ॥५२॥
१२५८ / चौपाई
संन्निवेश त्या वृत्ति गोपिका । गतसंशय मुनि म्हणुनि मतिपिका ॥
तीव्र त्याचि मग तनुमय होती । यास्तव रासिं ब्रह्म आणि वृत्ति ॥५३॥
१२५९
दोन्ही तीव्र गोपिका माजी । कृष्णब्रह्म तें तीव्र समाजीं ॥
तीव्र वृत्ति त्या गोपि सुखाच्या । कृष्णब्रह्ममय संधी साच्या ॥५४॥
१२६०
परि हा काळहि इतरचि आधीं । रासीं मिळतां परम समाधी ॥
वृत्ति संधि हा भेद न व्हावा । ऐशा श्रीहरिचित्ती हावा[१]॥५५॥ *(१.तृष्णा)*
१२६१
हेंहि बोलणें जरि का व्यर्थ । अंतर्यामी म्हणुनि समर्थ ॥ (य९उ.२८७)
वृत्ति संधि हा भेद जंववरी । समाधी व्युत्थान तंववरी ॥५६॥
१२६२
भेद समुळ तो म्हणुनी जावा । ऐसी चिंता वाटलि देवा ॥
यास्तव दाउनि विरहसुखाला । करी नित्य चिन्निगममुखाला ॥५७॥
१२६३
विरह गेलिया मग सुख-काला । दाखवुनी करिलचि प्रभु काला ॥
जरि अद्वैतिं परम मति व्हावी । द्वैतव्यर्थता तरि साधावी ॥
यास्तव हरि दावुनि विरहाला । मिळविल शेवटिं ब्रह्म रहाला ॥५८॥
१२६४ / दोहा
आधि गोपिमनिं प्रगट करी द्वैतभाव अभिमान ॥
संधिवृत्ति जो भेद तो झाडुनि करिल समान ॥५९॥
१२६५
ज्ञानेश्वर करुणा अती जाणति सुजन सुजाण ।
यास्तव रासश्रवणि पुन्हा असो सकल अवधान ॥६०॥

॥ हरिःॐतत्सदिति श्रीज्ञानेश्वर कृपाप्रसादे नानाछंदबद्धे
उपक्रम नाम प्रथमं प्रकरणम् ॥

.....



# रासक्रीडा : द्वितीय प्रकरणम्

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥
१२६६ / दोहा
रासक्रीडा पुढें सुखें श्रीहरिभक्तिउपाय ।
सुचो पूर्ण यासाठिं नमो उमामहेश्वरपाय ॥१॥
१२६७
ज्ञानेश्वरचरणेंदिवर वंदुनि अतिसुखसार ।
अग्रीं यदुपतिविशदयशलीला वर्णु अपार ॥२॥

वियोगाने समाधि

१२६८ / ओवी
''द्वितीयाद् वै भयं भवति'' । ऐसीच सांगे श्रुति ।
''भयद्वितीयाभिनिवेशतस्स्यादिति'' श्रीमद्भागवतीं अनुवादू ॥३॥
एवं राहतां किंचित् भेद । ते न साहे श्रीगोविंद ।
वियोग दावुनि श्रीगोविंद । करी अभेद निजरूपी ॥४॥
वियोगें कर्पिल्या जाईल वृत्ति । तेणें ती येउनी चित्ती ।
ध्यातृध्येय ऐक्यस्थिती । समाधी निश्चितीं साधेल ॥५॥
१२६९ / चौपाई
ऐसें आणुनि मनि यदुरावू । जो संकल्प सत्य श्रुति भाऊ ॥
निजसंकल्प करुनि मनिं साचा । उठवी अहंभाव गोपींचा ॥६॥(य९उ.२८८)
१२७०
खेळत असतां रास तदा कीं । अहंपणा तो सत्वर धाकी ॥
गोपिमंडळीं हरिसंकल्पें । केला चार गर्व अति अल्पें ॥७॥
१२७१ / दोहा
अहंभाव व्रजयुवतिमनीं उठतां प्रेमिं विकार ॥
पाहुनियां मग भेदभयें चकित सुनंदकुमार ॥८॥
१२७२ / चौपाई
वस्तुभिन्न भासवी उपाधी । अधिष्ठानसत्तया अनादी ॥
अधिष्ठानविण भ्रांतिहि नाहीं । तथापि भेदभान परि कांहीं ॥९॥
१२७३

तया चेतनचि अहंपणा कीं । भेद दावि तरि जगजिवना कीं ॥
गोपिमनीं उठतां परि भेदू । न्यून जाहला परमानंदू ॥१०॥

१२७४

ब्रह्मानंदन्यूनता जेव्हां । दूर दिसे यादवपति तेव्हां ॥
तीव्रभावमय होण्या वृत्ति । मंद जाहली श्रीहरिप्रीती ॥११॥

१२७५

हरिही करुनी निमित्ताऽहंता । द्याया गोपिलागिं सोहंता ॥
गोपिअंतरीं सहज रिघाला । गोपीलागिं न दिसता झाला ॥१२॥

१२७६

''तत्रैवान्तर् धीयत'' ऐसें । भागवतीं तूं वचनहि परिसें ॥
यास्तव नाहीं हरि दुरि गेला । गोपींप्रीति गोपिमन झाला ॥१३॥

१२७७

झाला जरि हरि वृत्तिस्वरूपी । तरिही दृश्य न दिसता गोपी ॥
चमकुनि सकळहि पाहती देवा । द्याया काय कृष्णतनुखेवा ॥१४॥

१२७८

जोंवरि दृश्य मानि चिति चित्तीं । तोंवरि न कधिंहि चिन्मयवृत्ति ॥
तीव्र तथापि दृश्य चितिभेदें । न सदनिकृत नवलहि गोविंदे ॥१५॥

१२७९

दृश्यभेद जैं सकळ गळे हा । तीव्रभावही प्रबळ वळे हा ॥
दृश्य द्रष्ट्रु हरिरूप न दुसरें । तैं तनुभाव सकळही विसरे ॥१६॥

१२८०

पावुनि इतिविधि चिति मदभेदा । दृश्य जगीं हरिभक्ति सुबोधा ॥
गोपिलब्ध[१] हो तयाचि साठीं । गोपिहृदयिं शिरला जगजेठी ॥१७॥ (१.प्राप्त)

१२८१ / दोहा

इतिविधि केवशगुप्तपणा पाहुनि गोपिसमाज ।
बाहति 'हा हा' करुनि बळें त्यजुनि अहंकृतिसाज ॥१८॥

१२८२

जीवनजगत व्यापक प्रभू पाउनि अंतर्धान ।
सकळ गोपिजन चकित मती धुंडिति गतअभिमान ॥१९॥ (य९उ.२८९)

१२८३ / चौपाई



इतिविधि चकित गोपिसमुदायू । हरिविण वाटे खंडित आयू ।
विरह भयंकर भ्रांतिविहारी । कधिंही प्रीति न होत विचारी ॥२०॥

१२८४

जडचैतन्य कांहिं मग न कळे । ज्यातें स्मरतां समुळ भव जळे ॥
तो प्रभु व्हावा पति यासाठीं । केलें व्रतही वरतापाठीं ॥२१॥

१२८५

तो कवणेपरि करिंचा सुटला । कां हरिप्रेम समूळचि तुटला ॥
इतिविधि सकळहि चिंतिति बाळा । अतितर दुःखवियोगउबाळा ॥२२॥

१२८६ / दोहा

योगवियोग नाहिं चितीं परब्रह्म अविकार ।
दृश्यबळें तें विसरुनी पावति दुःख अपार ॥२३॥

१२८७ / चौपाई

हा यदुनाथ नाथ करुणाब्धी । तव करुणाग्रीं उण न रुणाब्धी ।
काय म्हणुनि त्यजिल्या निजदासी । काय तुम्हा हा किती उदासी ॥२४॥

१२८८

देहभाव मग सकळ गळाला । मनिं होता अभिमान पळाला ॥
कांतवीण एकान्त कळाला । मरणचि वाटे तैं सकळाला ॥२५॥

१२८९

पळ घननीळवीण युग वाटे । धुंडिति नाना साधनवाटे ॥
ज्ञानें संचितकर्म जळालें । क्रियमाण तें अंगिं न आलें ॥
प्ररब्धहि तो विरह निवारी । जे वाटे मनिं अक अनिवारी ॥२६॥

१२९० / दोहा

विरहदुःख अनुभवबळें पळ पळ कल्पसमान ।
धीर न धरवे चित्तिं मग चिरूं पाहती मान ॥२७॥

१२९१ / पद

सकळ मिळुनि तैं हरिचरणाला लंपट विनविति मना ।
कुठें हा नंदतनय चिमणा ॥धृ॥
नाना मुनिजन त्यजुनी सुतधन साधन ज्यास्तव रिती ।
कठिण तव जपतपही या रिती ॥ सकळ ॥१॥

वारिती ज्ञानेश्वरकरुणार्णववश तो कैं भेटेल यदुपती ।
मिळे कैं प्रेमधेनु दूभती ॥ सकळ मिळुनि तैं ॥२॥
१२९२ / श्लोक
इतिविधि बहुभांती चिंतिती गोपबाळा ।
करिं धरुनि फुलांच्या दिव्य गंधाब्जमाळा ।
यदुपतिचरणाची आवडी चित्तिं गाढी ।
यशुमतिसुतप्रीती आत्मया अन्न वाढी ॥ (य९उ.२९०)
१२९३ / अभंग
गोविंद गोपाळ कोण्या स्थानिं आहे । प्रेमभाव राहे तेथ कैसा ॥१॥
काय अपराध घडला साजणी । त्यजियलें वनीं नंदजानें ॥२॥
काळें तोंडा झालें आतां चहूंकडे । हातीचें रोकडे ब्रह्म गेलें ॥३॥
देव ना संसार ऐसी झाली परी । उरलि नाहीं उरी दोहीकडें ॥४॥
बळियाच्या हातीं जाउनी सुटलों । कां आम्हीं विटलों गोविंदासी ॥५॥
विघ्न कां आडवें आलें मायाजाळ । गेला घननीळ हातांतूनी ॥६॥
आतां ठेवुनीयां काय ऐसी काया । जेणें व्रजराया अंतरलों ॥७॥
त्यागुनियां प्राण वरूं नारायण । काढुं जनवन धुंडोनियां ॥८॥
ज्ञानेश्वरकन्या धैर्ये बळकट । पूर्ण आला वीट संसाराचा ॥९॥
१२९४ / दोहा
सत्वगुणी तुज म्हणति मुनी नारद धृव प्रल्हाद ।
साहसि ना कां तमससम किमपि स्वजनअपराध ॥२८॥
१२९५ / अभंग
कळों आले आम्हां रोकडे अन्याय । परी नाहीं माय तुजवीण ॥१॥
करुणेनें तुम्ही घेतलें पदरी । अहंभावें तरी फोफावलों ॥२॥
नाहीं दिले कष्ट म्हणोनियां देवा । विसरलों सेवा दीनबंधू ॥३॥
फुकाचें हें धन मातिमोल केलें । ब्रह्म दवडीलें जवळीचें ॥४॥
अभिमानें तुज छळिलें गोविंदा । आतां परमानंदा सांभाळीं तू ॥५॥
लाज वाटे तुज भेटावें म्हणतां । अन्याय गणतां मिती नाहीं ॥६॥
कोण्यागुणें स्वामी आतां देसि भेटी । शोकदाह पोटीं उमळतो ॥७॥
मनीं ध्याऊं बाई आळंदीचा राणा । तेणें हा सुजाणा भेटे कृष्ण ॥८॥
१२९६ / गीति



फुकटचि होउनि बटकी पाणी वाहूनि त्वद्गृहीं राहूं ।
परि तुम्ही त्यजिलीया मग ना कवणाचिया मुखा पाहूं ॥२९॥
१२९७ / चौपाई
प्रभु कवणाचे पाय पहावे । अमल नयनजळिं कोणि नहावें ॥
आठ अंग आम्हिं कोठे वहावे । संग करुनि कोणता रहावें ॥३०॥
१२९८
नाथ सदय तूं अभयप्रदानी । आज उदारपणा के मानी ॥
जय जय जगदघभंजन देवा । जन्मजन्म देई पदसेवा ॥३१॥ (य९उ.२९१)
१२९९
तुजविण पवन तनूंत न थारे । नासिक तूं आम्हिं कनक नथा रे ॥
नाक म्हणुनि मुखशोभा आमुची । तुजसाठीं ज्ञानेश्वर नमुंची ॥३२॥
१३०० / दोहा
आम्हां शोभा तुझ्यामुळें तूं श्रीमंत कृपाळ ॥
दासी करुनी फुकट अम्हां अधरसुधेनें पाळ ॥३३॥
१३०१ / दिंडी
विमल तूमचीं स्वामि पाउलें । स्मरत सन्मुनी ब्रह्म पावले ॥
मृदुल साजिरीं दाविजे प्रिया । विलपतों अम्हीं सर्व गतन्हिया ॥३४॥
१३०२ / चौपाई
जे दीनाप्रति संसृतितारी । यदुदितजल शिरिं धरि त्रिपुरारी ॥
शुद्ध हृदय पाहुनि जे वसती । तोडर ब्रीदांकित[1] जे असती ॥३५॥
(१.पाठांतर - ब्रिदाब्धि अंकित.)
१३०३
जें पाहुनि कमला रूपमदा । त्यजुनि राहिली सेवुनि सुपदा ॥
ते प्रभु सुखमय दाखविं पाय । तूं जगतास पिता पति माय ॥३६॥
१३०४ / दोहा
चरण स्मरुनी सिद्धऋषी गेले भवनदिपार ॥
श्रुति स्मृतीही गाति मुखीं महिमा ययोरपार ॥३७॥
१३०५ / अभंग
पूर्णता पावूनी मुनी निराकारीं । जाहले साकारीं कर्षित जे ॥१॥
म्हणुनिया जरी आमुच्या हृदयीं । स्वामि फणिशायी आहांत कां ॥२॥

तथापि सगुणीं गुंततातित प्राण । पहावया नयन उत्सुक की ॥३॥
कमळासारिखें मृदुल सावळें । पहावया डोळे तटस्थलें ॥४॥
सगुण निर्गुण दोन्ही एकेपाडें । बोलती रोकडे अलंदीपती ॥५॥
म्हणुनीयां तेंची मानोनी उत्तम । ज्ञानेश्वरनाम स्मरतसें ॥६॥

१३०८ / दोहा

हा नाथ, हा रमणप्रिय हा ! हा ! स्वामि मुरारि ।
इतिविधि सकलहि परस्पर विलपति बल्लवनारि ॥३८॥

१३०९ / श्लोक

ब्रह्म ये जरि करीं व्रजनाथा । ठेविजे तरि तुझ्या पदिं माथा ।
ब्रह्म ये जरि करीं न कदापी । सोडूं ना तव पदेंहि कदापी ॥३९॥

१३१० / चौपाई

पुढति दृश्यमन फिरवित मागें । म्हणति धुंडुं वारा हित मागे ॥
पाहुं चला हरि कवण्या देशीं । या स्थळिं बहुति तरु उपदेशी ॥४०॥

१३११

चिज्जडभेद न चित्ति गणावा । सकळाभूतीं हरिच म्हणावा ।
तरिपरि सगुण आवडे स्वमना । यास्तव शोधुनि आणूं चिमणा ।(य९उ.२९२)
सुमन सुमन पूजन करुनीयां । कधीं न होऊं यमपूरऋणिया ॥४१॥

१३१२ / दोहा

दृश्यमूर्ति हरि चित्तिं या चितिप्रीतिसंस्कार ॥
विसरुनि निज जडभाव तनु शोधिति गीताकार ॥४२॥

१३१३

ओवी - जैसे कां असती पाषाण । तैशाच आम्हींही म्हणोन ।
काय सजातिया कारण । पुसूनि मिळे ॥४३॥
यास्तव सोडुनि पाषाणजाती । तरूलागीं प्रेमें पुसती ।
म्हणे हरीची कोठ वस्ती । सांगिजे समस्तीं कृपावशें ॥४४॥

१३१४ / श्लोक

मोकळ्या सकळही व्रजबाळा । जाळि ज्यां हरिवियोगउबाळा ।
धुंडिती यशुमतीतनुजातें । जाणती सुरमुनी अणु ज्यातें ॥४५॥

१३१५ / गीति

बाहिर असाल कोठें दिसा तरी निज जनांस संकार ॥



असाल जरि प्रभु हृदयीं द्यावा तरी अंतरींच हुंकार ॥४६॥

१३१६ / अभंग

गोपिका भाविती आपुलिया मनीं । जानकी रावणीं नेली जेव्हां ॥१॥
तेव्हां रघुवीरें पुसिले तरूसी । प्रमाण हे यास दृढ आहे ॥२॥
स्त्रियेसाठीं रामा तरूंचा विश्वास । न कां आपणास पतीसाठीं ॥३॥
असोनियां देव कवटाळी झाडें । आपण कां फुडे पुसूं नये ॥४॥
विचार हा ऐसा आणोनियां मनीं । द्रुमा पैं कामिनी पुसताती ॥५॥
भक्तकल्पद्रूम द्रुम हो तो सांगा । सजातीय अंगा जाणोनीयां ॥६॥
सकळही तुम्हीं कनकाचे तरू । स्वामी ज्ञानेश्वरू कृपावंत ॥७॥

१३१७ / दोहा

ज्याचे नामस्मरणबळें तरले मूढ अपार ।
तुम्हीं ऐकतां वेणु सदा यास्तवचि चिदुद्धार ॥४७॥

१३१८ / गीति

त्यजणें होतें आम्हां तरि प्रभु तूं जाहलासि गवळीं कां ॥
मौळी भाव धरोनी भजतां गेली कुठेंहि कवळीका ॥४८॥

१३१९ / दोहा

कृष्णचिंतनीं विसरल्या जडचैतन्यविभाग ।
तरुलागीं पुसती सुवशा निजप्रीयपदा माग ॥४९॥

१३२० / चौपाई

कर जोडुनि मग विनविति युवती । म्हणति तुम्हीं देखिला श्रीपती ॥
(य९उ२९३) त्यागुनि सकलहि नरतनुभावा । अर्पित ज्या हरिपद मनुभावा ॥

१३२१ / दोहा

निज निज पतिपद पूसती दृष्ट काय यदुनाथ ।
यत्पादाम्बु शीरीं धरुनी झाला शिवहि सनाथ ॥५१॥

१३२२ / चौपाई

कपित्थतरु प्रथमाकुलधारी । काय कोठ हरि पुसती नारी ॥
तो भवरोग सकल दुखहाता । सहज येसि करुणा वीताता ॥५२॥

१३२३

देखिलासि जरि यादवराणा । दाखविं कोठ करित गुणगाना ॥
मागसि तरि देऊं निजप्राणा । परि दे आणुनि श्याम शहाणा ॥५३॥

१३२४

प्राण करित देहीं येरझारा । परि नच दावी जगदुद्धारा ॥
जन्ममरण प्राणाधिन सारे । दाखविंना हरि कोठ कसारे ॥५४॥

१३२५

प्राण सर्व दुखदायक आम्हां । अंतरले सकळहि घनशामा ॥
कधिं भेटल यदुपति येउनियां । रडतो सकलहि तात सुवनिं या ॥
यापरि पुसुनी च्यूतकदंबा । गेल्या ज्या स्थलिं तुलसी अंबा ॥५५॥

१३२६ / दोहा

नमुनि नमुनि अति भावधृत श्रीपद वारंवार ।
दाखवीं त्वरित हरिप्रिये गौप्यचि नंदकुमार ॥५६॥

१३२७ / गीति

सांगा हरि पादप हो पादचिन्ह लोचनींहि देखलिया ।
गेला केविं त्यजुनी आम्हीं तों निजमनींहि रेखलिया ॥५७॥

१३२८ / चौपाई

तुलसि तुलसि हरिप्रीयानंदे । आम्हां त्यजिले यशुमतिनंदें ॥
तूं असतां वनिं बहिणस्वरूपी । कां गेला हरि त्यागुनि गोपी ॥५८॥

१३२९

तूं आम्हां अति वडिल कृपाळे । कां त्यजिलें वनिं गोपनृपाळें ॥
ठाउक तुज हे सकलहि माते । हरि भेटीची सांग सिमा ते ॥५९॥

१३३०

माय बहिण तूं श्रीहरिभेटी । येउं देइं कणवा निजपोटीं ॥
कृष्णवर्ण तूं कृष्ण प्रियाची । मुनिगण तुज यदुपति सुख याची ॥६०॥

१३३१

वृंदारण्य नाम तव योगें । जें न मिळे निगमान्तप्रयोगें ॥
ते तव छाया पडतां देहीं । येत चालुनी हृदय सुगेहीं ॥६१॥

१३३२ / दोहा

माय बहिण तूं आमची दाखविं अक्षय वाट ।
नयनजलीं अभिषेकु हरी सांडुनि संसृतिहाट ॥६२॥

१३३३

रमाकृपें जो अमिळ हरी यदि तव करुणा त्यास ।
वश होये तैं लक्ष्मिपती यापरि वदले व्यास ॥६३॥ (य९उ.२९४)



१३३४ / चौपाई

कमला ज्या ग्रहिं करि रहिवासा । तेथ दंभदम रहित विवासा ।
कमला जेथ तेथ हरि नाहीं । यापरि अनुभव सर्वि हि पाहीं ॥६४॥

१३३५

तूं माये तुलसी ज्या सदनीं । त्यास्थळिं नांदत रिपुगण कदनीं ।
म्हणुनि आम्हां कळलें मनिं ऐसें । रमेहुनी तवप्रेम आपैसें ॥६५॥

१३३६

रमा ज्या स्थळीं तेथ न देवो । तूं ज्या स्थळिं ते अमृत मुदेवो ॥
रमाविरोधि वाटतो विष्णु । परि तव विरहा हरि असहिष्णु ॥६६॥

१३३७

यास्तव पुसतें जरि कमलेला । तीसहि न कळे श्रीहरिलीला ।
तूं कमळेहुनि प्रीय सुखाची । चुंबनि झालिस कृष्ण मुखाची ॥६७॥

१३३८

कमळा धनमय तूं सविरागी । निजसुखदानीं अक्षय रागी ॥
तुजवरि यास्तव वचन विनोदें । सांग कोठ वदला प्रभु नोदें ॥६८॥

१३३९ / दोहा

इतिविधि बहु बहु गोपिका करिती विनति अपार ॥
श्रमुनि नमुनि म्हणति प्रभो नेइ त्वरें भवपार ॥६९॥

१३४० / श्लोक

तुलसि तुलसि झाली कोप ज्याही सिमा ते ।
सगुण हरि पदाब्जीं आमुचें चित्त माते ॥
अगुणनिगमगीतीं गाईलें ब्रह्म जें कां ।
हरिपदसुख आम्हां त्यागुनी श्रेष्ठ देखा ॥७०॥

१३४१

विलपति बहुबाळा भेट दे शीघ्रकृष्णा ।
तवपदकमलार्थी साहिलें शीत उष्णा ॥
पतिसुतधन सारे त्यागुनी दीन बंधो ।
वनिं रजनिंतही कीं पावलो प्रेमसिंधो ॥७१॥

१३४२

जडमय तरु सारे कृष्ण चैतन्य पाहीं ।
व्रजयुवतिमनीं हा भेद संभाव नाहीं ॥

तरु हरिमय वाटे विश्व विष्णुस्वरूपी ।
पुसति सकळ बाळा चिंतुनी प्रेमकूपी ॥७२॥

१३४३

पळपळ हृदयाब्जीं चिंतिती त्या उदारा ।
घळघळ निजनेत्री पातल्या अश्रुधारा ॥
भवभय बहु वाटे चित्तही आकळेना ।
प्रभु कवण ठिकाणीं ठाव तोही कळेना ॥७३॥

१३४४ / दोहा

तुलसि भगिनिनिज जाणुनी कथिला गोपिविहार ।
पुढति पाहुनी प्रेम नभीं करिती नयनिं निहार ॥७४॥ (य९उ.२९५)

रासक्रीडा समाप्त

०००

# भागवत : दशमस्कंध सार

१३४५ / हिंदी

सिंधुजावृत्त. रा.- यमन कल्याण. ता.- तेताला (राजविद्याधर)

मंगल गुरुपद ध्यावो ॥धृ॥
गुरु करुणातें पुरुषारथ सब । मंचक बैठे पावो ॥१॥
और देव सब निज मतलबके । सद्गुरुही गुण गावो ॥२॥
अलकावतिवल्लभ भजिभजि हिय । आतमज्योति लगावो ॥३॥

१३४६ / हिंदी

रसालावृत्त. रा.- देस. ता.- तेताला (राजविद्याधर)

सत्‌गुरु सब देवनके स्वामी ॥धृ॥
वेहि गणेश बिघनके हर्ता । सरसइ मतिगुणगामी ॥ सत्‌गुरु ॥१॥
शिव सकती रवि हरि सतगुरुसब । जगके अंतरजामी ॥ सत्‌गुरु ॥२॥
अलकावतिजीवन पगकी मन । करसत जलम गुलामी ॥ सत्‌गुरु ॥३॥

१३४७ / हिंदी

रंभावृत्त. रा.- दरबारी कानडा. ता.- तेताला (राजविद्याधर)

वंदे देवलोक हितकारी ॥धृ॥
भूतन के पति सब सुखदाता । हैमवती जीवन त्रिपुरारी ॥ वंदे ॥१॥
जिन करुणा विधि सर्गशक्तभ्यो । ज्याको हिय ध्यावत पुतनारी ॥ वंदे ॥२॥



अलकावतिपतिनंदिनि जाचत । देहुनाथ मोहे नाथ मुरारी ॥ वंदे ॥३॥

१३४८ / हिंदी

रसालावृत्त. रा.- केदारा. ता.- तेताला (राजविद्याधर)

को अस मानुख या जगमाही ॥धृ॥
ग्वालिनि लालित चरण कमल के । चरित सुनत रति नाहीं ॥१॥
आपहि साखि समाधि त्यजिके । गावत हो फणिशाई ॥२॥
नामलिये बिन प्रभुके शतभव । कबु बिखय बिरति नाहीं ॥३॥
बिनु अनुग्रह करुणा करके । सज्ञन पावत नाहीं ॥४॥
सुनत मनोहर और हरत रति । प्रगटत हियके माही ॥५॥ (य९उ.२९६)
अलकावतिपतिको जो न भजे । सो सठ पशुहि कहाई ॥६॥

१३४९ / हिंदी

सिंधुजावृत्त. रा.- सोरठ. ता.- तेताला (राजविद्याधर.)

शिव त्यजिके कैलासा ॥धृ॥
ध्यावत अपने हृदयकमलमो । कमला ललितबिलासा ॥१॥
जिनबिन जोगजाग जपतपशत । करत न रूप खुलासा ॥२॥
अलकावतिवल्लभपद ध्यावो । करिके सुहिय हुलासा ॥३॥

१३५० / हिंदी

श्लोक -५ रमावृत्त. रा. बिलावल. ता.-तेताला (राजविद्याधर)

मोहे ताको चरित कहो ॥धृ॥
नव सुनि नृप अधिकारि भयो तब । गुरुको बिनति कियो ॥ मोहे ॥१॥
सेवत निगम न सुगम परागा । चिति प्रस्थान हुयो ॥ मोहे ॥२॥
ज्या प्रभुनें हमरे पितुके रथ । श्रमि उपकार कियो ॥ मोहे ॥३॥
अलकावतिवल्लभभक्तनहित । मानुखजनम लियो ॥ मोहे ॥४॥

१३५१ / हिंदी

श्लोक - ६ रमावृत्त. रा.-तोडी. ता.- तेताला (राजविद्याधर)

मुनिवर का औरनकि कहे ॥धृ॥
ये मम तनपें हाल बीति है । जो श्रम जदुप सहे ॥ मुनिवर ॥१॥
बिप्रबचन जब बेदजननि पढ । मोपर उलट बहे ॥ मुनिवर ॥२॥
तब मम माता दौर दौर गयि । प्रभुपद सीर लहे ॥ मुनिवर ॥३॥
अंतर जामी सबके कुखगत । मो दृग प्रगट भये ॥ मुनिवर ॥४॥
अलकावति वल्लभनें राख्यो । गरभहि गोदलिये ॥ मुनिवर ॥५॥

## १३५२ / हिंदी

श्लोक -७, मुक्तमालावृत्त. रा.- दरबारी कानडा. ता.- तेताला.

सो अंतर पूरुख परमात्मा ॥धृ॥
अनजाने सो काल होत है, फेरि ग्रसत पापात्मा ॥ सो अंतर ॥१॥
दोहा - माया तिरिया मानुख जदुबर, सबके अंतर्यामी ।
अलकावतिवल्लभ बिभु बिक्रम, कहुं किमि करि है धामी ॥ सो अंतर ॥२॥

## १३५३ / हिंदी

श्लोक - ८, मुक्तामालावृत्त. रा.- यमन. ता.- तेताला.

अरु यामें कछु हुइ है शंका ॥धृ॥ (य९उ.२९७)
तुमबिन गुरुबर या सठ मनके । कौन निकारे पंका ॥ अरु यामें ॥१॥
दोहा - राम कहे रोहिणि के नंदन, देवकि गरभसु आये ।
सो कस प्रभु बिनु पुनर्‌जननके, रोहिणिपेट उपाये ॥ अरु यामें ॥२॥
अलकावतिजीवनबचननतें । मिटत सकलहि कलंका ॥ अरु यामें ॥३॥

## १३५४ / हिंदी

श्लोक - ९ ते १२, मुक्तमाला. (रसालाभेद.) रा.- बहार ता.- तेताला.

तज पितुगृह अपने जदुराई ॥धृ॥
कौन हेत गोकुल म्याने गे । कसकिइ खेल खिलाई ॥१॥
दोहा - मथुरामें किनते दिन पैठे, क्यौंकर मातुल मारे ।
मायिक मानुख सुरयादव जे, तिनसंग कितने ठारे ॥२॥
कितनिक नारी बरिहै, प्रभुबर, कब फिरि गोकुल आये ।
ये सब कहिये और दयाघन, जो तुम हियमें पाये ॥३॥
सोभी कहिये सद्गुरु स्वामी, मम मतिवर्धनहेतू ।
अलकावतिजीवन तुम बिनु अरु, कोउन ग्याननिकेतू ॥४॥

## १३५५ / हिंदी–मराठी

श्लोक -१३, मोहरी. रसालावृत्त.रा.- गुर्जरी तोडी.ता.- तेताला. (राजविद्याधर).

कानन पान करत बचनसुधा ॥धृ॥
अमर होत जी देखत मोहे । मंगलमय सब बसुधा ॥ कानन ॥१॥
भूक तहान सकळ हरली मम । सोडियलें अन्न-उदा ॥ कानन ॥२॥
ज्ञानराज जननिये रिझविं मज । पाजुनि स्तन्यदुधा ॥ कानन ॥३॥

## १३५६ / पद

लावणीचे चालीवर.भला जन्म हो तुला लाधला या चालीवर.



सूत म्हणे शौनका ऐकुनी विष्णुरात वाणिसी ।
तोष अति शुक मुनिच्या मानसी ॥धृ॥
म्हणे धन्य धन्य या जगीं मज तुजसम कोणि न दिसे ।
असे ज्या यदुवल्लभ पदपिसे ॥
कर्मी ज्ञानी योगी फिरती कितिक याच लालसे ।
पडति परि कालकरीं आलसें ॥
॥ चाल ॥ इंद्रियविंगलशयनीं सुखनिद्रा कशी ।
मस्तका तळवटी कामक्रोधफणि उशी ।
पाठीस लागती तनय युवति वीवसी ॥ (य९उ.२९८)
॥ चाल पहिली ॥ अशा मधें तरति ते भजति जे व्रजवर दिवसा निशी ॥
इतर ते पडति यमाच्या फशीं ॥ सूत म्हणे शौनका ॥१॥
राया तुज कथितों तच्चरिता जो करुणाकर हरी ।
स्वकरविक्रमें धराभर हरी ॥
अनध्यस्त जो विवर्त चित्सागरविदूषलहरी । स्मरतां नामबंद संहरी ॥
॥ चाल ॥ दीनाचि काळजी अविकळ ज्याला पडे ।
जो उकलुनि काढी षडरिपुचे धापडे ।
यद्यजनि अनिच्छा अपवर्गहि सांपडे ॥
॥ चाल पहिली ॥ कथा तयाच्या ऐकुनि पावन होती मति आळसी ॥
निवारे भीति कळीकाळसी । सूत म्हणे शौनका ॥२॥
प्राणसंयमन करुनि उगी का करणें तनु घाबरी ।
तुटेना जंव माया साबरी ।
नंदतनय भजनाविण नोहे आन वासना बरी ।
मागते जिभ जे गुळखोबरी ॥
॥ चाल ॥ हें ओळखुनी जो त्यजितो लवकर भवा ।
मानोनि श्वानविष्ठेसम या वैभवा ॥
तो आवडतो अंतरिं अति माधवभवा ॥
॥ चाल पहिली ॥ ज्ञानेश्वर चरणांबुज सेवी राहुनि सुखसौरसीं ।
वर्णि जो हरिलीला नवरसी ॥ सूत म्हणे शौनका० ॥३॥

## १३५७

श्लोक - १५,१६ पद. भला जन्म हा तुला लाधला. या चालीवर.

किति वाणू वाणावा रुचसी शिष्यहि असी जरी ।
वदविसी चरितामृतवाग्झरी ॥धृ॥
वेदान्तीं शिष्यप्रश्न गुरुला ओढुनि तळिं आणवी ॥

वचनें नसता भ्रम मानवी ॥
भक्तिशास्त्री शिष्यप्रश्न गुरुला अधिक ब्रह्म मानवी ॥
उपजवुनि यदुपतिरति नवनवी ॥
॥ चाल ॥ कोरड्या ज्ञानिया जन-निरुपणसांकडे ॥
हरि धावुनि येतो आपण दासाकडे ।
ज्ञानी हरिभक्ता सगुण सहज सांपडे ॥
॥चाल पहिली ॥ प्रेम तयाला सदाचि उपजे व्युत्थानहि हो जरी ॥
दिसे दिठिं सगुण तनू साजिरी ॥ किति वाणू ॥१॥
भोग भोगुनी रायपणें तूं मिळसी अपुनर्भवा ॥ चिंतिसी आवडिनें माधवा ॥
अनंतकोटीजन्मपुण्यबळलब्ध बुद्धिवैभवा । सहज उडविलेंसि लाथें भवा ॥
॥ चाल ॥ यच्चरणनीरलवतुषार जन शंकरीं ।
यद्विक्रमयशवशगत ऱ्ही श्री किंकरी ।
यल्लीलाश्रवणें पातकि पावन करी ॥
॥ चाल पहिली ॥ वक्ता श्रोता पृच्छक अलकावतिपति भजती जरी ॥
(य९उ.२९९) पावती सायुज्या साजिरी ॥ किती बाणू ॥२॥

१३५८ / भूमिद्दप्तनृपव्याज -

श्लोक १७.भला जन्म हा  तुला लाधला. या चालीवर

कर्मजन्य तनु नव्हे हरीची म्हणुनि भक्तमानसीं ।
प्रगटते सगुणमूर्ति सानसी ॥धृ॥
कामक्रोध उमटतां हृदयीं देहास दुःख वाटते ।
नयनिं येऊनि पाणि थाटते ॥
चंचल मति अति होतां गति वायूचि कंठि दाटते ।
विघट तें तोषचक्र गाठतें ॥
॥ चाल ॥ या समष्टि महिवर दैत्य मातता तसे ।
जनतापें भूला कष्ट होति भलतिसे ॥
मग विनवि अजा ती सततचि हा क्रम असे ॥
॥चाल पहिली ॥ तदन्वयें या द्वापरिं धरणी शरण गेलि विधिपशीं ।
प्रगटतें सगुण मूर्तिसानसी ॥ कर्मजन्य० ॥१॥

श्लोक १८, १९

वृषभरूप हरि धर्म तयाचा ब्रह्मासुत पाहुनी ॥
रडे महि गायकाय घेउनी ॥
माय रडे कीं काय समजुनी विधि आला धावुनी ॥



बोलली मही श्रम न साहुनी ॥
चाल ॥ ब्रह्मा ही वचना ऐकुनि ना भी म्हणे ॥
मग शिव शचिवर सुर महिसह अवघेजणे ॥
पावोनि पयोनिधितट विनविति तनुमनें ॥
चाल पहिली ॥ अलकावतिपति दीनदयाला निवारीं जनहानिसी ॥
प्रगटते सगुणमूर्ति सानसी ॥ कर्म ॥२॥

१३५९

श्लोक - २०. तत्र गत्वा जगन्नाथ. ''भला जन्म हा तुला'' या चालीवर.

गरुडध्वज तोचि वृषभध्वज जाणुनिया अंतरीं ॥
वर्णिती सुरमुनि नानापरी ॥धृ॥
सवें घेउनी ध्येयमूर्ति ती शैवतनू साजिरी ।
विष्णुपदिं ठेविति हो रति खरी ॥
जगन्नाथ आणीक वृषाकपि मुळीं पदें साजिरीं ॥
अर्थ हा निघे तेथुनी तरी ॥
चाल ॥ विधि हरि हर तीन्ही सम निगमीं बोलिले ॥
परि ईश्वरइच्छे अवघे गुण चालिले ॥
तत्प्रेरणेविना कधिं न पर्ण हालले ॥
चाल पहिली ॥ ओळखुनी हे पुरुषसूक्तमय स्तुति करिती साजिरी ॥
वर्णिती सुरमुनि०॥१॥
सहस्त्रशिर तूं अससि मूर्धनी अनंत उपलक्षणें ॥
सहस्त्राक्षा तुज जगदीक्षणें ॥
सहस्त्रचरणा तुला कठिण ना धरणिदुःख वारणें ॥
फेडि हरि दीननयनपारणें ॥
चाल ॥ भूमी जल वन्ही पवन ख व्यापुनि तुवां ॥ (य९उ.३००)
उरलासि दशांगुलीं निगम म्हणे आघवा ॥
प्रभु करि करुणा वारुनि मायालाघवा ॥
चाल पहिली ॥ यज्ञें यजुनी अर्पु सकलही श्रीअलकावतिपतिवरी ॥ वर्णि०॥२॥

१३६० / ब्रह्मदेव उवाच -

श्लोक - २१ ते २५, कंकणवृत्त. लावणी भेद.

विधाता सांगे सुरकर्णी ।
ऐका हो तें वदले माझ्या कमळावर कर्णी ॥धृ॥
पुरा पुरा येणेंचि ठेविला विचार हा करुनी ॥

धराभरा तें हरिल तुम्हासह गोकुलिं अवतरुनी ॥
दीनबंधु हा स्वामि दयानिधि दानवतमतरणीं ॥
नाना परिच्या लीला करुनी झटल भक्ततरणीं ॥
देव तुम्हीं यादव व्हा सारे जन्मुनियां अवनीं ।
तत्प्रियार्थ सुरकामिनि सुजनत हो बल्लवभवनी ॥
गाय वासरुं रूपजन्म घेवोत सर्व सुमुनी ॥
दुधा सुधासम पाजोत तयां यदुवरदा नमुनी ॥
अशेषांश तो शेषचि आधीं येइल अवतरुनी ॥
माया हरिची जन्मुनि परतल झटिति कार्य करुनी ॥
अद्भुत करणें कृति भगवंता चिंता त्यज धरणी ॥
ज्ञानेशस्मरणीं हो सावध अपुल्या उद्धरणीं ॥ विधाता सांगे सुरकर्णीं०॥१॥

१३६१

श्लोक - २६ ते ३५ पद. ''दत्तात्रय चतुराक्षरी मंत्र'' या चालीवर.

वदुनि असे ब्रह्मादिदेव आपुल्या गृहीं गेले ॥
शुक सांगे नरपाला हरिनें पुढें काय केंलें ॥धृ॥
शूरसेन भूपतीपुत्र वसुदेव एक होता ॥
निखिलसगुणसंपन्न द्विजवरभक्त महा होता ॥
मथुरापुरिं उग्रसेन त्याला कंस पुत्र होता ॥
बहिण त्याचि देवकी करी तल्लग्नयोग्य होतां ।
दिधली ते वसुदेवालागीं । उत्सव बहु केले ॥
शुक सांगे नरपाला हरिनें पुढें काय केंलें ॥१॥
दिधलें आंदण दास दासि रथ जे किं उचित थोरा ॥
भगिनिरथा चालवी कंस तो धरुनि वाजिदोरा ॥
परि आनंदामध्यें ऐकिलें सुरवचना घोरा ॥
देवकिचा आठवा तनय तुज मारिल रे पोरा ॥
तैं शठ तत्कच आकळोनी म्हणे उतर मेले ॥
शुक सांगे नरपाला हरिनें पुढें काय केंलें ॥२॥
भोजराज कुलउपवनवन्ही करिं घेउनि शस्त्रा ॥
कंठ तोडुं धांवला मूर्ख रक्षाया तनुवस्त्रा ॥
निरखुनि तैं वसुदेव अशा त्या भगिनिहा कुपात्रा ॥
म्हणे हाय दैव इचें काहे निर्मियलें धात्रा ॥ (य९उ.३०१)



अलकावतिपति रक्षिल पाहूं रचुनि साम खेळे ॥ शुक सांगे ०॥३॥

१३६२

वदला राया करिसी काय ॥धृ॥
भोजकुळीं विख्यात सगुण तूं । शूर वीर महिराय ॥ वदला ॥१॥
स्त्रीवध निंद्य तयांतहि घालिसि । भगिनीवरि कां घाय ॥२॥
मंगल समयीं पाप आचरुनि । काळ न सोडिल काय ॥३॥
आज उद्यां मरणें परि साधुस । राखि आळंदिशमाय ॥४॥

१३६३ / श्लोक

३७ ते ४१ पद. ''दत्तात्रय चतुराक्षरिमंत्र.'' या चालीवर

परब्रह्म नेणती म्हणुनि हा भवविभ्रम भासतो ॥
तनुसह उपजुनि मृत्यू पळपळ करि आयुर्नाश तो ॥धृ॥
इंद्र वरुण यम कुबेर ब्रह्मा रुद्र आदि सुरगणा ॥
काळ खाय मग कोण विचारी तेथ अल्प नरगणा ॥
महातापसी हठी योगिया धूम्रपानि मुनिजना ॥
मृत्युदेव तो भिवविं नगारा वाजवुनी झणझणा ॥
महाबळी ब्रह्मांडाचाही निमिषें करिं घास तो ॥ तनुसह० ॥१॥
अनिवार्यचि जे तयाप्रति उगे भिवोनि फळ कायसें ॥
आजवरी तरि कुणे मिळविलें सदमृतफळ कायसें ॥
तूं तरि अणुपरि थोर हरपले रंतिदेव रायसे ॥
धन्य तोचि पळ मिळेल तेथें करितो सदुपायसे ॥
जनन मरण चरटफणी जाणे करि ब्रह्म वासतो ॥ तनुसह० ॥२॥
स्वप्नीं अथवा मनोराज्य हें करितां जागृतिंत ही ।
तीव्र वेग पावतां लाधतें होउनि तनु ग्रंथितही ॥
पूर्वदेह विस्मरणहि पडतें मानसजविकृतींतही ।
तसे जनन मरण हें प्रसरण कुंचन प्रकृतींतही ॥
साच वासना मानि तया ज्ञानेश्वरसुत हासतो ॥ तनुसह०॥३॥

१३६४ / हिंदी

श्लोक - ४२ मुक्तमालावृत्त. रा.-बिलावल. ता.- तेताला

करम किया सो कबु नहिं छूटे ॥धृ॥
करमहि केवल सरग अमर बडे । करमहि ते नर छोटे ॥१॥
दोहा - जस जल मालीके कर तहांलों चाहे वहां वह लोटे ।

बसकेदार गये नीर तब आपहि आपहि लौटे ॥ करम० ॥२॥
तसजहांलों जिय मीत तहांलों हिय जानो अपने हथिया । (य९उ.३०२)
तनुपतनसमे दैवबिबस मन चलने देत न बतिया ॥३॥
स्वप्नबिबस जस विपरित देखे भार मुवा अरु जीता ।
उत्तम नीच तथा नर देखत जो अपनेपर बीता करम ॥४॥
जाते जहलों जतन हाथ निज तहंलों नेकि बनावो ।
अलकावतिवल्लभ करुणाघन पग पलपलहि मनावो ॥ करम०॥५॥
(अपूर्ण)

# रुक्मिणी स्वयंवर

वैदर्भीय कुणबी भाषेतील 'दडंगी लावणी'चे चालीवर.

१३६५

अंबेच्या देऊळीं लौकर यावें यदुराया ।
हा मज वैरी शत्रू झाला बंधू रुखमाया ॥धृ॥
तीर्थामंधीं तीर्थ जाना कौंडणपुर भारी ॥ होइन पुंन्याची शामगिरी ॥
तेथला राजा भीमकराना पराक्रमी थोर । त्याले होते चवघ पोर ॥
चवघा पोरा पाठीवरते कन्या सुंदर । रखुमिनी झाली सकुमार ॥
मंग चवघा पोरांहुन बापाचा लोभ तिच्यावर । तिनेंच मोहिलें अंतर ॥
पाहुन उपवर इचार करितो आपुल्या मनिं राया ॥१॥
सुकीर्ति नांवाचा बाह्मन तव्हा आला मनसबीत ।
चार हाताची मुरति सावळी गून वानत ॥
देवलोकीं नागलोकीं नाहिं तसा तिरभुवनांत ॥ पाहता मनिं पुरतो हेत ॥
असी ऐकुन गोष्ट पोरगी दचकलि मनांत ॥ मंग तें रूप हुर्दयांत ॥
किस्न व्हावा पती म्हणुन पडे मंग पित्याच्या पाया ॥२॥
बाप ह्मने बाई ग पुस्तों मोठ्या पोराले । पाहु मंग काय तो बोले ॥
बाप ह्मने रुखमाया पोरगी द्यावी किस्नाले । ऐकुनी पोरग मंग बोले ॥
सर्वे काय आतां बाबा जितेचि कीं मेले ।
सांडुन मोठे राजे रे पोट्टी देतां गवळ्याले ॥
शिशुपायाले पत्र मंग धाडे रुखमाया ॥ हा मज वैरी०॥३॥
असी गोष्ट ऐकुनी रुखमिनी रडे मनांत ॥ कहीं येतिल किस्ननाथ ॥



कोना हातीं आतां ग बाई धाडूं मी खत ॥ **(य९उ.३०३)**
मियाले वैरी घरांत । तव्हा पाहिला सुदेव मंग त्याच्या पडली पाया ॥
ह्मने हें पत्र द्या युदराया ॥ अंबेच्या देउळी ॥४॥
दुरगावरते उभी रुखमिनी न्याहाळे भार ॥
डोळां पाहीले रथ हत्ती घोडे बहु फार ॥
ह्मने रुखमिनी कहि हे मरतिल अवघे जनभार ।
वरिन मी गवळ्याचा वर ॥
खाले भाले वरते पडली छत्रीची छाया ॥ हा मज वैरी० ॥५॥

द्वारकेत -

दारकेमंधी बाम्हन गेला निरखला देव । भुलला घरदारभाव ॥
महिनाभर राहिला भुलला पत्राची ठेव । पाहतां मुखें वासुदेव ॥
वाट पाहे रुखमिनी मला कां त्यागिलें युदराया ॥ हा मज ० ॥६॥
शंभर जल्म पन केला म्हणुनशिन्या देवा । आले नाहीं आमच्या गांवा॥
लग्न हें जरी होतें तरि मंग उचलुनियां न्यावें।राहुनी करिन तुमचे सेवे
राजकुळांतिल आहें परि मज रांडेपरि ठेवा । माझा अंगीकार करावा॥
दंडवत साष्टांग प्रभुजी मी घालते पाया ॥ हा मज वैरी०॥७॥
आतां जरी न याल तुमही गड्या यदुनाथा । देईन प्राण आज आतां॥
शंभरजल्म पन केला तो सत्य करितां । वरिल मी दुज्याजल्मिं नाथा॥
होती शकुन उत्तम फडफड लागलि उजव्या हाता । डोळा मंग डावा लवता॥
उजव्या हाताची मंग फडफड हे होतां । सकुन डावा डोळा लवता ॥
होतां निश्चय नयनिं आज मी पाहिन यदुराया ॥ हा मज वैरी०॥८॥
देवा जातो आम्ही आतां आपुल्यारे नगरासी ॥
असे ऐकुनी बहूत धन मंग देल्हे तयासी ॥
आज्ञा घेउन इप्र तव्हां चाललारे मार्गासी ॥ मनामंधि आठवले भिमकिसी ॥
पुन्हा आला परतुन पाहे न्याहाळुन किस्नासी । देल्हे मंग हातीं पत्रासी ॥
पत्र फाडुन वाचुं लागला तव्हां ऐकवाया ॥ एकही अक्षर नसे वाया ॥९॥
तुह्या गुनाची तारिफ कोणी करूं न सके ॥ काय मी वर्णुं एका मुखें ॥
अशा अर्थाचे लेहले तेव्हां सात इस्लोक ॥ पाहुनी देव करी शोक ॥
देव वाचितां भीमकिपत्र आसा येति डोया । ह्मने मी घेउन येइन राया॥१०॥
श्रीकृष्ण उवाच -
एकालाच आणिन हरुनि सकळी मारुनि बावडे* ।
तुझ्या मी संग येत गाढे ॥ **(य९उ.३०४)** *(*ढेकुण)*

कांही नको माह्यासंग रथ हत्ति घोडे । देऊळीं चलावें ॥
माडीवरती बसुनशिन्या मंग येइल ते पारी । तशिच मंग घालिन खांद्यावरी॥
आमुचें कुळदैवत देवी तेथ तिच्या घरीं ॥ दोघाले रात होइल सारी ॥
असें ह्मनुन मंग देव पडले बाह्मनाच्या पाया ॥ हा मजवैरी ॥११॥

कौंडिण्यपुरीत -

देव येतो हे गोष्ट जेव्हां कळलि भीमकीले ॥ तव्हा मंग सामने आले ॥
देवीच्या देवळांत कृष्ण महाराज बोले ॥ तेथ एकटेच बसवले ॥
घरी जाउन सामान सुमान मंग धाडुन देले ॥ पाठवी मंग तेथच मायले ॥
किस्नसेवेसाठी रायानें लावली काया ॥ हा मज वैरी ॥१२॥
पाहुनी बाम्हन रुखमिनि बाई पडतें पाया ॥ ह्मने मी ओवाळिन काया ॥
पत्र नेउन सख्या तुह्मी आनले यदुराया ॥ सद्गुरू तुह्मि विप्रराया ॥
सद्गुरु वाचुन हरीची भेटी कदा नव्हे राया ॥ पावलें मी तुमच्या ठाया ॥१३॥
नको ह्मने गुरु मला बाई तुझ्यान परसंग । ह्मनुनशिन्या झाला कृष्णसंग ।
अंबेच्या देवळांत उतरले बाई श्यामरंग ॥ तयाचें हातिं धरीं अंग ॥
आसिरवाद देतों तुजला वरसिल यदुराया ॥
असें ह्मनतां रुखमिनिबाई मंग पडली पाया ॥ अंबेच्या ॥१४॥
रुखमिणीबाई ऐकुन वचन ब्राह्मनासि धन ॥ मोहरा देल्या मग काहाडुन ॥
मोहरा घेउनशेन्या घरीं गेला बाम्हन ॥ मंग दुरगाहुन पाहिला किस्न ॥
आलि लग्नाची वेळ हळद आनली तीकून ॥ तव्हां राव बोले आपन ॥
आधीं लावुन हळद न्यावी देवळांत बाया ॥ तेथ मंग बोले रुखमाया ॥१५॥
न बोलावतां आला गवळी कपटी । तोच नेईल पोट्टी ॥
बाप ह्मनें तू बायल्या सारखा काय बोलतोरे गोष्टी ॥
ईर असुन तूं तुह्या सामने कशी नेइल पोट्टी ॥
ऐकुन बापाच्या वचना बोलता मंग झाला रुखमाया ॥
महा पराक्रम पोट्टि नेउं न देऊं गवळ्या या ॥ अंबेच्या देऊळीं ॥१६॥
सखे ग बाई देवी तुजला वाहतें प्राण ॥ परी तो पति व्हावा कृष्ण ॥
तुझ्याच योगानं स्त्रिया होती सौभाग्यसंपन्न ॥
ह्मणुनि मी प्रार्थितें तुज लागून ॥ (य९उ.३०५)
असें ऐकतां देवी ह्मणे नको देउं प्राण । तुजला पति होइल कृष्ण ॥
निळ्या कमळाची माळ मग हातांत देऊन । ह्मणे तूं गळां घाल नेऊन ॥
असें बोलतां देवीचरण वंदे रुखमीण । काया घेतलि ओवाळून ॥



माळ घेउनशन्या मग आली दाराच्या पाया । हा मज वैरी० ॥१७॥
बाहेर जेव्हां आली तेव्हां मग तेजाच्या बळें । फुटले समद्यांचे डोळे ॥
पडलि रुक्मिणी पाहुनशन्या वैकुंठ पाया । उचलोनि रथावरि चढे यदुराया॥
कृष्ण पाहतां रथावरी मग टाकली माळा ॥ हा मज वैरी० ॥१८॥
ब्रह्मादिक देव ह्मणती पुण्याहं वाचे ॥ विमानीं बैसुनि देवाचे ॥
देवांचा गुरु बृहस्पती मंग तोहि वेद वाचे ॥
देवांगना परमस्वासिनी करिती अक्षदाचे ॥ सत्यपति मग करिती साचे ॥
याचपरी मग रुक्मिणीबाइनें वरलें युदराया ॥ हा मज वैरी० ॥१९॥
पुढें कथा मंग लढाईची बहुत आहे । मिळाले रुक्मिणी कृष्ण पाहे ॥
तेच वंदुनी आपुल्या मंग हुरदयांत राहे । ज्ञानदेव परम सुखी आहे ॥
ज्ञानेश्वर प्रभुच्या मस्तक ठेवू पाया ॥ हा मज वैरी शत्रू झाला बंधू०॥२०॥

॥ रुक्मिणीस्वयंवर समाप्त ॥

# विरहिणी पदे

## १३६६

सुशिला. राग- बेहाग. ता. तेताला.

जाउनी आणा नंदलाल ॥धृ॥
त्याविण मंदिरिं मंचकिं माझे । झाले गे बहू हाल ॥ १॥
धावुनि जरि तेथवरि जावे । माझि हंससम चाल ॥२॥
योगियांच्या ध्यानिं नये तो । मजसि काय नेहाल ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या कर जोडुनि । ठेवी सखिपदिं भाल ॥४॥

## १३६७ / हिंदी

जयावृत्त. मूळ-भैरव. ता.- दादरा. गौण.- जागियो कृपानिधान.या चालीवर

सुरवर मिल तुम मेरे पतिको हित चाहो ।
सब देवन चरण नवति झटिति पिय मिलावो ॥धृ॥
श्रीगणेशपति मगके बिघन सब छुडावो ।
मृत्युंजय शिवसोहाग चिरहिं मम बढावो ॥१॥ (य९उ.३०६)
कात्यायनि जगज्ञननि सुन नंदिनि टेरी ।
नंदनंदन देश गये लाय देहुं फेरी ॥२॥
सुरज मेरि बिनति सुनो तेज बहु तुम्हारा ।

नंदनंदन पंथ चले मत डारो अंधारा ॥३॥
नारायण करुणाघन तुम सबके दाता ।
तुमही हो कृष्ण किन्तु राखो ब्रिजनाथा ॥४॥
पंचायतनाख्यचक्र पूंजति मनमांही ।
ज्ञानेश्वरतात दया हिरदें भर आई ॥५॥

१३६८ / हिंदी-मराठी

नटिनीवृत्त. मूळ - जोगी. ता :- दीपचंदी.गौण.'याच्यावीणे ग'

॥ मोहरी ॥ मी तो एकटि मंदीरी नारी । कब आवेंगे फिर पूतनारी ॥ध्रु०॥
हरी करते है सुंदरियोंकी चोरी । मैं तो दीनहुं गरिबकी छोरी ॥
चाल ॥ कौन मेरा करेगा प्यार । कैसी पावोंगि संसारपार ॥
चाल पहिली ॥ भयी आज सबनसे न्यारी ॥ कब आवेंगे ॥१॥
आतां कोणत्यानं वाटे मी जाऊं । नंदनंदनपद कोठें पाहूं ॥
चाल ॥ बाई नलगे ग मजला चोळी । नाही मागत मोत्यांचि जाळी ।
चाल पहिली ॥ शाम सुनेंगे कब अर्जी म्हारी ॥ कब आवेंगे ॥२॥
औरनि समान नाही मै खंदी । कीनी हूं दैवने जनम अंधी ॥
चाल ॥ तुम तोभि कहो कछु बाता । ल्यावो मंदीर अलंदिकांत ॥
चाल पहिली ॥ मीली चलियें इंद्राणि किनारी ॥ कब आवेंगे ॥३॥

१३६९

सामनुष्टुपवृत्त. मूळ-भूप. ता. - तेताला. गौण. 'ऐशा गोपिका'

ऐक साजणी जिवीच्या खूणा । कालपासोनि धीर येतो मना ।
बाई येईल श्रीहरी पाहुणा । ऐसे सांगे गुरू चतुर शहाणा ॥ ऐक०॥१॥
कचग्रंथी विरळ होताती । तेल न घालतां दीप उजळती ।
देह-ओजें पापेही जळती । वामनेत्रपापण्या पुंजाळती ॥ ऐक ०॥२॥
ज्ञानेश्वर माउली कृपावंत । तिच्यामुळे मंदिरीं आले संत ।
तिहीं कथिले येताति भगवंत । बाई यथार्थ बोलती हे महंत ॥ ऐक ०॥३॥

१३७०

कंचुकीवृत्त. मूळ. यमन.-ता.- धुमाळी. गौण. 'या या यादव नायक जी'

लवकर या व्रजनायकजी । पीडित रतिपति सायकजी ॥धृ॥ (य९उ.३०७)
सान मी एकटि सुकुमारा । इच्छिते जवळिं नंदकुमारा ॥१॥
कोणि द्या सुलग्न दैवज्ञ । ज्यानं मिळतिल हरि सर्वज्ञ ॥२॥
मी नूतन ऋतुमतिरामा । चिंतितें हृदयिं पूर्णकामा ॥३॥



आम्हिं बहु परतंत्रचि अबला । परि ज्ञानेशकृपें प्रबला ॥४॥

१३७१

सामनुष्टुप. रा.-मांझी. ता. तेताला.

कधिं येतिल घरीं नंदलाल ॥धृ॥
आजचि मंगलस्नान करूनी । सुकविले बाई बाल ॥१॥
उतावेळ बहु मी तत्कंठी । घालाया फुलमाळ ॥२॥
ल्याली कुंकुम भाळ भरोनी । केले निर्मळ गाल ॥३॥
आणाया सत्ताधीश प्रभु । गुरु अलकावतिपाल ॥४॥

१३७२

साममाणव. मूळ.- पूर्वी.ता.- दीपचंदी,.गौणः- 'राधे घडि घडि' या चालीवर.

कधि येतील पंढरिराव । मनिं लागलि फारचि हाव ॥धृ०॥
कांहीं सांग गडे तूं उपाय । जेणे लाधति यदुवरपाय ॥ कधि येतिल ॥१॥
काल सांगोनि गेले कोणी । घरिं येतील सारंगपाणी ॥ कधि येतील ॥२॥
मशि सांपडला ग उपाय । वंदु भावे अलंदीशपाय ॥ कधिं येतील ॥३॥

१३७३ / हिंदी

कुरंगाक्षीवृत्त. रा.- तिलंग (खमाज.) ता.- तेताला.

माई मोहे सपन दिखापनि रात ॥धृ॥
सोती थी घरमांहि अकेली । आयकिये प्रभुबात ॥ माइ मोहे ॥१॥
देखत देखत परमानंद । प्रीति बनगई सात ॥ माइ मोहे ॥२॥
यदुपतिको पति बरने कारन । भजति अलंदीनाथ ॥ माइ मोहे ॥३॥

१३७४ / हिंदी

सुशीलावृत्त. रा.- केदारा. ता– तेताला.

कब कहो आवेंगे सखि शाम ॥धृ॥
घरद्वार सब छोरदिया मैं । भइ हूं उनकि गुलाम ॥कब ॥१॥ (य९उ३०८)
सगरि रयन मोहे तलफत बीती । सुमन मयन[1] बेफाम । कब कहो ॥२॥
बिरहबिबस पल बरख गनति हूं । ले विठ्ठलसुतनाम ॥ कब कहो ॥३॥

(१. मदन)

१३७५ / हिंदी

रंजितावृत्त. रा.- यमन कल्याण. ता.- तेताला.

लगि माई मोहनियाकी प्रीत ॥धृ॥
रात पलंगपर नींद न आती । डरति अकेली नीत ॥ लगि माई ॥१॥

जन मेरे मुखपर थूकत है । नहिं मै लावति चीत ॥ लगि माई ॥२॥
अलकाबतिपति तात कहेंगे । हरी मिलनकी रीत ॥ लगि माई ॥३॥

१३७६ / हिंदी

सुशीला. रा.- असावरी. ता.-तेताला

अब मत देखो अंत ॥ प्रभुजी ॥धृ॥
अकेले हो गोपिगृहनमें । और तो रूप अनंत ॥ प्रभुजी ॥१॥
तुमही ब्रह्मा तुमही विष्णु । तुम शंकर भगवंत ॥ प्रभुजी ॥२॥
अलकावतिपतिबचनश्रवणतें । राहा बतावत संत ॥ प्रभुजी ॥३॥

१३७७ / हिंदी

पढूं मै नाम, या गझलचे चालीवर.स्वैरिणीवृत्त.मूळ- भिमपलासी.गौण- पढूं मै नाम लेले दुख.

बिना ब्रजराजकूं देखे और नहिं शांतदाई है ॥धृ॥
गृहनके सौख्यसे मेरा बिरह दुख ये सवाई है ।
कने किस्के किसन बिनु ना ब्याधिहरनी दवाई है ॥ बिना ब्रजराज ॥१॥
किया है जल गुलाबोंका कछू नहिं थंड छाई है ।
सखी ल्यावो मुझे हरिकी हृदयमें याद आई है ॥२॥
अलंदीनाथको बिनती यही मैनें पठाई है ।
जलद आवो दयाशालिन् मिलन में ही मिठाई है ॥३॥ (य९उ.३०९)

१३७८

रंग-लावणीवृत्त. मूळ-पूर्वी ता-तेताला. गौण 'द्राक्षाचे मंडप'
'आधिल्या भ्रतारे काम नव्हे पुरा' या प्रमाणे. / परकिया नायिका

सखा मसीं सोडुनि गेला ऋतूच्या भरांत गे ॥
वाट पाहतां झाली बाई दुपाहेरि रात गे ॥ सखा मसीं ॥धृ॥
देउनियां उभी बाई दारावरि हात गे ।
कोणि नाहिं अझूनियां इकडुनि जात गे ।
एकाएकिं तुटला प्रेमा कैसि झालि मात गे ।
हुरहुरवाणें सये वाटते घरांत गे ॥१॥
मायेकडे मियां आजी धाडिला निरोप गे ।
विष पाठवावें आई करोनियां कोप गे ॥
सखा स्वप्निं मेळवाया घेते मृत्युझोप गे ।
अनुमान कांही आतां नाणि अंतरांत गे ॥२॥
पिकले हे पान बाई गंगेमध्ये सोडा ।
सख्यासाठिं विणवीला काल धोत्र जोडा ॥



येतां कोण्या सवतीनें घातला ग मोडा ।
कसा रूख बुडवीला वियोग पुरांत गे ॥३॥
सख्यासाठिं भरताराच्या तोंडिं दिला हात गे ।
दूधपीतिं लेंकूरें म्यां सोडिली वनांत गे ॥
नाहि ओळखीले थोरां आपुल्या मनात गे ॥
विसरूनि कांटे गोटे हिंडि दिनरात गे ॥४॥
आजपासुनि मी कांही नाही बोलणार गे ।
चालवील तैसेपरि सुखे चालणार गे ॥
सवतीच्या निंदेमध्यें नाहिं डोलणार गे ।
एकवेळ मिरवूनी आणावी वरात गे ॥५॥
कोणाच्या मी आज बाई तोंडाकडे पाहूं ।
कवणाचे मिष्ट उष्टे सेवोनियां राहूं ॥
कोण पाठिं माझ्या, म्हणुनी लोक बोल साहुं ।
कुणापुढे रडूं हृदय तंतुच्या सुरांत गे ॥६॥
सुखी राहोत की माझे आळंदीश तात गे ॥
तेचि ठेवोनीयां माझ्या माथां शूभ हात गे ॥
आणतील मेळवूनी गोपिकांचा नाथ गे ।
आठवितें दोघांनाही मनोमंदिरात गे ॥ सखा मसीं ॥७॥

१३७९ / हिंदी

सुशीलावृत्त. रा.- यमन. ता-राजविद्याधर. (तेताला)

मोहे बिरहकि लागी चोट ॥धृ॥
रात पलंगपर नींद न आई । गये नयनसे लोट ॥ मोहे बिरहकि ॥१॥
वाणीचतुष्टय नाद घुमाया । नाहिं मिलाये ओठ ॥ मोहे बिरहकि ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु शिक्षा लेकर । पी ॐकार अलोट ॥ मोहे०॥३॥ (य९उ३१०)

१३८०

नटिनीवृत्त. मूळ.- जोगी. ता. दीपचंदी. गौण 'याच्यावीणे ग मजला. या चालीवर.

हरि वांचूनि मनि सूख नाही । झालें भिक्षूनि[1] यांच्या मी पायीं ॥धृ॥
शामसुंदर कोवळ्या आंगी । छबि पाहोनि मन गुंग रंगीं ।
सासुबाई यशोदाहि घरीं । कैसे येतील मजकडे हरी ।
॥चाल॥ आज मी तव एकाकि येथें । कोण जाऊनि सांगेल तेथें ।
माझा आठव देवोनि चित्ते ।

||चाल पहिली|| झोंपही ये न करू गत कायी || झालें भिक्षूनि ||१||
घरीं जाचती जन फार सारें । अंगि भरलें यदुराजवारें ।
तनु दडपीली बहु बांधमारें । मति दडपीली हरिकामभारे ।
||चाल|| झालि मी बाई पुरती ग वेडी । परद्वारीच लागली गोडी ।
केव्हा तुटतील घरच्या खोडी ।
||चाल पहिली|| सोसवेना मज जाच बाई || झालें भिक्षूनि ||२||
जहि होते ग वय बाल माझे । तहि भेटले यादव राजे ।
झालि होति वराया मी राजी । तंव बापें दिलें या समाजी ।
||चाल|| आज मरणेंचि उत्तम वाटे । घेऊं पीऊनि सोमल वाटे ।
प्राण पाठविते कृष्णवाटे ।
||चाल पहिली|| आसरा दे ज्ञानेश आई || झालें भिक्षूनि* ||३||
(१ संन्यासिनी)

१३८१ / हिंदी

वासंतीवृत्त. रा.- जीवनपुरी. ता.- तेताला. रस विप्रलंभ.

अब न धरूंगी धीर || नाथजी ||धृ||
ससि निकस्यो है गगनमंडलमों । बहता मंद समीर || नाथजी ||१||
बिरहबिबस अति व्याकुल भइ हूं । नयन चल रहा नीर || नाथजी ||२||
हृदयतल्पपर शयन कियेपर । वारोंगी लघु चीर || नाथजी ||३||
अलकावतिपतिनंदिनि बिरहिनि । चाहत पदनदिनीर[२] || नाथजी ||४|| (२.तीर्थ)

१३८२

सामनुष्टुपवृत्त. रा. यमन. ता-तेताला. गौण.'चला बाई पांडुरंग' या चालीवर.

असा कोणि तरी तुम्ही पाहिला कि सांगा । (य९उ.३११)
ज्याच्या दृष्टिपुढे सदा खेळणे श्रीरंगा ||धृ||
तयाच्या मी लोटांगणी जाते सहाष्टांगा ।
कृष्णासाठि गुलालाने भरिते मी भांगा || असा ||१||
ज्ञानेश्वरप्रभु माझ्या करिती भवभंगा ।
निर्लज्ज होउनी आतां जाते संतसंगा || असा ||२||

१३८३ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-बेहाग.ता.-धुमाळी. गौण.- भूपती खरें तें, या चालीवर

कोइ ल्यावो प्यारा देति सुन्रेका बाजा ।
उन बीन चैन नहिं हिय बिरहानल भूंजा || कोइ ||धृ||
जो सद्गुरु मोरा खूण बतावत राजा ।



मै भइ हूं तिनकी दासी सबन समाजा ||१||
मेरि आखनसे गिरी जलभर पानी बुंदा ।
कहां देखुं बताओ प्रीय मेरे मुकुंदा ||२||
कोइ है ऐसा जो निकारे मोहका कुंधा* ।
जो ग्यान बतावे हो अधिकारिभि मंदा ||३||
अलकावतिजीवन खडे हमारे काजा ||४||*(*एक प्रकारचे गवत)*

१३८४

सामकामदावृत्त.मूळ-झिंझोटी. ता- दादरा.गौण -''पांडुरंग स्मर अभंग''

बाई त्याचि पाउलाचि आवडी मना । जाउनियां कधिं मिळेन जगज्जीवना||धृ||
सुंदर तनु श्यामवर्ण दिसे कोंवळी ।पाहुनिया हरुनि चित्त होते बावळी ||१||
ज्ञानेश्वरपदपंकज सेवुनी सये । पाहुं सर्व भूतिं हरी नित्य अन्वये ||बाई०||२

१३८५ / हिंदी

रसालावृत्त. रा.- यमनकल्याण ता.-राजविद्याधर (तेताला)

सो रूप मोरे नयन बतावो ||धृ||
जो गोपीमानस हर लेत है । ब्रजबिच खेलत छावो || सो रूप ||१||
देखके घटपट प्रपंच ये सब । मनमो नहिं भुलि जावो || सो रूप ||२||
ज्ञानेश्वरप्रभुतात दयालू । आज्ञा हरि घर आवो || सो रूप ||३|| (य९उ.३१२)

१३८६ / हिंदी

वराननावृत्त. मूळ.-खमाज. ता.- तेताला. गौण.- जाग उठी मैं, या चालीवर.

लालाके आवनकी मैं सुनत खबरिया । नींद नहीं टक लागि नजरिया ||धृ||
जहं जावेंगे नाथ हमारे । तहं देखूं सोनेकि नगरिया || लालाके ||१||
दोहा - मै तो घरमें रही अकेली ओरनकी नहिं आस ।
कब आवेंगे बोल सखीरी लाल हमारे पास || लालाके ||२||
देवपगे मैं बिनती करती । कब देखोंगी हरीकी मुखरिया || लालाके ||३||
ज्ञानेश्वरगुरुचरन पकरि करि । होय रहूं पियहात मुदरिया || लालाके||४||

१३८७

सामकामदा वृत्त.मूळ-झिंझोटी. ता. यतिलग्न. (दादरा) गौण.वैशाखमास. या चालीवर.

सांग सांग तुलसि सखे कुणिकडे हरी ।
अत्यंतचि त्यांना तूं प्रिय शिरावरी || सांग सांग ||धृ||
शोधियले वृक्ष बाई बहुत आजवरी । परि म्हणुनि वासुदेव कोणि नोत्तरी||१||
कष्ट आमचे तुरंत आणुनि मनी । अंगिकारिं शिष्य तुझ्या सकळ भामिनी ||२||

त्या वांचुनि निकृतभाग्य आम्हि सुंदरा । ज्ञानेश्वरचरणिं प्रीति वाहुं कंधरा ॥३॥

१३८८

लावणी वृत्त.मूळ. पूर्या. ता. धुमाळी. गौण. 'घडि घटका मला' या चालीवर.

माहेराची आवड मोठी म्हणुनि सख्या मी हुळहुळते ।
बाई, दुःखाने जीव तळमळते ॥धृ॥
क्रोधपती तो कांहि वदेना दीरसवे आंग मळते ।
बाई, घडिघडि मन पाहुनि जळते ॥
जंव जंव द्यावे अन्न करूनी तंव आशासासू पुढं पळते ।
बाई, मायामगरी वरि गीळते ॥
काय करूं मी पाहुं कुणाच्या मुखाकडे । मज नच कोणी ।
बाई, गुरुविण दिसतें हुरहुरवाणी ॥ (य९उ.३१३)
चिंताग्निमधिं कोण मला आतां पाजल गोड शितल पाणी ॥
गडे कधिं पर्णिल सारंगपाणी ॥
तुम्हां संतांच्या हाती निरोपा पाठवितें मी या सदनीं ।
मला चैन नसे द्या करुनि धनी ॥
ज्ञानेश्वरप्रभु नाथा तुम्हाला हित माझे सकळहि कळते ।
बाई, दुःखानें जीव तळमळते ॥१॥

१३८९

लावणीवृत्त. मूळ-पूर्या. ता. धुमाळी. गौण.घडो घटका मला, या चालीवर.

माझ्या सुरती साठि सख्या रे टपति दुधावरी मांजर जैसी ॥
बाहते तुला मी श्रीहरी ऐसी ॥धृ॥
तव पायाची दासि इंदिरा तिच्यापुढे मी दिसते कैसी ।
कौमुदिस्पर्धी पिपिली जैसी ॥
परि सकळाला तूंचि कृपाळा समदृष्टीनें पाहसि स्वदेशी[1]।
न्यूनाधिकातें समसुख देसी ॥
बाळपणापासूनि दयाळा लावितसें मी कुंकुम भाळीं ।
की यावि तुजसी संलग्नपाळी ॥
वृंदावनिं तुज बहु भाग्याच्या भेटति प्रभूजी व्रजबाळी ।
स्वीकारि त्यामधे एक हि काळी ॥
पिवळ्या ढवळ्या निळ्या तुला त्या साजती सख्या वनमाळी ।
मजवरीहि ये हळदधुमाळी ॥



अलकावतिपतिबाला असें मी बहु निकुळा तुज विनविं आपैसी ।
बाहतें तुला मी श्रीहरी ऐसी ॥ माझ्या सुरतीसाठीं ॥१॥ (१.स्वाधिष्ठानी.)

१३९०

रंगलावणीवृत्त. मूळ. - पूर्वी. ता. राजविद्याधर. तेताला गौण.'द्राक्षाचे मंडप' या चालीवर.

प्रियकरा कृष्णा तुम्हां कोण्या स्थळीं पाहूं ।
किंवा ऊर्ध्वबंधाने मी प्राण आज देऊं ॥धृ०॥
तुम्ही गेले सोडोनी मी एकटि कां राहूं ।
वृंदावनी जातांचि मी गोपिसेवा लाहू ॥१॥
देणे होते शिक्षा तुम्हां जरी बळकट ।
तरी मज मारावे जी होते अवचट ॥२॥
गोपिकांची रजधूळ घेतां नारायणा ।
याल काय ऐशा तरी द्यावे भाकदाना ॥३॥ (य९उ.३१४)
माझि पापे बहू तरी काय तुम्हां पुढे ।
प्रलयाग्नि अग्रीं काय तृण तें बापुडें ॥४॥
बहु बहु श्रमलें मी करुनीयां शोध ।
आणते मी तुम्हा आतां पिऊनि गुरुदुग्ध ॥५॥
सांपडली युक्ति मजला सफळही देवा ।
जीवेभावे करीते मी ज्ञानेश्वरसेवा ॥६॥

१३९१ / मोहरी / हिंदी-मराठी

जयंतीवृत्त. मूळ- यमन. ता.- धुमाळी. गौण.- राधा मुखडन. या चालीवर.

भली बुरी मैं कैसी ही प्रभु तुम स्वीकार करो ।
तुमच्या करुणे सौभाग्यानें आपुलें सदन भरो ॥धृ॥
त्रीभुवनांतिल शत्रू तुमचा रांडलेक जळुनि मरो ।
तुम्हरे चरणपर सुरवर अरु मुनिजनका प्रेम जरो ॥१॥
सब जगमुखतें तुह्मरी प्रभुजी कीर्ती सहज झरो ।
तुमच्या स्मरणें सकल जनांचा किल्मिषभार हरो ॥२॥
गिरती हूं प्रभु अधःपतन मै तुम मुझे अधर धरो ।
तुमच्या वांचुनि कोणी मजला कधिं स्वबळें न वरो ॥३॥
आवो आवो अलबेलि रंगेला तुह्मरी पांव परो ।
मम हृन्मंदरमाहि प्रेमतल्पकपें शयन करो ॥४॥
भक्तहृदयमों स्थान प्रभुजी अपनि दयातें करो ।

तुमच्या ध्यानें रिपु क्रोधकामसमुच्चय संहरो ॥५॥
तुह्मरि नामतें त्रिविध कर्म यह जरिके खाक भरो ।
ज्ञानेश्वरप्रभु तात दयालू करुणा नित्य करो ॥ भली बुरी मैं ॥६॥

१३९२

रंगलावणीवृत्त. मूळ. पूर्वी. ता. तेताला.गौण.द्राक्षाचे मंडप. या चालीवर.

पती मशी सोडुनी गेले ऋतुसमयांत गे ॥ध्रु०॥
आईबापें केले माझे स्वयंवर बाई ।
अज्ञान मी होते तेव्हा कळत नव्हते कांहीं ।
आतां झाली पूर्णपणे बारा वरुषांत गे ॥ पती ॥१॥
गर्गज्योतिषाने ऐसे नव्हते बोलिले ।
कैशा गाठि सुटुनी गेल्या दुष्कृत उदेले ॥
पावले मी दुःख बहू एकटी घरांत गे ॥ पती ॥२॥ (य९उ.३१५)
पक्वान्न पंच केली जेवायासि गोड गे ।
नव्हती ग पूर्वी ऐसी यांना काहिं खोड गे ॥
बाई सवतीच्या पायी कैसी झाले रोड गे ।
कोणि तरि संत माझ्या शिरी ठेवा हात गे ॥३॥
कृष्णवर्ण बाळपण निघोनियां गेले ।
ऋतु येतां लालवर्ण रज तेंहि गेलें ।
पाहोनियां निळा रंग शुक्ल निवटीलें ।
सुखी राहो बाई माझा ज्ञानेश्वरतात गे ॥ पती ॥४॥

१०९३ / हिंदी

कन्यकावृत्त. रा.- ललित. ता.- तेताला.

कौन गली सखि शाम ॥धृ॥
उनको मिलन बिने नहिं मोरे । पल दिलमो आराम ॥ कौन गली ॥१॥
छिनछिन नयन नीर भरि आवहि । सूझत नहिं बेकाम ॥ कौन गली ॥२॥
श्याममिलन सदुपाय करति हुं । ले ज्ञानेश्वर नाम ॥ कौन गली ॥३॥

१३९४

मंजुमतीवृत्त. लावणीभेद. मूळ - यमन ता. धुमाळी.गौण.'चांदणी विनविते' या चालीवर.

या या यादवनायक जी । पीडित रतिपतिसायक जी ॥ध्रु०॥



कमलमुख कोमल मज दावा । जाळितो मनस मदनदावा ॥
कांहि तरि शब्द शुभ वदावा । कृपाजळिं वारा भवदावा ।
मुनिजन निजसुख दायकजी ॥ पीडित ॥१॥
करिपति श्रीपति उद्धरिला । असुरसुत स्वांकावरि धरिला ।
तो महिमा मम मति भरला । म्हणती जो मुनी सुमति भरला ॥
मनोहर मुरली नायकजी ॥ पीडित ॥२॥
निजधन तुम्हांप्रति देते । त्यजुनि कुळ तुम्हासवें येतें ।
तुम्हास्तव जनबोलहि घेते । तुम्हायोगे जळति अघे ते ॥
जय अलकावति नायकजी ॥ पीडित ॥३॥ (य९उ.३१६)

१३९५ / हिंदी

सामललितवृत्त. मूळ.- रा. वसंत. ता.- दादरा. गौण.- रत हरिपद.या चालीवर

कोई तोभि जाय लावो मेरे मुरारी ॥धृ॥
नथनि मोति मंगति नहीं नहिं मंगती सारी ।
प्रेम बात ह्रदय रखो श्याम पूतनारी ॥१॥
नयनहीन अतिहि दीन नंदजिके लाला ।
हात लेय कुसुम खडी गले डारूंगी माला ॥२॥
अलकावति पतिनंदिनि दस बसरकि बाला ।
देनेकी कुमार तुमहि लेवो प्रेमप्याला ॥३॥

१३९६ / हिंदी

सुशीलावृत्त. रा.- असावरी. ता.- तेताला.

हरिबिन मेरि अकेली जान ॥धृ॥
रात भई दोन पहर नाको । कहत संदेसा आन ॥ हरिबिन ॥१॥
प्यारेके कारन सब छोरा । शयन खान अरु पान ॥ हरिबिन ॥२॥
ज्ञानेश्वरकन्याकी बिनती । सुनिये कृपानिधान ॥ हरिबिन ॥३॥

१३९७ / हिंदी

सामनुष्टपवृत्त. मूळ.- भूप. ता.- धुमाळी. गौण.- किन्ने देखा कन्हय्या प्यारा कि. या चालीवर.

दिलदार हमारा प्यारा बतावो मैया ॥धृ॥
कंचन किंगरी करमों लेके । बनमों राखत गैया ॥ बतावो मैया ॥१॥
बेणुनाद सुन सुनमो मनमों । भरी काम की छैया ॥ बतावो मैया ॥२॥
रमाकान्त एकान्तके कारण । भजु विठ्ठलसुत पैया ॥ बतावो भैया ॥३॥

## १३९८ / हिंदी

विशाखावृत्त. रा.- गौड. सारंग.- ता.- तेताला.

शाम मम किस घट पावेंगे ॥धृ॥
उनबिन मो मन चैन नहीं सखि । असुतहं जावेंगे ॥ शाम ॥१॥
मै हुं अकेली बिरह बिबस वे । कह सुख सोवेंगे ॥ शाम ॥२॥
अलकावतिजीवन करुणाघन । पीय शामकू लावेंगे ॥ शाम ॥३॥

## १३९९ / हिंदी

रसालावृत्त. रा.- कालंगडा. ता.- तेताला.

पियबिन मोहे और न कोई ॥धृ॥
जहां जहां जाती तहां तहां हरिको । सुमिरति हूं मनमाही ॥१॥
घर घर धूंड तलास कियो तभि । मुरहर मिलते नाहीं ॥२॥ (य९उ.३१७)
ज्ञानेश्वरकरुणाघनबल घर । आवेंगे फणिशाई ॥ पियबिन मोहे ॥३॥

## १४००

कंचुकीवृत्त. मूळ. -यमन. ता.-धुमाळी. गौण. 'राधा म्हणे रडूं नको' या चालीवर.

येउनि झडकरि माराया । शांतवीं मम मन माराया ॥ध्रु०॥
मदनदमनप्रिय गोविंदा । सच्चिदुदय परमानंदा ॥१॥
करि उपदेश सुनामा या । तरि जवळि ये ना माया ॥२॥
भवभय सकलहि साराया । दाविं निजगत श्रुतिसारा या ॥३॥
तारित कुंतिज कुरुराया । श्रीज्ञानेश्वर गुरुराया ॥४॥

## १४०१ / कांचन पांखरूं

कंचुकीवृत्त. मूळ. -यमन. ता.-धुमाळी. गौण.'म्हणे रडूं नको' या चालीवर.

कधिं येतिल यदुपति सांग । तूं कांचन पांखरु चांग ॥धृ०॥
मज हें सदन सुनें वाटे । वसति तरि हरि कवण्या वाटे ॥१॥
विरहें ही सुकली काया । नयनिं पाही न सु-कलि-काया ॥२॥
अलकावतिवल्लभ तनुजा । चिंतिते रेवतिपति अनुजा ॥३॥

## १४०२ / करुणास्य वृत्त

कमळा तुझ्या जनिपासुनी प्रभु गोकुळी नित राहते ।
तव नाव घेउनि चिन्नदीं जनता किती तरि नाहते ॥
नयनी आम्हांप्रति दाखवी पद स्वामिया प्रियपावका[१]॥
मुनि चिंतिती तुज योग जाणुनि संसृतीवनपावका ॥१॥
कधिं येतिल प्रिय सांग साजणि वेळ फारचि जाहला ॥



मज केविं जाइल एवढा रतिकान्त वायुज साहिला ॥
जळुनी तनू मुखिं काळिमा अभिलाषवृत्ति ही भागली ।
परतूनि यास्तव मी सखी असु-मुंचनापथिं लागली ॥२॥

(१पवित्र करणाऱ्या)

(य९उ.३१८)

## १४०३ / हिंदी

रमावृत्त. रा.- पिलु. ता.- तेताला (राजविद्याधर).

किसने कौनकु शाम दियो ॥धृ॥
एक दफे देखी थी लगनमो । तबसें कहां गयो ॥ किसने० ॥१॥
तीन भुवनसमन सुकृत दैं हरी । किसनें मोल लियो ॥२॥
अखिया बाहर निकसन आवति । अंगनदाह भयो ॥३॥
अलकावतिपतिचरणरजनमों । सुख संपूर्ण हुयो ॥४॥

## १४०४

मंजरी वृत्त. मूळ -कल्याण ता. दीपचंदी. गौण.'सये माझि हरिनें पुरवीली पाठ' या चालीवर.

सये माझी विनवणी हरिला सांग ॥ध्रु०॥
वाजवि मुरली कुंजवनी तो । चोरुनि मम चित्त चांग ॥ सये ॥१॥
सौरभ नहाणें करुनी सदनी । मौक्तिकी भरिला भांग ॥ सये ॥२॥
कोण्या सुदिवशी येउनि प्रभुजी । फेडाल समुदित पांग ॥ सये ॥३॥
मिळवाया तुम्हा ज्ञानेशचरणा । नमि घडि घडि साष्टांग ॥ सये ॥४॥

## १४०५

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-जोगी. ता.-तेताला.गौण.- पहा पहा सांवळा. या चालीवर.

केव्हां येतील गृही नारायण । जीव तळमळे जेविं अजळिं मीन ।
कांही कळेना हे काय आहे खूण । केव्हा दावितील गुरू आत्मखूण ॥धृ॥
मज ठाऊक नाहिं सये वाट । बहू दमले मी पाहुनियां वाट ।
रात्रंदीन करी निगम बोभाट । कथा वर्णुनी पुराणे ज्याचे भाट ॥१॥
कळे निर्गुण श्रौत अनुमानें । परी माझ्या चित्ता सगुण माने ।
जें कां यशोदेच्या मांडीवरी तान्हें । ज्ञानेश्वरकृपें ह्रदयाचें शहाणें ॥२॥

## १४०६ / हिंदी

श्रीमतीवृत्त. रा.-बेहाग ता.- तेताला.

मोहे बतावो जी शाम ॥धृ॥
जिनके कारण छोरी स्थल कुल । कीन्हा बनमो ग्राम ॥ मोहे ॥१॥

जब जब सुमिरति हूं घननीलकुं । तब तब बढता काम ॥ मोहे ॥२॥
आलिंगन चुंबन बिन अरु कछु । नही चाहति धन धाम ॥ मोहे ॥३॥
ज्ञानेश्वरगुरु बचन पकरके । भई बिरह बेकाम ॥ मोहे ॥४॥ (य९उ.३१९)

१४०७

सामकामदावृत्त. मूळ - यमनकल्याण. ता. - दादरा.गौण- निजसुखे विश्रांतिसि. या चालीवर.

फिरति बाइ वनिं देवपाय कोंवळें ।
गुंततील तरुपर्णी हरिचि जाउळें ॥ फिरति ॥धृ॥
पायघड्या घालुनी गृही वाट चालती ।
आज वनी कंटक पदीं तोद[1] घालती ॥१॥
धेनुचरण चरणस्मरण स्मरचि वाढवी ।
काय नाहिं बसायास यांस वाढवी[2] ॥२॥
शमनशमन सुमनमनें पूजूं भाविते ।
न कळे काय असें बाई परम भावि तें ॥३॥
अलकावतिनाथसुताकान्तसंगती ।
विरहबळें गोपि सकळ आप्त-संगती ॥ फिरति ॥४॥

(१. काट्याचें टोंक २. मोठा पक्षी, गरुड.)

१४०८

नवोढावृत्त. मूळ - पिलु. ता. -धुमाळी गौण 'नृपममता रामावरती' या चालीवर.

जीव तळमळे भेटीसाठीं । येतिल केव्हां जगजेठी ॥ सखि सांग ॥धृ.॥
नवस बहु देवांचें केले । वाहुनी निंब नारिकेले ।
जाउनी तरु प्रस्तर पूजिले । नाहिं परि फळ कोणी सृजिलें ॥
॥चाल॥ अति जाच घोर संसार । किंचित न मिळे सुखसार ।
साहवे न दुःख अपार ।
॥चाल पहिली॥ रूप तें आठवतें पोटीं ॥ येतिल०॥१॥
कोणत्या करूं धर्मकाजा । जेणें भेटेल गडे यदुराजा ॥
जों मरिचादींचा आजा ॥ त्याविण देह व्यर्थ माझा ॥
॥चाल॥ विरहानल हृदया दाही ॥ वाटती हार घोराही ।
कोणि दावा तरि फणिशायी ॥ देउनी चेतनमय दृष्टी ॥२॥
आतां शरण कुणा जाऊं । मुखाकडे कवणाच्या पाहूं ।
मज ना बहिण बाप भाऊ । साह्य तरि कवणाचें घेऊं ॥
॥चाल॥ परि एक भरंवसा बाई । श्रीज्ञानेश्वर मम आई ।
तनुमन वाहुनि तत्पायीं ॥ (य९उ.३२०)



(चाल पहिली) करिन मग श्रीहरिसह गोष्टी ॥ येतिल केव्हा ॥३॥

१४०९

सामनुष्टपुवृत्त. मूळ. - जोगी. ता.- तेताला गौण. पहा पहा सांवळा' या चालीवर.

कधिं येतील सांग चक्रपाणी । स्नानासाठी सारिलें शुद्ध पाणी ।
निरोप घेऊनी आले नाहीं कोणी । बाई तुझी सत्य होवो वाणी ॥ कधि ॥धृ॥
नारि-जिणें हे परतंत्र फार । विप्रलंभ विव्हळ नाहिं सार ।
उपायही नव्हे वेदसार । स्वामी हरिवीण नाहीं आधार ॥कधिं ०॥१॥
तनु सकुमार कोंवळीं वाटे । पायिं चालुनी जाती कवण्या वाटे ।
व्रजदेशीं या अतितर कांटे । येतिल तो उपाय करीं नेटे ॥ कधि ०॥२॥
व्यतिरेकें हृदय शून्य झाले । अन्वयें जग ब्रह्मपणा आलें ।
समन्वय करुनी वेद बोले । हरीकेलिसुखार्थ घालि झोले ॥ कधि ० ॥३॥
ज्ञाने संचित जळोनियां गेले । अहं त्यागितां क्रियमाण मेलें ।
विरहदुःखें ते प्रारब्धही नेले । अझुनि कां गे हरी नाही आले ॥ कधि०॥४॥
आतां नाही ज्ञानाची चाड कांहीं । ज्ञाने मिळालें ब्रह्मरूप ठायी ।
परि उरलें जीवित जाते वायी[1]। यास्तव पडतें बाई तुझ्या पायीं ॥५॥
बहुदिस झाले कळली नाहीं मात । विरहानल जाळी हृदयांत ।
उपाय हा सुचला संगतींत । ज्ञानेश्वर स्मरतें अखंडीत ॥ कधि येतील ॥६॥

(१.व्यर्थ)

१४१०

साममाणव मूळ - जोगी. ता. - दीपचंदी.

कधि तरि येतिल काय । बाई सदनीं मम यदुराय ॥ध्रु०॥
पाहुनि पाहुनि वाट ही कष्टी । अतितर वाङ्मन काय ॥१॥
केलें जनिंवनिं जप तप याजन । योगादीक उपाय ॥२॥
विश्वासाचे आतां हृदयीं । ज्ञानेश्वर गुरुपाय ॥३॥ (य९उ.३२१)

१४११

विशाखावृत्त. रा.-जोगी - ता - तेताला.

पाहूं कवणे वनीं ॥ प्रभुला ॥ध्रु०॥
मनपवनाचा संगम करितां । श्रमचि हृदयभुवनीं ॥ प्रभुला ॥१॥
झडकरि दाविल ऐसा कोणी । योगि नसे अवनीं ॥ प्रभुला ॥२॥
विश्वासाची एकचि उरली । ज्ञानेश्वरजननी ॥ प्रभुला ॥३॥

१४१२

सामनुष्टुपवृत्त. मूळ. भूप. ता. - तेताला. राजविद्याधर.गौण.'पहा पहा सांवळा' या चालीवर.

कोणि जावोनि झडकरि आणा । गृह स्मशान, विना यदुराणा ।
अन्नपाणी हे विषसम जाणा । उगें काय गे वांचवोनि प्राणा ।
कोणि जावोनि० ॥धृ॥
मीन तळमळें नसतां जीवन । वत्स तळमळें वनी धेनुवीण ।
मायेलागी बाहे बाळ तान्ह । तेवीं हरिवीण व्याकुळ हे प्राण ॥ कोणि ॥१॥
भेटवावें आणोनी यदुराया । ज्ञानेश्वरप्रभू वारा माया ।
पूर्वरूपें सदन शोभवाया । निजरूपें माहेर सौख्य द्याया ॥ कोणि ॥२॥

१४१३ / हिंदी

मल्लिकावृत्त. रा.- पूर्या. ताल.-दीपचंदी.

सखि मोरे हियमें लागि कटारी ॥धृ॥
लाल लहूते अंग भयो सब । तलफत बीति निशि सारी ॥१॥
गोरेमोरे वदन सुरजपें । छाई बदरियाकारी ॥२॥
ज्ञानेश्वर बालाको अब तुम । लाय मिलावो मुरारी ॥३॥

१४१४ / हिंदी

रसालावृत्त. रा.- खमाज. ता.- राजविद्याधर.

मोहे सावरी सुरत बतावो ॥धृ॥
सुरत गुन सुनी लागी कटारी । तलफत ओखद पावो ॥१॥
नील जलदतनु छैल छबेली । भरी सनेह हिय लावो ॥२॥
अलकावतिपति नंदिनी विरहनी । पिय मम प्राण बचावो ॥३॥ (य९पू.३२२)

१४१५ / हिंदी

भूपती खरे ते वैभव सुख सेविती. या चालीवर.

मै शाम शाम कह जीवित अपना खोया ।
अबलो नहि किसीने शामसंदेसा लाया ॥धृ॥
दिन जुगसम बीते ठौर ठौर जी रोया ।
स्मृति शास्त्र निहारे शाम मारग न पाया ॥१॥
प्रभुमेलन कारण क्या क्या नही मै कीन्हा ।
खाये निंबपान बरसो शिवपूजन कीन्हा ॥२॥
शिरनायनाय भूसुरकर कंचन दीना ।
ज्या गंगाजल बिच प्राण न क्यौंकरि दीना ॥३॥
मोहे कौन भरोसा श्याम चरणनख पावूं ।



श्रीज्ञानेश्वरगुरुराजचरणनख ध्यावूं ॥४॥

१४१६ / हिंदी

सामनुष्टुप. मूळ.- भूप. गौण.- किने देखा कन्हय्या. या चालीवर.

किने देखा कन्हय्या प्यारा कीं मुरलीवाला[१] ॥धृ॥
जमुनाके निर तिर गौवा चरावे । खांदे कामरिया काला ॥ किं॰॥१॥
मयुरपुच्छ शीसपें बिराजे । गले मोतनकी माला ॥ किं॰॥२॥
बालमध्य नीलांबुदाभप्रभु । कर दध्योदनकाला ॥ किं॰॥३॥
देखदेख छब मोहतें बावरी । भई ज्ञानेश्वरबाला ॥किं॰॥४॥

(१.हे धृपद दुसऱ्याचें आहे पुरें न सांपडल्यामुळें महाराजांनी पुरें केले.)

१४१७

विशाखावृत्त. रा.- असावरी. ता.- तेताला.

उद्धवा ज्ञान तुझें कळले ॥धृ॥
या ज्ञानेंची बुडुनि तुझें मन । हरिपदिं नच वळलें ॥१॥
आज हरीचें गोपीवरिचें । प्रेम सकळ गळलें ॥२॥
ज्याचा असती गडि तूं तन्मन । कुब्जवदनिं मिळलें ॥३॥
स्वामि भुजंगू ज्ञानी सेवक । विरुद्ध आढळलें ॥४॥
ज्ञानेश्वरकन्यकाशरिर हें । हरिविरहें जळलें ॥५॥

१४१८ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- तिलंग खमाज. ता.- पंजाबीठेका.गौण.- 'कदर पियाकी' या चालीवर.

खबर पियाकी जानति हो कोई ॥धृ॥
काज पियाके रयन दीन जगी । नयन पुतरी खोई ॥१॥
अब मेरे अपराध छमबसब । होनी सो होई ॥२॥
अलकावतिवल्लभ करुणाबल । पिया गोद सोई ॥३॥ (य९उ.३२३)

१४१९

लावणीवृत्त मूळ. - यमन. ता. - धुमाळी.गौण ''भला जन्म हा'' या चालीवर.

काय करूं मज कांहीं सुचेना अक्कल गेली जळून ।
मेल्या दैवानं घेतलं पिळून ॥धृ॥
सुख नाहीं अन्यत्र समजलें एकांतामधीं बसून ।
वरिलें हरिला हृदया पुसून ॥
परंतु आधी नाहीं केलें मन हे निर्मळ निसून ।
यास्तव व्रजवर गेले रुसून ।

जाउनि कोणी करुनि विनवणी आणा पालखींत बसून[1]।
प्रभुविण काय सये असु असून ॥
॥चाल॥ हे नरतनु बाई अवचित जनि लाहिली ।
परि लाज धरुनि मी उगिच सदनीं राहिली ।
व्रजवल्लभचरणीं कशि नच नति वाहिली ॥
॥चाल पहिली॥ सदा दासवश शेषशयन पण चुकि घडली गडे कळून ॥१॥
मज रिझवाया झाकित बोटे हळु हळु डोळ्यांवरून ।
पाहतां खुणवित होतें दुरून ।
नवल आजचि माया पातळ कां अशी माझ्यावरून ।
निरोपही नाहीं धाडिला फिरून ।
राजबिंड तोंडाकड रांडा पाहतिल डोळे भरून ।
कोण दिठ उतरल कळकळ करून ॥
॥चाल॥ सुकुमार साजिरें रूप कसें सांवळे ।
कासे कसलेसें अंबर पर पींवळें ।
विलसती मस्तकीं कुरळ कुरळ जावळें ॥
॥चाल पहिली॥ पाठवितें मी ज्या ज्या तो तो बसतो तेथचि खिळून ॥२॥
मुका मागता मुरहर मुख मी फिरवी मागे सरून ।
बसे मुकी गालावर करकरून ।
प्रिये म्हणुनि बोलवितां प्रेमें जाइ न गर्वा धरून ।
पावलें फळ मी याचे भरून ।
रडुं कोणाच्या पुढे साजणी गळा मोकळा करून ।
कोण समजावल पोटसी धरून ॥
॥चाल॥ अभिसार करूं तरि दोन्हि नयन आंधळे ।
करुं दान तरीं घरी तांदुळ ना जोंधळें ।
दृढ योग साधुं तरी बुद्धि परम ऊधळे ॥
**॥चाल पहिली॥ श्रीज्ञानेश्वर स्मरतां वाटे येतिल लवकर मिळून ॥ मेल्या दैवानं० ॥३॥**
**(य९उ.३२४)** (१.बसवून पाहिजे पण वऱ्हाडी भाषेत असे प्रयोग आहेत)

१४२० / हिंदी

उमावृत्त

साधनमें अति बद्ध बुधी नहिं पाय सुधी व्रजरायनकी ।
नींद नही दिनरात गयी जुगती न सही सहिलायन की ॥
काज तजी अरु लाज तजी सुनि आवत टेर न गायनकी ।



ग्यानसुरेश मुहै बिसरो मति मैं परिचारिणि पायनकी ॥

१४२१ / हिंदी

मदिरावृत्त. विरह- वीररस.

साज सवारिके आज सभेनिज काजलिये रनरंग चरूंगी ।
लोगनको सब सोग मिलायके अंतरमें अपनेहि भरूंगी ॥
दीनदयाल पिया हमरे सखि प्राणके बानन वासु लरूंगी ।
या भवसागर बूरत बूरत ग्यानसुरेंद्र अंगोठि धरूंगी ॥

१४२२ / हिंदी

रंभावृत्त. रा.- तोडी. ता.- राजविद्याधर.

अस जियके तुम बालि रहोना ॥धृ॥
धुंडत बन मै नाथ अकेली । देहि असा सन बाहि गहोना ॥१॥
जो हम सरिसन राखत नाहीं । तौं निगमबदन करुण कहोना ॥२॥
रसिक सिरोमन विप्रलंबमें । डारि अजानिन सुरस चहोना ॥३॥
अलकावतिपतिनंदिनी बिनती । सुनि शतशत क्यौं अनतन होना ॥४॥

१४२३

रमावृत्त. रा.- बागेश्री. ता.- राजविद्याधर.

जदुवर आद[1] सुकपट कीये ॥धृ॥
सो सुमिरत अजू समय बितेपर । रुचि रुचि वोर नये ॥१॥
हमरे नयनकूं कमल कही कहि । नीरहि डार दिये ॥२॥
पीली पतली सुंदर दिखसी । इमि भनि विरह दिये ॥३॥
ज्ञानेश्वरजा तब नहिं उमजी । अब क्या रुदत जिये ॥४॥ (य९उ.३२५)

*(१.पूर्वीपासून)*

०००

# प्रणयकलहपर पदे

१४२४

सामनुष्टुप. रा.-परज. ता.- तेताला.

मज माहेरिं धाडा देवा ॥धृ॥
राहुनि गोकुळिं त्रास बहू मज । लिहूनियां पट द्यावा ॥१॥
घरोघरीं बहु नारी तुमच्या । करितिल प्रेमे सेवा ॥२॥
मज देखत तुम्हि परगृहिं जातां । जाळि सवतिचा दावा ॥३॥

खान पान मी कहिं न मागे । जाते स्व-जनक-गावां ॥४॥
अलकावति जाउनी आचरिन । ज्ञानदेवपदसेवा ॥५॥
१४२५ / हिंदी
रमावृत्त. रा.-यमन. ता.- तेताला (राजविद्याधर)
प्रभु तुम काहे बिबाह किया ॥धृ॥
छांड सदनमो मोहे अकेली । परघर वास लिया ॥१॥
दोहा - नंदलाल तुम जानके डारि कंठमो माल ।
अबतो अच्छे गठ गये छोडो अगली चाल ॥२॥
अच्छे कुलके हैं हमारे ज्ञानेश्वर प्रभुतात ।
तिनको कहत जग मिलके भले मिले जामात ॥३॥
१४२६ / हिंदी
सामनुष्टुपवृत्त. रा.- यमन. ता.- तेताला.यशोदाप्रति गोपीवचन-
जसोदा मैया अपना लरका संभाल ॥धृ॥
घरमो आकर दहिदुध छूवे । लेवे सबके बाल ॥ जसोदा मैया ॥१॥
ननंद तो मेरी चुगलखोर है । सास पकरेंगी बाल ॥ जसोदा मैया ॥२॥
कैसा बालक पैदा किया । व्रजगोरस का काल ॥ जसोदा मैया ॥३॥
ज्ञानेश्वरजा प्रणयकोपतें । हरिगले डारत माल ॥ जसोदा मैया ॥४॥
१४२७ / हिंदी
कन्यकावृत्त. रा.- परज. ता.- राजविद्याधर (तेताला)
उचित नहीं जदुराज ॥धृ॥ (य९उ.३२६)
भंवरभई तोभी घर नाहीं । त्यागन रजनी काज ॥१॥
श्रवण मनस सब बेणूमें लागा । डुब गई दूसरी भाज ॥२॥
राखो प्रभुजी मनमो कछुभी । ज्ञानेश्वरकूल लाज ॥३॥
१४२८ / हिंदी
सामाचामरवृत्त. मूळ.- रा.-जोगी. ता.-दीपचंदी.गौण.- त्याला कशाला. या चालीवर.
मेरे भरोसे तुम ना रहिये ॥धृ॥
धूंड वृंदावन अपने गरजको । जा औरनिको कहिये ॥१॥
मै हूं गोरी तुम हो काले । भावन पावन टरिये ॥ मेरे भरोसे ॥२॥
देखत देखत धोका दीना । ये क्या भाव पकरिये ॥३॥
ज्ञानेश्वरको बिना बिचारे । मेरा कर ना धरिये ॥ मेरे भरोसे ॥४॥
१४२९ / हिंदी



रंभावृत्त. रा.- खमाज. ता.- तेताला.
प्रभु मम घर अनरीति करो ना ॥धृ॥
ये चर्या नहिं पसन् तुह्मारी । बिखय बिबस सब उमर भरोना ॥ प्रभु. ॥१॥
ये कुबिकार निकारो हियतें । निगम गदित मग ध्यान धरोना ॥ प्रभु ॥२॥
हमरे पितानें दिया तुह्मे प्रभु । तिनके कुलकी सरम बरोना ॥ प्रभु ॥३॥
अलकावतिपतिनंदिनि हूं मै । परिचय तज सुख समय न खोना ॥ प्रभु ॥४॥
१४३० / हिंदी
रंभावृत्त. रा.-बागेश्री. ता.- तेताला.
निज करुणा मोहे पाव लगावो ॥धृ॥
भव जलधीमों बहत जाति हूं । तों निज धीरज नाव बनावो ॥ निज ॥१॥
बिरह फणी काटत मोहे पिय । अपने कर कछु दवा लगावो ॥ निज ॥२॥
अलकावतिपतिनंदिनि बिनती । सुनसुनके नित रागहि गावो ॥ निज ॥३॥
१४३१ / हिंदी / भगवद्वचन -
रंभावृत्त. रा.वसंत. ता.-तेताला.
क्यौं करती मेरी अभिलाषा ॥धृ॥ (य९उ.३२७)
न्यून नहीं कछु तोर पिताघर । मिलती परविद्या अविनाशा ॥१॥
मैं तो माया जनित सगुण हूं । तूं भेद न चाहति तत्पाशा ॥ क्यौ.॥२॥
अलकावतिपति सुता बडी है । मैं गौली सुत कुल न बिकासा ॥ क्यौ.॥३॥
१४३२ / हिंदी / गोपीवचन -
रंभावृत्त. रा.- परज. ता.- तेताला.
क्यौं प्रिय ऐसे वचन निकारे ॥धृ॥
तुह्मरे कारण अद्य दिनालों । दुस्तर तप करि करि तनु गारे ॥१॥
तुम नहिं हो तो छन छन प्रभुजी । प्रलयानलसम सब तनु जारे ॥२॥
अलकावतिपतितातनें मोहे । नित अपने कर प्रिय दे डारे ॥३॥
१४३३ / हिंदी
रंभावृत्त. रा. वसंत. ता.- तेताला. भगवद्वचनः-
मै नहिं तो संगति को चाहूं ॥धृ॥
कब तो मोको ग्यान कहति है । कब कहती माता घर जाऊं ॥१॥
कब तो कूल निकारे हमारे । कब कहती तो थपर लगाऊं ॥२॥
सब गोपिन मो तूहि बजारिणी । अलकावतिपति लीख भिजाऊं ॥३॥
१४३४ / हिंदी / गोपीवचन -

रंभावृत्त. रा.- परज ता.- राजविद्याधर (तेताला)

प्रभु मै नहि हूं चतुर सुनारी ॥धृ॥
अति अज्ञान बिबस दी होगी । कभी आपको मुखतें गारी ॥१॥
घर ते मुझे निकार जो दीने । तो सोउंगि जमुनाके किनारी ॥२॥
अलकावतिपतितात भले है । तिनकि जानि राखो पुतनारी ॥३॥

१४३५ / हिंदी / भगवद्वचनः-

रंभावृत्त. रा. हमीरकल्या. ता.-तेताला.

ये कहनेकी आदत तेरी ॥धृ॥
जसुमति माता तात नंदजी । आजलों सिखावतहि घनेरी ॥१॥
तव बचननते चार लोकमों । भलपन लाज जायगी मेरी ॥२॥
कभि कछु मैं एक बचन कहूं तो । तू अपनीहि लगावति टेरी ॥३॥
ज्ञानेश्वर घर जा एकबेर । मति शुद्धीपर आयजु फेरी ॥४॥ (य९उ.३२८)

१४३६ / हिंदी / गोपीवचन -

रंभावृत्त.रा.-बागेश्रीकानडा. ता.- तेताला. :-

मै परि है प्रभु तिरिया[1] जाती ॥धृ॥
नहिं रखते तो मर्जि तुह्मारी । निज भगिनी गोपीघर जाती ॥ मै ॥१॥
तुह्मरे गोपिनकी सेवामो । नहिं देखोंगी दिवसरुराती ॥ मै ॥२॥
अलकावतिपति पदनख सुमिरन । करिकरि अपनो ताप बुझाती ॥ मै ॥३॥

(१. तिरोळे कुणबी)

१४३७ / हिंदी / गोपी वचन

चौपाई

जो नहिं राखत तुम पुतनारी । तो राखत है भगिनि हमारी ॥
जिन घर तुम दहि दुधकु जावे । तिन पग हम नित सीस लगावे ॥१॥
दोहा - आपहि कीन्हे अंध मोहे आपहि कीन्हे सूध ।
आपहि नहिं बोलत प्रभु कहो कहांकी बूध ॥२॥

१४३८ / हिंदी / जसुमतीवचन

रंभावृत्त.रा.-बेहाग. ता.- तेताला.

क्यौं ताको तू बोलत लाला ॥धृ॥
ओतो मेरे घरहि परेगी । तूं देखन जाना परबाला ॥ क्यौं ताको ॥१॥
नयन हीन सा दीन बिचारी । कत दवरे तो पग अनुचाला ॥ क्यौं ० ॥२॥
बिबाहमें प्रेमभरे वाने । डारी तेरे हि गले माला ॥ क्यौं ताको ॥३॥



मेरी बहु मैं अच्छी बगावूं । न्यून नहीं तोको कछु बाला ॥ क्यौ ताको ॥४॥
छन ताको अवसर न देत है । और कहावत है जगपाला ॥ क्यौ ताको॥५॥
अलकावतिपतिकुल जनिता वो । रहो बिचारी सदन निहाला ॥ क्यौं०॥६॥

१४३९ / हिंदी / जसुमतीवचन :-

रंभावृत्त. रा.- मालकंस. ता.- राजविद्याधर. (तेताला)

मत रोवो बेटा मम प्यारी ॥धृ॥
पतिबचननको खेद न करनो । तोहे छोरेंगे न बिहारी ॥ मत रोवो ॥१॥
आ आ मेरे निकट सुभागी । कर दधिमंथन पकरहि डोरी ॥ मत रोवो॥२॥
आज नहीं तो कल आवेंगे । तेरे मंदर शाम मुरारी ॥ मत रोवो ॥३॥
अलकावतिपतिकुलको सुमरन । कर घर अपनें रह सुखसेरी ॥ (य९उ.३२९)

१४४० / हिंदी / प्रियबचन जननीको

रंभावृत्त. रा.- दरबारी कानडा. ता.-तेताला.

जननी मेरे प्रणयकि बाणी ॥धृ॥
कैसा छोरूंगा मैं इसको । कीना है मैं ग्रहणहि पाणी ॥ जननी ॥१॥
जानत हूं मैं भले कुलकि ये । प्रेम बात छन एक मिलानी । जननी ॥२॥
अलकावतिपति नंदिनि को मैं । जनम जनम करुहूं निजराणी । जननी ॥३

१४४१ / हिंदी

दोहा - भैरवी

इतना कहकर मौन रहे पीय हमारे नाथ ।
तब मोहे बिश्वास हुवा जावो उनके साथ ॥१॥
ये मेरा अनुभवहि कहा नहि औरकी बात ।
जो किसको मीठा लगे तो सुमिरो दिनरात ॥२॥
ज्ञानेश्वरकी कृपाबिन नहीं भक्तिको लाभ ।
जाते तत् सुमिरन करो पावत पंकजनाभ ॥३॥

०००

१४४२ / हिंदी

रसालावृत्त. रा.-वसंत. ता.-राजविद्याधर (तेताला)

आवो न कन्हय्या लाला ॥धृ॥
पकर रखोंगी अपने घरमों । द्वारि लगायके ताला ॥ आवो न ॥१॥
मोर गलेमो हात डारि क्यौं । तोरि मोतियन माला ॥ आवो न ॥२॥

आगे हूंगी तुह्मरी नारी । मैं ज्ञानेश्वरबाला ॥ आवो न ॥३॥

१४४३

परिचारिणीवृत्त मूळ - यमन ता. - धुमाळी.गौण - हे कपटपटूपण. या चालीवर.

महाराज कशाला पाहतां माझ्या कडे ।
साहा महिने झाले तुमसिं मसीं वांकडें हो । महाराज० ॥धृ॥
मी गालावर कर ठेवुनि ढळढळ रडे ।
तुम्हाला सटवी सवतचि बहु आवडे ॥
घ्या आदर करुनी उचलुनि खांदे कडे ।
लवंढिचें जातही नाहीं अझुनी मढें हो ॥१॥
मी नयनविहिन सुंदरता वदनी नसे ।
आणीक युवतिनां पाहुनि शशिरवि हसे ॥
तुम्हि रसिकजनप्रिय वदति बहु लालसे । (य९उ.३३०)
मी घरिंच राहतें अतिशय बहु लालसें हो ॥ महाराज० ॥२॥
अलकावतिपतिपदसेवा करुनी बरी ।
मी कधिंतरि घालीन तुम्हांवरि साबरी ॥
ठेवीन रोधुनी नित्य ह्रदयमंदिरीं ।
मग पाहूं कशा येतिल त्या व्रजसुंदरी हो ॥ महा०॥३॥

१४४४

भोजन समयींचा विनोद : आर्या

रात्री जन्म जयाचा तो आंधारांत राहणार सदा ।
दिवसा जन्म जयाचा ध्यावें या साठिं रामचंद्रपदा ॥१॥

१४४५ / श्लोक

बहु कपटि तुझा हा देव वाटे आम्हांला ।
श्रमुनि नमुनि ज्याच्या घातल्या कंठिं माळा ॥
व्रजयुवति अशाही टाकिल्या शीघ्र वेगीं ।
सकरुण मग केवीं सोडवी प्रश्न वेगीं ॥१॥

१४४६

रघुपतिमहिमेला ऐकतो शूलपाणी । यदुपतिमहिमा तो कामिनीच्याच कानीं ॥
रघुपति वचनातें गाति सर्वत्र वेद । रघुपतिस्मरणानें तुटतो भिन्न भेद ॥२॥

१४४७ / हिंदी



छविवृत्त. रा.- काफी. ता.- तेताला.

किने मेरे प्यारेको मोहनि डारी ॥धृ॥
आजतक प्रीती थी मोपर । निकर गई ओ सारी ॥ किने मेरे ॥१॥
हमको दीन्हा घरहि छोरके । औरनि काज बिकारी ॥ किने मेरे ॥२॥
मोको दिनदिन कपरा न मिलत । वाकूं लाई सिलारी ॥ किने मेरे ॥३॥
मेरे घरका पलंग न लेवे । औरनि साथ किनारी ॥ किने मेरे ॥४॥
अलकावतिपतिसुतारमणको । शामहि मोहनकारी ॥ किने मेरे ॥५॥

१४४८

शीलवतीवृत्त. रा. - भूप. ता.-तेताला. राजविद्याधर.

माधवजी दासि मी तुमची गड्या ॥ध्रु०॥
क्रीडण अनुचित दासिसह तुम्हां । घालुनियां फुगड्या ॥ दासि मी ॥१॥
कोरडि प्रीती मजवरि घेतां । सवतीप्रति लुगड्या ॥ दासि मी ॥२॥
बोलतां तुमसी बिदिवरती । जाती व्यर्थ घड्या ॥ दासि मी ॥३॥
ज्ञानेश्वरकन्यकाधिवृत्ती । सेवेस्तव उघड्या ॥ दासि मी ॥४॥

१४४९

रमावृत्त. रा. - हमीर ता. - तेताला. राजविद्याधर.

बोला कांहिं तरी ॥ स्वामी ॥धृ॥ (य९उ.३३१)
वनिं फिरंता श्रमलां बहु प्रभुजी । म्हणुन मी पाय चुरीं ॥ स्वामी ॥१॥
महिना महिना कां नच होतें । येणें येथवरी ॥ स्वामी ॥२॥
ऐसे भ्रमणे होतें तरि कां । केले मज नवरी ॥ स्वामी ॥३॥
स्थिर व्हाया मन ठेवा अक्षय । भाव आळंदिवरी ॥ स्वामी ॥४॥

१४५० / हिंदी

वासंतीवृत्त. रा.- परज. ता.- तेताला (राजविद्याधर)

बहुतनिसों पहेचान ॥ तुह्मारी ॥धृ॥
ये छब छोरी घरघर धूंडत । बेणु सुनावत कान ॥ तुह्मारी ॥१॥
धूंडो मति व्रजराज गली तुम । कोइ आवेगी छान ॥ तुह्मारी ॥२॥
घर आवो अज लाल हमारे । कीन्हा मंगलस्नान ॥ तुह्मारी ॥३॥
अलकावतिपतिबाला प्रभु मैं । मत करिये अवमान ॥ तुह्मारी ॥४॥

१४५१ / हिंदी

विशाखावृत्त. रा.- परज. ता.- तेताला (राजविद्याधर)

किधर किया आना ॥ नाथजी ॥धृ॥

दिन डूबतही गमन आपनो । गोपी गृह होना ॥ नाथजी ॥१॥
बास लिया इस हृदयकमल । परभ्रमर जाना[१] ॥ नाथजी ॥२॥
अन्यशयनसुख लेत समय मोहे । लगत मदनबाणा ॥ नाथजी ॥३॥
चाहत हो मोको तुम तो । ज्ञानेश्वरखत लाना ॥ नाथजी ॥४॥

(१.ओळखला)

## १४५२ / हिंदी

मंजरीवृत्त. मूळ.- जागी. ता.- दीपचंदी. गौण.- त्याला कशाला. या चालीवर.

मेरे भरोसे तुम ना रहिये ॥धृ॥
धूंड धूंड ब्रज अपने गरजकूं । जा औरनि को कहिये ॥ मेरे भरोसे ॥१॥
जिनकी तुमकूं सुरत रुचे प्रभु । तिनकी हथिया गहिये ॥ मेरे भरोसे ॥२॥
जो तुम मोको चाहत हो हरि । तो ज्ञानेश्वर कहिये ॥ मेरे भरोसे ॥३॥

## १४५३

रमावृत्त. रा. - असावरी. ता. - तेताला.

सोडा छंद असा ॥ प्रभुजी ॥धृ॥ (य९उ.३३२)
निगमगदित निज धर्म कदापी । मोडुं नये रजसा ॥ प्रभुजी ॥१॥
स्थीर न राहे मन येथें तरि । तुहीनसदनिं बसा ॥ प्रभुजी ॥२॥
एकपत्निव्रत पाळुनि जगतीं । साधुसमान दिसा ॥ प्रभुजी ॥३॥
जरि आम्हां वरणें तरि अलका- । वतिपतिगुरुस पुसा ॥ प्रभुजी ॥४॥

## १४५४ / हिंदी / मराठी

मोहरी. साममाणववृत्त. मूळ.- जोगी. ता.-दीपचंदी. गौण.- याच्यावीणे ग॰ या चालीवर.

लाला मोसे न करिये रारी । मैं तो लाखन दूंगी जीगारी ॥धृ॥
तुह्मि मोठ्याचे ह्मणवितां पोर । परनारी न जाणा समोर ॥
चाल ॥ यह अनरीती भाखे वेदा । जाय बूझो मुनीसो भेदा ॥
चाल पहिली ॥ कोणि शिकवीत तुज अधिकारी ॥ मैं तो ॥१॥
धर्म सोडूं नये येधवांची । कांहीं वेदान्त सांख्यादि वाचीं ॥
चाल ॥ श्रुति कहती तुह्मे निर्विकारी । धुंडते क्या देखी परनारी ॥
चाल पहिली ॥ फसवूनि सुयोगी विचारी ॥ मैं तो ॥२॥
जेवि तुज नाहिं सुत तात माता । तेविं दुसरीया पाहसी आतां ॥
चाल ॥ तुम सकल हृदयमों बसिये । हेत और निसों निज पुछिये ॥
चाल पहिली ॥ येथ चालेना काम भिकारी ॥ मैं तो ॥३॥



हातिं घेवोनि निज भावरंग । तुज निःसंगा करिन ससंग ॥
चाल ॥ वेदमहावाक्य जानिके चारों । निजहियमें मैं बांधूंगि यारो ।
चाल पाहिली ॥ ज्ञानेश्वरगुरू साहाकारी ॥ मैं तो ॥४॥

## १४५५

मूळ - यमन. ता.- तेताला (धुमाळी) गौण या चालीवर

तुम्हाला खरिच नाहिं काळजी ।
घडि घडि पळपळ पाठीं धावत जगताच्या काळ जी ॥ध्रु०॥
धननंदनसुत त्यजुनि तुम्हास्तव । घोटिति किति लाळ जी ॥१॥
ज्ञानेश्वरप्रभु विनवणि ऐका । घ्या कडिये बाळ जी ॥२॥ (य९उ.३३३)

## १४५६ / हिंदी

सुशीलावृत्त. रा.- काफी. ता.-तेताला.

*अपशब्दं परित्यज्यापि मधुरा भगवति क्रोधं समर्पयन्नाह -*

बांके हो नीतिनिधान ॥ पिय ॥धृ॥
स्वारथ परमारथ साधतहों । करि बन सदनसमान ॥१॥
दोहा - सचि मधुकर मधु पिबनहि जानत ।
अनुचित सुमन गुमान ॥ पुरख बिकार सहत कबि भाखत ।
रुकि सकत न तियजान ॥२॥
कीरति भावति हिय कोउ जाचक । बिमुख न दीन्हे जान ।
अलकावतिपति छैल छबिले । सममन निगम प्रमाण ॥३॥

## १४५७

श्रीमतीवृत्त. रा. - यमन. ता. - तेताला.

माहेरा जाऊ द्या ॥ मज ॥ध्रु०॥
उगे उगे कां धरुनि ठेवितां । प्रीति ही राहुं द्या ॥ माहेरा॰॥१॥
सेवेकरिणी बहु हौस पुरी । त्यांचीही होउं द्या ॥ माहेरा॰॥२॥
वर्षातुन तरी तातचरण मज । डोळ्याने पाहुं द्या ॥ माहेरा॰॥३॥
केस चिकटले इंद्राणीजळीं । मंगलसें न्हाऊं द्या ॥ माहेरा॰॥४॥
हात जोडितें तुम्हां जननिचा । स्तनपान्हा पिउं द्या ॥ माहेरा॰॥५॥
जयजय ज्ञानेश्वरमाउलि हें । वदनीं या गाउं द्या ॥ माहेरा॰॥६॥

## १४५८

रसालावृत्त. रा. - यमन ता. - तेताला.'सोडिं पदर जाऊ दे' या चालीवर.

सोडा पदर एकटे म्हणुनी ॥धृ॥

आले अलंदीदर्शन घ्याया । ब्रह्मचारि हें गणुनी ॥ सोडा०॥१॥
द्वापरिंचे असते व्रजवर तुम्ही । तरी साजती करणी ॥ सोडा०॥२॥
नेऊं कुणाजवळीं गाऱ्हाणें । यापरिचे जरि सुमुनी ॥ सोडा०॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु योगि म्हणवितां । घ्या इंद्रिय-मन दमुनी ॥ सोडा०॥४॥

१४५९

सामनुष्टुपवृत्त. रा.- यमन. ता.- तेताला.

ना करिये अनरीत । यदुवर । ना करिये ॥धृ॥ (य९उ.३३४)
तुम तो लरके हौ पटेलनके । गरीब सतावत नीत ॥१॥
पतिव्रत नारी कूंज बुलाई । काह्यके मुरलीरीत ॥२॥
सीर हमारे टूक टूक किये । करत थटोलि अमीत ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु जाय कहूंगी । फेर भगोगे भीत ॥४॥

———

# पौराणिक लीलापर पदे

१४६०

सामनुष्टुप. रा.-भैरव. ता.- तेताला.

छन एक लाला बंसि बजाओ ॥धृ॥
आती हूं मै जमुनातिरको । भैरव राग सुनावो ॥१॥
सास ननद मेरी बहुत हटेली । तिनको धूल मिलावो ॥२॥
कोइ मुझे सोवला सिखावत । कोइ कहे जमुना मति जावो ॥३॥
निज बंसीका नाद सुनाके । बंधन घरका आज छुरावो ॥४॥
ज्ञानेश्वरकन्याके हियको । निजपगध्यास लगावो ॥५॥

१४६१ / शकटधाटीवृत्त.

नंदाचा नंदन बाई छेडितो ॥धृ॥
दहि दुध घेउनि मथुरे जातां । धावुनि पदरिं अडितो ॥१॥
माठ फोडी दहिदुध भक्षुनि । कंचुकि ही फाडितो ॥२॥
ज्ञानेश्वरकन्येच्या हृदया । प्रेमभरें जोडितो ॥३॥

१४६२

प्रासंगिक धृवाख्यानसंबंधी.

उत्तानपादवचन - साममाणव. रा.- जोगी. ता.- दीपचंदी.



जीवित माझे कसें । माकड केलें स्त्रीनें जसें ॥धृ॥
होता एकुलता नंदन । आतां गेला कुलचंदन ॥१॥
पाहूं आतां कवण्या वनीं । कैसी ठाव देइल अवनी ॥२॥ (य९उ.३३५)
ज्ञानेश्वरसुतभाग्य बहू । गेला सानचि हरिला स्तवूं ॥३॥

१४६३ अभंग. धृववचन

नाहीं मज कांही द्यावयासी धन । करितों हें ध्यान जीवें भावें ॥१॥
तयागुणें देवा करावीचं कृपा । दावा मज सोपा निजमार्ग ॥२॥
द्यावि भेटी मज तान्हेलीया पोरा । स्वामी शार्ङ्गधरा दीनबंधू ॥३॥
ज्ञानेश्वरबाळ बहू प्रेमनिष्ठ । करितसे स्पष्ट मनें सेवा ॥४॥

१४६४ / भगवद्वचन

आर्या - मज जो भजतो भावें त्याला होऊनि सद्गुरू मीच ।
येउनि सत्वर करितों वरिष्ठ त्या होउनी स्वयें नीच ॥

१४६५ / हिंदी / धृव वचन :-

दोहा - मोरे तुमही नाथ हो मोरे तुमही देव ।
नारदप्रभु निवारिये मोरे मनका भेव ॥१॥

राम चरित्

१४६६ - कौशल्यावचन

संदीपनीवृत्त. रा.- जोगी. ता.- तेताला.

माई ह्मारो बतावो रघुबीर ॥धृ॥
जानकिबाला पांच बरसकी । साथें लछुमन धीर ॥ माई ह्मारो ॥१॥
सुमंतसह लवटाय रथ दियो । बिनु बल्कल नहिं चीर ॥ माई ह्मारो ॥२॥
सुमति कहो रघुपति सुखकारन । कौन मनाऊं पीर ॥ माई ह्मारो ॥३॥
अलकावतिपतिपग सुमिरनबल । पकरी दिलमों धीर ॥ माई ह्मारो ॥४॥

१४६७ / कौशल्यावचन -

सामकामदा. मूळ.-झिंझोटी. ता.- दादरा. गौण.- पांडुरंग स्मर अभंग.

काय ह्मणुनी कैकयी मज झालि वैरिणी ।
लेकरुं मम सुनेसहित धाडिलें वनी ॥धृ॥
काय मोडियले यज्ञ पूर्वि साजणी ।
छळिलें कीं सज्ञनास गर्व साजुनी ॥१॥ काय
रामनाम ग्रहण करित सशिव शालिनी ।
रामफूल वागविण्या मीच मालिनी ॥२॥ काय

पुत्रासह तप्त माझि सुगुणशालिनी ।
ज्ञानेश्वरकृपाचि वनिं रामपालिनी ॥३॥ काय

१४६८

कौशल्यावचन - सुशीला. रा.- जोगी. ता.- तेताला.

करवुं कुणा स्तनपान ॥ रामा ॥धृ॥ (य९उ.३३६)
ह्मणसिल जरि तूं भरत तुझा कीं । परि मी तुझ्यास्तव म्लान ॥ रामा ॥१॥
ह्मणतां सुत मज लाज वाटते । जनक तुं दयानिधान ॥ रामा ॥२॥
जानकि होती तेही नेलिस । विसरुनि माझें भान ॥ रामा ॥३॥
आला पान्हा तो तरि पिउनी । मग वनिं मांडीं ठाण ॥ रामा ॥४॥
ज्ञानेश्वररामार्थ नवसितें । वाहिन फळ फुल पान ॥ रामा ॥५॥

१४६९ / कौशल्यावचन :-

तिलोत्तमावृत्त. रा.- कालंगडा. ता.- राजविद्याधर.

अति सत्यप्रिय मम नंदन गे ॥धृ॥
प्रातःकाळीं सुरवर मुनिजन । ज्याला वाहती चंदन गे । अति ॥१॥
स्वभक्तवाल्मिकिवचनासाठीं । परतुनि दिधला स्यंदन गे ॥ अति ॥२॥
वसिष्ठ गुरु तो आह्मां सकळा । परि त्या करिं मनिं वंदन गे ॥ अति ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु करुणायोगें । करो दुर्जनकंदन गे ॥ अति ॥४॥

१४७० / हनुमद्वचन नारदं प्रति

सामकामदा. मूळ.- झिंझोटी. ता.-दादरा. गौण.- पांडुरंग स्मर अभंग.

काय वर्णुं गूण नारदा तुह्मापुढें । नाहिं कोणि ज्या समान विक्रमी फुडे ॥धृ॥
यज्ञोपवीत गुप्त ओळखोनियां । घेतलें किं पदरीं मज बा म्हणोनियां ॥१॥
वेदसिद्ध ग्रंथ योग आर्षनाम कीं । प्रणववाच्य होउनी निमित्त राम कीं ॥२॥
शोभे सव्यमांडिये विदेहनंदिनी । सिताराम मिळो मम हृदयस्यंदनी ॥३॥
ज्ञानेश्वर रघुनंदन एकची मला । भजतां करि रामरूप बुद्धि निर्मला ॥४॥

१४७१ / हिंदी / सीतावचन

सामनुष्टुप. रा.- जोगी. ता.- तेताला. हिंदुस्थानी खंजरी भजनाचे चालीवर.

बतावो मोको कोइ तोभी रघुनाथ ॥धृ॥
मैं जो मृग मारनको भेजी । गेलषण न करी बात ॥ बतावो ॥१॥
नसीब मेरा फुट गया है । लगिहूं रावणहात ॥ बतावो ॥२॥
मेरे बिन वे जानते नहीं । ललना लेना साथ ॥ बतावो ॥३॥ (य९उ.३३७)
जानकि दुःखी सुनके जटाऊ । गगन उड्यो जस बात ॥ बतावो माई ॥४॥



प्रभु अलकावतिपति ल्यावेंगे । राम मिलाय संगात ॥ बतावो माई ॥५॥

१४७२ / हिंदी / सीतावचन मारुतीप्रत

सुशीला रा.- तोडी. ता.- तेताला.

सुत तैं कहां देखे प्रभु राम ॥धृ॥
लछमन को मैं नहि सो बोली । भरपाई कृति बाम ॥ सुत तैं ॥१॥
रघुबिरबर नर तूं तो बानर । कैस करेंगा काम ॥ सुत तैं ॥२॥
जाकर कह रघुनायक चरना । मोंकु लिजाओ धाम ॥ सुत तैं ॥३॥
मारुति बोले सुन जननी तूं । सुमिर अलंदिपनाम ॥ सुत तैं ॥४॥

१४७३ / हिंदी / सीतावचन

सामनुष्टुप. मूळ.- जोगी. गौण- हिंदुस्थानी भजनाचे चालीवर.

पूछो हरिको कबतक करूं मै शोक ॥धृ॥
मुझे आसरा उन बिन नाहीं । क्षमा करावहुं रोख ॥ पूछो ॥१॥
तुह्मरी कीर्ती जुग जुग जी ओ । बुरा कहत मोहे लोक ॥ पूछो ॥२॥
लखमनजी को बोली मैं सो । नाथ मिटाओ दोख ॥ पूछो ॥३॥
ज्ञानेश्वरचरणन प्रसादकी । रामनाम यहि नोक ॥ पूछो ॥४॥

१४७४ / सीतावचन

सुशीला. रा.- असावरी. ता.- तेताला.

जननी धरणी दे मज ठाव ॥धृ॥
सद्भक्तातें छळिलें यास्तव । दुर गेले रघुराव ॥ जननी ॥१॥
शिला तरू या काननिं जपती । दशरथनंदननांव ॥ जननी ॥२॥
हे रामा मी अन्यायी परि । तुमचा सदय स्वभाव ॥ जननी ॥३॥
सुर्या स्वामिस ताप न दावीं । पवना हळु हळु धाव ॥ जननी ॥४॥
रामास्तव मी देव नवसितें । श्रीअलकावतिराव ॥ जननी ॥५॥

१४७५ / श्रीरामवचन कौशल्याप्रत

रमावृत्त. रा.- यमन. ता.- तेताला.

अंबे येतों परतोनी ॥धृ॥
पूर्वी तूं मम अवतारार्थी । श्रमलिस फार मनीं ॥ अंबे ॥१॥ (य९उ.३३८)
तव श्रम उसणें फेडाया मी । जातों आज वनीं ॥ अंबे ॥२॥
रघुनंदनवचन श्रवणानें । रामरूप जननी ॥ अंबे ॥३॥

ज्ञानेश्वरप्रभुकरुणेनें मन । स्थिर रघुपतिचरणी ॥ अंबे ॥४॥

१४७६ / सीतावचन

लग्नसमयींचे - साममाणव. मूळ.- पूर्वी.ता. दीपचंदी. गौण.- राधे घडि घडि.

माझ्या पितयानें पण व्यर्थ केला । रामप्रेमास जीव भुकेला ॥धृ॥
जरि असतें मी मोकळि सदनीं । तरी आज करितें राम धनी ॥१॥
ह्मणुनि बाई ऐसें वाटे । गोतप्रतिबंधक देव वाटे ॥ माझ्या ॥२॥
आळंदीश्वरसंगति करितां । होइन मी स्वसौभाग्यभरिता ॥ माझ्या ॥३॥

१४७७

विशोकावृत्त. रा.- यमन. ता.- तेताला.

तपोवनीं गेला राम गडे ॥धृ॥
सुमंत रथ हा घेउनि आला । काय असे तिकडे ॥ तपोवनीं ॥१॥
कैकयीनें हें द्वंद्व साधिले । पाठवुनि पतिमढें ॥२॥
वसिष्ठनाथा किति मी तुमच्या । धाउनि पायिं पडें ॥ तपोवनीं ॥३॥
राज्याभिषेक होऊं न देतां । लोपविलें मुखडें ॥ तपोवनीं ॥४॥
आणुनि द्याया राम मला तुह्मि अलकावतिप फुडे ॥५॥

१४७८

सीमावृत्त. मूळ.- पिलु. ता.- तेताला. मज टाकुनि अवध्याजणि गेल्या.

बाइ दुर गेला रघुराणा वो ॥धृ॥
वांझ नसोनी कैकयी माझा । वनिं पाठविला तान्हा वो ॥१॥
नाही मजला गति त्या वाचुनि । अपतिक मी अतिदीना वो ॥ बाइ दुर ॥२॥
की मी नव्हतें माय तयाची । त्यजिलें मद्वचनांना वो ॥ बाई दुर ॥३॥
वसिष्ठादि सद्गुरु सत्यची परि । तेही नाणिति ध्याना वो ॥ बाई दुर ॥४॥
प्रेमचि नाहीं मजला ह्मणुनी । गेला न पिउनि पान्हा वो ॥ बाई दुर ॥५॥
अलकावतिपति येउनि केव्हा । भेटवितील सुतांना[१] वो ॥ बाई दुर ॥६॥
(य९उ.३३९) *(१.राम लक्ष्मण सीता या तिघांना)*

१४७९ / हिंदी दोहा

स्तंभ विदाऱ्यो नाथजी निज भक्तनके काज ।
आय सभामें भक्तितें राखी द्रौपदिलाज ॥१॥

रामाचा पाळणा - १

१४८०



सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ.- सारंग ता.- धुमाळी गौण.- कुणीकडे तुह्मी या चालीवर

महाराज पाळण्यावरी । निजा रघुराया ।
वंदितें प्रेमभरी पायां । पाळण्यावरी ॥धृ॥
महाराज कनकपत्रांनीं । पत्रांनी करुनि घडित ।
स्यमंतकआदिरत्नजडित । रचिला असा ।
असा भाव फळित । संतमुनिहृदयीं जो रुळत ॥
हालविति बहु । बहु अहेव जाया ।
प्रेमभरि वंदितसें पायां ॥ पाळण्यावरी ॥१॥
महाराज पीठ साजिरें । साजिरें चौरंगी । चांदवें सुंदर नवरंगी ।
मध्यें शोभते, शोभते, कोमलांगी । मूर्ति जे ब्रह्ममय तरंगी ॥
ध्यानरूप तें, रूप तें हरवि माया ॥ प्रेमभरि ॥२॥
महाराज दिवस यामिनी । यामिनी तुह्मां रडणें ।
उचित हें नोहे आधि पडणें ॥
करुनि कां घ्यावें, उगें हडहडणें, सर्वदा शांतिरूप जडणें ॥
प्रार्थितें तुह्मा, निजदासी कराया ॥ प्रेमबळें ॥३॥
महाराज आह्मी बायका, बायका कुलवंत, तुह्मी तों श्रीहरी भगवंत ॥
एकरूपिणी,रूपिणी पत्निवंत । आह्मांला करा स्वरूपवंत ॥
आळंदीपती, पतिकन्याकाया । अर्पिली प्रभुजी तव पाया । पाळण्यावरी ॥४॥

१४८१

रामाचा पाळणा - २

सामनुष्टुपवृत्त. मूळपीठ.- सारंग ता.- धुमाळी गौण.- कुणीकडे तुह्मी या चालीवर

महाराज, कोंवळी तनु, तनु तुमची देवा,
श्रमली करुनि भक्त धावा ॥ कोंवळी तनू ॥धृ॥
महाराज, पोटिं वाटतो, वाटतो कळवळा, रंग हा दिसतो सावळा ।
भाव उपजतो, उपजतो मनीं कोवळा, येतसे सुलीनता जवळा ।
शुद्ध सांपडे परब्रह्मठेवा ॥ श्रमली ॥१॥
महाराज कितिक भक्तांनी । भक्तांनी कष्ट दिधले, परि ते सकळ सहन केले।
असुरें जहीं, जहीं निगम नेले ॥ तहीं नदिजलचर तुह्मि झाले ॥ मारुनी
असुर । काढिला श्रुतीठेवा ॥ श्रमली करुनि भक्तधावा ॥ कोवळी तनु ॥२॥
महाराज, कूर्मवाराह, वाराह नरहरी, होउनी असुर अवघे मारी ॥

रक्षिले भक्त, भक्त ते निर्विकारी । जीववुनि कृपासुधाधारी ॥
ध्यानधारणीं । तारितां मूढजीवा ॥ श्रमली ॥३॥ (य९उ.३४०)
महाराज बळी पाताळीं । पाताळिं समुळ नेला ।
क्षत्रियकुळा नाश केला । रावणासाठी, साठिं येथ आला ।
सुरमोचननिश्चय वहिला ॥ सूख द्यावया, द्यावया मुनीदेवा ॥
श्रमली करुनि भक्त धावा ॥ कोवळी तनु ॥४॥
महाराज कृष्ण कारुण्य, कारुण्य कलकिमूर्ति,
संतमुनि गाति तुमचि कीर्ती । परी द्यावी हे, द्यावि हे आह्माला स्फूर्ति ।
रहावी नित्य हृदयिं मूर्ति । म्हणुनि आरंभी, आरंभी पादसेवा ॥ श्रमली ॥५॥
महाराज कृष्ण अवतारीं, अवतारीं प्रभु आह्मा, करणें आहे पतिप्रेमा ।
म्हणुनियां आतां, सेवेचि करूं सीमा, होउनि ज्ञानेशज उगमा ।
विष्णुरूपिणी, रूपिणी मनीं भावा, श्रमली करुनि भक्तधांवा ॥ कोवळी ॥६॥

१४८२

सुशीलावृत्त. रा.-जोगी ता.-तेताला.

जानकि मम सकुमार ॥धृ॥
विवाहकालीं त्यजुनी नृपवर । दिधलें यश मज फार ॥१॥
स्त्री असुनी मम भक्तिच करी ती । ध्यान धरुनि निज सार ॥२॥
विरहसौख्य मिळवाया नेणों । सोडियला संसार ॥३॥
ज्ञानेश्वरकन्योपास्य प्रभु । दाखविं विहित विकार ॥४॥

१४८३ / हिंदी

रंभावृत्त. रा.- यमन. ता.- तेताला.

सब जग कारन राम हमारा ॥धृ॥
भृकुटिकटाहकटाक्षकोपबल । मंदोदरिबरदलसंहारा ॥ सब ॥१॥
कंचननगरी बिभिखन दीन्ही । शिलासे कधिपार[1] उतारा ॥ सब ॥२॥
शिवधनु तोरि जानकी लाई । नामतें पाख जटायू तारा ॥ सब ॥३॥
ज्ञानेश्वरकन्यासुखकारन । रघुबरचरणयुगल सिर धारा ॥ सब ॥४॥

(१. समुद्रः- कं जलं धार्यते अनेन इति.)

१४८४

लावणीवृत्त. मूळ.- यमन. ता.- लावणी.गौण.- नरजन्मामधिं, या चालीवर.

राम मला भेटवील ऐसी स्वभक्तगुणमाउली ।
स्मरतें घडि घडि तत्पाउली ॥धृ॥ (य९उ.३४१)



कोंवळी तनू फिरतां रुतती कंटक चरणीं सये । कशी मी मागत हरिण स्वयें।
चुकी हेच की कंचुकि मागुनि आळेलागि न भियें । छळिलें साधू वदनें बये ॥
आता येउनि कोण मजवरी करिल कृपासावली । स्मरतें घडि घडि ॥१॥
मला असें वाटतें अवनिं तुह्मि निबिड तरूवरवनीं । तपस्वी रामार्थचि परमुनी[1]।
ज्यायोगें रघुपति सोडवुनी नेइल मजलागुनी । जपावा मंत्र असा तरि गुणी॥
कधि येउनि मज देइल अभया ज्ञानेश्वरमावली ।
स्मरतें घडि घडि तत्पाउली ॥ राम मला भेटवील ॥२॥

(१. पर = उत्कृष्ट)

१४८५ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. रा.- बेहाग. ता.- तेताला.

कौन बन देखूं राम हमारा ॥धृ॥
रामबराबर सीयाभि गई । नील भया उजियारा ॥ कौन ॥१॥
गुरु तो कहते हियमों धूंडो । द्वैति बतावत न्यारा ॥ कौन ॥२॥
दोहा - जाको षट् शास्तर नहिं जानत पाये नहिं मुनि पार ।
शंकर सुमिरत निरबिख होगये नेति कहे श्रुति चार ॥ कौन बन ॥३॥
ज्ञानेश्वरचरणांबुपानतें । जगमों रामहि सार ॥ कौन बन ॥४॥

१४८६ / हिंदी

कुरंगाक्षीवृत्त. मूळ.- जोगी. ता.- तेताला. गौण.- हिंदुस्थानी भजनाचे. चालीवर.

बतावो माई कौन बन रघुबीर ॥धृ॥
हात धनुख शर लेले बनमो । चालत निज पद धीर ॥१॥
देखत नयनन तरु गन तारे । मुक्ति दिई पुनि चीर ॥२॥
तरुबर तुम सब मुनिगन होय है । करते पान समीर ॥३॥
तप करि करि रामको बुलाये । बनि अपवर्गनि धीर ॥४॥
शाम तनू रघुपति लछुमन का । सुंदर गौर शरीर ॥५॥
श्रीज्ञानेश्वरबाला हरिपग । राखति प्रेम सुशीर ॥६॥ (य९उ.३४२)

रामाचा पाळणा - ३

१४८७

सामनुष्टुपवृत्त मूळ.- सारंग. ता.-धुमाळी. गौण.- कुणीकडे तुह्मी. या चालीवर.

उत्सव समयींचे उद्गार

महाराज ब्रह्म सावळें, सावळें नृपतिसदनीं ।
जयाची कीर्ति वेदवदनीं ॥ ब्रह्म सावळें ॥धृ॥

महाराज सच्चिदन्वयें, अन्वये सौख्य भरित । सृष्टि झलियाहि उर्वरित ॥
महावाक्यार्थे वाक्यार्थे असंसरित । सदा जें व्याप्य हृदय भरित ॥
मानुषें देहे, जाहलें शत्रुकदनीं ॥ जयाची कीर्ति ॥१॥
महाराज यज्ञिंही नेघे, नेघे अवदान । करवि कौशल्या स्तनपान ॥
सदासर्वदा, सर्वदा समाधान । तयासी माय घालि स्नान ॥
नवल भाग्य हें, भाग्य हें शंसु वदनी । जयाची कीर्ति वेदवदनीं ॥ ब्रह्म०॥२॥
महाराज अलकावती, अलकावतिपतिकन्या, जयाच्या कृपें परम धन्या ।
शबरि जाहली, जाहली सर्व मान्या, सेवुनी प्रेमपक्व धान्या ॥
विवर्ती तनू, तनू असुर सुदनीं ॥ जयाची कीर्ति वेदवदनीं ॥ ब्रह्म०॥३॥

१४८८

रघुरायाचा पाळणा - ४

सामनुष्टपवृत्त. मूळ.- यमन. ता.- धुमाळी. गौण.- महाराज पाळण्यावरी. या चालीवर.
उत्सव समयींचे उद्गार.

जो जो जो जो रे, रघुराया । संसृतितरण उपाया । जो जो जो जो रे ॥धृ॥
महाराज, प्रणव-तनुरूपा, तनू रूपा परमेशा । मायामानुषवेषा ॥
अतितर अगम्य तूं, श्रुतिशेषा । अप्रकाश्य दिनेशा ॥
लक्ष्मी सेवितसे, तव पाया । संसृति तरण०॥१॥
जो जो जो जो रे प्रेमघना, शांता सुखमय सगुणा ।
नेणति मुनि जनही, त्वदिय खुणा, पाहति श्रुतिगत शकुना ॥
तवविण तुच्छ असे, तनु जाया ॥ संसृति तरण उपाया०॥२॥
अलकावतिकान्ता प्रति शरण । ध्याते हृदयीं चरण ।
येणें सहजचि हो । भव हरण । तुटतें पैं जनिमरण ।
करि बा पावन । ही प्रभु काया । संसृति०॥३॥ (य९उ.३४३)

१४८९

रामाचा कनक पाळणा - ५

सामनुष्टुवृत्त. मूळपीठ.- यमन. ता.- धुमाळी.गौण.- कुणीकडे तुह्मी या चालीवर.

महाराज कनक पाळणा, पाळणा राममूर्ति ।
जयाची निगम गाति कीर्ती ॥ कनक पाळणा ॥धृ॥
महाराज देत सज्जना, सज्जना निजस्फूर्ती, करित जगकामनाहि पूर्ती ॥
योगी साधिती, साधिती स्वयंस्मृति । जयाची निगम ॥१॥



महाराज कनक निर्मळ, निर्मळ शुद्धचित्त, शान्ति डोल्हारा सालंकृत ।
महाराज प्रेमरज्जूनें, रज्जूनें आकळीत, ब्रह्मानंदे आंदोलीत ॥
आंत शोभली, शोभली आत्मदीप्ती । जयाची निगम ॥२॥
महाराज राणि कौसल्या । कौसल्या भाग्यशील, उदरी आला घननीळ ॥
योगिया चढले । चढलें नव बळ, मोक्ष मिळवाया उतावीळ ॥
असुर पावले, अंतरी महति खंती ॥ जयाची निगम ॥३॥
महाराज अलंदीपती, पति सद्गुरुराणा, नये वाणि मना अनुमाना ॥
तोचि भेटवी, भेटवी रघूराणा, करुणाघन देउनि ज्ञाना ।
सूख सच्चिती, सच्चिती गुरूमूर्ति ॥ जयाची ० ॥४॥

१४९० सीतावचन -

कमलारंगीवृत्त. रा.- भूप. ता.- तेताला.

सुंदर शामतनू ॥धृ॥
आणुनि कोणी भेटवील कधिं । भंजकशूलिधनू ॥ सुंदर ॥१॥
जन्मुनि जन्मुनि कुंभिनिवरि जो । नित्यचि रडवि दनू ॥ सुंदर ॥२॥
भेटल हरि अलकावतिपतिचा । सेवुनि चरणकणू ॥ सुंदर ॥३॥

१४९१

रमावृत्त. रा.- यमन. ता.- तेताला. उत्सव समयीचें उद्गार.

तो हा तव उदरीं ॥ अंबे ॥धृ॥
ज्याला श्रुतिमुनि हृदयीं ध्याती । सोडुनि भव कुदरी ॥ अंबे ॥१॥
पहिला प्रणव एक ती वर्णी । सगुणचि सुपदधरी ॥ अंबे ॥२॥
फळलें फळ हें वात्सल्याचें । दिलें आळंदिवरी ॥ अंबे ॥३॥ (य९उ.३४४)

१४९२

सज्जनाचें हित दुर्जन संहार । सत्कर्मानुसार करील हा ॥१॥
माय बाप बंधू यास नाहीं कोणी । आहे हा निर्गुणी जैसा तैसा ॥२॥
जनन मरण अविद्येचा खेळ । नाहीं घननीळ बद्ध तेथें ॥३॥
ज्ञानेश्वकृपा होतांचि आकळे । अन्यथा न कळे तपें योगें ॥४॥

१४९३ / संस्कृत श्लोक

अयं साक्षात्परानंदो दृश्यते जातवानिव ।
न जायते नान्तमेति इत्यादौ निश्चयं कुरु ॥१॥

१४९४

डोळ्याची बाहुली न सोडी बुबूळ । मार्तण्ड मंडळ नभीं पाहे ॥१॥
तैसा हा गोविंद असोनियां स्थीर । वधील असुर देवकाजा ॥२॥
नेईल मागोनी आधी विश्वामित्र । वधील अमित्र त्राटिकेतें ॥३॥
पर्णील आपुल्या आंगीची चित्कळा । ज्ञानेश्वरबाळा समर्यादा ॥४॥

१४९५

सुशीलावृत्त. रा.- सारंग. ता.- तेताला (राजविद्याधर)

घेईल हा वनवास ॥ माते ॥धृ॥
सोडुनि सकलहि भूपतिवैभव । करूं जाइल कुधिग्रास ॥ माते ॥१॥
सुग्रिवसख्यें मारुनि रावण । भेटल पुढति तुह्मांस ॥ माते ॥२॥
अक्षयचि करिल, मग ज्ञानेश्वर- । बाला हृदयिं निवास ॥ माते ॥३॥

१४९६

कीर्तन समयीं दृष्टान्तार्थ

कुबेराची कथा

(अपूर्ण.)

ओवी - कपाळीं चर्चिला शेंदूर । विक्राळ दाढा भयंकर ।
पाशें बांधोनि यमकिंकर । चालविती गुणनिधीतें ॥१॥
दशभुज पंचवदन । कोट्यावधी वीर येऊन ।
यमूदतांचे पाश तोडोन । केला मोकळा गुणनिधी तो ॥२॥
ते पुरुष ह्मणती यमदूतांप्रति । तुह्मां न कळे व्याकरण व्युत्पत्ति ।
याचें गुणनिधी रूढ नांव असतां क्षिती । यास यमपुरीप्रति कां नेतां?॥३॥
गुणनिधीस यमपुरीस नेणें । यावरुनी चित्ता ऐसें जाणें ।
कां धर्मशब्दाचाही अर्थ होणें । अधर्म तुमचें नगरांत ॥४॥
यमधर्म धर्मन्याय करीत । गुणनिधी दोषांस कां पात्र होत ।
ऐसा ऐकोनी वचनार्थ । बोलती दूत परस्परे ॥५॥ (य९उ.३४५)

१४९७

कमाल-कथेसंबंधी :- कमलारंगीवृत्त. रा.- जोगी. ता.- तेताला.(राजविद्याधर)

क्षणभरि राहिं उभा ॥धृ॥
संत तृप्त झालियावरी मग । आकळि श्यामप्रभा ॥१॥
येइन तुझिया भेटिस आजी । सोडुनि विभवनिभा ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु करुणामूर्ती । उजळवि आत्मप्रभा ॥३॥

१४९८



सामनुष्टुपवृत्त. मूळ.- सारंग. ता.- गौण.-कुणीकडे तुम्ही. या चालीवर.

रघुनायका । माझ्या निजबाळा । धाडिला रथ कां वेल्हाळा ॥धृ॥
वनीं तुजलारे रुततील बहु कांटे । उष्णशीतादि तेहि मोठे ।
बाळ सकुमारा । सकुमारा गुणनेटे । कोण घालील स्नान पेठे ।
अक्षयीं सुखदा । सुखदा महिपाळा ॥ धाडिला रथ कां ॥ रघु०॥१॥
सूर्यवंशींच्या । वंशिंच्या भानुनाथा । प्रार्थितें तुला दिनानाथा ।
नको तापूं तूं । तापूं तुं उष्ण पंथा । रक्षिं मम पुत्र कृपावंता ।
जगव्यापका । कश्यप-अदितिबाळा । रक्षि तूं माझ्या घननीळा ॥ रघु० ॥२॥
महाराज सखिये जननी । जननि भूमिमाते । सुरक्षित नेइं राघवातें ।
होइं सकुमारे । सकुमारे पदघातें । प्रतीबंध तो न हो त्यातें ।
अलंदिपचरणीं । ठेवित शिरकमळा ॥ धाडिला रथ कां वेल्हाळा ॥३॥
रघुनायका । माझ्या निजबाळा । धाडिला रथ कां वेल्हाळा ॥धृ॥

१४९९ / उत्सव समयीचें उद्गार / ओव्या.

ओवी - अगा कुरूप जरी जाहली । वनिता जे आपुली ।
परी भोगितां तेचि भली । आणिका दोखूं पाहे पां ॥१॥
कां बुबुळेवीण नयन । नासिकावांचोनि वदन ।
पुत्रावीण शून्य सदन । मजलागून तेविं वाटे ॥२॥
पुत्र तुझा अनंतगुण । श्रुती म्हणती नेति श्रमोन । (य९उ.३४६)
तेथ माझें एक वदन । करील वर्णन लीला किती ॥३॥
म्हणोनि सानुमती बालवाणी । श्रीज्ञानेश्वरवसिष्ठचरणी ।
अर्पिली आतां आघवीं जनीं । कैवल्यदानी भजावा ॥४॥
सच्चिदानंद परमेश्वरू । उतरावया भूमिभारू ।
मानुषवेष नटप्रकारू । मनोहरू दावितु ॥५॥
जो यज्ञांत नेघे अवदान । जया साहीना वेदाभिमान ।
तो परमात्मा कर पसरोन । घालीं भोजन ह्मणे जननी ॥६॥

१५००

बिभीषणवचन रावणाप्रत.

(दसरा.पालखीचे वेळी म्हणवयाचे पद)

लावणीवृत्त. मूळ.- पिलू. ता.- धुमाळी.गौण.'ये धावत कृष्णाबाई अति कनवाळे' या चालीवर.

श्रीराम भक्तजनकाम शरण करसी रे । तरी भवदव हा तरसी रे ॥धृ॥
तो दीनबंधु जगदात्मा सुरवरकार्या । अवतरुनि पाळितो आर्या ।

तूं क्षोभविलें आणोनि तयाची भार्या । हें नाही सु पुस आचार्या ॥
॥चाल ॥ झालें जें कांहीं मागे । विनवूनि तें क्षमा मागें ।
प्रभु सम सर्वांसी वागे । सुखसंधि कां न करसी रे ॥ श्रीराम ॥१॥
हें वैभव जाईल सारें विषयापायी । उठ झट विनट रघुपपायीं ॥
गर्वे गुंतूं नको बापा आन उपायीं । भज विश्व बाप आणि आई ॥
॥चाल ॥ जाऊनि निज नगरापुढें । विनवीं हरिला रतिकोडें ।
स्वमन हें आवरीं वेडें । कां राज्य उगें हरशी रे ॥ श्रीराम ॥२॥
अति पातकि गज-गणिका ही तारिलि नामें । तारिल्या गोपिका कामें ॥
तूं मानुं नको चिरतर ही कनकमय धामें । पडशिल न राखितां रामें ।
॥चाल ॥ ही तव मति नच कामाची । चट खटपट करीं सामाची ।
करुणा होइल रामाची । ज्ञानेश्वर जरी वरिशी रे ॥ श्रीराम ॥३॥

१५०१

सिंधुजावृत्त. रा.- सारंग. ता.- तेताला.

अवतरला रघुराणा ॥धृ॥
सुरवरमुनिमनीं हरुष अपारचि । भय दानवजनप्राणा ॥१॥
श्रुतिजननी वर्णित तेजचि तो । भानुवंशमनीं जाणा ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु म्हणति जगतिं जें । परब्रह्म तव तान्हा ॥३॥ (य९उ.३४७)

१५०२

रसालावृत्त. मूळ.-यमन ता.- धुमाळी. गौण -

ब्रह्म समज निज मनास । जननी ॥धृ॥
चवदा वरुषें राज्य त्यजुनि हा । जाइल दंडकवनास ॥१॥
हा हठ करितां कंटाळसि तरी । विसरुं नये तद्गुणास ॥२॥
निमिष वियोगीं ध्यायीं अंतरीं । याच्या निर्गुणपणास ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु भेटल पुढती । पदीं मिळवुनि दुर्जनास ॥४॥

१५०३

रामाचा पाळणा - ६

वासंतीवृत्त. मूळ.- यमन. ता.-धुमाळी. गौणपीठ -

पहुडे माझा राम पाळणीं ॥धृ॥
दशरथसदनीं अजजन्मा कीं आला जनपाळणीं ॥धृ॥
तप तपती ज्यास्तव मुनिवर वन । सेवुनि तृण आळणी ॥१॥
ज्ञानेश्वरजा करि चरणांहुनी । तनुमनओंवाळणी ॥२॥



१५०४

सामपटुवृत्त. रा.- जोगी. ता.- दीपचंदी

देतें कवळ वदनीं । तान्हया ॥धृ॥
साखर लोणी भात दहीं आणि । अनारिसे रांधुनी ॥१॥
येऊं नका ग पळभरी बाई । दृष्टी झडपल झणी ॥२॥
यागिंहि जो नेघे अवदाना । तो जेवी सुरमणी ॥३॥
तृप्त अशा आळंदिवल्लभा । आनंद अती भोजनीं ॥४॥

१५०५ / विडा

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- जोगी. ता.- तेताला. गौण.- ''विडा घ्या हो नारायणा'' या चालीवर.

विडा घ्याहो रघुनाथा । देवा जानकीकांता ।
जोडोनियां दोन्ही कर । पदीं ठेवितों माथा ॥१॥
निवटोनी गुण सारे । हे अविद्येचे तीन्ही ।
मंत्रवर्ण तेरा तेवी । तत्व त्रयोदश गुणी ॥२॥
एकपत्नि तुम्ही ठावें । परी कृष्णअवतारी ।
स्वीकाराल याचें चिन्ह ।घ्यावे तांबूल करीं ॥३॥
अगस्तिसंहितेतें । मनीं मानुनीयां साचें ।
भावी माधुर्यबळें । बोल हे संभ्रमाचे ॥४॥ (य९उ.३४८)
जानकीपादनखीं । करूनियां दंडवत ।
रुक्मिणी होतां सीता । वरीन ती गोपीहेत ॥५॥
आळंदीवल्लभा जी । देवा सगुणनिर्गुणा ।
भवत्पदीं जडो माथा । भाव नवा किंवा जुना ॥६॥

१५०६

रामाचा पाळणा - ७

सुशीलावृत्त. रा. गौडसारंग. ता.- तेताला.

पहुडला रघुराय । पालखीं ॥धृ॥
योगसमाधी त्यजुनी मुळिंची । रक्षी ब्राह्मण गाय ॥१॥
श्रौतस्तवनें जागा नच जो । त्याला हालवि माय ॥२॥
शंभुसहित मुनि ध्याति जयाला । विसरुनि जीवमनकाय ॥३॥
ज्ञानेश्वरजा करित विनंती । दाखविं झडकरि पाय ॥४॥

०००

श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ.

श्री वाल्मिकीय सारोद्धार

## पदरामायण

१५०७

गणेश वंदन

वंदुं गजाननचारुचरित्रा ॥ पावरे पवित्रा ॥धृ॥
हृदयवनीं लाविति रिपु वणवा । येऊं द्या कणवा ॥
माय बाप गणपति तूं बरवा ॥ आवडी पुरवा ॥
विनवणि जोडुनि कर शिवपुत्रा ॥ पावरे पवित्रा ॥१॥
विघ्ने परिहरि कोमलगात्रा । पावरे पवित्रा ॥
अलकावतिपतितनया याचित ॥ हरिचरणीं लावीं चित्त ॥
प्रेमळवशमानस निजतंत्रा ॥ पावरे पवित्रा ॥२॥ (य९उ.३४९)

१५०८

''लाल शालजोडी जरतारी'' या चालीवर.

कोण तुजविना करुणा जननी करिल सहज बाळा वरुती ।
अन्य देवता नाम भजाया वदनिं बसुनि देसी स्फूर्ति ॥ कोण तुजविना ॥धृ॥
तूं पार्वति तूं क्षिरसागरजा गंगा शचि तुजला ह्मणती ॥
नारी जगीं जितुक्या तितुक्याही जननि सुजन तव रूप गणती ॥ कोण ॥१॥
नवल वदनिं तव वास भरंवसे तुलाचि जन सकलहि स्मरती ।
परि कुमती नाना देवपदिं विसरुनि तुज मन पाठविती ॥ कोण ॥२॥
अलकावतिवल्लभचरणाची आशा मनिं धार दयाळे ॥
तदीय सुंदर गुण वर्णाया स्फूर्ति देइ तूं विधिबाळे ॥ कोण तुजविना ॥३॥

१५०९

प्रणमू हृदय रमण चरणाला ॥धृ॥
ज्याविण निजसुख फळ नच लागे । जनि क्रतुशततप आचरणाला ॥१॥
करुणाकर एकान्ति अवलिला । करिं धरुनी सुकुमार करणाला ॥२॥
परब्रह्म चिद्धन दाखवुनि । लावि वृत्तिसह आकरणाला ॥३॥
अलकावतिवल्लभ दीनजनक । दिननिशिं करितें तत्स्मरणाला ॥४॥
मधुर मधुर गुरुनाम गाउनी । पार करिन या जनिमरणाला ॥५॥

१५१०

प्राचेतस नमिला ॥ प्रभु तो प्राचेतस नमिला ॥धृ॥



श्रवण करुनि कवितारव ज्याचा । जनमनमद शमला ॥ प्रभु तो ॥१॥
श्रुतिसम छंद असा दुसरा मज । अवतरला गमला ॥ प्रभु तो ॥२॥
यद्विक्रम किति वानु मुखें या । दशशतमुख श्रमला ॥ प्रभु तो ॥३॥
विश्व विष्णुमय सहज दाखवी । रामकथाकमला ॥ प्रभु तो ॥४॥
याचितसें अलकावतिवल्लभ । पाउलिं रति विमला ॥ प्रभु तो ॥५॥

१५११

कटावाचे चालीवर.

प्रेमें नमुं सर्वहि साधू । यत्करुणें भवभयबाधू ॥धृ॥
नारायण शिव उमा कृपाघन । विधि सनकादिक नारद मुनिजन ।
वसिष्ठ शक्ति स्मर्तृ सुपावन । पुढति नमो पाराशर नंदन ।
शुकाचार्यचरणाप्रति वंदन । संत ताप निववाया चंदन ।
आसन त्या हें हृदयस्यंदन । देउनि नमिला यशुमतिनंदन ।
यन्नामें अरिबंधनिकंदन । गाउं तयाचे पुण्यचरित हे ।
अलकावतिपति करुण सहायें । उमटुनियां अक्षय बोधू ॥१॥ (य९उ.३५०)

१५१२

त्रिविध हरिहर मूर्ति सावळी. या चालीवर.

अंजनितनया दीनदयाला देइं सहाय मला ॥ प्रभुरे ॥
कोणि नाहि तुजविना असा जो रामचरणिं रमला । अंजनितनया ॥धृ॥
आजवरी नरदेही लोकीं भवतरितटिं क्रमला ॥ दयाळा ॥
वानरतनु घेउनि त्वां भजनें मोक्षहि आक्रमला ॥ अंजनितनया ॥१॥
तुला शरण ये कदापि तो मग जाइच ना भ्रमला ॥
अलकावतिवल्लभकरुणेनें रामिं मती विमला ॥ अंजनितनया ॥२॥

१५१३

मानस तूं भज भज रामा । टाकुनि धन नंदन रामा ॥धृ॥
अष्टौ प्रहर स्मर नामा । सांडुनि अभिमान कुनामा ॥
हृदयींच्या काढुनि कामा । दे सोडुनि संसृतिकामा ॥१॥
धनवंता करिसि सलामा । ते पाहति नाच गुलामा ॥
कर पसरुनि मागसि दामा । शिवि देउनि धाडिति धामा ॥२॥
अलकावतिपतिपदकामा । वरितां अधिकार न कामा ॥
वायां भटके न रिकामा । लावी तनु सज्जनकामा ॥३॥

१५१४

रामस्तुति

त्रिविध हरिहर मूर्ति सांवळी. या चालीवर.

सुलभ सांगतों शोध तुला मी श्रुतिच्या तत्वाचा ।। मानस ।।
त्यजुनि काम रघुराम भजावा सागर सत्वाचा ।।धृ।।
शरणागत कधिं उपेक्षितो हें न ऐकिलें करणी ।
तुझा असें ह्मणवितां तारितो असो नसो करणी ।।
अलकावतिवल्लभचरणांबुज धरितां हृद्भुवनीं ।। दयाळा ।।
मुंगि असो वा किडा तयाला समय नाहिं च्यवनी ।। सुलभ सांगतो ।।२।।

१५१५

त्रिविध हरीहर, या चालीवर.

नांवे पावन करि पतिताला अयोध्या नगरी ।
सूर्यवंशि त्या स्थळीं सत्वशिल दशरथ राज्य करी ।।धृ।।
प्रजा पालनीं तत्पर जैसा माय बाप हृदयीं ।
देव सकल संतुष्ट देशिं नच दुःख शोक कांहीं ।। (य९उ,३५१)
झाले संवत्सर किति पोटी परि संतति नाहीं ।
आवाढव्य हें राज्य परी त्या चैन नसे देही ।
दिवस निशीं राजाला सुकवी सुतचिंता मगरी ।। सूर्यवंशि०।।१।।
एकविक्रमे व्याप्त विश्व जो लाजवि त्रिविक्रमा ।
नित्य अप्सरा पुरिला ज्याच्या करिती परिक्रमा ।
थकित होति ऐकुनि सुरवरही ज्याच्या पराक्रमा ।
अंतःपुर रमणी पाहुनिया लाजति उमा रमा ।।
वरि अलकावतिपतिपद चिंतन राय अखंड करी ।। सूर्यवंशि०।।२।।

१५१६

भूपती खरें ते वैभव. या चालीवर.

नृप ह्मणे राणि सुख नाहीं माझ्या मनीं ।
धनदवलत राज्यें पुत्रावांचुनि सुनी ।।धृ।।
अनुकूल सकल एकहि वस्तू नच उणी ।
परि गेल्या मी कोणी न प्रजा पालनी ।।
।।चाल।। राजाविण दिन दिन लोक ग ।
करीताति दिवसनिशी शोक ग । पीडिती चोरहि अनेक ग ।।
।।चाल पहिली।। वाटतें मला तरि काय असें वांचूनी ।। धनदवलत० ।।१।।



दंडिता न चोरा कोणि सांपडे जेव्हां ।
भलतेचि घरोघरी भूप ह्मणविती तेव्हा ।।
पिळिताति प्रजेला घालुनि भलता गोंवा ।
यज्ञाविण खाती नित्यचि साखर खोवा ।।
।।चाल ।। गादीवर नसतां राजा ग ।। गरिबाला मारिती फौजा ग ।।
व्यभिचारी लुटिती मौजा ग ।।
।।चाल पहिली।। पतिव्रताहि भरिती पोट जनिंच नाचुनी ।। धनदवलत०।।२।।
पुत्रावरि येथिल सोंपुनिया सर्वही । मग जावें वनिं टाकुनिया निज गर्वही ।।
कामा नयेच शेवटीं कोटि खर्वही । परि पुत्राविण भेटे न महापर्वही ।।
।।चाल।। कोणत्या उपाया साधू ग । कोणासि गोष्टि अनुवादू ग ।।
काळजी करि हृदयबाधू ग ।।चाल पहिली।।
ज्ञानेश्वर गावें प्रेम परम सांचूनी ।।३।।

१५१७

नंदनंदना अहो मधुसुदना. या चालीवर.

राणि ह्मणे महाराज कशाला शरीर सुकवावें ।
पुरोहिताला पुसा जयानें अखंड सुख व्हावें ।।धृ।।
ब्रह्मतनय करुणाघन स्वामी नारायण दुसरा ।
तो असता कनवाळू माथा मग मागें न सरा ।।
देव देवताहुनी थोर हो ब्राह्मणपदआसरा ।
संत देति तात्काळ देव दे लावुनि अति उशिरा ।। (य९उ,३५२)
साधु चरण सेवेनें असलें अनर्थ चुकवावे ।। पुरोहिताला० ।।१।।
बाहूबळ क्षत्रियास अक्षय विप्रा वाणिबळ ।
लोहशस्त्र राजाचें द्विजवरिं तपःशस्त्र प्रबळ ।।
युद्धीं जय अपजय हे येती क्षत्रियासि सकळ ।
सदा विप्रवर विजयि होति जे पुण्यशील निखळ ।।
नरजन्मामधिं सत्संगाविण स्वहित न चुकवावें ।। पुरोहिताला० ।।२।।
परब्रह्म हा शांत मुनी अति माय बाप जगतीं ।
सच्छिष्याला सद्गुरुवांचुनि उद्यां न आज गती ।।
अळस धरिति गुरुभजनीं त्यांची खरि यमराजगती ।
येउनियां जननीजठरीं ते पशू व्यर्थ जगती ।।
अलकावतिपतिपदिं पळ पळ पळ निजशिर झुकवावें ।। पुरोहिताला० ।।३।

१५१८

''नंद नंदना अहो मधुसुदना'' या चालीवर.

करा अनुज्ञा मला आणितों गुरुला विनवावें ।
संकट पडल्या संतपदाम्बुज युगुलिं लीन व्हावें ।।धृ।।
राजा उदास निरखुनि मंत्री सुमंत्रादि विमळ ।
मस्तक ठेवुनि चरणिं विनविती जोडुनि करकमळ ।।
महाराज भगवंता धरिली चिंता मनिं निखळ ।
राज्यावरि प्रभुचें दुर्लक्ष्य नेणति अज्ञुनि खळ ।।
उठा झटा विनटा भगवंता निजजन निववावे ।।संकट पडल्या०।।१।।
राव ह्मणे तुह्मिं चतुर शहाणे मंत्रि मला असता ।
देव सकल तोषवीन मानुनि तिहि लोकीं असता ।।
प्रतिनिधिकरवीं सांभाळाया सांगुनियां वसतां ।
चला जाउं लोटांगणिं ज्या स्थळिं गुरुवर मुनि वसता ।।
मजहि मानलें सदा अलंदीवल्लभ गुण गावे ।। संकट पडल्या०।।२।।

१५१९

''जांब जांभळी विचार करिती'' या चालीवर.

आजवरी धनराज्य भोगुनी जड केली फारचि काया ।
आह्मि दीन लेकुरें शरण तुह्मि येउं द्यावि हृदया माया ।।धृ।।
राजा दशरथ वसिष्ठसदना सहित समाजें गेला हो ।
अष्टभाव भरुनियां मुनिवरा नमस्कार तैं केला हो ।।
पुत्रवंत कीर्तिवंत हो हा वर गुरुवदनीं आला हो ।
इष्ट पाहुनी नृपवरचित्ता आनंदहि अति झाला हो ।। (य९उ,३५३)
कर जोडुनियां नृपवर वदला चला मंदिरीं गुरुराया ।। आह्मि०।।१।।
अरुंधतीसह विधितनयाला पालखींत मग बसवीलें ।
स्कंधि वाहुनी नृपवर आपण आणुनि सदनीं बसवीलें ।।
काय कार्य पुसुनियां गुरुवरें नृपवरचित्ता रिझवीलें ।
लीन नृपाळें मंत्रीकरवि मग गुरु चरणाला बुझवीले ।।
मुनि ह्मणती त्यज चिंता आठविं अलकावतिवल्लभपायां ।। आह्मि०।।२।।

०

हरिःॐ तत्सदिति श्री वाल्मिकीय सारोद्धारे पदरामायणे बालकांडे



दशरथचिंतापरिहारो नाम प्रथमः सर्गः।।

०००

१५२०

''जाऊ कामाला'' या चालीवर

प्रणमूं मंगलधाम, माझा निजजनवत्सल राम ।।धृ।।
धाव पाव ह्मणतांचि पुरवितो येउनि सकलहि काम ।
शूलपाणिसह मुनिवर जपती ज्या होउनि निष्काम ।। प्रणमूं ।।१।।
शांतिदेयेचे तरू पेरुनी हृदयचि करूं आराम ।
प्रेममंचकी बैसवुनीयां देउं प्रभुस आराम ।। प्रणमूं ।।२।।
निगम न ज्या निष्कृति सांगे ते तरले घेउनि नाम ।
अलकावतिवल्लभ करुणाघन आपण आत्माराम ।। प्रणमूं ।।३।।

१५२१

**श्रावण कथा**

''त्रिविध हरिहर'' या चालीवर.

काय करूं यापरी मानसीं नृपवर करि खंती ।
भल्या भल्याही प्राणिहिंसनामधें नव्हे शांती ।।धृ।।
कोणि एके दिवशी राजा दशरथ शिकारिला गेला ।
सेना सोडुनि मागें हरिणामागें लागला ।।
चपल चाल चालतां काननीं अतिशय पांगला ।
दाट झाडिं पाहुनी तरुतळीं उतरे भागला ।।
क्षुधा तृषेचा ताप फार जाहली म्लान कांती ।। भल्या भल्याही ।।१।।
उदक असल तरि कोठें ऐशा विचारिं तो स्तब्ध ।
अकस्मात तंव बुड बुड बुड हा श्रवणि पडे शब्द ।।
धनुष्यास चढवुनि रज्जू मग मुष्टि केलि बद्ध ।
शब्दवेधिं सोडिला शर तदा लक्ष्य करित विद्ध ।।
शिव शिव हरि हें कर्णिं ऐकुनी भूपतिला ग्लान्ति ।।२।। (य९उ.३५४)
विव्हल राजा जाउनि पाहे देखिलि नरमूर्ति ।
बाण उपटुं लागला तदा तो वदला शुभकीर्ति ।।
महाराज तुज अभय असो मी वैश्य जाण याती ।
ब्रह्महनन तुज घडलें न परी विनवणि धरिं चित्तीं ।।
मायबाप मम फार तान्हेले त्यांची करिं शांती ।। भल्या भल्याही ।।३।।

वृद्ध असति त्यासाठिं कावडी ही मी भरलि आहे ।
नेउनि दे परि श्रावण ह्मणतां त्याहि उगा राहे ॥
वदशिल तरि शापितील तुजला विचार हा पाहें ।
पुढें घडल तें घडो परी ईतुका समय साहें ॥
ज्ञानराज जय ह्मणुनि पावले वैश्यप्राणशांती ॥ भल्या भल्याही ॥४॥

१५२२

''वाहवा थोर तूं भूपाळा.'' या चालीवर.

शिव शिव दोष घोर घडला । ह्मणोनी नृपवर महिं पडला ॥धृ॥
हा हा बाळा ह्मणुनी भाळा पीटित आणी छाती ।
राज्य नको हें पाप करवि जें वित्तिं पडो या माती ॥ शिव० ॥१॥
सोडुनि तुजला एकट बापा मार्गी कैसा लागूं ।
माय पाडसा पुसतां तुज मग काय मुखें सांगू ॥ शिव शिव० ॥२॥
पुत्रहीन मी आधिंच वरि तुज पितृपास हरिले ॥
म्हणे यमा पाठवीं परत या मरण मला पुरलें ॥ शिव शिव० ॥३॥
अलकावतिवल्लभ नावानें उचित करुनि त्याचें ।
वडिलास्तव कावडी घेउनी चालत मनि काचे ॥ शिव शिव० ॥४॥

१५२३

''वीरा भ्रमरा.'' या चालीवर.

चालताहि वाटेनें राजा तनुमनिं अति तापला ।
ह्मणे म्या स्नेह कसा कापला ॥धृ॥
जायें जिकडे भूवरि पडलीं श्रावणमुनि पाउलें । खुणेनें ठिकाण ही पावले ॥
पाहे तंव तेथची आंधळे वृद्ध वडिल फावले । जळाविण वदनहि कोमावले ॥
पाणी देत पाणियावरि जणू अश्रुपूर आपुला ॥ ह्मणे ॥१॥
जळ करिं घेउनि बोलाविति ते 'ये श्रवण पाडसा' ॥
तुझ्याविण कासाविस असु कसा ॥
शिणला ह्मणुनी कां न बोलसी आज सख्या राजसा ।
तुझ्याविण जीव जाहला पिसा ॥
बिंदुमात्र ना घेउ वदनिं जळ प्राण देउं आपुला । म्हणे ॥२॥ (य९उ.३५५)
धीर न धरवे राजा वदला हा मी उभा पातकी । केला म्यां श्रावणघात की ॥
मृगयाव्यसनें माझि सदाची महा पतित जात कीं ।
वधावें उचलुनियां हात की ॥



वचन ऐकतां वृद्धांचा त्या हृदयबंद कापला ॥ ह्मणे ॥३॥
भिरकावुनि करिचें जळ राजा दशरथ वळखुनि असा ।
ह्मणति तूं अदय अह्मांस्तव कसा ॥
अथवा ठाउक मुळीं पासुनी सूर्यवंश हा असा ।
सूर्यसुत यम हरतो जग जसा ॥
'कुमर कुमर करितां मरशिलं तूं' यापरि नृप शापिला ॥ ह्मणे ॥४॥
हा हा श्रावण ह्मणुनी प्राणा वृद्धिं तदा सोडिलें ।
राया शोकें महिं पाडिलें ॥
शिकारिच्या त्या कठिण स्वभावें श्वास तनुंत ओढिले ।
नृपें मग तदुचित ही जोडिलें ॥
ज्ञानराजचरणांबुजावरी भार सर्व सोपला ॥ ह्मणे ॥५॥

१५२४

''बाइल पैशाची पैशाची'' या चालीवर.

शोके रायाला उमजेना । तों पातलि निजसेना ॥ शोके ॥धृ॥
नमुनी सर्वांही अतितुष्टी । बैसविले गजपृष्टीं ॥
करिती नेवुनि घरिं शांती पुष्टी । परि राव अंतरीं कष्टी ॥
करुनी सुविचारा मग अंगें । वसिष्ठ गुरुला सांगे ॥
अलकावतिवल्लभ करुणामूर्ति । द्यावी सन्मय स्फूर्ती ॥१॥

१५२५

'' वाहवा थोर तूं'' या चालीवर.

निगम असें सांगे । पुनिता पाप न बहु अंगे ॥धृ॥
अविचत सज्ञनकरवीं घडती जीवचुकिस्तव खोडी ।
सुकृताभिभवें पाप तयांची हानि करित अति थोडी ॥ निगम ॥१॥
अश्वमेध करिशिल तरि राया पाप जळल हें सारें ।
निरपराधि जन शाप परंतू पडल भोगणें बारे ॥ निगम ॥२॥
मी निजतप आठवूनि सांगतों होइल तुजला कुमर ।
आण यज्ञसाहित्या लवकरि बोलावी भूम्यसुर ॥ निगम ॥३॥
देइल तुजला अलकावतिवल्लभ इच्छिसि जें चित्तीं ।
नाम तयांचें जपुनी मुद्रा गुरुची करिं तनुवित्तीं ॥ निगम ॥४॥

०

*हरिःॐ तत्सत् श्री वाल्मिकीय सारोद्धारे पदरामायणे बालकांडे

अश्वमेधोपक्रमो नाम द्वितीयः सर्गः ॥
(य९उ.३५६)
०००

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ.॥

# योगपर पदे

## १५२६ / हिंदी

लावणीवृत्त. मूळ.- पूर्या. ता.- धुमाळी. गौण.- दत्तात्रय चतुराक्षरी मंत्र.

पीय मिलन मैं जाति अकेली छोर कुजनकुलसंग ।
देखि पियाको उरसुं मिलायके प्रेम उराउंगी रंग ॥धृ॥
निकली जहांसो चली रहासो कर लैं तुलसी माल ।
देख गनेशहि सीस नवायके ऊपर चलि गज चाल ॥
कामक्रोध ये वैरी मारे लेकर करमों ढाल ।
ब्रह्मा, विष्णू, शंकर सबको नायके भइ उपराल ॥
नैनबैनसो लागि प्राणसो चित्तनमो लीया ।
छोर नाद नवमेघनादमों नित श्रवण दीया ॥
रहा पकर तिनकी चलि झटतो दसमद्वार पाया ।
ज्ञानेश्वरप्रभु हात पकर मुझे अंदरमो लीया ॥१॥
आगे अकेली गई बीच तब ज्ञानेश्वर मिले साथ ।
मै ही हरिरुप भई आय ये ब्रह्मनके नित हात ॥
नाश किई सब मनकी चारों बाणिनकी और बात ।
सोहं सोहं मील गया अब लपट गई प्रभु साथ ॥
भरी प्रेमसे छूट गया और बातनका तो हाल ।
लिया हृदयमों ज्ञाननाथ अब भइ व्यापक नेहाल ॥
ज्ञानेश्वरप्रभु शिरके ऊपर धर्‍यो चंद गुनलाल ।





ज्ञानेश्वरकन्या कहि जानो भक्तियोग मितपाल ॥२॥

## १५२७

श्लोक

तो ओढियान ह्मणतो हरि योगिराणा ।
जालंधरा अधतला प्रतिसाह्य जाणा ॥
नाभीस उंच करुनी उदरास आधीं ।
नेवोनि खोल मग ती करणें समाधि ॥१॥
(य९उ.३५७)

## १५२८ / हिंदी

अमृतधारा

सामनुष्टुप. रा.-यमन. ता.-तेताला.

साधुराम पीवो अमृतधारा ॥धृ॥
आदौ क्रिया तालव्य करो । जिव्हाबंधसे न्यारा ॥ साधुराम ॥१॥
तालुस्थानमें जीभ लगाके । शिरबिच प्राण पठारा ॥ साधुराम ॥२॥
नयनभ्रुकुटिमों उलट पठाऊं । सोम भवन निकारा ॥ साधुराम ॥३॥
उस धाराके सुखमें देखा । देहतें आत्मा न्यारा ॥ साधुराम ॥४॥
जहंतक सोम रहे कायामों । तहंलो न कालघेरा ॥ साधुराम ॥५॥
ज्ञानेश्वरप्रभु एक पकरिके । जोग तजूंगी बारा ॥ साधुराम ॥६॥

## १५२९ / हिंदी

मोहनमुद्रा

रंभावृत्त. रा.- जिल्हा. ता.- तेताला

यहि योगिनकी मोहन मुद्रा ॥धृ॥
शंकर इसके कारन धूंडत । भसम लगाय करत बन निद्रा ॥१॥
नाद चिणचिणी प्रथमहि बाजत । सप्तम बाजत बेणु सुभद्रा ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या योगिवोंको । जान जाय मिलि गोकुलचंद्रा ॥३॥

## १५३० / हिंदी

रमावृत्त. रा.- भूप. ता.-तेताला.

धीर धरो मनमों ॥ बाबा ॥धृ॥
प्राणरु चित्त मिलाय धरो झट । जदुपति चरणनमों ॥ बाबा ॥१॥
बेणुनादश्रुति सुनसुन शीघ्रहि । चलो कूंजबनमों ॥ बाबा ॥२॥
रामकृष्ण हरि नाम सुमिरिके । सोहं रंगनमों ॥ बाबा ॥३॥

ज्ञानेश्वरप्रभुकरुणाबलतें । वसिये संतनमों ॥ बाबा ॥४॥

१५३१ / दिंडी

योगाचा अधिकार

जया आंगी वैराग्यपूर्ण झाले । विवेकाने निश्चीत चित्त केलें ।
असो कोणीही उंचनीच जाती । परी योगी अधिकार तया देती ॥१॥

१५३२

मंत्र तंत्र सर्वही हरीनाम । कृष्णपाय तेचि अपवर्ग धाम ॥
डोळियाचें बळ चालवूनि अंगें । निज देही खेळ तूं विश्वसंगे ॥२॥

१५३३

चित्तवृत्ति रोधितां योग होय । चित्त तेव्हां मीळोनि आत्मि जाय ॥
चित्तवृत्तीचा जरी रोध नाहीं । तरी चित्त धावतें बहू ठायी ॥३॥

१५३४ / ओवी

प्रमाण विपर्यय विकल्प निद्रा । स्मृति ऐसी पंचाकारा ॥
जाण गा एक धारा । वृत्तीचिया ॥१॥

१५३५

सामनुष्टुपवृत्त. रा.-यमन. ता.- तेताला.

मनपवनका मिलाफ ॥ करिये ॥धृ॥
काला पीला लाल सफेदा । लेव नीलेकी चाप ॥ करिये ॥१॥
अनाहत बाजा सुनके पकरो । निज मनमों अनुताप ॥ करिये ॥२॥
अपने वृत्तीमांही जानो । तीन लोकका माप ॥ करिये ॥३॥
निजको जडते न्यारी करिकै । वारो त्रिविध ताप ॥ करिये ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभुतातकृपातें । सुख लेवो आपहि आप ॥ करिये ॥५॥

१५३६

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-जोगी. ता.- राजविद्याधर. गौण.- माहीत नाही.

आहां तसे तुम्ही राहा । मौज मग सद्गुरुकृपें पाहा ॥धृ॥
एकचि मोडुनि शून्य देऊनी । करा आठ नऊ दहा ॥ गड्यांनों ॥१॥
हृदयामधील ही पुष्पपाकोळी । सद्गुरुचरणीं वाहा ॥ गड्यांनों ॥२॥
सतरावीच्या अमृतनदीचें । पाणी घेउनी नाहा ॥ गड्यांनों ॥३॥
शिर चरणातें देउनी तेथें । प्राण मन सुखी पहा ॥ गड्यांनों ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभु करुणाघन त्या । शरण जाउनी लाहा ॥ गड्यांनों ॥५॥



१५३७

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- यमन गौ.- गणया गणया गणपती. या चालीवर.

शांतियशोदे जवळि हरी । बसला हृत्पाळण्यावरी ॥धृ॥
दुध सत्रावी वरुनि गळे । अवघे गडी पीति सावळे ॥१॥
सोहं विंझणी ये झोका । नादें मोहित धेनुपिका[1] ॥२॥
भक्ता देवा एक मिळणी । झाली तनुमन ओवाळणी ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु कृपाकरें । केलें ग्रहण शारंगधरें ॥४॥ *(१. गोपिका)*

(य९उ.३५९)

१५३८ / दडंगी लावणी

वऱ्हाडी भाषेतील दडंगी लावणी- ढोलकी वरील. ''दौलतचे चोचले'' या चालीवर.

ऐकारे दादहो सांगतो ।
तुम्हां ठाव नाहीं तुम्हां ठाव नाहीं देव हा समद्यांच्या देहीं ॥धृ॥
नेत्रांच्या वरभागी गुरूले अभिषेक घडवावा ।
ॐकाराच्यापुढें गड्यारे सोहं भिडवावा ।
पाहुनसन्या चालला घेउनी चक्र गड्या साही । देव हा समद्यांच्या ॥१॥
पाचांचा देह गड्या हा द्यावा टाकून ।
कोन्या नांवरूपाचा ठाव द्यावा झोकून ।
जात पात कुळ गोतर समदं द्या वर फेकून ।
अनुहात नादाच्या पुढे चाल वयखून ॥
॥चाल॥सूक्षम सोडावा जी । श्यामवर्ण मोडावा जी । नीलवर्ण जोडावा जी ॥
॥चाल पहिली॥ चालून पुढें जाणे ना मंग ठायींच्या ठायीं ॥
ज्ञानराज भजना वांचूनशनी जुद काम नाहीं जी ॥ ऐकारे०॥२॥

०००

श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ.

# रूपकपर पदे

१५३९

साममाणव. मूळ.- जोगी. ता.- दीपचंदी गौण.-

सद्गुरूपासुनि बाई नवल आयकिलें ॥धृ॥
सत्पुरुषाचें वित्त हिरोनी । वंध्यासुतें नेलें ॥१॥

तीन वर्षाच्या कुमारिकेला । वृद्ध बाळक झालें ॥२॥
आपणची गडे तस्कर होउनि । आपल्या घरिचें धन हारविलें ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुकृपाकटाक्षें । आह्मिंच देखियलें ॥४॥

१५४०

सामनुष्टुप रा.- कालंगडा. ता.- तेताला.

अनाजनें अदमीको खाया ॥धृ॥
मछलीनें बक भक्षण करके । मटियानें कुंमार घडाया ॥१॥
अदमी ऊपर औरत चढके । बिन मुंडीका बाल बनाया ॥२॥
घोडे ऊपर खूटा बांधा । पानी म्यानें अग्नि जलाया ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु तात हमारे । तिन पग इनको अर्थ बुझाया ॥४॥ (य९उ.३६०)

१५४१

सामनुष्टुप. रा.- जोगी. ता.-तेताला

बाई म्यां नवल देखिलें काल ॥धृ॥
हिरवी हळदी डोळा पाहिली । चंदनपूर्ण गुलाल ॥ बाई म्यां ॥१॥
हिरवे पिवळे मिळुनी पडले । सुख सागरिचें लाल ॥ बाई म्यां ॥२॥
जनन तेंचि मरण जाहलें की । मरणीं हि जनन काळ ॥ बाई म्यां ॥३॥
आंबे उपडुनि दूर टाकिले । अंगणि लावुनि वाल ॥ बाई म्यां ॥४॥
वेश्या मेली लज्जा धरूनी । धडंग सतिची चाल ॥ बाई म्यां ॥५॥
गरीब ज्ञानेश्वर तत्कन्या । मी झाली बहु नाल ॥ बाई म्यां ॥६।

१५४२

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- भूप. ता.- तेताला॰ गौण- पहा पहा.

कोणी टाळ्या बोंबा ठोका कानीं ॥धृ॥
कान डोळा नाके जिभे एकरसू । ठाउवें आला अत्यंत सुरसू ।
झाला एकीनाठा दारूकसू । बिनाडोळ्याचा देखिला सौरसूरे ॥१॥
एकबाईल जबरदस्त आली । ती मनुष्याच्या छातींत बैसली ।
जगा अवघीच थू थू झाली । पुढें तेची त्याची माय केली ॥२॥
कानातूनी निघते दूध । थानातूनी वाहे रक्त शुद्ध ।
किती मान तिची बळ बद्ध । आंगावरी नाहीं मांसमेद ॥३॥
ज्ञानेश्वरकृपा भलीभली । बाइल होती जिती तेच मेली ।
मायपणें उदयासी आली । आतां जगभर सद्गुरू माऊली ॥४॥

१५४३

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-यमन. ता.- तेताला. गौण.- वाऱ्यानें दुनिया गेली



साठीचा सौदा घ्याना बापनो । साठ पायऱ्या चढुनी याना ॥धृ॥
बिना मोलाचा बाजार केला । आवडेल ते ते न्याना ॥ साठीचा सौदा ॥१॥
टाकत टाकत पाउल आमुच्या । शब्दा मागें याना ॥ साठीचा सौदा ॥२॥
अखंड साठा वरते जाउनि । साठ साठ मोडाना ॥ साठीचा सौदा ॥३॥
साठचि ह्मणुनी साठचि ध्याता । साठचि होउनि रहाना ॥ साठीचा ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभु करुणायोगें । साठचि दृष्टिं पहाना ॥ साठीचा॥५॥(य९उ.३६१)

१५४४

सामनुष्टुपवृत्त. गौण.- ठगडी बायको आली, या चालीवर.

चला बापनो चला । वरते हात घालुनी खुला ।
ध्या ध्या पाउठे ह्मणा । टाका गादीवरच्या फुला ॥धृ॥
आला चोर ब्रह्मांडाचा करोनिया चौघडीरे ।
सुपा एवढें कान त्याचे कुशा एवढी दाढीरे ॥
बळी निर्बळी दोन्हीं धरुनी तोंडांत रगडीरें ।
हरि नामाविण हरि नामाविण जाऊं न द्या सुनि घडीरे ॥ चला ॥१॥
टाळ्या पिटुनी चार चार नामस्मरणीं जडारे ।
ठाऊं एक्या ठाई जावोनिया आडवे पडारे ॥ चला ॥२॥
ज्ञानेश्वरकरुणार्णवस्मरणें आहा तैसे घडारे ।
अनाहातनादाचा झननन वाजवा चौघडारे ॥ चला ॥३॥

१५४५

सामनुष्टुपवृत्त. गौण.- वाऱ्यानं दुनया गेली. या चालीवर.

घाला घाला झाडाला पाणी । माय लेका भेटि शिराणी ।
माशां ताटावरि राखी पाणी । आनंदानें छिनाल पीतसे पाणी ॥
घाला घाला ॥धृ॥
द्वारीं उभा तुंबडीवाला । याला धान्य कांहीं घाला ।
करा बायकोसी अबोला । धावुन धावुन इचकट बोला ॥ घाला ॥१॥
डेंगणें हातीं धरुनी फिरा । गांवभर चोरांच्या गांडा मारा ।
ज्ञानेश्वर स्मरणाचा थारा । तुह्मि तरुन लोकांला तारा ॥ घाला ॥२॥

१५४६

सामनुष्टुपवृत्त. गौण.- डोई फोड्याच्या चालीवर.

डोई फोड्या पुढें ये पुढे । तुझ्या बायलीचे जाउंदे मढे ।
तुझ्या बापाला काळिमा पुढे । तुझ्या मायच्या कंठीं पडेरे ॥धृ॥
तुह्या घरां मागें एक आहे गली । म्या तुही बहिण तेथ पाहिली ।
तिची गांड दुसऱ्यान मारली । तुही काह्यची कुलूप किल्लीरे ॥ डोई० ॥१॥
तुह्या घरचा कुत्रा भला । त्यानं तुह्या मायला भोग दिला ।
त्याच्या पासुन तूच झाला । आतां काय दाखविसी आह्माला ॥ डोई०॥२॥
काळ्या तोंडाची कसनी भली । तोबरी मिरच्याची दिली ।
ज्ञानेश्वरकृपा साउली । तुझी माझी एक माउली ॥ डोई ॥३॥ (य९उ.३६२)

१५४७ / आर्या

हसले आणि उमसलें द्विजवर तुज सोडती न हे नवल ।
कंठिं मिठी दृढ देउनि मंचक मणि कासया चवल ? ॥१॥

१५४८

अयि वीणा वाजवुनी कधिं विधि नंदिनि न नाट्य तव दावी ॥
अविवश मधुकर महिमे त्वां बंधन करुनि आणिला गांवीं ॥२॥

१५४९

तव रशनानुकूल तनु शीतप्रिय तप्त जीवना मानी ॥
निज हृदय मांस हिंसन मीमांसा घालि जीव नामानी ॥३॥

१५५०

कन्या नसोनि कान्ता कान्ता संगें अखंड एकान्ती ।
कांतीं मेळवुनीया खेळवितां शांतिमंत लोकां ती ॥४॥

१५५१

सोवळि सवती साठीं तुज साठीं सर्वदा प्रिया गणिका ।
नियम कपाटे रिपुनां येर विमुक्तां समस्तहि जवनिका ॥५॥

१५५२

गोड विषाला त्यजुनी कडवट पीयूष नित्य सेवावें ।
एकपदरि दोरीनें तदनंतरि पक्षिपाय गोवावें ॥६॥

१५५३ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. रा.- भैरवी. ता.- तेताला.



नवल देखी कुंठित मति मारी ॥धृ॥
पांचालीनें त्यज पतिपंचक । कांत कीनो पूतनारी ॥१॥
रावणनें तो अजुध्या लीनी । रामनें बिभिखन नगरी तोरी ॥२॥
धर्म व्हयगया जारिणिके बस । पतिव्रता स्त्री मारी ॥३॥
ज्ञानेश्वर करुणाकरि कोई । उलट अर्थको बिचारी ॥४॥

॥ रूपकपर पदे समाप्त ॥

०००

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# ॥ पदात्मक आख्याने ॥

आख्यान १ ले

## जंबूफल कथा

जंबूफल-आख्यानस्य पूर्वरंगः

१५५४

श्रीमान् ज्ञानेश्वराचार्य उमा माता शिवः पिता ।
पतिः कृष्णो राधिकाद्या भगिन्यो गोपिका मम ॥१॥

१५५५

पंचायतनमित्येतत् हृद्यास्थाप्य प्रपूज्य च ।
प्रणम्य कीर्तयाम्यत्र जम्बूफलकथां शुभाम् ॥२॥

अभंग

आळंदी वल्लभे येइ वो जननी । माझे बाळ कोठें ऐसें ह्मणत आननी ॥१॥

अथवा पद

येइ रमारंगे, माउली, येइ रमारंगे ॥धृ.॥

०००

॥ संस्कृत ॥

''सत्यं वद'' - इति श्रुतिः ।

''सत्यमेव जयते नानृतं, सत्यं पंथा विद्यते देवयानः'' - मुण्डकश्रुतिः।
''नास्ति विद्यासमं चक्षुर्नास्ति सत्यसमं तपः'' - इति भारते ।
''प्राणानपि परित्यज्य सत्यमेव पालयेत्'' - इत्याह कश्चित्कविः।
''जी गया तो जाने दे पर बानीकी पत राख''

संस्कृत-गद्य

एवं सत्येन अनायासेन आर्जवं भवत्येव ।
शत्रोरपि सत्यवचने एव विश्वासः ।
तस्य आप्तत्वात् ।
''आप्तस्तु यथार्थवक्ता'' इति नैयायिका जगुः।
अत्र दुर्योधनेन युधिष्ठिरं प्रति वज्रकायकरणोपायप्रश्नगाथैव उदाहरणीया।
अथ किं नाम सत्यं?
हिंसाकरं चेत् सत्यादपि पातयतीति श्रुतिराह ।
तत्रोच्यते ''सत्यं भूतहितं प्रोक्तमिति'' ।
भगवति चित्तार्पणं वा सत्यलक्षणं ।
तस्यापि स्वदोषनिराकरणेन सारल्यात् अनार्जवं परिहरति ।

१५५६ / मालिनी

श्रवण करि मना तूं शास्त्र वा वेद वाची ।
कपटपटु न पावे पाउलें माधवाची ।
सरल सुजन दासा साह्य मी देव देतो ।
पुरवुनि निखिलाशा शेवटीं दास्य देतो ॥१॥

संस्कृत गद्य -

असरलस्य आवश्यम् आहंकारिकम् अभ्युपेयत इत्यत आहुः हृदयाचार्यपादाः॥
ओवी - एरव्ही थोरपण परा सांडिजे । आघवी व्युत्पत्ति विसरिजे ।
जगा धाकुटे होइजे । तैं जवळीक माझी ॥१॥
कां रूपवयसा माजा । आथिलेपणे गाजा ।
एक भाव नाहीं माझा । तरी पाल्हाळ ते ॥२॥ (य९उ.३६४)

संस्कृत - उपकथा

कस्मिंश्चित् यज्ञे द्रव्यग्राहकं ब्राह्मणं दृष्ट्वा मदीयमिदमिति शिवेनोक्तम्।
पितरं पृच्छेति, तदा तेन तथैव कृत्वा यथा पित्रोक्तं तथा निगदितम् ।
तेन सत्येन संतुष्टः पुरहरः ।
तदानींतनतः सर्वं यज्ञीयशेषवित्तं विप्रेभ्यो दत्तवान्



इति महाभारतीयं आख्यानम् उदाहर्तव्यम् ।
चित्तार्पणे न तिष्ठत्येव असारल्यमप्याह । -

१५५७ / वसंततिलका

देवा समर्पण जरी अवघे करावे । सांगा तिथें मग कसें कपटें करावें ।
नामीं नसे भय उगी मग चित्तचोरी । कां ठेविजे विसरुनी हृदयस्थ थोरी ॥१॥

॥ भजन ॥

गोपीवल्लभ गोकुललाल । देवकिनंदन दीन दयाल ॥

॥ इति पूर्वरंगः ॥

अत्रोपाख्यानमाह -

१५५८ / मंगलाचरण

जय जय जय दयासिंधु जय जय जय दीनबंधू ।
जय जय सच्चिदानंदु जय जय जय सद्गुरो ।
वंदितो भवत्पदास, चिंतिति सुरसुमुनि ज्यास ।
मम निवटुनि हृदय आस, भव विलास हा हरो ॥
मनसि हांव घालि धाव परि तुमचें जपत नांव ।
यास्तव घ्या त्वरित धांव, हरा लाव पावना ।
हे समर्थ हे समर्थ, गर्व वारुनी अनर्थ,
वदवा मुखिं परम अर्थ, अलकावति जीवना ॥१॥

१५५९ / दोहा

कमलनयन कमलापती कमलवदन सुखधाम ।
सुविमल यश मुरहर हरि हरत निजजनकुकाम ॥२॥

१५६० / अभंग

जैशी ज्याची श्रद्धा तया तैसा हरी । आहे सर्वापरी अनुमंता ॥१॥
तथापी उपेक्षा न करी दासाची । कुकल्पना साची निवारीतू ॥२॥
आपुले जे दोष सांगती गोविंदा । झांकुनी प्रमादा वारी त्यांच्या ॥३॥
भक्त परी दोष झांकिती प्रमादें । उघडे मुकुंदे कीजे त्यांचे ॥४॥
आळंदीवल्लभ दासांचे कल्याण । करी मोठे सान वा करोनी ॥५॥

१५६१ / दिंडी

नित्य ऐके जो कथा सज्जनांची । त्या न चिंता संसारमज्जनाची ॥
हातिं हाता देऊनि दयासिंधू । पार नेतो उतरूनि आर्तबंधू ॥१॥(य९उ.३६५)

१५६२ / गीति

प्रभु भक्तिस वश केवळ आणिक गुण मान सर्वथा न रुचे ।
खाय कण्या विदुराच्या टाकुनि मोदक अपूप कुरुघरचे ॥१॥

१५६३

कपटें कामें प्रेमें आनंदें आळसें कसे ही हो ।
घेता नाम प्रभु दे निज सुख जरि सूज्ञ तो नसे ही हो ॥२॥

१५६४

राम कृष्ण हरि वदनीं षडक्षरी साजरा उघड मनु गा ।
तनु मन विसरुनि नाचा व्रजपतिच्या होउनी सुघड अनुगा ॥३॥

१५६५

यदपि प्रमाद घडती तूं ठेवी चोरुनी न तदपि मनीं ।
अवलोकी मग यम कां उगे निवेदिसि न दास विषशमनी ॥४॥

१५६६ / स्वागता

चित्त जैं परिचयेचि उदास । काम चोरिति तदा हरिदास ।
देव ते सकल जाणुनि आधीं । आधि वारुनि करी सुसमाधि ॥१॥

१५६७

याज्ञसेनि परम प्रिय देवा । पात्र काढुनि करी हरिसेवा ।
चूकता परिचये प्रभुपाया । कामविद्ध रविजास्तव काया ॥२॥

१५६८

भारतीं जरि कथा न दिसे ती । अन्यथा मुनि तथापि न घेती ।
संतकाम दिसता न गणावा । तत्कथा भवजळीं नव नावा ॥३॥

१५६९

चार वेद जगतीवरि आजी । गुप्त वेद असती कितिका जी ।
ही कथाहि वदली श्रुतिमाजी । भारतादि न कसे बहु मा[१] जी ॥४॥ (१.मग)

१५७० / शिखरिणी

यदा वृत्ती तीव्रा यदुपति पदाब्जीं विनटती ।
तदा गोविंदाचे नवनव चरित्रें प्रकटती ॥
स्वनेत्रीं पाहोनि सुजन जन कार्यार्थ जपती ।
मना ते गा ऐकें तुज मिळल येथें[२] व्रजपति ॥ (२.बसल्या ठिकाणी)

१५७१ / गीति

दानशूर रविनंदन परि कुरुऋण वारणास कुसमाजीं ।
द्रौपदीस दुर्वाणी वदला ती रुपत काळजामाजीं ॥ (य९उ.३६६)



१५७२

यास्तव जणु एकान्ती नमुनि तिला मागुनी क्षमा करणी ।
मानसकपट निवारी पापनदीवरि वडील वर तरणी ॥

१५७३ / स्वागता

मानसीं पुढति चिंतुनि ऐसें । दुर्जना कळवितां सुख कैसें ॥
एकला ह्मणवुनीच निघाला । याज्ञसेनिसदनांगणिं आला ॥

१५७४

पाहतां रविसुता मखबाळा । अंतरीं उठत कामउबाळा ।
पूजि त्या पति घरीं नसतांही । श्रीचिते ह्मणुनि दोष न कांहीं ॥

१५७५ / गीति

दानशूर निज मानसिं मौनें मागे जणू क्षमा कर्ण ।
ठाउक यास्तव वधुचे नाशभयें उघड वंदिना चरण ॥

१५७६ / दिंडी

आसनादी सत्कार तिचा भावें । घेउनिया मानसीं ह्मणे देवें ।
इचें कीजे कल्याण सर्वकाळ । स्मरुनि गेला स्वगृहीं सूर्यबाळ ॥

१५७७ / स्वागता

भीमकी प्रथमची शिशुपाळा । दीधली परि हिने व्रजपाळा ।
आवडी करुनि घातलि माळा । जाणते सकळ हे मख-बाळा ॥

१५७८

केधवां जरि वदेल विनोदें । मौन माय तर्हिं हो न[१] विमोदे ।
पाहणें उचित हें न कुमारा । सूचली कुमति यास्तव मारा ॥

(१. न = आनंद असलेली अशी)

१५७९

अंग चोरुनि उभा शरधारी । याज्ञसेनि हृदयास विदारी ।
ती न चिंतित तदा भवहारी । तोहि यास्तव सुता न निवारी ॥

१५८० / गीति

सुटलें हरिपद चिंतन कर्णरूप लागला महाशर हो ।
विरह विकळ मख-तनया चंद्रकिरण भासताति रविकर हो ॥

१५८१

दोष नाहिं संकल्पीं परि अध्यवसाय[२] बोलिली नसता ।
हा[३] जरि असता पांडव प्रेमें मी भोगिला स्वयें असता ॥ (य९उ.३६७)

(२.निश्चय,३.पंडूस कुंतीच्या विवाहानंतर झाला नाहीं ह्मणून पंडूचा ह्मणवत नाहीं,असाश्लेष)

१५८२ / स्वागता

मातृसाम्य ह्मणुनी तरि कांहीं । दोष चिंतनिं असेल कि नाही ।
आणुनी मनिं अशा सुविचारा । काम सांडि मग पांडवदारा ॥

१५८३

भूलली परि न बोललि कांहीं । लाजली निजमनीं हरिलाही ।
साक्षि जो सकल वृत्तिस पाही । चिंतनें स्वजनदुष्कृत वाही ॥

१५८४ / गीति

निर्विकार परमात्मा जगज्जननलय समस्त जो करितो ।
असुरहरण त्यास किती परि दासास्तव अखंड अवतरतो ॥

१५८५ / मालिनी

बहुत दिवस झाले पाहिली वाट फार । किमपि न मखबाळा बोलिली दुर्विचार ॥
जडितहृदयदोषू आवळी सर्व काया । निजभगिनिकलंकू साहिना देवराया ॥

१५८६ / स्वागता

मानसीं हरि ह्मणे सुविचारें । बोल देतिल मला मुनि सारे ।
बायको त्यजिली शाब्दिकदोषीं । साच पैं भगिनिसाठिं न[१] रोषी ॥

(१. रागावत नाही)

१५८७ / गीति

मी साक्षी हृदयाचा परि मजसीं चोरिलें हिनें सकळ ।
समजुनि भाऊ भुलली देहबुद्धिविवशहोउनी निखळ ॥

१५८८

मज हृदयस्था चोरी काय हिची ओळखेल नर[२] काया ।
शिवशिव वधुपाटव हें दुर्घट घटवी अखंड मम माया ॥ (२.मनुष्य)

१५८९ / ओवी

परंतु जे कां मज्जन । तया भवीं न निमज्जन ।
या लागीं असतां पांडव सज्जन । हिचें उघड मन करावें ॥

१५९० / मालिनी

मग मुरहर सांगें आवडीं पांडवासीं । वन यजन करूनी तोषवा तांडवासी ।
जरि हर करुणाब्धी पाहिना प्रेमदृष्टिं । तरि मम पदसेवा श्रेष्ठ वाटे न सृष्टीं ॥
(य९उ.३६८)

१५९१ / द्रुतविलंबित



त्वरित यास्तव चला वनभोजना । सकळ घ्या कि उणे न गमो जना ॥
ह्मणति पार्थ करी तव मानसी । अखिल तूं आमुचें हित जाणसी ॥

१५९२ / वसंततिलका

सातू सिता घृत गुळ क्षिर तेलमीठ । दाळी दही कणिक तांदुळ चून पीठ ।
शाका जिरे तिळ धणें निशि[३]निंबु आलें । इत्यादि घेउनि समस्त वना निघाले ॥

(३.हळद)

१५९३ / कामदा

पांच पांडव द्रौपदी सति । चालिला सखा कृष्ण संगती ।
पावले वनीं जान्हवीतटीं । चिंतनें जिच्या वासने तुटी ॥

१५९४ / अभंग

पाहुनियां तेथें मुनीचा आश्रम । निवारीले श्रम सर्व त्यांचे ॥१॥
विष्णुपादोदक संतांची संगती । यावीण सद्गति दानी नाहीं ॥२॥
नारायण ह्मणे हें स्थान उत्तम । सारावा नियम येथे सारा ॥३॥
बुद्धिप्रवर्तक गोपाळ बोलता । मानवले चित्ता सकळांच्या ॥४॥
आळंदीवल्लभें मांडिले विंदान । दासानुसंधान शुद्ध व्हाया ॥५॥

ज्ञानेश्वरी - अध्या.६, ओव्या १६४ ते १७४ पर्यंत -

जेथ आराणुकेचेनि कोडें । बैसलिया उठों नावडे ।
वैराग्यासी दुणीव चढे । देखिलिया जें ॥१६४॥
जो संतीं वसविला ठावो । संतोषासी सावावो ।
मना होय उत्सावो । धैर्याचा ॥१६५॥
अभ्यासचि आपण यातें करी । हृदयातें अनुभव वरी ।
ऐसी रम्यपणाची थोरी । अखंड जेथ ॥१६६॥
जया आड जातां पार्था । तपश्चर्या मनोरथा ।
पाखांडियाही आस्था । समूळ होय ॥१६७॥
स्वभावें वाटे येतां । जरि वरपडा जाहाला अवचिता ।
तरि सकामही परि माघौता । निघों विसरे ॥१६८॥
ऐसेनि न राहतयातें राहावी । भ्रमतयातें बैसवी ।
थापटूनि चेववी । विरक्तीतें ॥१६९॥
हें राज्य वर सांडिजे । मग निवांता एथेंचि असिजे ।
ऐसें शृंगारियांहि उपजे । देखतखेवो ॥१७०॥ (य९उ.३६९)
जें येणें मानें बरवंट । आणि तैसेचि अति चोखट ।

जेथ अधिष्ठान प्रगट । डोळां दिसे ॥१७१॥
आणिकही एक पहावें । जें साधकी वसतें होआवें ।
आणि जनाचेनि पायरवें । रूळेचिना ॥१७२॥
जेथ अमृताचेनि पाडें । मुळाहीसकट गोडें ।
जोडती दाटें झाडें । सदा फळतीं ॥१७३॥
पाउला पाउला उदकें । वर्षाकाळावीण अतिचोखें ।
निर्झरें कां विशेषें । सुलभें जेथें ॥१७४॥ ज्ञाने.

१५९५ / ओवी

एवं हृदयाचार्यवचन । तैसेंचि पाहोनि ठिकाण ।
बैसोनियां अवघे जण । कार्यसाधन चिंतिती ॥

१५९६ / पृथ्वी

असो मुनिमठस्थलीं दुकुलमंडप स्थापिला ।
तदा यदुवरें मनें पवनपुत्र उत्थापिला ॥
उठूनि तरुच्या तळीं भ्रमत कार्यही सोडुनी ।
सुपक्व फल जांभुळा निरखितांचि घे तोडुनी ॥

१५९७ / गीति

मधुरगंध ओळखुनि आणोनी अर्पि आदरें कृष्णा ।
हरिवांचुनि हरिदासा अल्पफळाची कदा नसे तृष्णा ॥

१५९८ / दोहा

पवनपुत्रहृत पाहुनी फळ तें गोकुळपाळ ।
हा भयउदय वदोनि असें पीटित करें कपाळ ॥

१५९९ / ओवी

श्रीहरी ह्मणे धर्मास । मुनि शापील आह्मांस ।
नेणोनि विप्रविक्रमास । हें भीमास काय सुचलें ॥

१६०० / द्रुतविलंबित

सकलसंग परित्यजिला जिहीं । निखिल लोक तदा जितिला तिहीं ॥
किमपि याचन ना कवणा जया । फळ मुळीं मिच पाळितसे तया ॥

१६०१ / दिंडी

सोडुनीयां पूसणें साधुलागीं । कां कुकार्या केलेस सुप्रसंगी ।
क्षमा मागूं तो मुनी समाधिस्थ । मति भीमा माझीहि समाधिस्थ ॥
(य९उ.३७०)

(भागवत )- नाहं विशंके सुरराजवज्रात् न त्र्यक्षशूलान्न यमस्य दंडात् ।



नाग्न्यर्कसोमानिलवित्तपास्त्राच्छंके भृषं ब्रह्मकुलावमानात् ॥
(भाग.स्कंध-५.अ-११.श्लो-१८)

१६०२ / पद

मज ना कवणाचे भय कांहीं । रचि शतमखादिकांही ॥धृ॥
ब्रह्मा मम नाभीकमळीं झाला । तो निर्मितो प्रजाला ॥१॥
शिव शिरिं धरितो मत्पदसलिलाला । मी भिये न तच्छूलाला ॥२॥
यमाचा दंड बळें तोडुनि म्यां कीं । किति नेले निज नाकीं ॥३॥
एकचि मज परि अतितर दर वाटे । जाणे द्विजवरवाटें ॥४॥
महिसुर चरणचि म्यां दिधला हृदया । मम संतास्तवचि दया ॥५॥
अलंदिपतिचित्तीं करुणा ही । न भजुनि पण वश नाही ॥६॥

१६०३ / दिंडी

द्विजान्याया पाहोनि भूपपक्षी[1] । भक्तिसाठी होवोनि त्यास रक्षी ।
परी येथें अन्याय तुह्मी केला । मुनी शापिल तरि ऊठता भूकेला ॥
(१. अंबरीष कथा उद्धरण)

१६०४ / अभंग

ऐकिलें सकळ बोलिला मुरारी । घाली[2] पायावरी दंडवत ॥१॥
पांडव साष्टांग घालिती सर्वथा । अभिमान वृथा निवारोनी ॥२॥
याज्ञसेनी घाली प्रेमें लोटांगण । बोलती जोडुन कर सारे ॥३॥
ह्मणती आमुचा तूं एक कैवारी । तुजवीण हरी आन नेणें ॥४॥
आळंदीवल्लभा दिसेल उचित । करा तनु चित्त वाहूं पायीं ॥५॥
(२. येथें भीम हा कर्ता आहे.)

१६०५ / धनाक्षरी.

धर्म भीम धुनर्धार । आणि माद्रीचे कुमार ।
द्रौपदीसहित फार । नमस्कारिती फुडें ॥१॥
भीम ह्मणे माय बाप । मदें म्यांचि केले पाप ।
ऋषि सुखें देवो शाप । अनुताप तैं घडे ॥२॥
थोर होउनियां पुंड । उगे चाळविती तुंड ।
संती करावाचि दंड । भंड बंड तैं उडे ॥३॥
याज्ञसेनि ह्मणे त्राहि । कृपादृष्टि पाहि पाहि ।
आळंदीश गुरू आई । नाहि ना ह्मणे पुढें ॥४॥ (य९उ.३७१)

१६०६ / लावणीचे चालीवर

करुणाघन नवनीरद तनु हा हरि मायालाघवी ।
स्वदासा समयी समयी जागवी ।।धृ।।
ऐकुनि पांडववचन ह्मणे हरि उपाय मज सूचला ।
त्वरित तुह्मि तरुतळिं सारे चला ।।
साच वदा मानसीं असें तें देंउनियां भाखिला ।
जडल फळ जाउनि तरुशाखिला ।।
।।चाल।। चुकल्याची चिंता आपण ईश्वर करी ।
मोकळे तयाला शरण रिघावें तरी ।
तिळ खाकसभरही गर्व नसो अंतरी ।
।। चाल पहिली ।। शपथ वाहतां चित्त असों द्या जानकिवर राघवी ।।१।।
स्वदासा समयी समयी जागवी ।।धृ।।

१६०७ / गीती.

ऐकुनि यदुपतिवचना तरुतळिं जावोनि वाहती शपथा ।।
दीनदयाळा ह्मणती तूंचि साक्षि जाणती श्रुतीसुपथा ।।

१६०८ / संस्कृत

युधिष्ठिर उवाच -
धर्मः सत्यं दया ज्ञानं क्षमाशांतिस्तवार्चनम् ।
इत्यैतन्मे प्रियं नाथ निखिलं विदितं तव ।।

(पूर्वीचें पद पुढें चालू )

धर्म ह्मणे मज धर्म आवडे सदा बोलणें खरें । ज्ञान हें जगताकारण खरें ।।
दया क्षमा शांति या वराव्या अखंड मम अंतरे । पूजितां तुज भवदवकव तरे ।।
।।चाल।। निज धर्माविण तव भक्ति न ह्रदया वरी ।
तव भक्तिविण धर्मास न शोभा पुरी ।
होतें ते कथिलें साच विभो मम हरी ।।
।।चाल पहिली।। मम बाप तुज ठाउक माझी स्वामी मति आघवी ।।
स्वदासा समयी समयी जागवी ।। करुणाघन नवनीरद ० ।।२।।

१६०९ / गीति

शपथ युधिष्ठिर वदतां फळ या परि एक हात तहिं उचले ।।
अधर बघुनि गगनी मग नवल ह्मणती येथ अन्यथा न चले ।।

१६१० / भीम उवाच

मातृवत् परदारेषु परद्रव्येषु लोष्ठवत् ।



आत्मवत् सर्व भूतेषु पश्यंस्त्वद्भक्त उत्तमः ।। (य९उ.३७२)

(पद चालू)

भीम ह्मणे परदारा पाहुनि नमि मानुनि माउली ।
दगड सम देखे परमावली[१] ।।
सर्वभूति मी ब्रह्म अशी ज्या सुखसमता पावली ।
परि प्रीती अति तव पाउली ।।
।।चाल।। तव चरण चिंतिता षडरि काय बापुडे ।
ज्ञानही तुझ्या करुणेंचि सहज सांपडे ।।
यास्तवचि तुला जो धरितो ह्रदया पुढे ।।
।।चाल पहिली।। तो आवडतो व्रजवर मजला तूंहि तसें वागवी ।।
स्वदासा समयी समयीं जागवी ।। करुणाघन ।।३।। (१.लक्ष्मीच्या पंक्ती)

१६११ / ओवी.

ऐसी भीमाची ऐकोनी शपथ । फळें लाहोनि आकाशपथ ।
भूमीपासोनी दोन हात । स्थीर जाहलें जाउनी ।।

१६१२ / संस्कृत

अर्जुन उवाच.
स्वभावविहितें धर्मे गदिते भवता श्रुतौ ।
सुखदुःखे समे कृत्वा तत्र त्वयि च मे रतिः ।।

(पद चालू)

पार्थ ह्मणे देवा त्वां धर्मी मानश्रुति बोलिली । आजवरि परंपरा चालिली ।।
पूर्वदैवयोगें मज सहजे क्षत्रियतनु लाभली । म्हणुनि त्या धर्मी आवडी भली ।।
।।चाल।।
हे वेद शास्त्र तव आज्ञा लवलाहिना । मोडिता तिला तनु वैष्णवपण लाहिना।।
हा द्रोह तुह्माला यदुवरजी साहिना ।।
।।चाल पहिली।। तुझ्या चरणिं यामुळें अधिक रति आन न मन रागवी [२]।।
स्वदासा समयीं समयीं जागवी ।। करुणाघन०।।४।।

(२. प्रीति उत्पन्न करीत नाही.)

श्रुतिस्मृति ममैवाज्ञा यस्तामुल्लंघ्य वर्तते ।
आज्ञाच्छेदी मम द्रोही मद्भक्तोऽपि न वैष्णवः ।।

१६१३ / स्वागता

तीन हात फळ तैं उचलीले । दाखवी सकळ माधव लीले ।।

भक्त दासपण लाविती अंगीं । देवदास्य करि त्या प्रियसंगीं ॥

१६१४ / नकुल उवाच

प्राणानपि परित्यज्य धेनुब्राह्मणरक्षणम् ।
कर्तव्यमिति मे भाति भगवद्भक्तिसिद्धये ॥ (य९उ.३७३)

१६१५ / घनाक्षरी.

पाणि जोडोनिया धीर । नकुल तैं महावीर ।
ह्मणे कांहि नव्हे स्थीर । सर्व जाइल क्षणें ॥
धर्ममहाराज दंड । अंति मारितो उदंड ।
तरि पाळावया पिंड । कुडे गोड भक्षणें ॥
मज गमे रमाधाम । हारपूनि कोप काम ।
हृदयांत तुझें नाम । वसो प्रेमलक्षणें ॥
सांडुनियां वित्त मान । अर्पुनियांहि स्वप्राण ।
साधु-धेनु-विप्रमान । सर्वकाळ रक्षणें ॥

१६१६ / गीति

ऐकुनि नकुलशपथ फळ चार हात जाउनी वसे गगनी ।
बोलत तहिं सहदेवहि जो हरिविण थोर आणिका न गणी ॥

१६१७ / सहदेव उवाच -

अनित्यानि शरीराणि वैभवं नैव शाश्वतम् ।
सर्वान्कामान्परित्यज्य सदैकान्ते हरिं भजेत् ॥

(ज्ञानेश्वरी अध्या ९.श्लोक ३३.ओव्या ५०२ ते ५०६)

जिये लोकींचा चंद्र क्षयरोगी । जेथ उदय होय अस्तालागी ।
दुःख लेऊनि सुखाची आंगीं । सळित जगातें ॥५०२॥
जेथ मंगळाचिया अंकुरी । सवेचि अमंगळाची पडे पारी ।
मृत्यु उदराचिया परिवरीं । गर्भ गिंवसी ॥५०३॥
जें नाही तयातें चिंतवी । तंव तेंचि नेइजे गंधर्वी ।
गेलियाची कवणें गांवी । शुद्धी न लगे ॥५०४॥
अगा गिंवसिता आघवियां वाटी । परतलें पाउलचि नाहीं किरीटी ।
सैंघ निमालियांचिया गोष्टी । तियें पुराणें जेथिंचीं ॥५०५॥
जेथींचिये अनित्यतेचि थोरी । करि तया ब्रह्मयाचें आयुष्यवेरी ।
कैसें नाहीं होणें अवधारी । निपटुनियां ॥५०६॥''

१६१८ / भुजंगप्रयात.



शरीरे क्षणें नासती हे दयाळा । बहू वैभवें वाढवीती भयाला ॥
त्यजोनि त्वरें काम या साठिं सारे । तुझ्या चिंतनी योग्य होणें पिसा रे ॥
(य९उ.३७४)

१६१९ / गीति

सहदेव शपथ ऐसी वदता तैं पांच हात फळ चढले ॥
कृष्ण ह्मणे द्रौपदिला पाहे आश्चर्य हें कसे घडलें ॥

१६२० / गीति.

याज्ञसेनी उवाच -

याज्ञसेनि वदली मग हरि तुजला साक्ष ठेवुनी ह्मणतें ।
पांडव पांच विवर्जुनि तुज सम जन सर्व मी सदा गणितें ॥

१६२१ / द्रुतविलंबित.

ऐकुनी क्रतुसुता वचनें अशी । कोपसा गंवसला वसुधा वशी ॥
भूवरी उतरलें फळ पाहती । मानसी चकित पांडव राहती ॥

१६२२ / ओवी.

द्रौपदी अधोवदनें लज्जित । श्रीहरी माया ओळखली समस्त ।
मनीं ह्मणे म्यां चोरिलें व्यर्थ । रमानाथ क्षोभविला ॥

१६२३ / अभंग.

धर्म ह्मणे काय केलें याज्ञसेनी । बोलिलीस वाणी मिथ्या कैसी ॥१॥
सर्व जाणे आधींच हा नारायण । उपकार येणें केले फार ॥२॥
चतुर्भुज केलें पुरविलें वस्त्र । त्यासीं अपवित्र बोललीस ॥३॥
आळंदीवल्लभ नव्हे कोणाचाही । सरलाचे ठायीं चित्त त्याचें ॥४॥

१६२४ / गीति.

आहे मन ह्मणवुनियां असती सर्वत्र सर्व अपराधी ।
सांगुनि सुजना यास्तव गावा माधव धुवोनि अपराधी ॥
(पद चालू)

देव वदे सापत्न बंधु मी यास्तवही मजसवे ।
दोष सती सांगेना निज नवे ॥
कामिनिमति अति दुस्तरतर तद्गति विधिस न सांगवे ।
ह्मणति हे निगम सुमुनि आघवे ॥
॥चाल॥ विश्वासें एका कांहींतरि बोलती ।
चेटकी कामवश भलत्या पथिं चालती ।

पतिलाहि कधी कधीं हालाहल घालिती ॥ चाल पहिली ॥
शिव शिव शतभवकृततप पलगत युवतिसंग पांगवी ॥ स्वदासा ०॥
(य९उ.३७५)

१६२५ / संस्कृत श्लोक

एक एव प्रणामस्ते सर्वपापहरः स्मृतः ।
ततो मे मानसं पापं रविजे क्षणजं हर ॥
नाहं पतिव्रता नारी कुमारी तव केशव ।
पाहि मां करुणासिंधो बंधो त्वां शरणं गताम् ॥
सकृदेव प्रपन्नाय तवास्मीति च याचते ।
भगवन् सर्वभूतेभ्योऽभयदानं व्रतं तव ॥

१६२६ / चौपाइ

मै नीकी पापिणि गिरिधारी । तुम प्रण शरणागत भयहारी ॥
सन्मुख होत नाहिं तेहिं त्यागा । 'विश्वद्रोहकृतअघ जिन्ह लागा' ॥१॥
*- तुलसीदासीयं उत्तरदलम् ।*

१६२७ / अभंग

एक नमस्कार करीताचि तूतें । पावती मुक्तीतें इच्छेवीण ॥१॥
नव्हे पतिव्रता शुद्ध मी गोपाळा । शरण स्नेहाळा आले तुह्मां ॥२॥
काया वाचा मनें जाहले प्रमाद । ते तुह्मी मुकुंद निवारावे ॥३॥
आतां कृपादृष्टि करूनियां पाहे । आळंदीशा साहें सर्व माझे ॥४॥

<u>तुलसीदासपद</u>

मो सम कौन कुटिल खल कामी ॥धृ॥
तोपें काह छिपे करुणानिधी ॥ सब पट अंतरजामी ॥ मो सम०
(पद चालू)
एकवेळ कर्णे मम सदनीं येउनि मन मोहिले ।
तुज न कळवुनि लाजे साहिलें ॥
चुकले आतां तुझ्या प्रणामें काय सख्या राहिलें ।
बोलतां फळ तरुला पाहिलें ॥
॥ चाल ॥ हरि ह्मणे चोरितां दुरित हृदयीं आवडी ।
उपजवी जयापरि मळमळ कण सावडी ।
द्रौपदी वदे भलि केली तद्वावडी ॥
॥चाल पहिली॥ अळंदिवर वर हा द्या पुढती शठमदन न नागवी ॥



स्वदासा समयी समयी जागवी ॥ करुणाघन ॥५॥

१६२८ / ओवी.

ब्राह्मण घेऊनियां पंगती । पांडव बैसलें कृष्णसंगती । (य९उ.३७६)
पात्रें वाढी द्रौपदी सती । शुद्धचित्तीं पक्वान्नें ॥१॥

१६२९ / गीति

द्रौपदिसह कर जोडुनि ह्मणती कृष्णास आधिं घ्या कवल ।
साहि रसाहीं करिती तृप्तासहि तृप्त भक्तिचें नवल ॥

१६३० / द्रुतविलंबित.

असो जेउनी अंतरी सर्व धाले । द्विजा वंदुनी मंदिरातें निधालें ॥
घरींदारिं दासा हरी साह्यकारी । प्रणामें स्वनामें कुकामाहि तारी ॥

१६३१ / पृथ्वी

नको फुगु उगा गड्या गढुनि मानविद्याधनीं ।
वनीं अवनि वावरे नच मना कदा साधुनी ॥
तुला सदनिं येउनी हृदयिं वंदिल स्वर्धुनी ।
अळंदिपतिपादुका धरिसि जेधवां मूर्धनीं ॥

१६३२ / अभंग

दीनाचा दयाळू मनाचा मवाळू । सदा कनवाळू बाप माझा ॥१॥
उसणें पासणें मनमानें तैसें । बोलिले उल्हासें अर्पू तया ॥२॥
पुरें उणें येथें ज्याचे तोचि जाणें । चित्तीं नारायणें दाविलें जें ॥३॥
ज्ञानराज माझा सोयरा अखंड । भजन उदंड करा सारे ॥४॥

भजन

आळंदिवल्लभ विठ्ठललाल । सद्गुरु ज्ञानसुरेंद्र कृपाल ॥ (य९उ.३७७)

०००

<u>आख्यान २ रे</u>

# चिंधीची कथा

श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ.

१६३३

राग-भूप. ता.- झंपा. पीतकटी छंद

जय जयामलविमलकमलदललोचना जय भवविमोचना भवनहेतू ।

जय जयाकलकलारमण भगिनिप्रिया विहितनिगमक्रिया सुफळसेतू ॥
जय पतिततारणा जय दनुजहारणा जय भयनिवारणा गरुडकेतू ।
जय जयालंदिमंदीरमणिसुंदरा [१]तवचरणिं कंधरा लववि हेतू ॥१॥
*(१.दुसरा पाठ - स्वपदिं मम कंधराश्रयण देतू ॥)*

१६३४ / पद

प्रभुवर भावाचें । भावाचें ॥ नातें अडनांवाचें ॥ प्रभु०॥धृ॥
वडिलकरिं देउनियां । दैवाचे ॥ पालक गोकुळ गांवाचें ॥ प्रभु०॥१॥
यजिती आहुति सोडुनि थोरांची । रुचि भिल्लिणिबोरांची ॥प्रभु०॥२॥
सदासुख साधूसेवक खेवाचें । बिरुद हें ज्ञानदेवाचें ॥ प्रभु०॥३॥

संस्कृत गद्य -

ननु परमेश्वरस्य नैर्गुण्ये कथं भावानुसारेण वर्तनम्?
निर्गुणत्वादित्येवोत्तरम् ।
स्वयमेवाहुरार्यपुत्रचरणा :-
समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥

१६३५ / अभंग

सर्वभूती सम जरी आहे प्राण । सेवी जो पथ्यान्न तया पाळी ॥१॥
गाई व्याघ्रा जरी समान जीवन । निवारी तहान पी तयाची ॥२॥
सर्वां भूतीं सम रवी प्रकाशीतो । दिवाभीतासी तो काय करी ॥३॥
ज्ञाननाथ गुप्त हृदयीं असतां । भक्तिवीण हाता नुघड ये ॥४॥

संस्कृत गद्य -

(शंका-) अस्त्येवं सामान्यम् । सम्बन्धभजने खलु भजनमात्रेण सम्बन्धि भवति इत्यत्र प्रमाणं नास्ति । (य९उ.३७८)
अत आह व्रजवल्लभः -
पिताहमस्यजगतो माता धाता पितामहः ।
गतिर्भर्ताप्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् ॥

संस्कृत गद्य -

समाधान : - विरुद्धमेतत् । न । यथा मनुष्यत्वं सर्वसममपि पितृपुत्रादिभावनया भिद्यते, एवं पारमैश्वर्येऽप्यदोष एव ।



अत्राप्युदाहरन्तीति प्रयोगो भारते स्फुटः ।
केनाप्यतः कथां दृष्टा शिवाचेन्मानमर्हति ॥
॥ इति मध्यमरंगः ॥

१६३६ / दिंडी

तिहीं लोकी विधितनय अटण चाले । दिनीं एके हरिभगिनिसदनि आले ।
विष्णुदासा संपत्ति सुख सदाही । दया दारापरि वसुं न दे कदाही ॥

१६३७ / साकी

झटिति उठुनि पद नमुनि सुभद्रा मुनिस ह्मणे बैसावें ।
पाद्यादिक षोडश उपचारें पूजुनि तोषवि भावें ॥

१६३८ / यूथिका

वंदिले पुढति आवडि पावलें । पाहुनी मुनि मनांत विसावले ॥
भाग्य हो तुज अशा मृदुभाषणा । बोलुनी सुकुशला पुसती पुन्हा ॥

१६३९ / भुजंगप्रयात्

स्मराच्या दर त्यागुनी सायकांचे । पहावें कसें चित्त ते बायकांचे ॥
मुनी आघवे ब्रह्मचर्येचि जाणें । पुसे सौख्यदुःखादि सर्व प्रमाणें ॥

संस्कृत गद्य -

अयं भाव :- यथा वात्सायनेन कामशास्त्रं ब्रह्मचर्येण समाधिना निर्मितमिति तेनैवोक्तं भवति तदेतत् ब्रह्मचर्येण परेण च समाधिना ।
विहितं लोकयात्रायै न रागार्थोऽस्य संविधिः ।
बलवानिन्द्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ।
इति निषेधस्तु अनधिकारिकाणां विदुषां सामर्थ्याभावात् ॥

१६४० / ओवी

ब्रह्मनंदन ह्मणती हृदयीं । कृष्णभगिनी ह्मणविते ही ।
तरी प्रेम कैसा कायी । तो लवलाही अवलोकू ॥१॥
तिया मस्तकीं हस्त ठेउनी । करुणादृष्टीं कल्याण वाहुनी ।
वत्से इत्यादि मधुरवाणी । आश्वासूनी बोलती ॥२॥ (य९उ.३७९)

१६४१ / मदिरा (सवैया)

केविं पती तुज वागवितो क्रतुनंदिनि केविं तुझ्या सह वागे ।
बंधु कसा तुजसी तुज नेत कदा सदनास सणाप्रति सांगे ॥

ठाउक तो मज निष्ठुर भावहिना[१] तुझिया पतिहूनहि वाळी ।
ऐकुनि वाणि वदे नयनी जळ आणुनि ते कर लावुनि भाळीं ॥
(१. भक्तिरहित जे त्यांना, किंवा बंधुवर्गहीनाला.)

१६४२ / मदिरा (सवैया)

सर्व सुखे मिळतीच तदा करिताति यदा सदनुग्रह साधू ॥
दुस्तर हें भवगर्व तुटे मग कोण पुसे अणु आधि[२] विबाधू ॥
भाग्य पुरें मम योग्य खरें परि सोकवि एकचि दुःख मनाला ।
हा मम बंधु जनीं ह्मणवी विकला पण कां क्रतुपुत्रिपणाला ॥
(२. मानसिक दुःख)

१६४३ / कामदा

वंदितो तिच्या हा सदा पदा । जाचते मनीं हेंच आपदा ॥
ग्रास घेइना माझिया करीं । सावडी शितें यज्ञजाघरीं ॥

१६४४ / दिंडी

पुढें माझ्या बोले न गोड गोष्टी । द्रौपदीस्तव निर्मिली वस्त्रसृष्टी ।
उणें याला मंदिरीं काय आहे । उगे यांचे एवढें कष्ट साहे ॥

१६४५ / कामदा

जाल जैं तुह्मीं द्वारकापुरा । काज माझिये एवढें करा ॥
सांगुनी तया ओळवा मनें । व्यर्थ होति ना संतदर्शनें ॥

१६४६ / ओवी

सांगावे सुभद्रा सख्खी बहीण । द्रौपदी तुझी कैची कवण ।
बहिणिसी बोलसी न निवांतवचन । कां नित्य पोषण द्रौपदीचें ॥

१६४७ / भुजंगप्रयात

तुला फारशी आवडे श्रेष्ठसेवा । तरी मंदिरी देवकीमाय देवा ॥
तिला टाकुनी यज्ञजा अंगणांत । शिणोनी मला लाजवीसी मनांत ॥
(य९उ.३८०)

१६४८ / गीती

मुनि ह्मणती तूं बाळे सान तुला योग्य बोल हें काय ।
परि पुसलें यास्तव मी जाउनि सांगेन जेथ यदुराय ॥

१६४९ / स्वागता

ती ह्मणे मन न काय कुणाला । थोर[१] चित्तिं रड, मी तंव बाला ॥
मायेनें जरि असेंच वदावें । लेंकुरें कुणिकडे तरि जावें ॥



(१. मोठ्यामोठ्यांच्या चित्तांत तर रड आहे.)

१६५० / मालिनी

मुनिवर वदलें कीं काळजी सर्व सोडी ।
मुळिहुनि मज आहे काजिं ऐशाच गोडी ॥
त्वरित निघुन आतां जाइन द्वारकेला ।
कथिन हरिस हो, तो जेविला वा भुकेला ॥

१६५१ / कामदा

वंदिलें पदा वाक्य ऐकुनी । द्वारके तदा चालिले मुनी ॥
योगमानसें शीघ्र पावले । तों घरींच तैं देव फावले[२] ॥
(२.सांपडले)

१६५२ / ओवी

पाहतांचि मुनीतें । तात्काळ उठोनि भगवंतें ।
लोटांगण घालोनि जोडोनि करातें । विनवी मंदिरातें न्यावया ॥

१६५३ / स्रग्धरा.

या या देवर्षिवर्या निजचरणरजें पाववावें मला जी ।
कामी मी फार, नारीवदन निरखितां कैं न चित्तांत लाजी ॥
आले स्वामी असे कीं मम पतन पुढें होय तें पाहवेना ।
बाळाचे न्यून जैसें अणुहि जननिच्या अंतरीं साहवेना ॥

श्लोक

नह्यंमयानि तीर्थानि न देवा मृच्छिलामयाः ।
ते पुनन्त्युरुकालेन दर्शनादेव साधवः ॥

कबित्त - सुंदरदास-.

तात मिले पुनि मात मिले सुत भ्रात मिले जुवती सुखदायी । (य९उ.३८१)
राज मिले गजबाजि मिले सब साज मिले मन वांछित पायी ॥
लोक मिले सुरलोक मिले बिधिलोक मिले वैकुंठहि जाई ॥
सुंदर ओर मिले सबही सुख संतसमागम दुर्लभ भाई ॥

चौपाई - तुलसीदास.

मति कीरति गति भूति भलाई । जो कोउ जतन जहां जहि पाई ॥
सो जान बसत संगप्रभावूं । लोकहुं वेद न आन उपावूं ॥१॥

१६५४ / ओवी

मुनीतें आसनीं बैसवोनी । पाद्य अर्ध्यादि उपचार वाहोनी ।

साष्टांगे दंडवत करोनी । विषद कुशल देव पुसती ॥
१६५५ / द्रुतविलंबित.
मुनि ह्मणे तुझिया करुणें हरी । कुशल हो अवघे[1] अवघेपरी[2] ।
कळवितों परि एक करि क्षमे । बहुत हा मज दोष तुझा गमे ॥१॥
(१.सर्व, २.सर्वपरी)
१६५६ / द्रुतविलंबित.
वडिलही त्यजुनी अपुलें घरीं । परकिया सदनीं अति चाकरी ।
करुनियां मज लाजविसी कसें । बहिणिचें ह्मणणे तुजला असें ॥२॥
१६५७ / गीति.
देव ह्मणे कळ करितां शांति नसे जरि समस्त तुह्मि फिरले ।
शेवट काय म्हणावें माझ्याही बहिणिचें न घर पुरलें ॥
१६५८ / द्रुतविलंबित.
कळिमला तुज अंतरिं काम हा । सहज दोहिमधें तरि साम[3] हा ॥
हरि म्हणे बरवें[4] बरवें करा । भलतियाहि मिषें जन उद्धरा॥(३.समेट,४.ठीक आहे.)
१६५९ / इंद्रवज्रा.
सामान्य मी चेतन हें गणावें । माया अधिष्ठान मला म्हणावें ॥
जें जो करी त्या न म्हणेचि कांहीं । गातो तयाला भजणें मलाही ॥
१६६० / द्रुतविलंबित.
अवचिता दिसले सुत[1] सर्पसे । उमटतां मति तैं न गमे तसें ॥ *(१-दोरी)*
मुढजनांप्रति मी जगसा दिसे । निरखितां निवतें अवघें पिसें ॥ (य९उ.३८२)
१६६१ / कामदा
किंतु सर्प तो दोर व्हावया । दीप पाहिजे हो पहावया ।
मी विशेषही ब्रह्म हे गमे । जैं किजे कृपा देशिकोत्तमें ॥
१६६२ / गीति.
ह्मणवुनि तुमचें करणें मजला केव्हां कसेंहि हो रुचतें ।
चार दिवस वास करा श्रम हरल्यावरिच बुद्धि शुचि सुचतें ॥
१६६३ / ओवी
एवं राहवोनी नारदासी । नित्य उपचारें पूजी त्यासी ।
परमात्मा मनुष्यवेषी । सत्संगे आपणासी धन्य मानी ॥
१६६४ / निवेषिका
देव दयानिधि दासाकरवीं इतर गर्व हारवी ।
नेणें निजपर भाव चतुरतर हृदयतिमिर हा रवी ॥धृ.॥
एक दिवशिं हृषिकेशि विधिसुता कौतुक दाविति बरें ।
माव करुनि चिरुनियां अंगुळी धरणिं पडति घाबरे ॥
पाहुनि मुनि वत्सलरसवशमन धावुनि उठवी त्वरें ।
हर हर किति वाहतें रुधिर गति कवण करूं सत्वरें ॥
मुनिकळकळ बघुनि प्रेमळ[1] गति वदत मधुरतररवी[3] ।
नेणें निजपरभाव चतुरतर हृदयतिमिर हा रवी ॥१॥ देव दयानिधि०
(१.देव.२. आवाजानें)
१६६५ / द्रुतविलंबित.
हरि ह्मणे तुमची इतुकी कृपा । ह्मणुनिया वदतो विगतत्रपा[3] ।
श्रमविणें द्विज दुःशिल ऊघडे । परि विपत्तिमुळें अवघें घडे ॥
(३. लाज सोडून)
१६६६ / द्रुतविलंबित.
कळत हेंहि तुह्मां मुनिनायका । समयिं कामि न येतिच बायका ।
जननि ते जरठा ह्मणुनी तिशीं । कथुं नका अति होइल हो पिशी ॥
१६६७ / गीति
बहिण सुभद्रा माझी वार्ता तिजला समस्त सांगावी ।
अति काकुळती चिंधी बांधाया अंगुलीस मागावी ॥
१६६८ / भुजंगप्रयात.
ह्मणावें मिया थोर अन्याय केला । तुवां पाहिजे किन्तु न क्रोध केला ।
जहीं सान होतीस तैं फार बाळे । सदा मांडिये खेळवी मी स्वलीले ॥
(य९उ.३८३)
१६६९ / ओवी
एवं देववचन ऐकूनि मुनी । अवश्य ह्मणोनि आले सुभद्रासदनीं ।
तिने आसनीं बैसवोनी । पूजोनि चरण वंदिले ॥
१६७० / गीति
कुशल परस्पर पुसुनी सांगति जें द्वारकेंत मग घडले ।
चिंधि ह्मणति दे झडकर कर चिरुनी देव संकटी पडलें ॥
१६७१ / स्वागता
हांसुनी वदली द्विज हें जसें । कोंवळें नसती नृप हो, तसे ॥
विष्णु तो तुह्मि हें मज सांगतां । बोटबंधनि कां पट मागता ॥

१६७२ / अभंग

माझाचि निरोप मानसीं न साही । ह्मणोनिया कांहीं मिष केले ॥१॥
ब्राह्मणा कथिलें अयोग्यही काज । नवल हें मज वाटताहे ॥२॥
काय तें न होते सेवक मंदिरी । काय सर्व नारी करिताती ॥३॥
काय घरीं नाहीं तयाच्या पल्लव । जाणे ज्ञानदेव खरें खोटे ॥४॥

१६७३ / दिंडी

ह्मणति मुनि हें बोलणे योग्य कायी । परी माते उपदेश समय नाहीं ॥
चिंधि देई आणोनि बोट बांधू । फार दुःखें तळमळें दीनबंधू ॥

१६७४ / ओवी

सत्य मानोनी मुनीचें वचन । चिंधीस्तव धांडोळी सदन ॥
मग गाठोडें एक एक आणोन । विधिनंदना दावितू ॥

१६७५ / पद

हा तंव भरजरिचा हो पाटाऊ । कुरळि पहा धोटाऊ ॥धृ.॥
हा तंव नव खांबाइत ही धट्टी । यांची न निघे पट्टी ॥१॥
हें तंव शालदुशाले भरगच्ची । ही तंव हिरवी काची ॥२॥
हें तंव अंगवस्त्र खांद्यावरचें । वदुं काय मी पुसतां घरचें ॥३॥
हें दिसतें लुगडेंच पुराणें । परि मोलकरणिला देणें ॥४॥ (य९उ.३८४)
अळंदिजीवन करुणामयमूर्ति । अवघें जाणति चित्तीं ॥५॥ हा तंव०॥

१६७६ / द्रुतविलंबित

मुनि म्हणे कळलें मज अंतरी । मिळत ना तुटके तुझिया घरीं ॥
तळमळे प्रभु फार म्हणोनियां । त्वरित मी निघतो तरि जावया ॥

१६७७ / ओवी

बरवें म्हणोनि करी नमन । मुनी निघोनि पावलें प्रभुचें स्थान ॥
पाहोनि हरीही करी वंदन । भावें करुन विधितनया ॥
देव म्हणती बह्मनंदना । झडकरी चिंधी आणा ॥
थोर होती वेदना । अंगुळीस माझिया ॥

१६७८ / गीति.

वदली काय तुह्माला कीं ऐकुनि शोक सागरीं पडली ॥
फार कळवळा माझा तिजला म्हणुनीच चिंधी सांपडली ॥

१६७९ / अभंग



मुनि म्हणे देवा ऐक गोष्ट खरी । नाहीं तिचे घरीं चिंधी जुनी ॥१॥
आपुल्या लोचनीं पाहिले आघवें । वस्त्र नवे नवे नानापरी ॥२॥
प्रेमें तिनें सांगितला नमस्कार । डोळे अश्रु भर भरोनियां ॥३॥
खोटी नव्हे कदा बहिणीची क्रिया । आळंदीशमाया जगींच हे ॥४॥

पद / निवेशिका.

प्रभु म्हणे सापत्न बहिण मम मखजा जनिं म्हणविते ।
बहुत तिचा भरंवसा मजस्तव जी [१] कणवाकण विते ॥१॥
जेवि नित्य परि मजविण चित्ता उपवासचि घडविते ।
दीपावळिच्या मधुर करंज्या मी नसतां सडविते ॥२॥
अरणि [२] करुनि निजतनु मथित मना करुनि नाम मम रवी ॥
नेणें निजपर भाव चतुरतर हृदयतिमिर हा रवी ॥ देव दयानिधि ० ॥३॥

(१.जी करुणेचे तुषार विते.२. स्वदेहमरणीं कृत्वा इत्यादिवरून. / नामाला रवी करून देहरूपी अरणीत दही घुसळल्याप्रमाणे)

१६८० / कामदा

ब्रह्मपूर्ण मी सिद्ध निर्गुणें । सृष्टिकर्तृता मायिकें गुणें ॥ (य९उ.३८५)
किंतु अंतरीं भक्तिचे पिसें । सर्वही तुह्मी जाणतां असें ॥

१६८१

यज्ञनंदिनीमंदिराप्रति । जाउनी पहा केविं तन्मती ।
ॐ इति स्वयें बोलुनी मुनी । पावले जिथें यज्ञनंदिनी ॥

१६८२ / यूथिका

पाहुनी मुनिपदाम्बुज लोचनीं । वाटला भरंवसा भवमोचनीं ॥
वंदुनी बसविलें कनकासनी । अर्चिलें सकलभाव निवेषुनी ॥

१६८३

जोडुनी कर पुसे विमला मनी । आपणा सकळ आकळलें मुनी ॥
दीनबंधु मम बंधु सुखी तरी । सांगिजे गुरुवरा सुवरोत्तरीं ॥

१६८४ / भुजंगप्रयात.

असें पाहुनी बोलतानां सतीतें । भला तोष झाला मुनीच्या मतीतें ॥
ह्मणे ऐक मी द्वारकेहूनि आलों । स्वकाजा रमावल्लभें पाठवीलों ॥

१६८५ / कामदा

द्रौपदी ह्मणे त्या दयाघना । इंदिरावरा विश्वपालना ॥

काज कोणते मी करी असें । धाडिलें तुह्मा प्रीतिचें पिसें ॥

१६८६ / अभंग

फिरतां फिरतां सहज अंगणीं । पत्रिका आणोनी मजपुढें ॥१॥

टाकिताती पक्षी ऐसा नित्यक्रम । लिखित सुप्रेम प्रश्न ऐसा ॥२॥

१६८७

सुखी असससी की बहिणी सुंदर । हातीचे अक्षर श्रीहरीच्या ॥३॥

आळंदिवल्लभ कारणावाचोनी । कृपावंत मनी सर्वांवरी ॥४॥

दिंडी / १६८८

मुनी ह्मणती यज्ञजे ऐक माय । बोट चिरलें तळमळति देवराय ॥

तया बांधाया चिंधि एक देई । निरोपा या बोलिले शेषशाई ॥

१६८९ / गीति.

जगदंकुरकंदांगुलि बांधाया दे तुला भली चिंधी ॥

बिंदु धन न घेउनि नग कनकांबर दे तुला, भली चिंधी ॥

पद निवेषिका / कडवें ३ रे.

ऐकुनि वचना पडली धरणीं प्राण परतलें उरी ॥

परि दे चिंधी ही हरिआज्ञा पळपळपळ सावरी ॥ (य९उ.३८६)

उठुनि फोडुनी हाक ह्मणे हा विश्वजननि हे हरी ॥

कवणाचें दुःख घेउनि चिरुनी बोट झाली घाबरी ॥

हृदयचि देइन ह्मणुनि निजकरें तीक्ष्ण नखा चालवी ॥

नेणें निजपरभाव चतुरतर हृदयतिमिर हारवी ॥ देव दयानिधि ० ॥३॥

१६९० / द्रुतविलंबित.

मुनि ह्मणे मखजे न करीं असें । व्रण उडे पिशितें गमलें कसें ॥

धरुनि धीर वरी मनि सत्पदा । भरजरी पट फाडुनि दे तदा ॥

१६९१ / शुद्ध कामदा.

मुनिवरा वदे आपुलि दया । सहज लोपवी दुःखदुष्क्रिया ॥

त्वरित नेउनी चिंधी द्या बरें । सुखि हरी असें जाणवा त्वरें ॥

१६९२ / दिंडी.

विनंती मी एवढी दीननाथा । करिताहे ठेवोनि पदीं माथा ॥

मुनी ह्मणती कन्यके सोडिं चिंता । सूख होइल चिंधिनें रमाकान्ता ॥

१६९३ / ओवी

एवं द्रौपदीस आश्वासुनी । योगबळें चालिले मुनी ।



पावले जेथ शारंगपाणी । कैवल्यदानी जगदात्मा ॥१॥

निरखितां नयनीं यदुवल्लभें । मुनिचरणयुगल नमिलें लोभें ।

कुशल पुसोनी स्नेहलाभें । ह्मणती चिंधी आणिली कीं ॥२॥

काय बोलली याज्ञसेनी । ते सख्खी कीं मम सापत्न बहिणी ॥

वाटलें तैसें सांगावें मुनी । पुढती नमोनी हरि वदले ॥३॥

१६९४ / द्रुतविलंबित

मुनि ह्मणे कळलें तुज अंतरी । मग उगें पुससी मज कां तरी ॥

जनहितास्तव भारत बोलणें । कळवितां स्वमुखें सुरसा उणे ।

पद निवेषिका : कडवे ४ थें.

देव वदे मुनिवरा मला जो तनु मन धन वाहतो ।

त्यजुनि देवपण भार तयाचा निजतनुवरि साहतो ॥

शपथ विप्रचरणाची त्यास्तव मानव तनु लाहतो ।

व्यापुनि अंतरिं बाहिर केवळ लीलामय राहतो ॥ (य९उ.३८७)

अलकावतिपति दास विवश अति प्रेम परम वाढवी ।

नेणे निज-पर भाव चतुरतर हृदयतिमिर हारवी ॥

देव दयानिधि दासा करवीं० ॥४॥

१६९५ / कामदा

प्रेम साध्विचा वर्णिती मुनी । धाडि पत्रिका देव ऐकुनी ॥

चिंधि पाहतां मी सुखी असें । प्रेमळापुढें दुःख कायसें ॥

१६९६ / भुजंगप्रयात.

त्वरें वैनतेयास पाचारुनीही । म्हणे द्रौपदीलाचि दे पत्रिका ही ॥

सुभद्रेस ही भेटुनी शीघ्र यावें । पदा वंदुनी चालिला पक्षि भावें ॥

१६९७ / भुजंगप्रयात.

करीं दीधलें द्रौपदीच्या सुपत्रा । पढोनी सामधिस्थ हर्षे पवित्रा ॥

सुखी अंतरीं देवरायास पाहे । स्तवोनी खगेंद्रा म्हणे त्वत्कृपा हे ॥

१६९८ / भुजंगप्रयात.

सुभद्रेचिया अंगणी पक्षिवर्य । निवेदी तिला जाहलें जें सुकार्य ॥

असें ऐकुनी लाजली ते मनांत । अहा, चूकलें देव तो भक्तनाथ ॥

१६९९ / अभंग

प्रणमूनि तेव्हा गरुडाचे पाय । दंडवत कायमनें घाली ॥१॥

म्हणे माझा नेई निरोप हा एक । क्षमा सकळीक करीं देवा ॥२॥

बंधु म्हणवोनी विसरलें तुज । सोडोनियां लाज आतां सारी ॥३॥
याज्ञसेनि-दासी होवोनि राहीन । आनंदें घेईन भक्तिसौख्य ॥४॥
गरुडें येवोनी सांगितलें सारें । हांसे तैं नावरे मुनीदेवा ॥५॥
हर्षले नारद हर्षले गोविंद । ज्ञानदेव सिद्ध कृपावंत ॥६॥

भजन

आळंदिवल्लभ विट्ठल लाल । सद्गुरु ज्ञानसुरेंद्र कृपाल ॥

१७००

आहो ! हरि करुणाघन गा हो ॥धृ॥
अंतर देइल हें मनिं नाणा । धरुनि विकल्प उगा हो ॥ आहों ॥१॥

दोहा -

कीर्तनरंगीं रंगुनि अंगें भवनदिपार निघा हो ।
गोपीकुचतरुतुंगविहंगम, लोचनिं साच बघा हो ॥ आहों ॥२॥
मिळवा येथचि परब्रह्मपदीं तुडवुनि स्वर्गनगा हो ।
अलकावितवल्लभकेलिप्रिय । अंतरिं करुनि सगा हो ॥ आहो ॥३॥

(य९उ.३८८)

श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमाउली समर्थ

**चिंधीच्या आख्यानाचा पूर्वरंग**

मंगलाचरणापूर्वीचें भजन

' ज्ञानराज माउली '

मंगलाचरण जांभूळ आख्यानाचेंच घ्यावयाचें.सर्व आख्यानाला एकच मंगलाचरण असते.

१७०१ / संस्कृत श्लोक

यत्र नैवास्ति कण्ठोक्तं तत्रादेशोऽस्त्ययं मम ।
वैष्णवे मधुराख्याने पूर्वरंगः शिवाश्रयः ॥१॥

१७०२ / संस्कृत श्लोक

शैवेऽपि मधुराख्याने पूर्वं स्यान्माधवाश्रयम् ।
माधवोमाधवावीशौ परस्परनुतिप्रियौ ॥२॥

१७०३ / संस्कृत श्लोक

निष्कलो निर्गुणो देवो विराट् संराट् स्वमायया ।
लीलया करुणामूर्तिः किन्त्वस्ति भक्तिवल्लभः ॥३॥

१७०४ / संस्कृत श्लोक



यस्या वा देवताया यदुपाख्यानं प्रकीर्तितम् ।
तथापि मंगलं कार्यमिष्टदेवस्य नान्यथा ॥४॥

१७०५ / संस्कृत श्लोक

उपाख्यानदेवतायाः कीर्तनं मध्यतो भवेत् ।
अन्ते सद्गुरुनाथस्य मंगलाचरणं स्मृतम् ॥५॥

१७०६ / संस्कृत श्लोक

पूर्वस्य मंगलात्पूर्वं सद्गुरोर्भजनं सदा ।
संप्रदायनिदेशोऽयं लंघने शपथोर्पितः ॥६॥

१७०७ / अभंग

देवा भक्त आवडती । ऐसी कोठें नाहीं प्रीती ॥१॥
रमा ब्रह्मा बळिभद्र । आत्मा आणि भालचंद्र ॥२॥
गळां वैजयंती माळा । तेही नावडे गोपाळा ॥३॥
ऐसा निवाडा पुराणीं । तुका ह्मणे व्यासवाणी ॥४॥

तथाचैकादशस्कंधे-

न तथा मे प्रियतमो आत्मयोनिर्न शंकरः ।
न च संकर्षणो न श्री नैवात्मा च यथा भवान् ॥१॥

(य९उ.३८९)

इत्युद्धवं प्रति भगवानाह - आत्मयोनिः कमलासनः ।
समष्टिजीवत्वाभिमानान्न विशेषेण प्रियः।
शंकरोऽपि बहुभक्तवत्वान्न विशेषेण प्रियः।
संकर्षणस्तु आधिकारिकत्वेन शय्यास्थानप्राप्तः कर्तव्यमेव तस्यैतत् ।
अकरणे प्रत्यवायसंभवात् प्रेम्णैव मां धारयतीति न मन्ये ।
लक्ष्मीस्तु मत्सौंदर्येण मोहिता चंचलापि न प्रिया विशेषेण ।
आत्मापि निष्कलो भक्तार्थमेव शरीरीकृतः।
अतो विशेषेण न प्रिय इत्यवेहि ।
भक्तास्तु सर्वथा निरभिमाना मे प्रिया इति भावः।
विश्वाचार्यचरणनिर्देशोऽपि -

''किंबहुना धनुर्धरा । जो मातेचिया ये उदरा ।
तो मातेचा सोयरा । केतुला पां ॥८३॥

तेवीं मी तयां । जैसे असती तैसियां ।
कळिकाळ नोकोनिया । घेतला पटा'' ॥८४॥
(भावार्थदीपिका अध्या. –१२– श्लोक. ७)

अत्र स्कंदपुराणोक्ता व्याधब्राह्मणलिंगपूजाऽऽख्यायिकां दृष्टान्तार्थं उदाहर्तव्या ।
पुनश्च तदेव ।
''देवा भक्त आवडती'' इत्यादि ।
अत उपाख्यानमुच्यते ।

मध्यम भजन ।
॥ गोपीवल्लभ गोकुळलाल, देवकिनंदन दीनदयाल ॥

---

आख्यान ३ रे

# संत सखु आख्याान

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

॥ पूर्वरंग ॥

अभंग

कथा त्रिवेणी संगम । देव, भक्त आणि नाम ।
तेथीचें उत्तम । चरणरज वंदितां ॥१॥
जळति दोषांचे डोंगर । शुद्ध होती नारीनर ।
गाति ऐकती सादर । जे पवित्र हरिकथा ॥२॥
तीर्थे तया ठायां । येती पुनीत व्हावया ।
पर्वकाळ पाया- । तळीं वसे वैष्णवा ॥३॥
अनुपम्य हा महीमा । नाहीं द्यावया उपमा ।
तुका म्हणे ब्रह्मा । नेणें वर्णू या सुखा ॥४॥ (य९उ.३९०)

संस्कृत -
अथ खलु कर्मणा चित्तशुद्धिगतानां विरागशमादिषट्क-मुमुक्षासाधनचतुष्टय-प्राप्तानामेव ब्रह्मज्ञानेऽधिकारः ।
तत्र तावत् कर्मापेक्षा विद्यते, विद्योत्पत्तौ ।
सा खलु त्रयवर्णिकानामेव इह जन्मनि संभवति न चान्येषाम् ।



न च कर्मणो नियमः येन पूर्वसंचितम् अपहाय अन्यवर्णकर्मणां शीघ्रउच्चतमवर्ण-परिणतिः स्यात् ।
भवेद्दैवमपि ।
परं च अयं ब्रह्मज्ञानाधिकारोऽपि बुद्धिपूर्वकोऽबुद्धिपूर्वको वा?
आद्ये तस्य अतीव कष्टतमत्वं आह भगवान् मुचकुंदाय -
'युंजानानामभक्तानां प्राणायामादिभिर्मनः ।
अक्षीणवासनं राजन् दृश्यते पुनरुत्थितम् ॥'
तथा चोक्तमभियुक्तेन ।

''हरिहरकीर्ति अनादर करितो धरितो मनांत पंचदशी ।
त्याच्या ज्ञानाग्नीनें न जळे एकहि पटप्रपंचदशी'' *वामनपंडित.*

अस्त्वेवं तर्हि अन्यदपि श्रेयो मार्गोऽन्वेषणीयः।
येन सर्वेषामेव भगवति गतिः स्यात् । बाढमन्वेषणीयः ।
अन्वेषितश्च प्राचीनैः परमकारुणिकैः सकललोकाचार्यचरणैः महर्षिभिः ।
तथाच शास्त्रमपि -
''ज्ञाने प्रयासमुदपास्य नमन्त एव ।
जीवन्ति सन्मुखरितां भवदीय वार्ताम् ॥''
इत्यनेन भगवत्कथाश्रवणे सहजसत्संगलाभात् ।
नामस्मरणेन सकलपापदहनात्,
गुणश्रवणेन विषयप्रवृत्त्यनुपपन्नतया भगवत् प्रवृत्त्युपलम्भात्,
कथाश्रवणमेव सर्वेषां कलौ हितम्, - इति भणन्ति निगमशास्त्रपुराणानि ।
तथाच अणुरणति विष्णुपुराणम् -
''कृते ध्यायन् यजन् यज्ञैस्त्रेतायां द्वापरेऽर्चयन् ।
यदाप्नोति तदाप्नोति कलौ केशवकीर्तनात् ॥''
अत आहुः श्रीतुकारामपादाः ।
कथा त्रिवेणीसंगमः। 'देव भक्त आणि नाम' - अत्र च देवभक्तनाम्नां च एकत्वेन गंगायमुनासरस्वतीनामपि न्यूनाधिकत्वाभावेन समत्वं सूचयन् आह - ''कथा त्रिवेणी संगम'' ॥
अथ खलु भवेदेवम् ।
तथापि भगवदपेक्षया भगवद्भचरित्रवर्णनन्तु त्रिवेणीसंगमत्वात्,
अधिकप्रेमजनकमिति परिचये उत्तरसम्मतिरपि विद्यते -
मुदमंगलमय संतसमाजू । जिमि जगजंगम तीरथराजू' - तुलसीदास.

तस्मात् परिचयाय इहजन्मन्येव आविष्टचेतसां भगवत् साक्षात्काराय च कथापरिचय आरभ्यन्ते ॥

भजन

आळंदीवल्लभे विठ्ठललाल । करुणासिंधू दीनदयाळ ।

॥ इति पूर्वरंग ॥

(य९उ.३९१)

१७०८ / मंगलाचरण छंद

जय सुजनसौलभा जय कुजनदुर्लभा जय हृदयवल्लभा गोपवेशा ।
जलजचरणा नमो, जलदवर्णा नमो, जलजनयना नमो, मृदुलकेशा ॥
जय जयाजितजयाऽनन्तसुखदायका, जय जगन्नायका, प्रणवबिन्दो ।
सुभगसीमा नमो, पूर्णकामा नमो, मोक्षधामा नमो, करुणासिंधो ॥१॥

१७०९ / पुराण - साखी वृत्त - हिंदी

यहि हेतू तुम परिचय देखन चरित सुनो मम भाई ।
पंढरिजीवनचरणभजनतें कस तरगइ सखुबाई ॥१॥

१७१०

ओवी - कृष्णातीरीं करवीर । तेथें नांदे द्विजवर ।
आपण पत्नी आणि पुत्र । सून चवथी ॥

१७११ / गीति

सखु अभिधान सुनेचें जणु महिवरि दूसरीच अनसूया ।
गांजति सासुसासरे भर्ता परि अंतरांत अनसूया ॥

१७१२ / दिंडी

आधिं नारी सर्वदा अभीमानी । नवऱ्याही साठिं ज्या होति मानी ॥
सुनेसाठीं सर्वदा राग जागा । अशा साऱ्या मग कें वदूं कजागा ॥

१७१३

कजागाची स्वामिनी सखूसासू । मारितानां येऊं न देइ आसू ॥
धड खाया देती न अन्न कोणी । दिवसरातीं करविती शेणपाणी ॥

१७१४

सासु कुमती रांजणी छिद्र केलें । पाणि भरितां खालतें सर्व गेलें ॥
तदा झोटी आसडोनीहि बोले । म्हणे कां गे हिंडसी व्यर्थ मेले ॥

१७१५

सणवारीं उच्छिष्ट अन्न देती । झणी शेजारी कांहिं बोलुं जाती ।



तरी होती भांडणा सिद्ध सारीं । छळिति दीना सर्वही दुराचारी ॥

१७१६ / गीति

छळितां छळितां श्रमली तनु अतिशय तरि न मानि खंती ते ॥
शांतीतें अवलंबुनि पंढरिराया अखंड चिंती ते ॥

१७१७ / हिंदी

धनाक्षरी वृत्त

कहे पंढरीके राज, मुझे भूल गये आज ।
तुमबीन महाराज, कवण बाज राखि है ॥ (य९उ.३९२)
दीनबंधु दीननाथ, मैं अकेलिही अनाथ ।
भव नदिमों देहु हात । ब्रीद बात बांकि है ॥
भलो दुःखहि संसार, बढे चित्त में बिचार ।
मिटे बिखय बिस्तार । नामसार चाखि है ॥
समझे भक्ती अरु ग्यान, मिले मुक्ति अधिष्ठान ।
अलंदीश पदध्यान, श्रुतिग्यान साखि है ॥

१७१८ / वसंततिलका.

शेजारियाहि सखुदुःख न गोड वाटे । ते पूसती सखुस सांग कुण्या सुवाटे ॥
माहेर हो तव असें कळवोनि तेथें । धाडूं तुला दिवस चार वळोनि यातें ॥

१७१९

पद. लावणीचे चालीवर.

माय बाप बहिण भाउ गुरु पति फणिशायी सकळां ।
व्रजवल्लभभजनाविण अवघ्या सुकळा त्या विकळा ॥धृ.॥
सखु ह्मणे माहेर बाइ ग मम पंढरपूरी ।
बाप विठोबा माय रुक्मिणी नांदति भरपूरी ।
भाउ पुंडरिक बहिण भीवरा मार्ग फार दूरी ।
मला विसरले माय बाप गुंतुनि निज लेंकूरीं ॥
॥चाल ॥ मी घारेवाणी वाट पाहतें सये ।
जन्म जाहला अझुनि प्रभू तरि न ये ।
पाठवूं कुणाच्या हातिं निरोपहि बये ॥
॥चाल पहिली॥ बहुतांसाठीं धांवे ह्मणुनी स्वामि असल थकला ।
व्रजवल्लभभजनाविण अवघ्या सुकळा त्या विकळा ॥ माय बाप०॥१॥

१७२० / भुजंगप्रयात.

कुणी हांसती ऐकुनी बोल तीचे । वृथा दोष कोणी पहाती सतीचे ॥
कुणी टोंचिती हांसुनी हो विठोबा । तुझा बाप तो जाहला केविं ठोंबा ॥

१७२१ / गीति.

एक ह्मणति पोरीचा जाच कसा साहतोचि वनमाली ॥
कोणी हांसुनि वदती पोरगि त्या कोडगी कळों आली ॥ (य९उ.३९३)

१७२२ / पद

जन हे घटकेचे घटकेचे । विश्वासि न अटकेचे ॥ जन हे ॥धृ॥
लटिक्या भरिती हांवा । नेणति भगवद्भक्ती भावा ॥जन०॥१॥
परोत्कर्ष असहिष्णू । आपण म्हणती न म्हणविती विष्णु ॥ जन०॥२॥
अलकावतिरायाविण । दुर्जनसंगे केवि मिटे शिण ॥ जन०॥३॥

१७२३ / गीति

कोणी पुसती भावें कोणी हांसुनि करोनियां थट्टा ॥
ह्मणती बाप विठोबा सखु माग तया लिहोनियां पट्टा ॥

१७२४ / स्वागता.

ती ह्मणे बहुत मागितलें कीं । माय बाप ह्मणुनी रुसले कीं ॥
फार कर्मफळ मी सांवडती । याचिलागिं हरिला नावडती ॥

१७२५

जन्म जन्म मज पाळित आला । मागुं काय पुढतीहि तयाला ॥
याचिंना ह्मणुनि निश्चय केला । किंतु जीव हरिभेटिं भुकेला ॥

१७२६ / दिंडी

उपहासें बोलती लोक कोणी । सखूच्या हें येइना कधीं ध्यानीं ।
बाप माझा पंढरीराव हेंची । सांगतांना आनंदभरें साची ॥

१७२७ / पुराणसाकी.

कोणि एके दिवशी घागर घेउनि पाण्याला सखु गेली ॥
तंव मार्गावरि पंढरियात्रा विठ्ठल गर्जत आली ॥

भजन.

बाप विठोबा माय रुखमाई । भाउ पुंडरिक बहीण भीमाई ॥

१७२८ / गीति

संतमुखे सखु ऐके अभंग जो बोलिले तुकाराम ।
हृदयीं कळलें तिजला कीं भजतां रक्षितो सखा राम ॥

१७२९



अयं अभंगः सद्भिर्गीतः।

बाप माझा दीननाथ । वाट भक्ताची पाहात ॥१॥
माय माझी रुक्मा देवी । तिचे पायीं ठेवा डोई ॥२॥
भाउ माझा पुंडरीक । त्याचा भाव आहे एक ॥३॥
बहिण माझी चंद्रभागा । तिला नमस्कार सांगा ॥४॥
तुका ह्मणे पंढरपुर । माझ्या मुक्तीचे माहेर ॥५॥

॥पुनः भजन॥

बाप विठोबा माय रुखमाई । भाउ पुंडरिक बहीण भीमाई ॥
(य९उ.३९४)

१७३० / हिंदी - साकी.

सुनके साधुबचन सखुबाई दिलमों अति हरखानी ॥
मुहसों बोलति रुक्मिणिजीवन पावहुं मोहे सुखदानी ॥

१७३१ / दिंडी.

सखीयांसी बोलली तदा वाणी । बाप माझा पंढरीं चक्रपाणी ॥
बाई जातें तेथ मी साधुसंगें । न यें आतां मंदिरीं तुह्मांमागे ॥

श्रीतुळसीदासांचे पद -

जिनके प्रिय न राम वैदेही ।
सो त्यजिये कोटिक बैरीसम, जद्यपि परम सनेही ॥ जिनके०॥धृ.॥
तज्यो पिता प्रल्हाद बिभीषण बंधु भरत महतारी ।
बलि गुरु व्रजवनितन पति त्यागे भये जग मंगलकारी ॥१॥
नातो नेह रामको मनियत सुहृद सुसेव्य जहां लौं ।
अंजन कहा आंख जेहि फूटै बहुत हौ कहौं कहांलौं ॥२॥
सो तुलसी सब भांति परमनिधि पूज्य प्राणते प्यारो ।
जासों होइ सनेह रामपद सोई हितू हमारो ॥३॥ जिनके प्रिय०॥

भजन

बाप विठोबा माय रुखमाई । भाउ पुंडरिक बहीण भीमाई ॥

अभंग

अवघाची संसार सुखाचा करीन । आनंदें भरीन तीन्ही लोक ॥१॥
जाईन गे माये तया पंढरपुरा । भेटेन माहेरा आपुलीया ॥२॥
सर्व सुकृताचें फळ मी लाहीन । क्षेम मी देईन पांडुरंगी ॥३॥

बापुरुखमादेवीवरू विठ्ठलेंसि भेटी । आपुले संसाटी करुनी ठेला ॥४॥

पद - लावणीचे चालीवर.

कर जोडुनि मी तुह्मां विनवितें साजणि ग बाई ।
जाते मी माहेरिं पहाया माझे बाप आई ॥धृ॥
घरचे अति रोधतील ह्मणुनी कळवित मी नाहीं ॥
सोडुनि अवघी लाज आज मी जात गडे पायीं ॥
॥चाल॥ कळवळा बहुत माझ्यास्तव तुमच्या मना ।
मम माहेरीच्या पुसतहि होत्या खुणा ॥
तरी सत्समुदायचि मूळ आज पाहुणा ॥
॥चाल पहिली॥ निघतें ह्मणुनी लोभ असो जणु वाढती चंद्रकळा ।व्रज०॥२॥
(य९उ.३९५)

भजन

बाप विठोबा माय रुखमाई । भाउ पुंडरिक बहीण भीमाई ॥

१७३२ / अभंग.

कांहीं खेद तुह्मी नका करूं मनी । जातें मी ह्मणूनी संतासवें ॥१॥
विसरतो बाळा देव कार्यमग्न । तेव्हां आठवण संताला ये ॥२॥
संतवचनानें माझे अवगुण । क्षमा नारायण करील कीं ॥३॥
भलत्याही भावें जो कां शरण गेला । नाहीं मोकलीला मायबापें ॥४॥
अडल्याबिडल्या आधार सज्जन । आळंदीजीवन आवडे ज्या ॥५॥

१७३३ / गीति

इतुकें वदुनी घागर आपटली ती सर्वेचि भवभारा ।
उतरुनि संतांमध्ये बसुनि मनीं आठवी निगमसारा ॥१॥

१७३४ / गीति

विठ्ठलनामें वदनीं गातां सत्संगती निवे चित्तीं ।
सासुसासरे त्यजिले तिलांजुली दिलि तशीच पतिवित्तीं ॥२॥

१७३५ / वसंततिलका.

शेजारणीस परि तें नच गोड लागे । ठेवोनि घागर तिच्या घरिं जाय वेगें ॥
सासूप्रती सकल तैं सखुवृत्त सांगे । यात्रेस चाललि तुझी सुन संतसंगें ॥

१७३६ / गीति.

माहेरचि जे सखुचें पुसत असति फार फार कळवळुनी ।
तेचि चाहडी वदती लोक दुतोंडे अखंड घ्या कळुनी ॥२॥



१७३७ / निर्लज्ज व्हावे

गीति

विषयपाश पडतां तैं पाळावी लोकलाज हेंहि खरें ।
परि भगवंतीं अंतर पडतां लाथें त्यजा तिला निकरें ॥३॥

१७३८ / गीति

कुशळ अती संसारीं हृदयापासोनि वीट भजनाचा ।
मूर्ख जसे निष्कारण आचरती द्वेष नित्य सुजनांचा ॥ (य९उ.३९६)

१७३९

ओवी - शेजारणीची वाणी । सासू पुत्रापाशीं सांगे जाउनी ।
ह्मणे तुझी रांड संतासवें निघोनी । जाते लाज मनी असों दे ॥

१७४० / दिंडी.

बोलतें मी दीसतें तेंचि लोकां । पुढें सर्व देतील तोंडि थुंका ॥
जाइं वेगें ओढोनि आणि येथें । बरी मार्गीं झोडीत बुक्कि-लाथें ॥

१७४१

अविचारी पुत्रही जेंवि माय । कारणाच्या सारिखें कार्य होय ॥
धरूनीयां कोपास अंतरांत । त्वरें गेला यात्रेंत दांत खात ॥

१७४२ / हिंदी-मराठी

मोहरी साकी.

सज्जनमेला नयन निहारी देत अकाजहि गारी ।
ह्मणे षंढ हे गांव गांव कां साळे फिरति भिकारी ॥१॥

१७४३ / हिंदी-मराठी

विठ्ठल विठ्ठल बोंबल रहते पनघट वाकि किनारी ।
गावुनि नाचुनि मोहुनि नेती परक्या सुंदर नारी ॥२॥

१७४४ / हिंदी-मराठी

बेदकरम नहिं धरम डुबाया पेट बगाया कुंडा ।
राया सांगिन या चोरांना धरुनि पंजरीं कोंडा ॥३॥

१७४५ / दिंडी.

शिव्या ऐशा ऐकती साधुलोक । उत्तरा त्या देती न कोणि एक ॥
वाट जातां गजराज सर्वदाही । भुंकती जीं कूतरीं त्यां न पाही ॥

१७४६ / गीति.

सूर्या पाहुनि थुंके जो थुंका त्याचियाचि मुखिं पडतो ।

सज्जननिंदक तैसा इच्छेविण आपदांत सांपडतो ॥
१७४७
कोणि न वदती देखुनि सोडी सौंदणिसमान तुंडेला ।
ह्मणे भांड हो सांगा कोठें मी बघुं तुह्मांत रांडेला ॥
१७४८
धन न विवाह कराया नेतों या जारिणीस ह्मणुनि पुढें ।
नाहि तरी लाथेनें केलें असतें इथेचि आज मढें ॥
१७४९
ऐकुनि पतिवचनातें संत शिव्या सोसताति मम पायी ।
होईल तें सुखें हो मानुनि पतिपाशि सखु उभी राही ॥
भजन
बाप विठोबा माय रुखमाई । भाउ पुंडरिक बहीण भीमाई ॥ (य९उ.३९७)
१७५० / वसंततिलका.
रोषा धरोनि सखु तैं पतिलागिं बोले । संतास देखत नसा फुटलेत डोळे ॥
माझाच देह तुमचा घरिं तोचि न्यावा । पोटांत आग ह्मणुनी शिजवोनि खावा॥
१७५१ / गीति
मग पतिदेखत संतां सखु लोटांगणहि घालुनी विनवी ॥
कीं विठ्ठलपितयाला सांगा तुमची सुता असे वणवीं ॥
१७५२ / अभंग.
कृपाळू सज्जन तुह्मी संतजन । एवढें कृपादान करा मज ॥१॥
आठवण तुह्मीं द्यावी पांडुरंगा । कींव माझि सांगा काकूळती ॥२॥
अनाथ अपराधी पतीत आगळा । परि पाया वेगळा करूं नका ॥३॥
तुका ह्मणे तुम्ही निरविल्यावरी । मग मज हरी उपेक्षी ना ॥४॥
१७५३ / गीति.
देखत घाली संता लोटांगण हें विलोकुनीहि खळ ।
सापासम संतापे ओकी शब्दा जसें गरळ निखळ ॥
१७५४ / दिंडी.
ह्मणे कांगे मातली सांग ऐसी । देखतांची जातेस साधुपाशीं ॥
ओढोनीया वेणीस वामहातें । प्रतोदानें झोडीत बळें तीतें ॥१॥
१७५५
दया नाहीं अंतरी लेश त्याला । जसें गांजिति यमदूत पापियाला ॥
असो नेली ओढोनि सासुपाशीं । पुढें गांजिति ते वाणवे कुणासी ॥२॥



१७५६
सखुप्रारब्धें जिता नरक केला । सासुरूपें तो भूमिवरी आला ॥
भोगुनीयां दुर्दैवनरकजाचा । पुढें मिळविल सांगाति पांडवाचा ॥३॥
१७५७ / इंद्रवज्रा
घालोनि केले तुकडे सुयांचे । ते दोर ऐसे घरिं निर्दयाचे ॥
त्यांहीं सखूची तनु बद्ध केली । पाणी वरी घालिति दुष्ट मेली ॥
१७५८ / गीति.
फर फर ओढुनी नेली ठेविली मग कोठडींत कोंडोनी ।
ह्मणती इला अन्नजला द्यावें नच पक्ष एक दंडोनी ॥ (य९उ.३९८)
पद. लावणीचें चालीवर.
सखुबाई ह्मणे दीन दयाळा स्वस्थ कसा निजला ।
माय बाप तुजविणा कोण मनिं विचारिं परि मजला ॥धृ॥
श्रुतिमुनिवचना साच कराया सुबिरुदचय सृजला ।
कीं भुललासी आज कुणाच्या गुणगानीं रिझला ॥
॥चाल॥ मायेस भारि नच उनाड जरि लेंकुरें ।
तूं जगन्माय मी किति कणवा भांकु रे ॥
तूं समर्थ असतां हाय कशी टांकुं रे ॥
॥चाल पहिली॥ अंतरसाक्षी ह्मणुनि सख्या मी जीव तुला विकला ।ब्रज० ॥३॥
अभंग तुकाराम -
तुझा माझा देवा काय वैराकार । दुःखाचे डोंगर दाखवीसी ॥१॥
बळें बांधोनीयां दिलें काळाहातीं । येणें तुझे हातीं काय आले ॥२॥
ऐसिया कीर्तीनें होइल तुझें नांव । तरी तुला देव ह्मणेना गा ॥३॥
तुका ह्मणे माझी येऊ द्यावी कींव । नाहीं तरी जीव देईन मी ॥४॥
पद जनाबाई -
मज आस दर्शनाची लागली पांडुरंगा ॥धृ॥
रुक्मिणीप्राणहंसा वल्लभा भेट द्यावी ।
किति तरी वाट पाहूं तुजविणा कोणि नाही ॥
विठ्ठला प्रार्थना ही शेवटीं आयकावी ॥ मज ॥१॥
माहेरिं नेइं आतां मुळ धाडिं सेवकाला ।
धिर नाहिं माझ्या जीवा कंठिं हा प्राण उरला ॥
संस्कृत - ननु सत्संगेन सर्वसाक्षिणं निर्गुणं मां ज्ञात्वा सुखिनी भव ॥

तर्हि तत्र न मे रुचिरित्याह ॥

शुभकाळ सर्व वदतें सगुणांत जीव जडला ॥
पुरवावि कामना हे विनवितें आपुल्या बा ॥ मज०॥२॥
आवडी नामयाच्या सांगातिं जेवसी बा ।
प्रेमानें ग्रास घेसी वर्णिसी आपुल्या बा ।
अवदान यज्ञयागीं याहूनि गोड किति बा ।
भक्तिची प्रीत मोठी जनिसंगें धावसी बा ॥३॥
सद्गुरुनाथकृपें लाधलें संतसंगे ।
सुखबोध पाहोनीयां प्रार्थितें ज्ञानगंगे ॥
जनि ह्मणे स्वरुप तूझें कोंदलें अंतरंगे ॥
मज आस दर्शनाची लागली पांडुरंगा ॥४॥

१७५९ / अभंग.

गुंतलीस जरी आणिकाचे साठीं । न ह्मणें मी पाठी धांव तरी ॥१॥
(य९उ.३९९) पंढरीचें सुख सांडोनियां आई । बोलवीत नाहीं तूज येथें ॥२॥
परी काळ तरी पाठवूनि प्राणा । नेईं नारायणा पायापाशीं ॥३॥
जोंवरी या दुःखें नाहीं विस्मरण । तोंवरी मरण होकां माझें ॥४॥
आळंदीवल्लभा श्रमावीण तुज । करवेल काज तैसें करी ॥५॥

भजन

बाप विठोबा माय रुखमाई । भाउ पुंडरिक बहीण भीमाई ॥

१७६० / अभंग.

पंढरीस आला सज्ञनांचा मेळा । पाहती स्नेहाळा माय बापा ॥१॥
उधळती बुक्का तुळसीच्या माळा । पाहती स्नेहाळा माय बापा ॥२॥
गाती नाचताती वाजवीती टाळ्या । पाहती स्नेहाळा माय बापा ॥३॥
आळंदीवल्लभा चिंतिती सुवेळा । पाहती स्नेहाळा माय बापा ॥४॥

१७६१ / हिंदी-मराठी

मोहरी साकी.

सब सज्ञन का आदर जदुवर लेत तदपि सुख नाहीं ।
चिंतातुर वदनासि देखुनी बोलत भीमकि आई ॥

१७६२ / ओवी.

दोन्ही कर जोडूनि माता । विनवी आपल्या प्राणनाथा ।



सुख वाटेल हरीच्या चित्ता । ऐशा माधुरार्था अनुवादी ॥

१७६३ / गीति

स्वामी दीनदयाळा जाऊं द्यावा सुखें क्षण तरी हो ।
ताराया निजदासा जीवचि केला कसा सुगुणतरि हो ॥१॥

१७६४

तुह्मास भजुनी मरतां पावे तो भक्त साच मुक्तीतें ।
मग कां चिंता करिता सुख माना मानुनी मदुक्तीतें ॥२॥

१७६५

जाया निज दुःखातें प्रार्थी तरि हो कसा भवद्दास ।
यास्तव घ्या विश्रांती पडुं द्या तैसे अखंड बद्धास ॥३॥

१७६६

ऐकुनि भीमकबाळावचनाला देव हांसुनी ह्मणती ।
कळली प्रिये सहज मज मायेमाजी खरी तुझी गणती ॥४॥

१७६७

माय ह्मणे मृगजलमय भविं मग्ना व्यर्थ काय तारावें । (य९उ.४००)
देव ह्मणति साच परी शिशुभयनाशार्थ यक्ष मारावें ॥५॥

१७६८

माझ्या अर्धांगींही बसुनी नाहीं स्वभाव तव गेला ।
भक्तोपयोगि नसतां मम ऐश्वर्यी ह्मणेन दंव गेला ॥६॥

पद / लावणीचे चालीवर.

सखु बाई भक्तरत्न माझें उकिरड्यांत पडलें ।
सासु सासरे कसाइ तत्करि गोघर सांपडलें ॥
मत्संकल्पे दैव तिचें जरि याचि रीति घडलें ।
तरि सोसिन मी अंगें जाचहि कंटक जरि गडले ॥
॥ चाल ॥ दासाविण या ऐश्वर्या मी ना वरीं ।
तेवढी न रुचसी तूंहि जरी नोवरी ।
भक्तास्तव माझी मति झालि बावरी ॥
॥ चाल पहिली ॥ उंच नीच काजहि करितां मी न मनिं काय सुकला ॥
व्रजवल्लभ-भजनाविण अवघ्या सुकला त्या विकला ॥ माय बाप० ॥४॥

१७६९ / गीति.

काढिन शोधुनि ऐसी जाया झट जवळिचीच वाट नवी ॥

मनपवनपाठिं धावों शकतिल न जसे तसाच वाटनवी ॥

१७७० / वसंततिलका.

तूं बोललीस मज चिंतित जो मरे तो । माझ्या पदाप्रतिच निश्चय ये त्वरें तो॥

साचें परंतु भजनारहित प्रबोधी । हें होतसेचि मग कां श्रम भक्तिसिद्धि ॥

१७७१ / इंद्रवज्रा.

दैवे तयानां जरि दुःख होतें । सोसी निजांगें अवघें अहो तें ॥

हें जाणतां भक्त न इच्छिजेतो । तैं राहुनी संगतिं सौख्य देतों ॥

१७७२ / गीति.

जाउनि सखुच्या घरला सरला मी वागणार तत्सम गे ॥

पाठवुनी तिज येथें मग तदरींचा करीन मद शम गे ॥

१७७३ / इंद्रवज्रा

आहे रमे पूर्णहि शक्ति मातें । जाळों शकें सर्व कटाक्षपातें ॥ (य९उ.४०१)

तथापि हा पालनकाल माझा । सत्त्वार्थ आविर्भवलों समाजा ॥१॥

१७७४ / इंद्रवज्रा

सत्त्वें जिथें नाश गुणद्वयातें । तेथें न मी दाखविता भयातें ॥

जीं तूटती गे कमलें नखांनीं । त्यांना कुठारीं वद कोण हाणी ॥२॥

१७७५ / गीति

सखुला पाठवुनी मी करिता तीची समस्त घरकरणी ।

मग खळही तें अंतीं सखुसंगतिं विनटतील मम चरणीं ॥१॥

१७७६ / गीति

तरि मजला जाऊं दे झडकरि सांभाळि तूं सुजन अर्चा ।

विठ्ठल नाहित येथें होउं न देई जगांत अणु चर्चा ॥२॥

१७७७ / अभंग

बोलोनियां ऐसे निघाले विठ्ठल । आवडी अमोल स्वदासाची ॥१॥

मन तें चंचळ सांडियलें मागें । पवन ही वेगें येरझारी ॥२॥

गरूड पाहील वैभवेंचि न्यावें । नावडे स्वभावें तेही देवा ॥३॥

ह्मणोनी गोविंद निघाले एकट । न चालतां वाट पातले कीं ॥४॥

आळंदीवल्लभ सर्वांचे अंतरीं । ध्यातां तेथें तरी प्रगट तो ॥५॥

१७७८ / दिंडी

सखूबाई बांधली होति जेथें । देव आले द्विप्रहररात्रिं तेथें ॥



सासु आदी नीजले ओळखोनी । सखूलागी बोलावि चक्रपाणी ॥

१७७९ / मोहरी साकी.

नारी बनकर नाथ दयाघन फुकारते सखुबाई ।

जन्माची मी मैत्रिण तुझि गे बोल गोड अजि आई ॥१॥

१७८०

बाळपणा पासुनि भेटी नच ह्मणुनि काय रुसलीसी ।

पुढती ऐसें न करिन शपथचि कां तरि उगि बसलीसी ॥२॥

१७८१ / गीति

ऐकुनि भगवद्वचना सखुच्या चित्तास वाटलें नवल ॥

कीं आजवरी प्रेमें श्रवणिं न मिळला असा सुवचकवल ॥१॥

१७८२ / गीति.

कोण असल ही माता कीं आले पांडुरंग झांकोनी ।

परि मज एकटिसाठीं येतिल कां पंढरीस टाकोनी ॥ (य९उ.४०२)

१७८३ / गीति.

करुणा उणि भगवंतीं ही शंका साच नाहिं मम चित्तीं ॥

परि मजहुनि थोरजना देतिल माझ्यास्तव कशि विपत्ती ॥३॥

१७८४ / गीति.

सम सर्वांभूतिं प्रभु ज्ञानी आत्माच त्यास आवडतो ॥

बाळ ह्मणुनि धावावें ऐशा मोहा कशास सांवडतो ॥४॥

१७८५ / गीति.

अथवा संतचि वदती करुणाघन तो असे महाराज ।

येऊं शके परंतू निकडें बोलाविलें न म्यां आज ॥५॥

१७८६ / गीति.

ह्मणुनि असल ही कोणी येथिल वा पूर्वीचीच मम बहिणी ॥

तरि आतां ओ द्याया खेद न कीजे कदापि व्यर्थ मनीं ॥६॥

१७८७ / दिंडी

ह्मणे माते कोण तूं कासयाला । बाहतेसी साजणी सांग माला ॥

घरींच्याही बांधिलें मला फार । न ये येतां येथोनि नमस्कार ॥१॥॥

१७८८ / दिंडी

ऐकुनीयां सखुवाणि देव बोले । ह्मणे बाई म्यां जन्म तंत्र केले ॥

मंत्र फुंकोनी कूलुपें कपाटें । क्षणें तोडिन मी आज मला भेटें ॥२॥

१७८९ / हिंदी-मराठी / साकी
इतना कहकर जदुबरजीनें तोडा घरका ताला ।
सखुबाई को जाकर मिल गये बनि उस सरिखी बाला ॥१॥
१७९० / साकी
सखू देख मन अति हरखानी पूछत कुशल सुबाता ।
येरि ह्मणे कुशल परि तूं कां परतलि पंढरि जातां ॥२॥
१७९१ / गीति.
संतमुखे मज कळलें तूं होती जात पंढरी यात्रे ।
परि परतोनी आलिस मंदिरिं कोणाचिया स्वबलसूत्रें ॥
१७९२
सखुबाई ह्मणे माझी पुंडलीकवरदपायिं साच मती ।
परि धर्मांशें वाटे टाकूं किंवा न टाकुं हा स्वपती ।
१७९३ / कामदा.
विट्ठली ह्मणे ऐक वो सये । विट्ठलाविणा जो वदे स्वयें ।
तो गुरु पिता माय वा पती । टाकिजे अशी शास्त्रसंमती ॥
श्लोक
''गुरुर्न स स्यात् स्वजनो न स स्यात् ।
पिता न स स्याज्जननी न सा स्यात् । (य९उ.४०३)
देवं न तत्स्यात् न पतिश्च तत्स्यात् । न मोचयेद्यस्समुपेतमृत्युम् ॥
१७९४ / भावार्थ ओवी.
गुरू पती माय पिता । सोयरा आणि देवता ।
जो जोडोनि दे ना भगवन्ता । तो कोणीही सर्वथा त्यागावा ॥
अभंग. श्रीतुकाराम
नारायणीं घडे जेणें अंतराय । हो कां बाप माय त्यजावे ते ॥१॥ ....
१७९५ / गीति.
आह्मीं संसारिं सदा परि सखुबाई तुझ्यासम सुसाधू ।
विट्ठल जोडुनि करिती लीलेनें आमुचाहि भवबाधू ॥
१७९६ / श्लोक.
साधूवरा न मिळता धन संपदा ते ।
खेदास ना करिति जाणुनि पापदा ते ॥
ध्याती अखंड हृदयीं हरिच्या पदातें ।
देहीं असोनि मुकती भवआपदा तें ॥१॥



१७९७ / श्लोक.
धालीस तूं कशि गडे वद सार साची ।
चाखोनि गोडि हरिच्या पदसारसाची ॥
दुःखी सुखीं सम अशी दिसतेस मातें ।
वाटे मला अजिच तूं त्यजिं या श्रमातें ॥२॥
१७९८ / श्लोक.
की पावली अझुनिया न रसा रमा गे ।
त्या इच्छिसी परि सखे घर सार मागे ॥
सोडोनि सासु ससरा पति दीर जाऊ ।
माझ्या सवेचि सखु पंढरिं चाल जाऊ ॥३॥
१७९९ / गीति
सखु बोले मम चिंता आहे श्री विट्ठलाप्रती कळलें ।
यास्तव इतुक्या रातीमध्यें येथें त्वदीय पद मिळलें ॥१॥
१८०० / गीति
तूं चालसील संगें तरि मी येतें असाच निश्चय कीं ॥
परि हे बंधन अंगीं कर्माचा मागिला सुदुश्चय की ॥२॥
(य९उ.४०४)
१८०१ / गीति
ऐकुनि सखुच्या वचना स्वकरें विट्ठल निवारि बंधन तें ॥
प्रेमभरें मुक्त सखू करि मग मैत्रिणिपदास वंदन तें ॥३॥
१८०२ / दिंडी.
ह्मणे बाई येथोनि चालता गे । सकाळीं ते येतील कोणि मागें ।
येरि बोले तूं काय व्यर्थ चिंता । करितेसी जाणोनि कृपावंता ॥
१८०३ / गीति.
'कसें करूं काय करूं' वृथा मंत्र मूढ काळजी वाची ।
दीनदयाघन केशव चिंता त्या सर्वकाळ जीवाची ॥
१८०४ / हिंदी-मराठी / मोहरी साकी.
जदुवल्लभवाणीको सुनिके हरखि मनीं सखु बाई ।
बांधुनि घेइल कीं ही आपणा ऐसेंहि सुचलें नाहीं ॥१॥
१८०५ / मोहरी साकी
विट्ठलपाया पहावयाची अभिलाषा स्वमनाला ।
सोडुनि मग घरदार तिजसवें निघुनि जात मार्गाला ॥२॥

१८०६ / मोहरी साकी
पाणवठ्यापर्यंत नेउनी विठ्ठल सखुला बोले ।
बाइ मार्गी या चाल मला तव कार्य पाहिजे केलें ॥३॥
१८०७ / मोहरी साकी
सासु सासरें पूर्वी पासुनि ओळखती तव मातें ।
समजतील तरि यत्न करोनी वळवुनि पाहिन या तें ॥४॥
१८०८ / मोहरी साकी
पुढें चाल तूं येइन सखये तुझिया मागिल पायीं ।
उपकारिणितें नमन करोनी बरें ह्मणत सखु बाई ॥५॥
१८०९ / पद
करुणाघन हरिचें कवतुक नानापरी ।
देवपणा सोडुनि दासाघरिं वापरी हो ॥धृ.॥
सखु निघुनि चालतां मानसपथिं धावली ।
मनिं ह्मणे आज मी पाहिन जगमाउली ॥
वाहीन तनुमना श्रीविठ्ठलपाउलीं ।
ज्यांची दीनांवर नित सीतल साउली ॥
सत्संगी गाउन प्रेम भरिन अंतरीं हो ॥१॥ (य९उ.४०५)
इकडे सखुच्या सदनीं यदुपति पातले ।
आपणा दयाळें बांधुनिया घेतलें ॥
ते अग्र सुयांचे निज शरिरी घातलें ।
सखुच्या प्रारब्धा यापरि निर्घातले ॥
किति ह्मणुनि कळवळा वाणूं ज्ञानेश्वरी हो ॥२॥
१८१०
प्रभातसमयीं सखुचा भर्ता उठुन विचारि मनिं ऐसें ।
कीं ही मरतां मग मज लग्न करायास जवळि ना पैसे ।
१८११ / गीति
आज वृद्ध जाति उद्यां मग कोणासह करूं मी संसारा ।
चित्तीं यापरि आणुनि सखुबंधक रज्जु तोडि मग सारा ॥
१८१२ / दिंडी.
ह्मणे तूतें घडवीन अलंकार । येथुनीयां देतिल न कोणि मार ।
आजपावेतों गांजिलें तुला कीं । कोप त्याचा चित्तांत नाणु राखीं ॥



१८१३ / गीति
पति वदतां नच बोले कांहीं विठ्ठल पतिव्रताधर्मे ।
परब्रह्म करुणावश दासास्तव करित नीच हो कर्मे ॥
१८१४
कीं जीवभजन जीवा द्याया परतोनि काय मम जातें ।
अजानियम अज पाळी कीं स्वपदीं जीव होइजे जातें[१] ।
(१. जातीनें)
१८१५ / अभंग
पतिआज्ञेचाची मानोनी सुरवाड । करी झाडझूड दीनबंधू ॥१॥
कालवोनि शेण माती घाली सडा । चपळ रोकडा विश्वसूत्री ॥२॥
केलें संमार्जन चंदनाचे सडे । घातले रोकडे पतितोषा ॥३॥
नेणों काय झालें सासुसासरीयां । उगा वाटे तयां आनंदची ॥४॥
झाकुळला हीरा न लोपेचि तेज । तैसा महाराज गृहीं येतां ॥५॥
पालटली मती जाहले शितळ । ह्मणती प्रांजळ सखु झाली ॥६॥
सूर्यप्रकाशांत लावितांहि डोळे । वर्ण ते वेगळे दिसतीच ॥७॥ (य९उ.४०६)
तैसें झाकुळलें जरी परब्रह्म । सगुण हें श्याम घनतनू ॥८॥
तरी संगतीनें उपजवी सत्त्व । हेंचि भक्तितत्त्व ओळखावें ॥९॥
हाणितां पूजितां लोखंडे परीस । हेम होणें त्यास चुकेना कीं ॥१०॥
रागद्वेष नाहीं आळंदीवल्लभी । जयाच्या स्वयंभी तैसा फावे ॥११॥
भजन
बाप विठोबा माय रुखमाई । भाउ पुंडलिक बहिण भीमाई ॥
१८१६ / गीति
घागर घेउनि कडिये पाणवठां देव चालिले साचे ।
नाथगृहीं उमजले ह्मणुनी हें अन्यकार्य दासाचें ॥१॥
१८१७ / गीति
निश्चय केला प्रभुनें बरवी मज फावली सुजनसेवा ।
धुंडुनि काढिल येथें ऐसा कोणी करील नच हेवा ॥२॥
१८१८ / अभंग.
गंगा वाहे ज्याचे चरणीं । तो हा डोईवरी पाणी ।
आणोनि भरी रांजणीं । शार्ङ्गपाणी सावळा ॥१॥

ओला झाला पीतांबर । शिरींहूनी टपके नीर ।
पाहताती सुरवर । गंगासार दूसरी ॥२॥
देव भावीत हृदयीं । कार्य चूकतां मी कांही ।
गांजितील सखूलाही । जन्मभरी आघवे ॥३॥
ह्मणोनि ब्रह्मनिश्चळता । एकीकडे ठेवूं आतां ।
धरोनियां सावधानता । सखुसत्ता सांभाळूं ॥४॥
छिद्र होतें रांजणास । देव भरी आसमास ।
वडिलांसी हा विश्वास । छिद्रऱ्हास मातीनें ॥५॥
नेणों काय झालें तया । लक्ष न देतीच काह्या ।
बरें किंवा चुकलीया । यदुराया पाहोनी ॥६॥
बाप आळंदीजीवनू । अंतर्यामीं दयाघनू ।
दर्शनेंची अणु अणु । प्रेमगुण वाढवी ॥७॥

१८१९ / दिंडी.

असो वरिचे सारोनि कामधंदे । स्वयंपाका आरंभिले मुकुंदे ॥
परम सौख्य जाहलें सुरसमाजी । ह्मणति हरिकृत नैवेद्य खाउं आजी ॥
(य९उ.४०७)

१८२०

सुधाकुंडा लागली फार चिंता । ह्मणे मजला पुसतिल न देव आतां ।
देवकरिच्या पावोनि गोड ग्रासा । अमरपुरिहुनि घेतील अमर वासा ॥

भगवान् स्वतः स्वयंपाक करतात

१८२१ / कटाव

यादवजी दासासाठीं करि स्वयंपाक सुंदरसा ॥धृ.॥
जो संकल्पें क्षीरसमुद्रा । निर्मी तो कणकेवरि मुद्रा ।
घालुनि साची दोही कराची थापटि पोळी । मळोत ह्मणुनी सावरि चोळी ।
वैश्वानर ह्मणुनिया जयाला । पावे अक्षय उपासकाला ।
जो चुलींत फुंकि पावकाला ।
केले मधुर सार पक्वान्नें । भात पोळिया पीत वरान्नें ।
लाडु अनरसे करंज्या पुऱ्या । पापड्या पुरणपोळिया ।
मांडे गहुले मृदू सेवया । चर्प नखोले मणि जेवाया ।



फुले फेणिया गोड सरोळे । मोदक शिरलाडू सुबोटळे ।
तऱ्हेतऱ्हेचे बुंद पाडिले । राघवविलास तळुनि काढले ।
कर्पुर मळुनी गोड रसाला । करुनी करि मग आम्ररसाला ।
नव्हते घरिं ते ते पुरवूनी ।
हरि आणुनिया निर्मित अन्ने । करी मालपुरि ।
घोटि लाळ अमृतही या परि ॥
दीनदयाघन पाउनिया अति हर्षा ॥
यादवजी दासासाठीं करि स्वयंपाक सुंदरसा० ॥१॥
ऐसे रुचिकर मधुर करुनि मग । षड्रसमिश्रित रांधी अविलग ।
तोंडी लावावयास भाजी । करि वाढाया वडिलसमाजीं ।
निगम-भाट ज्या ह्मणती हाजी । तो पार्थाचे क्षाळी वाजी ।
येथ तोचि सुदर्शनपाणी । सात ऊत कथिकेला आणी ।
मीठ मसाला जिरे फोडणी । करुनि करी साराची जोडणी ।
अमटी निमटी । सुधारसाची गोड आमटी ।
चुका चाकवत चमकोऱ्याच्या वड्या । गोडशा आणि कुरोड्या ।
मूगवड्या दहिवडे रसवडे । गोडवडे अपुपादि चोवडे ।
तीळ खोबरे किसूनि चटण्या । निर्मूनिया पाक यापरी ।
विनवुनि करवुनि स्नानपुजा नैवेद्य दावुनी ।
पात्र वाढिलें । सकळ जेवितां सौख्य जाहलें ।
आपसांत ते बोलु लागले । ह्मणती सखुचे दोष मागले ।
अवघे गेले । कितितरि सुंदर अन्न निर्मिले । जे बुधिं गोडच नाहि देखिले ।
अलकावतिपतिकरुणेकरुनी, तृप्त होवुनी ॥ ढेंकर देती डरडरसा ॥
यादवजी दासासाठीं करि स्वयंपाक सुंदरसा० ॥२॥
(य९उ.४०८)

१८२२ / ओवी

पात्रें काढोनी उच्छिष्ट । स्वकरें ठाव करोनि स्पष्ट ।
सकलां मागोनि जगच्छ्रेष्ठ । भक्तनिष्ठ जेवितू ॥

१८२३ / कडव

अहा अहाहा हरी जयाचे घरीं रमा राहे ।
तोचि दास आवडी सांज कावडी पाणि वाहे ॥धृ.॥
झाडझूड करुनियां पुढति हरि पाक मधुर निर्मी ।

जेउं वाढि निजकरें जेवितां नुरती अक-ऊर्मी ॥
निगम ह्मणति ज्या विषम भाव नाहींच पूर्णब्रह्मीं ।
सर्वभूतसम नारि होउनि रचित सेजकर्मी ॥
ज्ञानेश्वरगडि दासास्तव उचितानुचित न पाहे । तोचि दास ० ॥१॥

१८२४ / अभंग

मनीं भावी देव कीं मी या गोकूळीं । साध्वी चंद्रावळी फसवीली ॥१॥
तिच्या बहिणीचें घेऊनीयां रूप । स्वकामसंकल्प पुरवीला ॥२॥
बरें त्याचें आजी घेऊं प्रायश्चित । निर्विकार स्थित सहज मी ॥३॥
सखूच्या पतीचा पुरवुनी काम । नारीनर सम ब्रह्म मीच ॥४॥
आळंदीजीवन स्वामी दासासाठीं । नेणें पाटिंपोटी तर्क करूं ॥५॥

१८२५ / ओव्या.

एक अभंगी चरित्र । मियां देखिलें पवित्र ।
तेथ वर्णिले कीं शतपत्रनेत्र । गेला पळोन रतिसमयीं ॥
परि महिपतिरायें कथा । वर्णिली कीं पुरविलें सखुपतिमनोरथा ।
पाहतां संतलीलामृता । प्रमाण मिळे ॥
ह्मणोनि मियांही वर्णिली ऐसी । एरव्हीं भक्तहृदयीं हृषीकेशी ।
जयाची भावना जैसी । होय तयासी तयेपरी ॥
असो इकडे सखुबाई । मार्ग चालत असता पायीं ।
तंव देखती जाहली लवलाही । कळसें लोचनीं अवचिता ॥

१८२६ / अभंग

कळस देखतां नयनीं । होय पातकांची धूनी ॥१॥
ऐसें गातसे अभंग । प्रेमभरें संतसंग ॥२॥ (य९उ.४०९)
मेळविला स्वानंदाचा । पांडुरंग स्मरे वाचा ॥३॥
स्वामि आळंदीजीवनू । ध्यातां पतीतपावनू ॥४॥

भजन

बाप विठोबा माय रुखमाई । भाऊ पुंडलिक बहीण भीमाई ॥

१८२७ / वृत्त - सुशीला.

जीवीं आला धीर ॥ सखुच्या ॥धृ.॥
भवभयचिंता सकल हरपली । पाहुनि भीमातीर ॥ सखुच्या ॥१॥
याच शरीरीं अमर जाहली । पिउनि सुधामय नीर ॥ सखुच्या ॥२॥
अलकावतिजीवनजननीतें । करुणानिधि गंभीर ॥ सखुच्या ॥३॥



१८२८ / गीति.

दीनदयाळू हरितें श्रम व्हावे ना ह्मणूनि सखुबाई ।
नांव घेत नावेवर बसुनि उतरली तिरास परठायीं ॥

०००
०

आख्यान ४ थे

# राधाविलास

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

१८२९ / गीति.

श्रुति संत पान करिती यच्चरितामृत अखंड नंदोनी[1] ।
तद्वत राधाचरिता कथितें गणनायकास वंदोनी ॥ (१.आनंदोनी)

१८३० / गीति

करधृतवीणापुस्तक विधितनया माउली शारदा ते ।
वंदिलि प्रेमसंभ्रमें आज्ञा दे मज कथनि चार दाते ॥

१८३१

यत्करुणाकर वरदें सांपडलें शब्द ब्रह्म तें पशुला ।
त्या ज्ञानेश्वरचरणीं शिर ठेवुनि वंदु राधिका सुशिला ॥

१८३२ / गीति

आधीं गोपिपदा मग गोपीरमणास वंदुनी भावें ॥
द्यावें हें मजला प्रभु गातां यश वाणि चित्त वेधावें ॥ (य९उ.४१०)

१८३३ / गीति

माघू मागूनि करित न जातां गति अंग चालि बा राधा ।
धारापीयूष गलत् तैसी कृष्णीं न भिन्न बा राधा ॥

१८३४ / गीति

पति तोचि पत्नि ऐसें वदले गुरुतात अमृतानुभवीं ।
सविता चित्‌घन एकचि जाणुनि कधिं यत्कुमर न पडति भवीं ॥

१८३५

गद्य :- यद्यपि व्यास, यद्हृदयीं हरिवास, तो आस धरुनी पुराणेतिहास, भिन्न बोलिला, यथा शचि-अवतार राधा असें. पद्मपुराणीं स्वशक्ति, रती ऐसें ब्रह्मवैवर्ती, तथापि हरिसुख सेवितां बाला, हें दोन्ही पुराणीं समान वर्णनीय

ह्मणून तात्पर्यपक्षीं, युगलकिशोरमधुरचरितपानार्थ श्रोतृवंद विनवायास, प्रत्यवाय न मानावा.

१८३६ / गीति.

येवो मेघ कोठुनिहि परि घाली पाणि तो मही वरुता ।
यापरि तात्पर्यचि तें राधाप्रीतीस पात्र हरि पुरता ॥

१८३७ / गीति

गोलोकखंड गर्गे मथुनी कथिलें हरीचरित्रास ।
तें प्राकृत वदतों जें ऐकुनीयां नासतो भवत्रास ॥

१८३८

ओवी - एके समयीं यशोदा सुंदरी । कडिये घेवोनि श्रीमुरारी ।
समजावीत नानापरी । बाळशब्दें करूनी ॥

१८३९

ओवी - तों इकडे अनयाराणी । जावया निघाली नंदसदनीं ।
मनीं व्यापिला चक्रपाणी । वेदपुराणीं वंद्य जो ॥

१८४० / श्लोक.

करि गमा निगमानन मंदिरा । गमित ठेवुनि सत्पदिं कंधरा ।
जसि समा न रमा हरिभागिनी । तसि गमे महि कामिनि रागिणी ॥

१८४१ / गीति.

रुण झुण चाली राधा धावुनि आलीच नंददारांत ।
दारा व्हाया हरिची लक्षी जणुं ती सुनंददा रात ॥ (य९उ.४११)

१८४२

गद्य :- श्रीहरीप्रति पाहोनि कडेवरुती, तद्गता रती, भ्रूविकटाकृती निरुती ऐसी बोलती झाली. ॥

१८४३ / दिंडी.

रडसि कां रे चावटा गृहीं आतां । कां न निजसी मामिजी गीत गातां ।
काय जावे वाटतें बिदीं खेळा । त्रस्त झाल्या तव बळें गोपबाळा ॥

१८४४

चूकवूनी मायेचिं नेत्रपातीं । झोंबसी तूं गोपिकां असी ख्याती ।
देउं बाळा गाऱ्हाणि बहू येती । परी मामी त्यांनांचि शिव्या देती ॥

१८४५



ऐकुनीयां राधेचि नम्र वाणी । उगा राहे सत्वर चक्रपाणी ।
माय बोले राधेस ऐक बाई । कडे घेऊनी यास गृहा नेई ॥

१८४६ / हिंदी

रा. यमनल्याण. ता.-दादरा.

राधा श्रीहरिको तुम निजघर ले जावो ।
गीत गाय गाय ताप आपनो बुझाओ ॥ राधा ॥धृ.॥
जबलग है मोरो काम तबलगहि खिलाओ ।
भूक लगे हरिको तब दहिभात खिलाओ ॥ राधा ॥१॥
ज्ञानेश्वरबाला तुम हरिरंग चढाओ ।
जोडि जोडि हरिको संग जमबंध छुडाओ ॥ राधा ॥२॥

१८४७ / दिंडी.

तुझ्या बोलें राहिला उगा बाई । एरव्हीं हा कष्ट दे सर्वदाही ।
पायिं याच्या सोडोनि कामधंदा । सदा बैसें मी खेळवीत छंदा ॥

१८४८ / गीति.

प्रमाण गुरुवाक्य परी जननी-वचनास ऐकुनी बाळा ।
उचलुनि कडिये नेउनि गृहिं कंठीं घालि कमलफुलमाळा ॥

१८४९ / गीति

फल देतां श्रीगुरुने मग घ्याया हिरुनि कोण श्रेष्ठ असे ।
तेवीं मातृदत्त हरि राधेला ह्मणुनि करित कष्ट असे ॥

१८५० / गीति

नामचि घेउनि ज्याचें होती निष्काम त्यास कामबळें । (य९उ.४१२)
वश करुं पाहत राधा बाधा वारोनि साध साम मिळे ॥

१८५१ / दिंडी

सदनिं नेवोनी ठेवि कृष्णनाथा । गृहीं पाहे तों न देखे स्वनाथा ।
समय पाहोनी स्मयमुखें सुकेशी । पाळणीया निजविला हृषीकेशी ॥

१८५२ / गीति.

यन्नामस्मरणानें देती मुनि यमपुरीसही झोका ।
जो कां ब्रह्म नंदसुत त्या दे वृषभानुजा तहीं झोका ॥

१८५३ / गीति

घडि घडि चिंती स्वमनीं कीं येइल काय येथ ह्मातारी ।
पुढती धीर धरोनी वदत हरी त्वरित साच मा तारी ॥
१८५४ / गीति
जाऊ नणंद नाहीं कोणी मजला न भीं नभासम गा ।
गाती तुज योगि असें कीं चेतन सगुण मित्रभासम गा ॥
१८५५ / गीति
पुढती चिंती हरिला सत्यचि कीं लागली असे निद्रा ।
गोपी सुंदर असतां मी कैसी साधली मुखीं मुद्रा ॥
१८५६ / गीति
कीं मी सुंदर आपण ऐसें वदलें ह्मणूनियाच हरी ।
बोलति ना परि हें चट भोगुनि मग मद्विगर्व साच हरी ॥
१८५७ / दिंडी.
हालवीतां पाळणा पाहि मागें । कृष्ण भोगाया स्थान शोधि वेगें ।
कामसूत्रकारकें मुनी जैसें । बोलिले तें पाहिलें स्थान तैसें ॥
१८५८ / गीति.
यापरि चिंतित बाळा माळा घेवोनि हस्तिं हस्तिवरा ।
झुरतां अस्थिच उरल्या ह्मणुनि ह्मणे आज मात स्वस्ति करा ॥
१८५९ / गीति
परदारागमनाच्या दोषा न धराचि भीति चाड अशी ।
घाला कंठिं मिठी मम तिष्टे मी हरि सुभिंतिआड अशी ॥
१८६० / गीति
ईश्वरसंकेत असा कीं मी तुह्मि एकदाचि एकान्ती ।
सांपडलो ह्मणुनीयां एकी तुह्मि लक्ष्मिकान्त मी कांती ॥
१८६१ / गीति
वात्सायन ह्मणती कीं काम जरी वाढला तरी वनिता ।
स्पष्ट न ह्मणती भोगा यापरि मी लाजयुक्त जी वनिता ॥
१८६२ / गीति
ह्मणो तुह्माला नाहीं संवय अशी तरि विरुद्ध हे वाटे ।
कांटे टाकुनि कितितरि केल्या प्रभु रुद्ध गोपिका वाटें ॥ (य९उ.४१३)
१८६३ / गीति



आतां मीनसाचि तळमळ जीवू मी न साहतें कामा ।
साहस करितां हे प्रभु कधिं आपण ह्मणुनि वारि ना कामा ॥
१८६४ / गीति
नाक न लावुनि नाकीं होउनि वश भावितीच ना कामा ।
ना कां मजला आतां करुनी दासीच भोगिता का मा ॥
१८६५ / गीति
मद गद स्वांग सुकवि परि पुष्ट करुनि कुच सुकंचुकी तोडी ।
गोडी वर्णिति सुकवि तें वर्णन हृदयबंधही तोडी ॥
१८६६ / गीति
खोडी करितां तुमची देति जसे अन्य गोपि गाऱ्हाणीं ।
तैसें मी नच करुनी कामबळें जाहले अगा राणी ।
१८६७
पद - लावणीचे चालीवर.
मदविव्हल लोचना ॥ राधिका ॥
अपदर कुचदर दरुनि मदनभर विनवि कुमदमोचना ॥धृ॥
मृगमदमुखगंधिका । ह्मणे पशुसमा मी धेनू तूं ये ज्यापरि नंदिका ॥
पद पुढति पुढति वंदि का ।
तें न स्मरुनि मरण रणीं घालिसि न धरुनी स्कंधिका ।
असु पावति संकोचना । वाचविं होउनि वैद्य तुला मी अर्पित तनुकंचना ॥
अन्या कवणा वरूं । तुजविणा सुना समय पाहुनी अजुनि मी मना किती सांवरू।
निद त्यजुनि उघड लोचना । तुज मिळवाया स्मरतें ज्ञानेश्वरसंसृतिमोचना ॥
मदविव्हल लोचना । राधिका० ॥
१८६८ / गीति
काम तुझा सुत ह्मणुनी जरि लाजसि त्यासमीप खेळाया ।
तरि तें न साहुनी मी सिद्ध तुझ्या सुमनशयनिं लोळाया ॥
१८६९ / गीति
बहु बहु विनवुनि राधा हिंपुटि होवोनि पोटिं अग्निं उभी ।
त्यावरि कोटि न करुनी हरि धरि रूपास यौवनाख्य प्रभीं ॥
१८७०
पाहुनि तरुण प्रभा ते भावबळें आकळोनि गोविंदा ।

मुग्धा धीट होउनी वंदि नीट हरि न मानुनी निंदा ॥ (य९उ.४१४)

१८७१

विकसित हरिमुख लज्जा मज्जित तलगलरतिरसरसित स्मिता ।
विस्मितेक्षण क्षपितधी नमुनि विदलि हाचि माततिमशमिता ॥

१८७२

स्वर्गी ज्यापरि रक्षी अमृतघट शक्र त्यापरी भुवरी ।
लावुनि द्वारकपाटें वरि हरिला राधिका स्वयें नवरी ॥

१८७३

नेणुनि वेदविधीतें विधिताता घालुनी स्वयें माळ ।
अविधी करुनि विधीतें वारुनि वारी निषिद्ध ही जाळ ॥

१८७४ / पद

अहो विधि ज्या पासुनि झाला ।
त्यास आराधुनि राधा न मनी विधी वरायाला ॥धृ.॥
निषेधीं भावहि नच आला ।
कामचि परि निष्कामकर ज्ञानेशकृपें झाला ॥

१८७५ / गीति

चंद्रें कलंक जाणुनि निजदेहा मग लपावया सदनीं ।
राधेच्या येउनियां निष्कल होवोनी राहिला वदनीं ॥

१८७६ / ओवी

चंद्रासी कलंक सर्वकाळ । येथें तव निष्कलतेचा सुकाळ ।
हें जाणूनि तत्काळ । डोळां काजळ लाविती ॥

१८७७ / श्लोक

असो होउनी थोर तैं कामताते । धरीली स्वयें पल्लवीं राधिका ते ।
बहू चुंबनें घेउनी देहलिंगी । नखें मारुनी ओष्ठिं तैं काम लंघी ॥

१८७८ / गीति

वदनोपरि वदनातें श्वासोच्छ्वासास एकता करुनी ।
प्राण न धरुनी साधिति प्राणायामास काम वोसरुनी ॥

१८७९

तो अंगसंग कैसा जैं जडला राधिकाहृदीं चिकसा ।



हरि तैं अंग चिकटलें येउनिंया श्वेद पल्लवीं पिकसा ॥

१८८०

पिकदानी नच घेउनि एकेका भिजविती स्व-पिकदानें ।
राधा जसि हरि तैसा जो भक्ता दुर्गतीस न कदा ने ॥

१८८१

पारदगंधकयोगें मात्रा होतांचि त्या सुधा पात्रीं ।
अहिगरळ पडे तेवीं आला अनया नसोनिही रात्री ॥

१८८२

राधे उघड कपाटें पहांटेपासूनि लागली भूख । (य९उ.४१५)
कावडि उतरुनि शिरिंची दे झडकरि अन्न व्हावया तोख ॥

१८८३

ऐकुनि हाक पतीची हा हा करुनी हरीप्रती बोले ।
हा करिवर पंचानन झडकरि होवोनि सानसा डोले ॥

१८८४

कृष्ण म्हणे तैं राधे भुललों मी मंत्र सान व्हायाचा ।
मज वाटे कीं आला तुज मज हा समय मार खायाचा ॥

१८८५

भांडीरवनीं पूर्वी दुर्वासें मज मनू असा दिधला ।
परि मंत्रान्य भुलोनी समय न जाणोनि जातसें विधला ॥

१८८६ / पद

राधिका म्हणे वैरिणी तुम्हा मी देवा ।
आज प्रसंग कैसा ओळखुनी हरि घ्यावा ॥धृ॥
हा काय करिल मी नेणें, अनया आतां ।
मज मारुनि आधीं प्रभु तुम्हि आपुल्या हातां ॥१॥
मग होइल ते मज नलगे नयनीं पाहतां ।
परि काय करूं ते हृदयीं व्यथा हि न साहतां ॥२॥

१८८७ / श्लोक

राधिका म्हणे विश्वचालका । होसि तूं सदा व्यर्थ बोलका ।
चूकलासि तूं मंत्र हें हरी । साच येइना माझियांतरीं ॥

१८८८

ओवी - तेव्हां हरी ह्मणे मातें । असत्य बोलावया निरुतें ।

कारण नसतांही रितें । खोटें कासया बोलेन ॥

१८८९

समय न पाहोनि जरी । बोलेन अनृतोत्तरीं ।
तरी मग चातुर्य मजवरी । रुसलें ह्मणावें ॥

१८९०

अशी ऐकोनी कृष्णवाणि राधा । पतीहातीं मानूनि मृत्युबाधा ।
कृष्णपायीं लागूनि ह्मणे हा हा । प्राण माझें आपुल्या पदीं वाहा ॥

१८९१

प्रभु तुह्मा वैरिणी मीच झालें । पूर्वी कैसें मज मरण नाहिं आलें ।
द्वाड कांत अरडोनि द्वारिं बोले । तुह्मा प्रीया मी व्यर्थ बद्ध केलें ॥ (य९उ.४१६)

१८९२

ओवी - इकडे हांकावरी हाका । अनया मारितांहि देखा ।
कांहीं न बोले राधिका । जगन्नायका मीनली ॥

१८९३ / गीति.

तेव्हां लोक मिळाले अनयासी ह्मणति काय रे झालें ।
येरु ह्मणे मम सदनीं न कळे कोणासि राधिका बोले ॥

१८९४

तेव्हां लोकहि ह्मणती कोणी तरि नष्ट भासतोचि खरा ।
फोडुनि द्वार गड्या रे वारिं त्वरें राधिकासुसुखनखरा ॥

१८९५

इकडे राधा तल्पकिं कल्पसमा प्राण अल्पसा करुनी ।
बोले विकल्परहिता जावें मी अल्पकालिं या मरुनी ॥

१८९६

तुमचें होइल कैसें ह्मणुनी झुरतें सदा प्रभूराया ।
सत्ता असेल जरि तरि जावें दवडुनि प्रसंग घोरा या ॥

१८९७

परि कांहिं न हरि बोले ऐसें पाहूनि राधिका बाळा ।
घेउनि अंगिं दुशाला असु न्याया प्रार्थि तैं महाकाला ॥

१८९८

ओवी - इकडे अनया फोडोनि द्वारा । येवोनि पाहे गाभारा ॥



तो पलंग टाकूनि निजदारा । निजली उदारा घेउनी ॥

१८९९

पाहुनि मंचकिं जोडा ओढी मग शाल पूर्ण क्रोधभरें ।
तों सौभाग्यवती त्या तल्पकिं भगिनीच दोघि नीदभरें ॥

१९००

पाहुनि अनया झाला विस्मयमय द्वारिं येउनी लोकां ।
सांगे कीं मम कान्ताभगिनी राहीच आलिसे देखा ॥

१९०१ / ओवी

तों राधिका उठोनि द्वारीं । लोकांसी ह्मणे पहा निर्धारी ।
गर्तीला शब्द लावुनी साचारी । जैसें गंगावारी निंदिले ॥

१९०२

मी लहानपणापासूनि राधिका । तुह्मां सकळां असे ठाउका ।
आज दिवस असोनी फुका । कैशा चुका करीन मी ॥

१९०३

परि हा गुराखी अनया जाणा । करोनि भलत्या अनुमाना ।
द्वाराचा विखळ करोनि ठाना । हास्यदाना मिळविलें ॥

१९०४ / गीति.

यापरि नाना चरिता करुनी हरि पावला स्वसदनातें ।
त्यासी कांत असे मम ज्ञानेश्वरसंमती असो नातें ॥

१९०५ / अभंग

गुरुकृपा ग्रास करोनी सायास । राधिकाविलास वर्णियेला ॥१॥
प्रेमभावें त्याचें करीती पठण । अथवा श्रवण जे करीती ॥२॥
दोघांहीतें मिळे पूर्ण कृष्णभक्ति । विज्ञान विरक्ति जन्मोजन्मीं ॥३॥
ज्ञानेश्वरचरणी करुनी समर्पण । शेखीं सर्वजण हरी बोला ॥४॥

०००

०

आख्यान ५ वे

# उलूखलबंधन

यमलार्जुनोद्धारवर्णनम्.

॥श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

१९०६ / पद

नमिला श्रीगणनायक हा ॥धृ.॥

पाशांकुशधर मूषकवाहन । मंगलदायक हा ॥ नमिला ॥१॥

ज्ञानेश्वर करुणाघन सद्गुरु । गणपति निजसुख हा ॥ नमिला ॥२॥

१९०७ / गीति

वंदुनि ब्रह्मकुमारी मारीचहते द्वितीय अवतारीं ।

तारित भक्तजनांते लीला करुनी असीम भवतारी ॥

१९०८ / गीति

त्या लीला वर्णाया नायक गणनायिका सुखें नमिली ।

जीच्या करुणेनें मम मति हरिचरणींच सांविया रमली ॥

१९०९ / गीति

ते ज्ञानेश्वर श्रीगुरु गुरुतर भेदोनि संसृतीकुवना । (य९उ.४१८)

दिधलें अभय जयानें मज त्या वंदोनि साधिते कवना ॥

१९१०

रा.-यमन. ता.-तेताला.

करि मना संतपदाम्बुज जोड ॥धृ.॥

फणिमणिसम कांचन कामिनी हे । कांहिं न वाटो गोड ॥ करि०॥१॥

वास नसोनी वासनासुखें । लागलि तुज भवखोड ॥ करि मना ॥२॥

विषयशयन मृगनयनी सांडुनी । मुनिसेवे हो रोड ॥ करि मना ॥३॥

ज्ञानेश्वरगुरुपाय स्मरुनियां । षड्‌रिपुसंगति सोड ॥ करि मना ॥४॥

१९११ / साकी

रक्षाया निजगदित श्रुतिकथित धर्मा गोकुळिं आला ।

गोपिमंदिरीं राहुनि कवतुक करि नानाविध लीला ॥

१९१२

नंदसदनिहुनि कोणे एके समयीं बिदिवरि खेळायाला ।



निघोनि हरि मग पथ चुकवुनियां गृहिं एकिचिया आला ॥

१९१३

पाहुनि ती एकटीं सुंदरी पदरिं धरुनि तैं बोले ।

दिधलें मज तव बापें सखये घेउनियां बहु मोलें ॥

१९१४ / गीति

ऐकुनि वचना वदली नष्टा न करी कधीं तुझ्या कष्टा ।

भवरुष्टा तारिसि तूं परि नच मी इच्छितें विभवतुष्टा ॥

१९१५ / दिंडी.

हरी बोले तेधवां ऐक नारी । आलि संपत्ती जाइल ही सारी ।

गर्वयोगें ना स्वीकरिसी मातें । परी तनुची वार्धक्य वरि सिमा तें ॥

१९१६

सर्व माझें मंदीर जाण बाळे । तुला घ्याया आलों मी प्रीतिमेळें ।

त्वरें येऊनी साधिं अंगसंगा । मिळें होवोनि शुद्ध ब्रह्मरंगा ॥

१९१७ / गीति.

गोष्टी कथिसी हरी परि दृष्टि नसे वाटतें तुझीच बरी ।

जबरी करसी मज तुज नेतें मी जननिघरिं करीं सबरी ॥

१९१८ / ओवी.

ऐसें बोलतांचि कामिनी । परि तें कांहीं हरी न मानी । (य९उ.४१९)

मडक्यांतील दही घेउनी । मिटक्या देउनी भक्षितसे ।

१९१९

तेव्हां बाळा आरडोनी । ह्मणे सर्व भक्षिसी लोणी ॥

बहू त्रासला जीव तुझेनी । जाई सदनीं आपुल्या ॥

१९२० / गीति.

ऐकुनि ऐसा कल्ला भल्लातकवत् वरी मनीं सदया ।

गोपी साधुनि पल्ला करुनि सला बांधिती कला हृदया ॥

१९२१ / हिंदी

गोविंद गोद लेकर आई सब पवति नंदजुवति जहां ।

कहती सहति न जननी हम किन्हे अपराध अनेन महा ॥

१९२२

पाही निजजवदनपर सदनदधी भक्षुनी न लक्षि कसा ।

चिकसा झोंबी घेउनि गोपीसी सोडि बंद जोड कसा ॥

१९२३

रा.- यमन कल्याण. ता.- तेताला.

पाहुनी माय तदा वदली ॥धृ॥
काय राजसा केलें त्वा हें । सोडुनि गृहकदली ॥ पाहुनी ॥१॥
बोले हरि दहि हिनें भक्षिलें । करुनी मम बदली ॥ पाहुनी ॥२॥
माय ह्मणें तूं ऐशिच करिसी । गोकुळिं रदबदली ॥ पाहुनी ॥३॥
ज्ञानेश्वरजामातजननि ती । हरिला धरु सुदली ॥ पाहुनी ॥४॥

१९२४ / गीति.

तैं नंदराणि हरिला निंदुनि गोपीस बोलली वाणी ।
आणी दावें झडकरि बांधिन या अंग ज्यापरी बाणी ॥

१९२५ / चौपाई / हिंदी

सुनि सुनि तब जसुमतिकी बाणी । गोपी भई प्रणय प्रीति लानी ।
उत्तम कहकह न सह वियोगा । देत जननिकर जेवरि तागा ॥

१९२६ / संस्कृत श्लोक.

यस्योदरान्तरे साक्षात्, सन्ति ब्रह्माण्डकोटयः ।
यतन्ते तद्बंधनार्थ यशोदाप्रमुखा स्त्रियः ॥ (य९उ.४२०)

१९२७ / सवैया.

आवळि लावुनि दोर कटींपरि तो नच ये हरिला पुरता गा ।
पाहुनि माय ह्मणे मग गोपिस आणुनि दे दुसरा मज तागा ॥
घेउनि बांधित तोहि तसा मग घे तिसरा अति संभ्रम रागा ।
यापरि लावित दोर बहू परि नाकळतो श्रुतिवन्मननागा ॥

१९२८ / ओवी.

ऐसें नवलक्ष लाविलीं दावें । परी द्वयंगुल उणेचि यावे ।
मग मनीं चिंतिलें वासुदेवें । कीं बांधो द्यावें मायेसी ॥

१९२९ / अभंग.

पुन्हा एक दावे घेउनिया माय । लावितसे स्वयें पुरवणी ॥१॥
पुरलें तें दावें उखळासी तेव्हां । आवळूनि देवा बद्ध केलें ॥२॥
चित्तीं प्रेम गांठीं गांठीं देत माय । सर्व होय-जाय ज्या पासूनी ॥३॥
तयाला बांधोनी गृहीं गेल्या नारी । यशोदा गाभारीं गेली कामा ॥४॥
ज्ञानेश्वर गडी पाहुनिया वेळ । ओढित उखळ हळु हळू ॥५॥



१९३०

उखळा बांधुनि हरी । प्रणयबद्ध होउनी, पातल्या गोपसुंदरा घरीं ॥धृ॥
बोलति एकेकिला । बाई आपुल्या गाऱ्हाण्यानें श्रीकरधर अडकिला ॥
बाई आतां हे जिणे । काय ठेवुनी कुणप समानचि वाटे [१] गे हरिविणें ।
ज्ञानेश्वर करुणाबळें । भाग्य उदय होउनी दृष्टि तरि पडल रूप सांवळें ॥

*(१. पाठांतर : मदनदहनप्रियविणें, किंवा स्मरहरप्रियकरविणें.)*

१९३१

ज्याच्या आह्मि राणी आह्मि राणी । नेली तत् गाऱ्हाणीं ॥धृ॥
आह्मी प्रेमें जो वंदावा । तो उखळीं बांधावा ॥ ज्याच्या०॥१॥
धिग्धिग् जीवन हें आमुचें बाई । जडलों नच हरिपायीं ॥ ज्याच्या० ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या गुरुकृपें । चिंतिति हरि अनुतापें ॥ ज्याच्या०॥३॥

१९३२ / ओवी

जिनें कडिये नेला हरी । सकळ तुटूनि पडल्या तीवरी । (य९उ.४२१)
ह्मणती कां गे पतिव्रतासुंदरी । तूंच कां आजवरी राहिलीस ॥

१९३३

जो पतीचाही पती । तया आणूनि विपत्ती ।
आतां प्रेतसमा संपत्ती । भोगाया प्राप्ति बरी तुज ॥

१९३४

असो इकडे कथानुसंधान । हरी मांडुनी विंदान ।
उखळा ओढीत ओढीत जाण । बाह्यांगण पावला ॥

१९३५ / गीति.

त्या स्थळिं यमलार्जुन ते दोन्ही तरु पाहुनी जगद्गुरु तो ।
संधीं ओढि उखळ जो चिंती दासा कधीं न शस्त्र रुतो ॥

१९३६

रा.यमन. ता.-तेताला.

नये जना कळुनी ॥ लीला ज्याची ॥धृ०॥
यन्नामामृत सेवितची शिव । विष गेले गळुनी ॥ लीला ज्याची ॥१॥
तो प्रभु द्रुमसंधींतुनि ओढित । उखळ आकळुनी ॥ लीला ज्याची ॥२॥
उखळ बळें अडकवितां पडलें । तरु ते उन्मळुनी ॥ लीला ज्याची ॥३॥
ज्ञानेश्वरजामातस्मरणें । जाये भव जळुनी ॥ लीला ज्याची ॥४॥

१९३७ / गीति.

तेव्हां त्वरित निघाले वृक्षांतुनि नरशरीरधृत दोघे ।
वेगें स्तविती त्या कर जोडुनि गोपी कडेवरी जो घे ॥

ओवी. / १९३८

जय जय जी करुणाकरा । परमानंदा रमावरा ।
गुणानिधाना स्वानंदकरा । परमोदारा तुह्मां नमो ॥

१९३९

जय जय जी अजरामरा । अखिल अमल निर्विकारा ।
प्रणववाच्या परात्परा । ब्रह्माकारा तुह्मां नमो ॥

१९४०

नमोजी अनंतकल्याणनामा । नमोजी परममंगळधामा ।
नमो वासुदेव पूर्णकामा । शांतिग्रामा प्रेममूर्ति ॥

१९४१

नमो नमो जी यादववर्या । नमो नमोजी प्रतापसूर्या । (य९उ.४२२)
नरवेशधारक देवकार्या । कारणकार्यापरा नमो ॥

श्लोक -

वाणी गुणानुकथने श्रवणौ कथायां । हस्तौ च कर्मसु मनस्तव पादयोर्नः ॥
स्मृत्यांशिरस्तव निवास जगत्प्रणामे । दृष्टिः सतां दर्शनेऽस्तु भवत्तनूनाम् ॥

(भागवत. दशमस्कंध अध्या. १० श्लोक. ३८)

१९४२

ओवी - प्रभू आह्मी तुझे किंकर । यक्ष नाम नल-कूबर ।
नारदशापें साचार । वृक्षदशा पावलों ॥

१९४३

परी तुमच्या कृपें आतां । आह्मी उद्धरलों रमानाथा ।
करीं धरोनी अह्मां अनाथा । निजभक्तिपंथा लावावे ॥

१९४४ / श्लोक

हे मूरमर्दन हरे करुणार्द्रसिंधू । त्वज्जन्म दानवविनाशक दीनबंधू ॥
ठेवोनि हस्तक शिरीं आमुच्या दयाळा । वारी सख्या अक समस्तहि विश्वपाळा॥

१९४५ / अभंग

तेव्हां हरी ह्मणे ठाऊक साचार । विषयांध फार तुह्मी होते ॥१॥
ह्मणूनी शापिलें नारदें कृपाळें । अनुग्रह काळें लक्षुनीया ॥२॥



गंगेंत मरण जैसें मोक्षदाते । तैसाऽनुग्रह होते संतशापें ॥३॥
आतां तुह्मी जावें आपुल्या मंदिरीं । मद्भक्ति सुंदरी ठेवा चित्तीं ॥४॥
ज्ञानेश्वरमित्र वाक्यातें ऐकुनी । गेले ते निघोनी उत्तरेला ॥५॥

१९४६

ओवी - इकडे नंद आला घरीं । तों वृक्षसंधींत देखिला हरी ।
हांक फोडोनि म्हणे गजरीं । धांवा श्रीहरी चेंदला ॥

१९४७

ऐसी ऐकोनिया हांक । आंगणीं मिळाले सर्व लोक ।
यशोदा काम सांडोनि सकळिक । रडत द्वारीं पातली ॥ (य९उ.४२३)

१९४८

उभा पाहुनी श्रीहरी । धांवुनी घेतला कडेवरी ।
तों मिळूनी गोपनारी । निंबलोण उतरती ॥

१९४९

पद / रा.- जोगी. ता.- तेताला.

बाई मज हें न कां कळलें ॥धृ.॥
श्रुतिसिद्ध हरी उखळिं बांधिता । कर कां ग नच जळले ॥१॥
ऐकुनि गोपीवचन हलाहल । कां मम मन चळलें ॥ बाई ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु श्वसुर म्हणुनिया । रक्षिति हें कळलें ॥ बाई ॥३॥

१९५०

ओवी - नंदे देवोनि आलिंगना । ह्मणे बहु भाग्यें वाचला तान्हा ।
मग भांडारें फोडोनि जाणा । वित्त ब्राह्मणा वाटले ॥

१९५१ / अभंग.

पूर्वी तेथें होतीं लेंकुरें जीं कांहीं । त्यांनी दिली ग्वाही ऐसी तेव्हां ॥१॥
उखळ ओढोनी हरीनें सांध्यांत । बळानें बहुत ओढियलें ॥२॥
तेणें दोन्ही वृक्ष गेले उन्मळून । पुरुष त्यांतून निघाले कीं ॥३॥
ते बोलोनी कांहीं गुप्त झाले माय । ठाउक हें आहे वृत्त आह्मां ॥४॥
परी बालबुद्धि न मानोनी माता । उतरी तत्वता निंबलोण ॥५॥
सकळ गोकुळ रक्षिती प्रेमानें । जया श्रुति माने समन्वय ॥६॥
ज्ञानेश्वरमित्र प्रेमाचा पुतळा । सर्व गोपबाळा कांता ज्याच्या ॥७॥

१९५२ / अभंग.

उखलबंधन सुंदर आख्यान । श्रवण पठण करिती जे ॥१॥
तयावरी नारायण कृपा करी । भवांतूनि तारी क्षणमात्रें ॥२॥

देउनीया भक्ति ठेवी पायापाशीं । सच्चेतनोल्हासीं मेळवूनी ॥३॥
समर्पूनी काव्य ज्ञानेश्वरपायीं । तोचि बाप आई वंदूं सदा ॥४॥

**(य९उ.४२४)**

०००
०

आख्यान ६ वे

# यज्ञपत्नींचे आख्यान

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

१९५३

ओवी - हरिविरहदुःखे करुनि जाणा । जिहीं त्यागिले कल्मष नाना ।
ध्यानीं धरुनि वैकुंठराणा । पुण्य निर्वाणा त्यागिलें ॥

१९५४ / संस्कृत श्लोक

पुण्यपापविनिर्मुक्ताः गौप्यः कृष्णपदान्विताः ।
जहुर्गुणमयन्देहमित्युक्तेर्मुक्ततां गतिः ।

१९५५ / हिंदी

करो जन हरि-पग-लीला-गान ॥धृ॥
महावाक्यनसे ज्ञान भयेतें । मत लाओ अभिमान । करो जन०॥१॥
जो जो नयनतें देखत हो तहां । करिये हरिमुखपान । करो जन०॥२॥
अलकावतिपतिसुता-बिनतिको । सुन मारो मद-मान ॥ करो जन०॥३॥

१९५६ / श्लोक.

जसें ऐकिलें श्रोत्रसंबंध देवा । तसें पाहती सर्व त्या वासुदेवा ।
सदा सर्वदा चित्तिं जो नाथ होता । पुढे त्या न लज्ञा तया शरण जाता ॥

१९५७

लावणीचे चालीवर.

कात्यायनिव्रत करुनि सुंदरी पावुनि हरि करवरा ।
गतगृहीं बोले हरि तरुवरा ॥धृ॥
हे अंशो हे कृष्णस्तोक श्रीदामन् सुबलार्जुन ।
शोभवीताहे वन कां जुन ।
हे उपकार करूनि जनाते पोशिति बहु करवरा ॥ गतगृहीं ० ॥१॥



असो या परी यमुनातीरीं सुरभिनीर पाजुनी ।
धरिति मग वाट नगरिची जुनी ।
तैं गोपमुलें क्षुधाक्रांत वदति वृषभानुजा वरा ॥ गत० ॥२॥
‘हे भगवन् ही क्षुधा बाधते पितां न जाये दुधा । देउनी अन्न वारि आपदा ।
ऐकुनिया गडिवचनरचन हरि वदे ‘माग द्विजवरा’ ॥ गत०॥३॥
अलकावतिपतिसुताकांतमुखवाणी मानुनि वरा ॥ गत०॥४॥ (य९उ.४२५)

१९५८ / गीति

यापरि हरि वदतां ते हरिमुखगत हरित हरिजना हरिसे ॥
जाउनि ह्मणती द्या कीं करिवरपंचानना सुसद हरिसे ॥

१९५९ / श्लोक

अशी ऐकुनी कृष्णवक्त्रोक्त वाणी । त्वरें बोलती जाउनी बद्धपाणी ।
नमोस्तु द्विजेभ्यो वनीं कृष्णनाथा । क्षुधा लागली अन्न द्या शीघ्र आतां ॥

१९६० / पद

क्षुधित वनीं यदुनाथ ॥ गडे हो ॥धृ॥
ज्याला यजिती युष्मत्सम जन । भरुनि हविर्ष्यीं हात ॥ गडे हो ॥१॥
त्यालाची लागली क्षुधा की । द्या एकहि तरि पात[1]॥ गडे हो ॥२॥
अथवा नाहीं तरी ह्मणावें । देइल ज्ञानेश्वरतात ॥ गडे हो ॥३॥ (१. पात्र)

१९६१ / गीति.

मी कर्ता हें मानुनि जाणुनिही विप्र जाहले मूढ ।
ह्मणुनि न बोलति कांहीं नाहीं ह्मणणेंहि ठेविलें गूढ ॥

१९६२ / अभंग.

ज्योतिष्टोमयागीं न घे अवदान । मागे अन्नदान विप्रासी तो ॥१॥
यज्ञपत्नि प्रीतीं आणोनिया मनीं । मागत ब्राह्मणीं धिःकारिला ॥२॥
असो गोपबाळ नंदबाळापाशीं । सांगती निःशेषी जाहले जे ॥३॥
ऐकोनियां कानीं कांत इंदिरेचा । बोलतसे वाचा गंभीरत्वें ॥४॥
ज्ञानेश्वरकन्याकान्ताची आवडी । द्विजकान्ता ओढी प्रेमबळें ॥५॥

१९६३ / पद.

ऐक सख्या यदुराय ॥ प्रभुरे ॥धृ॥
दर्शन आमुचें झाले ह्मणुनी । विप्र धुती मुख पाय ॥ प्रभुरे ॥१॥
एक ह्मणति कृष्णे हें गोकुळ । भ्रष्टविलें हाय हाय ॥ प्रभुरे ॥२॥
देऊं न देऊं कांहिं न वदती । स्मरती त्रिपदा गाय ॥ प्रभुरे ॥३॥
ज्ञानेश्वरकृपेविण द्विज हे । वौषट् करिती काय ॥ प्रभुरे ॥४॥(य९उ.४२६)

१९६४ / गीति.

निज जनवाणी कानीं ऐकुनि हरि वदत एक ऐकावें ।
मागा द्विजपत्नींना मज विषयीं त्या न जाणती कावे ॥

१९६५

देतील अन्न मातें मातेसम आणुनी असाचि मला ।
नेतील प्रेमसदनीं परि विप्रांचा भाव असाचि मला ॥

१९६६

ओवी - अगा सकल कर्मांचा संन्यास । हेंचि मूळ माझिया भक्तीस ।
कर्माधिकार नाहीं द्विज पत्नीस । झाला संन्यास अनायासें ॥

१९६७ / अभंग.

देतील त्या अन्न मज भरंवसा । जावें पत्नीवसा एकवेळ ॥१॥
माझ्या साठीं जिहीं धरियेले प्राण । त्या साठीं मी जाण व्रजीं आलों ॥२॥
जीवें भावें ज्यांना माझीच आवडी । विषयांची गोडी नेणताती ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या सर्वही पवित्र । जावें नंदपुत्र ह्मणे तेथें ॥४॥

१९६८ / गीति.

हरिनें पाठविल्यावरि नारीसदनास गोप जाउनी ।
नमुनी ह्मणती हरिला तुष्टकरा शीघ्र अन्न देऊनी ॥

१९६९ / अभंग.

पत्निशाळेप्रति गेले गोप जेव्हां । पाहियले तेव्हां अघटित ॥१॥
स्वाहा स्वाहा ऐसें करीती ब्राह्मण । पाकसिद्ध जाण सर्व झाला ॥२॥
रितीवेळ पाहुनियां द्विजजाया । मनीं कृष्णपाया आठविती ॥३॥
तुळसीच्या माळा घेउनियां करीं । मंत्र बाराक्षरीं ध्याती मनीं ॥४॥
ध्यातांचि गोविंद गोविंदाचे गडी । घालत फुगडी पावले ते ॥५॥
संत ओळखिती संतांचिया खुणा । ह्मणूनी चरणा नमिताती ॥६॥
विप्रपत्नी तुह्मां असो नमस्कार । वनीं क्षुधातुर नारायण ॥७॥
ज्ञानेश्वरकन्या तुह्मी प्रेमभरी । द्यावें झडकरी अन्न कृष्णा ॥८॥

१९७० / पद.

नंदतनय क्षुधित बाई अन्न मागतो ।
विप्र ह्मणति आह्मि त्याचें काय लागतो ॥धृ॥ (य९उ.४२७)
ह्मणुनि पाठविलों आह्मिं तुमच्याकडे ।
अन्न देउनियां घ्याहो प्रेम रोकडें ॥ नंदतनय ॥१॥



देत अन्न जो जनास तो तुह्मां जना ।
मागुनियां अन्न करवि विष्णुयाजना ॥ नंदतनय ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या तुह्मि परम प्रेमळा ।
हृदयिं धरा नंदसुता टाकुनी मळा ॥ नंदतनय ॥३॥

१९७१ / कटाव.

गोपवचन ऐकुनियां बाळा । टाकुनि सकळहि करिंच्या माळा ।
घालति हृदयीं शांति सुमाळा । मनिं प्रेमाचा अतिच उमाळा ।
अनुतापें उठताती ज्वाळा । ह्मणति क्षुधा लागलि गोपाळा ।
देउंचि अन्न यशोदा बाळा । भरूनियां मग कंचनथाळा ।
चाला ह्मणती परी । तोषवूं देउनि अन्न श्रीहरी ।
कर्म धर्म भ्रम सकळहि सांडुनि चला द्विजसुंदरी तोषवूं ॥१॥

१९७२ / संस्कृत

पत्न्यः ऊचुः -

यदा नंदगृहे साक्षात् अवतीर्णो जगत्पतिः ।
तदाऽशोचमयात् स्त्रीभिर्न दृष्टो भगवान्स्वयम् ॥१॥

१९७३ / संस्कृत

तस्मादन्नमिषेणास्मिन्नरण्ये कृष्णदर्शनम् ।
गृह्णाय वयं गन्तुं योग्याः सर्वार्तिहेतवः ॥

१९७४

ओवी - बाई नंदगृहीं अवतरला हरी । तेव्हां जननाशौच मानुनी साचारी ॥
पहावया आह्मीं नारी । गेलों नाहीं सर्वथा ॥

१९७५

वर्णयाती अभिमान थोर । हरि अयोनिसंभव अवतार ।
न करोनी याचा विचार । गृहीं साचार राहिलो ॥

१९७६

ह्मणोनि आतां तरी सकळीं । अन्नमिषें वनमाळी ।
सांडोनि पतिपुत्रादि धुमाळी । गोपमंडळी पाहुं चला ॥

१९७७ / गद्य.

यापरी बोलोनि द्विजकामिनी । अन्नाचे हारे भरोनी ।
मनीं मान न धरोनी । सुगुणी वृत्ती लावुनी । (य९उ.४२८)
ह्मणोनि हरिचरणीं । शीर ठेऊं चालिल्या ॥

१९७८ / गीति.
हारे घेउनि नारी जाती लगबगचि काननावाटे ।
तों एका गोपीच्या आलें दुर्दैव तेधवां वाटे ॥
१९७९ / ओवी.
सकळही पुढें गेल्या निघोनी । एकीनें जावें हारा उचलोनी ।
तों तिचा पती पाकशाळेत येउनी । ठेवी रोधोनि स्त्रियेतें ॥
१९८० / गीति.
रंडे कोठें जाशी देसी मिष्टान्न काय जारा या ।
कां बहु धगडी झालिस होसी कां पात्र व्यर्थ माराया ॥
१९८१
श्रुति ह्मणती नारीला पति दैवत तेंहि मोडुनी आज्ञा ।
काय अगे गणिकेची पावसि हरिजवळि जाउनी संज्ञा ॥
१९८२
सप्तपदीची वाणी स्मरशि मनिं कांहिंतरी अजूनि गडे ।
धर्म अर्थ कामाचा आश्रय मी जाण हें मनीं उघडें ॥
*''धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि'' - इति वाक्यात् ।*
१९८३
ओवी - तैं बोले विप्रदारा । ह्मणे आयका जी भर्तारा ।
धर्म अर्थ आणि काम निर्धारा । तुम्हांप्रति नेमिले ॥
१९८४
परी मोक्ष पाहतां जाणा । तुमचा आश्रय नाहीं सगुणा ।
तो मोक्षदातिया जगन्मोहना । कडेचि असे ॥
१९८५ / गीति.
श्रुतिसंमतिनें ऐसी वदतां दारा सकोप द्विज वदला ।
ज्ञान सांगसी मज गे करूं पाहसी तूं स्वकांत कीं बदला ॥
१९८६ / अभंग.
यापरी बोलोनी तेव्हां द्विजराय । बांधी हात पाय दृढ तिचे ॥१॥
वेताटी घेउनी देत असे मार । ह्मणे तुझा मार काढितों मी ॥२॥(य९उ.४२९)
सकळ गोकुळ बुडविलें ज्यानें । त्यासी अन्न देणें अनुचित ॥३॥
नष्ट तुह्मी नारी पूतनारी जाया । पूत नारी व्हाया पात्र कैंच्या ॥४॥
ज्ञानेश्वरकृपेंवीण विप्रवाणी । न साहोनि वाणी पत्नी बोले ॥५॥



१९८७ / गीति.
वेदीं वदलें ऐसें कीं तुमचा देह हा पतीराया ।
तरि तो जतन करावा ऐसें बोलोनि सांडिली काया ॥
१९८८ / ओवी.
ऐसें पत्नी बोलतांही । परी द्विजाचे लक्ष नाहीं ।
बांधोनियां लवलाहीं । गेला निघोनी मखशाळे ॥
१९८९ / पद
धन्य धन्य मावली ।
हरिविरहज्वाला नाहिं जिच्या निजहृदयीं मावलीं ॥धृ॥
नंदतनय पावली ॥ स्मरतां धावलि प्रतिपावली ।
तशिच अति नंदतनय पावली । विषया जे कावली ।
ह्मणुनिच कीं हरिनाममाळ करिं, कंठीं एकावली ॥
बैसलि जी मावली[1] ॥ हरिविरह ज्वाला० ॥१॥
शांतिसुखा सावली । होउनि हरिसह रासिं राहिली ।
न गणुनि मासावली । गुणमय दुरमावली[2] ।
त्यजुनि, भक्तिबळसुधा सेवुनी, चित्सुखिं सामावली ॥
पुज्य ज्ञानेश्वरमावली ॥ हरिविरह ज्वाळा ०॥२॥
(१.लक्ष्मी / २. अवदसा.)
१९९०
ओवी - मग ब्राह्मणापाशी जाउनी । बोलतसे ऐसिया वचनीं ॥
बांधूनि ठेविली आपुली कामिनी । ह्मणोनियां मनीं हर्ष भरें ॥
१९९१ / अभंग.
बोलत ब्राह्मण कां करितां याग । साधावा कीं योग संन्याशाचा ॥१॥
भोगूं गेल्या स्त्रिया गोवळ्यासी आतां । कासया करितां खटपटी ॥२॥
ज्ञानेश्वरकृपेंवीण मूर्खवाणी । हरीवरी आणी व्यर्थ दोष ॥३॥
१९९२ / ओवी
आपली थापटोनि मांडी । ह्मणे माझी स्त्री पतिव्रता गाढी । (य९उ.४३०)
माझिया वचनें सुरवाडी । बंधन कवाडी राहिली ॥
१९९३
सकलांसी ह्मणे घ्यावा संन्यास । मजचि अधिकार एक होमास ।
माझी स्त्री पतिव्रता निःशेष । स्तंभा बांधिली असे कीं ॥
१९९४

मग विप्र ह्मणतीरे ब्राह्मणा । आह्मां दाखवीं येच क्षणा ।
गेली असेल सोडोनि जाणा । स्त्री समाजीं आमुच्या ॥
१९९५ / गीति
कुलपें तोडुनि सोडुनि निजनारी नारिहीन त्या बोले ।
कीं हे रागें भरली अजुनी मजसीं न कांहिं कां बोले ॥
१९९६ / ओवी.
मग ह्मणे तूं उघडीं लोचन । तुझें केलें बंधमोचन ।
आतां कांहींही सोच न । चित्तीं करीं ॥ (सोच=विचार)
१९९७ / अभंग
घडवीन तुज बहु अलंकार । तुह्मिं आह्मिं पार यज्ञ पाऊं ॥१॥
उठ प्रिये करीं मजसी भाषण । हात मुखाहून फिरवुं लागे ॥२॥
तव श्वासोच्छवास न दिसती कांहीं । जाहला शोकांहीं तप्त मग ॥३॥
ह्मणे माझें भाग्य फुटलें कीं आतां । अशौच्य तत्वतां आहे मज ॥४॥
बांधिताचि पत्नी मरोनियां गेली । काय ऐसी केली दशा इची ॥५॥
ज्ञानेश्वरकन्या नाहींच प्रबळ । मग कां तुंबळ कटकट ॥६॥
१९९८ / ओवी
मग बोलती द्विज समस्त । तूं दृष्टीनें तरी पाहसी प्रेत ॥
आमुच्या स्त्रिया निश्चित । गोंवळ्या लागीं लंपटल्या ॥
१९९९ / श्लोक.
असो ईकडे सर्वही पूतनारी । पुजाया वनीं पातल्या पूतनारी ॥
जसा पूर्वी चित्तांत होता सुकाम । तसा दृष्टिनें पाहिला पूर्णकाम ॥
२००० / पद
धेनुप मंडळिमाजिं धेनुपा पाहुनि द्विजसुंदरा । (य९उ.४३१)
ह्मणति जनीं या योग्य एकचि नारि असें इंदिरा ॥धृ॥
न्यावें कैसें हरिला उचलुनि आपुलिया मंदिरा ।
ज्ञानेश्वर करुणाघन वळतां मग प्रसादचि दरा ॥
२००१ / ओवी.
गोपाळमंडळीत गोपाळ । पाहुनी विप्रपत्नी सकळ ।
ह्मणती यशोदेसी नाहीं कळकळ । वनीं घननीळ पाठविला ॥
२००२
येथें नसत्या जरी आमुच्या शाळा । तर कोण अन्न देतें यदुपाळा ।



बाई माये वांचूनि कळवळा । कोण पाळी ॥
२००३ / गीति.
तरि आतां आपणची माता होवोनि चारूं त्या अन्नें ।
सोडुनि हरिपदकमळा कधिं न करूं साधनें गडे अन्यें ॥
२००४
अथवा श्रीहरिकंठी घालुनियां माळ त्याजलाचि वरूं ।
पुढती गृहि जाउनि कधि आतां विप्रसेवना न करूं ॥
२००५
ऐसा निश्चय करुनी येउनि वनि वंदिती सुगोपपदा ।
ह्मणती हे यदुपाळा पाणी घेउनि वारि ही अपदा ॥
२००६
तेव्हां यदुपति बोले स्वागत तुमचें असो, अहो या या ।
मत्पदिं भाव धरोनी केलें मनधैर्य या वनीं याया ॥
२००७ / अभंग.
मग सकळही मिळोनिया बाळा । अन्ने नंदबाळा समर्पिती ॥१॥
सकळी लावूनी हातालागीं हात । देती हातोहात ग्रास मुखीं ॥२॥
हात भवभव प्रियालागीं तेव्हां । ह्मणताति जेवा जेवा देवा ॥३॥
देव ह्मणे देवा न मिळे जे अन्न । सेवुनी पक्वान्न तृप्त झालों ॥४॥
आतां तुह्मीं जावें आपुल्या मंदिरा । मन्मोक्ष इंदिरा भोगाल कीं ॥५॥
ज्ञानेश्वर जामात ऐसें बोलता । कोमेजल्या लता उष्णें जैशा ॥६॥
२००८ / दिंडी.
प्रेमबद्ध होवोनि सर्व बाळा । ह्मणति देवा सांभाळि विश्वपाळा ।
जहीं आह्मी आलोजी येथ देवा । धरोनियां तुमचीच मनीं सेवा ॥
२००९
जहीं येथें पातलो आम्हि नारी । तदा रेषा फाडिल्या गृहद्वारी ।(य९उ.४३२)
पाठवीणें परतोनि तुम्हां आतां । उचित नाहीं हें पहा गोपिनाथा ॥
२०१० / अभंग
येथेंचि आमुचा करोनिया वध । बोलणें हे स्तब्ध करा देवा ॥१॥
गृहीं जरी गेलो आंता परतोनि । तरी आह्मा कोणी न घेतील ॥२॥
पतिपुत्रादिक सर्व सांडोनियां । प्रेम मांडोनिया येथ आलों ॥३॥
तरी आम्हा ठेवा आपुल्या चरणी । अथवा या रणीं मुक्त करा ॥४॥
ज्ञानेश्वरबाळा बोलतां ही वाणी । झाला शार्ङ्गपाणी सद्गदित ॥५॥

२०११ / ओवी.

मग संतोषोनि बोले वाणी । ह्मणे तुह्मी जावें आपुल्या सदनीं ।
तुमचे पती गुण वर्णुनी । तुह्मासचि स्तवितील ॥

२०१२

अंतीं तुह्मी सकळ बाळा । पावाल माझिया पदकमळा ।
आणि तुमचे पती हीनकपाळा । घेउनी जन्ममरणमाळा भोगितील ॥

संयोगाहून वियोग उत्तम

वामनपंडितांचा श्लोक -

घडे भक्ति जैसी मनाच्या प्रसंगें । न साधे तशी माझिया अंगसंगे ।
मनीं ध्या मला शीघ्र पावाल मातें । स्मरा अंतरीं सर्व सर्वोत्तमातें ॥

२०१३ / ओवी

हा पंचभूताचा देह जाण । तयाचा अंगसंग करिता पूर्ण ।
माझा भौतिक देह नव्हे ह्मणून । भक्ति कल्पांतीं साधेना ॥

२०१४

मन तें चैतन्य मायामात्र । आणि माझा अवतार चैतन्यचि पवित्र ।
ह्मणोनि मनाचा संग निर्धार । भक्ति वाढवील तुमची ॥

२०१५ / अभंग.

वियोग राहतां प्रेमाचें लक्षण । जाय क्षणक्षण कल्पा ऐसा ॥१॥
अन्यथा तें सुख न मिळे कल्पांती । करिता संगती माझीही कां ॥२॥
वियोगाचें दुःख अत्यंत भोगता । प्रारब्धाची सत्ता तेही उडे ॥३॥
शांडिल्याची वाणी स्मरोनी अंतरीं । जावें तुह्मी घरीं प्रेमभरें ॥४॥
तुह्मासवें द्विज करितील याग । परी पुण्यभाग तुह्मां मिळे ॥५॥
माझ्या भक्तां मिळे पुण्याचें सुकृत । इतरा दुष्कृत पापफळ ॥६॥
ज्ञानेश्वरबाळा तुह्मीं घरीं जावें । अंतरीं ते न्यावें मजला ही ॥७॥

(य९उ.४३३)

२०१६ / गीति.

श्रीहरिवाणी ऐकुनि आल्या सदनास सर्वही नारी ।
पाहुनि प्रेम तयांचें वंदिति चरणास द्विजपरी नारी ॥

२०१७ / ओवी.

मग ह्मणती अहा काय झालें । यज्ञ करोनि काय केलें ॥
श्रीहरीसी अन्न न देतां वहिले । सकळहि जोडिलें मोह फळ ॥



२०१८

यांसी नसोनी द्विजातिसंस्कार । नाहीं केला गुरुपदीं नमस्कार ।
परी हरिचरणीं पावल्या प्रेमसार । ह्मणोनी त्यांच्याणी निर्धार धन्य आह्मी ॥

२०१९

एक ह्मणती चला कृष्ण दर्शनीं । एक ह्मणती कंसदूत हिंडती वनीं ।
शरीराचें भय मानोनी । झालें स्त्रियाहुनी अति नीच ॥

२०२० / अभंग.

असो हे सुंदर यज्ञपत्निकथा । बोलतां ऐकतां पुण्यवंत ॥१॥
देखिली म्यां तैसी केलीसे वर्णन । पहावी जाऊन वृंदावनीं ॥२॥
पद्मपुराणीची साक्ष ऐसी आहे । वृंदावनी पाहे अद्यापी ही ॥३॥
ज्ञानेश्वरकृपें ओळखोनि घ्यावा । करोनियां सेवा प्रेमभावे ॥४॥

२०२१ / अभंग.

वेडीवांकुडी झाली जे कविता । प्रकाश सविता हरी देता ॥१॥
सकलही काव्य कर्त्यासहित । स्तवनी महीत न धरोनी ॥२॥
ज्ञानेश्वरपायीं समर्पिलें आतां । तनुमन चित्ता वाहोनियां ॥३॥
टाळ्या पिटोनियां हरी हरी ह्मणा । करोनी नमना ज्ञानेश्वरा ॥४॥

(य९उ.४३४)

०००

आख्यान ७ वे

# हरिहराख्यान

॥ श्रीमत्सदगुरु ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

२०२२ / हिंदी

पद. संदीपनीवृत्त. रा.- भैरव. ता.- राजविद्याधर (तेताला)

माई हमे होय सो भिच्छा डार ॥धृ.॥
सुनत आवाज जसोदा माता । खोल दिया गृहद्वार ॥माई हमें ॥१॥
हीरा कंकर मोतन लेकर । भरि सुन्नेकी थार ॥ माई हमें ॥२॥
थार देखके अतिथी बोले । ये तो हमारा गार ॥ माई हमें ॥३॥
जो जो देती तूं सो है यहां । ये तो झोलि को भार ॥ माई हमें ॥४॥
नहिं लेता मै मोती कंकर । मुझे दिखावो कुमार ॥ माई हमें ॥५॥

सुनकर बानि जसोदा बोलत । तुम जावो निजद्वार ॥ माई हमें ॥६॥
लेना होय तो लेव बोवाजी । न बतावूंगि कुमार ॥ माई हमें ॥७॥
सुरत तुह्मारी पंचाननसम । ह्मारो सिसु सुकुमार ॥ माई हमें ॥८॥
देखके बालक डर जावेंगा । हमें अकेला अधार ॥ माई हमें ॥९॥
ज्ञानेश्वरजामात जननि का । सुनकर वाक्य प्रकार ॥ माई हमें ॥१०॥

२०२३ / हिंदी / दोहा.

हटेल जोगी द्वारपर खडे रहे मतिधार ।
लावोंगी निजनंदको देखो दरस बिहार ॥१॥

२०२४ / हिंदी / चौपाई.

जसोदा निजनंद लावो । दरशन कर अंदर घर जावो ।
जों नहिं लावो नंदन बासा । तों मैं शाप देउं पुनि खासा ॥

२०२५ / हिंदी

सुनो जसोदा बाल तुह्मारा । जिनपर चले सकल संसारा ।
कालकाहि महाकाल ये जानो । डरने का डर तुम मत मानो ॥

२०२६ / ओवी

मत्स्यावतारी शंखासुर । येणेंचि मारोनि साचार ।
विजयी झाला जो श्रीधर । तो हा कुमार तुझा कीं ॥ (य९उ.४३५)

२०२७

कूर्मावतारीं भूमंडळ । पृष्ठीवरी धरिलें सकळ ।
जयवंत केलें स्वर्गपाळ । तो हा बाळ तुझा कीं ॥

२०२८

वराह अवतार घेउनी । दाढेवरी धरिली अवनी ।
विजयी झाला हिरण्याक्ष मारुनी । तो चक्रपाणी पुत्र तुझा ॥

२०२९ / अभंग.

प्रऱ्हादाचेसाठी स्तंभी प्रगटला । असुर मारीला महाबळी ॥१॥
सिंहमूख अंग नराकृति जाण । क्रोध धूमें नयन व्याकूळ कीं ॥२॥
तरी भक्तिभावें शांतविला क्रोध । घेतला प्रऱ्हाद मांडीवरी ॥३॥
तो हा हरी तुझ्या आला कीं उदरीं । ध्यातो त्रिपुरारी नित्य जया ॥४॥
घ्यावया दर्शन तयाचें गोकूळीं । आलों वनमाळी दावि डोळां ॥५॥
पाहोनियां मग देईन आशिर्वाद । ज्ञानेश्वरसिद्ध वाक्य साचा ॥६॥

२०३०

सुशीलावृत्त.रा.- हमीरकल्याण. ता.-राजविद्याधर (तेताला)



झाला मायामय उपराग ॥धृ.॥
अदिती उदरीं वामनरूपें । देवार्थचि अनुराग ॥ झाला०॥१॥
दान मागुनी बळिला त्याचा । भ्रष्टविला महायाग ॥ झाला०॥२॥
त्रिविक्रमरूपें बळी जिंकुनी । राखि तयाची पाग ॥ झाला०॥३॥
भक्तासाठीं केली ज्यानें । देव लाजही त्याग ॥ झाला०॥४॥
तो हा नंदन तुझा यशोदे । ज्ञानेश्वर श्रुति भाग ॥ झाला०॥५॥

२०३१ / आर्या

जमदग्निसुत होउनि केली निःक्षत्र सर्वही धरणी ।
तो भार्गव तव सुत कीं झाला अघटित सुपुण्य तरु भरणी ॥१॥

२०३२ / दिंडी.

सोडवाया बंदिचे देव सारे । धरीयेला अवतार महावीरें ।
सूर्यवंशी होउनी रामराणा । दिलें खाया राक्षस सिद्धबाणा ॥१॥

२०३३

रावणादी मारोनि महापापी । मुक्त केलें मुनियोगि अनूतापी ।
रामराणा तो पराक्रमी थोर । तुझा झाला नंदनू निर्विकार ॥२॥
(य९उ.४३६)

२०३४ / साकी

असुरभार महि सहन न करुनी कमलासनगृहिं आली ।
तैं तेणें आश्वासुनि महितें प्रार्थियला वनमाळी ॥

२०३५

सुरमुनि मिळुनी स्तविलें जेव्हां नाथ शेषशयनातें ।
देउनि वाणी बोलियला तैं धरिजन अवनि सनातें ॥

२०३६

तो हा यदुकुळिं अवतरुनी हरी पूर्ण कराया लीला ।
भाग्य तुझें ह्मणुनियां यशोदे मंदिरि श्रीपति आला ॥

२०३७

इतर जे अवतार सकळही अंशरूप ते जाण ।
पूर्णरूप नंदन हा तुमचा देती श्रुति ज्या मान ॥१॥

२०३८

हाचि पुढें होउनियां बुद्धहि वारिल दुराभिमान ।
कल्की होउनि म्लेंच्छ मर्दुनी करिल विजय अभिधान ॥

२०३९

परि तो पूर्णचि राहिल नित्यहि गोकुळिं ऐसें साच ।
वर देतो मी दर्शन आतां घेउनि वाहिन पांच ॥

२०४० / हिंदी

पद. सामनुष्टुपवृत्त. रा.- यमनकल्याण. ता.-तेताला

नंदराणी लावो अपना बाल ॥धृ॥
उसके कंठ मुक्त बिराजत । मेरे गले रूंडकि माल ॥ नंदराणी ॥१॥
उसके नाभी ब्रह्मदेव बाल । मेरे स्वामि निहाल ॥ नंदराणी ॥२॥
मै तो शंकर त्रिभुवन नाशक । ओ हरि त्रिभुवन पाल ॥ नंदराणी ॥३॥
इतना सुनकर मात जसोदा । शिव पग राखत भाल ॥ नंदराणी ॥४॥
शंकर बचन सुनत जो लकरी । उठी नंदकी नार ॥ नंदराणी लावो ॥५॥

२०४१ / हिंदी - दोहा.

गोद लेत हरिको तहं लाये जहं ठहरे मृतिहार ।
देखत नैनसो नैना लागीं दूनो चयन बिहार ॥

२०४२ / हिंदी - दोहा

शिवशिव हरिहर मिलगये भयी एकभी चैना ।
ज्ञानेश्वरप्रभु हरिहरको गति एक भयी अरिद भैना ॥ (य९उ.४३७)

२०४३ / अभंग

हरिहर दोन्हीं एकरूप झालें । होतें तें निमालें भिन्नभाव ॥१॥
सत्त्वरजस्तम गेली आटाआटी । जाहली त्रिपुटी एकरूप ॥२॥
तरंग समुद्र एकीएका आले । यशोदेसी झालें तैशापरी ॥३॥
यशोदेसी कृष्ण शिवासी तो शिव । दोघासीही भाव एक झालें ॥४॥
कृष्णासी तों शिव ऐशापरी झालें । समाधिस्थ केलें आदिनाथें ॥५॥
आदिनाथकृपा समाधि अंतरी । श्रीकृष्ण बाहेरी लीलामात्र ॥६॥
अंतर बाहेरी निवांत साजिरी । अंगे झाली हरिरूप साच ॥७॥
आख्यान पठण करिती जें भावें । तयासीही पावें ऐसें फळ ॥८॥
म्हणोनिया सर्व ज्ञानेश्वरपायीं । अर्पोनियां पाही नाम जपूं ॥९॥
(य९उ.४३८)

०००



॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# १८. प्रभाती पदे

२०४४

उदितावृत्त मूळ.-यमन. ता.-धुमाळी. गौण.- नंदाच्या नंदना.

उठा नंदनंदना हो । झाला मार्तंडोदय पाया लावूं द्या चंदना ॥धृ॥
जय करुणाघन हरे । सुरवर मुनिजन पूजिति नित्यचि परमप्रेमपडिभरें ॥
कुसुमहार घेउनी । प्रभुपदजयगायन करुनीयां उभ्या द्वारिं मालिनी ॥
निजकरिं पंचारती हो । चरण पाहतां तुमचे ज्ञानेश्वरकन्यामनिं रती ॥१॥

२०४५

रमावृत्त. रा.-बिभास. ता.- तेताला.

सूर्योदय झाला ॥ स्वामी ॥धृ॥
संमार्जन मज करणें आहे । झडकरि नंदलाला ॥ स्वामी ॥१॥
सासुबाइ येतील मंथना । उशिर बहू झाला ॥ स्वामी ॥२॥
जेवाया प्रभु तुह्मासाठिं कीं । श्रीखंडहि केला ॥ स्वामी ॥३॥
उठा उठा जेउनियां श्रीहरि । जा कुंजवनाला ॥४॥ (य९उ.४३८)
दीन जाणुनी पहा मजकडे । अलकावतिपाला ॥ स्वामी ॥५॥

२०४६

जयंतीवृत्त. मूळ.- पूर्वी. ता.- धुमाळी. गौण.-घनश्याम सुंदरा.

उठा उठा श्रीपती भाट गर्जती वेद बाहती ।
प्रेमळ जन गोविंद ह्मणूनी पायिं शीर वाहती ॥धृ॥
कनकपताका उभारुनी हरिभक्त उभे द्वारीं ।
पूर्वदिशे उदयला दिवाकर करें तिमिर वारी ॥
निज जागृतिनें जनभवनिद्रा दूर करा देवा ।
देउनियां ऐश्वर्य तयाकरवीं करवा सेवा ॥
प्रेमभरें जन घेती तुमची सहस्रवरि नांवें ।
ज्ञानेश्वरकन्याही त्यांतचि असों द्या ठावें ॥ उठा उठा श्रीपती ॥१॥

२०४७

जयंतीवृत्त. मूळ.-पूर्वी. ता.- धुमाळी. गौण.- घनश्यामसुंदरा या चालीवर

उठा अनंता श्रीभगवंता फार वेळ झाला ।

द्वारिं उभे सेवकजन घेउनि कमल कुसुममाला ॥धृ॥
मामिजीने हो मज सांगितलें उठवीं निजकांता ।
जेउं घालितें क्षुधा लागली असल दयावंता ॥
पंचारतिया घेउनि अंगणिं उभिया व्रजनारी ।
प्रेमदान द्यावया तयांनां उठा पूतनारी ॥
सत्वर आलिंगोनि करा मज पुनित वामचरणे ।
उशिर होतसे स्वामि पुढें मज संमार्जन करणे ॥
अलकावतिपति तात बोलाविति तुम्हां ।
करा त्वरें पदवंदन घेउनि नाथ सवें आह्मां ॥उठा॥१॥

२०४८ / हिंदी

जयावृत्त. मूळ.-भैरव. ता.-दादरा. गौण.- घनश्यामसुंदरा या चालीवर

जागिय पिय नंदकुंवर उदित भे तमारी ।
आवेंगे नंद तुह्मे देवेंगे गारी ॥ जागिय पिय ॥धृ॥ (य९उ.४३९)
गैया लैं गोपबाल निकरे बन वारी ।
उठो नाथ भोजन करि पिवो शीत वारी ॥ जागिय ॥१॥
खेलो सखियन संगति रविकुमरि-किनारी ।
पंचारति[१] लैं खडि अलकावतिपकुमारी ॥ जागिय ॥२॥
*(दुसरा पाठ - १. करधर वरदान देहु होउं तुह्मरि नारी.)*

२०४९

लावणीवृत्त. मूळ.-पूर्वी. ता.-धुमाही. गौण.- घनश्यामसुंदरा या चालीवर.

उठा उठा श्रीहरे तुह्माला बोलाविति बाळें ।
ध्याति नित्य योगीजन हृदयीं तुमचीं पदकमळे ॥धृ॥
कर्मब्रह्म एकाकृति होउनि जग हें अळुमाळ ।
न रुचे ह्मणुनी तुमच्या कंठीं घातली माळ ॥
अक्षय म्हणुनी बोलती श्रुती स्मृती आणि शास्त्रें ।
सकळ विश्व हें आत्मा परि झाकिलें कृपावस्त्रें ॥
अखंड दंडायमानरूपीं असुनि तुम्हीं देवा ।
झालाती साकार घ्यावया निजजनकरि सेवा ।
आरत्या घेउनी गोपिका उभ्या प्रभू द्वारीं ।
ज्ञानेश्वरकन्या ही आर्जव करुनी हाकारी ॥१॥

२०५०



[२]सुशीलावृत्त. रा.-भूपाली. ता.- तेताला. उत्सव समयीचें.

बाळा लवकरि निद्रा सोड ॥धृ॥
मायासुप्ती जग व्यापोनी । झाली दानव जोड ॥ बाळा लवकरि ॥१॥
सगुण असोनी निजणें तुजला । का हें वाटत गोड ॥ बाळा लवकरि ॥२॥
झडकरि करिं सुरकार्य दयाब्धे । सांडुनि गिरद्या लोड ॥ बाळा०॥३॥
ज्ञानेश्वरकन्या सकळांना । द्या निजरूपीं जोड ॥ बाळा लवकरि ॥४॥
(२. येथें इतिहासान्वयें यशोदावचन आहे तरी वात्सल्यान्वयें कोणाचेंही होऊं शकते.)
(य९उ.४४०)

२०५१

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-पूर्या. ता.-धुमाळी. गौण.-चतुरा कर नट हरी. या चालीवर.

उघडा नयना हरी ।
आतांवरि कशि हृदयीं तुमच्या सुषुप्तिची लहरी ॥ उघडा ० ॥धृ॥
द्वारिं उभे सज्जन ।
कोमल भाषण करुनी त्यांचें प्रतिग्रहावें मन ॥१॥
काल न गेले ज्यांच्या घरीं ।
घ्याया दर्शन त्याही आल्या प्रेममया सुंदरी ॥२॥
उघडा नयना ज्ञानेश्वरकन्या सुखें ।
नांव न घेतां येइ ह्मणुनी घे हळु हळु हरिचे मुके ॥ उघडा० ॥३॥

२०५२

उदितावृत्त.लावणीभेद.मूळ.-पूर्वी ता.-धुमाळी. गौण.-चतुराकर नट हरि या चालीवर.

उठा श्यामा सुंदरा । येउनियां हडपी सुमनांनी साजविती मंदरा ॥धृ॥
आरक्त प्राची दिशा । तारागण लोपले निमाली घोर समुळही निशा ॥
कर्मसमय ब्राह्मणा । सद्गुरु ह्मणती निज शिष्यांना प्रणवाध्ययना ह्मणा ॥
प्रभुजी करूंद्या संमार्जना । मामि यशोदा बाहती लौकर सारामुखमार्जना ॥
वायन घेउनि करीं । जिवें कराया निंबलोण सदनिं आल्या सुंदरी ॥
मनमोहन यदुतीलका । उठा त्वरित घ्या पदरीं आह्मां प्रभु गोकुलपालका ॥
वेदवंद्य सुखघना । उठुनी पिटुनी टाळ्या वदनीं जय ज्ञानेश्वर ह्मणा ॥२॥

२०५३ / हिंदी

कुरंगाक्षीवृत्त. मूळ.- जोगी. ता.- तेताला. गौण.- हिंदुस्थानी खंजिरी भजनाचे चालीवर.

उठोना प्यारे भंवर भई है शाम ॥धृ॥
मंचक नाथ निकारन देवो । आगे करना काम ॥ उठोना प्यारे ॥१॥

जो तुम आये हो व्रजदेशमें । तों न नींदका काम ॥ उठोना प्यारे ॥२॥
तुम दरसहेत गोपिदृष्टि प्रभु । भइ उत्सुक बेफाम ॥ उठोन प्यारे ॥३॥
ज्ञानेश्वरकन्याकुं बनावो । अक्षय अपनि गुलाम ॥ उठोन प्यारे ॥४॥

२०५४ / हिंदी

रमावृत्त. रा.-भैरव ता.- तेताला.

जागो लाला भंवर भई ॥धृ॥
उठिं ग्वालन सीस घगरिया धरीं । पनघट सबहि गयी ॥ जागो ॥१॥
सुतिलक करिके सेवन करिये । सक्कर दूध दहीं ॥ जागो ॥२॥
अलकावतिपतिचरणसरोरुह । सत्ता सकल सही ॥३॥
(य९उ.४४१)

२०५५

रमावृत्त. रा.- बिभास. ता.-तेताला (राजविद्याधर)

यदुपति जागा होई हरी ॥धृ॥
जगदादौ श्रुती जागविती तुज । गोपी त्याचिपरी ॥ यदुपति ॥१॥
श्रुति जागविती जगकार्यास्तव । गोपी प्रेमभरी ॥ यदुपति ॥२॥
अलकावतिपतिनंदिनिविनती । झडकरि चित्तिं धरीं ॥ यदुपति ॥३॥

२०५६ / हिंदी

विजयावृत्त मूळ.- भैरव. ता.- दादरा, गौण. जागिये रघुनाथ या चालीवर

जागो ब्रजराजकुंवर भोर भयी लाला ॥धृ॥
जमुनाजल चली बाम । हिय सुमिरत शाम शाम ॥
सुरवरमुनि जपत नाम । पानि तुलसिमाला ॥ जागो ब्रजराज ॥१॥
मोहतिमिर करन हान । प्रकट भयो ग्यानभान ।
जानन सब प्रेममान । जगतितल उजाला ॥ जागो ब्रजराज ॥२॥
शाममूर्ति गोद लयी । सक्कर दधि हात दयि ।
लैं प्रसाद सुखिनि भई । ज्ञानेश्वरबाला ॥ जागो ब्रजराज ॥३॥

२०५७

सामनुष्टुपवृत्त. रा.-राजविद्याधर मूळ.-जोगी. गौण.-सावध होइं बापा, या चालीवर

भूपाळी

उठा जी ब्रजराया । मज दाखवा पाया ।
दिनबंधु करुणेनें । माझी निवारा माया ॥धृ॥
चरण सुखदायी । मुनी वर्णिती सारे ।



वाजती वाकीवाळे । नाद निगमाकारें । उठाजी ॥१॥
आणिक अवतार । अंशमात्र अवघे केले ।
रूप हें पूर्ण ब्रह्म । भाग्यें गोकुळीं या आलें ॥ उठाजी ॥२॥
आळंदीवल्लभा जी । उघडुनि लोचन ।
दीनांचे झडकरी । करा भव विमोचन ॥ उठाजी ॥३॥ (य९उ.४४२)

२०५८

सामनुष्टुपवृत्त. रा.-पिलु. ता.-तेताला. गौण.-(माहीत नाही)

माधवा उठा श्रीहरी । द्या पददर्शन झडकरी ॥धृ॥
निर्मळ सांवळी तनु । ध्याताति योगि मुनिजनु ॥१॥
सुकुमार पाय पाहतां । जाय अवघी संसृतिव्यथा ॥२॥
उभी ज्ञानेश्वरनंदिनी । ठेवा पाय हृदयस्यंदनीं ॥३॥

०००

श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ.

# संकीर्ण पदे

२०५९ / दिंडी

अशी बोले मदयुक्त देवदारा । सर्वभावें वंदीत ते उदारा ॥
संसृतीचे तोडिले पाश सारे । कृष्णचरणीं लागलें ध्यान सारें ॥१॥

२०६० / आधपद

आतां घेतें मी बरें प्रायश्चित । गुरुचरणीं वाहूनि तनुचित्त ॥१॥
ज्याचें नांव हृदयींच गुप्त । तयासह मी मंचकिं सुप्त ॥२॥
ज्ञानेश्वरकृपा अवघड । पर्णी नारायण उघड ॥३॥

२०६१ / हिंदी

वासंती. रा.- असावरी. ता.-तेताला.

राखो मेरी लाज ॥ नाथजी ॥धृ॥
जहं[1] जहं जाति हुं तहं तहं नाथजि । भारी द्रव्य को ब्याज ॥ नाथजी ॥१॥
तुमबिन कौन जगतमो करे है । ह्मारो गरिब को काज ॥ नाथजी ॥२॥
श्रीज्ञानेश्वरकरुणाबलतें । तुम पति भये ब्रजराज ॥ नाथजी ॥३॥

(१. पुस्तकाकरितां पैसे नव्हते त्या वेळेला हें पद केलें आहे.)

२०६२

सिंधुजावृत्त. खमाज.-ता.-राजविद्याधर (तेताला)

या या चौसर खेळुं ॥धृ॥
खेळीं मेळीं राहुनि देवा । दोन्हि अहंपण जाळूं ॥१॥ (य९उ.४४३)
तुमचें नाम प्रेमा माझा । एका पात्रीं घोळूं ॥ या या चौसर ॥२॥
सम करुनीयां जय पराजय । विरहिं संगरति पाळूं ॥ या या चौसर ॥३॥
अलकावतिवल्लभ चिंतुनि मनिं । संसृति सहजचि जाळूं ॥ या या ॥४॥

२०६३

सामनुष्टुपवृत्त. रा.-वसंत. ता.-राजविद्याधर (तेताला)

कर सोय सकळही बाळा ॥धृ॥
शीलत चंदन तबकि भरोनी । करिं सुमनांच्या माळा ॥ कर सोय ॥१॥
येतील निजगुरु श्रवणार्थ अजी । घेउनि त्रिभुवनपाळा ॥ कर सोय ॥२॥
आतां नाहीं भिणें आपणा । जगद्भक्षका काळा ॥ कर सोय ॥३॥
जरि असेल साधु दर्शनाची । आशा तरि करिं थाळा ॥ कर सोय ॥४॥
नारदमुनिजन येउनि तुजवरि । करितिल करुणा डोळा ॥ कर ॥५॥
तुझ्या मिषानें होइन पुनित मी । ज्ञानेश्वरप्रभुबाळा ॥ कर सोय ॥६॥

अमृतानुभव, ज्ञानेश्वरी, पंचीकरण, ज्ञानेश्वरगाथा, भक्तिपदतीर्थ

ग्रंथांचे स्मरण

२०६४

कंचुकीवृत्त. मूळ.-पिलु. ता.-तेताला. गौण.-सोडुनियां धनसुत.

मम पुस्तकनामें स्मरतां । जाईल हृदयींची स्मरता ॥धृ॥
अमृतानुभव* हा पहिला । शिव शक्ति सम करी वहिला ॥ मम ॥१॥
ज्ञानेश्वरी* गीतालहरी । ध्यातां सत्वर वरिल हरी ॥ मम ॥२॥
पाहतांचि पंचीकरणा* । होइल नाश चित्तकरणा ॥ मम ॥३॥
भज भज ज्ञानेश्वरगाथा* । मग विठ्ठल करि रतिगाथा ॥ मम ॥४॥
शेवटिं ज्ञानेश्वरतीर्था । पिउनि घे भक्तिपदतीर्था* ॥ मम ॥५॥

२०६५ / हिंदी / तुकबंदी

छोरो बाद बिबाद पसारा । रूप अनादि सकल अवतारा ॥१॥
प्रेमरूप **यदुनंदन** मानो । योगरूप **रघुनंदन** जानो ॥२॥
ज्ञानरूप **ज्ञानेश्वर** मोरा । भक्तरूप **गोपिनका** प्यारा ॥३॥



ये सब खेल अनादी दीखत । ताको गुरुकरुणातें लेखत ॥४॥
ग्यान करे जद प्रेम न माही । तो सब स्वतः सिद्ध दिखाई ॥५॥
जाते बखाने बेद ढंढोरा । अनादि जान यह सकल पसारा ॥६॥
जीव देह यह सृष्टि अनादि । मायारूप अखंड उपाधि ॥७॥ (य९उ.४४४)
ईश्वर तैसो लेत अवतारा । सोहि अनादी जान निहारा ॥८॥

२०६६ / दोहा

तैसे सब अवतार पुनि रूप अनादी जान ।
जब[1] काम पडे तब करत भक्त भूमिपर आन ॥१॥
*(१. पाठांतर - भक्तकाज निर्वाह करत मर्त्यभूमिपर आन.)*

२०६७

भक्तकाज अवतार भये ओजी अखंडरूप ।
जो अमृतसिंधु बीच सोहि देत नित कूप ॥२॥

२०६८ / दिंडी

कामा ऐसा अन्यायी जगीं कोण । तोहि येतां स्वीकरी नारायण ।
देउनीयां रामत्व सत्पदाला । ऋषींच्याही वारोनी आपदाला ॥१॥

२०६९

पुत्र होतांही बहू आपदातें । माय इच्छी कल्याणची सदा तें ।
तसा भक्त सक्षोभ द्वेषि देवा । परी कृष्ण सोडिना चरणसेवा ॥२॥

२०७०

बीज भाजीतां अर्ध जरी राहे । तरी अंकूरा उपयोगी नोहे ।
तसी अंधक करीत जो भक्ती । परी नाशेना ऐसी कांत उक्ती ॥३॥

२०७१

कर्म झालें किंचीत जरी न्यून । तरी कर्त्या पाववी नरक जाण ।
भक्ति थोडीही मोक्ष पुढे मांडी । असें बोले हरि थापटोनि मांडी ॥४॥

२०७२ / आर्या

आतां कर्मणुकेस्तव दोघेही सारिपाट खेळुं चला ।
मज येववे न ह्मणुनी कडियेवरि घेउनी त्वरें उचला ॥१॥

२०७३

**मी जैसा प्रिय तुजला तैसेंची घेइं मज्ञनां सकळा ।**
**ज्ञानेश्वरा दयाळा देई आह्मांस पूर्ण प्रीतिकळा ॥२॥**

२०७४ / दिंडी

राममूर्ती ते ज्ञानमयी साची । सौख्यरूपी श्रीकृष्ण मूर्ति तेची ।

सच्चिदानंद मेघमयी मूर्ती । रासक्रीडा गर्जोनि वर्णि कीर्ती ॥१॥

राष्ट्र उन्नत होवो !

२०७५ / श्लोक

तें राष्ट्रचि उन्नति पूर्ण यावे । ध्याती जिथें कृष्णपदा स्वभावें ।
जेथें नसे विष्णुगुणार्थ वाणी । राष्ट्रावरी त्याहि पडोचि पाणी ॥१॥(य९उ.४४५)

२०७६

कविजनांप्रति तें यमकीं पिसें । करितसे परि त्यां यम कीं पिसे ।
ह्मणुनियां हरि पादुका सेवुनी । मिळविजे चिर मा तुक सेवुनी ॥२॥

२०७७ / आर्या

अधरामृतही पिउनी नाहीं तृप्ती कधीं जरी आह्मां ।
तरि हा संशय कैसें पिउनि सुधा देव अमर घनःशामा ॥१॥

२०७८

भोजन प्रसंगीं मंडळींतील कोण्यातरी ब्राह्मणास उत्तरादाखल आहे.

दृष्टान्ताग्रह सोडुनि सिद्धान्ताधार साधिं विप्रर्षे ।
अखंड भक्ती पावुनि दीनावरि सत्सुधारसा वर्षे ॥१॥

२०७९

जवळचे मंडळीला भयासंबंधी उद्देशून ह्मटले आहे.

**वाटे मज तूं ऐसें कीं नाहीं दास श्रीहरीचा रे ।**
**भक्तां मरण भयाशा कां जननी बाळकास विष चारे? ॥१॥**

२०८०

वेदाधिकारयोगें होतासि तूं पवित्र द्विजराया ।
आतां आत्मानुभवें ज्ञानेशचि ह्मणुनि लागतों पाया ॥२॥

२०८१

देईन दान ह्मणुनी होतें दातृत्व मजवरी आलें ।
तें ज्ञानेश्वरचरणीं समर्पुनी लोळणीं सुखें धालें ॥३॥

२०८२

काव्यकुसुममालेनें पूजियेलें ज्ञानदेवचरणास ।
पुण्यहि अर्पुनि पायीं मुकलें आतांचि जन्ममरणास ॥४॥



२०८३

कोणी देण्याकरितां द्राक्षें आणलीं होतीं तेव्हां नैवेद्य दाखविण्याचे वेळचें.

द्राक्षें सुंदर काळीं तुह्मां खायास आणिलीं देवा ।
चाखुनि गोडी यांची द्या मज वर जन्म जन्म पदसेवा ॥१॥

२०८४

देवी दर्शनाला जाण्याचे वेळचे

द्या द्या प्रभुजी आतां निज वक्त्रींचा विडाही चाऊनी ।
पळभरि धीर धराहो येतें अंबालयासि जाऊनी ॥२॥ (य९उ.४४६)

२०८५ / चौपाई

तुकबंदी

जो पोळित भवजनित प्रतापें । ते जीवति गुरुचरणप्रतापें ॥
यदुपतियजन सुजनमनहारि । स्वमनशुद्धि पावति अधिकारी ॥१॥

२०८६

यत्करुणा दीनाऽभयदा कीं । कीर्ति त्याचि श्रुति हाकि सदा कीं ॥
अलकावतिपतिचरणसरोजा । स्मरणसात मिळती सुपरोजा ॥२॥

२०८७

जे इहपरफलभोगविरागी । ते होतिल कथममृतविभागी ॥
सदन व्याधिमृत स्वजनहि जेव्हा । सोडि अमृत मग सुजनकसेवा ॥३॥

२०८८

एवं विगततृष्ण कृष्णगुणा । गाति सदनि जे अतित त्रिगुणा ॥
भवरुजपीडित जनसमुदाया । निववुनि निरुज करिति मन काया ॥४॥

२०८९ / दोहा

सप्त लोक

भू[१]र्भुव[२]स्वर[३]र्मह[४]र्जन[५]तपः[६] सत्य हे सात ॥
लोक मिळति त्या सुजनजना कुंड जयाची साठ ॥१॥

२०९०

शंकरविष भेषज जें झालें । श्रोतृचित्त श्रुति रमवुं निघालें ।
तेथुनि कोण सुजनमन काढी । कोण गमन करि द्रुत यमदाढी ॥१॥

२०९१

हिंसक एक तथाविध कोणी । परि मज हरिगुण सज्ञनवाणी ॥
यास्तव पाराशरसुतनंदन सुंसृतितप्त विजन जनचंदन ॥२॥

२०९२

कृष्णकथामृतजीवन पाजा । जें निववुनि मज उदित सुकाजा ॥
कोमल पाय इंदिरा ज्याचे । सेवि तथाविधि शशिधर नाचे ॥३॥

२०९३

गाति नाम सन्मुनिजन वाचे । वदिजेऽशेष सुयश प्रभु त्याचे ॥
रामनाम निज काम कराया । नाहिं अन्य तद्विध मुनिराया ॥४॥

२०९४

यास्तव वचनसुधासुखपानें । पाजुनि अमर करी प्रीतिपानें ॥
यापरि परिसुनि नृपतिविनंती । बोलति शुक कांहिं न करिं खंती ॥५॥

२०९५

शुकमुखगतसुख हरिचरितामृत । न्यून करी जें मघवरतामृत ॥
तें निजमतिअनुसार वदावें । एवंविध चिंतित मन भावें ॥६॥

२०९६

वचनरचनपटुता मज नाहीं । परि गुरुचरणप्रीति हृदिं पाहीं ॥
बोबडि बाळवाणि जननीला । तोषवि तेविंचि हरिगुणलीला ॥७॥ (य९उ४४७)

२०९७

मम मुखगत ऐकुनि सज्ञन ते । करितिल हरियशनदिं मज्ञन ते ॥
साधु तेचि पाहति अधिकारी । जेथ विलज्ञ सुगीत मुरारी ॥८॥

२०९८

तेंचि गीत वारी जनपापा । जें सुभरित सुश्लोकप्रतापा ॥
वाणि न शुद्ध अबद्ध जरी कां । परि वदतें गोविंद हरी कां ॥९॥

२०९९

ऐकति घेति गाति जन साधू । वारिति दीनभवकुभयबाधू ॥
सकल प्रेम हरिपायिं जयाचा । नाहिं भाव मनिं विश्वभयाचा ॥१०॥

२१००

ज्यापासुनि जनते भय नाहीं । देति अभय जें थोरहि नाहीं ।
जे मतिरोध क्लेश अति साहनि । पावन सत्पदजीवनिं नाहुनि ॥११॥

२१०१



चिंतिति हृदयिं सुयश हरि पाहुनि । राहि तेथ प्रभु दुष्कृत दाहुनि ।
वाहुनि कर्म सकल हरिपायीं । करिति भजन बहुविध सदुपायीं ॥१२॥

२१०२

तत्पद वंदुनि नंदनंदना । बैसवुं आणुनि हृदयस्यंदना ॥
अजित चित्तिं जिंकुनि जे धाले । निज करुणे जन निववुं निघाले ॥१३॥

२१०३ / दोहा

शिव विधि नारद व्यास शुक पुंडरीक प्रह्लाद ।
बिभीषण वसिष्ठादि हरिजन प्रणमुं तदीय सुपाद ॥१॥

२१०४ / चौपाई.

नाभि नाभि सुत काळ कराला । हो हरि भजुनि विकल्प-निराळा ॥
कामक्रोध रिपु मारुनि बापा । धरिं मनिं पूर्व कुकृत अनुतापा ॥१॥

२१०५

जग नग कनक कृष्ण मनिं आणीं । जो पयनदिपति तनुजा जानी ॥
हरि स्मृतिगत अघवध सुविचारें । होवुं नको भवविवश विकारें ॥२॥

२१०६

युवतियुवयुगुलगतिप्रति सांडी । रामकृष्ण विठ्ठल मुखिं मांडी ॥
येकिं तुला बैसवितील विष्णु । आधिं होय परि द्वंद्वसहिष्णु ॥३॥

२१०७ / दोहा

देवविप्रगुरुसंतजनपाय पूजिं अतिप्रीति ।
या वांचुनि नाहीं दुजी हरि मिळण्याची रीति ॥२॥

२१०८

देखति हरि व्यापक नभरीति । नयनद्वारिं हरि हृदयिं भरीती । (य९उ.४४८)
अभिलाषा नच भजनें तरती । कृष्ण शपथ ते सहजचि तरती ॥१॥

२१०९

जे हरिसुखमय विषय विसरती । भवमोचन सूचनिं अनुसरती ।
ते अति धन्य धन्य भगवंत । झाडिन तत्पद कचिं अनुसंत ॥२।

२११०

मति गति भूति वाणि श्रुति करिमा । सकलहि सज्ञनसंगतिगरिमा ॥
जे वारित परजनमतिविहिमा[१] । तोहि तसा सत्संगतिमहिमा ॥३॥

(१.शंकेला)

२१११ / दोहा

संतकृपा करितील तर ना न ह्मणे यदुराज ।
यास्तव तनु मन वाणि सदा सेविन सुजनसमाज ॥३॥

२११२ / चौपाई

शंभुचरणीं ज्यांची रति नाहीं । त्यां न मिळे हरिभक्ति कदांही ।
सद्गुरु ज्यांस सदाशिव झाला । त्यां न कदां भव अकद विपाला ॥१॥

२११३

ज्यांवरी कृपा करी त्रिपुरारी । त्यांच्या हृदयिंच वसत मुरारी ।
तात मात शुलपाणि भवानी । तत्पद वंदुं कायमनवाणीं ॥२॥

२११४ / दोहा

रुंडमाल गल धारकू शशिशेखर अविकार ।
गंगाजटविहारि जो वारी दासविकार ॥४॥

२११५ / हिंदी / चौपाई

यदि कोई बालकता चहिये । तदा जननि माता इति कहिये ॥
तथा कोई दैन्य जो लेही । उमा नामतें परम मिलेही ॥१॥

२११६ / हिंदी

बाल कहा हि मातपद गावे । माता गोदसो परम पठावे ॥
तथा दैन्यवश उमा जो कहही । उमादुग्धपानसुख लहही ॥२॥

२११७ / दोहा / हिंदी

ज्ञानेश्वर गुरु मातृपद उमा नाम सोहि जान ।
ध्यान धरत तब उमा उमा तूटे सबहि गुमान ॥५॥

२११८ / संस्कृत

*गाईकरितां पाच घरें भिक्षा मागण्याचें ठरलें होतें त्यावेळचा श्लोक.-*

जननि जननि भिक्षां देहि मे कन्यकायाः।
त्वमपि सुखदशान्तं शंकरं कांतमेहि ॥
तदिय करुणया मां स्व-कृपातश्च मातः ।
जन-जनि-मृति-हंत्रे नंदपुत्राय देहि ॥१॥ (य९उ.४४९)

*

*मुक्काम शिंगणापूर येथें ता. २९/४/१९०८ रोजीं त्रिपुरवार यांनीं महाराजांस ''तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों'' ही समस्या दिली असतां त्यांनी ती खालील श्लोकानें पूर्ण केली. –*



२११९ / श्लोक

नसे केधवां आवडी संतपायीं । नसे आळवीला कदा शेषशायी ।
मुली लेंकुरें पोशितां शुष्क झालों । तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ॥

*ह्याचा श्लेषार्थ नवरा स्त्रीस उद्देशून ह्मणतो अशा प्रकारें करावा.*

२१२० / आर्या

गंगू-जीजी-चरणी माझें राहो अखंड दंडवत ।
पाळावें मज जेवीं पाळी जननी स्वबाळ बंडवत ॥
*(पाठांतर - मज पल्लवि पाळावें पाळी जशि माय बाळ बंडवत ॥)*

०००

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# स्तुतिसंग्रह पदे

२१२१ / एकनाथस्तुती

सामम‍ाणववृत्त. मूळ.- काफी. ता.- दीपचंदी. गौण.

कावडि आणी हरी । पैठणकर नाथाघरीं ॥ कावडी ॥धृ॥
गोकुळिं दहिं दुध बहुत भक्षिलें । तें निवटाया तरी ॥ कावडी ॥१॥
मस्तकिं गंगा शंकर धरितो । ती यावि आपुले शिरीं ॥ कावडी ॥२॥
ह्मणुनिच पाणी घागरि भरुनी । वहातो माथ्यावरी ॥ कावडी ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु तात दयालू । सद्गुरुकृपा खरी ॥ कावडी ॥४॥ (य९उ.४५०)

२१२२ / शिवस्तुति / हिंदी

सामनुष्टुप. रा.- नाट. ता.-तेताला.

गंगाधर तुह्मारी छब न्यारी ॥धृ॥
तेज अघोरा बामदेव जल । सद्यो जातमें मही पधारी ॥ गंगा० ॥१॥
पंचाक्षरिको रटन करें जो । नमःशिवाइति बाणि सुधारी ॥ गंगा० ॥२॥
संप्रदायके भूषण हो तुम । आदिनाथ दयाल त्रिपुरारी ॥ गंगा० ॥३॥
ज्ञानेश्वरचरणन स्मरस्मरके । तुह्मरि कृपातें शिस पगधारी ॥ गंगा०॥४॥

२१२३ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त.रा.-जयजयवंती. ता.-धुमाळी.

आयाहुं निकट तुम चरणनके ॥धृ॥
भवजंजाल फसावत मोहे । देहु ग्यान हथियार मनन के ॥ आयाहुं ॥१॥
माथे ऊपर चंद बिराजे । हरत तिमिर भजक नयनन के ॥ आयाहुं ॥२॥
ब्रह्मा बिष्णुहि दास तुह्मारे । तुम हो दीनदयाल सबनके ॥ आयाहुं ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुरूप तुमहि हो । हरण करो किल्बिष मम मनके ॥ आयाहुं ॥४॥

२१२४ / हिंदी

रंभावृत्त रा.-कानडा. ता.-तेताला.

शशिशेखर सुमिरो मनमाहीं ॥धृ॥
कालाग्नि मां श्रुति जिन गावें । तिनको ध्यावत भवभय नाहीं ॥१॥
पंच वदन लोचनहि पंचदश । दशभुज प्रभु साकृति मन लाई ॥२॥
नंदिवहन फणिभूषण शंकर । कंठ नररुंडमाल धराई ॥३॥
अर्धांग बसे जननी जगकी । ज्ञानेशदया दरस दिखाई ॥४॥

२१२५ / हिंदी

सामनुष्टुप रा.- बागेश्री ता.- तेताला.

देखत नयन तिमिर छुटि जावें ॥धृ॥
अकार ब्रह्मा उकार विष्णु । मकार तुह्मर साथ दिखावें ॥ देखत ॥१॥
बिंदु हो तुम निर्विकार प्रभु । रेखा अच्छर जगत् मिलावें ॥ देखत ॥२॥
जगमें तुममें अभेद दीखत । नहिं जाने अधपाती होवे ॥ देखत ॥३॥
ज्ञानेश्वरचरणनके कृपातें । शिवशक्तीको भेद न पावे ॥ देखत ॥४॥
(य९उ.४५१)

२१२६ / हिंदी

सामनुष्टुप. रा.- यमन. ता. - तेताला.

चिन्मय हो तुम गिरिजारमण ॥धृ॥
चेतनमांही वृत्ति उठत जो । सो है गिरिजा अरध अंक मन ॥१॥
गिरिजासे साकार प्रभू तुम । तुमसों वाको निराकारपन ॥ चिन्मय ॥२॥
पंचमूख तुम गिरिजासें हो । तुमसों गिरिजा है नहिं छोबन ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुचरणकृपातें । तुम्हारें सुख मिले करत बिनवन ॥ चिन्मय ॥४॥

२१२७ / हिंदी

सामनुष्टुपवृत्त. रा. बहार. ता.- तेताला.

नमन तुम्हें केदारके बासा ॥धृ॥
रज्जू ऊपर भूजग जैसो । तैसो तुमपें जगतबिलासा ॥ नमन तुह्में ॥१॥



रघूनाथ जो दशरथ सुतसो । शिव शिव शिव सुमिरत निशिबासा ॥२॥
दीपतें रज्जू भुजग नहिं मिले । तुमहिं भजत तस जगतबिनासा ॥३॥
यहि खातर श्रुति तुमको कहती । लयकारन प्रभु रूप बिलासा ॥४॥
भयरुप जगको नाश करत तुम । भक्तहेत बसहि कैलासा ॥५॥
कुलमणि हमरे आदिनाथप्रभु । ज्ञानेश्वरकरुणा अधिबासा ॥६॥

२१२८ / हिंदी

सामनुष्टुप. मूळ.- देस. ता.- तेताला. गौण.- हिंदुस्थानी भजनाचे चालीवर.

निगम न जाने शिव तुह्मरी माया ॥धृ॥
ब्रह्मा मस्तक दरस समयमों । झूट बोल पुनि अपुजन पाया ॥१॥
रमारमणचरणनको देखत । धूंडत नहिं अंतनको पाया ॥निगम ॥२॥
भ्रमजगको संहार करत हो । भक्तप्रीति कैलास बनाया ॥ निगम ॥३॥
ज्ञानेश्वरचरणनकि कृपातें । आदिनाथपग सीस धराया ॥ निगम ॥४॥

२१२९ / हिंदी

रंभावृत्त. रा.- कालंगडा. ता.-तेताला.

शंकर मनबच करम सुमरना ॥धृ॥
पंचबदन सुंदर हर छोरिके । अमरपूर बन क्यौं फस मरना ॥ शंकर ॥१॥
दहनी आखी चंदरूप है । बाई पिंगल सूरज नयना ॥ शंकर ॥२॥
अग्नी बीच सुषुम्ना भासे । शंकर नाम जोगिको तरना ॥ शंकर ॥३॥
सदा सं सं यहि बिधि बोले । हं हं सूरज करतमिलेना ॥४॥ (य९उ.४५२)
अग्नि सुषुम्ना सोहं भाखे । ज्यामह रटत समाधि सुलीना ॥ शंकर ॥५॥
ज्ञानेश्वरप्रभुचरणकृपातें । जो जाने पद शिवरूप करना ॥ शंकर ॥६॥

२१३० / हिंदी

रंभावृत्त. रा. ललत. ता. तेताला.

शंकरनाम यही बडभारी ॥धृ॥
और तो नाम अंत नहिं आवत । ये नाम जनमजनम बिहारी ॥१॥
बाहर आवत हं हं करते । सं सं अंतर जात मिलारी ॥ शंकर ॥२॥
बीचमें जो कोइ स्मरण करत वह । जीवत देह होत त्रिपुरारी ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभुचरणकृपातें । मंतर लय हठ राजनिहारी ॥ शंकर ॥४॥

२१३१ / हिंदी

सामनुष्टुप. रा.-यमन. ता.-तेताला.

विधि हरिहर तो यहि बिधि सुमरे ॥धृ॥

बाणी माहीं ब्रह्मा बैठत । नयनन माहीं विष्णु पधारे ॥ विधि ॥१॥
श्वासामाहीं शंकर रटते । मनसों प्रणवकि धारा बनरे ॥ विधि ॥२॥
अंतर गिरिजा बाहर शंकर । बीचमें हरिको बीज सुमनरे ॥ विधि ॥३॥
अंतर जनम समय बिधि करत । बाहर शंकर मरण बिहनरे ॥४॥
बीचमें पालन नाथ करत प्रभु । प्रणवरूप बिंदु मिलनरे ॥ विधि ॥५॥
ज्ञानेश्वरप्रभुचरणकृपातें । गुरु ईश्वरको द्वैत हननरे ॥ विधि ॥६॥

२१३२

हरिहरस्तुति.

सामनुष्टुप. रा.-छायानट. ता.-तेताला.

शिव विष्णू बोल बाळा । विझेल भवउबाळा ॥धृ॥
एक विभूति जटा शिरिं धारक एक घालि वनमाळा ॥
एक काशि वृंदावनिं दुसरा, एक गौर एक काळा ॥ शिव विष्णू ॥१॥
पहिला फणिभूषण करिं धारक त्रिशूल चक्र सुनाभा ॥
दुसरा सूदर्शन करि धरुनी भाळिं लावि मृगनाभा ॥ शिव विष्णू ॥२॥
एका प्रभुला दोनचि युवती पार्वति आणी गंगा ॥
ज्ञानेश्वरकन्या गौळिणि त्या दुजियाच्या अर्धांगा ॥शिव ॥३॥ (य९उ.४५३)

२१३३ / नवसाकी वृत्त

नावें दोन्ही गोड । तोडिती साहि रिपूंची खोड ॥धृ॥
ज्याच्या चित्तीं कांहिंच नाहीं विषयसुखाचा मोड ।
तो शंकरप्रभु स्मरतां फुटती अज्ञानाचे फोड ॥ नावें ॥१॥
एक प्रभू भोगुनि गोपीतें भोगी मुक्ती जोड ।
करूनि देतो सद्भक्तातें वारुनियां कडु गोड ॥ नावें ॥२॥
आदिनाथ गुरु संप्रदायमणि निवृत्ति पुरवी कोड ।
वृंदावनवर अलकावतिवर असि अक्षय मति जोड ॥ नावें ॥३॥

२१३४

देवी स्तुति

सामकामदा. मूळ.-यमन. ता.-दादरा. गौण.-पांडुरंग स्मर अभंग

उदय असो तुझा देवि माय शांकरी । कृष्ण प्रेमभाव देइं माझिया करीं ॥धृ॥
जय जय जननिये देइं कृष्ण कांत हा । यशोवंत तिहीं लोकिं कांतिमंत हा ॥१॥
ओवाळुनि सकळ सौख्य सांडु त्याहुनी । नाहीं प्रिय कांहिं अन्य विधिपित्याहुनी॥
ज्ञानेश्वरकरुणाबल योग हा बरा । प्रसन्न तूं होउनि दे कृष्ण नोवरा ॥३॥



२१३५

विठ्ठल स्तुती

सामकामदा. मूळ.-यमन. ता.-दादरा. गौण.-पांडुरंग स्मर अभंग

कोमलांग पांडुरंग अंतरीं वसो । सच्चित्सुख अन्वय घन डोळियां दिसो ॥धृ॥
क्रीडत कुंजवनिं गोपिरासराउळीं । प्रेमळ मणिसुंदरतनु मूर्ति सावळी ॥१॥
ज्ञानेश्वरचरणस्मरण करुनियां मनीं । आह्मिं सकळ श्रीहरीच्या होऊं कामिनी ॥२॥ (य९उ.४५४)

२१३६

सामनुष्टुप. मूळ.- जोगी. ता.- तेताला. गौण.-

धन्य धन्य पंढरपुर । नाचताति नारीनर ।
द्वैतभाव झाला चुर । घनदाट प्रेमापुर ॥धृ॥
पूर्वमुख पांडुरंग । राधारुखमाबाईसंग ।
पुंडरीक भक्त चांग । भीमाचंद्रभागासंग ॥१॥
नरजन्मी ज्यानें यावें । त्यानें पंढरीला जावें ।
ब्रह्म विठे ओळखावे । गरुड पारावरि नाचावें ॥२॥
संतसंगी प्रेमसुख । विठ्ठलनामी गर्जे मुख ।
सर्वांभूती ब्रह्म एक । ज्ञानेश्वरकन्याभाख ॥३॥

२१३७ / हिंदी

गीता स्तुति

कन्यकावृत्त. रा.- यमन. ता.- तेताला

सब उपनीषदसार ॥धृ॥
गीता ये निर्माण भई है । निगमवचनविस्तार ॥ सब ॥१॥
वेद प्रभूके श्वासतें भये । गीता मुखउद्गार ॥ सब ॥२॥
सो प्रभु अपने बचनअर्थके । कारन भये उदार ॥ सब ॥३॥
वेही अलकावतिपति सद्गुरु । रुक्मिणि देवि कुमार ॥ सब ॥४॥

२१३८

देवी स्तुति

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-जोगी. ता.-धुमाळी. गौण.-तुजवर फुलवरा, या चालीवर

जय जय जगज्जननी आई भवानी वंदिली वो ॥धृ॥
दहा धूप जाळुनी पंच दीपारति उजळलीवो ।

आधारापासुनी मेंढियावळिया आक्रमिली वो ।
भक्षोनी नैवेद्य भक्तां उपकारिणी झाली वो ।
सर्व सुखानें सर्व सुखानें विश्वा प्रसवली वो ॥ जय जय ॥१॥
गुणी त्रयोदश विडे भक्षुनी विद्युत पाजळल्या वो ।
झर झर झर झर फिरुनि सकळही बाहुट्या जाळिल्या वो ।
करडुनि खाउनि दांत असूरमाना मुरगाळिल्यावो ।
भक्तिसुखाच्या साठीं मायबाप प्रेमा गाळिल्या वो ॥ जय जय ॥२॥
स्वानंदाचा करुनि फुलवरा नाचणिये नाचली वो ।
निळिया पिळिया लालियाचिया डोळिया भासली वो ।
प्रणवमूळपीठिके तीन्ही देह विस्तारली वो ।
अलकावतिपतिपदकमळांची आश्रितें तारिली वो ॥३॥ (य९उ.४५५)

तुकाराम स्तुति

२१३९ / आर्या

त्रेतायूग असोनी नेले वैकुंठि ग्राम रामानें ॥
भूवैकुंठ पंढरी केली कलितचि सुतुकारामानें ॥१॥

२१४० / श्लोक

इंद्रायणी स्तुति

इंद्राणि हे भगवती करुणार्द्र माते । वारीं त्वरें करुनियां भवविभ्रमातें ।
नेईं अगे बहिणिये जननीच जेथें । टाकूं नको कधिं मला जन नीच जेथे॥१॥

२१४१

अमृतानुभव स्तुति

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-जोगी. ता.-धुमाळी. गौण.-सगुण चरित्रें या चालीवर.

अमृतानुभव ग्रंथ सनातन नित्यचि तो वंदा ।
तदंतर्गतानुभव सेवितां पावति गोविंदा ॥धृ॥
अक्षर सुखमय अनिर्वाच्य जे परब्रह्ममूर्ति ।
तो सद्गुरु म्यां आश्रयिला प्रभु नाथ निवृत्ति ॥१॥
गुरुकीर्तीनें जय पावे ही सदा ब्रह्मविद्या ।
दयार्द्र त्या अक्षयीं वंदितो पदसंमति आद्या ॥२॥
ब्रह्म माया या दोहोंमध्यें अर्ध अर्ध कोण ।



जाणों न शकें मेलन त्यांचें एकचि परिपूर्ण ॥३॥
शिव शक्ति दोघांचे तत्व अद्वैतानंद ।
म्हणुनी त्यांतें वंदूं जे कां जगदादिस्पंद ॥४॥
आदिमध्यान्तहीन असूनी आदिमध्यअंतीं ।
सत्तारूपें सगुण तयातें वंदियलें संतीं ॥५॥
तोचि द्वादशाक्षरी सुगम प्रभु मत्कान्त स्वामी ।
श्रीज्ञानेश्वर सद्गुरुकृपें तल्लिन तन्नामीं ॥६॥

२१४२

नर्मदा स्तुति

इंदिरावृत्त. रा.-यमन ता.-तेताला

मम भवभय सकल निवारी ॥धृ॥
शिवदा होउनि अभिभव छेदुनि । करिं निजचरणविहारी ॥ मम ॥१॥
नेउनि मिळवीं हरिरूपिं असे । जननी हें तव वारी ॥ मम ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुरूप धरावें । मम मति उज्वलकारी ॥ मम ॥३॥(य९उ.४५६)

२१४३

शंकर स्तुति

सामकामदावृत्त. मूळ.-झिंझोटी. ता.- दादरा. गौण.-रत हरिपद, या चालीवर.

झडकरि मज पाव प्रभू गिरिजारमणा रे ॥धृ॥
करकपाल पालकजन अंधकदमना रे ।
संप्रदायमूळरूप शिवद शमनशमना ॥१॥
''ॐनमः शिवाय'' इति कथितनिगमचरणा ।
अलकावतिपतिनंदिनि पूर्ण दीनशरणा ॥ झडकरि ॥२॥

अमृतानुभव स्तुति

२१४४

सामनुष्टुपवृत्त. मूळ- यमन. ता.-धुमाळी. गौण.-चतुराकर नट हरी. या चालीवर

जोंवरी अमृत नच पाहिलें ।
औषधिसाठीं तोंवरि वैद्य रोगि श्रमुनि राहिले ॥धृ॥
बद्ध मुमुक्षू पुरा । जंव न कळे अमृतानुभव तंव अधिकारांचा कुर्रा ॥
तो राहो जनिच्या वरा । अमृतानुभव सेविति त्यातें भेद न वाटे खरा ॥
निज गुज ऐका गड्या । जीवपरात्मैकत्व चिंतनीं नेऊं जीवितघड्या ॥
मायेच्या उकलुनि घड्या ।

होउनि सच्चित्सुखमय हरिसह घालूं नित फूगड्या ॥
ज्ञानेश्वरपद पाहिले ॥ औषधिसाठीं तोंवरि वैद्य० ॥१॥

२१४५

सामनुष्टुप. दंडकवृत्त. मूळ॰ - जोगी ता.- धुमाळी.

मुनिवंद्या हरि गोविंदा ।
हरि गोविंदा, परमानंदा, आनंदकंदा, पाव मला ॥धृ॥
चिन्मणिमंता भगवंता, भगवंता करुणावंता, कमलाकान्ता,
शमतमविमला ॥ मुनिवंद्या ॥१॥
या माया ही माराया, ही माराया श्रीमाराया, भव साराया,
तव नव सुकला ॥ मुनिवंद्या ॥२॥
जीवित वायां शिणवाया, शिणवाया बहु अरि व्हाया,
प्रभु विनवाया, कंठहि सुकला ॥ मुनिवंद्या ॥३॥
किति कामा या ह्मणु सामा या, ह्मणु सामा या न निमे माया ।
परि नामा या, तनुपण विकला ॥ मुनिवंद्या ॥४॥ (य९उ.४५७)
उदिता राया जन ताराया, जन ताराया तव ताराया ।
अधिकारा या, नच मी विकला ॥ मुनिवंद्या ॥५॥
या वेळा या खेळाया, या खेळाया उरिं लोळाया ।
कुच चोळाया । यशुमतिपुतला ॥ मुनिवंद्या ॥६॥
मल वाराया मन माराया, मन माराया निरधाराया ।
अलकाराया, नमितपदतला ॥ मुनिवंद्या ॥७॥

शिवस्तुति

२१४६

जयावृत्त. मूळ.-यमन. ता.-दादरा. गौण.- रत हरिपद. या चालीवर

केलिचंगरंगदंग उमासंगकारी ।
इंदुमुकुट जान्हविजुट वंदु त्रिपुरारी ॥ केलिचंग ॥धृ॥
सुजनसदय सकलहृदयव्यापक गजहारी ।
नंदिवहन, परमगहन, विमलनगविहारी ॥१॥
पंचवदन, निजजसदन, मदनकदनकारी,
भजती मुनि मृदुल मनीं होउनि अविकारी ॥२॥
संप्रदायमुकुटमणी भूषण फणिधारी ।
अलकावतिपतिनंदिनि अनुभव सहकारी ॥ केलिचंग ॥३॥

शिवस्तुति



२१४७ / संस्कृत

गंगातरंगांकितकेशशोभा । चंद्रांकितं भालविशाललोलम् ॥
पिनाकपाणिः कुलभूषणस्तं । उमासहायं पितरं श्रयामि ॥१॥

हरिहर स्तुति

२१४८

जयावृत्त. मूळ- झिंझोटी. ता.- दादरा. गौण.- रत हरिपद. या चालीवर.

जय शंकर गिरिजावर परम दयाशाली ।
जय यदुपति गोपीवर माधव वनमाली ॥धृ॥
कर्पुरांग गगनतनू त्रिशुलचक्रपाणी ।
मदनकदन मदनजनन चरणजटापाणी ॥ जय ॥१॥
अनलनयन अनलाशन मुरहर त्रिपुरारी ।
उरगवसन उरगशयन पूतनांधकारी ॥ जय ॥२॥
राधिकेश जान्हविवर हरिहर सुखकारी ।
अलकावतिरमणसुता चिंतित अविकारी ॥ जय ॥३॥ (य९उ.४५८)

शिवस्तुति

२१४९ / हिंदी

रमावृत्त. रा.- खमाज. ता.-तेताला.

रे मन गंगाधर कहिये ॥धृ॥
रूप मनोहर शशिशेखरपर । भक्तन काज बहे ॥ रे मन ॥१॥
शीततनु प्रभु शामतनूप्रिय । हिरदें ध्यान रहे ॥ रे मन ॥२॥
अलकावतिपति दीनदयालकि । करुणा नाथ चहे ॥ रे मन ॥३॥

२१५० / भजन

हरिहरस्तुति

गिरिजावल्लभ गुरु शंभो । जलजावल्लभ कुरु शंभोः ।
हृत्वा शिव संसृतिपरमाम् । दीनदयार्णव पालय माम् ॥१॥

२१५१

चारुचर्यावृत्त. रा.-भूप. ता.-तेताला.

प्रभु मोहन मुरलीधारी ॥धृ॥
रजतनिकेतन सोडुनि ज्याला । चिंति स्मशानीं पुरारी ॥ प्रभु ॥१॥

निर्विकार परि निजजन भजनें । खेळे सगुणाकारी ॥ प्रभु ॥२॥
अलकावतिपतिनंदिनि प्रियकर । मोहक व्रजजननारी ॥ प्रभु ॥३॥

२१५२

कंचुकीवृत्त. मूळ.- पिलु. ता.- धुमाळी. गौण.- सोडुनियां धनसुत चुटका. या चालीवर

शिव देवो शिव सकलांला । त्राता जो भवि विकलांला ॥धृ॥
कृतमथनदनुजबलकाला श्रितमंदाकिनिअलकाला ॥ शिव देवो ॥१॥
तव करुणाकर शशिभाला, स्पर्शो गिरिशा शिशुभाला ॥ शिव देवो ॥२॥
करिं शमवुनि त्रिगुणउबाळा । सुखि अलकावतिपतिबाळा ॥ शिव ॥३॥

५१५३

शिवस्तुति

विशाखावृत्त. रा.- हमीरकल्याण. ता.- तेताला (राजविद्याधर.)

हिमनगजामाता ॥ भज मना ॥
शशिशेखर विभु अनलनयन जो, धरि जाह्नविमाता ॥धृ॥
गिरितनयाहृदयांबुजमधुकर । करि पुनित अनाथा ॥ भज०॥१॥
अलकावतिपतिनंदिनिजनिता । आशु स्वपद दाता ॥ भज०॥२॥
(य९उ४५९)

२१५४

भगवत्स्तुति

जयावृत्त. मूळ.- झिंझोटी ता.- दादरा (यतिलग्न) गौण.-रत हरिपद. या चालीवर.

जय जय जय जगदीश्वर निवटिं सकल माया ।
जिंकु शकति कोणिहि ना करुनि बहु उपाया ॥धृ॥
परि त्यां वश वंदिति जे आवडि तव पायां ।
तव भजनावीण सकळ कर्म जाति वायां ॥ जय ॥१॥
सिद्ध होईं ज्ञानेश्वरनंदिनिपति व्हाया ।
प्रेमविवश आह्मि नारी लंपट तव पायां ॥ जय ॥२॥

२१५५ / ओवी

शिवस्तुति

अग्नि तोचि प्रज्वलित ह्मणावा । जो न विझे पडतां इंधनगोवा ।
तेवीं देव तो एकचि ह्मणावा । जो तमीं असोनी तमांत न सांपडे ॥१॥
तोचि वैद्य विद्यावंत । यत्करीं विषाचें अमृत होत ।



तैसा तूंचि एक मंगल भगवंत । स्मशानादि अमंगल होत मंगल तुझेनी ॥२॥

२१५६ / हिंदी

शिवस्तुति

रंभावृत्त रा.-यमन ता.- तेताला (राजविद्याधर.)

शंभो मंगल नाम तुम्हारा ॥धृ॥
जदपि कियो बास है स्मशाने । चिताभस्म तनु लेपनसारा ॥ मंगल ॥१॥
जदपि गले नरमुंडकी माला । तदपि हरत निजजनदुःखसारा ॥२॥
नाथ तुम्हारी पूर्ण दयापें । करुणारूप भयो संसारा ॥ मंगल ॥३॥
ज्ञानेश्वरनंदिनिकी बिनती । सुनिये उमापती दीन उदारा ॥ मंगल ॥४॥

२१५७ / हिंदी

शिवस्तुति

जयावृत्त. मूह.- रा.-झिंझोटी. ता.- दादरा. गौण.-''रत हरिपदकमलकंद'' चा चालीवर.

मेरे तो एक शरण । तुमही हो पुरारी ॥धृ॥ (य९उ.४६०)
कोवु करत जोगजाग । कोवु ध्यानधारी ॥ मेरे तो ॥१॥
कोवु भजत निगमभणित ब्रह्म निर्विकारी ॥ मेरे तो ॥२॥
तिरथ फिरत तपहि करत कोवू व्रतधारी ॥ मेरे तो ॥३॥
नयनविहिन विकल हुं मैं स्वामि अंधकारी ॥ मेरे तो ॥४॥
जोरि पाणि जुगल भणत । ज्ञानेशकुमारी ॥ मेरे तो ॥५॥
ऐसि करिये शंभो कृपा । होऊं श्यामनारी ॥ मेरे तो ॥६॥

२१५८ / हिंदी

शिवस्तुति

रमावृत्त. रा.- छायानट ता.-राजविद्याधर.

ऐसो नहिं देख्यो कोई ॥धृ॥
शिव तुमरे पदजुगल लपट करी । भव आरत होई ॥१॥
शंकर शंकर रटत न जाके । चितिमो मति सोई ॥२॥
ज्ञानेश्वरजाजनककि महिमा । निगमवदन गोई ॥३॥

२१५९ / हिंदी

शिवस्तुति

सामकामदावृत्त. मूळ.-रा. झिंझोटी. ता.-दादरा गौण.- पांडुरंगस्मर अभंग. या चालीवर.

मोरे हिय आय बसो दीनके दयाला ॥धृ॥

जटाजूट जाह्नवि जल सोहत शशि भाला ।
भक्तनहित सत्वरूप दैतनके काला ॥ मोरे हिय ॥१॥
वाम अंक सोहत है हिमालयबाला ।
ज्ञानेश्वररूप धरी क्रिडवु प्रणतपाला ॥ मोरे हिय ॥२॥

## २१६०

शिवस्तुति

जयावृत्त. मूळ- झिंझोटी. गौण.-पांडुरंगस्मर अभंग. या चालीवर.

पांच तुंड गळां रुंड दाहा बाहु धारी ॥धृ॥
हिमनगजामात विभो सेवि पूतनारी ।
संग त्यजुनि भंग भवा करित मन्मथारी ॥१॥
गिरिजापति करुणाघन अंधकगजहारी । (य९उ.४६१)
दमुनींद्रिय सेविं मना स्वामि त्रिपुरारी ॥२॥
अनुरागें क्रीडत जो उमासहित सारी ।
भूति परम तदपि लावी विभुति अंगीं सारी ॥३॥
वामांकीं शिखरसुता मस्तकिं तिमिरारी ।
अलकावलिजान्हवीजल[1] जगतिपुनितकारी ॥४॥
टणत्कारुनी पिनाकी निजजअशुभहारी ।
अलकावतिपतिसुतेस शंभु त्वरित तारी ॥५॥

(१.केशावरील)

## २१६१

शिवस्तुति

साममाणववृत्त मूळ.- जोगीप्रमाणें. ता.-दीपचंदी. गौण.-''राधे घडिघडि'' या चालीवर

भोलानाथ दिगंबर या हो । माझी दीनाची येऊं द्या दयाहो ॥धृ॥
पायीं वाहतो मी निजहृदया हो । तम निवटा पाउनि उदया हो ॥
श्वेतसुंदर ब्रह्ममया हो । भक्तजन हेतु सहउमया हो ॥
पाय दावा याचि समया हो । लावा हृदयीं शिव समया हो ॥१॥
नंदीवाहन त्रिशूलपाणी । वन्हिनयन स्वजनाभिमानी ।
शशि मस्तकीं आणि गांगपाणी । या या धावोनि शिव मोक्षदानी ।भोला०॥२॥
पंचतुंड गळां रुंडमाळा । पुंडसंहारी त्रिभुवनपाळा ।
काशीविश्वेश परमकृपाळा । ज्ञानेश्वर प्रभुजी विशाळा ॥ भोलानाथ ॥३॥



## २१६२

अंबास्तुति

साममाणववृत्त. मूळ-पिलु. ता.-दीपचंदी. गौण.- ''इस तनधनकी'' या चालीवर.

ये पाजीं मज अमृत जननी । जय शुंभनिशुंभदैत्यदलनी ॥धृ॥
तूं सच्चित्सुखघनतनु देवी । तव महिमा विदला नच देवीं[2] ॥ ये पाजीं ॥१॥
जय हिमालयजे शिवकांते । श्रुतिभिरीडिते आदावंते ॥ ये पाजीं ॥२॥
घे कडियेवरती अई मातू । श्रीज्ञानेश्वररूप उमा तूं ॥३॥ (य९उ.४६२)

(२.देवांनी.)

## २१६३

अंबास्तुति.

सामनुष्टुपवृत्त. मूळ.-पिलु. गौण.-''तूं भजरे भजरे भजरे मानवा'' या चालीवर.

तूं भजरे भजरे जननी श्रीगिरिजा देवी ॥धृ॥
जी घेउनि कडिये तुजला स्तनपीयूष मुखीं लावी ।
तू बहुत उनाड तथापी कल्याणचि तव जी भावी ॥
॥चाल ॥ ह्मणतां माय प्रेमभरें जी नयनीं निजपद दावी ॥ तूं भजरे ॥१॥
गजवदनषडाननमाता भगवति ललिता सुखदात्री ।
मंगला जयंती दुर्गा शिवकांता निजजनधात्री ।
सकरुणावलोकनमात्रें संपूर्णचि भवभय हंत्री ॥
॥ चाल ॥ तूं होउनि बाळ तियेचा जा जेवीं चिद्रसपात्रीं ॥ तू भजरे ॥२॥
तूं त्यजरे त्यजरे त्यजरे कांचनकांतासुतगोवी ।
तूं धावुनि सत्वर बापा शिर जननीचरणी ठेवी ।
शमदमादि साधुनि बुद्धि ज्ञानाग्रीवरती तावी ॥
॥चाल ॥ अलकावतिपतिपदकमलामोदाप्रति अक्षय सेवीं ॥ तूं भजरे ॥३॥

## २१६४ / हिंदी

शिवस्तुति.

सामनुष्टुपवृत्त. रा.-देस ता.- राजविद्याधर.

मेरे सांब सदाशिव वाली ॥धृ॥
पंचवदन शशिशीर्ष अलकमों जन्हुजनित नदिबाली ।
निजजनबरधनदानशूरगुरु बामांकेऽचलबाली ॥ मेरे ॥१॥
ध्यावत शशि शचिपति रवि मारुत जलज-जनन बनमाली ।

अलकावतिपतिकृपा शिवस्मरि हरदम करुहुं दिवाली ॥ मेरे.॥२॥

२१६५

शिवस्तुति.

इंदिरावृत्त. रा.-देस ता.- तेताला.

मज शरण[1] तुह्मी त्रिपुरारी ॥धृ॥
देवदनुजमुनि पार न पावती ब्रह्मा आणि मुरारी ॥१॥ (य९उ.४६३)
शिवशिवनामस्मरणें साधूं भवतरुहूनि भरारी ॥ मज शरण ॥२॥
उमामहेश्वर वाचे वदतां काळ दुरूनि थरारी ॥ मज शरण ॥३॥
ज्ञानेश्वर शिव एकरूप मनीं स्मरतां मुक्ति करारी ॥ मज शरण ॥४॥

(१.रक्षण करणारा.)

२१६६ / हिंदी

ज्ञानेशस्तुति

(कबित्तवृत्त) - कमलिनी लजाय रही कनकश्री जायरही ।
रसा हरखाय रही रसीली मिलाई है ॥
पानीके प्रवालकी अरु मनिमेके लालकी ।
अरु कामिनीके गालकी सब सोभा भी भुलाई है ॥
बिजूरीके सारीसे कि सूरज धुर धारीसे ।
करिके सवारी छबि सारि हरि लाई है ॥
क्या राधिका तिलक झ्याकी, नाहि नाहि सुनरि सखी ।
मेरे ज्ञानरायके पायकी ललाई है ॥१॥ *(संप्रदायसुरतरु अ.१.तील मंगलाचरण)*

उमावृत्त.

**अवतरण**

मातृत्वं च पतित्वं च सर्वं वै सम्भवेद्गुरौ ।
लालने चापि माधूर्येऽधिष्ठानं ब्रह्म एव हि ॥१॥

२१६७ / हिंदी

निज तारनकारन शंभुकृपा निरखी जलगांग भगीरथ तोखे ।
मिथिला नगरीमहं राजसुताहिय मोद भयो रघुबल्लभ लेखे ।
जिमि भीमकजा हियमें हरखी गिरिनंदिनि मंदिर गोविंद पेखे ।
तिमि मानस आज प्रसन्न भयो सखि ज्ञानसुरेश पदाम्बुज देखे ॥१॥

२१६८ / हिंदी-मराठी

ज्ञानेशस्तुति



कबित्त मोहरी.

भूमि केली पुण्यधाम सोडोनियां सर्व काम ।
गावोनियां रामनाम ब्रह्ममुखें धाले हो ॥
संतसंघ रंगदंग वाजति विणे मृदंग ।
प्रेमभरें नीरगांग पायरीये आले हो ॥
छांडी सब लाज काज राजसाज चालो आज ।
देखिवेको कैसे सखि नयन ललचाये है ।
कोऊ ठाडे छतर धारे कोऊ वापे व्यजन वारे ।
पालखीमें पैठ मेरे ज्ञानराय आये है ॥१॥ (य९उ.४६४)

(संप्रदायसुरतरु अ.१.मंगलाचरण)

२१६९

शिवस्तुति

सामकामदावृत्त. मूळ.- झिंझोटी. गौण.- पांडुरंगस्मर अभंग. या चालीवर.

झडकरी मज पाव प्रभू गिरिजारमणा ॥धृ॥
करकपाल पालक जन दुर्जन दमनारे ॥ झडकरी ॥१॥
संप्रदाय मूलरूप शिव दशमनशमना* ॥ झडकरी ॥२॥
'ॐनमः शिवाय' इति कथितनिगमचरणा ॥ झडकरी ॥३॥
अलकावतिपतिनंदिनी । पूर्णदीनशरणा ॥ झडकरी ॥४॥

(*दशेंन्द्रिय मनाचे शमन करणारा)

२१७० / हिंदी

शिवस्तुति

जयावृत्त. मूळ.-झिंझोटी ता.-दादरा. गौण.- रत हरिपद कमलकंद. या चालीवर

जय जय गिरिजावर हर कृपादृष्टि देखो ।
सुत तुह्मे बहोत नाथ नंदिनी मोहे लेखो ॥धृ॥
तलातलपतालचरण शीस सर्गधारा ।
भोलेमति ध्यात जोई तो भगतहि तारा ॥१॥
दुर्जनडर-कारण प्रभु शेष गले राखा ।
करत स्तुति सुरवरमुनी गीर्वाणकी भाखा ॥२॥
सकलदेवमांहीं तुम हो निगमांतविभागी ।
ज्ञानेश्वरनंदिनी प्रभू भजत चरन लागी ॥३॥

२१७१

शिवस्तुति

सामनुष्टुपवृत्त. मूळ-भूप. ता.-राजविद्याधर. गौण.-पहा पहा सावंळा. या चालीवर.

ज्याचा वाचक ॐकार । वेदीं गान करी रुद्र ।
वन्हीज्वाळा नेत्रभर । तो मज पावो श्रीशंकर ॥१॥
जय जय स्वामी आदिनाथा । घेई पदरीं मज अनाथा ।
चरणी वाहतो तनमनमाथा । व्हावें तैसें ऐक्य दोन्ही अर्था ॥२॥
करीं त्रिशूळ कंठीं रुंडमाळा । शोभे वामांकी दक्षाची बाळा ।
पयःफेनधवल कंठ नीळा । (य९उ.४६५)
सभोंवतीं पिशाचांचा पाळा[1] । अर्धांगी फणिवर काळा ॥३॥
सुमंगळ स्मरतां श्रेयस्पद । ज्याच्या शक्तीनें तुटे भवबंध ।
भेदत्रय नासोनी परमानंद । ज्ञानेश्वरकृपें प्राप्त गोविंद ॥४॥ *(१.मंडळ)*

२१७२

श्रीकृष्णस्तुति

सुशीलावृत्त. रा.-असावरी. ता.-तेताला.

मोहक तुमचे पाय । प्रभुजी मोहक ॥धृ॥
बाप तुमचा नंद प्रभूजी । आणि यशोदा माय ॥१॥
कालिय सर्प तिर्यग्योनी । उद्धरिला यदुराय ॥२॥
अघटित सत्ता वर्णिती ज्याची । नारदादि मुनिराय ॥३॥
आह्मां सांपडली सुसुखाची । ज्ञानेश्वर गुरुमाय ॥४॥

२१७३

विठ्ठलस्तुति

सुमतीवृत्त. रा.भूप. ता.- तेताला.

उभें ब्रह्म विटेवरी आज ॥धृ॥
चला त्या स्थळीं फुगड्या खेळूं । लेउनी सुंदर साज ॥१॥
मायबाप पतिबंधु सुतांची । सांडुनि देऊं लाज ॥२॥
आळंदीहुनि पालखि जातां । नाचूं रंगण काज ॥३॥
चंद्रभागाजलस्पर्शानें । दवडूं पापसमाज ॥४॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणायोगें । घेऊं वरुनि यदुराज ॥५॥

२१७४

शिवस्तुति

रंभावृत्त. रा.-यमन. ता.- तेताला.

दाखवि पद करुणाकर शंभो ॥धृ॥



शशिशेखर मंदाकिनि जटिला । पूजिति श्रीपति आणि स्वयंभो ॥१॥
अलकावतिपतिरूपें मम ह्रदि । झटिति प्रगटहि सुखद त्वं भो[1]॥२॥
*(१.पाठांतर - 'शंभो')* (य९उ.४६६)

२१७५

शिवस्तुति

सिंधुजावृत्त. रा.-कामोद. ता.-तेताला. उत्सवसमयीचें उद्गार.

झडकरि पाव पुरारी ॥धृ॥
या भवतापें तपलें तनुमन । झाली मतिही विकारी ॥१॥
दीनदयाळा देई अभय तूं । निमिषार्धांतचि तारी ॥२॥
आळंदीपतिनंदिनी विनवी । षड्रिपु-जांच निवारी ॥३॥

२१७६ / श्लोक

गंगास्तुति

गंगे त्वदीय चरणांबुजसौरभानें । तें वाटतें लघु जया स्थलिं सौर भाने ॥
तूं माय गोचर जनीं असतां कशाला । घेईल कोणि कलहांकित नाकशाला ॥१॥

२१७७ / स्त्रग्धरा वृत्त

मातें त्वद्वारीधारा जणुं मरणयुतासाठीं पीयूषधारा ।
की दीनांची दया हे द्रवतनु धरूनी पावली अश्रुसारा ॥
कीं हा स्वेदप्रतिज्ञात जगदखिल संतारणावेशजन्य ॥
माझी तों भावना कीं मम विषय महत्स्नेहजस्तन्यमान्य ॥२॥
स्नानें आधीं तुझ्या हा जन विमलतनू होउनी पूजि देवा ।
तेव्हां ते रक्षु ऐसें अयि ह्मणति उगे साधुनी शुष्क हेवा ॥
माते मातें गमें कीं सुरगण अवघे चोरटे त्वद्यशातें ।
दीनांची हांक कोणी श्रवणि न धरिती पाहुनी दुर्दशा ते ॥३॥

॥ इति गंगास्तुति समाप्ता ॥

२१७८

# शिवकरुणाकलरव स्तोत्र

पृथ्वी :- करुणा कोलाहल

सदाशिव सदात्मका सदभिलाषसंपादका ।
सदंघ्रि भजनोन्मुखा सदुपवेदसंवादका ॥
जगज्ञनिलयांतकृद्दशकरा शिरःपञ्चका ।
उमासह नमोस्तु ते प्रिय सदाऽहिमन्मञ्चका ॥१॥
तवांघ्रिकमलद्वयद्युति महत्तमो वारते ।
अहोऽनृत न बोलती मुनिप वातवा वारते ॥
परा गुरुपरंपरा सतत यापरी मान मी ।
न मानुं तरि नीचतेस्तव यमाप्रदहि मान मी ॥२॥ (य९उ.४६७)

२१७९ / गीति

किंवा लेकरुं ह्मणुनी करुनि उगें अल्पभक्ति अनुमाना ।
परि हें जगतिं न कोठें, रडतां सुत ये न मायला पान्हा ॥
बहुजन्मकृत माझे देवा अपराध सर्व तुज कळती ।
परि सहन न करितां मम शिव तुजविण कोण करिल कळकळ ती ॥४॥

२१८० / पृथ्वी

हिमाचलसुतापगा सकलपापसंहारिणी ।
शिवा कृपासागरा तुमचि ती गृहाचारिणी ॥
प्रभो जवळि ठेविता ह्मणुनि रत्न सा चोळिला ।
परंतु दुरि सोडणें उचित नाहिं मासोळिला ॥५॥
सकाम जरि शंभु मी स्मर तुम्हीच हो जाळिला ।
सकोप जरि मी तरी भुजग देहिं कां पाळिला ॥
अनंत अपराध कृत्परम मूढ पापागळा ।
विषाद ह्मणुनी ह्मणो तरि विखा सखा कां गळां ॥६॥

२१८१

पिता ह्मणुनि सांगसी त्वरित घे उमेला कडे ।
परंतु निगमान्वयें नुभयतां भिदा सांपडे ॥
उमेस अथवा तुह्मा बुझविणें मला शंकरा ।



समस्त जन बोलती उचित बालकालंकरा ॥७॥
उनाड तरि मी करा निजकरें प्रभू शिक्षणा ।
परंतु परपांगिलें करूं नका जगद्रक्षणा ॥
विनाश करणें जरी मम तरी तृतीय नेत्र हा ।
कृपा मजवरी करो परि नको कु-यमवेत्र हा ॥८॥
उनाड बहु मी जरी मनिं न भीति कांहीं वसे ।
सहाय असतां तुह्मीं ह्मणल कोण मातें पिसें ॥
कुमार्गगत यद्यपि परि न बाळ कोणी त्यजी ।
ह्मणूनिच भरंवसा परम अंतरीं तात जी ॥९॥ (य९उ.४६८)

२१८२ / गीति.

पतिविरहाप्रति युवति साहति नंदन समीप आणोनी ।
मज तव विरहो जननी न सहन करवे वरान्य मानोनी ॥
पिशाचतनु मागुनी असुर थुंकि नाकावरी ।
खरीच मिळतां सुधा सुमति कोण ताकावरी ॥१०॥
भवच्चरणिं[1] घेतले जगदका करीं लोळणे ।
*(१.पाठांतर- भवच्चरण घेतलें अनलजातजें लोळणे.)*
मलाचि परि गोवितां किमपि देउनी खेळणें ॥११॥
व्यथा निज कथावया जलधिजन्य वाजे न कां ।
तरी क्षुधित मी सदा सदन त्याज्य गाजे न कां ॥
न मोर ह्मणुनी मला मधुर ये न केकावणें ।
न योग्य जन का तुह्मां तनुज रोदना कावणें ॥१२॥

२१८४

मनांत बहु वाटते गिरिवरा तुझीं पावलें ।
धरूं दृढचि चिंतनीं मुनि जया सदा पावले ॥
परंतु अति संशयो हृदयिं ठाण मांडी महा ।
अशा द्वितटमध्यगा मजकडे कृपेनें पहा ॥१३॥
त्यजोनि तपही जिला सदय द्यावया आसरा ।
अगाधनिजवैभवें करुनि पूजिला सासरा ॥
तिचेंच शिशु सान मी शिवशिवा ह्मणोनी रडें ।
कसें अजुनि हो न या नयन जाहले कोरडे ॥१४॥
मदीय वरदे शिशू असुर येति आह्मांवरी ।

ह्मणोनि अपुली दया निजसुखार्थ मी आवरीं ॥
दुधें सबल बाल जैं जननिला करें बोकरी ।
तदीय वध कोपुनी शिव वदा कदा ते करी ॥१५॥

२१८५

दिला द्विजमुला पयोनिधि तुह्मीं जगत्सूरते ।
मिया बहुत याचितां मिळत ना भुकेपूरतें ॥
शिरीं शशि तुझ्या वसे करुनिही गुरूच्या चुका ।
नको रडूं उगा उगा मज मुखें ह्मणा ना फुका ॥१६॥ (य९उ.४६९)

२१८६

गणेश अवमानितां भगवती प्रकोपा करी ।
तयास तुमची दया म्हणवुनि प्रगोपा करी ॥
गृहीं ह्मणति मंदिरीं कलहनाश तो हो महा ।
मला न समजावितां पुढति वेळ येवो न हा ॥१७॥
कदापि गिरीनंदिनीकृतविमान वा मानवी ।
उदास जरि होईल स्वजन तारणी जान्हवी ॥
ह्मणोनि धरिला शिरीं शशि समस्ततापापहा ।
अशा सकरुणा मना त्यज विलाप बापा पहा ॥१८॥
ह्मणो प्रिय तुह्मा क्रिया तरि सुयज्ञ उच्छेदिला ।
शतद्विजजभक्षकाप्रति विमोक्ष कां दीधला ॥
जरी अशुचि ना रुचे, करिं कपाल कां मी पुसे ।
कडेवरि न घ्या मला किमु म्हणोनि हे हे पिसें ॥१९॥
कलंकि शशि हा जरी अजवरी जना नीववी ।
रुसेल गिरिजेवरी कधिं झणि प्रिया जान्हवी ॥
इति स्वमनिं शंकुनी सहज जी सुविश्वा तरी ।
दया वरुनि ठेविसी कलहवर्जित स्वांतरी ॥२०॥

२१८७

शिव स्मरुनि सद्गती सकळ संत ते पावले ।
ह्मणूनि तुमचीच मी युगुल चिंतिते पावले ॥
जना जनि लयाश्रय प्रभु तुह्मीच हें जाणुनी ।
असे विगतभीति मी पदमहात्म्य तें वाणुनी ॥२१॥
श्रियाळसदनी तुह्मीं जन विबोल विस्तारिला ।



उमा असुरिं अर्पुनि पुढति त्या दूजोरा दिला ॥
जटेंत बहु गामिनी वदति लोक हें ऊघडें ।
समस्त अपवाद हा मज सुरक्षितांना[1] उडे ॥२२॥ *(१.पाठांतर-ना घडे)*
पथीं पतित पादुका कुसुमशा तुह्मां वाटती ।
गुरोळ चुळबिंदु ते शिरिं सिता तसे थाटती ॥
सुभुक्तकवळा सुधागण तसा शिशूहर्षना ।
अयोग्य मग मीच कां गिरिसुतापते दर्शना ॥२३॥
(शिवकरुणाकलरवस्तोत्र समाप्त)

०००

श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ.

# महाभारत स्तुति

२१८८ / गीति.

श्रीहरि वाङ्मयमूर्ति समजोनी भारता तुला नमन ।
तुजविण आणिक कोठें घे शास्त्री भारता तुला न मन ॥१॥
प्रतिदिवशीं शतशतकवि गाती निगमा तुझ्याचि महिम्यातें ।
एकमुखें अकवीनें किति वाणावे वसोनि महि म्यां तें ? ॥२॥
भक्तमनोरथ पुरवी नुरवी हुरहूर तेंचि मी मागे ।
महायशातें दावी स्थीर करुनि वर्णिलेति जें मागें ॥३॥
माझ्या मनोरथांनां विफल न कीजे दयाघना स्वामी ।
तव नवगुण सुविवक्षें उद्धरीन सहज आनना स्वामी ॥४॥
स्वर्ग्य मर्त्य हे दोन्ही वाटति जरि भवसमान संतातें ।
तथापि बद्धा दाविल कोण त्वद्गताविणा सुपंथातें ॥५॥
तूं द्वैपायननंदन चंदनसम या जनास सीतल हो ।
वंदन तुजविण अन्या तें जैसें त्यजुनि कनक पित्तल, हो ॥६॥
तूं इक्षुदंड तुझिया पर्वी पर्वी सदा सुधाधारा ।
प्याया मिळति बुधांनां जे धरिती ना भवा मुदाधारा ॥७॥
तूं आहेस म्हणोनी साधूंचें यश अखंड गाजतसे ।
वाजतसे स्वर्घण्टा भूमीला योग्य नाव साजतसे ॥८॥

ज्ञानकांड रूपें तू अवतरला साच पांचवा निगम ।
जग मिथ्या दावाया जरि केला क्षत्रवाच वाणिगम ॥९॥
तदप्युपासनकांडें त्वां लघुरूपें जनास निववावें ।
बाल याचना करितां मायेनें स्तन कसें न पिववावें ॥१०॥
श्रवण स्मरण दर्शनीं तुझिया मुनि सर्व पाप हारविती ।
कर्मकांड पतितांही अपवर्गपथाश्रयास धारविती ॥११॥
शूद्रां अशूद्र पतितां नारींना अरिसमान हे निगम । (य९उ.४७१)
जाणोनि तूं प्रगटला कैवल्य पुढें करावया सुगम ॥१२॥
धर्मार्थकाममोक्षी आन तंत्रचय सदा तुझा दास ।
बापा तुजला सोडुनि भजती ते शठ मुधापदादास ॥१३॥
मी कल्पी तवरूपा कल्पी परि तें तसेंचि दावावें ।
अंगजहठ पुरवाया मात्रनुमोदन कसें न पावावें ? ॥१४॥
महाभारतीं नाहीं तें नाहीं तिहि जगीं असे तात ।
वदले, यास्तव मतिफळ तूं पिकवी शुद्ध हृदयशेतांत ॥१५॥
पांडव कथा स्वधर्मी नीति कथा कौरवास अनुसरल्या ।
गीता सनत्सुजातीं मोक्षधर्मि आपदाचि जणु सरल्या ॥१६॥
त्वां आवडतें अंगहि देउनिया पाळिले स्वगुण भाट ।
श्रवणेंचि मुक्ति मिळते, कीति बहु मग नित्य जे करिति पाठ ॥१७॥
आहेस तशा तूतें नमन असो मम सुविश्वरूपातें ।
नमुनि पार्थ इच्छी हरि तेवीं मज दाखवी स्वरूपातें ॥१८॥
उपदेशमुकुटमणि तंव कीं यत्नेंचि कृतादिगयुग होती ।
दैवप्रशंसा शोका शमवायातें वृथा खनग होती ॥१९॥
आत्मस्वरूप आधीं पाराशरसुतमतींत अवतरलें ।
गणपतिकरवीं चित्रित होता वाचुनि न कोण भव तरलें ॥२०॥
मंगलमूर्ती हि तुझी घडवी मूर्ती तरी सुमंगल ते ।
किति ह्मणुनी वर्णावी हृदिं धरिता हरिती अरि तिमिंगल ते ॥२१॥
भारत केविं ह्मणावें ऐकति वाचति न नित्य भारत ते ।
भारत तुझिया चरणीं ज्यापरि करिणी वरा इभा रतते ॥२२॥
वंद्य विश्वरूप तुझें परि भिवविसि भीष्मप्रभृति दाहोनी ।
बाल दर न धरि कैसें मान्य माय वेत्रपाणि पाहोनी ॥२३॥
भारत विराट रूपा भीषण तव पृष्ठभाग वंदोनी ।



पुढिलाचि वंदितों मी हृदयाग्रीं स्थापिता सुनंदोनी ॥२४॥
मधुर आदिपर्व तुझें ज्यामाजीं देव सर्व अवतरलें ।
तद्विलासरस परिसुनि साचचि दनुतनयगर्वदव तरले ॥२५॥ (य९उ.४७२)

(अपूर्ण)

०००

॥ श्रीनारदस्तुति ॥

# ब्रह्मकुमार रत्नमाला

## २१८९ / गीति

वैष्णवगुरो हरितनो तुह्मां मम सतत नारदा नमन ।
भवदीयदयें स्वपदीं कैसें चुकवील नारदान मन ॥१॥
भक्तिरसावाचोनी कैवल्यहि होय नारदा मातें ।
यास्तव भवदुपदेशें हो यदुपतिरतिच पारदा मातें ॥२॥
तुम्हां व्रजेश्वर जपती त्या तुम्हि जपता ह्मणुनिच भिदा ना ।
मग हरिपत्नी ह्मणवुनि तुमच्या मी जपुं कसें न अभिधाना ॥३॥
कलहप्रिय तुह्मि ऐसें शठजिव्हेनें कदापि न वदावें ।
या व्यसनाचे माझ्या चित्तां लागो अखंड नव दावें ॥४॥
कळि करुनी कोणाचा नाहीं सत्कर्मघात केला हो ।
उभयपक्ष उद्धरिले मीहि भवत्पददये भुकेला हो ॥५॥
धृतराष्ट्रा सुखमंत्रा देउनियां बोधिला सुयोधनही ।
त्या तुह्मां कलहि ह्मणे तन्मातेचें जळो पयोधन ही ॥६॥
स्कांदीं शाप तुम्हाला विप्रें दिधला किं मूर्ख होशील ।
परि तो बाधे न तुम्हां सज्जनिं हे सर्वदाचि हो शील ॥७॥
भुवनभया दूर करी त्यास विकारहि सुयोग्यता चढवी ।
कनका कसवटि घासुनि तेजास्तव अधिक मोल सांपडवी ॥८॥
माझ्या विनंतीसाठीं शाप स्कंदादि उक्त वारोनी ।
दीनदयाळा यावें मज ताराया भवा निवारोनी ॥९॥
शाप न बाधो तुम्हां कोणाचा कधिंहि हेंचि मी मागे ।
हृदयांत मूर्ति तुमची राहो सारोनि गर्व मी मागे ॥१०॥
भक्तिसूत्र पाहोनि घेत जीव धाव हा तुम्हापायीं ।

उचलुनि कडिये घ्या हो मोडुनियां सर्वकाळ मा पायीं ॥११॥
द्या यदुवर वर मातें मी मागे हें करोनि दंडवत ।
उपवरकन्याचिंता ताडी पितया अखंड दंडवत ॥१२॥
प्रभु वेणुनाद विसरे गाता स्वर भरूनि महति[1]तारा हो । (य९उ.४७३)
स्मृतिगामी स्वामि तुम्ही धावुनिया विश्व विश्व तारा हो ॥१३॥
फार श्रमला भ्रमणें घ्या मम हृदयांत चिर विसावा जी ।
निरखुनि दीनविनंती, संतपदा आग्रहो नसावा जी ॥१४॥
ज्ञानेश्वरस्वरूपें हृदयीं राहुनि कुकाम पळवा जी ।
चपळ वाजिमन रोधुनि उचित भक्तिरस मतीस कळवा जी ॥१५॥

(१.श्रीनारदांच्या वीणेचे नांव)

०००

श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ.

# संस्कृत-पदानि

(सूक्तिरत्नावली यष्टी ९ उत्तरार्ध पदगाथाक्रमांकानि २१९०-२२३०)

२१९०

सामनुष्टुप. मूळ.-पूर्वी. ता.-तेताला. गौण.- सगुण चरित्रे.

मदनदहनप्रियवृषभानुसुतापतिं भजस्व मनः ।
यत्कृपया भवभुजगवदनतो दूरे यान्ति जनाः ॥धृ॥
कामक्रोधमदलोभैःसह त्वं मा कुरु व्यवहारम् ।
गुरुशास्त्राभ्यां श्रुत्वाऽलोचय परब्रह्मसारम् ॥मदन ॥१॥
त्यक्त्वा गौतमकणादतर्कं श्रुतिमार्गेणैहि ।
अन्वयव्यतिरेकतोऽथ पश्य ब्रह्मणि जगन्नहि ॥मदन ॥२॥
कृष्णभक्तिमिच्छसि चेच्चिन्तय व्रजदारान्सगुणान् ।
ज्ञात्वा सच्चित्सुखमितरेषात्र पश्य दोषगुणान् ॥मदन ॥३॥
अनध्यस्तमत्कान्तं दृष्ट्वा चित्तनुसाकारम् ।
ज्ञानेश्वरकृपया नाम्ना च न प्राप्स्यसि संसारम् ॥मदन ॥४॥

२१९१ / श्लोक.

विभाति सच्चित्स्वसुखं यदा तदा । न दृश्यते विश्वमनेकरूपगम् ।
परं पदं यं श्रुतयो वदन्ति तं । शिवं गुरुं शंकरमीश्वरं भजे ॥



२१९२

सर्वेषु शास्त्रेषु गुरुप्रसादतः । पश्यन्ति कृष्णेन सहाविरोधम् ।
तेषां न वैतण्ड्यभयं कदा भवेद् । अग्नौ न दह्यन्ति यथाग्निकीटकाः ॥१॥
(य९उ.४७४)

२१९३

प्रामाण्यविचार

जय जय हर इत्युच्चारमात्रेण हि त्वम् ।
जहि भवगतिमेतां स्थिरबुद्धे महात्मन् ॥१॥
इहपरपुरदोषालोकनाद् रागमुक्तः ।
श्रुतिपथमविकारं गच्छ हित्वाऽन्यशास्त्रम् ॥२॥
श्रौतं स्मार्तमथैतिह्यं प्रमाणं शब्दकं त्रिधा ।
तर्केणास्यनुकूल्येनाऽनुभूत्या च विचारयेत् ॥३॥

२१९४

धर्मलक्षणम्.

ईश्वरास्तित्वबुद्धिस्तु सुकृताचरणं तथा ।
सामान्यत्वेन गृह्णीयादेतद्धर्मस्य लक्षणम् ॥१॥

कृष्णाष्टमी

अष्टमीचें वेळेला लीलावैचित्र्यानें भाषण केले आहे. उत्सव समयीचें श्लोक

२१९५ / श्लोक

भगवन्नत्र किं चित्रं यस्माद्भिन्नं जगन्नहि ।
यत्र ते भावना जाता स वै साक्षात्परेश्वरः ॥१॥
सर्वेषामेव योगिनां मध्ये श्रेष्ठो महामुनिः ।
भगवान् ब्रह्मपुत्रोऽस्ति तेन प्रोक्तमिदं पुरा ॥२॥
राधिकाशापयोगेन व्रजेऽस्मिन्नागतो हरिः ।
तस्मात्तद्दर्शनायैव मामद्य नय सद्गुरो ॥३॥

२१९६ / पद

रंभावृत्त. रा.- सारंग. ता.- तेताला.

संसारेऽस्मिन् गुरुचरणौ भज ॥धृ॥
जगदिदमखिलं मायारचितम् । मत्वा अनृतेर्द्राग् विरज विरज ॥१॥
पश्यसि यत्तत् सकलमनित्यम् । विष्णुगुणेषु समनुरज अनुरज ॥२॥
ज्ञानेश्वरं मे कान्तरूपिणम् । स्मृत्वा दीनेषु दयां सृज सृज ॥३॥

२१९७

रमावृत्त. रा.-यमन ता.-तेताला.

भज राधारंगं । मानस ॥धृ॥
प्रमदाहृदयरतीशशमन्तम् । सुखसिन्धुतरंगम् ॥ मानस ॥१॥
सच्चित्सुखघनतनुमविकारं । निजजनभवभंगम् ॥ मानस ॥२॥
गोपीपीनपयोधरपाणिं । विठ्ठलतनुजांगम् ॥ मानस ॥३॥ (य९उ.४७५)

२१९८

चेतो भज युगलकिशोरम् ॥धृ॥
स्त्रीसुतधनजायासु ह्यस्मिन् । संसृतिपारनिसारम् ॥ चेतो० ॥१॥
ज्ञानेश्वरकन्याकुचमर्दन- । कारकमिच्छितभारम् ॥ चेतो० ॥२॥

शिवस्तुति

२१९९ / श्लोक

यस्य ज्ञानं सर्वविज्ञानरूपम् । यस्य ध्यानं सर्वसंप्रापकं च ॥
योऽर्वाचीनो माययाऽनुग्रहाय । तं सद्भक्त्या पार्वतीशं प्रणौमि ॥१॥

२२००

शशिशिररतिपात्रं शुद्धचैतन्यमात्रम् । विमलसुगुणगात्रं भक्तसंछिन्नरात्रम् ॥
निगमगतिविहारं सम्भृतान्धान्धभारम् । व्रजयुवतिविलासं व्रीडहासं प्रणौमि ॥२॥

२२०१

यस्य ध्यानात् स्थैर्यतामेति चित्तं । यस्य ज्ञानान्मुक्ततां याति जीवः ॥
यद्धर्मेणावाप्यते चित्तशुद्धिः । तत् ब्रह्मैकं पार्वतीशं नमामि ॥३॥

२२०२

शिवस्तुति / श्लोक

यदज्ञानान्माया भवि सविलासद्युतिधरा ।
यतो यस्य ज्ञानादपनयति तां सन्निगमवित् ॥
असावात्मज्ञप्तौ सतनुरिहतं स्वीयसदयम् ।
शिवं वन्दे सद्यः तुहिनतनुजानन्दनिलयम् ॥१॥

२२०३

कोऽयं भो नयने महाद्युतिधरो वह्निर्न शंकां कुरु ।
कोऽयं भो शिरसीन्दुरेव गिरिजे नैवानृतं मे वचः ॥
केऽयं केशसमाश्रितेति वचसा मौनं समासादितः ।
संरम्भं प्रणयादुमा कृतवती यस्मिन् शिवः पातु नः ॥२॥



२२०४

वेदा यस्य प्राणतः सम्प्रवृत्तः । संकल्पाद्वै खादिभूम्यन्तभावाः ॥
सत्यज्ञानाऽनन्दमन्तर्बहिस्थं । तद् ब्रह्मैकं पार्वतीशं प्रणौमि ॥३॥

॥ शिवस्तुति समाप्ता ॥

०००

२२०५

श्रीकृष्ण स्तुति

अन्योन्यत्राध्यासतः संगभावात् । ब्रह्मैवैकं संसरत्यत्र मोहात् ।
तद्यत्प्रेम्णा सर्वसंगं विहाय । मुक्तं स्यात्तं गोपबालं नमामि ॥१॥

२२०६

ब्रह्मज्ञानात्केवलानन्दलब्धौ । संधौ वृत्तौ प्रेमभक्त्यैव सिद्धः ।
योऽनध्यस्तः तिष्ठमानो विवर्तो । विश्वात्मानं तं स्वकान्तं श्रयेऽहम् ॥२॥
(य९उ.४७६)

२२०७ / उपदेशपर

भव भव सुभक्तिनिष्ठो इष्टज्ञानेन पूर्णतामेहि ।
अनित्यमसुखं लोकं ज्ञात्वैकान्ते भज स्वमात्मानम् ॥१॥

२२०८

शिवशक्ति स्तुति

संसारे पतितस्य दुःखिततनोरात्माभिलाषास्थितौ ।
कारुण्येन महत्तरेण वपुषा साकारतामागतौ ॥
गाढालिंगनरूपिणौ चितिमयौ यौ ज्ञानवृत्त्या भिदौ ।
वन्दे हैमवतीश्वरौ प्रणयतः कैवल्यमुक्तिप्रदौ ॥२॥

२२०९

अंबास्तुति

यद्यसि जगतो माता तस्मान्माता ममाप्यनायासात् ।
स्तनपानार्तं मामपि दृष्ट्वा धावसि कथं नु गिरिकन्ये ॥१॥
यद्यसि निजपतिसेवानिरता त्वं धर्मपालनाद्धेतोः ।
तदपि स्वसुतप्रीत्या रुणद्धि न हि ते पिता शिवोऽपि मम ॥२॥
त्वय्यपि सुताभिलाषा मयि तु क्षुद्दीनता महत्यस्ति ।
स्वसुतं मत्वा त उमे पालय मे स्तन्यदानतो मातः ॥३॥
पीतो गजवदनादिभिरपि तेन स्तनपयोर्णवः क्षीणः ।

स्वीयप्रेमतरङ्गैरुल्लसितो दृश्यते यतो नित्यम् ॥४॥
लालामलमूत्रमयं परतन्त्रं दुःखरूपमपि बाल्यम् ।
पुत्रीकृत्य त्वया चेत् अङ्गीकृतमयि तदेव संयाचे ॥५॥
शतशः सन्त्यपराधाः क्षन्तव्यस्ते त्वयैव मे मातः ।
स्तन्यं विना क्व कार्यं क्रीडासक्तं न चित्तमपि तद्वत् ॥६॥
तरुणं वयो न याचे तव कुचदुग्धं विना कुतो जरठम् ।
मे स्यात् सदैव बाल्यं यस्मिन्स्त्वं पास्ययं ममेति धिया ॥७॥
पयःप्रदानेन सदा पासीत्यनुभूतिमानमस्ति मम ।
तावत् चिन्मयि माता प्रौढापि[1] जडा कुतो वदन्ति बत ॥८॥
तव यदि वरमासाद्य श्रेष्ठो जीवति चिरं ऋषिःकाकः । (य९उ.४७७)
तर्हि स्तनपानात्तव बाल्यं मे स्यात् कुतो न ब्रह्मसमम् ॥९॥
धनवनिता-मति-विक्लवमयमति-मतिरेव यौवनं श्रयते ।
शिवगिरिजालालनजे बाल्ये कैवल्यमेव मन्येऽहम् ॥१०॥
मूत्रेण मूत्रयोगो वनितायोनौ हि यौवने चेताः ।
मूढ स्पृहयसि किं तत् बाल्ये गिरिजास्तनं पिबस्व सखे ॥११॥
मदर्थमपि ताडनमिव ते चेत्त्वं भवसि शोकसंमग्ना ।
झटिति स्वाङ्के कृत्वा सान्त्वयसे स्तनपयःप्रदानेन ॥१२॥
केनाऽपि ममावगुणः कथितश्चेद्वदसि रोषयुक्तधिया ।
एवमरे किं प्रौढये कः स्याद्बाल्ये गुणीनुदर्शय माम् ॥१३॥

*(१.हा छांदस प्रयोग आहे. हे सखेतिवत् )*

०००

तात स्तुति.

२२१०

यस्य प्रसादात् परमार्थरूपात् । नार्यप्यहं विष्णुरूपा बभूव ॥
यो विग्रही भक्तसंज्ञानहेतो-। र्ज्ञानेश्वरं तं शरणं प्रपद्ये ॥१॥

उपदेशपर प्रश्नोत्तरे

२२११

ज्ञानस्य तत्त्वं कथमस्ति सम्यक् । भूतेषु साम्यं परमार्थरूपं ॥
भक्तेः स्वरूपं कथमस्ति तात । ज्ञातेपि तत्त्वे हरिपादसेवा ॥२॥

उपासनापर

२२१२



पितास्तु देवो पितृपूजकानां । माता गुरुश्चैव विधेयकानाम् ।
दैवं हि देवो बहु कामिकानां । ममास्तु कान्तो भगवन्परेशः ॥३॥

स्वयं महाराजानां नित्यमुक्तता

२२१३ / वेदान्तपर

गर्भेऽथ बाल्ये तरुणे जरायां । मृतौ जनौ स्वर्गयमालये वा ॥
भक्तावभक्तौ विरतावमुक्तौ । नाहं स्वरूपच्युतिं संस्मरामि ॥१॥

२२१४

देवी स्तुति

सत्यां ज्ञानमयीमनन्तवचगां शान्तां सुखैकान्तिकाम् ।
कान्तां शंकरभूतपालनविभो रे कान्तवार्त्तां श्रियम् ॥
भक्तानुग्रहहेतुरद्वयतनुं श्यामां जगत्सुन्दराम् ।
अम्बामातरमंगजावनरतां स्वां देवतामाश्रये ॥१॥

रा. रा. त्रिपुरवार यांनी महाराजांना समस्या दिली ती महाराजांनी पूर्ण केली.

२२१५

न ह्यस्ति पूर्णपरमार्थसुखावबोधो ।
विद्यास्ति किंतु न हि कोपि ततो रसज्ञः ॥
वांछायतो महति भूपतिजादरस्य ।
तस्माद्व्रजन्ति कवयो धनदुर्मदान्धान् ॥१॥

२२१६ / उपासनापर

कमलारंगीवृत्त. रा.-बेहाग. ता.-तेताला (राजविद्याधर)

गोविन्दं वन्दे ॥धृ॥
या पदभजने निर्वृतिरस्या-। ऽसौ न चिदानन्दे ॥ गोविन्दं ॥१॥
करुणार्णवतनु मयि करुणाम्बु । मनसिज मतिमन्दे ॥ गोविन्दं ॥२॥
श्रीज्ञानेश्वरकन्या क्रीडति । केवलचितिछन्दे ॥ गोविन्दं ॥३॥

२२१७ / भगवत्स्तुति

कमलारंगीवृत्त. रा.- छायानट. ता.- तेताला.

वन्दे गोपालम् ॥धृ॥
देवकितनुजं मायामनुजं । भुवनत्रयपालम् ॥ वन्दे ॥१॥
शशिधर प्रियकर कमलाकान्तं । मुखमुरलीलोलम् ॥ वन्दे ॥२॥
अलकावतिपतिनन्दिनिरमणं । करुणाकल्लोलम् ॥ वन्दे ॥३॥

२२१८ / यत्नप्रशंसा

यः कालं प्रहिणोति तीव्रगमनात् यश्चेश्वरोपेक्षते ।
दैवं येन विना न यच्छति फलं यस्मिन् स्थितं जीवितम् ॥
जीवः कोऽपि यतो भवत्कमलजोऽन्यः शंकरोऽन्यो हरिः ।
विश्वं यस्य बलाद्धिनस्ति दुरकं यत्नाय तस्मै नमः ॥१॥ (य९उ.४७९)

२२१९ / उपदेशपर

(कोणा एका आईला सांगितले.)

वेदान्तश्रवणं शुद्धं मयि पुत्रत्वभावना ।
सत्संगश्च स्वधर्मश्च शिवविष्णोरुपासनम् ॥१॥

(पाठान्तर - भजनं शिवकृष्णयोः)

एतानि साधनान्यत्र कथितान्यात्मसिद्धये ।
कृत्वा प्रेमवशात्तूर्णं कृष्णत्वमनुभूयताम् ॥२॥

२२२०

नाहं वेदपदार्थतत्त्वविदुषी न्यायादिवादे रता ।
नाहं योगविवेकयज्ञफलभुक् नालंकृतालंकृतौ ॥
नाहं मुक्तिसुखाभिलाषनिरता मुक्ता न संसारिणी ।
यो गोपीकुचमर्दने पटुरहं तन्मन्दिरे मार्जनी ॥१॥

२२२१

व्यासांच्या चतुःसूत्रीवर

सुशीलावृत्त. रा.-केदार. ता.-तेताला (राजविद्याधर) करुणापरः

भगवन् मामवलोकय तात ॥धृ॥
अलकावतिवल्लभ करुणार्णव अपवर्गश्रीकान्त ॥ भगवन् ॥१॥
जनजनिभरणविलयक निगमकृत् सत्यं ज्ञानमनन्त ॥ भगवन् ॥२॥
ज्ञानेश्वर गुरुनाथ दयालो जय निगमान्तप्रान्त ॥ भगवन् ॥३॥

२२२२

महाराजांनी केलेली

मातुःश्री अलोका आईची स्तुति

*

न याचे भूराज्यं रुचिरसुरसाम्राज्यमपि नो ।
न वा ब्राह्मन्धाम प्रवरकपुरं नो हरिपुरम् ॥
न कांक्षे कल्याणं न च परपदानन्दपदवीम् ।
परं कांक्षेऽलोकाचरणकमलप्रीतिमचलाम् ॥१॥



०

२२२३

रसालावृत्त. रा.-बिलावल. ता.-तेताला.

कृष्णं भज मतिमोहनकारम् ॥धृ॥
मदनारिविनोदास्पदमीशं । विज्ञानामृतसारम् । कृष्णं ॥१॥
येनापहृतोऽर्जुनस्य शोकः । दत्वा गीतासारम् । कृष्णं ॥२॥ (य९उ.४८०)
मद्भगिनीभिः सेवमानकं । वेणूनादोद्धारम् । कृष्णं ॥३॥
ज्ञानेश्वरकरुणाघनकृपया । स्मर मधुमुरहन्तारम् । कृष्णं ॥४॥

२२२४

शिवस्तुति

यद्राजसं रूपमुत्पत्तिहेतौ । सत्त्वं स्थितौ तामसमन्तनिष्ठम् ।
यत्कारणं वेदमयं तुरीयम् । उमासहायं पितरं श्रयेऽहम् ॥

२२२५

गणेश-वंदन

रमावृत्त. रा.-भूप ता.- तेताला.

वन्दे सुगजाननचरणम् ॥धृ॥
विघ्नैरभिभूतेऽस्मिंल्लोके । त्वदन्यो न शरणम् ॥१॥
धृत्वाऽलंदीपरूपं विभो । वारय जनिमरणम् ॥२॥

२२२६

ज्ञानेश्वरकृपालेशात् श्रीकृष्णस्य प्रसादतः ।
योषित्सु मातृबुद्धित्वात् वयं वै निर्भयास्सदा ॥

२२२७

शिवस्तुति

शिवाय शूलिने नमः शशांकशालिने नमः ।
पिनाकधारिणे नमोऽन्धकान्तकारिणे नमः ॥
उमाविहारिणे नमोऽखिलाघहारिणे नमः ।
कपालिने नमोनमः कपर्दिने नमोनमः ॥

२२२८ / मंगलाचरणपर

देवीस्तुति

वीरजननीवृत्त. रा.-भूप. ता.- मुक्तदेशी. झंपा. देवीस्तुति. मंगलाचरण

जय जगज्जननि जय दनुजदलिनि ॥धृ॥

अंब जगदंब करुणाकिरणकीरिणि । तुहिनतनुनन्दिनि प्रवररमणि ॥१॥
त्रिपुरसुंदरि शिवे अशिवसंहारिणी । मदनदतितीर्षुणां पूर्णतरणि ॥२॥
ज्ञानदेवात्मजा याचते मेय्युमे । नन्दनन्दनकरे देहि जननि ॥३॥
जय जगज्ञनिनि जय दनुजदलिनि ० ॥ (य९उ.४८१)

तातस्तुति

२२२९ / श्लोक

सूर्यो भासयते न यश्चितिपदं नानन्ददश्चन्द्रमाः ।
विद्युद्वाप्यनलोऽथवा न पुनरित्येवं किमाभाष्यते ॥
तन्मायारहितं तथापि तनयोद्धाराय दृग्गोचरम् ।
श्रीन्द्राणीपुलिनेषु खेलनिलयं वन्दे महीयो महः ॥१॥

२२३०

अम्बारूपेण यो मे सुखमनुतनुते पाययंस्तन्यमीशः ।
यस्तातः पाति कृष्णः पतिरतिमपि मे केलिकीर्तिर्बिभर्ति ॥
योऽनध्यस्तो[1] विवर्तः सकरुणहृदयोऽलंदिपीठाधिवासः ।
सोऽयं श्रीसद्गुरुर्मे प्रभवतु भवतां भूतये ज्ञाननाथः ॥२॥

*(१. आचार्यो यः स्ववाचा प्रहरति कुभिदामात्मनोर्मन्दवेद्याम् ।*
*सोऽलन्दीन्द्रः कृपालुः प्रभवतु भवतां भूतये ज्ञानदेवः ॥ पाठान्तरम् )*

०००

श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ.

# तुमडी प्रकरण

२२३१

सांगतो मी दादा तुम्हां करुनी नमस्कार ।
आधी होतें ब्रह्म जगापूर्वी निराकार ॥१॥
त्याचीमंधी माया मिथ्या होती निर्विकार ।
चेतनाचे संगे बाबा मायेला विकार ॥२॥
मायेपोटीं झाले बाबा तीन ते आकार ।



ब्रह्मा आणि शिव आणि विष्णु सर्वाधार ॥३॥
तिघामुळे तीन गुण पावले विस्तार ।
रजोगुणीं ब्रह्मा तमोगुणी शीवीं थार ॥४॥
सत्वगुणीं विष्णु सर्व सज्जनां आधार ।
त्याची करा भक्ति उतराल भवपार ॥५॥
नारी सुत धनमाया पाश अवघा सोडा ।
अरण्यांत बाबा साधुसंगतीला जोडा ॥६॥
सांगती जे गुरु त्यांचे वचन ना मोडा ।
तोडोनियां टाका बाबा कालाचाही खोडा ॥७॥
दृढ करा निज निष्ठा, कोणते न खोडा ।
पायामंधी बांधा शांतिक्षमेचाही तोडा ॥८॥
एकदम नोहे तरी अभ्यास तो जोडा ।
हळुंहळुं इंद्रियांच्या सर्व खोडी तोडा ॥९॥
प्राणाची ते गती निज हृदयांत मोडा ।
मनाच्या वासना ध्यानबळे आधी तोडा ॥१०॥
सगुणभजनीं मग बुद्धि लावा ओढा ।
ज्ञान घेवोनीयां मग अविद्याही सोडा ॥११॥
वंदुनियां राहा ज्ञानेश्वरपदजोडा ॥१२॥

२२३२

द्रौपदीची गोष्ट

वंदुनिया भावें आतां ज्ञानेशमाउली ।
गोठ सांगतों तुम्हां दादा एक याद आली ॥१॥
भक्तासाठीं देव बाबा करितो श्रम भारी ।
दापारांत होती एक पांडवांची नारी ॥२॥
यज्ञ झाला एके दिशीं पांडवांच्या दारीं ।
नाना परी राजे आले द्विज परोपरी ॥३॥
दारकेचा देव आला तव्हां पूतनारी ।
उष्टे पात्र काढी हरी आपुलिया करीं ॥४॥

ऐकारे दादाहो भाव धरावा अंतरी ।
ब्रह्मांडाचा स्वामी होता आपुल्या मंदिरीं ॥५॥
एके दिशीं वाढतसे पांडवांची नारी ।
दूध तूप दही (हाती) तव्हां गर्दी झाली भारी ॥६॥
चोळीचे पदर गांठ सुटली ते सारी ।
खालें तोंड उभी तव्हां पांडवांची नारी ॥७॥
लाजले सज्जन खळां हर्ष झाला भारी ।
द्रौपदी अंतरी तव्हां स्मरे पूतनारी ॥८॥ (य९उ.४८३)
चतुर्भुज करुनी केली खळांची बोहरी ।
ज्ञानेश्वर स्वामी माझा सर्व सहाकारी ।
असतां भय काय मग कोणातें संसारी ॥९॥

२२३३

साधना

वंदुनियां आधीं बाबा सद्‌गुरूचे पाय ।
सांगतों मी ऐका तुम्ही श्रोते बापमाय ॥१॥
ब्राह्मणांचे वेद नारीशूद्राचें पुराण ।
इतर अडाणियांचे भाषाकथादान ॥२॥
म्हणोनियां भाषा हरीकथा ते प्रमाण ।
जिच्यामध्ये होय सर्व वर्णदासां मान ॥३॥
सज्जनांसी सदा बाबा लववावी मान ।
धरूं नये कदा बाबा जाती अभिमान ॥४॥
लाथ मारोनिया सोडा मान अपमान ।
हृदयांतून सोडा बाबा विद्येचें गुमान ॥५॥
करुनियां तप करा देहाची कमान ।
गुरुवाक्यें साधनेही करावी तमाम ॥६॥
म्हणा कृष्णराम किंवा म्हणावा इमाम ।
वैराग्याचे बळे परी सोडा हम् तुमाम ॥७॥
पुराणांच्या कथा बाबा भाषेमध्यें साऱ्या ।



तुम्हां सांगून देऊं बाबा मोक्षासाठी खऱ्या ॥८॥
ज्ञानेश्वर आधी एक स्मरावा सद्‌गुरु ।
तुमडीच्या छंदामधी कीर्तन ते करू ॥९॥

२२३४

व्याध व ब्राह्मणाची कथा

देव तंव वाढवितो भक्तांचाची मान ।
न लगेची त्याला कांही जाती अभिमान ॥१॥
ऐसे सांगतसे बाबा सुकंद पुरान ।
कोणी एक द्विज होता थोर त्याला मान ॥२॥
रुद्रपूजा नित्य करी येतां दीनमान ।
बेलफूलनैवेद्यादि पूजेचा तो मान ॥३॥
एक व्याध होता त्याची जाती अप्रमाण ।
थुंकोनिया देवावरी वाहे बेलपान ॥४॥ (य९उ.४८४)
देव करी ब्राह्मणाच्या पूजेचा अवमान ।
शिरावरी घेतो पारध्याचे बेलपान ।
ब्राह्मण पाहुनियां स्वपूजेचा अपमान ॥५॥
म्हणे कोण चांडाळ हें करिताहे काम ।
जागुनियां आतां त्याला दावूं यमधाम ॥६॥
रात्रभर जागुनिया तेव्हां महीदेव ।
प्रातःकाळी पाहे तंव वर्तताहे भेव ॥७॥
कोणी एक व्याध आला उठोनी सत्वर ।
बेलपान वाहे थुंकोनियां देवावर॥८॥
ब्राह्मण कोपला तेव्हा शिवावरी फार ।
म्हणे तुज आवडतो व्याधाचा प्रकार ॥९॥
देव म्हणे तुला उद्यां दावीन प्रचीत ।
पूजा घेवोनियां येई सकाळींची रीत ॥१०॥
ब्राह्मण आला पूजा घेऊन आणि आला व्याध ।
पाहातों तों लिंग भंग झाले अवसाद ॥११॥
ब्राह्मणाने मंत्र म्हणून शांति केली फार ।
भोजन घातलें बाबा नदी गेली तूपधार ॥१२॥

व्याध आला तेव्हां पाहे लिंगभंग थोर ।
हाय हाय म्हणुनियां छाती पीटी भोर ॥१३॥
प्राणाचाची पण केला लावुनियां जोड ।
तोडूं पाहे कंठ देव म्हणे हे न तोड ॥१४॥
ब्राह्मणासी बोलावूनी बोले देवराव ।
पाहे पाहे पाहे बाबा पारध्याचा भाव ॥१५॥
मज नाही रूप नाहीं नांव नाहीं ठाव ।
भक्तासाठी नांव आणि वसवितो गांव ॥१६॥
जेथें भक्त तेथें माझा नित्य आहे ठाव ।
सांगुनियां गेले ऐसें अळंदीचे राव ॥१७॥ (य९उ.४८५)

०००
०

श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ.

# गाणी - स्त्रीगीते

२२३५

बाई माझा प्राणनाथ । मेघःश्यामल तनू ।
परी तो मिळवाया । गुरुपाय सेवा अणू ॥१॥
आज मी प्राणनाथा । अमोल झालें दासी ।
मज वाटे कोटी जन्म । सेवीली तीर्थ काशी ॥२॥
संताच्या संगतीनें । न तरे ऐसा कोण ।
पाषाण मुक्त झाले । नराचा पाड कोण ॥३॥
बाइ माझा प्रियकर । अखंड निर्विकार ।
मज दीना रक्षावया । भासतो सविकार ॥४॥
पहिल्याने स्वयंवर । वरिला कृष्णराजा ।
मग मीं आले लोकी । विश्वाच्या मातृकाजा ॥५॥
पहिल्याने आले न्हाण । मखर जडिताचा ।
श्रीकृष्ण प्राणनाथ । खेळ खेळे घडीताचा ॥६॥
पहिल्याने गरवार । स्वानंद आशा पोटीं ।
उपजलें विश्वकोटी । चाल सखूगडणी०॥७॥



चौरंगावरी देव । बैसविला भक्तिभावे ।
उटणे लावितांना । तया निर्मळा मळ नोहे ॥८॥
बाइ माझा कृष्णनाथ । मुळींचा ब्रह्मचारी ।
गाऱ्हाणें देयावया । चाळक तुम्ही नारी ॥९॥
तूमचा बाळ तुह्मा । लाडाने वाटो गोड ।
पूरवी बायकांचे । आजचि कामकोड ॥१०॥
धांगडी तुम्ही बाया । करीतां नित्य चाळे ।
पांचाचि वरूषाचे । रामकृष्ण माझी बाळे ॥११॥
सुखसंपन्न मज स्वामी । नोहे आणिक अनुगामी ।
नंदनंदन हरि माझा । वसो माझ्या मनधामी ॥१२॥ (य९उ.४८६)
नांवाच्या ब्रिदासाठी । भक्तांच्या दारोदारी ।
यशोदे बाळ तूझा । गोकुळी होतो नारी ॥१३॥
माझीया बाळा पुढें । सारीखे नारीनर ।
जैसे गगन सर्वाकार । चाल सखूगडणी० ॥१४॥
कौस्तुभ कंठमणी । सोडोनियां निकाज ।
गुंजाच्या माळा कंठी । घालितां नाही लाज ॥१५॥
बाई माझा कृष्ण तान्हा । प्रेमाच्यासाठी वश ।
सोडोनी क्षीराब्धीजा । गोकूळी करी वास ॥१६॥
मोकळा तूझा बाळ । बंधन आम्हालागी ।
येऊनी तैशामध्ये । दाखवी भाव आंगीं ॥१७॥
बाइ माझा बाळ तान्हा । मोकळे सर्वा करी ।
तुम्हीच बंधनाला । धरीलें निज शिरीं ॥१८॥
पहिल्या पहिल्याने । दिसतो शाहुसम ।
पुढें हा कृष्ण करीं । दही चोरीचे काम ॥१९॥
तुम्हीच खातां दही । माखतां कृष्णमूखीं ।
टाकोनी व्रज जावे । आणिका वनी सुखी ॥२०॥
रागावूं नको बाई । डोळ्याने पाहे खोडी ।
कृष्ण हा माती खातो । सांडूनी स्तन्यगोडी ॥२१॥
बाई माझा कृष्ण तान्हा । पीतसे प्रेमपान्हा ।
लटिक्या तुम्ही नारी । आणिता आळी नाना ॥२२॥
निजतां रजनींत । मारोनी आंत खडे ।
जागवी अवघ्या जना । लेंकरूं हे रोकडे ॥२३॥

जावो जा घरी नारी । माझ्या बाळाला बोलूं नका ।
मुनीही ध्याती जया । तो मिळाला आम्हां फुका ॥२४॥
बाई हा जगन्नाथ । यासी गाताती वेदवाणी ।
म्हणोनी खोडकर । याला वर्जिता नाही कोणी ॥२५॥
उनाड माझा मला । तुम्हासी करणे काय ।
माझीया दारामध्ये । न द्यावा पुन्हां पाय ॥२६॥ (य९उ.४८७)
बाइ आली ही आली गाई । गाय ही हंबरत ।
बाइ माझा मेघःश्याम । श्रीकृष्ण दूध पीत ॥२७॥
हाड हाड गाई । गाई गेल्या पाण्या ।
माझीया नंदलाला । साखर देजो वाण्या ॥२८॥
नीजतां नीज नाही । कोण्या सवती पायी ।
हरि माझा कोमावीला । पीयेना स्तन्य कांही ॥२९॥
टोचीन गळनाडे । घेईन शिवदीक्षा ।
माझीया कृष्णासाठी । आणीन रामरक्षा ॥३०॥
म्हणतां तुझी माय । वाटते लाज मनी ।
तूं माझी कृष्णबाई । जनक आणी जननी ॥३१॥
मारोनी कंसराजा । जगाचे केले काज ।
मी एक दुःखी आहे । पाहोनी रिता साज ॥३२॥
जनाला कृपावंत । निष्ठुर मातेसाठीं ।
ऐसा नाही देखिला । पुराणीं पोटीं पाठीं ॥३३॥
आजीचें कृष्णगीत । ऐकोनी तोषो हरी ।
ते गीत प्रेमभावे । वाहीले ज्ञानेश्वरी ॥३४॥
०००

# शय्या गाणी

२२३६

बाई माझा कृष्णबाळ । दिसतो फार हठी ।
रडतां न राहे उगा । आळ घेतो दुधासाठी ॥१॥
लोकांच्या लेकराला । नागळपण फार ।
श्रीहरी बाई माझा । गुणाचा शारंगधर ॥२॥



निज तूं निज बाळा । हालविते स्नेहाळा ।
क्षणभरीं विश्राम ग बाई । लागू दे निज डोळा ॥३॥
पाळणा हालवितां । दुखले माझे बाहू ।
कोणाची दृष्ट झाली ग बाई । मंत्रूनी पाणी देऊं ॥४॥
बाई सगुण बाळ माझा । खेळतो बिदी बिदी ग ।
दुखती रात्री पाय । करी चुरीन प्रेमामधीं ग ॥५॥
बाई जेवतां माझें बाळ । द्वारीं येताती बहु मुले ग ।
बाई कोणाची दृष्ट झाली । माझें लेकरूं कोमाविलें ग ॥६॥
(य९उ.४८८)
०००

# बालरक्षा

२२३७

गोकूळ सुखमय सुखमय । रत्नानें पूर्ण झाले ।
नंदजी बाबागृहीं बाबागृहीं । सुंदर बाळ झालें ॥१॥
सुंदर श्यामतनू । पाहिली डोळेभरी ।
वाटतें ओवाळुनी ग बाई । जावें ग ययावरी ॥२॥
मोहन नीजरूप । देखिलें डोळ्यांपुढे ।
वेद मुनीचें ध्यान ग बाई । साकार झालें फुडें ॥३॥
वाराह* रक्षो जळीं । वामन* रक्षो स्थळीं ।
अरण्यामध्यें रक्षो ग बाई । नरहरी* वनमाळी ॥४॥
नंदजी राय माझा । प्रजापालक मोठा ।
वंशही होवो तैसा ग बाई । दैन्याचा जेथें तोटा ॥५॥
मिळोनि चौघीजणी । बाई लेंकरूं चित्तीं धरा ग ।
नंदाच्या नंदनाला । जीवें निंबलोण ते करा ग ॥६॥
मोहन गिरिधारी धारी कृष्णाला राधा प्यारी ग ० ॥धृ॥
प्रथम भाव ज्यांच्या । हरिविषयीं चित्तीं नाहीं ग ।
प्रत्यक्ष पाहोनी तो । हरिमय होईल काई ग ॥ मोहन० ॥७॥
ध्यानानें आधीं ज्यांचा । नाहीं निवाला आत्माराम ग ।
सगुण पाहोनी तो । केवीं होईल तो निष्काम ग ॥ मोहन० ॥८॥

बाई सर्वही जणी चला । सांडोनी कामधाम ।
नंदजी बाबागृहीं । जन्मले मेघःश्याम ॥ चाल सखूगडणी० ॥९॥
गोविंद नाम गातां आनंद माझ्यामनीं । प्रेमळ शार्ङ्गपाणी ।
सुलभ प्रेम नाहीं श्रमुनी जन्मकोटी ॥
श्रीकृष्णी आसक्तता जैं वाढे दृढ पोटीं ॥१०॥
स्मरण ॐकाराचें । सरोनी जेव्हां जातें ॥
प्रणवा पैलीकडे । वस्तू तैं हातां येते ॥११॥
मोहन गिरिधारी धारी० ॥धृ॥

०००

# जेवण्याचे वेळची गाणीं

२२३८ अ

मोहन गिरिधारी धारी कृष्णाला राधा प्यारी ग ० ॥धृ॥
भात भजा कढी भाजी । बाई तिखट सर्व देवा ग ॥
ह्मणूनी तुह्मीं आधीं । तूप पूरणपोळी ही जेवा ग ॥ मोहन० ॥१॥
हाड[1] वो हाड गाई । गाई गेल्या त्या गेल्या त्या गोवर्धनीं ।
बाई माझ्या कन्यकेला । दूध पाजत चक्रपाणी ॥२॥

(१. तातांनी महाराजांनां गाणें ह्मटलें अशी येथे भावना आहे.)

२२३८ आ / कौसल्या वचन -

बाई माझा ग रघुराय । पाठविला कां वनीं ॥
बाई सकुमार सीता ती । परतूनी आणा कोणी ॥१॥
चित्पद ग कृष्णमूर्ती । स्वानंद शुद्ध भाव ।
ज्ञानानें चित्तीं ये स्फूर्ति । बाई स्फूर्ति ग ॥२॥
वैखरी वैखरी पासुनीयां । परे पर्यंत ग सखुगडणी ।
ठाव तो ठाव तो कृष्णनामीं । भाव धरीती संत ग सखुगडणी ॥१॥
भक्तीच्या गडावरी । बाई कळस हरी प्रीति ग ॥
समहि दोन्ही भावें । अखंड कृष्णमूर्ती ग ॥ मोहन० ॥२॥
सुंदर मुखबाह्या । दिसती बळकट ग ।
त्या हरिभक्तीवीण । कर्म तें फलकट ग ॥ मोहन० ॥३॥
पाहूं मी कोणाकडे । श्रीहरि तुझ्यावीण ग ॥



ध्यानाच्या बळावीण । नोहे ध्येयाकार हें मन ग ॥ मोहन० ॥४॥
गोविंद नांव घेतां । गोविंद चित्तवृत्ती ग ।
गोपी रमणमीषें । गोब्राह्मण सत्कीर्ति ग ॥ मोहन० ॥५॥
कमळनाभ ब्रह्मा । हिरण्यगर्भ जीव ।
कोमळ कृष्णपायीं । भक्त होताती नित्य शीव ॥६॥
बीजें तीं श्रुतिशास्त्रें । फळ तें भगवंत ॥
प्रेमाच्या रसामध्यें ग बाई । पूजीला रमाकांत ॥७॥
कोमळ मनावरी । उमटे हरीप्रेमा ।
करूनी ब्रह्मवाद ग बाई । कठोरतेची सीमा ॥८॥
मनुष्य योनी कृष्ण । असोनियां साक्षात ।
कालिया सर्पयोनी ग बाई । तारिला अकस्मात ॥९॥
जीवांची ऐसी शक्ति । योनीच्या सजातीय ।
ईश शक्तीपुढें ग बाई । उद्धरे विजातीय ॥१०॥ (य९उ.४९०)
गोपींचे पदरेणू । वंदीतो प्रेममय ग ।
जयांच्या गीतयोगें ग बाई । पावन लोकत्रय ग ॥११॥
मोहन गिरिधारी धारी राधा कृष्णाला प्यारी ग ॥धृ॥
संकेत दृष्टीयोगें । मोडावें वृत्तीपण ।
श्रीहरिभक्तियोगें ग बाई । जाळावा अभिमान ॥१२॥
झालिया अहंकार । साधावी गुरुसेवा ।
तयाच्या कृपागुणें ग बाई । आनंद स्वयें व्हावा ॥१३॥
ब्रह्म हें ब्रह्म हें नाहीं जग । सुवर्णी जैसें नग ग सखुगडणी०।
सर्वही सर्वही विष्णु अंग । सर्वही विष्णु अंग ॥१४॥
वरते वरते याचें मूळ । खालते आल्या शाखा ग सखुगडणी० ।
अनित्य अनित्य जाण सखा । अनित्य जाण सखा ॥१५॥
चारीही चारीही मुक्ति दासी । समाधी लागे पायीं ग सखुगडणी० ।
नमो ती नमो ती मुक्ताबाई । नमो ती मुक्ताबाई ॥१६॥
भक्तीचा भक्तीचा क्षीरसिंधू । सोपानदेव काका ग सुखगडणी० ।
वंदिला वंदिला शिरीं नीका । वंदिला शिरीं नीका ॥१७॥
निवृत्ती निवृत्ती दीनबंधू । तत्पायीं जीवभाव ग सखुगडणी ।
अर्पितां अपितां एकमेळे ।
पावले ज्ञानदेव पावले ज्ञानदेव ग सखुगडणी०॥१८॥

भल्याच्या भल्याच्या संगतीनें । अपवर्गी होय गती ग सखुगडणी ।
हरिपायीं हरिपायीं जडे प्रीति । हरिपायीं जडे प्रीति ॥१९॥

तत्त्वमसि

तत्पद कृष्णपती । त्वंपद गोपनारी ।
असिपद तो रास । ठायीं क्रीडती एकाकारी ॥२०॥

श्रीकृष्ण व ज्ञानेश्वरांची तुलना

नंदाच्या वृंदावनीं । सुख ते रात्रभरी ग ।
ज्ञानेश्वरांचे पायीं । अखंड सुखाकारी ग । मोहन० ॥२१॥
भक्तांच्या भावनेनें । मिळे तो कृष्णराव ।
सद्गुरु तैसा नोहे । भावनातीत ठेव ग ॥२२॥
स्वरूपमयी तनू । बाई डोळियांमाजीं दिसे ग ।
अखंड अविकारें । बाई प्रणवीं प्राण वसे ग । मोहन० ॥२३॥
स्वरूपीं स्वरूपीं ब्रह्मभाव । पदार्थी वृत्तिनांव ग सखुगडणी ।
सगूणी सगूणीं वृत्तिधांव ग सखुगडणी ॥२४॥ (य९उ.४९१)
देवाच्या देवाच्या भक्तिमूळे । विश्वांत झालें द्वैत ग सखुगडणी ।
सद्गुरू सद्गुरू भक्तिमूळें । विश्वचि ब्रह्माद्वैत ग सखुगडणी ॥२५॥
देखियला डोळां । राधेसहित पुतनारी ।
निर्विकल्प समाधीनें । ऐसा प्राप्त नोहे हा हरी ॥२६॥
सर्वत्र सुखदानें । नंदाचें बाळ तान्हें ।
पहातां डोळेभरी ग बाई । कंदर्प वाटे साने ॥
पारणें लोचनाचें । फिटलें तिन्ही काळीं ।
अगम्य श्रुतीशास्त्रां । प्रगट वनमाळी ॥ चाल सखु चाल ग० ॥
आजपाजप थोडा । बाई जयाच्या नामापुढें ।
जयाच्या प्रेमासाठीं । कैवल्य वाटे थोडें ॥ चाल सखु चाल ग० ॥
नंदजीसम राजा । यशोदासम राणी ।
श्रीकृष्णासम बाळ । सर्वदां मागू वाणी ॥ चाल सखु चाल ग० ॥
आमुचें पंचप्राण । ओवाळूं बाळाहूनी ।
सात्विक राजबिंडा । न लावो दृष्टि कोणी ॥ चाल सखु चाल ग ॥
सकळ सुखापाठीं । शोधीत हेंचि सुख ग ।
गोकुळीं नंदगृहीं । डोळां पाहिले कृष्णमुख ग ॥
मोहन गिरिधारी धारी राधा कृष्णाला प्यारी ग०॥

०००

# सयनाजीचे गाणे

*वऱ्हाडांत माडीपौर्णिमेचे वेळेस कुणब्याच्या बाया म्हणतात त्या चालीवर.*

२२३९

भुईवर पापाची दाटी झाली ॥ सयनाजी ॥
बरम्हा देवाले मात गेली ॥ सयनाजी ॥
बरम्हा म्हणतो रुसी देवा ॥ सयनाजी ॥
तुम्ही इस्नू तो आठवावा ॥ सयनाजी ॥
देव म्हणती बरम्हा भाई ॥ सयनाजी ॥
इस्नू आम्हाले मालूम नाही ॥ सयनाजी ॥
बरम्हा म्हनतो तुम्ही सारे ॥ सयनाजी ॥
माह्या चल्लाव बरोबर ॥ सयनाजी ॥
मंग ते निंघाले अवघे झन ॥ सयनाजी ॥
जिथ होता तो नारायन ॥ सयनाजी ॥
तिथे जाऊन पायावर ॥ सयनाजी ॥ (य९उ.४९२)
सम्दे करतील नमस्कार ॥ सयनाजी ॥
असी आयकून कारुना ॥ सयनाजी ॥
बोले दारकीचा राना ॥ सयनाजी ॥
तुम्ही आले हो कशासाठी ॥ सयनाजी ॥
कोन लागला तुमच्या पाठी ॥ सयनाजी ॥
देव म्हणती नारायना ॥ सयनाजी ॥
दइत गांजती आमच्या मना ॥ सयनाजी ॥
तहा बोलल्ला नारायन ॥ सयनाजी ॥
येतो अवतार मी घेऊन ॥ सयनाजी ॥
सम्दे राकेस मारीन ॥ सयनाजी ॥
देवका बाईच्या उधरी ॥ सयनाजी ॥
होईन दासाचा शाहाकारी ॥ सयनाजी ॥
तुम्ही चालावे आपुल्या घरी ॥ सयनाजी ॥
चित्त ठुवावे ज्ञानेश्वरी ॥ सयनाजी ॥

कृष्णजलम

गोकुई किस्नाचा जलम झाला ॥ सयनाजी
यशोदा बाईले हरिख आला ॥ सयनाजी
चलना गडनी मिवून जाऊ ॥ सयनाजी
सावया गोइन्दू डोया पाहू ॥ सयनाजी
सिरष्टि उत्पन्न ज्यान केली ॥ सयनाजी
मूरती गवयाच्या घरी आली ॥ सयनाजी
ते पाय पाह्यता डोये भरी ॥ सयनाजी
आवडी वाढते ज्ञानेश्वरी ॥ सयनाजी ॥
अष्टमी बुधवार । वैशाख कृष्णराती ग ।
आनंद झाला तोची । जन्मो जन्मीचा हो सांगाती ॥

०

सोपानदेवांचा साक्षात्कार

२२४० / गाणें

(* कुऱ्हा येथें महाराजांस सोपान देवांचा साक्षात्कार झाला त्या वेळचें गाणें आहे.)

''द्राक्षांचे मंडप बाई'' या चालीवर.

सुंदर सावळी तनू । पाहोनीयां डोळेभरी ।
उडालें ग चित्त माझें । न बैसेचि मोक्षावरी ।
कृष्णचरण सेवेसाठी । धाव घेत परोपरी ॥ (य९उ.४९३)

०००

२२४१

उत्सव समयींचे उद्गार.

आमुच्या प्रभुजीचा । जाहला भाग्योदय ।
मंगळ विश्वठाय ग बाई । मंगळ विश्वठाय ॥
अमुच्या दीनानाथा । सर्वदां हो कल्याण ।
पांचाचे पन्नास हो ग बाई । व्रजीं सौख्यनिधान ॥

आरती सूर्याची

२२४२

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- भूप. ता.-दादरा. गौण.-जयदेव जयदेव जय पांडुरंगा, या चालीवर

जयदेव जयदेव जय संज्ञाकांता ।
आरति ओवाळीते तुज करुणावंता ॥धृ॥
सर्व सत्त्व तेज एकत्र झाले ।
आदित्य-स्वरूपें अनुभवा आले ॥ जयदेव० ॥१॥
नित्य ज्ञान ध्यान विवेका करी ।
शुद्धसत्वरूपें येती आकारी ॥ जयदेव० ॥२॥
ज्ञानेश्वरकन्या विनवी निजभावे ।
श्रीकृष्णें प्रेमे मज पर्णूनी न्यावें ॥ जयदेव० ॥३॥

२२४३

आरती नृसिंहाची - १

सामनुष्टुपवृत्त. मूळ.- भूप. ता.-दादरा. गौण.-जयदेव जयदेव जय पांडुरंगा, या चालीवर

जयदेव जयदेव जय नरहरिराया ।
आरती ओवाळीते चिंतुनि तव पाया ॥धृ॥
सत् चित् सुखघनरूपी देखियला डोळा ।
जीवन्मुक्ती पाउनि ब्रह्मी सुखसोहळा ।
नरजीवामाजी जो सिंहस्वरूप ।
एकचि परमानंद व्यापक चिद्रूप ।
ज्ञानेश्वरकन्या जोडुनि कर दोन्ही ।
विनवी हे लक्ष्मीपति ठेवी निजचरणी ॥

२२४४ / आरती नृसिंहाची - २

सामनुष्टपवृत्त. मूळ.- पूर्या. ता.- धुमाळी. गौण. 'जयजय त्रिंबक राजा' या चालीवर

जयदेव जयदेव जयजय स्वामी नरकेसरी हो ।
ओवाळू आरती माझें निवटी सारे अरी हो ॥धृ॥
रक्षिला प्रल्हाद घेवोनिया मांडीवरी हो ।
अवस्था तिहींच्या जो कां ठाण मांडीवरी हो ॥१॥
श्रीज्ञानेश्वररूपें हृदयीं राही नारायणा हो ।
चहुंही वाचा करिते तुझिया नाम-पारायणा हो ॥२॥
(यष्टी उ.९ पान ४९४)

॥ पदांची गाथा समाप्त ॥

०००